कवणअसेत्रासदेता॥शिक्षाकरीनमीआतां॥तयालागींनिश्चयें॥६॥अगानृपवेषधारीतूं असून॥शूद्रकर्मीहोसीनिपुण॥कांकरिसीव्यर्थताडन॥गोवृषभाकारणें॥७॥कींअर्जुनासहितनिश्चिती॥अंतर्हितजाहलारुक्मिणीपती॥ह्मणूनिनिरपराधगोदंपती॥पदेंताडिसीदुरात्म्या॥८॥यास्तवतुजलासांप्रत॥देतोंदेहांतप्रायश्चित्त॥हेंअधमापरिसेंमात॥गर्वकायसावागविसी॥९॥हेंवृषभापरिसेंवचन॥शोभेतुझाश्वेतवर्ण॥त्रिपदविकलकरिसीगमन॥एक्यापदेंमहीवरी॥१०॥तस्मातूंवृषरूपधर॥होसीप्रत्यक्षअमर॥आह्मांसिदेखूनिशोकफार॥किमर्थकरिसीसांगबा॥११॥यापांडवराष्ट्रांतजाण॥दुःखीनसेतुह्मांवांचुन॥आतांशूद्रभयापासून॥करितोंरक्षणनिश्चयें॥१२॥हेधेनोपरिसेंवाणी॥कांअश्रुआणिसीलोचनीं॥प्रजाजनादुष्टांपासूनी॥अपकारहोतीज्याराष्ट्रीं॥१३॥तयाराजाचेंहोयक्षीण॥कीर्तिभाग्यआयुष्यजाण॥करावेंअनाथरक्षण॥मुख्यधर्मराजाचा॥१४॥यास्तवजाणायेक्षणीं॥दंडकरीनशूद्रालागुनी॥हेंवृषभासौख्यखाणी॥तुझेपादकोणींभंगिले॥१५॥माझेकीर्तिविनाशकर॥जाहलाकोणमहीवर॥निरपराधींअपराधकरीनिर्जर॥तरीत्याचाकरछेदीनमी॥१६॥करावेंप्रजापालन॥हामुख्यधर्मरायालागुन॥ऐसेंऐकूनियांभाषण॥धर्मबोलेनृपातें॥१७॥तुह्मांपांडुकुलोद्भवजाण॥योग्यचिहेंआतांअभयदान॥परीनजाणेंमीदुःखकारण॥कोणअसेमजलागीं॥१८॥कोणीकर्मकोणीस्वभाव॥कोणीह्मणतीनिजदैव॥सुखदुःखभोगविलेंसदैव॥यथार्थभावनकळेहो॥१९॥नंतरभूपभाषणकरी॥तपशौचदयासत्यचारी॥कृतयुगामाझारीं-चरणतुझेहेहोते॥२०॥तेअधर्मेंकरूनिनिश्चित॥त्रिपादभंगलेयथार्थ॥आतांएकपदनोहीलरित॥भंगकरूंपाहेकली॥२१॥हेंहीभाराक्रांतगमेक्षोणी॥ऐसेंबोलूनिकोपलामनीं॥नृपहोऊनिखड्गपाणी॥कलिवधावयाधांवला॥२२॥

इतुक्यांमाजी कली येउन ॥ दृढ धरी राया चे चरण ॥ ऐसा तो शरणागत पाहुन ॥ केलें रक्षण ते धवां ॥ २३ ॥ नृपति ह्मणे
परिसें मात ॥ त्वां न सावें माझ्या राज्यांत ॥ गमन करावें इच्छित ॥ स्थानीं येथुन लवलाहें ॥ २४ ॥ कली प्रार्थुनी बोले रा
या ॥ स्थळ देणें वसावया ॥ पांच ग्रामें सौख्य ठाया ॥ पृथ्वीवरी मज लागीं ॥ २५ ॥ ऐसें ऐकूनियां वचन ॥ तया देऊनि अभ
यदान ॥ पांच स्थानें दिधलीं कवण ॥ त्यांची खुण परियेसा ॥ २६ ॥ स्त्रिया मद्य पान द्यूत ॥ हिंसा स्वर्ण निश्चित ॥ ऐसें होतां
तां अकस्मात ॥ वृषभासि पाय फूटले ॥ २७ ॥ गायींसी संतोष जाहला ॥ या परी कलि निग्रह केला ॥ नंतर परीक्षिती भ-
ला ॥ गजपुरीं गेला स सैन्य ॥ २८ ॥ यथान्याय राज्य करी ॥ प्रजा पाळी पुत्रापरी ॥ सर्वदा ही निजांतरीं ॥ गोपाळकृष्ण
स्मरतसे ॥ २९ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ प्रथमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ सप्तदशाध्याय गो
ड हा ॥ ३० ॥ १७ ॥ अष्टादशाध्यायप्रारंभः ॥ सूत ह्मणे परिसा मात ॥ परीक्षिती मातेचे उदरांत ॥ असतां द्रोणीसो
डी निश्चित ॥ ब्रह्मास्त्र त्यातें जाळावया ॥ १ ॥ तेथें त्याचें रक्षण ॥ करिता जाहला नारायण ॥ पावला नाहीं मरण ॥ प-
रम भागवत जाण हा ॥ २ ॥ तैसाच तो परीक्षिती ॥ विप्रशाप होतां अंतीं ॥ खिन्नता न दावूनि आपुले चित्तीं ॥ विचार क-
रिता जाहला ॥ ३ ॥ श्रीकृष्णपादीं अर्पूनि चित्त ॥ सार्वभौम परि होऊनि विरक्त ॥ गंगातटाकीं पातला निश्चित ॥ सर्वसं
गपरित्यागें ॥ ४ ॥ श्रीशुकाचा शिष्य आपण ॥ होऊनि संपादी ब्रह्मज्ञान ॥ गंगेंत देहा त्यागून ॥ मोक्षभुवन पावला ॥ ५
जों वरी अभिमन्यूकुमर ॥ राज्य करीतसे पृथ्वीवर ॥ कलीचा प्रभाव तों वर ॥ झाला नाहीं भूमीवरी ॥ ६ ॥ एके काळीं परी
क्षिती ॥ धनुष्यबाण घेऊनि हातीं ॥ चतुरंग सेना संगती ॥ मृगयार्थ निघाला ॥ ७ ॥ तेथें मृग शार्दूळ भालुक ॥ शशक
व्याघ्र जंबुकादिक ॥ ऐसीं वधिलीं श्वापदें अनेक ॥ तों मध्यान्हकाळ जाहला ॥ ८ ॥ सेना मागें राहिली ॥ क्षुधा तृषा रा

यालागली॥वनीं भ्रमतांचरणचाली॥श्रमयुक्तहोयतदा॥ ९ ॥यापरीपरीक्षिती॥कांतारभ्रमतांअवचिती॥शमीकमु-
नीचाआश्रमनिश्चिती॥पाहेतेव्हांरमणीयतो॥ १० ॥आश्रमपरमशोभित॥रावप्रवेशेपाहूनित्यांत॥तंवशमीकमु-
निसमाधिस्थ॥आत्मानात्मविचारें॥ ११॥ऐसेंपाहूनिपरीक्षिती॥उदकमागेतयाप्रती॥तंवतोनबोलेविदेहस्थि
ती॥तैंभूपतीसंतापे॥ १२॥त्यापासूनिनमिळतांपाणी॥राजाबोलेतयेक्षणीं॥मीयेथेंआलोंअसूनी॥सत्कारकांहीं
नकेला॥ १३॥दांभिकजाणूनियांब्राह्मण॥भूपकरीत्याचेंछलन॥मृतसर्पधनुःकोटीनेंघेऊन॥कंठींघालीतयाचे॥
१४॥ऐसेंकृत्यपरीक्षार्थ॥करूनियांनृपनाथ॥सेनेसहितहस्तनापुरांत॥जाताझालातेधवां॥१५॥तोंयेरीकडेशमीक
सुत॥शृंगीनामावनींखेळेनिश्चित॥समवयस्कबाळकांसमेत॥तयासिवृत्तसमजलें॥ १६॥क्रोधयुक्तहोऊनि-
मुनिसुत॥बोलताजाहलाबालकांप्रत॥अहोराजेमहीवरीसमस्त॥अधर्मकामीजाहले॥ १७॥तेभासतीकाव-
ळ्यांपरी॥जेक्षत्रियब्राह्मणाचेघरीं॥यष्टीधरूनियांकरीं॥द्वाररक्षणकरणारे॥ १८॥ब्राह्मणाचेआज्ञेंकरून॥त्यां
हींकरावेंपृथ्वीचेंरक्षण॥ऐसेंअसतांवर्तमान॥कायनवलावजाहला॥ १९॥अधर्मीराजांचासंहार॥करणाराश्री
कृष्णवीर॥निजधामींगेलियावर॥दुष्टचरित्रघडलेंहें॥२०॥विप्राचेंबळपहासांप्रत॥ऐसेंबोलूनिशमीकसुत॥
करूनिलोचनआरक्त॥अद्भुतकर्मदाखवी॥२१॥कौशिकीनदीमाजीजाण॥उदकेंकरूनिआचमन॥शापदेताजाह-
लादारुण॥तोऐसामुनिवरहो॥ २२॥आजपासूनिसातवेदिनीं॥परीक्षितीसीतक्षकयेउनी॥दंशकरीलनिश्चयेंक
रूनी॥भस्मीभूतहोवोतेथें॥२३॥ऐसेंबोलूनिसत्वर॥आश्रमींपातलाकुमर॥सर्पवेष्टितपितादेखूनिसाचार॥आ-
क्रोशकरीबहु॥२४॥करूनीसमाधीचेंविसर्जन॥पाहेस्वकंठींभुजगदारुण॥तोंदाकीतैंपुत्रकरीरुदन॥हेंजाणूनिमु

निह्मणे॥ २५ ॥ हे पुत्राकायजाहलें॥ कवणेंतुलादुखविलें॥ किमर्थनेत्रींउदकपातलें॥ सर्वकारणसांगबा॥ २६॥ ऐसी परिसूनिवाणी॥ शृंगीनेंकथिलेंतेक्षणीं॥ तेंसर्ववृत्तपरिसूनिमुनी॥ बोलताजाहलातयातें॥ २७॥ कुमाराहेंसुत्कनकेलें॥ सार्वभौमरायासिशापिलें॥ स्वल्पापराधास्तवतुवांदंडिलें॥ आतांकायकरावें॥ २८॥ याराजाचेप्रभावेंकरून॥ प्रजासुखीआहेतसंपूर्ण॥ ऐशाराजियायेतांमरण॥ राष्ट्रांततस्करहोतीलकीं॥ २९॥ आपणजाहलोंअधर्मरत॥ सद्धर्मबुडालासागरांत॥ वर्णसंकरहोईलत्वरित॥ तोनृपशापायोग्यनसे॥ ३०॥ याबालकेंअपक्कबुद्धीकरून॥ घेतलाभागवताचाप्राण॥ हेप्रभोयापातकापासून॥ करीरक्षणआसुचें॥ ३१॥ ऐसाअनुतप्तमुनिवर॥ होऊनियांसत्वर॥ गजपुरामाजीसमाचार॥ शिष्यद्वारेंपाठवी॥ ३२॥ सावधव्हावयापरीक्षिती॥ शमीकऋषीनेंकेलीयुक्ती॥ आतांराजाचीविरक्ती॥ अग्रभागींअवधारा॥ ३३॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ प्रथमस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसरवारासविरचित॥ अष्टादशाध्यायगोडहा॥ ३४॥ १८ ॥ एकोनविंशाध्यायप्रारंभः ॥ सूतबोलेशौनकासी॥ हस्तनापुरींतेजोराशी॥ परीक्षितीभूपमानसीं॥ चिंतनकरिताजाहला॥ १॥ अहोमीकेसापापिष्ठ॥ वनींजाऊनियांकष्ट॥ ब्राह्मणासीदिलेस्पष्ट॥ कायअदृष्टसांगावें॥ २॥ विप्रशापरूपदंड॥ प्राप्तहोवोमजउदंड॥ मागुतीमीकर्मप्रचंड॥ नकरीनऐसेंपैं व्हावें॥ ३॥ द्विजशापेंकरूनिजाण॥ होवोराज्यसंपत्तीदहन॥ ऐसेंकरीनृपचिंतन॥ तंवशमीकशिष्यपातला॥ ४॥ विप्रकुमरबोलेरायासी॥ ऋषिसुतेंशापिलेंतुजसी॥ आजपासूनिसातवेदिवशीं॥ तक्षकदंशहोईलबा॥ ५॥ तेणेंहोशीलभस्मीभूत॥ ऐसेंबोलूनिगेलात्वरित॥ परीक्षितीपरिसूनिमात॥ संतोषितजाहला॥ ६॥ स्वमृत्युकरितांश्रवण॥ वैराग्यबाणलेंमनींपूर्ण॥ हृदयींस्मरूनिनारायण॥ संसारींहोयविरक्ततो॥ ७॥ परमार्थसाधावयासत्वरी॥ रावगेलागंगातीरीं॥

सर्वसंगपरित्यागकरी ॥ अनशनव्रतें राहिला ॥ ८ ॥ मानस ठेवूनी मुकुंदचरणीं ॥ रावलागला हरिभजनीं ॥ ऐसें परिसूनि तें ऋषी ॥ मुनिवर भेटी पातले ॥ ९ ॥ अत्रिवसिष्ठच्यवन ॥ अरिष्टनेमि शरद्वान ॥ भृगुअंगिरागाधिनंदन ॥ पराशर भार्गवतें सेंची ॥ १० ॥ इंद्रप्रमदउतथ्यमुनी ॥ इध्मवाहमेधातिथिगुणी ॥ देवलआर्ष्टिषेण तेस्थानीं ॥ येते जाहले कौतुकें ॥ ११ ॥ भारद्वाजगौतम ॥ पिप्पलादमैत्रेयपरम ॥ और्वकवष निःसीम ॥ ज्ञानसागर जाणते ॥ १२ ॥ व्यासनारद अगस्ती ॥ देवर्षिब्रह्मर्षी निश्चिती ॥ सार्वभौम परीक्षिती ॥ पहावया पातले ॥ १३ ॥ सर्व मुनींचा सत्कार ॥ करूनियां मनोहर ॥ तयां बैसवूनि आसनावर ॥ पूजी भूपती सद्भावें ॥ १४ ॥ बद्धांजली होऊनि पुढती ॥ उभा राहे राजा परीक्षिती ॥ प्रायोपविष्ट निश्चिती ॥ आहें ह्मणूनी कळवील्यां ॥ १५ ॥ कृपा करूनी आपण ॥ दिधलें स्वामी मज लादर्शन ॥ आपुला अनुग्रह पूर्ण ॥ ह्मणूनी योग हा घडला कीं ॥ १६ ॥ मी धन्य सर्व क्षत्रियांत ॥ आजि जाहलों निश्चित ॥ विप्रशापअनुग्रहयुक्त ॥ मज लागीं जाहला ॥ १७ ॥ मी पापी गृहासक्त ॥ जाणूनि कृपा केली बहुत ॥ ब्रह्मस्वरूप प्राप्त्यर्थ ॥ उपाय उत्तम सत्संग ॥ १८ ॥ यथासुखें करून ॥ तक्षक हरो माझे प्राण ॥ हे विप्र होई ईश्वरपरायण ॥ काळक्रमणहें ह्मावें ॥ १९ ॥ परम पावन विष्णुगाथा ॥ श्रवण करवा समर्था ॥ अनाथ पामर शरण आतां ॥ चरणीं तुमचे पातलों ॥ २० ॥ जों वरी राहे कलेवर ॥ सप्राण माझें तोंवर ॥ श्रीकृष्णाचरितामृतसार ॥ श्रवण करवा दासातें ॥ २१ ॥ मी जाईन ज्या जन्मांत ॥ त्या त्या जन्मांतरीं निश्चित ॥ सत्पुरुषांची मैत्री बहुत ॥ घडो मातें कृदेवें ॥ २२ ॥ अखिलविप्रांसि याकरितां ॥ नमस्कार करितों आतां ॥ कृपा करूनी समर्था ॥ पावन करा दासातें ॥ २३ ॥ ऐसा निश्चय करूनी पूर्ण ॥ काय करी अभिमन्युनंदन ॥ स्वपुत्र जनमेजया लागुन ॥ राज्यासनीं बैसवी ॥ २४ ॥ नंतर आपण गंगातीरीं ॥ राहूनियां तें अवसरीं ॥ पूर्वा-

भिमुखकुशाग्रांवरी ॥ उत्तराभिमुखबैसला ॥ २५ ॥ यापरीसार्वभौमनृपति ॥ मरणावधीअनशनव्रती ॥ संकल्पक
रूनीआपुलेचित्तीं ॥ उपाधिरहितबैसला ॥ २६ ॥ तेव्हांस्वर्गातूनिसुरवर ॥ पुष्पवृष्टीकरितीराजावर ॥ वाद्येंवाजवि
तीअपार ॥ नादअंबरींकोंदाटला ॥ २७ ॥ तेथेंमहर्षीबोलतीवचन ॥ परीक्षितीराजाधन्यधन्य ॥ देहाचेंसार्थककेलेंपू
र्ण ॥ समाधानपैंजाहलें ॥ २८ ॥ मुनिवरबोलतीपरस्पर ॥ सांप्रतभागवतराजेश्वर ॥ कलेवरत्यागूनिस्वर्गासिसत्वर ॥
जाईलतोंवरीअसावें ॥ २९ ॥ तेव्हांपक्षपातरहित ॥ समजूनिमुनिवाक्यार्थ ॥ वंदनकरूनीपरीक्षित ॥ बोलताजाहला
सद्भावें ॥ ३० ॥ म्रियमाणजाहलियानर ॥ कायकरावेंतेणेंसाचार ॥ पापनिर्मुक्तहोऊनिपर ॥ लोकींसौख्यघडाव-
या ॥ ३१ ॥ शास्त्रेंपाहूनिअनेक ॥ येविषयींकरावाविवेक ॥ भाषणऐकूनियांचोख ॥ आगमनिगमविचारिती ॥ ३२
तोंइतुक्यांमाजीजाण ॥ तेथेंपातलेव्यासनंदन ॥ षोडशवार्षिकतरुण ॥ श्यामसुंदरअवधूत ॥ ३३ ॥ श्रीशुकपा
हूनिदिगंबर ॥ उत्थापनदेतीमुनीश्वर ॥ ऐसापाहूनिचमत्कार ॥ मस्तकेंनृपवंदनकरी ॥ ३४ ॥ पूजाअर्पूनिषोडशी
आसनीबैसवीतयासी ॥ चंद्रापरीसभावकाशीं ॥ शोभताझालायोगींद्र ॥ ३५ ॥ मस्तकनम्रवूनिमधुर ॥ बोलताजाह
लाअभिमन्युकुमर ॥ कृपाकेलीदीनावर ॥ दीननाथेंयेधवां ॥ ३६ ॥ आपुल्यास्मरणेंकरून ॥ गृहहोतेंबापावन ॥
आतांप्रत्यक्षजाहलेंदर्शन ॥ कायभाग्यमाझेंहें ॥ ३७ ॥ योगींद्रासन्निधअसतां ॥ पुरुषांचींपातकेंनाता ॥ जळती
क्षणनलागतां ॥ विष्णुसन्निधदैत्यजेसे ॥ ३८ ॥ पांडवांसप्रियश्रीकृष्णनाथ ॥ ज्यांचेंसर्वकृत्यसतत ॥ प्रीत्यर्थ ॥ मींजन
ल्मलोंतयांचियागोत्रांत ॥ ह्मणूनिभक्तीतयावरी ॥ ३९ ॥ म्रियमाणासीदर्शन ॥ त्याचेंह्मावयादुर्लभजाण ॥ परंतु
योगिरायातूंसद्गुरूह्मणून ॥ प्रश्नकरितोंसद्भावें ॥ ४० ॥ प्राणियांसीअंतकाळीं ॥ कर्तव्यकर्मपद्धतीसकळी ॥ की

र्तनभजनसौख्यमेळीं ॥ अकृत्यकार्यतेंहीवदा ॥ ४१ ॥ आपणगृहस्थांचेघरीं ॥ माध्यान्हींजातांल [illegible] ॥ तस्मात्
कृपाकरूनीदासावरी ॥ मनोरथपूर्णकरावे ॥ ४२ ॥ सूतह्मणेशौनकासी ॥ परिसूनिनृपवाक्यासी ॥ [illegible]ंगताजाह-
ला अध्यात्मासी ॥ यथासांगश्रीशुक ॥ ४३ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ प्रथमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसरवारा-
मविरचित ॥ एकोनविंशाध्यायगोडहा ॥ ४४ ॥ १९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्रीमद्द्वारकानाथायनमः ॥

इतिश्रीमद्भागवतसारामृतेप्रथमस्कंधःसमाप्तः



अथश्रीमद्भागवतसारामृते द्वितीयस्कंधप्रारंभः



श्रीगणेशायनमः॥ श्रीसरस्वत्यैनमः॥ श्रीगुरुभ्योनमः॥ ॥सूतह्मणेऋषींलागुन॥परिसाचरित्रपावन॥याद्वि
तीयस्कंधामाजीजाण॥कायसंवादवर्तला॥ १ ॥परीक्षितीरायश्रीशुकासी॥पूजाकरूनीसद्भावेंसी॥करिताजा
हलाप्रश्नासी॥परमसौख्यनिधीतें॥२॥मरणोन्मुखजाहालियानर॥तेणेंकायकरावेंसाचार॥कवणेपरीचा
आचार॥करणेंनकरणेंतेंवदा॥३॥श्रीशुकह्मणेपरीक्षिती॥राजाधन्यतुझीमती॥लोकहितकारकनिश्चिती॥
आत्मसंमतीप्रश्नहा॥४॥बापातुझेप्रश्नेंकरून॥होईलजगसर्वपावन॥राजेंद्राकरा वयाश्रवण॥बहुतग्रंथअ
सतीपें॥५॥तथापिआत्मज्ञाना॥नपावूनिकुतर्कनाना॥करितीगृहासक्तजाणा॥दारासुतधनालोलुपजे॥६॥त्यां
चेंआयुष्यनेमस्त॥निद्रेमाजीगेलेंनिशांत॥दिवसाव्यवहारबहुत॥करितांकरितांभागले॥७॥परिश्रीहरिभज-
नांत॥मानसनलाविती किंचित॥आहेदेहअशाश्वत॥हाकांहींविचारनातुडे॥८॥माझेआईबापमले॥महामृत्यु
पंथेंचिगेले॥हेंमानसींनाणूनिआपले॥मायाजाळेंभ्रमतीपें॥९॥चिरंजीवमानूनिआपणा॥व्यवसायकरिती
नाना॥परीश्रीहरीचेभजना॥नलावीलक्षपामरतो॥१०॥नपाहतीआत्महित॥धनदारागृहासक्त॥लोकजाहले
समस्त॥यागुणेंभ्रमलेबहु॥११॥अभयेच्छाज्याचेमनीं॥असेलत्यानेंचक्रपाणी॥सर्वात्माहरीसद्गुणी॥एकनि
ष्ठेंभजावा॥१२॥श्रवणकीर्तनस्मरण॥करावयायोग्यपरमपावन॥पुरुषांलागींनारायण॥अंतींस्मरणतयाचें॥१३
हाचीजाणापरमलाभ॥ह्मणूनिविधिनिषेधत्यागूनिस्वयंभ॥ब्रह्मनिष्ठअसतांपद्मनाभ॥गुणानुकथनेंरमतीबहू
१४॥ ॥श्लोक॥ इदंभागवतंनामपुराणंब्रह्मसंमितं॥अधीतवान्द्वापरादौपितुर्द्वैपायनादहम्॥८॥ टीका ॥ भ
गवन्नामगुणमंडित॥साक्षातआहेभागवत॥महापुराणब्रह्मसंमत॥यथार्थवर्णनवेदापरी॥१५॥तेंतूंह्मणशी-

लक्षणेपरी ॥ प्राप्तजाइलें तुह्मासी सत्वरी ॥ तरी तयाचा प्रकार अवधारीं ॥ कथन करितों राजेंद्रा ॥ १६ ॥ पूर्वी द्वापार
युगांत ॥ महामुनी द्वैपायन समर्थ ॥ माझा पिता योगिनाथ ॥ महाविष्णूचा अवतार जो ॥ १७ ॥ तयापासूनि जाण
केलें भागवताध्ययन ॥ श्रीकृष्णसद्गुणें करून ॥ मोहित झालें मन माझें ॥ १८ ॥ राया तुला सात दिवसांत ॥ सांगेन तें
समस्त भागवत ॥ खट्वांगराजानें एक मुहूर्तांत ॥ सार्थक केलें जन्माचें ॥ १९ ॥ सप्तदिवस आयुष्य उत्तर ॥ परीक्षिती तुज
आहे साचार ॥ तावत्कालपर्यंत मनोहर ॥ उत्तम धारणा करावी ॥ २० ॥ जितासन जितश्वास ॥ जितेंद्रिय होऊनि सा-
वकाश ॥ सगुणस्वरूप रमाविलास ॥ हृदयामाजी आणावा ॥ २१ ॥ विराट्देहाचें ध्यान ॥ राया करी तूं पावन ॥ विश्वांत
रात्मा नारायण ॥ सद्गुण त्याचे वर्णावे ॥ २२ ॥ त्या श्रीहरीचें पादमूळ ॥ मानवेंद्रा जाण पाताळ ॥ चरणाचा रसातळ ॥
पश्चिमभाग जाणिजे ॥ २३ ॥ घोंटे त्याचे महातळ ॥ जंघा त्याच्या तळातळ ॥ जानू तयाचे सूतळ ॥ अतळ वितळ मांडि
या ॥ २४ ॥ पृथ्वी तयाची कटी ॥ नभस्थल नाभी गोमटी ॥ वक्षस्थळाचे निकटीं ॥ स्वर्गलोक जाणिजे ॥ २५ ॥ कंठ जयाचा मह
र्लोक ॥ ललाट श्रीहरीचें तपोलोक ॥ मस्तक तें सत्यलोक ॥ इंद्रादि बाहू कर्ण दिशा ॥ २६ ॥ घ्राणेंद्रिय अश्विनीकुमार ॥ मु
ख हरीचें वैश्वानर ॥ अंतरिक्षलोक साचार ॥ नेत्रगोलक श्रीहरीचे ॥ २७ ॥ चंद्रसूर्य ज्याचे लोचन ॥ शीतोष्णातें प्रकाशमा
न ॥ दिवसयामिनी संपूर्ण ॥ पापण्या जाण विष्णूच्या ॥ २८ ॥ नैशा भ्रुकुटी मनोहर ॥ ब्रह्मपद जाणा साचार ॥ तालुस्थान
सुंदर ॥ सर्व उदकें जिव्हारस ॥ २९ ॥ मस्तक जयाचें निगम ॥ तीक्ष्णदाढा प्रत्यक्ष यम ॥ स्नेहलेश दंत परम ॥ माया हा
स्य श्रीहरीचें ॥ ३० ॥ उत्तरोष्ठ लज्जा निश्चिती ॥ अधर लोभ संपत्ती ॥ धर्म स्तन पृष्ठी अधर्मस्थिती ॥ लिंग प्रजापति जा
णिजे ॥ ३१ ॥ मित्रवरुण दोघे जण ॥ जाण श्रीहरीचे वृषण ॥ सप्तसमुद्र कुक्षिस्थान ॥ प्रविष्ट होती राजेंद्रा ॥ ३२ ॥ अ

स्थींचेसंघपर्वत॥नाड्यासरितानिश्चित॥वृक्षजगतीचेसमस्त॥रोमस्थानींकल्पिले॥३३॥श्वासोच्छ्वाससमीर॥
जयाचाअसेसाचार॥अनंतकाळगतीघोर॥कर्मसंसारप्रवाहजो॥३४॥केशस्थानींमेघमंडळ॥प्रातःकाळसायं-
काळ॥हींप्रभूचींवसनेंसोज्वळ॥प्रकृतीह्रदयमनशशी॥३५॥महत्तत्त्वजयाचें चित्त॥अहंकाररुद्रदेवत॥नरखेंअ
श्वादिसमस्त॥श्रोणिदेशमृगादि॥३६॥शिल्पनेंपुण्यविचित्रता॥पक्षीआदिकरूनीताता॥स्वायंभुवमनुजाणतल
तां॥बुद्धिस्थानींतयाचे॥३७॥सर्वमानवनिवासस्थान॥त्यापरमात्म्याचेंपावन॥गंधर्वविद्याधरचारण॥स्वरआल्हा
दकारक॥३८॥प्रल्हादस्मरणतयाचें॥धरामरमुखसाचें॥भुजाक्षत्रियऊरूचे॥गयींवैश्यकल्पिले॥३९॥शूद्रजयाचे
चरण॥ऐसेंविराटस्वरूपवर्णन॥राजाकेलेंतुजलाकथन॥करींध्यानश्रीहरीचें॥४०॥श्रीमद्भागवतसारामृत॥द्विती
यस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥प्रथमाध्यायगोडहा॥४१॥ १ ॥ द्वितीयाध्यायप्रारंभः ॥श्रीशु
कह्मणेपरीक्षिती॥धारणाकरूनीआपुलेचित्तीं॥सदासर्वदारमापती॥प्रेमभावेंभजावा॥ १॥ श्लोक ॥सत्यांक्षि
तौकिंकशिपोःप्रयासैर्बाहौस्वसिद्धेह्युपबर्हणैःकिम्॥सत्यंजलौकिंपुरुधान्नपात्र्यादिग्वल्कलादौसतिकिंदुकूलैः॥४
टीका॥ ॥निद्रेसिअसतांपृथ्वीचोख॥मगकासियापाहिजेपर्यंक॥शय्यासंपादनार्थअनेक॥श्रमव्यर्थकायते॥
२॥बाहुअसतांआपणापाशीं॥मगकासयापाहिजेउशी॥असतांहस्तांजळीपरियसी॥भोजनपात्रकासया॥३॥
दिशाहींचवस्त्रेंसाचार॥वल्कलादिहीअसल्यावर॥कासयापाहिजेपीतांबर॥वस्त्रेंअनेकपरिधावया॥४॥ श्लो॰
चीराणिकिंपथिनसंतिदिशंतिभिक्षांनैवांघ्रिपाःपरभृतःसरितोप्यशुष्यन्॥रुद्धाःगुहाःकिमजितोऽवतिनोपसन्नान्
कस्माद्भजंतिकवयोधनदुर्मदांधान्॥५॥ टीका ॥अन्नोदकदेहाकरितां॥कैसेंमिळेलताता॥ऐसीकरावयाचिंता॥

कांहींकारणतेंनसे॥ ५ ॥सदयत्हृदयभगवंत॥तेणेंनिर्माणकेलेंसमस्त॥मनुजासाधायापरमार्थ॥उपायबहुतअ
सतीकीं॥ ६॥पथींवस्त्रखंडेंजीर्ण॥नसतीकींकरावयाआच्छादन॥वृक्षतेपरोपकारीजाण॥फळभिक्षानदेतीकीं॥ ७
शफकजाहल्यानद्याकायी॥गुहारुद्धकायपाहीं॥भक्तांचेंरक्षणशेषशायी॥नकरीकायसर्वदा॥ ८॥ऐसेपदार्थस
र्व॥निर्माणकरीभक्तास्तव॥कृपाजलधिवासुदेव॥विश्वसाक्षीपरमात्मा॥ ९॥जोवैराग्यशीलजन॥तेणेंऐसावि
चारकरून॥स्वदेहकरूनीपोषण॥श्रीहरिभजनींरतव्हावें॥ १०॥परंतुधनदुर्मदलोकां॥सन्निधजाऊनियांपैका
संपादनकरणेंहाधोका॥परमार्थासीअसेकीं॥ ११॥स्वस्थकरूनीनिजचित्त॥त्हृदयींचिंतावाभगवंत॥तेणेंअवि
द्यासमस्त॥लयाजायनिर्धारें॥ १२॥तीयोगधारणासोडून॥विषयचिंतीलप्राज्ञकवण॥योगियानेंत्हृदयींपावन
ध्यानकरावेंसद्भावें॥ १३॥प्रादेशमात्रपुरुषवर॥चतुर्भुजेंश्यामसुंदर॥शंखचक्रादिआयुधेंपरिकर॥धारणकरी
देवजो॥ १४॥पीतांबरपरिधान॥मुकुटकुंडलेंप्रकाशमान॥कौस्तुभश्रीवत्सचिन्ह॥वक्षस्थळींविराजे॥ १५॥
कंठींवनमाळासुंदर॥वरीगुंजारवकरितीभ्रमर॥प्रसन्नवदनमनोहर॥कमलनेत्रसाजिरें॥ १६॥कटींमेखला
विभूषित॥नूपुरेंकंकणेंसालंकृत॥ऐसेंश्रीहरीचेंध्यानसमस्त॥करावेंनिश्चितयोगियानें॥ १७॥हरीचाप्रत्येकअव
यव॥त्हृदयींठसल्यावरीसर्व॥नंतरदुसऱ्याअवयवास्तव॥प्रयत्नकरावासद्भावें॥ १८॥अष्टांगमूर्तीमनींपाहून
चित्तचतुष्टयाऐक्यकरून॥स्थिरकरावेंआपुलेंमन॥योगिरायेंनिश्चयें॥ १९॥सद्योमुक्तीपरीक्षिती॥परिसेंअं-
तांनिश्चिती॥आसनघालूनीएकांतीं॥भक्तियोगसाधावा॥ २०॥आपुलेअंगुष्ठेंकरून॥रुद्धकरावेंगुदस्थान॥षट्स्थानीं
प्रभंजन॥नेऊनिअधीनकरावा॥ २१॥प्रथमआधारचक्रापासून॥समीरकरूनिआकर्षण॥नाभीचक्रांतआणून॥त्ह

दयस्थानींपैंन्यावा ॥ २२ ॥ तेथूनी कंठमार्गें निश्चित ॥ तालुमूळीं अकस्मात ॥ वायू भ्रृकुटीचे ठायीं त्वरित ॥ नेऊनि स्थैर्य-
संपादीजे ॥ २३ ॥ तेथूनि ब्रह्मांडीं सत्वर ॥ प्रभंजन न्यावा मनोहर ॥ आपुल्या पिंडीं आणि ब्रह्मांडीं ईश्वर ॥ एकरूपी प-
हावा ॥ २४ ॥ ब्रह्मरंध्र करूनी भेदन ॥ करावें देहाचें विसर्जन ॥ ऐसें सद्योमुक्तीचें लक्षण ॥ राया तुला कथियेलें ॥ २५ ॥
आतां परिसें क्रममुक्ती ॥ पारमेष्ठ्यादि भोगसंपत्ती ॥ भोगणें असेल जरी चित्तीं ॥ तरी प्रकार परिसावा ॥ २६ ॥ योगेश्व
राची गती जाण ॥ त्रैलोक्यामाजी होते पूर्ण ॥ सुषुम्ना नाडी योगें करून ॥ शिशुमारचक्रीं तो जातो ॥ २७ ॥ लिंगदेहें
करूनी योगी ॥ तें चक्र उल्लंघून वेगीं ॥ महर्लोकातें उद्योगी ॥ गमन करितो नरदेवा ॥ २८ ॥ तेथूनि ब्रह्मलोकासी ॥ जा
ऊनि नित्य जी शोकासी ॥ ब्रह्मदेवासह निश्चयेसीं ॥ जातो मुक्तीसी सद्भावें ॥ २९ ॥ सद्योमुक्ती क्रममुक्ती ॥ विधीसी सां
गे रमापती ॥ आणिक मार्ग बहुत असती ॥ तयांत मुख्य हा असे ॥ ३० ॥ श्रवणकीर्तनादिक ॥ भागवतधर्माश्रयें देख
सर्वाश्रय भगवत्स्वरूपीं चोख ॥ भक्तियोग प्राप्त होय ॥ ३१ ॥ तस्मात् मुमुक्षूं लागून ॥ या भागवतधर्मा वांचून ॥ आ
णिक नसे साधन ॥ ब्रह्मांडमंडपामाझारी ॥ ३२ ॥ कर्तव्याकर्तव्य प्रकार ॥ श्रीशुकें रायासि कथिला सार ॥ मानवें सर्वदा
यादवेश्वर ॥ निजांतरीं भजावा ॥ ३३ ॥ तेणें चित्तशुद्धी होउन ॥ अंतीं पावे मोक्षभवन ॥ अग्र भागीं कथा पावन ॥ श्रवण-
करा श्रोते हो ॥ ३४ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ द्वितीयस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ द्वितीयाध्याय गो
डहा ॥ ३५ ॥ २ ॥ तृतीयाध्यायप्रारंभः ॥ श्रीशुक म्हणे परीक्षिती ॥ म्रियमाण असे जो जगतीं ॥ तेणें भजावी ब्रह्म-
मूर्ती ॥ सकामें किंवा निष्कामें ॥ १ ॥ ब्रह्मवर्चसकाम नर ॥ तेणें भजावा विष्णुकुमर ॥ इंद्रियकामें अमरेश्वर ॥ प्रजाका
मे दक्ष तो ॥ २ ॥ लक्ष्मीकामें पार्वती ॥ तेजस्कामें अग्नि निश्चिती ॥ द्रव्यकामें वसुपती ॥ वीर्यकामें रुद्र यजावा ॥ ३ ॥ अन्ना

दिकामेंजाण॥ साध्यीअदितीप्रमाण॥आयुष्यकामेंसगुण॥अश्विनीकुमारभजावे॥ ४ ॥पुष्टिकामनेंधरणी॥ द्यावा
पृथ्वीप्रतिष्ठेलागुनी॥रूपकामेंगंधर्वगणी॥स्त्रीकामेंउर्वशीभजावी॥ ५ ॥सर्वाधिपत्यकामज्यासी॥तेणेंभजावेंप
रमेष्ठीसी॥यशाकरितांयज्ञासीं॥कोशास्तववरुणातें॥ ६॥ विद्याकामेंशंकर॥दांपत्यकामेंउमासाचार॥धर्मकामेंरमाव
र॥वैकुंठविहारीपूजावा॥७॥पुत्रकामासिपितर॥बाधानिवृत्तीसीयक्षवर॥राज्यकामासिमनोहर॥मनुआराध्यजा
णिजे॥ ८॥शत्रुवधकामज्याचेमनीं॥ तेणेंभजावेंराक्षसांलागुनी॥विषयकामेंभजावानिशिदिनीं॥नक्षत्रनाथसद्भावें
९॥वैराग्यकामांसिश्रीहरी॥पूज्यअसेत्हृदयांतरीं॥ बलकामासिजाणायापरी॥मरुद्गणपूज्यपैंअसे॥ १०॥ मोक्षप्रा
प्तीसीसुंदर॥भक्तियोगेंमनोहर॥परमपुरुषसर्वेश्वर॥भवभयहरभजावा॥११॥सत्संगेंभगवद्भावपूर्ण॥साधक
पावेकरितांभजन॥हरिभक्तीविषयींकवण॥नरआसक्तीधरीना॥ १२॥शौनकह्मणेसूता॥श्रीशुकेंऐसेंकथितां॥
तेणेंनृपेंमगप्रश्नकोणता॥केलातेंचिवदावें१३॥ श्लोक आयुर्हरतिवैपुंसामुद्यन्नस्तंचयन्नसौ॥तस्यर्तेयत्क्षणोनीत
उत्तमश्लोकवार्तया॥ १७॥ टीका ॥हेसूतापरिसेंवचन॥ ह्मासूर्यउदयअस्तमान॥पावूनिआक्रमितांगगन॥आयुष्यह
रितोप्राण्यांचें॥ १४॥श्रीहरिकथेवांचून॥कायकरावेंजगींवांचून॥व्यर्थकालाचेंअतिक्रमण॥करूनिसार्थकतेंनाहीं॥१५॥
श्लोक॥ ॥तरवःकिंनजीवंतिभस्त्राःकिंनश्वसंत्युत॥नखादंतिनमेहंतिकिंग्रामपशवोपरे॥ १८॥ टीका ॥ वृक्षकायन
वांचती॥ भातेश्वासोच्छ्वासटाकिती॥श्वानसूकरादिपशुजाती॥ भक्षणमैथुनकरितीसदा॥१६॥आयुष्यसमाप्तीपर्यंत
ज्याचेकानींनपडेभगवंत॥तेनरपशुविषयासक्त॥गर्दभवराहश्वानापरी॥१७॥आतांत्यानरपशूंचीअंगें॥ निष्फळ
दिसतीयाप्रसंगें॥ हेसूताकथितोंचांगें॥अवधानेंपरिसावें॥ १८॥नराचेकर्णपुटींजाण॥कधींनपडेश्रीहरिगुण॥तरी

मूषकबिलवतत्याचेंश्रवण॥ जगामाजीनिर्धारें॥ १९॥ गायननकरीश्रीकृष्णगाथा॥ तीमंडूकजिव्हाजाणताता॥ श्रीहरीसीननमस्कारितां॥ भारभूतशिरदेखा॥ २०॥ देवपूजानकरीनर॥ शवापरीत्याचेकर॥ विष्णुमूर्तीनपाहेत्याचेनेत्र॥ शिखिपुच्छवतनिश्चिती॥ २१॥ तीर्थानजायतोवृक्ष॥ संतपदरजअंगावर॥ नधरीतोप्रेततुल्यनर॥ कायवांचूनीकेलेंतेणें॥ २२॥ श्रीविष्णुचरणींतुळसीदळ॥ जेंअर्पणकेलेंसोज्वळ॥ त्याचेंअवघ्राणनकरीजोखळ॥ प्रेतजिवंतजाणतो॥ २३॥ आपणअथवाअन्यजनीं॥ हरिगुणवाणिलेकीर्तनीं॥ तेऐकूनिजयाचेमनीं॥ विकारकांहींउद्भवेना॥ २४॥ रोमांचनाहींअंगावरी॥ त्याचेंहृदयलोहापरी॥ हेसूताअभक्ताचेंजन्मतरी॥ महीवरीव्यर्थकासया॥ २५॥ असोश्रीशुकेंकथिलेंजेंसार॥ परीक्षितीरायासिमनोहर॥ आत्मतत्त्वहरिगुणसुंदर॥ तेचिआज्ञानिवेदीं॥ २६॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ द्वितीयस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसखारामविरचित॥ तृतीयाध्यायगोडहा॥ २७॥ ३॥

चतुर्थाध्यायप्रारंभः

॥ सूतह्मणेमुनींद्रासी॥ ऐकूनिश्रीशुकवाक्यासी॥ परीक्षितीराजामानसीं॥ वैराग्यशीलजाहला॥ १॥ कृष्णकथाकरावयाश्रवण॥ अखंडज्याचेंसादरमन॥ देहजायासुतसदन॥ याविषयींउदासहोयपैं॥ २॥ छेदूनिममतेचापाश॥ रावजाहलानिराश॥ हृदयींचिंतूनिरमाविलास॥ श्रवणींसादरबैसला॥ ३॥ नंतरकरीप्रश्नपावन॥ हेयोगींद्रादयाकरून॥ ज्यातुह्मींहरिकथाकेल्याकथन॥ ऐकूनिधन्यमीजाहलों॥ ४॥ यायोगेंविषयस्नेहभंग॥ माझाजाहलाअभंग॥ हृदयींप्रगटलारमारंग॥ तेणेंसंतुष्टमीसदा॥ ५॥ श्रीहरीनेंसृष्टीउत्पन्न॥ केलीकैशीअनुक्रमेंकरून॥ तीचसांगाकृपाकरून॥ व्याससुत्रास्नेहाळा॥ ६॥ प्रश्नपरिसूनिइत्यादिक॥ बोलतेजाहलेश्रीशुक॥ श्रीकृष्णाचरणींनमनचोख॥ करूनभागवतआरंभिलें॥ ७॥ ज्याभगवंताचेंकीर्तन॥ स्मरणआणिस्वरूपावलोकन॥ करितांत्रैलोक्यहोतेंपावन॥ त्यातेंवंदनअसोसदा॥ ८

श्रवणहोतांज्याच्याकथेचें ॥ पापजातेंजन्मांतरींचें ॥ रक्षणकरीजोभक्तांचें ॥ त्यातेंवंदूंसद्भावें ॥ ९ ॥ योगीजननिःसंग ॥ प
रित्यागूनिउभयसंग ॥ स्वरूपींलावूनिअंतरंग ॥ सदाध्यातीजयातें ॥ १० ॥ त्याभगवंतासीनमस्कार ॥ करितोंमीवारंवा
र ॥ तपस्वीदानकरणार ॥ यशस्वीमंत्रजाणते ॥ ११ ॥ ऐसेसत्पुरुषजाण ॥ स्वकर्मेंकरितीजयाअर्पण ॥ तयावांचूनीक
ल्याण ॥ नमानितीआणिक ॥ १२ ॥ नमनत्याविष्णुचरणीं ॥ सदाअसोदिवसरजनीं ॥ कृपाकटाक्षेंकरूनी ॥ बहुतप्राणी
उद्धरीजो ॥ १३ ॥ श्लोक ॥ किरातहूणांध्रपुलिंदपुल्कसाआभीरकंकायवनाःखसादयः ॥ येऽन्येचपापायदुपा
श्रयाश्रयाःशुध्यंतितस्मैप्रभविष्णवेनमः ॥ १४ ॥ टीका ॥ किराततांम्रवदन ॥ आंध्रपुलिंदपुल्कसजाण ॥ आ
भीरकंकादियवन ॥ शिखानष्टजाणिजे ॥ १४ ॥ त्यांचासदाश्रयेंसाचार ॥ होतोजगामाजीउद्धार ॥ संतांआश्रयजोश्री-
करधर ॥ त्यातेंवंदनहेंअसो ॥ १५ ॥ तोभगवान्‌श्यामसुंदर ॥ अनुग्रहकरोआम्हांवर ॥ ज्याचीउपासनाब्रह्मादिसुर ॥
सर्वदातेकरितीहो ॥ १६ ॥ श्लोक ॥ श्रियःपतिर्यज्ञपतिःप्रजापतिर्धियांपतिर्लोकपतिर्धरापतिः ॥ पतिर्गतिश्चां
धकवृष्णिसात्वतांप्रसीदतांमेभगवान्सतांपतिः ॥ २० ॥ टीका ॥ रमापतीयज्ञाधिपती ॥ बुद्धिपतीलोकपती ॥ धरा
पतीअंधकपती ॥ वृष्णिसात्वतनाथजो ॥ १७ ॥ सत्यादिकभुवनांचा ॥ स्वामीअसूनिअखिलांचा ॥ आपत्कालींविश्वाचा
पालकसंरक्षोमजलागीं ॥ १८ ॥ कवीश्रीहरिध्यानेंकरून ॥ शीघ्रपाहतीआत्मतत्वपूर्ण ॥ तोप्रसादकरोनलगतांक्षण ॥ आ
म्हांवरीयेधवां ॥ १९ ॥ कल्पादौविधीसीस्मृती ॥ द्यावयालागींनिश्चिती ॥ जेणेंप्रेरिलीसरस्वती ॥ चतुर्मुखींप्रगटली ॥ २० ॥
वाणीअलंकृतव्हावया ॥ मीस्मरतोंयादवराया ॥ वेदव्याससद्गुरूच्यापायां ॥ वंदनकरितोंसद्भावें ॥ २१ ॥ राजापरिसें-
सावधान ॥ ब्रह्मनारदसंभाषण ॥ हरीनेंब्रह्मयासीजेंकेलेंकथन ॥ तेंकथीविधीनारदासी ॥ २२ ॥ श्रीमद्भागवतसा

रामृत ॥ द्वितीयस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ चतुर्थोध्यायगोडहा ॥ ४ ॥ पंचमाध्यायप्रारंभः ॥ नार
दह्मणेविधीलागुन ॥ जेणेंमीआत्मतत्वजाणेन ॥ ऐसेंमजसांगाब्रह्मज्ञान ॥ आश्रयकवणविश्वातें ॥ १ ॥ आपणसृष्टि
कर्त्तेअसून ॥ तपकरितांकिमर्थपूर्ण ॥ ऐसेंपरिसूनियांवचन ॥ ब्रह्मदेवबोलेतदा ॥ २ ॥ वत्सात्वांजेंविचारिलें ॥ तेणेंम-
जसमाधानजाहलें ॥ लोकहितयामाजिभलें ॥ आहेमजभासतें ॥ ३ ॥ अगाकार्यकारणकर्त्ता ॥ जोआदिमायेचाभ
र्त्ता ॥ हेंविश्वतेणेंकेलेंताता ॥ माजीअसूनीतोनदिसे ॥ ४ ॥ आतांत्याब्रह्मस्वरूपानमन ॥ सद्भावेंकरितोंजाणून ॥ जया
चेमायेनेंविश्वमोहन ॥ केलेंतयावंदितों ॥ ५ ॥ श्लोक ॥ तस्मैनमोभगवतेवासुदेवायधीमहि ॥ यन्मायया दुर्जय
यामांब्रुवंतिजगद्गुरुम् ॥ १२ ॥ टीका ॥ जोदुर्घटजिंकावया ॥ ऐसीश्रीहरीचीमाया ॥ मोहितकरीतेविश्वाया ॥ क्षणमा
त्रेंसाहजिक ॥ ६ ॥ तुह्मीह्मणताजगदीश्वर ॥ मजलाजियेस्तवसाचार ॥ सर्वव्यापकशार्ङ्गधर ॥ जगद्गुरुआहेनिराळा
७ ॥ त्यावासुदेवाचेचरण ॥ आणूनिमनींकरितोंपूजन ॥ ध्यानयोगसमाधिजाण ॥ तयाविणअसेना ॥ ८ ॥ हेपुत्रापरि-
सेंवाणी ॥ जपतपकर्मानुष्ठानीं ॥ अन्यआराध्यहरीवांचुनी ॥ कोणीएकअसेना ॥ ९ ॥ श्लोक ॥ नारायणपरावेदा देवानारा
यणांगजाः ॥ नारायणपरालोकानारायणपरामखाः ॥ १५ ॥ नारायणपरोयोगोनारायणपरंतपः ॥ नारायणपरंज्ञानं
नारायणपरागतिः ॥ १६ ॥ टीका ॥ वेदनारायणापासून ॥ जाहलेनारदाउत्पन्न ॥ नारायणतनूपासूनिजाण ॥ स
कळदेवनिपजले ॥ १० ॥ चौदाभुवनेंनारायणपर ॥ नारायणरूपयज्ञथोर ॥ योगतपज्ञानगतीसुंदर ॥ नारायण-
परजाणिजे ॥ ११ ॥ त्याश्रीहरीचेआज्ञेंकरून ॥ मीसृष्टीकरितोंउत्पन्न ॥ त्रिगुणात्मकपरिपूर्ण ॥ सत्यजाणबालका ॥
१२ ॥ कालकर्मस्वभाव ॥ मायायांचाईश्वरवासुदेव ॥ आपणसर्वभोक्तास्वयमेव ॥ जाहलाअसेकौतुकें ॥ १३ ॥ पुरुषा

दिकस्पर्शीत ॥ कालकर्मस्वभावयुक्त ॥ त्यापासावजाहलेंमहत्तत्त्व ॥ तयापासूनिपुढती ॥ १४ ॥ राजसतामससात्विक ॥
अहंकारजाहलादेख ॥ त्यातामसाहंकृतीपासूनिचोख ॥ नभोमंडळउद्भवलें ॥ १५ ॥ आकाशापासूनिसमीर ॥ निर्माण
जाहलासाचार ॥ तयापासूनितेजसुंदर ॥ जाहलेंनिर्माणनारदा ॥ १६ ॥ त्यातेजापासूनिजळ ॥ त्यापासूनिपृथ्वी सो-
ज्वळ ॥ पृथ्वीपासूनिगंधसुढाळ ॥ उद्भवलामनोरम ॥ १७ ॥ सात्विकअहंकारापासून ॥ जन्मलेंबापातेंमन ॥ तैसेंदशें-
द्रियस्थानींपूर्ण ॥ देवजाणनिश्चयें ॥ १८ ॥ राजसाहंकृतीपासून ॥ बुद्धींद्रियेंजाहलींउत्पन्न ॥ हींतत्त्वेंअखिलमिळून ॥
प्रलयींऐक्यपावती ॥ १९ ॥ तैंप्रलयोदकांतभलें ॥ एकअंडउत्पन्नजाहलें ॥ तेंसहस्रवर्षेंराहिलें ॥ उदकामाजीनारदा ॥ २०
त्याअंडापासूनिसुभर ॥ रूपप्रगटलेंविराट ॥ भगवंतेंबहुकाळेंचोखट ॥ जडब्रह्मांडचेतविलेंजें ॥ २१ ॥ तेंश्रीहरीचेंस्व-
रूपचोख ॥ राहिलेंचतुर्दशभुवनात्मक ॥ तयाचाअवयवादिविवेक ॥ लोकांमाजीकल्पिला ॥ २२ ॥ सहस्रमस्तकेंसहस्र
कर ॥ बाहूलोचनेंसहस्रसुंदर ॥ त्याचेंमुखधरामर ॥ बाहुक्षत्रियऊरूवैश्य ॥ २३ ॥ शूद्रअसेजयाचेचरणीं ॥ त्याचेंपद
भूर्लोकस्थानीं ॥ भुवर्लोकनाभीचेठिकाणीं ॥ हृदयस्वर्लोकजाणिजे ॥ २४ ॥ वक्षस्थळमहर्लोक ॥ ग्रीवाजयाचीजनोलो-
क ॥ स्तनजाणातपोलोक ॥ सत्यलोकतोमूर्द्धा ॥ २५ ॥ कंठस्थळींअतळ ॥ ऊरूचेठायींवितळ ॥ जानूजाणसुतळ ॥ नळा
तळजंघात्या ॥ २६ ॥ प्रपदज्याचेंरसातळ ॥ पादतळतेंपाताळ ॥ अथवाभूर्लोकसोज्वळ ॥ चरणकल्पिलेदेवाचे ॥ २७ ॥ भु-
वर्लोकनाभीस्वर्लोकमस्तक ॥ श्रीहरीचेंस्वरूपदेख ॥ उपासनाकरावयाचोख ॥ ऐसेंनारदाकथियेलें ॥ २८ ॥ श्रीमद्भा-
गवतसारामृत ॥ द्वितीयस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ पंचमाध्यायगोडहा ॥ २९ ॥ ५ ॥ षष्ठाध्या-
यप्रारंभः ॥ ॥ श्रीशुकसांगेरायासी ॥ विधाताबोधीनारदासी ॥ विराटस्वरूपाचेंसौख्यराशी ॥ माहात्म्यवर्णितोंतुज-

लागीं ॥ १ ॥ भगवंताचें वदन ॥ वाचावन्हीचें उत्पत्तिस्थान ॥ तयाचे त्वचादि सप्तधातु पूर्ण ॥ गायत्रीमुख्य छंदां क्षेत्र होय ॥ २ ॥
हव्यकव्यान्नाचे रस ॥ देवता वरुणनामें विशेष ॥ विराटाची जिव्हा सुरस ॥ क्षेत्र जाणा तयाचें ॥ ३ ॥ नासिक जयाचें सुंद-
र ॥ माजी विराजे तो समीर ॥ गंधस्थानीं अश्विनीकुमार ॥ लोचनीं चंद्रसूर्य ते ॥ ४ ॥ विराटपुरुषाचें श्रवण ॥ तें अष्टदि-
शांचें उत्पत्तिस्थान ॥ आकाश शब्द तीर्थें पावन ॥ यांचें स्थान श्रोत्रेंद्रिय ॥ ५ ॥ त्वगिंद्रिय जयाचें समीर ॥ केश ओष-
धी साचार ॥ बाहु जयाचे शचीवर ॥ शिश्न प्रजापति जाणिजे ॥ ६ ॥ यम मित्र मलांचें स्थान ॥ वेरा जाचें गुद पूर्ण ॥ कु-
क्षीमाजी राहती जाण ॥ सप्तसिंधु सर्वभूतें ॥ ७ ॥ विधि ह्मणे नारदालागुन ॥ मी महादेव रमारमण ॥ सुर नर ऋषिगण
असुर नाग पक्षी मृग ॥ ८ ॥ सर्प गंधर्व अप्सरा सुंदर ॥ यक्ष राक्षस निशाचर ॥ भूतगण पशु पितर ॥ सिद्ध विद्याधर-
चारण ॥ ९ ॥ हे इतुके यांवांचुन ॥ अन्य जे प्राणी असती जाण ॥ उदक मही आणि गगन ॥ या स्थानीं सर्व वसती जे ॥ १० ॥
हे सर्व विराटदेहस्थ ॥ आहे तबापा नेमस्त ॥ विश्वव्यापूनि भगवंत ॥ दशांगुळें उरलासे ॥ ११ ॥ त्या भगवंताचे चरणीं
सर्वभूतें दिवसरजनी ॥ वास करिती नारदामुनीं ॥ सत्य जाण येथवां ॥ १२ ॥ अगा मी श्रीहरिनाभीपासून ॥ उत्पन्न जाह-
लों चतुरानन ॥ तेव्हां यज्ञ करावा ह्मणून ॥ मनीं वासना उद्भवली ॥ १३ ॥ पुरुषअवयवां विरहित ॥ यज्ञसंभार न दिसे
जगांत ॥ नंतर पुरुषावयव चि पुनीत ॥ यज्ञद्रव्यें कल्पिलीं ॥ १४ ॥ पशु यूप भूमी कुश ॥ काळ पात्रें व्रीही सुरस ॥ सु-
वर्ण घृतादि विशेष ॥ मृत्तिका जळ वेदी ही ॥ १५ ॥ होत्रादिक मखयाग ॥ नाम मंत्र दक्षिणा सवेग ॥ व्रतपद्धती ग्रंथोद्यो-
ग ॥ देवतोद्देशा योजिले ॥ १६ ॥ तैसे संकल्प तंत्र ध्यान ॥ प्रायश्चित्त समर्पण ॥ एवं परमेश्वरावयवीं जाण ॥ सर्व यज-
न केलें म्यां ॥ १७ ॥ तें च पुढती यजन ॥ मरीच्यादिक रिती आपण ॥ मनु ऋषी देव पितृगण ॥ करिते जाहले अनुक्रमें ॥ १८ ॥

देवदैत्यमानवजाती ॥ सर्वभजती विष्णूप्रती ॥ हें विश्वव्यापिलें निश्चिती ॥ परमपुरुषें निजशक्तीनें ॥ १९ ॥ श्रीहरीची आज्ञा होतां ॥ मी निर्मितों या जगता ॥ रुद्ररूपें संहारिता तो ॥ पुरुषरूपें पाळी कौतुकें ॥ २० ॥ ऐसें गुज तुज लाकथिलें ॥ जें कां हरीनें मज बोधिलें ॥ वाणी करूनि गाइलें ॥ समाधानें करूनियां ॥ २१ ॥ ऐसा प्रभु जगन्नाथ ॥ जो सर्वात्मा पुनीत ॥ त्याचे चरणीं वंदन निश्चित ॥ असो सद्भावें पैं माझें ॥ २२ ॥ त्या प्रभूची स्वरूपगती ॥ नेणों आह्मी पार्वतीपती ॥ अवतारचरित्रें दिवसरात्रीं ॥ गातां सौख्य मनातें ॥ २३ ॥ ऐसा विराटपुरुषवर ॥ प्रतिकल्पीं जाण साचार ॥ उत्पत्तिपालनसंहार ॥ सहज करी विश्वाचें ॥ २४ ॥ हा पुरुष आद्यावतार ॥ काळस्वभावप्रकृती थोर ॥ हीं तयाची शक्ती साचार ॥ भूतमहाभूतादी ॥ २५ ॥ अहंकार सत्वादिगुण ॥ इंद्रियें विराट वैराज पूर्ण ॥ स्थावरजंगम पावन ॥ मी शंकर महाविष्णु ॥ २६ ॥ हे त्याचे गुणावतार ॥ दक्षप्रजापती योगेश्वर ॥ स्वर्गखगनृलोकवर ॥ सप्तपातालपती परमात्मा ॥ २७ ॥ गंधर्व विद्याधर चारण ॥ यक्ष राक्षस उरगगण ॥ या विभूती असती पूर्ण ॥ सर्व जाण पुरुषाच्या ॥ २८ ॥ ऋषी पितर सिद्ध दैत्य ॥ भूत पिशाच कूष्मांड प्रेत ॥ मृगपक्ष्यादि हे समस्त ॥ विभूति सत्य तयाच्या ॥ २९ ॥ ओज ऐश्वर्य तेज ॥ सहन बळ क्षमा सहज ॥ लक्ष्मी लज्जा संपत्ती प्राज्य ॥ बुद्धियुक्त सर्व हें ॥ ३० ॥ श्रीहरीच्या विभूती ॥ सकळ जाण सुमती ॥ पुरुषावतार यथामती ॥ वर्णन केला नारदा ॥ ३१ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ द्वितीयस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखारामविरचित ॥ षष्ठाध्याय गोड हा ॥ ३२ ॥ ६ ॥

सप्तमाध्यायप्रारंभः ॥ नारदासि ह्मणे विधाता ॥ श्रीहरिचरित्र परिसें आतां ॥ ज्याच्या श्रवणपठनें भवाची व्यथा ॥ प्राणियांस सर्वथा न बाधे ॥ १ ॥ बाळका महाप्रळयकाळीं ॥ हिरण्याक्ष महीरसातळीं ॥ घेऊनि गेला जें बळी वराह वनमाळी झाला तें ॥ २ ॥ पाताळीं जाऊनि सत्वर ॥ केला दैत्याचा संहार ॥ पृथ्वी घेऊनि दाढेवर ॥ कुतुकें उद्धार पैं के-

ला ॥ ३ ॥ रुचिनामकप्रजापती ॥ तयाचीस्त्रीआकूती ॥ तियेचेजठरींयज्ञमूर्ती ॥ महाविष्णूप्रगटला ॥ ४ ॥ त्यायज्ञावता
रींजाण ॥ केलेंस्वयमदेवांसिनिर्माण ॥ इंद्रपदातेंस्वीकारून ॥ त्रैलोक्यपीडाहरियेली ॥ ५ ॥ पूर्वींचेंयज्ञनामअसतां ॥
स्वायंभुवमनूजाणतातां ॥ श्रीहरीनामजाहलाठेविता ॥ अत्यादरेंकरूनियां ॥ ६ ॥ मगकर्दमऋषीचेघरीं ॥ देवहूतीभा
र्येचेउदरीं ॥ नवभगिनीसहितदानवारी ॥ कपिलनामेंप्रगटहोय ॥ ७ ॥ मातेसिसांगूनितत्त्वज्ञान ॥ केलेंअज्ञाननिर-
सन ॥ शेवटींतियेलेंवैकुंठभुवन ॥ कृपाकटाक्षेंदीधलें ॥ ८ ॥ पुत्रेच्छाजयाचेमनीं ॥ ऐसामहाराजअत्रिमुनी ॥ तयाश्रीहरीप्रस
न्नहोउनी ॥ बोलेतुजदिधलेंइष्टनें ॥ ९ ॥ ह्मणूनित्याविग्रहांत ॥ दत्तात्रेयबोलतीसमस्त ॥ जयाचेपदाश्रयेंपुनीत ॥ समस्तन
नुभूतहोतीसदा ॥ १० ॥ तेणेंयदुहैहयांदिनृपांसीं ॥ सदयहोऊनिमानसीं ॥ कथिलेंतत्त्वज्ञानासी ॥ जेणेंतेवैकुंठपावले
११ ॥ परमेष्ठीह्मणेसाचार ॥ सृष्टीचेआधींचराचर ॥ निर्माणकरावेंसत्वर ॥ ह्मणूनितपआचरिलों ॥ १२ ॥ तपपाहूनिअखंडित
प्रसन्नहोऊनिभगवंत ॥ सनत्कुमारादिचाररूप ॥ हरीनिश्चितजाहला ॥ १३ ॥ पूर्वकल्पींप्रलयांत ॥ ॥ उच्छिन्नजाहलेसं-
प्रदायबहुत ॥ ह्मणूनिशुद्धआत्मतत्त्वयाकल्पांत ॥ साग्रनिवेदनकेलेंबा ॥ १४ ॥ धर्मस्त्रीमूर्तीपासून ॥ द्विमूर्तीनरनारा
यण ॥ उत्पन्नजाहलेआपण ॥ करुणाघनविश्वंभर ॥ १५ ॥ तयांचेंतपहरावयासी ॥ मघवाकरीउपायांसी ॥ तपोबळें
अप्सरागणासी ॥ निर्मूनितद्गर्वपरिहरिला ॥ १६ ॥ उत्तानपादभूपती ॥ त्याचीभार्यासुनीती ॥ तियेचेउदरींमहामती ॥
ध्रुवावतारजाहला ॥ १७ ॥ सापत्नमातेचेवाग्बाण ॥ ध्रुवपरिसूनिआपण ॥ काननींकरूनितपाचरण ॥ अढळपदींबैसला ॥
१८ ॥ तेगातीमुनिवर ॥ अमलयशमनोहर ॥ वेनराजादुष्टफार ॥ तयाविप्रींशापिलें ॥ १९ ॥ शापहोतांदारुण ॥ राष्ट्राधिपपा
वलामरण ॥ ऋषिप्रार्थनेंकरून ॥ पृथुअवतारघेहरी ॥ २० ॥ पुत्रमिषेंकरूनिभलें ॥ वेनासीनरकींतारिलें ॥ जगज्जीवना

र्थ पृथ्वीसी दोहिलें ॥ अन्नादि वस्तु उद्भविल्या ॥ २१ ॥ नंतर जाणा श्रीहरी ॥ नाभिराजाचे मंदिरीं ॥ मेरुदेवीचे उदरीं ॥ ऋषभ
रूपें निपजला ॥ २२ ॥ तेणें जडोन्मत्त ॥ परमहंस धर्म पुनीत ॥ स्थापन केला जगांत ॥ अत्यानंदें करूनियां ॥ २३ ॥ तोचि पुरुष हा
भगवंत ॥ माझ्या यज्ञांत अकस्मात ॥ येऊनि धनु हन्नूसि लावित ॥ गर्वें विप्रा बोलतसे ॥ २४ ॥ हे विप्र हो परिसा वचन ॥ मी केलें
यज्ञरक्षण ॥ ऐसा होतां अभिमान ॥ तेंन वलाव जाहला ॥ २५ ॥ प्रत्यंचा तुटूनी ते काळीं ॥ मस्तक गेलें अंतराळीं ॥ आकांत व-
र्तला ऋषिमंडळीं ॥ तो काय सुखें वर्णावा ॥ २६ ॥ मुनिवरीं करूनी विवेक ॥ लाविलें अश्वाचें मस्तक ॥ हयग्रीव नामें अवतार
चोख ॥ प्रगट जाहला विष्णूचा ॥ २७ ॥ तयांचे श्वासापासून ॥ वेदवाणी जाहली उत्पन्न ॥ चाक्षुष मन्वंतरीं वेदहरण ॥ शं-
खासुरें पैं केलें ॥ २८ ॥ तेंसमीं झाली पिसा ॥ शून्य झाल्या दिशा ॥ परी श्रीहरीचा भरवसा ॥ मनीं होता नारदा ॥ २९ ॥ नंतर स्तवितां दानवारी
मत्स्य होऊनि प्रलयसागरीं ॥ असुर वधूनि वेद झडकरी ॥ माझ्या करीं देता झाला ॥ ३० ॥ अमृतप्राप्तीस्तव जाण ॥ ॥ सुरासुर
करिती सिंधुमंथन ॥ तें कूर्म होऊनि मनमोहन ॥ पर्वत धरी पृष्ठीवरी ॥ ३१ ॥ भक्त प्रल्हादास्तव ॥ नृसिंह जाहला वासुदेव ॥
तेणें मानसीं धरूनि क्रोधभाव ॥ कनककशिपू विदारिला ॥ ३२ ॥ ग्राहें गजेंद्र धरितां जळीं ॥ तेणें मारिली आरोळी ॥ सत्वर
येऊनि वनमाळी ॥ रक्षण केलें तयाचें ॥ ३३ ॥ कश्यपगृहीं नारायण ॥ वामन होऊनि आपण ॥ करूनि बळीचें छळण ॥ राज्य
वासवा देई पैं ॥ ३४ ॥ प्रभूनें घेऊनि हंसावतार ॥ ज्ञान बोधिलें भागवतसार ॥ शरणागत भक्तवर ॥ अखंडित जे जाणती ॥
३५ ॥ मन्वंतरांत मनुवंशधर ॥ होऊनियां सर्वेश्वर ॥ स्वकीर्तीचा विस्तार ॥ करिता जाहला कौतुकें ॥ ३६ ॥ माधव होऊनि
धन्वंतरि ॥ मानवांचे रोग संहारी ॥ यज्ञभागग्रहण करी ॥ आयुर्वेदा वाढवीजो ॥ ३७ ॥ परशुराम होऊनि त्वरित ॥ त्रिस
प्तवेळा पृथ्वींत ॥ मदांध जाणून नरनाथ ॥ परशू करूनी संहरिलें ॥ ३८ ॥ इक्ष्वाकुवंशीं भले ॥ प्रगट श्रीराम जाहले ॥

पित्राज्ञें काननीं गेले ॥ सानुज सीता संगती ॥ ३९ ॥ रावणें प्रभूचा द्वेष केला ॥ शेखीं प्राणधना आंचवला ॥ सागरें रामा मार्ग दिधला ॥ मागुता आला साकेतीं ॥ ४० ॥ दैत्यांश जन्मले नृपती ॥ तेणें भारार्त जाहली जगती ॥ ऐसें जाणूनि श्रीपती ॥ रामकृष्णारूपें प्रगटेल ॥ ४१ ॥ अमानुष कृत्यें करून ॥ घेईल दैत्यांचे प्राण ॥ करील साधूंचें रक्षण ॥ भक्तवत्सल परमात्मा ॥ ४२ ॥ विषयुक्त पिउनि स्तन ॥ करील पूतनाप्राणहरण ॥ चरणप्रहारें शकट चूर्ण ॥ करूनि तृणावर्त मारिलतो ॥ ४३ ॥ रांगत असतां अंगणीं ॥ जुल्मा वृक्षांचे मधुनी ॥ जातां ते पाडूनि धरणीं ॥ कुबेरपुत्रा उद्धरिल ॥ ४४ ॥ विषोदकापासूनि निश्चित ॥ रक्षील गोपांचें जीवित ॥ कालिय करूनी पराभूत ॥ कृष्णा शुद्ध करिलबा ॥ ४५ ॥ घोर दावानळापासून ॥ करील व्रजाचें रक्षण ॥ माता बांधील दामें करून ॥ राहील त्र्यंगुळ न्यून तें ॥ ४६ ॥ त्या श्रीहरिवदनीं ॥ विश्व पाहील यशोदा जननी ॥ विस्मित होईल आपुले मनीं ॥ पाहूनि कौतुक देवाचें ॥ ४७ ॥ वरुणपाशीं पिता पडेल ॥ श्रीकृष्ण तेथूनि सोडवील ॥ व्योमासुरापासूनि गोपाल ॥ रक्षण करील विवरांत ॥ ४८ ॥ गोकुळवासी जनांसि देख ॥ हरी दाखविल वैकुंठलोक ॥ शिळाधारी वर्षतां अमरनायक ॥ पर्वतें व्रजासी राखील ॥ ४९ ॥ रासक्रीडा करून ॥ करील गोपींची कामना पूर्ण ॥ शंखचूडाचें मस्तक छेदून ॥ मणि बलरामा देईल तो ॥ ५० ॥ प्रलंब खर केशी बक ॥ अरिष्ट तृणावर्त यवन नरक ॥ शाल्व द्विविद वक्रदंत देख ॥ चैद्य मागध मारिल तो ॥ ५१ ॥ मत्स्यगंधेपासूनि साचार ॥ प्रगट होईल व्यासावतार ॥ वेदांच्या शाखा चार ॥ करील परम कौतुकें ॥ ५२ ॥ दैत्यमोहनार्थ अनंत ॥ बुद्धरूप धरील पुनीत ॥ पाखंडमतस्थापनार्थ ॥ कृत्यें करील नानापरी ॥ ५३ ॥ वर्णत्रय पाखंडभूत ॥ तेसे शूद्र होणार नृपनाथ ॥ यास्तव कल्किरूपें श्रीअनंत ॥ शास्ता होईल कलीचा ॥ ५४ ॥ सृष्टिकार्य करावयासी ॥ तत्पर असों दिवसनिशीं ॥ मी आणि मरीच्यादि ऋषी ॥ प्रसिद्ध नव प्रजापती ॥ ५५ ॥ धर्म स्वायंभुव प्रभृति ॥ चौदा मनु आणि सुरपति ॥ ए-

ध्वादिसार्वभौमनृपती ॥ जगद्रक्षणार्थसिद्धहे ॥ ५६ ॥ अधर्मआणिरुद्रजाण ॥ जेसदाअसतीक्रोधाधीन ॥ शेषादिमहास
र्पपूर्ण ॥ विश्वसंहारायोजिले ॥ ५७ ॥ हेसर्वनारायणांशधर ॥ शक्तिमंतआहेतथोर ॥ हरिमायाअनिवार ॥ इचापारन-
लागे ॥ ५८ ॥ श्रीशंकरप्रल्हाददैत्यनाथ ॥ सनकादिनारदातुजसहित ॥ स्वायंभुवआणिशतरूपापुनीत ॥ मनुपुत्रतेसेजा
णिजे ॥ ५९ ॥ प्रियव्रतउत्तानपादनृपती ॥ आकूतिदेवहूतिप्रसूती ॥ त्याकन्यामनोहरस्रुदती ॥ प्राचीनबर्हिऋभुध्रुव ॥
६० ॥ इक्ष्वाकुपुरूरवाविदेहेश,मुचुकुंद गाधिरघुअंबरीष ॥ सगरगयमांधातानाहुष ॥ अलर्कआणिशतधन्वा ॥ ६१ ॥
रंतिदेवदेवव्रत ॥ जोभीष्माचार्यगंगासुत ॥ अमूर्तरयदिलीपनृपनाथ ॥ सौभरिदेवलशिबितो ॥ ६२ ॥ पिप्पलादसारस्व-
त ॥ उद्धवआणिपराशरसुत ॥ भूरिषेणबिभीषणहनुमंत ॥ श्रीशुकपांडवधन्यते ॥ ६३ ॥ आर्ष्टिषेणगंधर्वविदुर ॥ श्रुतदे
वजाणधरामर ॥ श्रीहरीचीमायासाचार ॥ जाणूनितरलेअखिलहे ॥ ६४ ॥ भगवत्सदाश्रयेंकरून ॥ उद्धरतीसकलपापीजन
हेंभागवतमहापुराण ॥ संक्षेपेंतुजकथियेलें ॥ ६५ ॥ याभागवताचाविस्तार ॥ करीबालकाअपार ॥ मानवांसीहरिभ-
क्तिसार ॥ प्रासहोईलऐसेंकरी ॥ ६६ ॥ केवळरसत्यागकरून ॥ बोधूनकोतत्त्वज्ञान ॥ सर्वकारणसर्वात्मानारायण ॥ स
र्वाश्रयतोअसे ॥ ६७ ॥ तयाईश्वराचेंवर्णन ॥ भागवतींकरावेंपूर्ण ॥ ज्याच्याश्रवणपठनेंमोहमन ॥ कदानपावेनिश्चयें
६८ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ द्वितीयस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ सप्तमाध्यायगोडहा ॥ ६९ ॥ ७
अष्टमाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्रीशुकासीह्मणेपरीक्षिती ॥ अगुणाचेंगुणाख्याननिश्चिती ॥ करावयाब्रह्मदेवेंनारदा
प्रती ॥ कथितांतेणेंकेविंकेलें ॥ १ ॥ त्याचेंकरावयाश्रवण ॥ स्वामियांइच्छीमाझेंमन ॥ जोंवरीशरीरींआहेप्राण ॥
तोंवरीकृष्णकथावर्णावी ॥ २ ॥ श्रीकृष्णलीलामृत ॥ कर्णरंध्रेंकरूनिनिश्चित ॥ प्रवेशकरितांहृदयांत ॥ सर्वपात

केंपरिहरी॥ ३॥ ब्रह्मदेवेंनारदासी॥ कथिलेंभागवतसौख्यराशी॥ त्यांतीलभावार्थनिश्चयेंसी॥ हाचिअसेसर्वज्ञा
४॥ मायाश्रयेंश्रीहरी॥ विराट्रूपातेंधरी॥ चतुर्दशलोकत्याचेशरीरीं॥ कल्पिलेजाणसमर्था॥ ५॥ आतांकल्पवि
कल्पकालगणन॥ देवादिकांचेंआयुष्यमान॥ काळकर्मगतीचेंअनुमान॥ सविस्तरकथावें॥ ६॥ सत्वादिकांचेपरि
णाम॥ तैसेंभूपाताळआणिव्योम॥ ग्रहनक्षत्रभूभृत्परम॥ सरितासमुद्रद्वीपेंहीं॥ ७॥ यांचेंसांगाउत्पत्तिस्थान॥ तैसेंतें
थीलप्राणियांचेंजनन॥ अंडकोशाचेंमहिमान॥ यथासांगवर्णावें॥ ८॥ वर्णाश्रमधर्मसुंदर॥ तैसेश्रीहरीचेअवतार॥ यु
गमानयुगधर्मसाचार॥ धर्मतैसेनरपतीचे॥ ९॥ आपत्काळींचेधर्मतैसे॥ तत्वसंख्याप्रमाणकेसें॥ पुरुषाराधनजें
असे॥ विधीकवणातयाचा॥ १०॥ योगविधीवेदोपवेद॥ धर्मइतिहासपुराणसिद्ध॥ भूतप्रलयनानाविध॥ महा-
प्रलयतोकेसा॥ ११॥ इष्टापूर्तकाम्यप्रकार॥ त्रिवर्गविधीसांगाविस्तर॥ बंधमोक्षातीतत्वसाचार॥ प्राप्तकेसेंजो-
वातें॥ १२॥ पाखंडधर्मकवणेपरी॥ आत्म्यासिबंधमोक्षतरी॥ प्राप्तहोतोकवणेप्रकारीं॥ तेंसर्वमजलासांगावें॥
१३॥ भगवान्आत्ममायेंकरून॥ क्रीडाकरितोकेसाआपण॥ मायाकरूनीउत्पन्न॥ साक्षिभूतकेसाविचरतो॥ १४॥
इतुकेमींप्रश्नकेले॥ त्यांचेंपाहिजेउत्तरदिलें॥ मीशरणागतदीनआपुलें॥ ह्मणूनिसर्वसांगावें॥ १५॥ श्रीमद्भागव
तसारामृत॥ द्वितीयस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसखारामविरचित॥ अष्टमाध्यायगोडहा॥ १६॥ ८॥ नवमाध्याय
प्रारंभः॥ ॥श्रीशुकह्मणेनृपनाथा॥ सावधपरिसेंश्रीहरिगाथा॥ प्रलयसमुद्रामाजीताता॥ नवलावजाहला॥ १
विष्णुनाभिकमलापासून॥ प्रगटजाहलाचतुरानन॥ प्रलयोदकअवलोकुन॥ चिंताग्रस्तहोयतदा॥ २॥ सृष्टिकरा
वयापाहीं॥ विवेककरितांकांहीं॥ नफुटेतकर्ताहृदयीं॥ तेणेंस्तब्धजाहला॥ ३॥ तैंतपतपऐसींअक्षरें॥ उदकींनिघा-

लींसत्वरें ॥ तीं ऐकूनि विधि चतुरें ॥ उपदेश मानिला निश्चयें ॥ ४ ॥ दिव्य संवत्सर सहस्र ॥ अढळ तप बैसे हरिकुमर ॥ तप करितां चमत्कार ॥ जाहला तो परिसावा ॥ ५ ॥ तेव्हां श्रीहरीनें चोखट ॥ धात्यासि दाखविलें वैकुंठ ॥ ब्रह्मस्वरूप सर्वश्रेष्ठ ॥ उत्कृष्ट माहात्म्य जयाचें ॥ ६ ॥ भक्तपति लक्ष्मीपति ॥ यज्ञपति जगत्पति ॥ सुनंदनंदादि शोभती ॥ पार्षद्गण जयाचे ॥ ७ ॥ मंदस्मित प्रसन्न वदन ॥ मकरकुंडलें विराजमान ॥ रत्नखचित मुकुट पूर्ण ॥ श्यामसुंदर परमात्मा ॥ ८ ॥ चतुर्भुज पीतांबरधर ॥ वक्षस्थळीं रमा सुंदर ॥ सर्वालंकृति मनोहर ॥ सिंहासनीं विराजे ॥ ९ ॥ पंचविंशति तत्त्वांसहित ॥ अणिमाद्यष्टैश्वर्ययुक्त सदय हृदय रमाकांत ॥ दर्शन देता जाहला ॥ १० ॥ यापरी पाहूनि श्रीहरी ॥ ब्रह्मा धाला निजांतरीं ॥ पितामह नमस्कारी ॥ सद्भावयुक्त गोविंदा ॥ ११ ॥ विधिमस्तकीं ठेवूनि हस्त ॥ सप्रेम बोले जगन्नाथ ॥ वत्सा मागावें वांछित ॥ देतों वर तुजलागीं १२ ऐकूनि बोले विधाता ॥ भागवत सांगावें ताता ॥ कृपाकरूनी समर्था ॥ मजलागीं येधवां ॥ १३ ॥ वचन परिसूनियां परी ॥ बोधिता जाहला श्रीहरी ॥ तत्त्वज्ञान तनयांतरीं ॥ ठसावया भागवत ॥ १४ ॥ श्लोक ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ ज्ञानं परमगुह्यं मे यद्विज्ञानसमन्वितम् ॥ सरहस्यं तदंगं च ॥ गृहाण गदितं मया ॥ १ ॥ टीका ॥ हे विधात्या अनुभवसहित ॥ मत्स्वरूपज्ञान शास्त्रोक्त ॥ साधन रहस्यांसह अतिगुप्त ॥ कथितों ग्रहण करीं बा ॥ १५ ॥ श्लोक ॥ यावानहं यथाभावो यद्रूपगुणकर्मकः ॥ तथैव तत्त्वविज्ञानमस्तु ते मदनुग्रहात् ॥ २ ॥ टीका ॥ मद्रूपाची इयत्ता स्थिति ॥ मद्गुण कर्में जैसी सन्मति मदनुग्रहें तैसें तुज प्रती ॥ तत्त्वज्ञान अखंड लाधो ॥ १६ ॥ श्लोक ॥ अहमेवासमेवाग्रे नान्यद्यत्सदसत्परम् ॥ पश्चादहं यदेतच्च योऽवशिष्येत सोऽस्म्यहम् ॥ ३ ॥ टीका ॥ सृष्टिपूर्वीं मीच आहें ॥ सृष्टि जाहल्यावरी पाहें ॥ जगद्रूपें दिसतां हें ॥ मी प्रलयांतीं अवशिष्ट ॥ १७ ॥ ऐसा अखंडानंद ॥ परिपूर्ण ब्रह्मानंद ॥ नाशोत्पत्तिरहित स्वच्छंद ॥ वर्ते परमेष्ठी मी स्वयें १८

श्लोक॥ ॥ऋतेऽर्थंयत्प्रतीयेतनप्रतीयेतचात्मनि॥तद्विद्यादात्मनोमायांयथाभासोयथातमः॥४॥ टीका ॥सत्यनसू
निप्रतीति॥कींआत्मींजयाअप्रतीति॥एवंजाग्रत्स्वप्नसुषुप्ति॥जाणतीमन्माया॥१९॥ सत्यावरीअसत्यता॥असत्या
वरीसत्यता॥जीदिसतेतुजताता॥तीमन्मायाजाणिजे॥२०॥जेवींनभींचंद्रमाएक॥जलाभासींभासेअनेक॥कींराहु-
गगनींराहेनिःशंक॥परीआपणानदिसे॥२१॥ श्लोक ॥यथामहांतिभूतानिभूतेषूच्चावचेष्वनु॥प्रविष्टान्यप्रविष्टा-
नितथातेषुनतेष्वहम्॥५॥ टीका ॥प्राणिमात्राचेठायीं॥पंचमहाभूतेंवसतीपाहीं॥तींतेथेंप्रविष्टनसतांही॥प्रवे-
शलींऐसींभासती॥२२॥तैसामीअसूनिजगांत॥लिप्तनसेंबाकिंचित्॥माझीस्थितिअतर्कित॥ब्रह्मदेवाअसेकीं॥२३
श्लो०॥एतावदेवजिज्ञास्यंतत्त्वजिज्ञासुनात्मनः॥अन्वयव्यतिरेकाभ्यांयस्यात्सर्वत्रसर्वदा॥६॥ टीका ॥तत्त्वज्ञान
व्हावयानरें॥अन्वयव्यतिरेकाचेद्वारें॥येतुलेंचिजाणावेंबरें॥स्वानुभवें॥२४॥जयाचाअवस्थात्रयींअन्वय॥जेथेंत-
याव्यतिरेकहोय॥तेंसर्वदासर्वत्रठायींठाय॥भरलेंअसे॥२५॥ऐसेंमद्रूपज्ञानी॥पाहतीसदानिजध्यानीं॥तुजलाकथि
लेंयेक्षणीं॥सत्यजाणविधातिया॥२६॥ श्लोक ॥एतन्मतंसमातिष्ठपरमेणसमाधिना॥भवान्कल्पविकल्पेषुनवि
मुह्यतिकर्हिचित्॥७॥ टीका॥एकाग्रचित्तेंकरून॥माझेंमतकरीग्रहण॥सृष्टिकर्तृत्वाचाअभिमान॥कल्पांतींन
बाधेविधातिया॥२७॥यापरीसांगूनिभागवत॥श्रीहरीजाहलाअंतर्हित॥नमूनिब्रह्मासृजीनिश्चित॥यथापूर्वसक
ळसृष्टि॥२८॥नंतरब्रह्मदेवपुनीत॥नारदासीकथीभागवत॥जेंकादशलक्षणयुक्त॥परममंगलकारक॥२९॥सरस्व
तीचेतीरीं॥ब्रह्मचिंतनव्यासकरी॥नारदजाऊनिसविस्तरी॥महाभागवतकथीतया॥३०॥त्याव्यासाचेमुखापासून॥
प्राप्तजाहलेंमजलागुन॥तेंमीसांप्रतनिरूपण॥करितोंतुजराजेंद्रा॥३१॥श्रीमद्भागवतसारामृत॥द्वितीयस्कंधपरम

पुनीत॥ प्राकृतसखारामविरचित॥ नवमोध्यायगोडहा॥ ३३॥ ९॥ दशमाध्यायप्रारंभः ॥ श्रीशुकह्मणेराजियासी॥ दश
विधलक्षणेंसौख्यराशी॥ भागवताचींपरियेसीं॥ तुजकारणेंनिरूपितों॥ १॥ सर्गविसर्गस्थान॥ ऊतिमन्वंतरेंपोषण॥ ई
शानुकथापावन॥ निरोधमुक्तिआश्रय॥ २॥ ऐसेंदशलक्षणीयुक्त॥ श्रीहरीचेंहेंभागवत॥ महापुराणब्रह्मसंमत॥ जाण
निश्चितराजेंद्रा॥ ३॥ पंचभूतांचीउत्पत्ति॥ तयेसर्गऐसेंह्मणती॥ गुणवैषम्येंजगदुद्भूति॥ तोविसर्गजाणिजे॥ ४॥ पृथ्व्या
दिलोकरचना॥ तियेस्थानह्मणतीजाणा॥ भक्तानुग्रहतोसुजाणा॥ पोषणनामेंबोलिजे॥ ५॥ कर्मवासनाज्याविविध॥ त्या
ऊतिनामेंप्रसिद्ध॥ मनूचाराज्यकालतोशुद्ध॥ मन्वंतरजाणिजे॥ ६॥ श्रीहरीचींअवतारचरितें॥ तीईशानुकथाबोलिजेते॥
निरोधनामेंप्रलयातें॥ बोलतीज्ञातेपुरातन॥ ७॥ ब्रह्मपणेंजोकास्थिति॥ तियेतेंह्मणतीमुक्ति॥ जयेठायींसृष्टिलयस्थिति
तोआश्रयपरब्रह्म॥ ८॥ इंद्रियाभिमानीजीव॥ तोआध्यात्मिकस्वयमेव॥ तयाअनुग्राहकतोअधिदेव॥ सूर्यादिदेवस
मुदाय॥ ९॥ अध्यात्मअधिदैविक॥ ह्याजयास्तवभेददेख॥ तोदेहजाणआधिभौतिक॥ आश्रयतिहींसजाणता॥ १०॥
अंडभेदूननिघाला॥ पुरुषइच्छीस्थानाला॥ तैंप्रथमउत्पादूनजला॥ वासकरीतेठायीं॥ ११॥ नारह्मणतीपैंजला॥
त्याचाआश्रयईशेंकेला॥ ह्मणूनिजगींप्रसिद्धजाहला॥ नारायणनामेंतो॥ १२॥ तयाबहुरूपांचीइच्छाझाली॥ तैंभूतेंद्रिय
देवतावली॥ यारूपेंत्रिविधसृष्टिकेली॥ विराटदेहविभागुनी॥ १३॥ तोपुरुषचलनपावतां॥ हृदयाकाशीस्फुरणहोतां॥ इं
द्रियमनदेहशक्तितत्वतां॥ उद्भवल्यास्वभावें॥ १४॥ त्यांपासूनिसूत्राख्यप्राण॥ उद्भवूनिपावतांचलन॥ होतिक्षुधातृषाउ-
त्पन्न॥ तैंतोभक्षणकरूंपाहे॥ १५॥ बुभुक्षाउत्पन्नहोतां॥ मुखनिर्माणझालेंतत्वतां॥ जिव्हारसवरुणदेवता॥ तेथेंप्रगट
जाहलीं॥ १६॥ पुरुषाजेंभाषणाची॥ इच्छाउद्भवलीसाची॥ तैंमुखींवन्हिवाचाशब्दांची॥ उत्पत्तिझालीस्वभावें॥ १७॥ पु-

रुषेंइच्छितांअवघ्राण ॥ नासिकाजाहली निर्माण ॥ तेथेंवायुगंधआणिघ्राण ॥ प्रगटजाहलेंनरेंद्रा ॥ १८ ॥ एवंरूपशब्द
स्पर्शांचा ॥ जेंअभिलाषहोयसाचा ॥ तेंचक्षुश्रोत्रआणित्वचा ॥ देवतांसहजन्मती ॥ १९ ॥ ऐसींचसर्वकर्मेंद्रियें ॥ देवता
आणिविषय ॥ तेतेस्थानींप्रकटहोय ॥ पुरुषेच्छेंकरूनिपैं ॥ २० ॥ हेंभगवंताचेंस्थूलरूप ॥ तुजसांगितलेंअपरूप ॥ अ-
न्यसूक्ष्मतेंदुराप ॥ मनावाणीसनिश्चयें ॥ २१ ॥ असोतेणेंप्रजानिर्माण ॥ केल्यात्याकथितोंतुजलागुन ॥ विष्णुरातांकरी
श्रवण ॥ भक्तिभावेंकरूनियां ॥ २२ ॥ मनुदेवप्रजापति ॥ ऋषिपितरसिद्धपति ॥ चारणगंधर्वसुमति ॥ विद्याधरजाणिजे
२३ ॥ देवकिन्नरगुह्यक ॥ भूतप्रेतपिशाचदेख ॥ कूष्मांडउन्मादविनायक ॥ वेताळमारीचत्यापरी ॥ २४ ॥ अप्सरानागहि
घोर ॥ किंपुरुषआणिफणिवर ॥ मातृगणराक्षसप्यासुर ॥ रेवतीकोटरानामकबहु ॥ २५ ॥ ग्रहखगयातुधान ॥ मृग-
पशुवृक्षसुपर्ण ॥ पर्वतनद्याइत्यादिकरून ॥ अखिलविश्वनिर्मिलें ॥ २६ ॥ ब्रह्मरूपेंसृष्टिकरून ॥ विष्णुरूपेंकरीपाल
न ॥ शेवटींशिवरूपेंसंहरण ॥ तोचिकरीमायेनें ॥ २७ ॥ हाजाणावाब्राह्मकल्प ॥ आतांसांगेनपाद्मकल्प ॥ येथेंनधरूनि
विकल्प ॥ श्रवणकरींशुकह्मणे २८ तैंशौनकसूतासिबोलेमात ॥ विदुरोद्धवसंवादपुनीत ॥ कोठेंजाहलातोवृत्तांत ॥ आ
ह्माकारणेंनिवेदीं ॥ २९ ॥ संपत्तित्यागूनिविदुर ॥ तीर्थयात्रेसिगेलासत्वर ॥ याचेंकारणसविस्तर ॥ कथनकरीकृपा
ळा ॥ ३० ॥ पाद्मकल्पींश्रीहरी ॥ सृष्टिकरीकवणेपरी ॥ तोचसांगाझडकरी ॥ क्षुधितकर्णजाहले ॥ ३१ ॥ सूतबोलेपरि
सावाणी ॥ श्रीशुकह्मणेराजियालागुनी ॥ ब्राह्मकल्पकथिलायेक्षणीं ॥ पाद्मकल्पपुढेंअवधारीं ॥ ३२ ॥ मैत्रेयवि
दुरसंवाद ॥ कथनकरितोंप्रसिद्ध ॥ श्रीशुकेंनृपाबोधिलाविशद ॥ तोचसाग्रऐकावा ॥ ३३ ॥ आतांयेथूनिभला ॥
द्वितीयस्कंधसमासजाहला ॥ भावेंमोहा तुळशीचापाला ॥ अर्पणकेलाहरिपायीं ॥ ३४ ॥ श्रीमद्भागवतसारामृ

त॥ द्वितीयस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसखारामविरचित॥ दशमाध्यायगोडहा॥ १०॥ ॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥छ

इतिश्रीमद्भागवतसारामृते द्वितीयस्कंधः समा०





अथश्रीमद्भागवतसारामृतेतृतीयस्कंधप्रारंभः





श्रीगणेशायनमः॥ श्रीसरस्वत्यैनमः॥ श्रीगुरुभ्योनमः॥ ॥वैयासकिह्मणेनृपनाथा॥ मैत्रेयविदुरसंवादताता॥साव
धानपरिसेंआतां॥जोकासमूळजाहला॥ १ ॥दुष्टपुत्रदुर्योधन॥याचेंकरूनिपोषण॥धृतराष्ट्रें पांडुनंदन॥लाक्षागृहींहो
मिले॥२॥भगवंतानेंतेठायीं॥रक्षणकेलेंत्यांचेंपाहीं॥पुढतीदुःशासनेंलवलाहीं॥अघटितकृत्यपैं केलें॥३॥सभेंत
द्रौपदीआणुन॥करिताजाहलावस्त्राहरण॥प्रज्ञाचक्षूनिवारण॥नकरीतेव्हांपुत्राचें॥४॥तेथेंप्रगटूनिभगवंत॥ व-
स्त्रेंपुरवीअनंत॥दुर्जनलाजविलेसमस्त॥ भक्तकामकल्पद्रुमें॥५॥ द्यूतमिषेंकरूनिरवळ॥धर्माचीसंपत्तिसकळ॥ह
रिताझालातात्काळ॥परीकांहींनवदेचित्तो॥६॥जैंशिष्टाईकरावयासी॥श्रीकृष्णयेऊनिगजपुरासी॥मागेपांडवविभा
गासी॥तयासीकांहींरुचेना॥७॥मगदुर्योधनादिदुर्जन॥ परस्परेंकरितीभाषण॥ याकृष्णासिकरावेंबंधन॥कैंचा
भागमागतो॥८॥ऐसेंजाणूनियांहरी॥दुष्टांचागर्वसमूळहरी॥ विश्वदाखवितांझडकरी॥अधमसर्वविराले॥९॥
तेव्हांधृतराष्ट्रासिमधुर॥ बोलताजाहलाभक्तविदुर॥तुझेकनिष्ठबंधूचेकुमर॥कुंतीमाद्रीनंदनहे॥१०॥तरीदायभा
गधर्मेंकरून॥तयांसिकरावातुवांअर्पण॥तेणेंहोतांत्यांचेंपोषण॥उभयलोकींसौख्यहोय॥११॥ निरपराधीपांडवअस
तां॥कौरवद्वेषकरितीताता॥होतोअधर्मराज्यांतआतां॥यास्तवसावधहोइजे॥१२॥ऐसेंऐकतांचीवचन॥कायबोलेदु
र्योधन॥हादासीपुत्रअसून॥अमर्यादाकरितोबहु॥१३॥यास्तवयाविदुरासी॥शीघ्रघालावाबाह्यप्रदेशीं॥ऐसेंवा
ग्बाणेंतयासी॥दुःखबहुतदिधलें॥१४॥ऐसीपरिसोनिवार्ता॥विदुरसमजलाआपुलेचित्ता॥श्रीहरीचीअतर्क्यसत्ता॥
तीपुढेंउपायनसेची॥१५॥सर्वसंपत्तीसांडूनिघरीं॥विदुरनिघालेबाहेरी॥तीर्थयात्रेसीझडकरी॥अकस्मातएकाकी॥
१६॥राजद्वारींधनुष्यठेवून॥करिताजाहलातीर्थाटन॥जोसाक्षात्सूर्यनंदन॥लोकप्राणकर्षकहो॥१७॥मांडव्यशापें-

करून ॥ दासीपुत्रत्वलाहेआपण ॥ तोतीर्थयात्रेंतभूमिशयन। अवधूतवेषेंकरीतदा ॥ १८ ॥ हरितोषणाकरितांपुनीत ॥ आचरूनि
यांअ शनव्रत ॥ तीर्थेंभ्रमूनियांसमस्त ॥ प्रभासक्षेत्रींपातला ॥ १९ ॥ तेथेंपरिसिलेंवर्तमान ॥ यादवांचानाशपाहून ॥ नि
जधामासिगेलेनारायण ॥ तेणेंविह्वळबहूजाहला ॥ २० ॥ सरस्वतीचेउगमींतेथुन ॥ विदुरआलाविकळहोऊन ॥ क्रमेंक
रूनितीर्थाटन ॥ यमुनातटाकींपातला ॥ २१ ॥ तेथेंपाहूनिउद्धवासी ॥ विदुरबोलेवंदूनित्यासी ॥ स्वस्तिक्षेमकुशलआह्मां
सी ॥ कृपाकरूनिवदावें ॥ २२ ॥ रामकृष्णावासुदेव ॥ प्रद्युम्नउग्रसेनराव ॥ सांबअक्रूरादिसर्व ॥ समस्तयादवसुखीकीं ॥
२३ ॥ पृथेसहितधर्मनृपती ॥ सानुजद्रौपदीसुदती ॥ क्षेमआहेतकींसंप्रति ॥ कृपानिधीतेंवदें ॥ २४ ॥ कृष्णाशिष्टाई सम
यींजाण ॥ पाहूनिदुर्योधनदुर्वर्तन ॥ मीसंपत्तीचात्यागकरून ॥ तीर्थयात्रेसीनिघालों ॥ २५ ॥ पांडुपुत्रांसिविपत्ती ॥ नसावी
ह्मणूनिगासुमती ॥ बहुतकथिलीराजनीति ॥ परीनायकेदुष्टात्मा ॥ २६ ॥ मजदुःशब्दींघायघातले ॥ हरिप्रसादेंझालेंभ
लें ॥ उद्धवासांगआचरिलें ॥ अवधूतवेषेंतीर्थाटन ॥ २७ ॥ दीनवत्सलनारायण ॥ करूनिदुष्टांचेंनिकृंतन ॥ जेणेंस्वभक्त
रक्षिलेपूर्ण ॥ भूभारसर्वहरियला ॥ २८ ॥ जोयादवांचेंतीर्थ ॥ पूर्णब्रह्मसाक्षात ॥ तयाचीसत्कीर्तिप्रस्तुत ॥ वर्णनक-
रीउद्धवा ॥ २९ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ प्रथमाध्यायगोडहा
३० ॥ १ ॥ द्वितीयाध्यायप्रा० ॥ ॥ श्रीशुकह्मणेरायापरिस ॥ यमुनातीरींसावकाश ॥ विदुरेंपुसतांउद्धवास ॥ गहिंव
रकंठींदाटला ॥ १ ॥ श्रीकृष्णाचेंअप्रियवृत्त ॥ सांगावयाहोयप्रवृत्त ॥ भक्तियोगेंप्रेमभरित ॥ होऊनिमूकवतजाहला ॥ २ ॥
याचेंपरिसाकारण ॥ उद्धवअसतांलहान ॥ पंचमवर्षींदेवतार्चन ॥ करितहोतासद्भावें ॥ ३ ॥ भोजनासीप्रातःकालीं ॥ माता
बाहेउतावेळी ॥ परिजोपूजनसौख्यमेळीं ॥ सकृनइच्छीभोजना ॥ ४ ॥ तोउद्धवकृष्णसेवाकरून ॥ जाहलासेवृद्धआप-

ण॥तैंविदुराचाप्रश्नऐकून॥श्रीकृष्णास्मरणेंस्थिरावला॥५॥श्रीहरिध्यानासक्त॥होतांआंगरोमांचित॥प्रेमेंकंठसद्गदित
साश्रुनयनजाहले॥६॥तैंविदुरेंमनींजाणीतलें॥नंतरउद्धवेंप्रेमसांवरिलें॥पुढतीचिंतूनिश्रीहरीचींपाउलें॥बोलताझाला
तेधवां॥७॥श्रीकृष्णनामकतरणी॥जोउदयपावलाधरणीं॥तोगेलाअस्तासियेक्षणीं॥तेणेंतमदाटलें॥८॥सांप्रत
काळरूपअजगर॥तेणेंयादवांसीगिळिलेंसत्वर॥आतांआम्हुचासमाचार॥कुशलकायविचारिता॥९॥आम्हांसीत्यागू
निश्रीहरी॥निघूनिगेलावैकुंठपुरीं॥मायामानुषरूपसत्वरी॥पृथ्वीवरीधरीजो॥१०॥लोकांसिचरित्रेंअनंत॥दावि-
लींविदुराअद्भुत॥यादवअज्ञानीसमस्त॥श्रीहरीनाहींजाणिलातो॥११॥स्वबिंबदाखवूनिलोकां॥भगवंतगेलावैकुंठलो-
का॥त्याचींचरित्रेंसांगतोंऐका॥प्रेमभक्तीकरूनियां॥१२॥वसुदेवसदनांत॥अवतारघेऊनिअनंत॥पराक्रमीअसूनिसमर्थ
शत्रुभयेंपळाला॥१३॥व्रजामाजीकरूनीवास॥क्रीडाकरीजगन्निवास॥तोगेलियाविदुराउदास॥मनामाजीजाहलों॥१४
उग्रसेनसिंहासनीं॥बैसलाअसतांचक्रपाणी॥सेवकलसीकारूनी॥ह्मणेकायआज्ञाहो॥१५॥अनंतकोटीब्रह्मांडनायक
स्वयेंअसतांयादवपालक॥उग्रसेनाचाह्मणवीसेवक॥कायआश्चर्यसांगावें॥१६॥नीचोच्चकर्मकांहीं॥श्रीहरीसीसर्वथा
नाहीं॥सदयत्हृदयशेषशायी॥भक्तकार्यकरितसे॥१७॥ श्लोक ॥अहोबकीयंस्तनकालकूटंजिघांसयापाययदप्य
साध्वी॥लेभेगतिंधात्र्युचितांततोऽन्यंकंवादयालुंशरणंव्रजेम॥२३॥ टीका ॥अहोश्रीकृष्णाचेंदयालुत्व॥कायवर्णा
वेंजगांत॥बाळपणींअसतांगोकुळांत॥चमत्कारजाहला॥१८॥काळकूटस्तनीभरून॥पूतनाराक्षसीआलीदारुण॥
हरणकरावयाप्राण॥जाणेसर्वश्रीहरी॥१९॥सगरदुग्धकरूनीपान॥मातेचीसद्गतीआपण॥देताजाहलाजनार्दन॥
पूतनेसीपरमात्मा॥२०॥ऐसादयाळूकवण॥आहेप्रभूवांचुन॥तोविधिप्रार्थनेंकरून॥मायामानुषजाहला॥२१॥वसु

देवदेवकीकुमर॥होऊनियांसर्वेश्वर॥कंसभयेंकरूनीसत्वर॥गोकुळामाजीराहेपैं॥२२॥तेथेंएकादशसंवत्सर॥बा
ळक्रीडाकेलीफार॥धेनूरक्षूनअसुर॥लीलेंकरूनीमारिले॥२३॥विषोदककरितांप्राशन॥गोगोपांचेगेलेप्राण॥
तयांअमृतदृष्टीकरून॥संजीवनपैंकेलें॥२४॥काळियासीगर्वफार॥तोमर्दूनिकेलाजर्जर॥यमुनेंतूनिसहपरिवा
र॥सिंधूमाजीघालविला॥२५॥गोवर्धनकरूनीधारण॥केलेंव्रजाचेंसंरक्षण॥इंद्रगर्वहरूनीपूर्ण॥परमकौतुकदा-
खविलें॥२६॥मधुरमुरलीवाजवून॥गोपिकामोहूनिआपण॥रासक्रीडेंतमनमोहन॥त्यांसवेंरमलाहो॥२७॥श्री
मद्भागवतसारामृत॥तृतीयस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥द्वितीयाध्यायगोडहा॥२८॥२॥ ॥अथ
तृतीयाध्यायप्रारंभः॥ ॥उद्धवह्मणेविदुरासी॥बंधमुक्तकरावयापितरांसी॥रामकृष्णआलेमथुरेसी॥नंदादिगो-
पांसहितहो॥१॥चाणूरमुष्टिकमल्लमत्त॥रंगणीवधिलेआणिकबहुत॥शेवटींकंसाचाकरूनीघात॥मातापितर-
सोडविले॥२॥सांदीपनीगुरूपासून॥सर्वविद्याकरूनीग्रहण॥गुरुपुत्रदक्षिणापूर्ण॥देऊनिमथुरेसीपैंआले॥३॥द्वा
रकाकरूनीनिर्माण॥नेथेंनेलेयादवजन॥कुंडिनपुरींजाऊन॥रुक्मिणीहरणतेंकेलें॥४॥नंतरसप्तवृषभांसी॥वेसणघा
लूनिहृषीकेशी॥वरितांजाहलानाग्नजितीसी॥गोपाळकृष्णपरमात्मा॥५॥सत्यभामेस्तवश्रीपती॥स्वर्गाजाऊनिगरुडग
ती॥इंद्राजिंकूनिद्वारकेप्रती॥पारिजातकआणिपैं॥६॥समरींवधूनिभौमासुर॥राज्यींस्थापितयाचाकुमर॥भौमें
रोधिल्यासुकुमार॥सोळासहस्रनृपकन्या॥७॥त्यापाहूनिमदनमोहन॥वरित्याजाहल्यामनेंकरून॥श्रीकृष्णेंभावजाणू
न॥कुशस्थळींसत्यानेल्या॥८॥नूतनगृहेंकरूनिनिर्माण॥एक्यामुहूर्तींपाणिग्रहण॥सविधिकरूनीनारायण॥प्रजा
निपजवीकौतुकें॥९॥प्रत्येकीसींदहाकुमर॥एककन्यासकुमार॥ऐसाकेलाप्रजाविस्तार॥दुष्टसंहारहीतसा॥१०॥सा

गधशाल्वकाळयवन॥शंबरद्विविददैत्यबाण॥मुरवक्रदंतादिदुर्जन॥मारूनीकांहींमारविले॥११॥भीष्मद्रोणकर्णवी
र॥दुःशासनविकर्णधीर॥कलीचेंस्वरूपदुर्योधनकीर॥बंधुसहितवधिलाजें॥१२॥तेव्हांभगवानबोलतावचन॥अ-
द्यापिभूभारहरण॥जाहलेंनाहींह्मणून॥विचारकरितेजाहले॥१३॥हेयादववीरबहुत॥अनिवारजाहलेजगांत॥
यांचाहोईलकैसाघात॥ह्मणूनिचिंतनकरीमनीं॥१४॥राज्यींबैसवूनियुधिष्ठिर॥अश्वमेधत्रयमनोहर॥करवूनिया
द्वेश्वर॥द्वारकेमाजीराहिला॥१५॥यादवांसीरमवूनिआपण॥रमताजाहलाजनार्दन॥विप्रशापाचेंनिमित्तकरून॥
प्रभासीयादवआणितें॥१६॥तेथेंस्नानतर्पण॥करूनिमिष्टान्नभोजन॥सुवर्णसवत्सधेनूदान॥करितेजाहलेतेधवां
१७॥श्रीमद्भागवतसारामृत॥तृतीयस्कंधपरमपवित्र॥प्राकृतसखारामविरचित॥तृतीयाध्यायगोड्हा॥१८॥ ३ ॥
चतुर्थाध्यायप्रारंभः॥ ॥उद्धवह्मणेसावधान॥विदुरापरिसावचन॥यादवप्रभासीयेउन॥सत्कर्मकरितेजाहले॥१॥
पितृपूजनब्राह्मणभोजन॥हिरण्यधेनुवसनदान॥करूनितोषवितीयाचकजन॥हरीचेआज्ञेंकरूनियां॥२॥तांबूल
करूनिग्रहण॥करितेजाहलेमदिरापान॥तेणेंनष्टबुद्धिहोऊन॥उन्मत्तहोतीसर्वते॥३॥यादवमिळूनिपरस्पर॥बोल
तेजाहलेमर्मोत्तर॥क्रोधवशहोऊनिसत्वर॥युद्धकदनींमिसळले॥४॥शस्त्रेंघेऊनियांकरीं॥करितेजाहलेमारामा
री॥दंडमुष्टिप्रहारीं॥महीसीपाडितीएकमेकां॥५॥यापरीहोतांरणोत्सव॥यादवनिमालेसर्व॥तेसमयींवासुदेव
स्वयेंनिश्चळपैंराहे॥६॥सरस्वतीच्यातीरीं॥अश्वत्थछायेंतश्रीहरी॥बैसूनिकुतुकतेअवसरीं॥पाहतेजाहलेभागवत॥
७॥उद्धवह्मणेइतुक्यांत॥मींनमिळाजाऊनिभगवंत॥सन्मुखउभाराहिलोंत्वरित॥मगप्रभूनेंमजआज्ञापिलें॥८॥हे
उद्धवाबदरीवना॥तूंजाऊनियांतपाचरणा॥करूनिपावेंमाझियास्थाना॥प्रेमानंदेंकरूनियां॥९॥ऐसेंबोलताहीया

दवेश्वर ॥ मीयादवकुळाचासंहार ॥ पाहातांगेलोंसाचार ॥ श्रीकृष्णामागेंत्विपें ॥ १० ॥ तंवअश्वत्थवृक्षातळीं ॥ एकाकीबैसेवनमाळी ॥ दक्षिणपदवामांकमूळीं ॥ ठेवूनियांस्थिरासनीं ॥ ११ ॥ व्यासांचागुरुबंधुइतुक्यांत ॥ तेथेंमैत्रेयआलासमर्थ ॥ तेणेंवंदूनियदुनाथ ॥ ज्ञानास्तवप्रार्थिला ॥ १२ ॥ ऐकूनिमुनीचेंवचन ॥ कायबोलेनारायण ॥ पूर्वीब्रह्मदेवालागुन ॥ कथिलेंतेंतुह्मांसांगतों ॥ १३ ॥ यापरीबोलूनिकृष्णनाथ ॥ सांगतेजाहलेआह्मांभागवत ॥ उद्धवह्मणेपरिसामात ॥ ध्यानींनिमग्नमीझालों ॥ १४ ॥ श्रीहरीचेआज्ञेंलरित ॥ बद्रिकाश्रमींचाललोंनिवांत ॥ ऐसेंऐकूनियादववृत्त ॥ विदुरचित्तखिन्नहोय ॥ १५ ॥ मगविचारेंशोकनिवारुनी ॥ विदुरह्मणेउद्धवालागुनी ॥ जेंज्ञानतुजचक्रपाणी ॥ वदलातेंकथींआह्मांसी ॥ १६ ॥ उद्धवह्मणेत्यजितांकलेवरा ॥ श्रीहरीनेंतुजभक्तप्रवरा ॥ स्मरूनिआज्ञापिलेंमुनिवरा ॥ कथावयातेंतुज ॥ १७ ॥ तोतुह्मांकथीलतत्त्वतां ॥ ऐसेंसंवादूनिउभयतां ॥ यमुनातटींरात्रींनृपनाथा ॥ राहूनिप्रभातींनिघाले ॥ १८ ॥ उद्धवजायबदरीवना ॥ विदुरविस्मयकरीमना ॥ चित्तींस्मरूनिजनार्दना ॥ गंगाद्वाराचालिला ॥ १९ ॥ तेंपुसेपरीक्षितीशुका ॥ विप्रशापेंयदुवंशआसका ॥ नष्टहोतांउद्धवाप्रतीकां ॥ शापनाहींबाधला ॥ २० ॥ शुकह्मणेदेहत्यजितां ॥ श्रीहरीविचारीनिजचित्ता ॥ कींमीगेलियांतत्वतां ॥ ज्ञानोपदेशखंडेल ॥ २१ ॥ ह्मणूनिराहूनिउद्धव ॥ ज्ञानोपदेशशुद्धभाव ॥ करीलजाणूनिस्वयमेव ॥ तयापाठवीबदरिके ॥ २२ ॥ ईशेच्छेनेंविप्रशाप ॥ तयानकरीसंताप ॥ तोबदरिकाश्रमींतप ॥ करूनिआराधीईश्वरा ॥ २३ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसरवारामविरचित ॥ चतुर्थाध्यायगोडहा ॥ २४ ॥ ४ ॥ पंचमाध्यायप्रारंभः ॥ विदुरतेथूनिकांहींदिवशीं ॥ जाऊनिपोंचलागंगाद्वारासी ॥ तेथेंभेटूनिमैत्रेयमुनीसी ॥ प्रश्नकरीअत्यादरें ॥ १ ॥ जनकर्मकरितीसुखस्वार्थ ॥ परीसुखनलाधतीकिंचित ॥ यासुव-

संसारींकर्त्तव्ययथार्थ॥कायतेंमजसांगिजे॥२॥हेसाधुवर्याआपण॥जनावरीअनुग्रहपूर्ण॥करावयापरिभ्रमण॥क
रीतसामहीमाजी॥३॥ह्मणूनिजेणेंश्रीपती॥स्थिरराहूनियांचित्तीं॥ज्ञानदेनिजभक्तांप्रती॥तीपद्धतीमजसांगा॥४
भगवान्आनंदकंद॥पूर्णब्रह्मगोविंद॥तेणेंअवतारकृत्येंकेलींस्वच्छंद॥तींआज्ञाकारणेंनिवेदा॥५॥मींव्याससुखें
करूनीनिश्चित॥श्रवणकेलींव्रतेंबहुत॥परंतुश्रीकृष्णालीलामृत॥सेवनार्थअतृप्तमी॥६॥विश्वाचीजन्मस्थिती॥व्हाव
यादुष्टवधकमलापती॥अवतारघेऊनिजगतीं॥माजीकायकरीहो॥७॥तेंचीसांगामजलागुन॥ऐसेंपरिसूनिभाषण॥
बोलतीमैत्रेयआपण॥अगापरिसेंकुरुश्रेष्ठ॥८॥हेविदुरभागवता॥कायवर्णावीतुझीयोग्यता॥मांडव्यशापापासू
नितात॥॥महीवरीतुझेंआगमन॥९॥व्याससवीर्येंकरूनीजाण॥दासीचेउदरींजाहलेंजनन॥श्रीकृष्णचरणींसदाम
न॥भक्तियुक्तनिश्चयें॥१०॥तूंयमधर्मसाक्षात॥बापाआहेसपुनीत॥निजधामासिजातांकृष्णनाथ॥रहस्यमातेंनि-
वेदिलें॥११॥तेंतुजकरावयाकथन॥मजआज्ञापीमधुसूदन॥बापाआलोंह्मणून॥गंगाद्वारींयेथवां॥१२॥यास्त
वश्रीकृष्णकथामृत॥वर्णनकरीनगापुनीत॥सृष्टीचेपूर्वीभगवंत॥एकहोतासज्जना॥११॥भगवंतह्मणजेआ-
त्माराम॥जोयोग्यांचाविश्राम॥अखंडअव्ययपरम॥कार्यकारणाविरहित॥१२॥तेणेंआत्मेच्छेंकरून॥सदसदात्मकमा-
याजाण॥करूनियांनिर्माण॥कौतुकअद्भुतदाविलें॥१३॥तियेच्याठायींमलें॥स्ववीर्यधारणकेलें॥त्यापासूनिउद्भवलें
महत्तत्वजाणपां॥१६॥त्यातलापासूनिसाचार॥जाहलात्रिविधअहंकार॥तामसाहंकृतीपासूनिसत्वर॥पंचमहा
भूतेंनिपजलीं॥१७॥राजसापासूनिजाण॥दशेंद्रियेंजाहलींपूर्ण॥वैकारिकाहंकृतीपासून॥इंद्रियदेवतामनजाह
लें॥१८॥काळमायेच्यायोगेंभलें॥तेथेंगगनउद्भवलें॥तयापासूनिदिसोंलागलें॥प्रभंजनरूपजाणिजे॥१९॥त्यापा

सूनितेजदेख ॥ तेजापासूनिउदक ॥ तोयापासूनिपृथ्वीचोख ॥ ऐशींतत्वेंजन्मलीं ॥ २० ॥ तींसर्वएकत्रहोऊन ॥ कृ-
रितीभगवंताचेंस्तवन ॥ हेप्रभोतुझेचरणींनमन ॥ अखंडअसोसर्वेश्वरा ॥ २१ ॥ आपणाशरणागतांचे ॥ त्रिताप
दूरकरणारसाचे ॥ तुझेठायींकायेंवाचें ॥ सेवाघडोसर्वेश्वरा ॥ २२ ॥ तुझेअनुग्रहावीण ॥ नव्हेआमुचेनिब्रह्मांडज
नन ॥ यास्तवकरूनीकृपापूर्ण ॥ विश्वनिर्माणकरवावें ॥ २३ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंधपरमपुनीत
प्राकृतसखारामविरचित ॥ पंचमाध्यायगोडहा ॥ २४ ॥ ५ ॥ षष्ठाध्यायप्रारंभः ॥ मैत्रेयह्मणेविदुरासी ॥ स्व
शक्तींचीगतीऐसी ॥ पाहूनिकाळसंज्ञकशक्तीसी ॥ तेंहृषीकेशीस्वीकारी ॥ १ ॥ तेवीसतत्वांचाजोगण ॥ त्यामाजीप्र-
विष्टहोयभगवान ॥ तेंविराटदेहपावेजनन ॥ सत्यजाणभागवता ॥ २ ॥ अंतर्यामीसर्वेश्वर ॥ ब्रह्मांडकोशींहोऊ
निस्थिर ॥ प्रलयोदकींसहस्र ॥ संवत्सरराहिला ॥ ३ ॥ त्याविराटपुरुषानेंभले ॥ स्वदेहाचेविभागकेले ॥ तेंवर्णन
पाहिजेऐकिलें ॥ कुरुश्रेष्ठायेधवां ॥ ४ ॥ प्रथमअंडासीसाचार ॥ मुखजाहलेंमनोहर ॥ वागिंद्रियदेवतावैश्वान
र ॥ वचनविषयपैंतेथें ॥ ५ ॥ तालुस्थानींदेवतावरुण ॥ जिव्हाइंद्रियरसविषयजाण ॥ नासिकास्थानींघ्राणेंद्रिय
पूर्ण ॥ अश्विनीकुमारसुरेश ॥ ६ ॥ गंधविषयघ्राणासी ॥ चंद्रसूर्यदेवतानेत्रांसी ॥ रूपविषयस्पर्शत्वगिंद्रियांसी ॥ अ
धिष्ठाताप्रभंजन ॥ ७ ॥ उपरीतयासीश्रवण ॥ पुढतीजाहलेउत्पन्न ॥ त्याच्यादेवतादिशाजाण ॥ शब्दविषयउद्भवला
८ ॥ लिंगजयाचेंप्रजापति ॥ गुदस्थानींदेवनिर्ऋति ॥ शक्तीनेंसत्वरगति ॥ मलत्यागकरितसे ॥ ९ ॥ त्यासीउत्पन्नजाह
लेकर ॥ तयांचीदेवताअमरेश्वर ॥ विराटासीजाहलेंपदसुंदर ॥ तेथेंविष्णुसंचरला ॥ १० ॥ हृदयउत्पन्नजाहलेंत्या
सी ॥ त्याचीदेवताजाणाशशी ॥ संकल्पविकल्पव्यापारासी ॥ उत्कर्षहोतोज्यायोगें ॥ ११ ॥ अहंकारज्याचाशंकर ॥

बुद्धीमाजी विष्णु कुमर ॥ ज्ञानशक्तीसहित सत्वर ॥ येऊनि यांत राहिला ॥ १२ ॥ ऐशा विराट देहाचें मस्तक ॥ स्वर्गलोक जा
णा चोख ॥ चरण पृथ्वी देख ॥ नाभी आकाश जाणिजे ॥ १३ ॥ मुखापासूनि ब्राह्मण ॥ बाहूंपासूनि क्षत्रिय पूर्ण ॥ ऊरू
पासूनि वैश्य जाण ॥ चरणापासाव शूद्र ते ॥ १४ ॥ हे विदुरा यथापरी ॥ विराट स्वरूपी श्रीहरी ॥ त्याचे गुण वर्णावया
वैखरी ॥ फणिपाळाची श्रमली हो ॥ १५ ॥ तेथें काय मी पामर ॥ गुण वर्णूं अपार ॥ जैसें गुरुमुखीं हूनी सुंदर ॥ ऐकिलें
तैसें कथियेलें ॥ १६ ॥ चार वर्ण चार आश्रम ॥ श्रीहरीपासूनि जाहले परम ॥ देवाधिदेव पुरुषोत्तम ॥ वंदन असो तत्
पदीं ॥ १७ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ षष्ठाध्याय गोड हा ॥ १८
६ ॥ सप्तमाध्याय प्रारंभः । ॥ श्रीशुक म्हणे रायासी ॥ मैत्रेय सांगती विदुरासी ॥ विराटोत्पत्ति सौख्यराशी ॥ ऐकूनि
बोले विदुर तो ॥ १ ॥ हे ब्रह्मनिष्ठा परिसा विचार ॥ ब्रह्म असतां निर्गुण निर्विकार ॥ तयासी क्रिया गुण प्रकार ॥ कैसा झा
ळं बोंशकेतो ॥ २ ॥ अहो ऋखागारा मैत्रेय ऋषी ॥ निवारण करावें संदेहासी ॥ परिसूनि विदुर वाक्यासी ॥ बोलते जाहले
मैत्रेय ॥ ३ ॥ गगनीं चारोहिणीवर ॥ वायुयोगें जळावर ॥ कंपित भासे वारंवार ॥ तद्वत श्रीधर जाणिजे ॥ ४ ॥ भगवंत
आत्ममायें करून ॥ तो होतो चंचळ गुण ॥ ज्या श्रीहरीचें करितां स्मरण ॥ हरे सकळ भववार्ता ॥ ५ ॥ ऐकूनि मैत्रेयाचें व
चन ॥ विदुर करी पुनः प्रश्न ॥ कीं विराट शरीर उत्पन्न ॥ करूनी प्रवेशे जो तेथें ॥ ६ ॥ ज्या भगवंतासी साचार ॥ मस्तकें कर्ण ने-
त्र सहस्र ॥ तैसीं मुखें पाद कर ॥ दशविध प्राण इंद्रियें ॥ ७ ॥ सर्व लोक ज्याचे ठायीं ॥ सदा राहती पाहीं ॥ त्याच्या विभूति
ये समयीं ॥ मज लागीं वर्णाव्या ॥ ८ ॥ ब्रह्म सर्ग प्रजापती ॥ अनुसर्ग मनूनि श्चिती ॥ तैसे मन्वंतराधिपती ॥ यांचे वंश पा
वन ॥ ९ ॥ चरित्र तयांचें समस्त ॥ सांगा स्वामी यथोचित ॥ त्रैलोक्य प्रमाण अद्भुत ॥ तिर्यक्‌ मानव देव ते ॥ १० ॥ सप्त पाता

ळेंतयापरी ॥ सप्तलोकजेकावरी ॥ पशुपक्षीसरीसृपसत्वरी ॥ कवणेपरीनिपजले ॥ ११ ॥ भगवंताचें विक्रम ॥ विभागेंहे व-
र्णाश्रम ॥ ऋषींचें कर्मजन्म ॥ वेदयज्ञविभागते ॥ १२ ॥ सांख्यमार्गयोगज्ञान ॥ कैसेंपाखंडजाहलेंनिर्माण ॥ प्रवृत्तीमाजी-
लज्ञाण ॥ जीवांसिगतीकवणेपरी ॥ १३ ॥ धर्मार्थकाममोक्षांसी ॥ श्राद्धविधीपरियेसी ॥ गृहस्थितिदानतपांसी ॥ इष्टा
पूर्तींचें फळवदा ॥ १४ ॥ प्रवासधर्मतयापरी ॥ तत्वमलयींनिर्धारी ॥ पुरुषसंस्थानकवणेपरी ॥ तत्वोपनिषद्ज्ञानतें ॥ १५ ॥ हे
मीकृष्णकथाश्रित ॥ प्रश्नकेलेजेपुनीत ॥ त्यांचेंसमाधानउचित ॥ कृपाकरूनीसांगावें ॥ १६ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृ
तीयस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ सप्तमाध्यायगोडहा ॥ १७ ॥ ७ ॥ अष्टमाध्यायप्रारंभः ॥ मैत्रे-
यह्मणेविदुरा ॥ कुरुवंशभूषणा बुद्धिसागरा ॥ माझेकडूनीहरिकथासारा ॥ नित्यनूतनवदवीसो ॥ १ ॥ जेंश्रीमद्भागव
त ॥ महापुराणब्रह्मसंमत ॥ मानवांचेंदुःखअमित ॥ नाशकरीश्रवणें ॥ २ ॥ परमसुखाचासागर ॥ ब्रह्मसुखाचेंमाहेर
महाभागवतनिगमसार ॥ लोकपालसेविती ॥ ३ ॥ तेंशेषेंअनंतेंजाण ॥ सनकादिकांसीकेलेंकथन ॥ तयानीतेंमहापुरा
ण ॥ सांख्यायनासांगीतलें ॥ ४ ॥ तयानेंबोधिलेंसुरगुरूसी ॥ तेंसेंचीपराशरामद्गुरूसी ॥ पराशरेंमजबोधिलेंनिश्चयेंसीं
तेंतुजआतांनिवेदितों ॥ ५ ॥ ऐसीपरंपरापावन ॥ कृष्णभक्तातुजकेलीकथन ॥ आतांभागवतपुराण ॥ सद्भावेंश्रवणकरीग
६ ॥ सद्गुरूपदेशेंकरूनीस्पष्ट ॥ आत्मरहस्यबोधितोंश्रेष्ठ ॥ ज्याचेश्रवणपठनेंअनेककष्ट ॥ जन्मांतरींचेनासती ॥ ७ ॥ जेंप्र
लयसागरींविरालें ॥ अखिलविश्वजाणभलें ॥ तेव्हांशेषशय्येवरीशोभलें ॥ रूपमहाविष्णूचें ॥ ८ ॥ सहस्रयुगपर्यं
त ॥ ब्रह्मांडसांठविलेंह्रदयांत ॥ आपुल्यासर्वशक्तींसहित ॥ पूर्णानंदेंतेधवां ॥ ९ ॥ सृष्टीउत्पन्नकरावयाचीवासना ॥
मनींउपजलीनारायणा ॥ तेव्हांतन्नाभीपासूनिजाणा ॥ कमलएकनिपजलें ॥ १० ॥ त्याकमलापासाव ॥ निर्माणजाह

लाब्रह्मदेव॥जोसाक्षातवासुदेव॥अंशरूपेंनिर्धारें॥११॥त्याकमलासनावर॥बैसूनितोहरिकुमर॥चारदिशांसिपाह
तांचार॥मुखेंतयाउत्पन्नवली॥१२॥विधिमनांतकरीचिंतन॥मीजाहलोंकवणापासून॥चहूंकडेप्रलयोदकपूर्ण॥का
यकेसेंहेंअसे॥१३॥मगकरूनीविचार॥कमलनालांतसंचार॥करिताजाहलासत्वर॥बहुवर्षशतवरी॥१४॥प
रंतुस्वाधिष्ठानपाहीं॥तयासीनातुडेकांहीं॥मगकमळींयेऊनिलवलाहीं॥समाधितेणेंलाविली॥१५॥तेव्हांस्व
हृदयमंदिरांत॥शेषपर्यंकासहित॥प्रगटजाहलाविश्वतात॥श्यामसुंदरपरमात्मा॥१६॥सूक्ष्मपीतांबर-
धारी॥शंखचक्रआयुधेंकरीं॥दिव्याभरणहृदयावरी॥कौस्तुभमणीविराजे॥१७॥आपादलंबिनीवनमाला
मकरकुंडलेंसूर्यकळा॥ऐसाघवघवीतसांवळा॥अकस्मातदेखिला॥१८॥आदिनारायणयापरी॥विधातापाहूनि
झडकरी॥सद्भावेंसाष्टांगवंदनकरी॥मुखेंस्तोत्रवाणीवदे॥१९॥श्रीमद्भागवतसारामृत॥तृतीयस्कंधपरमपुनीत॥
प्राकृतसखारामविरचित॥अष्टमाध्यायगोडहा॥२०॥ ८ ॥ नवमाध्यायप्रारंभः॥ ॥श्रीशुकह्मणेरायासी॥मै
त्रेयसांगतीविदुरासी॥विधिपाहूनिब्रह्मतेजासी॥स्तवनकरिताजाहला॥१॥चतुराननह्मणेताता॥कृपासागराभ
गवंता॥तवचरणांचीप्राप्तीआतां॥मजअनाथाजाहली॥२॥यास्तवतुझीसेवा॥नित्यनकरितीवासुदेवा॥तावत्का
लपर्यंतकेशवा॥तवमायासक्तहोती॥३॥द्रव्यसदनसुहृदांनिमित्त॥शोकमोहआणिस्त्रीसुत॥यांचीस्पृहाअक-
स्मात॥निर्माणहोतीनिश्चयें॥४॥हेंप्रभोतवमायेंकरून॥पुरुषमोहितहोतीआपण॥स्वर्गलोकाचीइच्छाधरून॥
यज्ञादिककरितीबहु॥५॥नानादानेंतीर्थाटनें॥लोककरितीयाकारणें॥परीयथार्थज्ञानतेणें॥नपावतीपरब्रह्मातें
६॥जनकजननीतूंचिताता॥कृपासागराविश्वनाथा॥सर्वांतर्यामीसर्वसत्ता॥तुझीअसेगागोपाळा॥७॥ऐसेंस्तव

नकेलियावरी ॥ सद्भावें ब्रह्मापायधरी ॥ नंतरी संतुष्ट होउनी श्रीहरी ॥ बोलता जाहला तेधवां ॥ ८ ॥ परमेष्ठी लातं पक-
रून ॥ केलेंस मातें प्रसन्न ॥ आतां करी निर्माण ॥ समस्त सृष्टि विधात्या ॥ ९ ॥ जैसा काष्ठीं वैश्वानर ॥ तैसा विश्वीं मी साचा-
र ॥ तूं लोकमागुती उत्पन्न कर ॥ मदनुग्रहें करूनियां ॥ १० ॥ तुझें तपःप्रभावें सांप्रत ॥ दर्शन दिधलें त्वरित ॥ माझें स्वरू-
प वेदसंमत ॥ पूर्वपुण्यें पाहती ॥ ११ ॥ तुझ्या सृष्टिकर्मासी ॥ मोह न बाधे कष्टराशी ॥ मी प्रसन्न तुजसी ॥ सदा असें
विधातिया ॥ १२ ॥ तुवां केलें जें का स्तोत्र ॥ सर्वमंगल पवित्र ॥ भक्तीनें पढतां इह परत्र ॥ सुख लाधे माझिया भक्तां ॥ १३ ॥
दिवसरजनी चक्रपाणी ॥ मी आहें विश्वस्थानीं ॥ मजमाजी लीन सर्व हें जाणूनी ॥ सृष्टि करी यथापूर्व ॥ १४ ॥ मैत्रेय ह्मणे
विदुरा ॥ ऐसें आज्ञापूनि कुमारा ॥ अंतर्धान पावला ते अवसरा ॥ पद्मनाभ परमात्मा ॥ १५ आतां पुढें अवधान धरा ॥ श्री
कृष्णलीलामृतपान करा ॥ तेणें चुकेल जन्मफेरा ॥ मोक्षसौख्य प्राप्त होय ॥ १६ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंध-
परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ नवमाध्याय गोड हा ॥ १७ ॥ ९ ॥ दशमाध्याय प्रारंभः ॥ ॥ विदुर ह्मणे मै-
त्रेयासी ॥ अंतर्धान पावतां हृषीकेशी ॥ ब्रह्मदेवें कवणे प्रकारेशीं ॥ निपजविली सृष्टि हे ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणे विदुरासी ॥
विधि तें करी तपासी ॥ दिव्य शतवत्सर परियेसीं ॥ उदकामाजी निश्चयें ॥ २ ॥ प्रवेश करूनी कमलांत ॥ चतुर्दश लोकां-
ची कल्पना पुनीत ॥ कल्पिता जाहला जगन्नाथ ॥ परम कौतुकें करूनियां ॥ ३ ॥ विदुर ह्मणे मुनिनाथा ॥ अनेकस्वरूपें श्री
अनंता ॥ माजी कालाख्य लक्षण आतां ॥ कृपा करूनी वर्णावें ॥ ४ ॥ तैसाच ब्रह्मसृष्टिप्रकार ॥ सांगूनि वर्णिजे मत प्रश्नवि-
चार ॥ ऐसें ऐकूनि मुनिप्रवर ॥ बोलता जाहला तयातें ॥ ५ ॥ सृष्टीच्या पूर्वी जाण ॥ अखंड असे भगवान ॥ प्रस्तुत विश्व
व्यापून ॥ अंतीं अवशिष्ट तो चि राहे ॥ ६ ॥ आतां सत्वादि गुणांचा जो क्षोभ ॥ सकल सृष्टि तरूचा कोंभ ॥ आद्यंतहीन स्वयं

भ ॥ तो त्रिकाळ बोलिजे ॥ ७ ॥ प्राकृत सर्ग साचार ॥ श्रवण करी गा मनोहर ॥ तो असे नवप्रकार ॥ प्राकृत वैकृत मिळूनी ॥ ८ ॥
सहा प्रकारीं प्राकृत ॥ तीन प्रकारीं वैकृत ॥ उभयात्मक दशम सर्ग निश्चित ॥ नामें त्याचीं परिसावीं ॥ ९ ॥ अहंकार महद्
भूतसर्ग ॥ इंद्रियें आणि देवतावर्ग ॥ पंचम तो अविद्यासर्ग ॥ तामस भेद सहावा ॥ १० ॥ ऐसा प्राकृत सर्ग कथिला ॥ आतां
परिसें वैकृत भला ॥ वृक्षसर्ग सप्तम वहिला ॥ पशु पक्षी सर्ग अष्टम तो ॥ ११ ॥ वृक्षसर्गांत सहा प्रकार ॥ आहेत विदुरा स
चार ॥ वनस्पति औषधि लता त्वक्‌सार ॥ वीरुध द्रुम यापरी ॥ १२ ॥ श्लोक ॥ गौरजो महिषः कृष्णः सूकरो गवयो
रुरुः ॥ द्विशफाः पशवश्चेमे अविरुष्ट्रश्च सत्तम ॥ २१ ॥ खरोऽश्वोऽश्वतरो गौरः शरभश्चमरी यथा ॥ एते चैकशफाः
क्षत्तः शृणु पंचनखान्पशून् ॥ २२ ॥ श्वा सृगालो वृको व्याघ्रो मार्जारः शशशल्लकौ ॥ सिंहः कपिर्गजः कूर्मो गोधा च मक
रादयः ॥ २३ ॥ कंकगृध्रवटश्येनभासभल्लूकबर्हिणः ॥ हंससारसचक्राह्वकाकोलूकादयः खगाः ॥ २४ ॥ टीका ॥ धेनु
अज महिष जाण ॥ कृष्णमृग सूकर गवयें पूर्ण ॥ मुवार नामें प्रसिद्ध हरिण ॥ मेंढा उष्ट्र हे द्विखुर पशु ॥ १३ ॥ गर्दभ
अश्व खेचर ॥ गौरवर्ण हरिण साचार ॥ शरभ चमरी मृग सुंदर ॥ एकखुराचे हे पशु ॥ १४ ॥ आतां परिसें पंचनख ॥ ॥
श्वान सृगाल व्याघ्र वृक ॥ मार्जार साळ शीश शशक ॥ सिंह वानर वारण ॥ १५ ॥ कांसव घोरपड जलचर मीन ॥ कंक गीध व
टश्येन ॥ जळकुक्कुट भल्लुक जाण ॥ मयूर हंस सारस ॥ १६ ॥ चक्रवाक काक उलूक ॥ हा अष्टम सृष्टीचा विवेक ॥ मनुष्यांस
तो हा सम्यक ॥ प्रकार नवें सृष्टीचा ॥ १७ ॥ कुमार सर्ग दशम लें प्रसिद्ध ॥ तो उभयात्मक जाणिजे शुद्ध ॥ आतां जो देवसर्ग
अष्टविध ॥ वैकृत भेद तो साच ॥ १८ ॥ देव असुर आणि पितर ॥ तैसेच गंधर्व यक्ष किन्नर ॥ चारण सिद्ध विद्याधर ॥ भूत प्रे
तादि आठ हे ॥ १९ ॥ आतां परिसें सादर ॥ मन्वंतरादि प्रकार ॥ जो कां सृजिला साचार ॥ कालनियमार्थ विधीनें ॥ ॥ २० ॥

श्रीमद्भागवतसारामृत॥ तृतीयस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसखारामविरचित॥ दशमाध्यायगोड हा॥ २१ ॥ १०॥ एका
दशाध्यायप्रारंभः॥ ॥मैत्रेयबोलतीवचन॥ परिसें भागवतासावधान॥ परमेष्ठीनें घटिकेचेंमान॥ केलेंतेंचीसांगतों॥१
सहापळेंतांब्याचीजाण॥ घटिकाघडावीकरूनिवजन॥ तियेतेंसच्छिद्रकरावयालागुन॥ सांगसाधनसांगतों॥ २ ॥
विंशतिगुंजासुवर्णाचीतार॥ विस्तृतकरूनीअंगुलेंचार॥ घटिकेसिपाडावेंसत्वर॥ छिद्रएकनिश्चयें॥ ३॥ त्याछिद्र-
द्वारेंउदकजातां॥ घटिकाभरेतैंघटीहोयतत्वतां॥ साठघटिकागणितां॥ दिवसयामिनीजाणपां॥ ४॥ तीसदिव-
सांचामास॥ तोपितरांचाएकदिवस॥ सहामहिनेहोतांसुरस॥ अयनऐसेंवदतीत्या ५ देवांचादिवसउत्तरायण॥
दक्षिणायनतेंचियामिनीजाण॥ मानवांचेंवर्षसंपूर्ण॥ अहोरात्रतेंदेवांचें॥ ६॥ याचींमानेंसाचार॥ युगचौकड्याए-
काहत्तर॥ जातीतेंमन्वंतर॥ एकहोतेंभागवता॥ ७॥ ऐसींचवद्रामन्वंतरें॥ गेलींअसतांएकसरें॥ विधीचाएकदिव
ससाचारें॥ रात्रीहीतितुकीच॥ ८ यामानेंकरूनीनिश्चित॥ ब्रह्म्यांसीहोतांवर्षेंशत॥ जगाचाप्रलयअकस्मात॥ होतोसंकल्पेंश्रीहरीचे ९
तेव्हांब्रह्मांडाचासंहार॥ होतोवैष्णवासाचार॥ याप्रलयासीदैनंदिनसुविचार॥ अखिलबोलतीजाणते॥ १०॥ त्या
प्रलयारंभींजाण॥ शतवर्षेंअनावृष्टिहोउन॥ प्राण्यांसीनमिळेउदकान्न॥ तेणेंबापुडेतेमरती॥ ११॥ पुढतीशतसं-
वत्सर॥ शेषमुखींचावैश्वानर॥ प्रगटहोऊनिसंहार॥ करितचालेविश्वाचा॥ १२॥ तेव्हांससप्तसागरखवळती॥ ब्र
ह्मांडउदकांतबुडविती॥ काळाचीकरावयागणती॥ ॥समर्थकोणीअसेना॥ १३॥ ब्रह्मांडहेपरमाणुवत्॥ अनंतासी
होयपरिकिंचित॥ रोमरंध्रींब्रह्मांडेंअनंत॥ वसतीजयाश्रीहरीचे॥ १४॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ तृतीयस्कंधपरमपुनी
त॥ प्राकृतसखारामविरचित॥ एकादशाध्यायगोडहा॥ १५॥ ११॥ द्वादशा॰प्रारं॰॥ ॥मैत्रेयम्हणेविदुरासी॥ काल

स्वरूपसांगितलेंतुजसी॥आतांब्रह्मानिपजवीसृष्टीसी॥कवणेपरीतेंपरीस॥१॥अंधतामिस्रतामिस्रांसी॥मोहमहा
मोहअज्ञानासी॥सृजीपंचपर्वाअविद्याऐसी॥पापिष्ठसृष्टिप्रथमतो॥२॥मगब्रह्मदेवहरिस्मरण॥करूनियांसृष्टीउत्प
न्न॥करिताजाहलापूर्ण॥मनेंकरूनीतेधवां॥३॥सनत्कुमारादिकांचवघांसी॥विधिउत्पन्नकरूनितयांसी॥ह्मणेसृ
ष्टिकरात्वरेंसी॥तेंतेउत्तरदेतीतया॥४॥आह्मीमोक्षेच्छुनिश्चित॥नजाणोंसृष्टिकार्यकिंचित्॥ऐसापरिसूनिवा-
क्यार्थ॥परमेष्ठीमनींकोपला॥५॥तेंभ्रुकुटीपासूनिजाण॥एकपुरुषजाहलाउत्पन्न॥नीलवर्णकरीरुदन॥ह्म
णेमाझेंनामठेवीं॥६॥स्थानराहावयाआतां॥शीघ्रओपिजेताता॥ऐसेंऐकूनिविधाता॥ह्मणेरुद्रह्मणतीतुज॥७॥
तेसेंचमन्युमनुमहिनस॥महान्शिवऋतुध्वजरूरस॥ऊर्ध्वरेताभवकालविशेष॥वामदेवधृतव्रत॥८॥इंद्रियअ
सुगगन॥वायुअग्निजळपूर्ण॥महीसूर्यरोहिणीरमण॥तपस्थानेंहींतुला॥९॥बुद्धिउमाउशनाधृती॥इलाअंबि
काइरावती॥स्वधादीक्षाशब्दमती॥सर्पिकातात्यातुझ्या॥१०॥स्थानेंकांतायापरी॥रुद्रासिदेऊनिसत्वरी॥पि
ताह्मणेसृष्टीकरी॥ऐकूनितेणेंमानिलें॥११॥तामससृष्टीभेसूर॥उत्पन्नकेलीसाचार॥ऐसेंपाहूनिविष्णुकुमर॥
ह्मणेबाबाहेंपुरे॥१२॥मगधात्यानेंकायकेलें॥आपुल्यादेहापासूनिभले॥दहापुत्रनिर्माणकेले॥कवणकैसेतेऐ-
का॥१३॥मांड्यांपासूनिनारदमुनी॥दक्षजाहलाअंगुष्ठापासुनी॥प्राणांपासाववसिष्ठज्ञानी॥त्वचेपासूनिभृगुतो
१४॥करापासूनिक्रतुजाण॥नाभीपासूनिपुलहपूर्ण॥पुलस्त्यकर्णपासून॥मुखापासूनिअंगिरा॥१५॥नेत्रांपा-
सूनिअत्रिमुनी॥मरीचीझालामनापासूनी॥नंतरधर्मउद्भवेस्तनीं॥अधर्मपृष्ठीनिपजला॥१६॥हृदयापासूनिम-
न्मथ॥भ्रकुटीपासूनिनिश्चित॥क्रोधनिपजलाअकस्मात॥अधरोष्ठींलोभमतो॥१७॥लिंगस्थानींसागर॥मलोत्स

गीं निर्ऋती थोर ॥ छायेपासूनि कर्दममुनीश्वर ॥ इत्यादिक हे सृष्टि केली ॥ १८ ॥ मग स्वकन्येसी रममाण ॥ होऊं पाहे विधाता आपण ॥ मरीच्यादि ऋषी तें पाहून ॥ निषेध करिती तयाचा ॥ १९ ॥ मग लज्जित होऊनि परमेष्ठी ॥ आपुल्या देहाची यष्टी ॥ त्यागितां जाहला उठाउठी ॥ सृष्टीमाजी तेधवां ॥ २० ॥ त्या ब्रह्मतनूचा अंधकार ॥ होता जाहला साचार ॥ अष्टदिशांनीं तो सत्वर ॥ ग्रहण केला कौतुकें ॥ २१ ॥ एके समयीं जाण ॥ कमलसंभवाचे मुखापासून ॥ चारी वेद जाहले निर्माण ॥ ऋग्यजुःसाम अथर्वण हे ॥ २२ ॥ तैसे आयुर्वेद धनुर्वेद ॥ गांधर्ववेद शिल्पाख्य वेद ॥ उपवेद जे प्रसिद्ध ॥ इतिहास पुराणें ॥ २३ ॥ ऐसे वेद निर्माण केले ॥ सोमादि यज्ञ दान भले ॥ तप सत्य धर्म पद चांगलें ॥ चारी आश्रम लहूनी ॥ २४ ॥ व्याहृती अक्षर समुदाव ॥ रागरागिण्या स्वर सर्व ॥ मनें करूनी स्वयमेव ॥ निर्माण करी विधाता ॥ २५ ॥ सृष्टीची अपूर्णता ॥ देखूनियां विधाता ॥ स्वदेहापासूनि तत्वता ॥ स्त्रीपुरुष निर्मी पुढें ॥ २६ ॥ स्वायंभुव मनु आणि शतरूपा ॥ कांता तयाची शतरूपा ॥ लावण्यें रत्नाच्या प्रदीपा ॥ स्वयें तेला जवी ॥ २७ ॥ त्यांच्या मैथुनधर्में करून ॥ प्रजावृद्धी जाहली पूर्ण ॥ मनुपुत्र प्रियव्रत उत्तानचरण ॥ महापराक्रमी उद्भवले ॥ २८ ॥ आकूति प्रसूती देवहूती ॥ या कन्या लावण्यवती ॥ जामात पाहूनि योग्य सन्मती ॥ कन्यादान तें केलें ॥ २९ ॥ रुचीसी दिधली आकूती ॥ कर्दममुनीसी देवहूती ॥ दक्षालागीं प्रसूती ॥ देतां जगत् विस्तारलें ॥ ३० ॥ श्रीमद्भागवत सारामृत ॥ तृतीयस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ द्वादशाध्याय गोड हा ॥ ३१ ॥ १२ ॥ त्रयोदशाध्याय प्रारंभः ॥ ॥ श्रीशुक कल्याणें नृपनाथा ॥ मैत्रेय मुनी ऐसें सांगतां ॥ विदुर परिसूनि सद्वार्ता ॥ आणिक प्रश्न करितसे ॥ १ ॥ स्वायंभुव आणी त्याची कांता ॥ शतरूपा लावण्यसरिता ॥ गृहस्थधर्में वर्तता ॥ काय पुढती ते करिती ॥ २ ॥ ऐसी परिसूनियां वाणी ॥ तया बोले मैत्रेयमुनी ॥ स्वायंभुव

मनुशतरूपाराणी ॥ भावें प्रार्थिती विधीतें ॥ ३ ॥ हे ताता आज्ञां लागुन ॥ काय आज्ञा आहे पूर्ण ॥ ती मस्तकीं करूनि धारण ॥ तदनुसार वर्तूं सदा ॥ ४ ॥ परमेष्ठी ह्मणे स्वसुता ॥ पुत्रजनका ज्ञा मानिता ॥ होय तयास चीधन्यता ॥ जगामाजी होतसे ॥ ५ ॥ तुह्मी प्रजा करूनी उत्पन्न ॥ करावें पृथ्वीचें पालन ॥ यज्ञयागादि कर्में करून ॥ आदिनारायण तोषवा ॥ ६ ॥ ऐसी परिसूनि वाणी ॥ स्वायंभुव मनु ते क्षणीं ॥ बोलता जाहला विधीलागुनी ॥ काय तें चीपरिसावें ॥ ७ ॥ पृथ्वी गेली रसातळांत ॥ आतां आह्मीं प्रजेसहित ॥ कोठें राहावें सांगा त्वरित ॥ पितामहा सर्वज्ञा ॥ ८ ॥ महीचा करावया उद्धार ॥ विचार करावा सत्वर ऐसें ऐकतां वचनसार ॥ ब्रह्मा ध्याय श्रीहरीतें ॥ ९ ॥ तों नवल वर्तलें जाहूला ॥ विधिनासाद्वारें भला ॥ अंगुष्ठमात्र क्रोड पडला ॥ अकस्मात ते काळीं ॥ १० ॥ मरीच्यादि मुनिवर ॥ पाहून आश्चर्य करिती थोर ॥ इतुक्यामाजी वराह भयंकर ॥ गर्जना करूं लागला ॥ ११ ॥ तेणें दिशा नादभरित ॥ होत्या जाहल्या समस्त ॥ आदिसूकरें स्वदेह पुनीत ॥ कंपायमान तें केला ॥ १२ ॥ तेणें सर्व लोक थरारिले ॥ मग शरीर तयाचें विस्तीर्ण जाहलें ॥ स्थान घ्राणें करूनी हुंगिलें ॥ प्रलयोदकीं संचरला ॥ १३ ॥ कोपें करूनी जाण ॥ उदकीं प्रवेशे नारायण ॥ पृथ्वी दंष्ट्रेवरी धरून ॥ येऊं पाहे जंव वरती ॥ १४ ॥ तंव हिरण्याक्ष अवचित गदापाणी आला धांवत ॥ प्रभूनें तयाचा करूनी घात ॥ ऊर्ध्व प्रयाण तें केलें ॥ १५ ॥ असुर रक्तपंकांकित ॥ शरीर वराहाचें शोभे बहुत ॥ ऋषी तें पाहूनि रमाकांत ॥ स्तवन करिती सद्भावें ॥ १६ ॥ तैं वराह जलावरी ॥ उर्वी ठेवूनि पूर्वीपरी ॥ पावनचरित्र श्रीहरी ॥ वैकुंठपुरीं जायतो ॥ १७ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सरस्वाराम विरचित ॥ त्रयोदशाध्याय गोड हा ॥ १८ ॥ १३ ॥ चतुर्दशाध्यायप्रारंभः ॥ विदुर ह्मणे मुनिराया ॥ हिरण्याक्षाचें त्यासमया ॥ हरीशीं युद्ध व्हावया ॥ काय कारण सांग पैं ॥ १ ॥ मैत्रेय ह्मणे विदुरासी ॥ कथा परिसें सौख्यराशी ॥ दितीनें प्रार्थि

ला कश्यपऋषी ॥ कीं स्मरतदानमजकरा ॥ २ ॥ संततीचीकामना ॥ मजआहेमनमोहना ॥ आपणावांचूनीकवणा ॥ पतिरायासीप्रार्थूं ॥ ३ ॥ ऐसें बोलतांवचन ॥ तैंजाहलाअस्तमान ॥ होमद्यावाह्मणून ॥ ऋषिलगबगेंउठिन्नले ॥ ४ ॥ तोंसन्मुखपाहूनिपती ॥ धांवूनिधरीहाती ॥ कामातुरदिती ॥ कश्यपासीआइविते ॥ ५ ॥ ऐसेंपाहूनिलवरित ॥ कश्यपबोलतीपरिसेंमात ॥ हे पतिव्रतेहोऊनिशांत ॥ स्वस्थबैसेंक्षणभरी ॥ ६ ॥ हेस्मभगेशोधूनिपाहीं ॥ हा रतिचा समयनाहीं ॥ ऐसेंबोधितांलवलाहीं ॥ दितीनायकेतेधवां ॥ ७ ॥ ह्मणेमाझीमनकामनापूर्ण ॥ करास्वामीनलगतांक्षण ॥ कांतेचेंऐकूनिवचन ॥ वश्यजाहलामुनीतो ॥ ८ ॥ दितीशीं संगकेल्यावर ॥ मुनीह्मणेतूंगरोदर ॥ जाहलीसकांतेसाचार ॥ परंतुएकजाहलें ॥ ९ ॥ जोहामुहूर्तपूर्ण ॥ होमद्यावयायोग्यजाण ॥ माजोलांकेलंयेऊन ॥ विघ्नऐसेंयेवेळीं ॥ १० ॥ तेसेंचिभूतांसहित ॥ भ्रमणकरीकैलासनाथ ॥ स्वेच्छेंकरूनीजगतांत ॥ त्यासंधींतगर्भराहिला ॥ ११ ॥ यास्तवतूंतेंदोनकुमर ॥ तामसीहोतीलअनिवार ॥ यावेळेचागुणप्रखर ॥ ऐसाआहेशंभांगे ॥ १२ ॥ यापरीऐकूनिवचन ॥ दितीतेंव्याकुळहोउन ॥ महादेवासीकरीनमन ॥ कींमाझेपुत्रवधूंनये ॥ १३ ॥ ऐसेंकेलियाउत्तर ॥ कायबोलतीऋषीश्वर ॥ आदिदैत्य होऊनितुझेकुमर ॥ त्रैलोक्यत्रस्तकरतीलगे ॥ १४ ॥ मगप्रगटूनिश्रीपती ॥ वधीलतुझेपुत्रांप्रती ॥ ऐसेंऐकूनियांह्मणेदिती ॥ होससद्गतीममपुत्रां ॥ १५ ॥ परीजोदुःसहनरकस्थांसी ॥ ब्रह्मदंडतोनहोपुत्रांसी ॥ ऐसें बोलतांअनुतापेंशीं ॥ कश्यपबोधितीनंतर ॥ १६ ॥ तुजपश्चात्तापजाहलापूर्ण ॥ यास्तवहोईलसाधुपौत्रजाण ॥ करिसीलत्यातेंअवलोकन ॥ माझ्यावरेंनिश्चयेंगे ॥ १७ ॥ पौत्रहोईलभागवत विष्णुकरेंपुत्रघात ॥ ऐसेंऐकूनिदितिमनांत ॥ समाधानपावली ॥ १८ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंधपरमपुनीत प्राकृतसखारामविरचित ॥ चतुर्दशाध्यायगोडहा ॥ १९ ॥ १४ ॥ मैत्रेयह्मणेविदुरा ॥ अगाभागवतागुणागारा ॥ श्रीकृ-

ष्याकथाश्रवणकरा॥ प्रेमानंदें करूनियां॥ १॥ दितीनें कश्यपवीर्यधारण॥ उदरीं केलें शतवत्सरपूर्ण॥ अंधतमब्रह्मांडीं तेणें करून॥ व्यासजाहलें तेधवां॥ २॥ त्रस्तहोऊनि लोकपाळ॥ सत्यलोकासि गेले सकळ॥ गाऱ्हाणें सांगती उतावेळ ब्रह्मयासी सद्भावें॥ ३॥ जाणूनि देवांचें त्वद्गत॥ पितामह बोले मात॥ तुह्मांसि सांगतों यथार्थ॥ गाथा पुरातन जाणिजे॥ ४॥ माझे मानसपुत्र चार॥ सनक सनंदन सनत्कुमार॥ वैकुंठीं पाहावया श्रीधर॥ जाते जाहले एकदां॥ ५॥ तेथें जयविजय द्वारपाल॥ ज्यांचें चतुर्भुज रूप सोज्वळ॥ करीं शंखचक्र कंठीं वनमाळ॥ श्यामसुंदर तीकाया॥ ६॥ किरीट कुंडलें मकराकार॥ कांसे कशिला पीतांबर॥ रत्नजडित यष्टी सुंदर॥ हस्तामाजी जयांच्या॥ ७॥ द्वारपाळ पाहूनि मुनी॥ तयांसी रोधिती तेक्षणीं॥ हें पाहूनि कोपाग्नी॥ प्रगट जाहला द्विजांचा॥ ८॥ अहो येथें वसून॥ विषमस्वभाव धारण॥ करीत सा नारायण॥ भेदरहित असतां स्वयें॥ ९॥ ह्मणूनि येथें न वसावें॥ कामक्रोधलोभस्थळीं जावें॥ ब्रह्मशाप ऐकतां चि भावें॥ येऊनि चरणीं लागले॥ १०॥ दंडवत नमस्कार॥ करूनी ह्मणती हरीचे अनुचर॥ आह्मी अपराधी फार॥ करा उद्धार दासांचा॥ ११॥ तैं मुनि ह्मणती जन्मत्रयें॥ वैकुंठीं पावाल निश्चयें॥ श्रीहरीची जरि स्वयें॥ तुह्मां वधील भूलोकीं॥ १२॥ तें सर्व वृत्त जाणूनि हरी॥ कमलेसहित महाद्वारीं॥ येऊनि मुनिवरचारी॥ पाहूनि तुष्टतें जाहला॥ १३॥ तुह्मी माझे प्रियकर॥ ह्मणूनि धांवलों सत्वर॥ ऐसा हरीनें करितां आदर॥ पुढती कुमार बोलती॥ १४ हे जयजयजी भगवंता॥ सर्वज्ञा सद्गुणा अनंता॥ तुज वर्णितां आमुचा पिता॥ श्रवणद्वारें जाणिलें॥ १५॥ परी आज नयनगोचर॥ झालासि तूं साचार॥ परमात्मा निर्विकार॥ जगदुद्धारकारका॥ १६॥ आतां जाहलों कृतार्थ॥ त्वद्दर्शनावीण स्वार्थ॥ नसे आह्मां हा निश्चितार्थ॥ सत्य जाण श्रीधरा॥ १७॥ ऐसें बोलूनि सनंदन॥ प्रभृती चतुरास्यनंदन॥ करिती

साष्टांगवंदन॥ श्रीहरिचरणा सप्रेमें॥ १८॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ तृतीयस्कंध परमपुनीत॥ प्राकृतसरस्वाराम विर
चि० पंचदशा० गो० ११॥ १५॥ षो० प्रा० । शुकदेव ह्मणे रायासी॥ मैत्रेय कथिती विदुरासी॥ ब्रह्मा ह्मणे लोकपालांसी॥ साव
धान परिसावें॥ १॥ मुनिवचन ऐकूनि श्रीधर॥ ब्राह्मणांसी बोले मधुरोत्तर॥ या द्वारपाळीं अमर्यादा थोर॥ केली ह्म-
णूनि समजलें॥ २॥ तुह्मीं सेवकां शापिलें॥ हें एक केलें भलें॥ मज अनुग्रहा रव्य लाभलें॥ परम कौतुक या काळीं॥ ३॥ अ
नुकंपा मजवर॥ आपुली असावी साचार॥ ह्मणूनि प्रार्थितों वारंवार॥ कूर्मदृष्टी परिपाळा॥ ४॥ जैसा राजसेवकें पाहीं॥
अपराध करितां कांहीं॥ लोक ह्मणती लवलाहीं॥ अविचारी बहु राजा॥ ५॥ भृत्ययोगें करूनि जाण॥ होतो नरपतीचा अ
पमान॥ तेवीं द्वारपाळ द्वारें पूर्ण॥ हें अतिक्रमण माझेंची॥ ६॥ ब्राह्मण माझें कुळदैवत॥ भीत यांचा आज्ञांकित॥ हूता प
राधन से किंचित॥ माझाच ऐसें मानितों॥ ७॥ मोठे मोठे विद्वज्जन॥ यज्ञ करिती मातें लक्षून॥ त्यामाजी हविर्भागें क
रून॥ तृप्ती माझी असेना॥ ८॥ ब्राह्मण भोजन करितां॥ पूर्ण गर्भ चेया सासघृता॥ उचलूनि वदनीं घालितां॥ मी श्रीधर तो
षतों॥ ९॥ तैसें अन्य साधनें जाण॥ तृप्त नाहीं माझें मन॥ विप्रपदींचें तीर्थ पावन॥ मी वंदितों मस्तकीं॥ १०॥ श्रीहरीची
ऐकूनि वाणी॥ सनकादिक बोलती तेक्षणीं॥ हे प्रभो तुझें चरित्र कोणी॥ शेषादिक ह्मेनेणती॥ ११॥ महाविष्णू सर्वे-
श्वर॥ तूंचि कृपा आह्मांवर॥ सदा करी गा सत्वर॥ ह्मणूनि प्रार्थना करितसों॥ १२॥ हें काय ऐसें बोलसी॥ पतितपाव
ना हृषीकेशी॥ तूंचि चाळक विश्वासी॥ कर्म अकर्मा विरहित॥ १३॥ विप्रां देवांचें दैवत परम॥ तूंची जाणूं पुरुषोत्तम॥
ऐसें असतां पूर्णकाम॥ दैवत तयां मानिसी॥ १४॥ याचि योगें करून॥ धर्म चालतो सनातन॥ तुझें चरित्रं श्रवण पठन॥
करितां भवनिस्तरे॥ १५॥ आह्मीं सेवकां दंड केला॥ तोचि प्रभो आपण मानिला॥ भक्तकल्पद्रुम अवलोकिला॥ प्रत्य-

क्षलोचनीं येथवां ॥ १६ ॥ श्रीहरि ह्मणे पार्षदगण ॥ असुरयोनींत होवोत उत्पन्न ॥ माझ्यासवें बहु वैर करून ॥ त्रिजन्मीं मुक्त-
होतील ॥ १७ ॥ हे विप्रहो परिसा मात ॥ हा शाप तुमचा समस्त ॥ मींच केला निर्मित ॥ ऐसें मानसीं जाणावें ॥ १८ ॥ ब्रह्मदेव ह्म-
णे देवांसी ॥ मग सनकादिक वैकुंठासी ॥ देखूनि वंदूनि श्रीहरीसी ॥ नंतरी गेले स्वालया ॥ १९ ॥ तें अनुचरांसी बोले श्रीध
र ॥ ब्रह्महेलन अनिवार ॥ केलें ह्मणूनि पृथ्वीवर ॥ दैत्य व्हावें जन्मत्रयीं ॥ २० ॥ शाप जालिया निवारण ॥ माझे सन्निध पु-
नरागमन ॥ ऐसें बोलूनि भगवान ॥ सौख्यमंदिरीं पातले ॥ २१ ॥ तें वैकुंठाहूनि तत्काळ ॥ भूमीस पडती द्वारपाळ ॥ हा
हाकार करिती सकळ ॥ विधि सांगे सुरांसी ॥ २२ ॥ तेची प्रस्तुत दितीचे उदरीं ॥ प्राप्त झाले साचोकारी ॥ तया वधुनी श्रीहरी
सौख्य देईल सर्वांसी ॥ २३ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ षोडशाध्याय-
गोड हा ॥ २४ ॥ १६ ॥ सप्तदशाध्याय प्रा॰ ॥ ॥ मैत्रेय ह्मणती विदुरासी ॥ विधिवाक्य ऐकूनि निश्चयेंसीं ॥ देवमुनी निजाश्र
मांसी ॥ जाते जाहले तेथवां ॥ १ ॥ येरीकडे कश्यप बोलती वचन ॥ हे दिते तुझ्या गर्भें करून ॥ शतसंवत्सर त्रास पूर्ण ॥ अ-
खिल लोकां जाहला ॥ २ ॥ पतिवचन ऐकूनि त्वरित ॥ दिती जाहली प्रसूत ॥ तेव्हां चे उत्पात समस्त ॥ श्रवण करी भागवता ॥
३ ॥ गर्भी गगनीं पृथ्वीवर ॥ उपद्रव होती अनिवार ॥ महीस पर्वतासा चार ॥ कंपायमान होतसे ॥ ४ ॥ अष्ट दिशा पावती द-
हन ॥ नक्षत्रें खचती गगनींहून ॥ प्रचंड सूटूनी प्रभंजन ॥ अंधकार दाटला ॥ ५ ॥ वायुयोगें सागर जाणा ॥ करूं लागला
गर्जना ॥ ग्रहण द्वारा यातना ॥ सोमसूर्यां होती बहु ॥ ६ ॥ नगरद्वारीं जंबुक ॥ श्वानें गीध घारी देख ॥ रासभ ही शब्द अने
क ॥ करून निरडती तेसदा ॥ ७ ॥ कोठ्यांपासूनि पक्षी पडले ॥ धेनु महिषींच्या स्तनीं भले ॥ रुधिर सदा वाहूं लागले ॥ ऐसा-
अनर्थ जाहला ॥ ८ ॥ देवतांच्या प्रतिमा जाण ॥ सघर्म करिती स्वयें रुदन ॥ वायुयोगें वृक्षपतन ॥ महीवरी होय बहु ॥

॥ ९ ॥ ऐसे पाहूनि उत्पात ॥ प्रजा जाहल्या भयभीत ॥ आदि दैत्यांची शरीरें लोहवत ॥ पर्वतप्राय जाहलीं ॥ १० ॥ मस्तकींचा
मुगुट ॥ सूर्यमंडळीं लागला थेट ॥ ऐसे वाढिन्नले उद्भट, कश्यप पुत्र ते काळीं ॥ ११ ॥ तेव्हां कश्यप येऊनि आपण ॥ करी पुत्रां
चें नामकरण ॥ हिरण्यकशिपु हिरण्याक्ष ऐशीं जाण ॥ नामें ठेविलीं तयांचीं १२ ॥ हिरण्यकशिपूनें तप करून ॥ स्वयें तोष
वूनि चतुरानन ॥ इच्छित वर पावून ॥ इंद्रादिसुर जिंकिले ॥ १३ ॥ हिरण्याक्ष गदाधर ॥ स्वर्गासि गेला सत्वर ॥ दैत्य पाहूनि
अनिवार ॥ देव सकळ पळाले ॥ १४ ॥ दैत्य युद्धक्रीडार्थ ॥ तेव्हां प्रवेशला सागरांत ॥ जळचर पाहूनि वरुण दूत ॥ तयांत्रा
स देबहू ॥ १५ ॥ दूत जाऊनि सत्वर ॥ वरुणासी जाउनि सांगती समाचार ॥ अरिष्ट आलें आपणावर ॥ तंव तो दैत्य पातला
॥ १६ ॥ हिरण्याक्ष बोले लोकपती ॥ त्वां जिंकिलें दैत्यांप्रती ॥ राजसूय यज्ञांतीं ॥ बहुत पुण्य संपादिलें ॥ १७ ॥ तस्मात् या
हिरण्याक्षा ॥ वरुणा देईं युद्धभिक्षा ॥ तें तो स्वीकारूनी उत्तम पक्षा ॥ उत्तर देइ समयोचित ॥ १८ ॥ हिरण्याक्षा परिसें व-
चन ॥ मी श्रमलों युद्ध करून ॥ तुजसीं झगडावया पूर्ण ॥ महाविष्णु समर्थ कीं ॥ १९ ॥ ऐसें ऐकतां कोपला ॥ पृथ्वी घेऊ
नी रसातळा ॥ हिरण्याक्ष त्वरें गेला ॥ पुढें चरित्र अवधारा ॥ २० ॥ श्रीमद्भागवत सारामृत ॥ तृतीयस्कंध परम पुनीत ॥
प्राकृत सखाराम विरचित ॥ सप्तदशाध्याय गोड हा ॥ २१ ॥ १७ ॥ अष्टादशाध्याय प्रा० ॥ ॥ मैत्रेय बोले वचन ॥ विदुरा
परिसें सावधान ॥ हिरण्याक्ष पृथ्वी घेउन ॥ रसातळीं गेला पैं ॥ १ ॥ नंतर आदिसूकर नारायण ॥ प्रलयोदकीं प्रवेश क
रून ॥ पृथ्वीसन्निध जाऊन ॥ गर्जना करी परमात्मा ॥ २ ॥ शब्द होतां अकस्मात ॥ हिरण्याक्ष होऊनि जागृत ॥ गदा घेऊ
नि युद्धार्थ ॥ येता जाहला तेधवां ॥ ३ ॥ वल्गना करूनी भारी ॥ सन्मुख ठाकला गदाधारी ॥ संग्रामार्थ पाचारी ॥ सूकरा
कृती विष्णूतें ॥ ४ ॥ क्रोडें घेऊनि गदा ॥ घाव मारूनी केला चेंदा ॥ दैत्य मागुती मारी गदा ॥ अंग चुकविलें श्रीहरीनें ५

ऐसें युद्ध परस्पर ॥ करिते जाहले अनिवार ॥ जैसे पर्जन्यकाळीं गुरुतर ॥ वृषभ भांडती मत्तते ॥ ६ ॥ जयप्राप्ती करितां ॥ योग
साधिती उभयतां ॥ गर्जना भयंकर ऐकतां ॥ ब्रह्मा सन्निध पातला ॥ ७ ॥ सवें घेऊनि मुनिवर ॥ स्तवन करी मनोहर ॥ देवाधि
देवा करुणासागर ॥ सूकररूपें तुज नमो ॥ ८ ॥ विधि म्हणे जगन्नाथा ॥ दैत्यासी मारावें आतां ॥ हा नाटोपे अस्तमान होतां
माया अनेक करील कीं ॥ ९ ॥ मुहूर्त आहे अभिजित ॥ जाणूनि करावा निःपात ॥ सर्प बाळका पाळिलें बहुत ॥ तरी पोषका
तो भक्षी ॥ १० ॥ तैसा प्रकार घडला ॥ यास्तव मारावें दैत्याला ॥ ऐसा विधाता बोलिला ॥ भगवंतासी ते काळीं ॥ ११ ॥ श्रीम
द्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ अष्टादशाध्याय गोड हा ॥ १२ ॥ १८ ॥ एकोनविं
शाध्याय प्रारंभः ॥ मैत्रेय म्हणे भागवता ॥ ब्रह्मदेवाचें वचन ऐकतां ॥ वराह करूनी शीघ्रता ॥ सन्मुख उभा राहिला ॥ १ ॥
गदा घेऊनि करीं ॥ उभा राहे मृगेंद्रापरी ॥ इतुक्या माजी झडकरी ॥ हिरण्याक्ष धांवला ॥ २ ॥ गदायुद्धीं परस्पर ॥ गर्ज
ना करिती वारंवार ॥ भगवंताची गदा महीवर ॥ पतन पावली ते धवां ॥ ३ ॥ ऐसें पाहूनि ते वेळां ॥ सुरानीं हाहाकार के
ला ॥ नारायण घेऊनि चक्राला ॥ सिद्ध जाहला युद्धार्थ ॥ ४ ॥ तेव्हां अखिल अमर मुनिवर ॥ संस्कृत वाणीनें मनोहर ॥ स्त
वन करूनी सत्वर ॥ म्हणती दुष्ट वधावें ॥ ५ ॥ हिरण्याक्ष त्वरित ॥ गदा घेऊनि अकस्मात ॥ घाव घाली तों झेली निश्चित ॥
वरच्यावर परमात्मा ॥ ६ ॥ मग क्रोधें घेऊनि त्रिशूळ ॥ दैत्य धांवला उतावेळ ॥ वेगें सोडूनी प्रहार प्रबळ ॥ करिता जाहला
विरोधी ॥ ७ ॥ प्रभूनें सुदर्शनें करून ॥ केलें त्रिशूळाचें खंडन ॥ तेव्हां दैत्य कुपित होऊन ॥ नानाविध माया रची ॥ ८ ॥ आ
सुरी माया उत्पन्न ॥ करिता जाहला आपण ॥ त्यांचें परिसा लक्षण ॥ पूयरक्तधारा स्रवती बहु ॥ ९ ॥ अस्थिवृष्टि दुर्गंधियुक्त
होऊं लागली अकस्मात ॥ भूत प्रेत यातुधान उन्मत्त ॥ नग्न नाचूं लागले ॥ १० ॥ ब्रह्मराक्षस वेताळ ॥ करिती नाना परी चारखे-

ळ॥ऐसें देखूनि भुवनपाळ॥ चक्रें छेदिती माया॥ ११॥ दितीचे स्तनीं हूनि भलें॥ तेव्हां रुधिर वाहूं लागलें॥ पतिवचन तीतें आठवलें॥ मानी पुत्रा विपत्ती॥ १२॥ दैत्य क्रोधें करून॥ वज्रमुष्टें करी ताडन॥ तेव्हां भगवंतें मारुनी चडकण॥ उलथोनि महीवरी पाडिला॥ १३॥ दुःखें व्याकुळ जाहला॥ तडफडूनी प्राण गेला॥ हें पाहूनि जयशब्द केला॥ सर्व सुरांनीं संतोषें॥ १४॥ स्तवन करूनी सुंदर॥ तोषविला श्रीकरधर॥ ऐसा आदिसूकरावतार॥ प्रगटला भक्तास्तव॥ १५॥ हिरण्याक्षाचा वध करून॥ श्रीहरी पावले अंतर्धान॥ हें आख्यान श्रवण पठन॥ करितां द्विजहत्या नष्ट होय॥ १६॥ ही कथा ऐकतां पावन॥ अंतीं स्वर्गती नारायण॥ अखंड देतो साधकांलागुन॥ काय महिमान वर्णावें॥ १७॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ तृतीयस्कंध परमपुनीत॥ प्राकृत सखाराम विरचित॥ एकोनविंशाध्याय गोड हा॥ १८॥ १९॥ विंशाध्या० प्रा०॥ ॥ शौनक बोले सूतासी॥ पृथ्वी हें स्थान मिळतां मनूसी॥ तो कवणें उपायें प्राणियांसी॥ उत्पन्न करिता जाहला॥ १॥ तैसें विदुर मैत्रेय पुनीत गंगाद्वारीं जे का स्थित॥ संवाद ले कृष्णकथाश्रित॥ काय तें सांगें आह्मांसी॥ २॥ ऐसें ऐकूनि वचन॥ सूत ह्मणे सावधान॥ सद्भावें करा श्रवण॥ पुण्यपावन हरिकथा॥ ३॥ हे शौनका कोड चरित॥ श्रवण करितां एस भरित॥ विदुर होऊनि हर्षयुक्त॥ मैत्रेयासी विचारी॥ ४॥ ह्मणे समर्था मुनिनाथा॥ मरीच्यादि ऋषींसी विधाता॥ निपजवूनी सृष्टी करितां॥ स्वयें मग काय करीतो॥ ५॥ विधीच्या आज्ञें करून॥ मरीच्यादि मुनी मनु जाण॥ कैसें करिती सृष्टिनिर्माण॥ तेंही सांगें सर्वज्ञा॥ ६॥ तैं मैत्रेय बोलती वचन॥ विदुरा परिसें सावधान॥ महदादि तत्त्वांपासून॥ एक अंड जाहलें॥ ७॥ त्यांत विष्णुनाभींसरोवरीं॥ कमळ निपजलें ब्रह्मांडकरीं॥ त्यापासून चतुराननवरी॥ उद्भवला निश्चयें॥ ८॥ तेणें स्वच्छायेपासून॥ अविद्या केली निर्माण॥ त्या तनूचा त्याग करून॥ ब्रह्मदेव सुखावला॥ ९॥ यक्षराक्षसीं ती काया॥ ग्रहण केली साधुराया॥

मागुतीविधीअन्यकाया॥धारणकरीलवलाहें॥ ११॥ब्रह्मयाचेजघनापासूनिफ़ले॥मदोन्मत्तदानवजाहले॥मैथुनार्थपा
ठीलागले॥परमेष्ठीच्यातेधवां॥१२॥तेथूनिविरिंचीपळाला॥त्हदयींचिंतीघनसांवळा॥स्मरणकरितांतोधांवला॥जाणू
निसंकटयापरी॥१३॥श्रीहरीह्मणेहेंशरीर॥त्यागावेंगाविधात्यासत्वर॥तेसेंकरितांसाचार॥सायंसंध्याप्रगटली॥१४
चरणींनूपुरेंवाजती॥आरक्तनेत्रालावण्यवती॥पुष्टोच्चस्तनीसुदती॥मंदहास्यकरीतसे॥१५॥ऐसीस्त्रीपाहूनिवशि
त॥दैत्यहोऊनियांमोहित॥भाषणकरितीआश्चर्ययुक्त॥तूंकोणकन्याकवणाची॥ १६॥आमुचेभाग्येंकरूनीनिश्चि
त॥दर्शनजाहलेंअकस्मात॥ऐसेंबोलूनिउन्मत्त॥ग्रहणकरितीतिजलागीं॥ १७॥हेंपाहूनिपरमेष्ठीभला॥कौतुकें
करूनीहंसताजाहला॥स्वदेहकांतीनेंतेवेळा॥अप्सरागंधर्वनिपजवी॥ १८॥तीतनूत्यागीविधाता॥तेंप्रभाजाहलीभा
गवता॥विश्वावसुप्रमुखगंधर्वनाथा॥तेग्राह्यझालीतेधवां॥१९॥ब्रह्माहोऊनिआलस्ययुक्त॥सृजिताजाहलाभूत
प्रेत॥दिगंबरपाहूनिसमस्त॥स्वदेहत्यागीकमळासन॥ २०॥तीजृंभणाख्यकाया॥ग्राह्यझालीपिशाचांतया॥मग
साध्यांपितृसमुदाया॥निर्मीविधातास्वबळेंतो॥२१॥तिरोधानेंसिद्धविद्याधर॥प्रतिबिंबेंउत्पादीकिंनर॥क्रोधेंसर्पादिसं
चार॥संतोषेंमनूउपजवी॥२२॥तयांतनुदेपौरुषी॥योगविद्येंसृजीऋषी॥तयांतपनिश्चयेंशीं॥देताजाहलाविरिंची
२३॥यापरीनानापरी॥विधिसृष्टीउत्पन्नकरी॥विदुराहरिकथेचीथोरी॥निगमागमांनेणवे॥२४॥श्रीमद्भागवत
सारामृत॥तृतीयस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥विंशाध्यायगोडहा॥२५॥ २०॥ एकविंशा॰प्रारं॰
विदुरह्मणेस्वायंभुवमनूचा॥वंशकथावामजलासाचा॥तेणेंमैथुनेंकरूनीप्रजेचा॥उद्भवकेलाकेसातो॥ १॥प्रियव्र
तउत्तानपाद॥युग्मकुमरजाहलेप्रसिद्ध॥समुद्रवलयांकिततयानींशुद्ध॥धर्मेंपृथ्वीरक्षिली॥२॥तयाचीदुहितादे

वहूती॥कर्दमकांतासुदती॥आपणकथिलीपूर्वींती॥वंशतियेचाविस्तारीं॥३॥रुचिपत्नीआकूति॥दक्षजायाप्रसूति
तयांपासावसृष्टिकोणती॥निर्माणजाहलीतीवदा॥४॥ऐसीऐकूनियांवाणी॥बोलतेजाहलेमैत्रेयमुनी॥विधीनेंआ
ज्ञाकर्दमालागुनी॥केलीसृष्टिरचनार्थ॥५॥तेंदहासहस्रसंवत्सर॥सरस्वतीतटाकींमुनिवर॥सृष्ट्यर्थतपकरितां-
चिथोर॥नारायणप्रगटले॥६॥विष्णुमूर्तीअवलोकुन॥कर्दमकरीसाष्टांगवंदन॥ह्मणेदर्शनमात्रेंधन्यधन्य॥पृ
थ्वीवरीजाहलों॥७॥मनींधरूनीवासना॥तुजध्यातीपतितपावना॥तेमूढतथापिस्त्रीकामना॥धरूनिकेलेंध्यानमीं॥८॥
तेचिकामनाश्रीहरी॥भावजाणूनीपूर्णकरी॥वचनऐकूनियांपरी॥कायबोलेपरमात्मा॥९॥हेंकर्दमापरिसेंमात॥स्वा
यंभुवमनुशतरूपासहित॥कन्याआणूनिअकस्मात॥दानकरिलतुजलागीं॥१०॥तिजपासूनिनवसुता॥निर्माणहो
तीलतत्ता॥कलावतारेंकरूनीपुत्रता॥तवउदरींपावेनमी॥११॥नलसंहिताकथन॥करीनसांगमातेलागुन॥ऐसेंश्री
हरीबोलून॥अंतर्हितजाहले॥१२॥बिंदुसरोवरींतोमुनीश्वर॥पाहताहेतोअवसर॥तंवनवलावजाहलाथोर॥तोपरि
सावाअद्भुत॥१३॥स्वायंभुवभार्येसहित॥कन्याबैसवूनिरथांत॥त्वरेंपातलाकर्दमाश्रमांत॥भगवद्वाक्येंकरूनियां॥
१४॥तोआश्रमकवणेपरी॥अगाविदुराअवधारीं॥ऋषिसेवितनानापरी॥पशुपक्षीवेष्टितीज्या॥१५॥पुण्यवृक्षफळेंकरू
न॥सुशोभितचुंबितीगगन॥शीतळछायासघन॥कायसौख्यवाणावें॥१६॥कदंबचंपककरंज॥बकुळकुंदमंदार
राज॥आम्रअशोकवृक्षींचोज॥पक्षियांचेंदेखिलें॥१७॥तैसेपाहिलेश्वापदगण॥क्रोडगवयहरिण॥वनगायीन
कुळवारण॥कस्तूरीमृगतेसेची॥१८॥पशुपक्षीअरण्यांत॥निर्वैरसदाक्रमतीनिश्चिंत॥तपस्वीपाहूनिदंडवत॥न-
मनकेलेंमनुरायें॥१९॥कर्दमदेऊनिआसन॥यथासांगकरीपूजन॥ह्मणेमहाराजप्रजापालन॥करावयाप्रगटला॥

२०॥ सद्रक्षणअसहृथ॥ कराव्यासदासावध॥ असशीनृपासांगेंशब्द॥ आगमनप्रयोजना॥२१॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ तृतीयस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसरवारासविरचित॥ एकविंशाध्यायगोडहा॥२२॥ २१ ॥ द्वाविंशाध्या०प्रा०॥ ॥मैत्रेयह्मणेसादर॥ चरित्रपरिसामनोहर॥ कर्दमेंकरितांसत्कार॥ स्वायंभुवमनुबोले॥ १॥ हेविप्रोत्तमापरिसावचन॥ वेदप्रवर्तनास्तवउत्पन्न॥ विधीनेंकेलेंआपणालागुन॥ महीमाजीनिर्धारें॥२॥ त्याविप्रांचियांत्राणार्थ॥ ईशबाहूपासूनियथार्थ॥ आह्मीझालोउद्भूत॥ क्षत्रियजगींनिश्चयें॥३॥ यास्तवकींपरस्पर॥ विप्रक्षत्रियींदेऊनिकर॥ रक्षणकरावेंहाप्रकार॥ शास्त्रसंमतकथियेला॥ ४॥ तुझ्यादर्शनेंमुनिवरा॥ संशयगेलादिगंतरा॥ तुझेंचरणरजदातारा॥ मस्तकींधरिलेंकौतुकें॥ ५ आतांपरिसावीएकमात॥ जेउत्तानपादप्रियव्रत॥ तयांचीभगिनीमत्कन्यापुनीत॥ असतांसभेंतकुतुकघडे॥ ६॥ नारदेंसद्गुणमहिमा॥ वर्णिलातुझाहूिजोनसमा॥ तेव्हांपासूनिकन्येचाप्रेमा॥ तुमच्यास्वरूपींगुंतला॥ ७॥ ह्मणूनिकरावेंपाणिग्रहण॥ सत्पात्रींयोग्यकन्यादान॥ यापरीऐकूनियांवचन॥ कर्दमेंमान्यतेंकेलें॥ ८॥ यथाविधिप्रकारीं॥ लग्नसोहळाजाहल्यावरी॥ भूषणेंवस्त्रेंमनोहारी॥ वधूवरांअर्पियलीं॥ ९॥ आंदणदेऊनिअमित॥ सन्मानकेलायथोचित॥ पाहूनिकन्याजामात॥ सुखदंपतीपावले॥१०॥ कन्याविरहेंकरून॥ मायबापजाहलेखिन्न॥ हेंअंबहेवत्सेंह्मणून॥ बाष्पाकुलबहुजाहले॥११॥ सरस्वतीतीरस्थांसी॥ दक्षिणादेऊनिसौख्यराशी॥ संतोषवीसमस्तांसी॥ नंतरगृहींनिघाला॥१२॥ स्वायंभुवमनुभार्येसहित॥ बर्हिष्मतीनगरींत्वरित॥ प्रविष्टहोऊनिपुनीत॥ यज्ञमंडपतेंउभवी॥१३॥ नानाप्रकारेंयज्ञहवन॥ करुनीतोषवीनारायण॥ ऋत्विजांसीदक्षिणादेऊन॥ आळ्यकरीतयांसी॥१४॥ करूनीअवभृथस्नान॥ आपुल्यामन्वंतरींप्रजापालन॥ सांगकरीलविषयभोगुन॥ परमानंदेंराहिला॥१५॥ एकाहत्तरचौकड्यापूर्ण॥ मनूराज्यक

रीपावन ॥ श्रीहरिकृपेंकरून ॥ संतुष्टजाहलासर्वदा ॥ १६ ॥ आदिराजाचेंचरित ॥ विदुराकथिलेंपुनीत ॥ आतांतद्पत्यां
चेंसमस्त ॥ चरित्रपुढतीअवधारीं ॥ १७ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसरवारामविरचि
त ॥ द्वाविंशाध्यायगोडहा ॥ १८ ॥ २२ ॥ त्रयोविंशाध्यायप्रा० ॥ ॥ मैत्रेयह्मणेगासुमती ॥ पितागेलियानगराप्रती ॥
परमसाध्वीदेवहूती ॥ पतिसेवाकरीतसे ॥ १ ॥ शंकरासभवानीपरी ॥ दंभादिवर्जितअंतरीं ॥ बहुकालपर्यंतपरोपरी
सेवितांकृशतीजाहली ॥ २ ॥ कांतेचीपाहूनिकृशता ॥ कृपाउपजलीसमर्था ॥ ह्मणेप्राणेश्वरीआतां ॥ प्रसन्नजाहलों
मागावें ॥ ३ ॥ मींस्वधर्मेंकरूनीजाण ॥ प्रसन्नकेलानारायण ॥ त्याचियेप्रसादेंकरून ॥ तूंप्राप्तझालीसमजप्रिये ४
तेतूंमाझीसेवाकरितां ॥ श्रमूनीपावलीसकृशता ॥ दिव्यदृष्टिदेतोंयाकरितां ॥ सर्वदर्शीतांह्वावें ॥ ५ ॥ तेणेंपाहाशी
लसारें ॥ त्रैलोक्यांतीलपसारें ॥ तूंपातिव्रत्येंसौख्यचलरे ॥ पूर्णअससीयेधवां ॥ ६ ॥ दिव्यभोगनानापरी ॥ प्राणे-
श्वरीअंगीकारीं ॥ ऐसेंऐकूनीसुंदरी ॥ कायबोलेपतीतें ॥ ७ ॥ श्लोक ॥ देवहूतिरुवाच ॥ राद्धंबतद्विजवृषै
तदमोघयोगमायाधिपेत्वयिविभोतदवैमिभर्तः ॥ यस्तेऽभ्यधायिसमयःसकृदंगसंगोभूयाद्गरीयसिगुणः प्र-
सवःसतीनाम् ॥ १० ॥ टीका ॥ हेविप्रश्रेष्ठामत्सति ॥ आपणअमोघमायाधिपती ॥ आहायास्तवपूर्णशक्ति ॥ अं
गींचसिद्धजाणतें ॥ ८ ॥ मातेंतेणेंहर्षबहुत ॥ जाहलादयाळानिश्चित ॥ अंगसंगपूर्वप्रतिज्ञात ॥ शीघ्रआजप्रासहो
वो ॥ ९ ॥ कारणश्रेष्ठपतीपासाव ॥ स्त्रियांसीहोऊनीगर्भसंभव ॥ प्रसवह्माचिलाभअपूर्व ॥ ह्मणूनीविनंतीपरिसावी ॥
१० ॥ यास्तवपुत्रोत्पतीकरितां ॥ मजकृशांगीसरतियोग्यता ॥ देऊनिनिर्मूनिमंदीरतलता ॥ संभोगआतांमजद्यावा-
११ ॥ मैत्रेयह्मणतीविदुरासी ॥ यापरीऐकूनीवाक्यासी ॥ कर्दमप्रजापतीनंतेसमयासी ॥ कामगविमाननिर्मिलें १२

त्याविमानीं बैसूनी त्वरित ॥ भ्रमावें चवदा भुवनांत ॥ सानुकूल साहित्य नयांत ॥ गौण कांहीं असेना ॥ १३ ॥ वस्त्रें आणि अलंकार ॥ मणिस्तंभ मनोहर ॥ चांदव्यांसी मौक्तिकें फार ॥ गर्यांगयीं वेष्टिलीं ॥ १४ ॥ ध्वज पताका मंडित ॥ शय्याशयनभवस्त्रान्वित ॥ केशर कस्तूरी परिमळ बहुत ॥ मणिखचित तांबूलपात्रें ॥ १५ ॥ ऐसें पाहूनि सत्वर ॥ कर्दम चिंती कीं आपुलें शरीर ॥ बहुत जाहलें जर्जर ॥ अयोग्य येथें विषयीं सत्य हें ॥ १६ ॥ यास्तव नवयौवन ॥ सदा असावें आपण ॥ भगसरस्वतींत उभयतां येऊन ॥ स्नान करिते जाहले ॥ १७ ॥ तों उभयतांचीं शरीरें ॥ जाहलीं देवापरी एकसरें ॥ सेवार्थ जळांतूनि आदरें ॥ सहस्त्र दासी पातल्या ॥ १८ ॥ त्या दासी सुवस्त्रालंकृत ॥ उत्पन्न होऊनि अकस्मात ॥ बोलत्या जाहल्या वाक्यार्थ आहों तसिद्ध सेवेसी ॥ १९ ॥ त्या दासी ऐसें बोलून ॥ उभयतांसी करविती मंगलस्नान ॥ तैं तें लेउनी वस्त्राभरण ॥ सुखदर्पणीं पाहती ॥ २० ॥ चित्तासी जाहलें समाधान ॥ सहस्त्र विद्याधरी सहित आपण ॥ विमानारूढ होऊन ॥ करिती भ्रमण ब्रह्मांडीं ॥ २१ ॥ यापरी भूगोल कांतेसी ॥ दाखवूनि सौख्यराशी ॥ कर्दम पातले स्वाश्रमासी ॥ महानंदें करूनी ॥ २२ ॥ मुनीच्या अंगसंगें करून ॥ नव कन्या जाहल्या उत्पन्न ॥ तें संन्यस्त व्हावया मन ॥ उदित होय तयाचें ॥ २३ ॥ ऐसें लक्षून मुनीश्वरा ॥ देवहूती प्रार्थी चतुरा ॥ कन्या जाहल्या उपवरा ॥ विवाह यांचा करावा ॥ २४ ॥ कुलदीपक एक कुमर ॥ वंशामाजीं धुरंधर ॥ होवो जेणें हा अपार ॥ संसार पार पावेल ॥ २५ ॥ ऐसा कुमार होऊनि उत्पन्न ॥ तो सांगो मज ब्रह्मज्ञान ॥ ज्याचे श्रवणमात्रें जन्ममरण ॥ ॥ कदाकाळीं बाधेना ॥ २६ ॥ मी तुमचें सामर्थ्य नेणूनी ॥ पडलें या विषयबंधनीं यास्तव पुत्र होऊनि ज्ञानी ॥ मज उद्धरो दयाळा ॥ २७ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ त्रयोविंशाध्याय गोड हा ॥ २८ ॥ २३ ॥ चतुर्विंशाध्यायप्रारंभः ॥ ॥ मैत्रेय म्हणे भागवता ॥ कर्दम

पाहूनीस्त्रीचीखिन्नता ॥ भगवद्वाक्यस्मरूनीताता ॥ जाहलाबोलताकांतेसी ॥ १ ॥ हेराजकन्यकेखेदनकरीं ॥ श्रीहरी
प्रगटेलतुझेउदरीं ॥ तोतुजतारीलभवसागरीं ॥ कर्णधारहोऊनियां ॥ २ ॥ मगकर्दमवीर्येंकरून ॥ जन्मपावलेनाराय
ण ॥ विमानीयेऊनीसुरगण ॥ नानावाद्येंवाजविती ॥ ३ ॥ गंधर्वअप्सरानाचती ॥ देवपुष्पवृष्टिकरिती ॥ कीं सांख्याचा
र्यश्रीपती ॥ पृथ्वीवरीप्रगटला ॥ ४ ॥ मरीच्यादिमुनीश्वर ॥ संगेंघेऊनिविष्णुकुमार ॥ कर्दमाश्रमींयेऊनिसत्वर ॥
वचनमधुरबोलिले ॥ ५ ॥ यानवदुहितांचेंपाणिग्रहण ॥ करवींकर्दमासत्यात्रमुनीपाहुन ॥ तुझ्यागृहींकपिलनारायण
आदिपुरुषअवतरला ॥ ६ ॥ हेंसर्वआह्मीजाणिलें ॥ हेदेवहूतीपरिसेंभलें ॥ तुझ्याउदरींपरब्रह्मआलें ॥ पूर्वस्मृ
तेंकरूनी ॥ ७ ॥ तुझीअविद्याग्रंथीछेदन ॥ करूनीकरीलपृथ्वीपर्यटन ॥ हेंसांगूनिब्रह्मदेवेंआपण ॥ कपिलनाम
ठेविलें ॥ ८ ॥ विधिबोलेकर्दमासी ॥ द्यातवकन्यासौख्यराशी ॥ माझियामानसपुत्रांसी ॥ दानकरीयथोचित ॥ ९ ॥ नं
तरकुमारनारदासहित ॥ विधातागेलासत्यलोकांत ॥ मानसपुत्रविवाहार्थ ॥ कर्दमाश्रमींठेविले ॥ १० ॥ विधिआज्ञें
करून ॥ प्रजापतीकरीकंन्यादान ॥ कवणकन्याकवणालागुन ॥ दिधलीतेंचीपरिसावें ॥ ११ ॥ मरीचीसीकलाजाण
अत्रीसीअनुसूयापूर्ण ॥ अंगिरानामकऋषीलागुन ॥ श्रद्धादेवीअर्पिली ॥ १२ ॥ हविर्भूपुलस्त्यासी ॥ गतिनामक
पुलहमुनीसी ॥ क्रियानामेंक्रतूसी ॥ ख्यातीभृगूसीदिधली ॥ १३ ॥ अरुंधतीवसिष्ठाला ॥ शांतिनामेंअथर्वणाला
ऐशाकन्याविधिपुत्रांला ॥ देताजाहलाकर्दम ॥ १४ ॥ तेसपत्नीकमुनीश्वर ॥ प्रजापतीसीनमस्कार ॥ करूनीकां
ताघेऊनीसुंदर ॥ निजाश्रमींपावले ॥ १५ ॥ महाविष्णूचाअवतार ॥ निजाश्रमींजाहलासाचार ॥ ऐसामनींआणूनि
विचार ॥ एकांतस्थानींमुनीजाय १६ ॥ तेथेंभगवान्कपिलमुनी ॥ पाहूनिवंदीतयालागुनी ॥ बोलताजाहलामंज

ळवचनीं॥भक्तिभावेंकरूनियां॥१७॥अहोसंसृतिसिंधुमग्नांसी॥तूंचितारकहृषीकेशी॥अखंडध्यातीमानसीं॥
योगिराजपूर्णतुज॥१८॥ऐसातूंश्रीकरधर॥घेऊनिमाझेगृहींअवतार॥प्रतिज्ञावचनसत्वर॥सत्यकरिशीगोविं
दा॥१९॥हेंजाणतीज्ञानीजन॥निगमकरितीतुझेंस्तवन॥ह्मणूनिचरणींआलोंशरण॥आहीआहींदयार्णवा॥२०॥
माझेजाहलेकामपूर्ण॥आतांकरूनीसंन्यासग्रहण॥ध्यानयोगतीर्थाटन॥करितोंआज्ञामजद्यावी॥२१॥कर्द
मासिबोलेश्रीहरी॥कृतकृत्यजाहलांतसंसारीं॥परंतुमोक्षार्थनिजांतरीं॥भजनमाझेंकरावें॥२२॥मातेसीसां
गूनिब्रह्मज्ञान॥करीअज्ञानछेदन॥जेणेंचुकेजन्ममरण॥स्वरेंगमनकरावें॥२३॥मैत्रेयह्मणेयापरी॥कर्दमासिबोल
तादानवारि॥प्रदक्षिणाकरूनीसत्वरी॥जाताजाहलाविपिनातें॥२४॥वासुदेवाचेंकरूनीध्यान॥भक्तिभावेंनाम-
स्मरण॥करितांमुनीसुक्तबंधन॥होऊनिवैकुंठलाधला॥२५॥श्रीमद्भागवतसारामृत॥तृतीयस्कंधपरमपुनीत
प्राकृतसखारामविरचित॥चतुर्विंशाध्यायगोडहा॥२६॥ २४ ॥ पंचविंशाध्यायप्रा॰ ॥ विदुरह्मणेमैत्रेयासी ॥
कर्दमगेलियातपासी॥पुढेंभगवान्कपिलऋषि॥कायकरितेजाहले॥१॥तेंचिसांगावर्तमान॥ऐसेंऐकूनियांवच
न॥मैत्रेयकरितीकथन॥तेंचिसर्वअवधारीं॥२॥बिंदुसरोवराचेठायीं॥देवहूतीयेऊनिपाहीं॥धातृवचनस्मरूनिहृ
दयीं॥कपिलाप्रतीबोलतसे॥३॥प्रपंचामाजीजोविरक्त॥तेणेंपुरुषेंकायस्वहित॥आचरावेंतेंदयाळायथार्थ॥मज
लागींनिरूपीं॥४॥ऐसेंपरिसूनिकपिलमुनी॥बोलतेजाहलेमातेलागुनी॥आध्यात्मिकयोगयाजनीं॥श्रेयस्करआ
हेतो॥५॥मातेतुजसीकरितोंकथन॥त्याचेंभावेंकरीश्रवण॥जयाचेनियोगेंजन्ममरण॥खंडितहोयजननीये॥६॥
पुरुषाचेंअंतःकरण॥विषयासक्तजाहलियाबंधन॥परमेश्वरींज्याचेंसक्तमन॥तोजीवन्मुक्तजाणावा॥७॥काम

लोभादिमलरहित ॥ शहूतापावेजैं चित्त ॥ तैं होयज्ञानवैराग्ययुक्त ॥ नरजाणे प्रकृतिपुरुषां ॥ ८ ॥ मोक्षाधिकारी होऊन
आत्मानात्मविचारें करून ॥ आत्म्याचे ठायीं चि पूर्ण ॥ परब्रह्म पहावें ॥ ९ ॥ संगहा पाश अजर ॥ ऐसें ह्मणती सर्वज्ञ थोर ॥
परी साधूशीं करितां साचार ॥ मोक्षद्वार लाधतें ॥ १० ॥ संतमुखें करूनी जाण ॥ श्रवण करावें माझें कीर्तन ॥ तेणें भक्ति होऊ
नि निर्माण ॥ परमपद पावती ॥ ११ ॥ देवहूति ह्मणे ताता ॥ कृपासागरा लक्ष्मीकांता ॥ तुझा भक्तियोग केसा आतां ॥ तो चि
बोधीं मज लागीं ॥ १२ ॥ कारण मी अबला जाती ॥ सुखोपभोगीं सदा मति ॥ तेणें वैराग्याची युक्ती ॥ ह्मणूनि अनुग्रह करा
वा ॥ १३ ॥ ऐकूनि मातेचें वचन ॥ काय बोले भगवान ॥ इंद्रियवृत्ती कृष्णार्पण ॥ करणें तीच मद्भक्ती ॥ १४ ॥ ते सुक्की परिसें-
श्रेष्ठ साचार ॥ क्षीण करी लिंग शरीर ॥ विश्वामाजी विश्वंभर ॥ प्रेमयोगें भजावा ॥ १५ ॥ जे भक्तियोगें करून ॥ माझे-
ठायीं योजिती मन ॥ अंतीं पावती वैकुंठभुवन ॥ माझ्या कृपें करूनी ते ॥ १६ ॥ माते ऐशा साधूंचें लक्षण ॥ परिसें आतां सा
वधान ॥ तितिक्षु कारुणिक पूर्ण ॥ जगन्मित्र जाणिजे ॥ १७ ॥ अजातशत्रु शांतवृत्ति ॥ कोपरहित महामति ॥ अहेतुकी
करिती भक्ति ॥ अखंड माझी निर्धारें ॥ १८ ॥ जयानीं सर्व मज करितां ॥ गृहधन कन्या पुत्र कांता ॥ त्यागूनि केली एकाग्र
ता ॥ मजवीण कांहीं जे नेणती ॥ १९ ॥ माझ्या आश्रयें करून ॥ मत्कथा करिती श्रवण ॥ ते चि माझे भक्त जाण ॥ मृत्यूसि
जिंकिती मत्कृपें ॥ २० ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ पंचविंशा
ध्याय गोड हा ॥ २१ ॥ २५ ॥ षड्विंशाध्यायप्रारंभः ॥ कपिल ह्मणे जननीसी ॥ तत्त्वांचें लक्षण सांगतों तुजसी ॥ श्रव
ण करावें सद्भक्तीशीं ॥ तेणें प्रेम दुणावे ॥ १ ॥ हें ब्रह्मज्ञान होतां कांहीं ॥ प्रकृतिगुणांची बाधा नाहीं ॥ हृदयामाजी ल
वलाहीं ॥ परब्रह्मानंद तें ॥ २ ॥ पंचकर्मेंद्रियें पंचज्ञानेंद्रियें ॥ पंचमहाभूतें निश्चयें ॥ पंचप्राण उपप्राण समुदायें ॥

ऐसींपंचवीसतत्वेंतीं॥३॥मनबुद्धीचित्तअहंकार॥हींतत्वेंसाचार॥पुरुषापासूनिविस्तार॥यातत्त्वसंख्येचा॥ ४॥
त्यासकोणीपौरुषस्वभाव॥ह्मणतातकित्येककालप्रभाव॥जोअंतर्यामीवासुदेव॥पुरुषरूपेंनांदतो॥५॥यापं-
चवीसतत्त्वांपासून॥प्रलयोदकांतजाण॥एकअंडजाहलेंउत्पन्न॥त्यासीअसतीदेवतेंद्रियें॥६॥परंतुत्यासीचा-
लवया॥शक्तीनाहींबोलावया॥तेंअग्निवाणीसहतया॥प्रवेशकरीमुखांत॥७॥नासिकांतअश्विनीकुमार॥त
यांचेनेत्रांतभास्कर॥कर्णांमाजीदिशासाचार॥रोमीं औषधीराहिल्या॥८॥ लिंगामाजीउदक॥गुदद्वारींकृतांत
देख॥हस्तामाजीशचीनायक॥चरणींविष्णूप्रवेशे॥९॥ऐसेंसाधनकरितीजाण॥तरीनाहींचलनवलन॥मगआत्माप्र
वेशतांआपण॥उठोनिउभेंराहिलें॥१०॥ऐसापरमात्माभगवान॥तयाचेंकरावेंचिंतन॥कपिलह्मणेमातेलागुन॥पुढतीं
ज्ञानपरिसावें॥११॥श्रीमद्भागवतसारामृत॥तृतीयस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥षड्विंशाध्यायगो
डहा॥१२॥ २६॥सप्तविंशाध्यायप्रारंभः॥ कपिलह्मणेमातेसी॥कथितोंज्ञानसौख्यराशी॥पुरुषहाअसूनीप्रकृ
तीपाशीं॥तद्गुणासीलिप्तनाहीं॥१॥जैसेंसूर्यबिंबरांजणीं॥सदादिसेपरीत्यापासूनी॥अलिप्तपणेंगगनीं॥अखं
डराहेसर्वदा॥२॥तैसाव्यापकश्रीहरी॥राहेअभंगविश्वांतरीं॥परीअलिप्तपरोपरी॥तयापासूनीजाणपां॥३॥भ
क्तियोगेंकरून॥वशकरावेंआपुलेंमन॥करूनीयमनियमआसन॥प्राणायामेंवायुजिंकावा॥४॥माझीकथाश्रवण
करावी॥साधूंचीसंगतीधरावी॥अखिलतमोवृत्तीनुरावी॥मनामाजीनिश्चयें॥५॥सर्वांभूतींभगवद्भावो॥नित्य
धरावानिःसंदेहो॥ब्रह्मचर्यमौनभावो॥धरूनिसद्धर्मकरावा॥६॥यदृच्छेंप्राप्तहोईलत्यांत॥संतुष्टराहावेंदिवस
रात॥यापरीयोगीसाधूनिपरमार्थ॥एकांतयोगकरितीबहू॥७॥शांतवृत्तीनेंजाण॥सर्वसंगपरित्यागकरून॥नि

गुणात्मक अहंकारपूर्ण ॥ प्रपंच कारणत्व जितीते ॥ ८ ॥ दशइंद्रियें एक मन ॥ यागुणांचा त्याग करून ॥ राहती तीव्र भक्ती धरून ॥ भाग्यवान पुरुष जे ॥ ९ ॥ आत्मानात्म विचार ॥ हृदयीं करूनि साचार ॥ विश्वामाजी सर्वेश्वर ॥ आत्माराम पाहती ॥ १० ॥ ते योगी विषयभोग ॥ मानिती जैसा प्रखर रोग ॥ किंवा पुरुष निद्रोद्योग ॥ करितां स्वप्न त्या पडे ॥ ११ ॥ जागृत होतां मिथ्या स्वप्न ॥ मानितो जैसा आपण ॥ तैसे प्रपंचासी योगीजन ॥ असत्य मानिती सर्वदा ॥ १२ ॥ आपण होउनि ब्रह्मभूत ॥ माझ्या प्रसादें करूनि निश्चित ॥ संसार मानिती मृगजळवत ॥ तयां सूत्क नाहीं कदा ॥ १३ ॥ ऐशा सद्भक्तां सीं सद्गती ॥ स्वयें मी देतों श्रीपती ॥ माते परिसें सांख्यपद्धती ॥ एकाग्र चित्तें करूनियां ॥ १४ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीय स्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ सप्तविंशाध्याय गोड हा ॥ १५ ॥ २७ ॥ अष्टाविंशाध्याय प्रारंभः ॥ श्री कपिल ह्मणती मातेसी ॥ योगाचें लक्षण परियेसीं ॥ सबीज योग तुजसी ॥ कथन करितों साद्यंत ॥ १ ॥ शुचिर्भूत देशाचे ठायीं ॥ हस्त प्रमाण वेदिका पाहीं ॥ करूनियां लवलाहीं ॥ मृदु आसनावरी बसावें ॥ २ ॥ दर्भ कृष्णाजिनयुक्त ॥ आसनीं धरूनी मौनव्रत ॥ वैकुंठविहारी लक्ष्मीकांत ॥ आणूनि चित्तीं ध्याइजे ॥ ३ ॥ प्राणायाम करूनी जाण ॥ करावें प्राणाचें शोधन ॥ ध्यानीं पाहावें रूप सगुण ॥ भगवंताचें सद्भावें ॥ ४ ॥ यापरी ध्यान करितां करितां ॥ चंचळ चित्त जाहलें तत्त्वतां ॥ तरी तयासी उपाय आतां ॥ कथितों श्रवण करावा ॥ ५ ॥ एकेक अवयवाचें ॥ ध्यान करूनी साचें ॥ तदनंतर दुसऱ्याचें ॥ ध्यान करावें सुंदर ॥ ६ ॥ वज्रांकुशध्वज पाहीं ॥ कमल यव या चिन्हांहीं ॥ मंडित चिंतिजे हृदयीं ॥ प्रथम ताचरण ॥ ७ ॥ जया चरणांचें सेवन ॥ महालक्ष्मी करिते आपण ॥ जेथूनि गंगा जाहली उत्पन्न ॥ स्थान पावन तें जाण ॥ ८ ॥ नंतर घोंटिया गुडघ्यांचें ॥ मांड्यांचें आणि कटीचें ॥ हृदयीं आश्रितवत्सलाचें ॥ ध्यान करावें मनोहर ॥ ९ ॥ तैसें बाहूंचें कंठाचें ॥ मु

खआणिनासिकेचें॥कर्णनेत्रगोलकांचें॥ध्यानकरावेंसाजिरें॥१०॥ललाटासहमस्तकाचें॥श्यामसुंदरकांतीचें॥किरीटमक
रकुंडलांचें॥ध्याननंतरकरावें॥११॥मगशंखचक्रगदाधारी॥सशक्तिकपहावाअंतरीं॥जैसाशिक्षकअक्षरकरीं॥एकें
कपटवितोबाळका॥१२॥त्यापरीधारणायोग॥सांगकरावासोडूनिउद्योग॥येणेंलागेपरमार्थलाग॥कपिलह्मणेमाते
सी॥१३॥श्रीमद्भा० तृतीयस्कं० प्राकृतसखाराम० अष्टाविंशोध्या०॥१४॥२८॥ एकोनत्रिं०॥ ॥कपिलह्मणेमातेसी॥भक्तियो
गपरियेसीं॥बहुतमार्गींकरावयासी॥योग्यआहेतोजाणपैं॥ १॥अहंकारेंबलिदानदेती॥हिंसायुक्तउत्सवकरिती
वाद्येंवाजवूनिपूजिती॥तेतामसभक्तजाणावे॥२॥आपणव्हावेंविभवयुक्त॥हीविषयवासनामनांत॥धरूनीप्रति
माजेपूजितीनिश्चित॥राजसभक्ततेजाण॥३॥कर्मवासनादूरकरून॥कृतकर्मेंकरितीमदर्पण॥सर्वसंगपरित्यागी
पूर्ण॥सात्विकभक्ततेमाझे॥४॥आतांमातेनिर्गुणभक्तांचें॥लक्षणकथितोंपरिसेंसाचें॥अनुसंधानन्नधरुनीफ
लाचें॥पुरुषोत्तमाजेभजती॥५॥यापरीकरितांनिर्गुणभक्ति॥भजकांसिदेतोंमीस्वयंमुक्ति॥सालोक्यसायु
ज्यसरूगति॥सारूप्यसामीप्यत्याचारी॥६॥चतुर्विधपुरुषार्थ॥मीभक्तांसिदेतोंलवरित॥परीमाझेसेवेव्यतिरिक्त
नमागतीकांहींते॥७॥मद्भक्तकरितीमाझेंपूजन॥अर्घ्यपाद्यआचमन॥स्नानोदकपात्रेंभिन्नकरून॥मत्पूजनकरावें
८॥माझीषोडशोपचारेंकरूनी॥पूजनकरूनीपायसान्नीं॥होमकरितीअग्निवदनीं॥पुरुषसूक्तेंकरूनियां॥९॥करूनि
यांसत्समागम॥प्राणिमात्राचेठायींपरम॥मित्रतामजस्मरखाराम॥मानूनिपाहतीसर्वदा॥१०॥अध्यात्मविद्याश्रवण
तैसेंमाझेंसद्गुणवर्णन॥करीअखंडभावधरून॥शत्रुमित्रज्यांनाहीं ११ ऐसेभक्तमजआवडती॥कमलेहूनिनिश्चि
ती॥कपिलमुनीमातेसीह्मणती॥अग्रभागींपरिसावें॥१२॥श्रीमद्भा० तृती० प्राकृतस० एकोनत्रिंशाध्यायगोडहा॥३

२९॥ त्रिंशाध्यायप्रारंभः॥ ॥ कपिलह्मणेमातेनिश्चित॥ हेंशरीरनाशिवंत॥ राहिलबहुकाळऐसेंभ्रांत॥ मानितीहेज
नसारे॥१॥ ह्मणूनीगृहधनमिळविती॥ वैराग्यनिपजेनाचित्तीं॥ नरकामाजीयातना भोगिती॥ अनेकदुःखींव्याकुळ
२॥ परंतुदेहाशासुटतनाहीं॥ लोभाविष्टहोऊनिपाहीं॥ कुटुंबभरणास्तवकांहीं॥ उपायकरितीबहुविध ॥३॥ आपण
देशांतरींजाउन॥ कष्टेंमेळवितीकांचन॥ ज्यासाठींतें येतांवृद्धपण॥ कांतासुतगांजिती४ देहींनानारोगव्याप्ति॥ होऊ-
नियांदुःखभोगिती॥ कंठघुरघुरवाजती॥ लागेचंद्रीप्राणियां॥ ५॥ तेव्हांस्त्रीसुतसन्निधयेऊन॥ विचारितीसांगा
कोठेंधन॥ तुह्मांसिप्राप्तजाहलेंमरण॥ आह्मींकायकरावें॥६॥ तेंवाणीनेंबोलवतनाहीं॥ हस्तपादभंगतीपाहीं॥ प्रा
णजातीलवलाहीं॥ यमदूतनेतीबांधूनियां॥७॥ मार्गींलागेभूकतहान॥ कंटकरुततीचरणालागुन॥ तयानकरवेशी
घ्रगमन॥ ह्मणूनिदूतताडिती॥८॥ शुभाशुभकर्मेंकांहीं॥ सांगेचित्रगुप्तपाहुनीवही॥ तेंपरिसूनिडसवितीअही ॥
बहुविधकरितीयातना॥९॥ तप्ताग्नीवरूनओढिती॥ स्वमांसभक्षणादेती॥ सांडसानेंआंतडींतोडिती॥ अवयव-
मोडितीकुठारें॥१०॥ तुडवितीगजाचेपायांतळीं॥ कडेलोटकरितीनिर्जनस्थळीं॥ पर्वतगव्हेंतनेऊनितत्काळीं॥ रुद्ध
करितीप्राणियां॥११॥ होकाकोणीनारीनर॥ जोदुष्टकर्मंकरणार॥ ऐशायातनातयासीफार॥ यमलोकीं होतीपैं॥
१२॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ तृतीयस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसखारामविरचित॥ त्रिंशाध्यायगोडहा १२ ॥३०
एकत्रिंशाध्यायप्रारंभः॥ ॥ कपिलह्मणतीहेजननी॥ मगप्राणीनिजकर्मेंकरूनी॥ प्रवेशकरितीगर्भस्थानीं॥ अकस्मा
ततेधवां॥१॥ स्त्रीचेंअशुद्धपुरुषाचेंरेत॥ संगमींहोतांएकत्र॥ त्यासंधिमाजीलरित॥ जीवसंचरतोतेठायीं॥२॥ शु
क्रशोणितांचेंमिश्रण॥ एकेठायींहोऊनिजाण॥ चारदिवशींबुद्बुदसमान॥ वर्धमानतेंहोतें॥३॥ दहावेदिवशींमां

सगोळ॥कंदापरीहोतोसोज्वळ॥मगजातांकांहींकाळ॥जरायुआवरणउन्दवतें॥४॥मस्तकउत्पन्नहोयमासांत॥ हस्तपाददोनमहिन्यांत॥नखेंकेशइंद्रियेंसमस्त॥तिसऱ्यामाजीपैंहोती॥५॥सप्तधातुचवथेमासीं॥क्षुधातृषापांचवेमहिन्यासी॥सप्तमासपर्यंतनिश्चयेंशीं॥गर्भसंपूर्णहोतसे॥६॥मातेचेउजवेकुशीं॥गर्भभ्रमतोपरियेसीं॥ मातेनेंभक्षितांकड्डाम्लासी॥होतीगर्भासीयातना॥७॥खालींमस्तकवरतीचरण॥होतीतेंहस्तजोडून॥देवाचेंकरितोस्तवन॥सोडवींमजदातारा॥८॥स्तुतीकरितांचीऐशी॥प्रसूतिवायूनेंदहावेमासीं॥बाहेरपडतांकोहंशब्दासी॥उच्चारकरीनिश्चयें॥९॥सोहंसोहंविसरला॥कोहंकोहंरडूलागला॥दिवसांमासांवाढला॥अविद्यामग्नमातृदुग्धें॥१०॥पुढतीकरूनीअन्नभक्षण॥सवेंचिजाहलातरुण॥धनकांतामेळवून॥धृष्टपुष्टजाहला॥११॥तोवृद्धपणापर्यंत॥प्राणीहोतोसंसारींआसक्त॥परीविरक्तपणेंमद्भक्त॥होतनाहींतोकदा॥१२॥यास्तवकरूनियांयोग॥त्यजावाप्रमदांचासंग॥अंतरींधरूनीज्ञानविराग॥देहाभिमानसोडावा॥ १३॥श्रीमद्भागवतसारामृत॥तृतीयस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥एकत्रिंशाध्यायगोडहा॥ १४॥ ३१ ॥द्वात्रिंशाध्यायप्रारंभः॥ ॥कपिलह्मणेजननी॥गृहस्थाश्रमेंवर्तेजोप्राणी॥तेणेंधर्मार्थकामजनीं॥संपादनकरावे॥१॥पुरुषानेंभागवत॥धर्मआचरावेपुनीत॥यज्ञेंकरूनीदेवऋषींप्रत॥यजनकरावेंसद्भावें॥२॥तेणेंचंद्रलोकतयासी॥प्राप्तहोतोसौख्यराशी॥अमृतप्राशनदिवसनिशीं॥सदाघडतेंजाणपां॥३॥जेनिवृत्तिधर्मीरममाण॥तेसूर्यद्वारेंकरून॥पुरुषाप्रतीपावतीआपण॥मुक्तहोतीब्रह्मयासह॥४॥गृहस्थधर्मेंकरूनीनिश्चिती॥प्राणीवैकुंठींराहती॥शेषमुखींच्याज्वालानिघती॥जेंइंद्रदृष्टीकरीना॥५॥सूर्यद्वादशकलायुक्त॥तपतोतेव्हांआविर्भूत॥अ

त्यावांचूनि तडफडित ॥ सकळ प्राणी नष्ट होती ॥ ६ ॥ प्रलयवायूनें प्रखर ॥ अग्नि पेटतो फार ॥ तेणें लोकपाळादि समग्र ॥ ब्रह्मांडही दग्ध होय ॥ ७ ॥ मग बहु काळ होय अतिवर्षण ॥ सप्तसमुद्र ते एक वटून ॥ ब्रह्मांड बुडवितीन लगतां क्षण ॥ तें योगीजन मुक्त होती ॥ ८ ॥ हे माते यास्तव भावें ॥ त्या भगवंतातें भजावें ॥ अखंडित सद्गुण गावे ॥ कीर्तनामाजी तयाचे ॥ ९ ॥ अनन्यभावें करून ॥ श्रीहरीसी जावें शरण ॥ हरिकथामृत परित्याग करून ॥ असत्कथा न ऐकावी ॥ १० ॥ यास्तव माते तुजला ॥ कपिलगीताख्य सांख्य भेला ॥ मोक्षाकरितां कथियला ॥ तो जीवीं धरीं दृढतर ॥ ११ ॥ या ज्ञानाचा अभ्यास करून ॥ हृदयीं चिंतावा नारायण ॥ आपुलें स्थिर करूनी मन ॥ समाधान पावावें ॥ १२ ॥ मातें हें ज्ञान दुष्टासी ॥ स्तब्ध दांभिक लुब्धांसी ॥ न कथावें तें जोराशी ॥ भाविकांसी अर्पावें ॥ १३ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ तृतीयस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ द्वात्रिंशाध्याय गोड हा ॥ १४ ॥ ३२ ॥ त्रयस्त्रिंशाध्याय प्रारंभः ॥ कपिल मातेसी ह्मणती ॥ तुजला ज्ञानयोग भक्ती ॥ पंथ मोक्षाचे निगुती ॥ यथासांग कथियेले ॥ १ ॥ परंतु आतां भक्ती करून ॥ सदा करावें श्रीहरीचें यजन ॥ एकाग्र चित्तें करितां ध्यान ॥ मोक्षफळ न प्राप्त होय ॥ २ ॥ ब्रह्मवेत्ते या करितां ॥ मान्य करिती याचि पंथा ॥ ऐशा सांगूनि योग्यमता ॥ मातेसि कपिलें वंदिलें ॥ ३ ॥ मातेची आज्ञा घेऊन ॥ निघाले सिद्धक्षेत्राहून ॥ कपिल महामुनी भगवान् ॥ स्वेच्छागमन करावया ॥ ४ ॥ नंतर येरीकडे पाहीं ॥ प्राचीसरस्वतीचे ठायीं ॥ देवहूती स्नान करूनी लवलाही ॥ आसनावरी बैसली ॥ ५ ॥ इतुक्यामाजी जाण ॥ कर्दमयोगनिर्मित विमान ॥ करतां जाहली अवलोकन ॥ ह्मणे-आश्चर्य काय हें ॥ ६ ॥ या विमानाची चोख ॥ काय शोभा अलौकिक ॥ मणिमयस्तंभांस माणिक ॥ पाचू हीरक

कोंदले ॥७॥ स्फटिकभूमिसुशोभित ॥ क्षीरोदकापरी शय्या बहुत ॥ शृंगारपदार्थ विलसती जयांत ॥ मौक्तिक
तोरणें गोमटीं ॥ ८॥ नाना पक्षी शब्द करिती ॥ नाना परीच्या वेली असती ॥ परि उपेक्षी त्या विमाना प्रती ॥ ध्यान क
री पतीचें ॥ ९॥ कपिल महामुनी जाण ॥ आपुला पुत्र नारायण ॥ ऐसी भावना धरून ॥ चित्त एकाग्र करी पें ॥ १०॥
ज्ञान वैराग्यें निश्चित ॥ शुद्ध अशा स्वहृदयांत ॥ विश्वतोमुख पाहू निपुनीत ॥ समाधियोग तीसाधी ॥ ११॥ चि
त्तीं ठेवूनि पुरुषोत्तम ॥ देवहूती पावली उपरम ॥ देव हर्षित होऊनि परम ॥ मंगलवाद्यें वाजविती ॥ १२॥ पुष्पवृष्टी
करिती ताता ॥ तो काय आनंद वाखाणूं आतां ॥ साध्वीचे शरीरापासूनि सरिता ॥ सिद्धिदानामें जाहली ॥ १३ ॥
तें चि सिद्धपद क्षेत्र ॥ अद्यापि प्रसिद्ध पवित्र ॥ भावें परिसा श्रीहरिचरित्र ॥ मैत्रेय ह्मणे विदुरासी ॥ १४॥ येरीक
डे कपिल महामुनी ॥ समुद्रदत्त निकेतनीं ॥ बैसले योगमार्ग साधूनी ॥ सकल सज्जनीं परिसावें ॥ १५॥ मैत्रेय ह्म
णे विदुरासी ॥ कपिल देवहूति संवाद हा तुजसी ॥ कथिला तो ऐकतां प्रेमेशीं ॥ हरीपदासी पाविजे ॥ १६॥ ये
थें तृतीय स्कंध संपला ॥ भक्तिभावें तुळशीचा पाला ॥ अर्पण केला श्रीहरीला ॥ सखाराम ेंयारूपें ॥ १७॥ श्रीमद्भा
गवत सारामृत ॥ तृतीयस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ त्रयस्त्रिंशाध्याय गोड हा ॥ १८॥ ३३ ॥

इतिश्रीमद्भागवतसारामृतेतृतीयस्कं० समा०



अथश्रीमद्भागवतसारामृतेचतुर्थस्कं० प्रारं०



श्रीगणेशायनमः॥ श्रीसरस्वत्यैनमः॥ श्रीगुरुभ्योनमः॥ मैत्रेयह्मणेभागवता॥ विदुरापरिसेंश्रीहरिकथा॥श
तरूपानामेंमनुकांता॥संततीतीसजाहली॥१॥प्रियव्रतउत्तानचरण॥ऐसेजाहलेनंदन॥आकूतिदेवहूतिप्रसू
तिजाण॥कन्यात्रयनिपजलें॥२॥रुचीनामेंऋषीपासून॥आकूतीसजाहलेंयुग्मजाण॥यज्ञनामेंपुत्रनारायण
दक्षिणाकन्यासुंदर॥३॥दक्षिणेतेंतोयज्ञवरी॥यज्ञापासूनिदक्षिणेचेउदरीं॥द्वादशदेवप्रगटलेतेअवसरीं॥श्र
वणकरीतन्नामें॥४॥तोषप्रतोषसंतोषनिश्चिती॥शांतभद्रइडस्पति॥इध्मकविविभुस्वन्हसुमति॥सुदेवरोचन
हेबारा॥५॥स्वायंभुवांतरींदेवनिश्चित॥मरीच्यादिकऋषिसात॥यज्ञावतारशचीनाथ॥पूर्वोक्तमनुपुत्रदोघेते॥
६॥आतांकर्दमापासून॥देवहूतीचेठायींसुगुण॥कपिलमहामुनिनारायण॥प्रगटजाहलापरमात्मा॥७॥तया
चेंचरित्रभलें॥अगाविदुरातुजकथियेलें॥आतांश्रवणकरीवहिलें॥कुलनेंतृतीयकन्येचें॥८॥ब्रह्मपुत्रदक्षासी॥
मनूनेंदिधलेंप्रसूतीसी॥तियेच्यावंशविस्तारासी॥त्रैलोक्यसारेंठेंगणें॥९॥कर्दमकन्यांचापावन॥वंशकरीआतां
श्रवण॥कलानामेंकन्यासुगुण॥मरीचीसीदीधली॥१०॥यादपत्यापासून॥कश्यपआणिपूर्णिमान॥ऐसेजाह
लेनंदन॥तद्वंशेंविश्वव्यापहें॥११॥त्याकश्यपाचावंशसकळ॥षष्ठस्कंधींकथिनप्रांजळ॥पूर्णिमानासिसोज्वळ॥
विरजविश्वगसुतझाले॥१२॥देवकुल्यानामेंदुहिता॥श्रीहरिपदप्रक्षालितां॥स्वर्गंगाजाहलीपुनीता॥जन्मांतरींत्या
पुण्यें॥१३॥अत्रिअनुसूयांपासूनिनिश्चित॥चंद्रदुर्वासआणिदत्त॥ब्रह्माविष्णुआणिउमाकांत॥यांच्याअंशेंकरूनी
१४॥विदुरह्मणेमैत्रेयासी॥त्रिमूर्तिजन्मल्याअत्रीचेकुशीं॥कायकारणजाहलेंत्यांसीं॥तेंचिसर्ववदावें॥१५॥मैत्रेय
ह्मणेभागवता॥श्रीहरिचरित्रपरिसआतां॥सृष्टिकरावयासीविधाता॥आज्ञाकरीअत्रीसी॥१६॥ऐकूनिपितृवाक्या

सी ॥ शतसंवत्सर अत्रिऋषि ॥ तपकरी उभा एकपदेसीं ॥ तत्तेजें त्रिजग लोपलें ॥ १७ ॥ मुनि देवांची प्रार्थना करी ॥ पुत्र
व्हावा तुमच्यापरी ॥ हें जाणूनि तयाचे घरीं ॥ विधि हरिहर पातले ॥ १८ ॥ दृष्टीं देखुनीं जगन्नाथ ॥ वंदन करी दंडवत ॥ अ
त्रिस्तवन करी मुदित ॥ ब्रह्माविष्णुशिवांचें ॥ १९ ॥ स्तवन परिसूनि कमलासन ॥ कैलासपती नारायण ॥ संतोषें बोलती
वचन ॥ मागइच्छित मुनिराया ॥ २० ॥ तैं मुनि ह्मणे मीं एक ध्यायिला ॥ तो कवण सांगा मला ॥ देव बोलती आह्मां तिघां-
ला ॥ एकत्व चीसदा असे ॥ २१ ॥ परिसूनि बोले अत्रिमुनी ॥ मत्पुत्र व्हावें त्रिवर्गांनीं ॥ तथास्तु बोलूनी देव तिन्ही ॥ स्व-
धामा जाती तत्काल ॥ २२ ॥ विधीचे अंशें करूनी शशी ॥ दुर्वास जाण व्योमकेशी ॥ दत्तात्रेय हृषीकेशी ॥ परब्रह्म प्रग
टलें ॥ २३ ॥ अत्रिपासूनि यां जाण ॥ अनुसूयेसी जाहले ऐसे नंदन ॥ देवदुंदुभी वाजवून ॥ पुष्पवृष्टी तें करिती ॥ २४ ॥ आ
तां विधिपुत्र अंगिरामुनी ॥ त्याची श्रद्धा नामक पत्नी ॥ सिनीवाली कुहू राका सद्गुणी ॥ अनुमती कन्या त्या प्रसवे ॥ २५ ॥ उ
तथ्य बृहस्पती दोन कुमर ॥ मुनीसि जाहले मनोहर ॥ ते स्वारोचिष मन्वंतरीं साचार ॥ प्रसिद्ध जाहले जाण पां ॥ २६ ॥ तै
सेच पुलस्त्यऋषीसी भले ॥ हविर्भूपत्नीचे उदरीं जाहले ॥ अगस्ती विश्रवा गाथिले ॥ महापुराणीं उत्तम ॥ २७ ॥ त्यांत वि
श्रव्यासी कुमर ॥ इडविडेपासूनि कुबेर ॥ केशिनीपासाव लंकेश्वर ॥ कुंभकर्ण बिभीषण ॥ २८ ॥ पुलहा गतिभार्येपा-
सून ॥ वरीयान् सहिष्णु कुमर दोन ॥ क्रतूसी क्रियेपासून ॥ वालखिल्य जाहले ॥ २९ ॥ ऊर्जा नामक कांतेसी ॥ वसिष्ठापा
सूनि निश्चयेसीं ॥ चित्रकेतुप्रमुख परियेसी ॥ सप्त पुत्र ते जाहाले ॥ ३० ॥ अथर्वणा चितिचे उदरीं ॥ धृतव्रत दध्यंच साचा
रीं ॥ भृगूख्यातीचे ठायीं निर्माण करी ॥ धाता विधाता श्रीसह ॥ ३१ ॥ धातिया आयतीचे ठायीं ॥ मृकंडपुत्र झाला पाहीं
कर्दमकन्या संतती ही ॥ कथियली तुजलागीं ॥ ३२ ॥ दक्षा प्रसूतिपासूनी ताता ॥ षोडश जाहल्या दुहिता ॥ त्रयोदश जा-

हल्याधर्मकांता॥पितरांसिएकदीधली॥३३॥एकअग्नीसीअर्पूनी॥महादेवादिलीदाक्षायणी॥जीदक्षकोपनिमित्तेंय
जनीं॥योगाग्निमाजींसाध्वीजळे॥३४॥श्रीमद्भागवतसारामृत॥चतुर्थस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥
प्रथमाध्यायगोडहा॥३५॥१॥ द्वितीयाध्यायप्रारंभः ॥विदुरह्मणेमुनिनाथा॥दक्षाआणिभूतनाथा॥श्वशुरत्ज
मातृसंबंधअसतां॥द्वेषजाहलाकवणेपरी॥१॥याचेंसांगाकारण॥दयासागराआह्मांलागुन॥ऐसेंऐकूनिवचन
सांगेसाद्यंतमैत्रेय॥२॥प्रजापतीचेयज्ञांत॥देवर्षिपितरसमस्त॥बैसलेअसतांअकस्मात॥दक्षतेथेंपातला॥३॥त
यासीकरितांअवलोकन॥समस्तदेतीअभ्युत्थान॥स्वस्थबैसेसतीरमण॥आसनावरीतेधवां॥४॥दक्षहोऊनिकुपित
बोलताजाहलात्वरित॥सभासदहोपरिसामात॥कायअधर्मजाहलाहा॥५॥सद्यशलोकपालांचें॥शंकरें बुडविलेंसा-
चें॥ निर्लज्जजाहलावाचें॥काययासीह्मणूंआतां॥६॥कन्यादेऊनियासी॥पश्चात्तापजाहलामानसी॥कोठेंदुहितल
वण्यराशी॥मर्कटनेत्रहाकोठें॥७॥शूद्रासिजेसेंवेददान॥तहृतकेलेंकन्यादान॥जयावसतिस्थानश्मशान॥नंदीवहन
जयाला॥८॥चिताभस्मेंकरूनीजाण॥जोनित्यकरितसेलेपन॥नरमुंडमाळाकरीधारण॥अस्थिभूषणेंप्रियजया॥९॥
ऐसाहाभूतनाथ॥प्रेतांमाजीखेळेसतत॥कन्यासाध्वीदेऊनिव्यर्थ॥पश्चात्तापपावलों॥१०॥मैत्रेयविदुरासीह्मणती॥
शिवनिंदाकरूनीयारीती॥क्रोधाविष्टहोऊनिअंतीं॥दक्षशापदेतसे॥११॥आजपासूनिजाण॥यज्ञामाजीशिवालागु
न॥हविर्भागनमिळेपूर्ण॥शापदक्षदेऐसा॥१२॥ऐसेंऐकूनिनिघाले॥महादेवकैलासीभले॥नंदीनेंतेंदक्षासीशा-
पिलें॥बस्तमुखहोतूंही॥१३॥शिवनिंदकचांडाल॥अधमपतितदुर्जनखळ॥ह्मणूनीबस्तमुखअमंगळ॥प्राप्तहो-
वोतुजलागीं॥१४॥जेऋषीशिवावरीहांसले॥भग्नदंतहोतीलतेभले॥वेदविक्रयकरूनीआपुले॥योगक्षेमकरितील॥

१५॥ यज्ञकरूनीसमाप्त॥ निजाश्रमींगेलेसमस्त॥ अग्रभागींकथामृत॥ श्रवणकरीहेंसाधो॥ १६॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ चतुर्थस्कंधींपरमपुनीत॥ प्राकृतसखारामविरचित॥ द्वितीयाध्यायगोडहा॥ १७॥ २॥ तृतीयाध्यायप्रा॰

मैत्रेयह्मणेविदुरा॥ ऐशाहूंषेंजामातश्वशुरा॥ बहुकाळजातांचमत्कारबरा॥ जाहलातोअवधारिजे॥ १॥ कोणेएकेसमयींजाण॥ प्रजापतींचेंराज्यासन॥ विधीनेंदिधलेंदक्षालागुन॥ पूर्णकृपेनेंजाणपां॥ २॥ तेणेंगर्वितहोऊनिफार॥ तोशंकराचातिरस्कार॥ करिताजाहलावारंवार॥ तोकायसुखीवाणावा॥ ३॥ वाजपेययज्ञपूर्ण॥ करिताजाहलादक्षआपण॥ ब्रह्मर्षिसुरर्षिपितृगण॥ सर्वपातलेतेस्थानीं॥ ४॥ इंद्रादिलोकपाळ॥ सपत्नीकआलेसकळ॥ विमानींबैसूनिसोज्वळ॥ कौतुकपाहूंपातले॥ ५॥ देवस्त्रियासालंकृत॥ विमानींबैसूनिपतीसहित॥ दक्षयज्ञालागींत्वरित॥ समारंभेंपैयेती॥ ६॥ यज्ञार्थआलियांचा॥ दक्षेंसन्मानकेलासाचा॥ इंद्रादिलोकपालांचा॥ यथायोग्यजाणिजे॥ ७॥ ऐसासमारंभपाहूनिनयनीं॥ अंबिकाविनवीकैलासभुवनीं॥ सदाशिवातेंमधुरवचनीं॥ कायतेंचीपरिसीजे॥ ८॥ हेशंकरासांप्रत॥ तुमचाश्वशुरदक्षतात॥ यज्ञकरितोएथ्वींत॥ समारंभेंकरूनी॥ ९॥ तोसमारंभपाहावया॥ इंद्रादिआलेस्वामिराया॥ अवश्यजाणेंतयेठाया॥ घडेलकींआपणा॥ १०॥ माझ्याभगिनीपतींसहित॥ कौतुकार्थआल्यासमस्त॥ तेथेंजावेंआपणत्वरित॥ ऐसीआशामानसीं॥ ११॥ समारंभांतमातृभगिनी॥ आल्यात्यापाहीनलोचनीं॥ हेंप्रभोजन्मस्थानीं॥ जावेंऐसेंवाटतें॥ १२॥ पहायानभमंडळांत॥ विमानेंव्यापजाहलींबहुत॥ तातगृहींजावयानिश्चित॥ मानापमानतोनाहीं॥ १३॥ यापरीऐकूनियांवाणी॥ दक्षवाक्यातेंस्मरूनी॥ कायबोलेभूलपाणी॥ दाक्षायणीतेंनिश्चयें॥ १४॥ हेशोभनेपरिसेंवचन॥ अनाहूतबंधुगृहींगमन॥ मान्यअसेआह्मांलागुन

दोषदर्शीजरीनसती ॥ १५ ॥ देहाहंकारमदयुक्त ॥ जेकांअसतीदिवसरात ॥ द्वेषकरितीसर्पवत ॥ संगत्यांचानकरावा
१६ ॥ जेवक्रदृष्टीनेंपाहती ॥ नजावेंत्यांचेगृहाप्रती ॥ प्राणवल्लभेअपर्णेसती ॥ मान्यकरावेंहेंसारें ॥ १७ ॥ पहाप्रजा
पतीचेयज्ञांत ॥ आह्मांपूर्वींनिंदिलेंबहुत ॥ कारणनसतांकिंचित ॥ मर्मस्थानींताडिलें ॥ १८ ॥ शत्रूचेतिखटशर ॥
अंगींनखुपतीसाचार ॥ परंतुदक्षवाक्येंजिव्हार ॥ भेदूनिगेलेंअंबिके ॥ १९ ॥ दक्षकन्यांमाजीपुनीत ॥ मान्यअससी
तूंयथार्थ ॥ पितृगृहींजातांअपमानप्राप्त ॥ सत्यहोईलशशिआनने ॥ २० ॥ माझ्याआश्रयेंकरून ॥ तुजवरीदक्षकोपा-
यमान ॥ होऊनितिरस्कारपूर्ण ॥ सर्वदाकरितोकीं ॥ २१ ॥ ब्रह्मसनातनलक्ष्मीपती ॥ व्याप्यव्यापकयाजगती ॥ हेंने-
णूनिआपुलेचित्तीं ॥ व्यर्थद्वेषकरीदक्ष ॥ २२ ॥ वल्लभेमाझेंहेंवचन ॥ जरीजाशीलउल्लंघून ॥ तरीतातगृहींअपमान ॥
अत्यंतपावशीलनिश्चयें ॥ २३ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ चतुर्थस्कंधीपरमपुनीत ॥ प्राकृतसरवारामविरचित ॥
तृतीयाध्यायगोडहा ॥ २४ ॥ ३ ॥ चतुर्थाध्यायप्रारंभः ॥ ॥ मैत्रेयह्मणतीभागवता ॥ हरिकथापरिसेंआतां ॥ पत्नी
नाशआपुलेचित्ता ॥ आणूनिशिवमौनावले ॥ १ ॥ नंतरबैसूनिनंदीवर ॥ सतीनिघालीसत्वर ॥ पार्षदयक्षप्रमथा
दिअनुचर ॥ भूतेंप्रेतेंसर्वेंजाती ॥ २ ॥ पुढेंगणवाद्येंवाजविती ॥ एकध्वजाघेऊनिहातीं ॥ जयजयशब्देंघोषकरि
ती ॥ एकनाचतीआनंदें ॥ ३ ॥ क्रीडासाधनसारिका ॥ कंदुकादिसमस्तदेखा ॥ श्वेतातपत्रविशेखा ॥ रविसमघे
ऊनीधांवती ॥ ४ ॥ ऐसेंसमारंभेंकरून ॥ अपर्णाकरीगमन ॥ दक्षयज्ञांतनलागतांक्षण ॥ अकस्मातपातली ॥
५ ॥ तेव्हांयज्ञमंडपांत ॥ येऊनिसतीन्याहाळीनिवांत ॥ तंवरुद्रभागनसेकिंचित ॥ पाहूनिचित्तपोळलें ॥ ६ ॥ कु
पितहोऊनिलवलाही ॥ दाक्षायणीबोलेपाहीं ॥ माझ्यापतीसीमित्रारिनाहीं ॥ शिवनामसंगलजयाचें ॥ ७ ॥ जया

चेंनामस्मरणकरितां ॥ हरेसंसाराचीचिंता ॥ ऐसाशंकर समर्थअसतां ॥ व्यर्थनिंदितीपामर ॥ ८ ॥ तया शिवाचीब
हुपरी ॥ चांडाळपापीजोनिंदाकरी ॥ तोपचेकल्पांतावरी ॥ रौरवनरकींनिश्चयें ॥ ९ ॥ तस्मात् दक्षापरिसेंवाणी ॥
समर्थनिंदाजोमुखेंवाणी ॥ तीनऐकावीश्रवणीं ॥ अंगुलीप्रवेशकरावा ॥ १० ॥ त्यादुष्टाचेंमुख ॥ पाहूंनयेसन्मुख ॥
निंदाऐकतांदोषअनेक ॥ येऊनिमस्तकींबैसती ॥ ११ ॥ यास्तवकर्णीघालूनीबोटें ॥ स्वस्थबैसावेंनेटें ॥ तयासीवच
नउफराटें ॥ देऊंनयेहेंधर्मशास्त्र ॥ १२ ॥ हेदक्षातुजपासून ॥ हादेहजाहलानिर्माण ॥ पतिताचेंभक्षितांअन्न ॥ योग्यव
मनत्यावरी ॥ १३ ॥ शिवनिंदकापासूनिशरीर ॥ उत्पन्नजाहलेंव्यर्थभार ॥ त्याचाकरितेंपरिहार ॥ सत्यजाणयेथवां ॥
१४ ॥ यापरीबोलूनिक्रोधाधिका ॥ कायकरीजगदंबिका ॥ हस्तपादप्रक्षालनकरूनीदेखा ॥ उदङ्मुखीबैसली १५
घालूनियांपद्मासन ॥ एकाग्रचित्तेंकरूनिज्ञाण ॥ करितीजाहलीशंकरध्यान ॥ यथासांगसद्भावें ॥ १६ ॥ नाभिचक्रा
पासून ॥ प्राणललाटींनेऊन ॥ प्रदीप्तयोगाग्निकरून ॥ भस्मीभूतजाहली ॥ १७ ॥ देवऋषिपहातअसतां ॥ अनर्थ-
ऐसाजाहलाताता ॥ भूचरखेचरबोलतीवार्ता ॥ कवणेंसतीसकोपविलें ॥ १८ ॥ जेणेंकेलाअसेघात ॥ त्याचीअपकी-
र्तीत्रिजगांत ॥ सदानंदेलदिवसरात ॥ चंद्रार्कराहतीजोंवरी ॥ १९ ॥ ऐसेंजनबोलतीवचन ॥ तेंसार्थवाक्यकरूनी
श्रवण ॥ दक्षवधार्थशंकरगण ॥ अकस्मातधांवले ॥ २० ॥ ऐसेंदेखूनिभृगुमुनी ॥ दक्षिणाग्नीतंतेक्षणीं ॥ यथासांग
हवनकरूनी ॥ ऋभुदेवानिपजवी ॥ २१ ॥ तयांनींजाऊनिसत्वर ॥ पळविलेशिवाचेअनुचर ॥ विदुरापुढेंचमत्का-
र ॥ कायजाहलातोपरिसा ॥ २२ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ चतुर्थस्कंधींपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचि-
त ॥ चतुर्थाध्यायगोडहा ॥ २३ ॥ ४ ॥ ॥ पंचमाध्यायप्रारंभः ॥ मैत्रेयह्मणेविदुरासी ॥ नारदेंजाऊनिकैलासीं

सर्ववृत्तांतमहादेवासी॥कथनकेलातेधवां॥१॥तें ऐकूनिवर्तमान॥शंकरजाहलाकोपायमान॥ह्मणेमाझेंहारवलेंरत्न॥सौभाग्यनिधान अपर्णा॥२॥मगशिवेंकायकेलें॥स्वकरें जटेसीआपटिलें॥तयापासूनिउत्पन्नजाहलें॥वीरभद्रदैवत॥३॥गगनचुंबितज्यानेंशिर॥सायुधजयासीसहस्रकर॥विक्राळदाढाभयंकर॥रुद्रमूर्तिकेवळ॥४॥उत्पन्नहोतांचिबाळ॥वंदूनिशंकरातात्काळ॥बोलताजाहलाउतावेळ॥कायखेळमीकरूं॥५॥ऐसेंवीरवचनसांग॥ऐकूनिह्मणेउमारंग॥करावादक्षयज्ञभंग॥आतांचिजाऊनिबालका॥६॥तूंमदंशसाचहोसी॥हानिश्चयजाणमानसीं॥ऐकूनिऐसेवाक्यासी॥वीरभद्रनिघाला॥७॥तेव्हांपार्षदगणांसहित॥कोपेंकरूनीनिघेलरित॥शूलघेऊनिहस्तांत॥यज्ञमंडपापावला॥८॥ऐसेंअरिष्टयेतांभलें॥ऋत्विजांनींअवलोकिलें॥रजःकणींनभव्यापिलें॥सूर्यआच्छादितजाहला॥९॥तेव्हांदक्षपत्नीबोलती॥हीसतीकोपाचीफलश्रुती॥मूढअधमकांहींनेणती॥कल्पांतकाळप्रगटला॥१०॥भूतप्रेतपिशाचगण॥येऊनिनलगतांक्षण॥यज्ञकुंडेंटाकितीमोडुन॥मूत्रमलोत्सर्गकरूनियां॥११॥पत्नीशालाहोमशाला॥यजमानगृहतयेवेळा॥यज्ञपात्रेंसाहित्यशाला॥भंगनकरूनीटाकिल्या॥१२॥ऐसापाहूनिअनर्थ॥इंद्रादिदेवपळालेसमस्त॥भयसानूनिमनांत॥उपायकांहींचालेना॥१३॥मणिमंतेंभृगुबांधिला॥वीरभद्रेंदक्षकंठरगडिला॥शेखींअग्निमाजीहोमिला॥पूषाचंडीशेंरोधिला॥१४॥नंदीधरीभगासी॥तैसेंऋत्विजसदस्यांसी॥शिवगणयेऊनिवेगेंसी॥पाषाणमारूंलागले॥१५॥दक्षमुखछेदूनिहोमिलें॥पूषियाचेदांतपाडिले॥भृगूचेश्मश्रुउपटिले॥जेसांवरिलेशिवनिंदितां॥१६॥डोळेवटारूनीपहिलें॥भगानेंसभेंतपाहिलें॥ह्मणूनित्याचेडोळेफोडिले॥शिवगणींयेउनीं॥१७॥जिकडेतिकडेहाहाकार॥

देवऋषीआणिपितर॥पळूंलागलेसाचार॥कोणासीकांहींसुचेना॥१८॥यज्ञभंगकरूनीत्वरित॥वीरभद्रशिवगणां
सहित॥कैलासशिखरींजोहल्लाप्राप्त॥शंकरासन्निधतेधवां॥१९॥ऋषिजनकरितीशोक॥विघ्नजाहलेंभयानक॥
याचेंनिवारणब्रह्मांडनायक॥कैसेंकरीलतेंकरो॥२०॥श्रीमद्भागवतसारामृत॥चतुर्थस्कंधींपरमपुनीत॥प्राकृत
सखारामविरचित॥पंचमाध्यायगोडहा॥२१॥ ५॥ ॥षष्ठाध्यायप्रारंभः॥ ॥मैत्रेयह्मणेभागवता॥परि
सेंश्रीहरीचीगाथा॥दक्षयज्ञांतदेवांसमस्तां॥रुद्रसैन्येंपळविलें॥ १ ॥तेछिन्नभिन्नसर्वांगीं निश्चित॥सदामा-
नसींभयभीत॥वेगेंसत्यलोकींप्राप्त॥होतेजाहलेतेधवां॥२॥ब्रह्मदेवासीकरूनिनमन॥सांगतेजाहलेवर्तमान॥
दक्षयज्ञभंगकरून॥शिवगणींआह्मांत्रासिलें॥३॥यास्तवआह्मीशरण॥पातलोंचरणींकरारक्षण॥यापरी-
त्यांचेंपरिसूनिवचन॥ब्रह्मदेवनिघाले॥४॥सवेंघेऊनिदेवमुनी॥विधिचाललातयेक्षणीं॥तोकुबेरनगरा-
हूनी॥कैलासभुवनीपातला॥५॥तेथेंफळपुष्पयुक्त॥वृक्षलागलेगगनचुंबित॥त्यांमाजीविस्तीर्णयोजनश
त॥वटवृक्षएकअसे॥६॥तयावटाचेतळवटीं॥छायापाहूनिगोमटी॥व्याघ्रासनींधूर्जटी॥परमानंदेंबैसले॥७
तर्कमुद्रेनेंजपकरीशांत॥सभोंवतींसरोवरेंबहुत॥जेथेंकुमुदकल्हारेंसुगंधित॥उत्पलशतपत्रेंविराजती॥८॥मृग
वाजीवारण॥वानररीसगवयजाण॥शरभव्याघ्रआदिकरून॥श्वापदेंविचरतीपर्वतीं॥९॥हंससारसकारंड
वशुक॥पिकादिपक्षीअनेक॥वृक्षावरीबैसूनिचोख॥शिवशिवशब्देंगर्जती॥१०॥ऐशापर्वतशिखरीं॥विधिजा-
ऊनिसत्वरीं॥साष्टांगवंदीत्रिपुरारी॥प्रेमभावेंकरूनीयां॥११॥सनकसनंदनयोगिजन॥नित्यकरितीज्याचेंस्त
वन॥तोशंभुवैराग्यसंपन्न॥पूर्णकामविराजे॥१२॥पद्मासनींप्रभुदेखिला॥जटाजूटरुद्राक्षमाळा॥जयाशोभ-

तीं नरमुंडें गळां ॥ भस्मचर्चित सर्वांगीं ॥ १३ ॥ नृकपालदंडधर ॥ भार्वांशोभे रोहिणीवर ॥ व्याघ्रकंथा फणिवर ॥ ठायींठायीं वेष्टिले ॥ १४ त्रिशूल डमरु या आयुधें करून ॥ युक्त ब्रह्म सनातन ॥ ऐसा शंकर नयनीं पाहून ॥ विधाता विनवी सद्भावें ॥ १५ ॥ हे यज्ञहंत्या यजमानाचा ॥ ऋत्विजादि अन्यजनांचा ॥ अपराध क्षमा करूनी साचा ॥ यज्ञमंडपीं चलावें १६ ॥ यज्ञभाग आपणासी ॥ अखंड देतों व्योमकेशी ॥ मैत्रेय ह्मणे विदुरासी ॥ चरित्र पुढतीं परिसावें ॥ १७ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ चतुर्थस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ षष्ठाध्याय गोड हा ॥ १९ ॥ ६ ॥ ॥ सप्तमाध्यायप्रारंभः ॥ ॥ विदुरासि ह्मणे मैत्रेय मुनी ॥ शंकर स्तवन परिसूनी ॥ देवांसहित तेथूनी ॥ यज्ञमंडपीं पातले १ ॥ तेथें जाऊनि वहिलें ॥ महादेव ह्मणूं लागले ॥ दक्ष कबंधासी अजमुंड भलें ॥ शीघ्र लावा येधवां ॥ २ ॥ भग ऋषी चक्षुहीन ॥ तो पाहील सूर्यतेजें करून ॥ पूषा दंतविहीन ॥ यजमानदंतीं चालवितो ३ देव ऋषी पितरांचें ॥ अवयव भंगले साचे ॥ पहिल्यासारिखे होतील त्यांचे ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥ ४ ॥ हा यज्ञ भग जाहला निश्चित ॥ ह्मणूनि याचें प्रायश्चित्त ॥ ह्मावया विष्णुतोषार्थ ॥ त्रिकपाल इष्टि करावी ॥ ५ ॥ यापरी ऐकूनी शिववाणी ॥ धाता यजन करी तेक्षणीं ॥ तंव तो लक्ष्मीसहित चक्रपाणी ॥ प्रगट जाहला तेधवां ॥ ६ ॥ तेजःपुंज मनोहर ॥ पीतांबरधारी श्यामसुंदर ॥ ज्याचे मस्तकीं मुकुट रुचिर ॥ कर्णीं कुंडलें साजिरीं ॥ ७ ॥ शंखचक्रादि आयुधें समस्त ॥ कंठीं कौस्तुभ विराजित ॥ आपादलंबिनी माळा रुळे निश्चित ॥ वैजयंती गोमटी ॥ ८ ॥ ऐसी श्रीहरिमूर्ति पाहुन ॥ अखिल देऊनि अभ्युत्थान ॥ करूनी साष्टांग वंदन ॥ सन्मुख उभे राहिले ॥ ९ ॥ दक्ष करूनी नमस्कार ॥ स्तवन करी वारंवार ॥ बोकडासारिखा उच्चार ॥ होतां समस्त हांसले ॥ १० ॥ नंतर ऋत्विज आणि सदस्य ॥ भृगु पुढती चतुरास्य ॥ स्तवन करिती सुरेश ॥ ऋषिपत्न्याही तेधवां ॥ ११ ॥

गंधर्वआणिलोकपाळ ॥ विद्याधरादिमिळूनिसकळ ॥ स्तवनकरितीसोज्वळ ॥ महोत्सवतेंमांडिला ॥ १२ ॥ यज्ञसमाप्तकरून ॥ स्वगृहींगेलेसुरगण ॥ विदुरापुढतीचरित्रपावन ॥ श्रवणकरीप्रेमळा ॥ १३ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ चतुर्थस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसरवारामविरचित ॥ सप्तमाध्यायगोडहा ॥ १४ ॥ ७ ॥ ॥ अष्टमाध्यायप्रारंभः ॥ ॥

मैत्रेयह्मणेविदुरास ॥ आतांस्वायंभुवमनूचावंश ॥ परिसेंबापाअशेष ॥ कथनकरितोंतुजलागीं ॥ १ ॥ मनुपुत्रप्रियव्रत ॥ दुजाउत्तानपादनिश्चित ॥ कांतातयालागींपुनीत ॥ उभयअसतीसुंदरी ॥ २ ॥ सुनीतिसुरुचीजाण ॥ लावण्यसागरींचेंनिधान ॥ सुनीतीवरीरायाचेंमन ॥ तिळमात्रअसेना ॥ ३ ॥ ध्रुवनामापुत्रसुंदर ॥ पंचवार्षिकसाचार ॥ सुरुचीचाउत्तमकुमर ॥ परमआवडेनृपनाथा ॥ ४ ॥ एकेसमयींभूपती ॥ सुरुचिपुत्राउत्तमाप्रती ॥ अंकीं घेऊनियांप्रीति ॥ लालनकरीसंतोषें ॥ ५ ॥ तंवतेथेंध्रुवपातला ॥ अंकींबसावयाधांवला ॥ तोंचमत्कारजाहला ॥ विदुरापरिसेंसावधान ॥ ६ ॥ सुरुचिनेंचरित्रपाहुन ॥ सापत्नभावमनींधरून ॥ रायानेंकरावेंश्रवण ॥ ऐसेंवचनबोलिली ॥ ७ ॥ ह्मणेवत्सानृपासनप्राप्तव्हावयातुजलागुन ॥ अधिकारनाहींपूर्ण ॥ त्याचेंकारणपरिसेंबा ॥ ८ ॥ तांमाझेकुशींजन्मावें ॥ तरीचराज्यासनग्रहणकरावें ॥ तपेंश्रीहरीसीतोषवावें ॥ तरीऐसेंफळपावसी ॥ ९ ॥ दुष्टवचनऐकूनिकानीं ॥ दुःखितध्रुवनिघालातेक्षणीं ॥ रुदनकरितआक्रंदुनी ॥ मातेसन्निधपातला ॥ १० ॥ सर्ववृत्तकथनकेलें ॥ तेव्हांजननीसदुःखजाहलें ॥ सुनीतीनेंपुत्रासितेवेळे ॥ वक्षस्थळींधरियेलें ॥ ११ ॥ ह्मणेबाळाकाळगती ॥ कायसांगूंतुजप्रती ॥ मजभार्याह्मणावयानृपतीलज्जायमानपैंहोतो ॥ १२ ॥ वत्सासुरुचीचेंवचन ॥ सत्यमानीविचारकरून ॥ पदइच्छिसीतरीनारायण ॥ तपेंकरूनतोषवीं ॥ १३ ॥ तेणेंइच्छितपावसी ॥ अढळपदींबैससी ॥ दुःखसमुद्रानजाणसी ॥ कृपेंकरूनीतयाच्या ॥ १४ ॥ ऐक

तांमातेचावाक्यार्थ॥ मनींउद्भवलेवैराग्य बहुत॥ पुरांतूनीतोअकस्मात॥ वनामाजीनिघाला॥ १५॥ जाणूनिध्रुवाचें मनोगत॥ नारदभेटलेमार्गांत॥ मस्तकींठेवूनिवरदहस्त॥ बोलतेजाहलेतेधवां॥ १६॥ हेवत्सायावयांत॥ मानापमानधरिसीव्यर्थ॥ मातृवाक्यसाधनार्थ॥ महत्संकटबाअसे॥ १७॥ आतांत्वांहेंचिकरावें॥ दुराग्रहसोडूनिभजावें॥ निजगेहाप्रतीवींचित्तधरावें॥ तेणेंक्षेमापावसी॥ १८॥ ऐसीऐकूनीनारदवाणी॥ ध्रुवबाळजोडूनिपाणी॥ सप्रेमलोचनींआणूनिपाणी॥ करीविनंतिसद्भावें॥ १९॥ हेमुनिवराअवधारीं॥ सुरुचीचेवाग्बाणजिव्हारीं॥ भेदूनिगेलेयेअवसरीं॥ तेणेंअंतरपोळलें॥ २०॥ सर्वोत्कृष्टत्रिभुवनांत॥ अन्यपदल्हावयाप्राप्त॥ सदुपायकथावानेमस्तकृपाकरूनीमुनिराया॥ २१॥ तेव्हांनारदह्मणेजरी॥ ऐसेंइच्छिसीबाळकाअंतरीं॥ तरीएकनिष्ठेंश्रीहरी॥ भक्तिभावेंआकळीजे॥ २२॥ बाळाध्रुवापरिसेंवचन॥ यमुनातटाकींअसेमधुवन॥ तेस्थानींतुवांजाऊन॥ परमात्माध्याइजे॥ २३॥ यमुनाजळींस्नानकरूनी॥ बैसूनियांपद्मासनीं॥ प्राणायामेंदेहशोधूनी॥ आत्मारामपहावा॥ २४॥ किरीटकुंडलेंवनमाळा॥ शोभतीचतुर्भुजकौस्तुभगळां॥ ज्याचेकांसेपटपिवळा॥ प्रसन्नवदनश्रीहरीतो॥ २५॥ ऐसाप्रभुअद्वय॥ ध्यायिजेस्थिरकरूनीहृदय॥ नमोभगवतेवासुदेवाय॥ २६हामंत्रपठनकरावा॥ २६॥ यामंत्रपठनेंकरूनिजाण॥ सप्तरात्रींतमानवआपण॥ प्रत्यक्षपाहेनारायण॥ सत्यवचननिर्धारें॥ २७॥ वासुदेवमंत्रेंसुखकर॥ गंधमाल्येंकरूनिसुंदर॥ कायावाचामनेंसीनिर्धार॥ पूजितांश्रीहरीइष्टदे॥ २८॥ ऐसेंनारदध्रुवासी॥ सांगेगोप्यतत्वप्रेमेंसी॥ वंदनकरूनीविधिसुतासी॥ तपागेलाबाळतो॥ २९॥ येरीकडेनारदमुनी॥ उत्तानपादनृपाचेसदनीं॥ येऊनिकौतुकनयनीं॥ पाहताजाहलातेधवां॥ ३०॥ पूजासत्काररकरून॥ योगियाआसनींबैसवून

प्रश्न केलासाश्रुनयन ॥ पुत्रविरहें नरनाथें ॥ ३१ ॥ अहो नारदा परिसा वाणी ॥ पंचवार्षिक लावण्यखाणी ॥ माझा पुत्र गे-
लारानीं ॥ मातृवचनें करूनियां ॥ ३२ ॥ क्षुधातृषा बाळकाला ॥ लागतां मागेल अन्नाला ॥ वनीं देईल कवण त्याला ॥
चिंता दारुण मनीं वाटे ॥ ३३ ॥ व्याघ्रवृकादि श्वापद क्रूर ॥ सदा भ्रमती वनचर ॥ काय कैसा होईल प्रकार ॥ मत्पुत्राचा नि-
श्चयें ॥ ३४ ॥ अहो मी स्त्रीजित ॥ मंद दुरात्मा अधम बहुत ॥ बाळ आला सन्निध खेळत ॥ तयाकडे न पाहिलें ॥ ३५ ॥ ऐ-
सी परिसूनि वाणी ॥ काय बोले नारदमुनी ॥ राजा शोक न करी मनीं ॥ स्वस्तिक्षेम पुत्र तुझा ॥ ३६ ॥ जें कर्म देवांसि दुष्क-
र ॥ तें करूनि तुझा कुमर ॥ नगरासि येईल सत्वर ॥ चिंता न करी सर्वथा ॥ ३७ ॥ मैत्रेय ह्मणे विदुरासी ॥ ऐकूनि नारद
वाक्यासी ॥ पुत्रागमन मानसीं ॥ चिंतन करितो नृप ॥ ३८ ॥ येरीकडे प्रकार घडला ॥ तो पाहिजे श्रवण केला ॥ नारदोपदे-
शा ध्रुवें धरिला ॥ सद्भावें निजचित्तीं ॥ ३९ ॥ त्या वासुदेव मंत्रें करून ॥ ध्रुव करी श्रीहरीचें अर्चन ॥ त्रिरात्र जातां कपित्थ बद-
राशन ॥ करिता जाहला बाळक तो ॥ ४० ॥ एक मास पर्यंत जाण ॥ हा नियम चालें त्याचा पूर्ण ॥ द्वितीय मासीं सहा दिन
जातां तृणपर्ण भक्षितो ॥ ४१ ॥ तृतीय मासीं नवम दिनीं ॥ उदकप्राशन तोषें करूनी ॥ चतुर्थ मासीं द्वादश दिनीं ॥ वायु
भक्षण करीतसे ॥ ४२ ॥ पंचम मासीं महीवरी ॥ उभा एकांगुष्ठावरी ॥ अंतरीं धरूनी श्रीहरी ॥ ब्रह्मानंदीं निमग्न ॥ ४३
ध्रुव रोधी निजश्वास ॥ तेणें त्रास विश्वास ॥ जाहला जाणूनि वैकुंठास ॥ सकळ देव पातले ॥ ४४ ॥ ह्मणती धांव गा श्री-
हरी ॥ प्राणरोध विश्वाचा सत्वरी ॥ होता जाहला ये अवसरीं ॥ हेतु कांहीं नाकळे ॥ ४५ ॥ यास्तव आह्मी शरण ॥ पात-
लों माधवा करा रक्षण ॥ ऐसें ऐकूनियां वचन ॥ परमात्मा बोलतसे ॥ ४६ ॥ माझा ध्रुव बाळभक्त ॥ मधुवनीं तपें नि-
श्चित ॥ तया योगें विश्वांत ॥ प्राणनिरोध जाहला ॥ ४७ ॥ त्यासी देऊनी वरदान ॥ करितों हेतु परिपूर्ण ॥ तुह्मी जावें

परतून॥ आपुलेस्थानीं शीघ्रपैं॥ ४८॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ चतुर्थस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसखारामविरचित अष्टमाध्यायगोडहा॥ ४९॥ ८॥ नवमाध्यायप्रारंभः॥ ॥ मैत्रेयविदुरालागुनी॥ बोलतीपूर्वकथानुसंधानीं ऐकूनिश्रीहरीचीवाणी॥ देवस्वस्थानींपातले॥ १॥ बैसूनिगरुडावरी॥ मधुवनींआलेमुरारी॥ ध्यानींमूर्तीध्रुवांतरीं तीचबाहेरीप्रत्यक्ष॥ २॥ साक्षात्पाहूनिनारायण॥ ध्रुवेंकेलेंसाष्टांगवंदन॥ तेंत्याचेकपोलींमाधवेंआपण॥ शंखस्पर्शकरविला॥ ३॥ तेणेंजाहलेंअगाधज्ञान॥ करूंलागलाप्रेमेंस्तवन॥ हेसर्वभूतात्म्याकरीअवन॥ चरणींशरणदासहा॥ ४॥ हेप्रभोशेषशायी॥ प्रवेशकरूनीमाझेहृदयीं॥ ज्ञानउत्पन्नलवलाहीं॥ शीघ्रकेलेंदयार्णवा॥ ५॥ याप्रकारमाझेवाचेसी॥ तैसेचहस्तपादादिकांसी॥ जोजीववीअहर्निशीं॥ त्याहृषीकेशीतुजनमो॥ ६॥ ध्यानयोगेंभूवरी॥ प्रत्यक्षभेटसीदानवारी॥ हेभगवन्सकलविश्वांतरीं॥ कुतुकेंनांदसीगोविंदा॥ ७॥ तूंनित्यमुक्तपावन॥ शुद्धकूटस्थसनातन॥ आदिपुरुषातुझेंमहिमान॥ ब्रह्मादिकानेणवे॥ ८॥ देवाधिदेवाचक्रपाणी॥ सद्भक्तिअसोतुझेचरणीं॥ दर्शनघडोदिवसरजनीं॥ हेंचिअखंडमागतों॥ ९॥ यापरीकरितांस्तवन॥ प्रसन्नबोलेनारायण॥ ज्याकरितांकेलेंतपाचरण॥ तेंध्रुवपदतुजदिधलें॥ १०॥ अद्यापिज्यापदासिपाहीं॥ कोणीतपेंगेलानाहीं॥ तेंअनुच्छिष्टपदलवलाहीं॥ तुजलागींसमर्पिलें॥ ११॥ अंतींहोईलमोक्षगती॥ प्रस्तुततूंहोशीलभूपती॥ तवपिताकाननाप्रती॥ जाईलआत्मसाधना॥ १२॥ छत्तीससहस्रसंवत्सर॥ राज्यकरिसीलपृथ्वीवर॥ मृगयेजातांतवभ्रातासाचार यक्षहस्तेंमरेलकीं॥ १३॥ तयाचेशोकेंकरून॥ तन्मातापावेलमरण॥ अंतींहोऊनिमाझेंस्मरण॥ अढळपदपावसी॥ १४॥ वरदानदेऊनयापरी॥ अंतर्हितजाहलेश्रीहरी॥ ध्रुवपातलाआपुलेनगरीं॥ महोत्सवतेंजाहला॥ १५

मातापितापौरजन ॥ सामोरे येऊनि आपण ॥ ध्रुवाचा करूनी सन्मान ॥ समारंभें आणिती ॥ १६ ॥ प्रौढ होतां कुमर ॥ उ-
त्तानपाद करूनी विचार ॥ ध्रुवासी बैसवूनि राज्यावर ॥ आपण गेला तपोवनीं ॥ १७ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ च
तुर्थस्कंधीं परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ नवमाध्याय गोड हा ॥ १८ ॥ ९ ॥ ॥ दशमाध्याय प्रारंभः ॥
ध्रुव प्रजापतीची दुहिता ॥ भ्रमी नामें जाहला वरिता ॥ तियेचे उदरीं सुत उभयतां ॥ कल्प वत्सर निपजले ॥ १ ॥ द्वि
तीय वायूची कुमरी ॥ इला नामें सुंदरी ॥ उत्कल पुत्र तियेचे जठरीं ॥ कन्या एक जाहली ॥ २ ॥ उत्तमाचा विवाह कांहीं
मुळींच जाहला नसे पाहीं ॥ मृगयेसी जातां लवलाहीं ॥ यक्षें त्या मारिलें ॥ ३ ॥ त्याचे शोकें करून ॥ तन्माता पावली
मरण ॥ ऐसें ऐकूनि वर्तमान ॥ ध्रुव मानसीं कोपला ॥ ४ ॥ सत्वर बैसूनि रथावरी ॥ धनुष्य बाण घेऊनि करीं ॥ येऊ
निपुण्यजननगरीं ॥ शंखनाद करी तेधवां ॥ ५ ॥ तो शब्द करूनी श्रवण ॥ ससैन्य यक्ष आले धांवून ॥ त्रिंशत्सहस्राधि
क लक्ष जाण ॥ संख्यात यांची हीं असे ॥ ६ ॥ हिमालयीं युद्ध करितां ॥ उपदेवां मारिलें बहुतां ॥ छिन्नभिन्न गात्रें क
रूनी तत्वतां ॥ कित्येकांसी पळवीलें ॥ ७ ॥ नाना शस्त्रें करून ॥ केलें शत्रूंसी ताडन ॥ पुण्यजनीं बाणवृष्टी करून ॥ ध्रु
वरथ आच्छादिला ॥ ८ ॥ तों स्वर्गीं विमानांत ॥ सुरसुरांगना समस्त ॥ पाहून हाहाकारें प्रलपत ॥ ह्मणती काय अन-
र्थ हा ॥ ९ ॥ अहो मनुपुत्रतरणी निश्चित ॥ बुडाला पुण्यजनसागरांत ॥ येरीकडे राक्षस भूत प्रेत ॥ शाकिनी डाकिनी
नाचती ॥ १० ॥ दोन घटिकापर्यंत ॥ शत्रुशरीं रथ आच्छादित ॥ जाहला ध्रुवाचा निश्चित ॥ नंतरी मुक्त होयतो ॥ ११
पुनरपि ध्रुववीर ॥ सज्ज होऊनि रण घोर ॥ करिता जाहला अपार ॥ तें चि पुढती परिसावें ॥ १२ ॥ श्रीमद्भागवतसा
रामृत ॥ चतुर्थस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ दशमाध्याय गोड हा ॥ १३ ॥ १० ॥ एकादशा० प्रा०

मैत्रेयह्मणतीविदुरालागुन॥ध्रुवानेंधनुष्यसज्जकरून॥अस्त्रसोडिलेंनारायण॥तेणेंपुण्यजननष्टहोती॥१॥ बा
णापाठींबाणसोडिले॥तेणेंसूर्यमंडलझांकलें॥कित्येकयक्षव्यंगजाहले॥कित्येकनिमालेसंगरीं॥२॥ नंतरस्वायं
भुवमनुरथांत॥बैसूनिऋषिजनासहित॥हिमालयासीगेलात्वरित॥शांतवनकरावया॥३॥ध्रुवेंपितामहासीप
हून॥केलेंसाष्टांगवंदन॥पुढेंठाकलाहस्तजोडून॥ह्मणेकायआज्ञाजी॥४॥तेव्हांमनुह्मणेध्रुवासी॥क्रोधत्यागी
दोषराशी॥त्वांनिरपराधयक्षांसी॥रणांगणींमारिलें॥५॥हेंआमुचेकुळांत॥जाहलेंबापाअनुचित॥एक्याबां-
धवास्तवसमस्त॥पुण्यजनगांजिले॥६॥त्वांपुण्यजनांचामुळा॥रोषेंबहुतक्षयकेला॥हेवत्साभ्रातृवत्सला॥सा
धूंचामार्गह्मानव्हे॥७॥त्वांसर्वात्माभगवान्॥प्रसन्नकेलासतपेंकरून॥पावलासीध्रुवपदासन॥ऐसेंअसतांकाय
हें॥८॥बानिंद्यकर्मकेलें॥तुजपासूनिकैसेंहेंघडलें॥होणेंजाणेंअखिलभलें॥देवाधीनहेंसारें॥९॥कोणीयासीक
र्माधीन॥ह्मणतीकोणीस्वभावप्रमाण॥कोणीकाळप्रधान॥तोचिभगवानजाणिजे॥१०॥तोरमाधवसर्वेश्वर॥हेंवि
श्वनिर्माणकरीसत्वर॥पालनकरूनीसंहार॥सर्वेंचिकरीबाळका॥११॥ह्मणूनितोचीभगवान्हरी॥अस्थूलरूपींवि
श्वांतरीं॥तस्मात्पुण्यजनांशींनकरीं॥तीव्रविरोधयेधवां॥१२॥तयासीहोऊनिशरण॥वंदूनिमागेंअभयदान॥या
योगेंभगवान्॥प्रसन्नतुजहोईलकीं॥१३॥ऐसामनूनेंध्रुवासी॥उपदेशकेलासौख्यराशी॥नंतरऋषींसहित
स्वालयासी॥स्वायंभुवमनुगेला॥१४॥श्रीमद्भागवतसारामृत॥चतुर्थस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविर-
चित॥एकादशाध्यायगोडहा॥१५॥ ११ ॥ द्वादशाध्यायप्रारंभः ॥मैत्रेयह्मणेविदुराशांत॥ध्रुवदेखूनियक्षांस-
हित॥कुबेरयेऊनिअकस्मात॥भाषणकरिताजाहला॥१॥हेमनुवंशधरमहाराज॥आमुचेंकुळरक्षिलेंआज

इच्छितवरदानसहज ॥ देतोंशीघ्रमागावें ॥ २ ॥ ऐसीऐकूनियांवाणी ॥ ध्रुवबोलेतयेक्षणीं ॥ अखंडभक्तीश्रीहरिचरणीं
असोमाझीहेंद्यावें ॥ ३ ॥ तथास्तुह्मणूनियक्षनाथ ॥ तेथेंचिजाहलाअंतर्हित ॥ पुढतीरथींबैसूनिध्रुवत्वरित ॥ पुरामाजीं
पातला ॥ ४ ॥ पित्रुवतप्रजारक्षण ॥ करूनीयज्ञयागपूर्ण ॥ छत्तीससहस्रवर्षेंआपण ॥ राज्यकरीपृथ्वीचें ॥ ५ ॥ नं
तरराज्यपुत्रासी ॥ देऊनिजाहलातापसी ॥ अनुतापेंबदरीवनासी ॥ जाताजाहलातेधवां ॥ ६ ॥ तेथेंसमाधियोगें
करून ॥ आपुलेठायींआत्मचिंतन ॥ करीतअसतांपुढेंविमान ॥ अकस्मातपातलें ॥ ७ ॥ त्यांतचतुर्भुजपीतांबरधर
विष्णुदूतश्यामसुंदर ॥ पाहूनिध्रुवेंनमस्कार ॥ साष्टांगकेलासद्भावें ॥ ८ ॥ तेव्हांविष्णुदूतह्मणतीध्रुवासी ॥ कल्या
णअसोअखंडतुजसी ॥ आतांचलावेंध्रुवपदासी ॥ ॥ परमानंदभोगावया ॥ ९ ॥ ऐसेंपरिसूनियांवचन ॥ ध्रुव
मानसींश्रीहरीस्मरून ॥ विमानासीप्रदक्षिणाकरून ॥ करीपूजनसद्भावें ॥ १० ॥ मृत्यूच्यामस्तकावर ॥ ध्रुवचरणठे
वूनिसत्वर ॥ विमानींबैसतांदिव्यशरीर ॥ देवासमजाहला ॥ ११ ॥ तेव्हांध्रुवबोलेवचन ॥ मातेच्याउपदेशेंकरून ॥
प्राप्तजाहलेंसजविमान ॥ यास्तवआणातिजलागीं ॥ १२ ॥ ऐसेंऐकूनिदूतह्मणती ॥ माताविमानारूढसुनीती ॥ जा
तआहेगारुमती ॥ अवलोकनकरावें ॥ १३ ॥ मातृभक्तिपाहूनियांपरी ॥ आनंदकेलासुरवरीं ॥ विमानींबैसूनीवर
चेवरी ॥ पुष्पवृष्टिकरितीबहु ॥ १४ ॥ वाद्येंवाजवितीनाना ॥ गंधर्वकरितीतनाना ॥ आनंदजाहलाथोरसाना ॥ ब्रह्मा
दिकांतेंजाणपां ॥ १५ ॥ थैथैअप्सरानाचती ॥ आलापेंगायनकरिती ॥ ध्रुवगेलाध्रुवपदाप्रती ॥ नारदवाक्येंकरू
नियां ॥ १६ ॥ हेंध्रुवचरित्रश्रवणपठन ॥ पर्वणीसाधूनिसंक्रमण ॥ भावेंकरितांपूर्ण ॥ सौख्यहोयसकळांसी ॥
१७ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ चतुर्थस्कंधींपरमपवित्र ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ द्वादशाध्यायगोडहा ॥ १२

१२॥ ॥त्रयोदशाध्यायप्रारंभः॥ ॥मैत्रेयह्मणेविदुरासी॥परिसेंकथासौख्यराशी॥ध्रुवपुत्रजोउत्कलनामेंशीं॥
तयानेंराज्यत्यागिलें॥१॥तोजडांधबधिरवत॥ब्रह्मभूतहोऊनित्योकांत॥भ्रमणकरितांचरित॥कायजाहलें
तेंऐका॥२॥तेव्हांकुळवृद्धप्रधान॥विचारकरितीपूर्ण॥हाध्रुवपुत्रज्येष्ठअसून॥वैराग्येंराज्यकरीना॥३॥प्रजेला
उपद्रवबहुत॥होईलह्मणूनिलरित॥कनिष्ठपुत्रनृपनाथ॥वत्सरनामाअभिषेकिला॥४॥सह्याकुमरजाहलेत्या
सी॥कनिष्ठपुत्रअंगतयासी॥मृत्युकन्यासुनीथेचेकुशीं॥वेनराजाजाहला॥५॥तोदुष्टबुद्धीदुराचारी॥उत्प-
न्नजाहलापृथ्वीवरी॥ऐकूनिविदुरप्रश्नकरी॥तोचिसाग्रअवधारा॥६॥दुष्टव्हावयाराजनंदन॥कायजाहलें
कारण॥याशंकेचेंसमाधान॥ब्रह्मर्षिआपणकरितीपैं॥७॥एकेसमयींअंगनृपती॥अश्वमेधकरीयथास्थि
ती॥यज्ञभागघ्यावयानिश्चिती॥नचियेतीदेवगण॥८॥विप्रह्मणतीनृपनाथा॥याचेंकारणपरिसेंआतां॥
निपुत्रिकाचेगृहींताता॥देवभागनचघेती॥९॥यास्तवपुत्रेष्टिकरून॥पुत्रकरावासंपादन॥नंतरयज्ञभागग्र
हण॥देवकरितीलनिश्चयें॥१०॥ऐकूनिद्विजांचीवाणी॥रावसमजलाआपुलेमनीं॥यथासांगपुत्रेष्टीकरूनी
चक्रपाणीतोषविला॥११॥श्रीहरिकृपेंकरूनीजाण॥अंगरायाजाहलानंदन॥तोदुष्टदुराचारीकुश्चितपूर्ण
मातामहाअनुसरला॥१२॥नंतरमृगयाकरावयासी॥नित्यजातसेकाननासी॥खेळतांप्रजाजनांच्याबाळां-
सी॥आपटुनीमारीस्वभावें॥१३॥ऐसापाहूनिदुष्टकुमर॥दुःखितहोऊनिनरेश्वर॥बोलताजाहलासखेदांत
र॥आतांकायकरावें॥१४॥मीहोतोंनिपुत्रिक॥तोचिबराअसेंचोरव॥परीआतांहोऊनिबाळक॥कार्यकांहीं-
नसाधे॥१५॥उपद्रवप्रजाजनांसी॥नित्यहोतोदिवानिशीं॥हेंदुःखभोगावयामजसी॥कैसेंआणिलेंदैवानें १६

यापेक्षांआतांआपण॥राज्यपरित्यागकरून॥काननींकरावेंगमन॥आत्मसाधनकरावया॥ १७॥ यापरीकरूनीविचा
र॥अर्धरात्रींनरेश्वर॥तपोवनांतसत्वर॥जाताजाहलाअनुतापें॥१८॥श्रीमद्भागवतसारामृत॥चतुर्थस्कंधींपरम
पुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥त्रयोदशाध्यायगोडहा॥१९॥ १३ ॥चतुर्दशाध्यायप्रारंभः ॥ पुत्रदुःखेंकरू
नीनृपती॥पळूनिगेलाअवचिती॥नंतरमंत्रीविचारकरिती॥ह्मणतीकायकरावें॥ १ ॥ सकळमुनीकरितीविचार
प्रजारक्षणार्थनरेश्वर॥स्थापिल्यावांचूनिसदाचार॥योग्यनचालेसर्वथा॥२॥तस्करउपद्रवबहुत॥आतांकरितील-
राज्यांत॥ह्मणूनीप्रजारक्षणार्थ॥वेनराजाकरावा॥३॥मगसुमुहूर्तींसकळमुनी॥वेनासिबैसवितीसिंहासनीं॥प
ट्टाभिषेकहर्षेंकरूनी॥जातेजाहलेनिजाश्रमा॥४॥पुढतीमानवेंद्रवेन॥सर्वराष्ट्रींकरितांभ्रमण॥रथारूढहोऊनिआ
पण॥प्रजाजनअवलोकी॥५॥ग्रामोग्रामींडांगोरा॥पिटवूनिकळवीसमाचारा॥माझ्याराज्यांतवेदाचारा॥करूनयेक
वणेंही॥६॥यज्ञयागादिकर्मपावन॥जपजाप्यहरिकीर्तन॥करितांशिक्षातयालागुन॥करीनजाणानिश्चयें॥७॥विष्णू
चाअंशमीनरपती॥सर्वदेवमदंगींवसती॥देवपितृभागमजप्रती॥अर्पणकरासकळही॥८॥ऐसेंऐकूनिवर्तमान॥सं
कटींपडिलेसमस्तब्राह्मण॥अखिलऋषिजनयेउन॥विनवितीरायातें॥९॥विप्रह्मणतीमेदिनीनाथा॥प्रार्थितोंतुज
हेंपरिसावेंआतां॥आयुष्यलक्ष्मीबळदाता॥धर्मतत्वतांसंरक्षीं॥ १०॥ देवब्राह्मणांचेपायीं॥दृढविश्वासधरूनिरा
हीं॥तेणेंसर्वकल्याणपाहीं॥जगामाजीराजेंद्रा॥११॥रायासद्धर्मेंकरून॥पुत्रवत्प्रजेचेंपालन॥करूनीयोग
यागहवन॥नारायणतोषवावा॥१२॥तयायोगेंनृपराया॥होईलतुझीदिव्यकाया॥कांगाअधर्मकरिशीवांया
मृत्युकारकदुष्टहा॥१३॥राज्यांतविप्रजेवसती॥तेराज्याचेंअभीष्टचिंतिती॥ऐसीऐकूनिविप्रोक्ति॥कायराव

बोलेतयां ॥ १४ ॥ तुह्मी आहांत मूर्ख ब्राह्मण । तुह्मांसि कांहीं नाहीं ज्ञान ॥ मज भासतां पाषाण ॥ शब्द बुद्ध नर पशु ॥ १५
जैशा पतित्यागुनी जारिणी ॥ जारासवें रमती जाउनी ॥ तैसी तुमची दिसे करणी ॥ प्रत्यक्ष आज मज लागीं ॥ १६
अहो मी विष्णु साक्षात ॥ प्रत्यक्ष असतां राज्यांत ॥ नित्य भजतां अन्य दैवत ॥ काय तुह्मां ह्मणावें ॥ १७ ॥ ही बाल
बुद्धि तुमची पूर्ण ॥ ऐसें ऐकतां त्यांची वचन ॥ विप्र हुंकार सोडिती दारुण ॥ तें गतप्राण वेन जाहला ॥ १८ ॥ नृप मरण
पावलियावर ॥ ऋषि करिती विचार ॥ अधिकारि पाहिजे राज्यावर ॥ ह्मणूनि योग साधिती ॥ १९ ॥ वेनांकाचें क
रितां मंथन ॥ कृष्ण पुरुष त्यापासून ॥ ह्रस्वांग महाहनु ह्रस्वचरण ॥ ह्रस्व बाहु निपजला ॥ २० ॥ ताम्र मुखी पुरु
ष जाण ॥ अकल्पित होऊनि उत्पन्न ॥ ह्मणे काय करावें साधन ॥ तैं त्या ब्राह्मण बैसविती ॥ २१ ॥ तयापासून जाह
ले शबर ॥ गिरिकंदरीं करिती संचार ॥ पुरुषरूपें साचार ॥ वेन पाप परिहरिलें ॥ २२ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ च
तुर्थस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सरस्वाराम विरचित ॥ चतुर्दशाध्याय गोड हा ॥ २३ ॥ १४ ॥ पंचदशाध्याय प्रारंभः ॥
मैत्रेय ह्मणे विदुरासी ॥ कथा परिसें सौख्यराशी ॥ विप्र विचार करूनी मानसीं ॥ आणिक उपाय योजिती ॥ १ ॥ वेन
बाहूचें मंथन ॥ पुनरपि करितां ब्राह्मण ॥ स्त्री पुरुष उत्पन्न ॥ तयापासूनी जाहले ॥ २ ॥ तें पाहूनि विप्र ह्मणती ॥ हा
प्रत्यक्ष विष्णुमूर्ती ॥ ही कमलांश निश्चिती ॥ आदिराज सत्य हा ॥ ३ ॥ सकल नृपांमाजी श्रेष्ठ पूर्ण ॥ हा करील पृथ्वी
चें पालन ॥ ह्मणूनी पृथु हें अभिधान ॥ ठेविते जाहले कौतुकें ॥ ४ ॥ त्या स्त्रीतें अर्चि हें नाम ॥ ठेविते जाहले विप्रोत्तम ॥ ऐ
सा उत्सव होतां परम ॥ देवगगनीं आनंदले ॥ ५ ॥ दुंदुभी वाजविती निराळीं ॥ पुष्पवृष्टि करिती अंतराळीं ॥ गंधर्व गाती
हर्षमेळीं ॥ अप्सरा नाचती थैथैत्या ॥ ६ ॥ ब्रह्मदेव येऊनि आपण ॥ पट्टाभिषेचन संपूर्ण ॥ करूनियां विधी करून

राज्यावरीत्याबेसविलें॥ ७॥ पृथुराजबैसतांसिंहासनीं॥ प्रजायेऊनिलागतीचरणीं॥ ब्रह्मादिसुरपाहूनिनयनीं॥ स्नानकरितीरायाचा॥ ८॥ कुबेरेंदिधलेंसिंहासन॥ वरुणेंकेलेंछत्रार्पण॥ प्रभंजनेंचामरव्यजन॥ पुष्पहारदिला वाणीनें॥ ९॥ सन्मुखयेऊनिविधाता॥ सामुद्रिकजाहलापाहता॥ भूपतीचेदक्षिणहस्ता॥ चक्रचरणींकमळें॥ १०॥ हींचिन्हेंअवलोकुन॥ विधाताबोलेहानारायण॥ करावयाभक्तरक्षण॥ जगामाजीअवतरला॥ ११॥ ऋषिजनकरितीस्तवन॥ हेंसर्वकरूनीश्रवण॥ बोलताजाहलापृथुआपण॥ कायबोलताहेंऐसें॥ १२॥ हेजनहोपरिसावाणी॥ माझापराक्रमलोचनीं॥ अद्यापिपाहिलानाहींकोणीं॥ नजाणतांवदताकसें॥ १३॥ ऐसेंस्तवितांअखंडित विडंबनहोईलजगांत॥ ऐसीपरिसूनिमात॥ नंतरबोलतीऋषीते॥ हाभूपतिलोकरक्षक॥ होईललोकपाळांपरीदेख॥ लोकांवरीअनेक॥ उपकारकरीलहा॥ १५॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ चतुर्थस्कंधींपरमपुनीत॥ प्राकृतसरवारामविरचित॥ पंचदशाध्यायगोडहा॥ १६॥ १५॥ षोडशाध्यायप्रारंभः॥ ॥ विदुरासिह्मणेमैत्रेयमुनी॥ पृथुराजसन्मुखपाहूनी॥ गायकजनतयेक्षणीं॥ स्तवनकरितेजाहले॥ १॥ हेमहाराजभूपती॥ आपणसाक्षातविष्णुमूर्ती॥ अर्चिकमळाभगवती॥ दर्शनेंपावनकेलेंआह्मां॥ २॥ आतांआह्मीजेंकरितोंस्तवन॥ तेंसकळऋषिप्रेरणेंकरून॥ पुढतोंअनावृष्टिधाचीरमण॥ करितांआपणरक्षालकीं॥ ३॥ स्वबळेंकरूनीजाणा॥ वर्षवालवेगेंत्याघना॥ सर्वदाप्रजापालना॥ दक्षह्मालसर्वस्वें॥ ४॥ शरणागतांसिअभयोक्ती॥ बोलूनित्यांचीदुःखशांती॥ अमृतदृष्टीकरूनिपुढती॥ क्षणामाजीकरालकीं॥ ५॥ स्वतेजेंकरूनीप्रजेसी॥ संतोषवालसौख्यराशी॥ क्षमागुणेंसमधरणीशीं॥ आल्हादकशशीसारखे॥ ६॥ वायुसमसर्वदेशांत॥ भ्रमणकरालदिवसरात॥ शत्रुदंडूनिलवरित॥ सौख्यद्यालज

नकलें॥७॥अदंड्यासीदंडकांहीं॥दयासागराकरणारनाहीं॥गुणपूर्णाशेषशायी॥कृपादृष्टीअसोंद्या॥८॥स्वपु-
त्रेंअन्यायकरितां॥शिक्षाकरालत्यासिताता॥तुमचीआज्ञाहेसमर्था॥जगत्त्रयींमान्यहो॥९॥समुद्रवलयांकित
पृथ्वीभोगालपरमपुनीत॥परंतुदृढव्रतधरालनिश्चित॥सत्यप्रतिज्ञराजेंद्रा॥१०॥आणिकव्हालब्राह्मणभक्त॥
वृद्धसेवकप्रेमभरित॥दीनवत्सलताठेवालबहुत॥मनामाजीनिश्चयें॥११॥परस्त्रियांचेठायीं॥मातृस्नेहठेवा
लसदाही॥सर्वभूपालतुमचेपायीं॥नम्रहोतीलकरदानें॥१२॥विप्रमानूनिपरमेश्वर॥सेवाकरालमनोहर॥
रथारूढहोऊनिपृथ्वीवर॥भ्रमणकरालकौतुकें॥१३॥उंचसरखोलजेकापर्वत॥तेधनुष्यकोटीनेंलवरित॥चूर्ण
करूनीसमस्त॥महीसमानकरालकीं॥१४॥मेदिनीचेंकरूनीदोहन॥करालओषधींचेंग्रहण॥सर्वप्रजांसीसम-
र्पण॥कुतुकेंकरालकृपानिधी॥१५॥अश्वमेधकरूनीशत॥प्रसिद्धव्हालत्रिजगतांत॥सनकादिकयेऊनिअक-
स्मात॥ब्रह्मोपदेशकरितीलकीं॥१६॥श्रीमद्भागवतसारामृत॥चतुर्थस्कंधींपरमपुनीत॥प्राकृतसखारामविर-
चित॥षोडशाध्यायगोडहा॥१७॥ १६॥ सप्तदशाध्यायप्रारंभः॥ ॥मैत्रेयह्मणेविदुरासी॥यापरीस्तवितीस-
मस्तऋषी॥तेव्हांविप्रगायकमागधांसी॥पृथुराजासंतोषवी॥१॥पुढेंएकदांप्रजाजन॥व्याकुळहोऊनिआपण॥
ह्मणतीराजेंद्राकरीरक्षण॥क्षुधातुरजाहलों॥२॥जठराग्नीहोऊनिप्रदीप्त॥करितोंआह्मांसिअत्यंततप्त॥हेकृपा-
र्णवाकरीशांत॥ह्मणूनिविनतीकरितीबहु॥३॥वाणीऐकूनियापरी॥पृथूबैसूनिरथावरी॥धनुष्यबाणघेऊनि
करीं॥प्रजारक्षणार्थनिघाला॥४॥ह्मणेतीक्ष्णबाणेंकरून॥करीनमेदिनीचेंचूर्ण॥जिनेंगिळिलेंसर्वान्न॥औ-
षधीबीजनिश्चयें॥५॥कोपयुक्तपाहूनिनृपती॥भयभीतजाहलीवसुमती॥गोरूपधरूनिपुढती॥पलायन-

कूरीतदा ॥ ६ ॥ कुंभिनीजायजिकडे ॥ धृतायुधराजातिकडे ॥ तीभयभीतहोऊनिदडे ॥ मगधेयेंविनवीनृपा ॥ ७ ॥ हेरा
जेंद्रापरमउदारा ॥ विक्रमशालीसौख्यागारा ॥ हस्तकींघेऊनितीक्ष्णशरा ॥ व्यर्थमातेंवधितांकसें ॥ ८ ॥ मीनिरपराधी
असतां ॥ कांमातेंउगेंचिमारितां ॥ तुह्मीधर्मज्ञसमर्था ॥ मीअबलाजातीची ॥ ९ ॥ आहेंमीधेनुजाण ॥ माझेंकरावेंसंर-
क्षण ॥ माझेठायींविश्वपूर्ण ॥ वासकरितेंदयाळा ॥ १० ॥ मीनाशपावल्यावरी ॥ विश्वरक्षालकवणेपरी ॥ ऐसेंऐकूनि
तेअवसरीं ॥ राजाबोलेधरणीतें ॥ ११ ॥ केल्याओषधीतुवांभक्षण ॥ त्याकरीसर्वउत्सन्न ॥ नंतरीतुझेंसंरक्षण ॥ हो-
ईलजाणवसुंधरे ॥ १२ ॥ ऐसीऐकूनियांवाणी ॥ कायबोलेकुंभिनी ॥ हेआदिपुरुषाचक्रपाणी ॥ वंदनअसोतवप
दीं ॥ १३ ॥ देवाधिदेवानारायणा ॥ ब्रह्मरूपापतितपावना ॥ त्वांआत्ममायेंकरूनीवामना ॥ विश्वउत्सन्नहेंकेलें १४
जेव्हांहिरण्याक्षबळी ॥ मजलाघेऊनिपाताळीं ॥ गेलातेधवांतूंवनमाळी ॥ येऊनिमजउद्धरिलें ॥ १५ ॥ जगन्ना
थालवलाहें ॥ मजअमृतदृष्टीनें पाहें ॥ मीजीर्णनौकाआहें ॥ बहुतांदिवसांची ॥ १६ ॥ प्रस्तुतपापीजनांचा ॥ भार
मजनसाहेसाचा ॥ ह्मणूनिगोरूपेंभयाचा ॥ मार्गधरूनीपळतेंमी ॥ १७ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ चतुर्थस्कंधीं
परमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ सप्तदशाध्यायगोडहा ॥ १८ ॥ १७ ॥ ॥ अष्टादशाध्यायप्रारंभः ॥ ॥
मैत्रेयह्मणतीभागवता ॥ सावधपरिसेंश्रीहरिगाथा ॥ पृथ्वीनेंपृथुराजास्तविता ॥ कांहींचित्तकळवळलें ॥ १ ॥
नंतररायासिधरणी ॥ बोलतीजाहलीतयेक्षणीं ॥ पुष्पमकरंदवदनीं ॥ ग्रहणकरितोभृंगजेसा ॥ २ ॥ तैसेंमज-
लाप्रसन्नकरून ॥ सर्वरसकरावेग्रहण ॥ दुष्टराजेउपभोगितीपूर्ण ॥ सकलमातेंपोटभरू ॥ ३ ॥ मींओषधीह्मणू
न ॥ यज्ञार्थकेल्यासंरक्षण ॥ त्याओषधींचेंदोहन ॥ करावेंतांनृपश्रेष्ठा ॥ ४ ॥ एकधारकाढणार ॥ एकवासरूंसा-

चार॥मीप्रत्यक्षदुग्धदेणार॥तुझ्यासन्मुखआहेंबा॥५॥ज्याज्याऔषधींचीवासना॥तुजलाअसेललोकरमणा॥
करूनियांवत्सयोजना॥त्यात्यादोहनबाकरी॥६॥ऐसेंऐकूनियांवचन॥मनूतेंवत्सकरून॥स्वहस्तपात्रींपृथ्वि
जाण॥औषधिदोहीसकळिक॥७॥मगदोहितीऋषिजन॥बृहस्पतीसवत्सकरून॥इंद्रियेंपात्रकल्पून॥वेद
मयदुग्धकाढिती॥८॥अमरींइंद्रवत्सकेला॥हेमपात्रींवीर्यतेजबळा॥अमृतासहदोहिलेंतयेवेळां॥परमानंदेंक
रूनियां॥९॥दैत्यप्रल्हादभागवत॥वत्सकरूनीपरमपुनीत॥लोहपात्रींमद्यबहुत॥दोहनकरितीसंतोषें॥१०॥गं
धर्वविश्वावसूसी॥वत्सकल्पूनिहर्षेंशीं॥गंधर्वविद्यापाहुनीसरसी॥दोहनकरितीलेधवां॥११॥पितरींअर्यमा
वत्सकेला॥कव्यान्नदोहिलेंतेवेळां॥सर्वसिद्धहोऊनिगोळा॥वत्सकपिलाकरितीते॥१२॥आकाशपात्रांतजाण॥
सिद्धिदोहितीसंपूर्ण॥पशूनीनंदीवत्सकरून॥तृणदोहनपैंकेलें॥१३॥पर्वतींहिमालयासी॥वत्सकरूनीतेजोरा
शी॥नानाधातुससुदायासी॥दोहनकेलेंसाक्षेपें॥१४॥याप्रकारेंकरून॥पात्रेंभिन्नकल्पून॥सर्ववस्तूंचेंदोहन
यथासांगपैंकेलें॥१५॥पृथुरायानेंपुढती॥स्वधनुष्यकोटीनेंनिश्चिती॥पर्वतफोडनीवसुमती॥सर्वसमानकेली
पैं॥१६॥सर्वभूमंडळसमान॥करिताजाहलापृथुआपण॥जनांसीरहावयास्थान॥कल्पूनिनांवेंदेतया॥१७॥ग्रा
मपुरपट्टन॥दुर्गघोषव्रजपूर्ण॥शिबिरेंखेटखर्वटेंजाण॥नामेंकेलींहीं ऐसीं॥१८॥ऐशायोगेंकरूनी॥प्रजाराह
तीसौख्येंसदनीं॥मैत्रेयह्मणेविदुरालागुनी॥अग्रभागींपरिसावें॥१९॥श्रीमद्भागवतसारामृत॥चतुर्थस्कंधींपर
मपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥अष्टादशाध्यायगोडहा॥२०॥ १८ ॥ एकोनविंशाध्यायप्रारंभः ॥मैत्रेय
विदुरासीह्मणती॥पृथुराजतोजायपुढती॥ब्रह्मावर्तमनुक्षेत्राप्रती॥यज्ञकार्यसाधावया॥ १॥प्राचीसरस्व-

तीतरीं भला ॥ अश्वमेधांसी आरंभ केला ॥ नव्वद यज्ञ होतां घाबरला ॥ पाहूनि वासव अंतरीं ॥ २ ॥ ह्मणे काय जाहलें
ऐसें ॥ आतां मी करावें कैसें ॥ अमिष्ट होऊनि लागलें पिसें ॥ कांहीं न सूचे त्या जला ॥ ३ ॥ मग इंद्रें येऊन ॥ यज्ञवारू ने-
ला चोरून ॥ पुढें काय जाहलें वर्तमान ॥ तें चि परिसा भाविक हो ॥ ४ ॥ तो यज्ञोत्सव पहावया ॥ साक्षात् यज्ञपति स्था
ठाया ॥ पातले सौख्य पावावया ॥ नामें त्यांचीं अवधारा ॥ ५ ॥ शिव ब्रह्मा रमारमण ॥ सनकादिक पिलजाण ॥ द
त्तात्रेय अत्रिनंदन ॥ कौतुक पाहूं पातले ॥ ६ ॥ तेव्हां बोलती अत्रिमुनी ॥ हे पृथुराया परिसें वाणी ॥ अश्व चोरिला
इंद्रें येउनी ॥ पाखंडवेषें पैं आतां ॥ ७ ॥ ऐसी ऐकूनियां मात ॥ पृथुपुत्र महारथ ॥ करीं घेऊनि शरचाप त्वरित ॥ तया
मागें धांवला ॥ ८ ॥ मार्गीं गांठिलें इंद्रासी ॥ पाहूनि बोले कोपेंसी ॥ अरे तस्करा कोठें जाशी ॥ उभा राहें क्षणभरी ९
तैं देवेंद्र अदृश्य जाहला ॥ तेणें यज्ञाश्व आणिला ॥ ह्मणूनि ऋषिजनीं राजपुत्र आला ॥ विजिताश्व नाम दीधलें ॥ १० ॥ पु
न्हा इंद्रें अश्व चोरिला ॥ तया मागें विजिताश्व लागला ॥ गर्जना ऐकतां मनीं घाबरला ॥ कान फाटतो होय ॥ ११ ॥ त्या
पासूनि पुढतीं ॥ तेणें अश्व आणिला मागुती ॥ जीं जीं रूपें शचीपती ॥ ग्रहण करी कपटें बहु ॥ १२ ॥ त्या त्या रूपापासून
अश्वहरी राजनंदन ॥ तींच पाखंडरूपें असून ॥ प्रसिद्ध आहेत पृथ्वीवरी ॥ १३ ॥ शेवटीं अध्वर्यूनें भला ॥ मनामाजी
निश्चय केला ॥ होमकुंडीं इंद्राला ॥ दहन करावें सत्वर ॥ १४ ॥ त्या उद्देशें मंत्र ह्मणतां ॥ तेथें पातला विधाता ॥ पृथूसी जा
हला बोलता ॥ राया काय करिसी हें ॥ १५ ॥ आतां यज्ञ करी समास ॥ तूं मोक्षधर्म जाणसी समस्त ॥ पशू वांचुनी यज्ञांत ॥
अन्य वध असेना ॥ १६ ॥ इंद्र आहे विष्णूचा अंश ॥ ह्मणूनि अयोग्य वधास ॥ तूं धर्मवेत्ता हें काय करितोस ॥ धर्मरक्ष
णार्थ प्रगटूनी ॥ १७ ॥ आतां पाखंडमार्ग बहुत ॥ जाहले त्यांचें छेदन त्वरित ॥ येथूनि करावें हें माझें मत ॥ पृथो तुज नि

वेदिलें ॥ १८ ॥ विदुरासि ह्मणे मैत्रेयमुनी ॥ पृथूनें ब्रह्मवाक्य परिसूनी ॥ अवभृथस्नान करूनी ॥ यज्ञ समाप्त पैं केला ॥ १९ ॥ इंद्रासि मित्रता इच्छुन ॥ ब्राह्मणांसि केलें दक्षिणादान ॥ पृथूसी आशीर्वाद देऊन ॥ विप्र गेले निजाश्रमा ॥ २० ॥ ब्रह्मदेव यज्ञफळ ॥ पृथूसी देऊनि सकळ ॥ अंतर्धान तात्काळ ॥ पावता जाहला परमेष्ठी ॥ २१ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ चतुर्थस्कंधीं परमपुनीत ॥ प्राकृत सखारामविरचित ॥ एकोनविंशाध्याय गोड हा ॥ २२ ॥ १९ ॥ विंशाध्याय प्रारंभः ॥ ॥ मैत्रेय ह्मणती विदुरासी ॥ तें इंद्र संतोषला मानसीं ॥ मग श्रीविष्णु यज्ञोत्सवासी ॥ पाहूनि पृथूसी बोलती ॥ १ ॥ श्यामसुंदर वनमाळी ॥ कस्तूरी तिलक जयाचे भाळीं ॥ मस्तकीं मयूरपत्रावळी ॥ पीनपट कटीं कशियेला ॥ २ ॥ शंखचक्रगदा हातीं ॥ वक्षस्थळीं कौस्तुभदीप्ती ॥ मकरकुंडलें जयाशोभती ॥ नानाभरणीं भूषित ॥ ३ ॥ ऐसा भगवान् प्रसन्नवदन ॥ शक्रासह मनमोहन ॥ सन्मुख पृथुराजा लक्षून ॥ बोलता जाहला परमात्मा ॥ ४ ॥ हे सार्वभौम नृपनाथा ॥ मनुष्यदेह प्राप्त होतां ॥ पात्रापात्र विचार करितां ॥ स्वार्थ परमार्थ साधतो ॥ ५ ॥ इंद्रें तुझा अश्व चोरिला ॥ ह्मणूनि द्वेष मनीं धरिला ॥ होमकुंडीं तयाला ॥ घालावया टपलासि तूं ॥ ६ ॥ हे प्राज्ञा देहाभिमानें ॥ भूतद्रोह संपादणें ॥ हें योग्य नसे सूज्ञपणें ॥ विचारीं निजमानसीं ॥ ७ ॥ मायोत्पन्न शरीरीं ॥ गृहीं कीं धनपुत्रावरी ॥ कवण प्राज्ञ ममता धरी ॥ आत्मतत्त्व जाणता ॥ ८ ॥ राजानें प्रजापालन ॥ पुत्रवत् करावें आपण ॥ स्वधर्में करून माझें पूजन ॥ करितां संतुष्ट मी होतों ॥ ९ ॥ धान्य उत्पन्न होईल राज्यांत ॥ त्याचा षष्ठभाग पुनीत ॥ ग्रहण करावा नेमस्त ॥ सानवृद्धं जाणपां ॥ १० ॥ याहूनि घेतां अधिक ॥ पाप होय राया सिद्ध देख ॥ अंतीं नरककुंभपाकादिक ॥ प्राप्त होतो निश्चयें ॥ ११ ॥ ऐसा उपदेश करून ॥ बोलता आणखी भगवान ॥ अल्पकाळें सनकादिक येऊन ॥ आत्मज्ञान तुज कथितील ॥ १२ ॥ जाहलों राया मी

ब्राह्मणांदंडअसेना ॥ ८ ॥ विप्रआणिवैष्णवावांचून ॥ आणिकांना हीसंप्रमापूर्ण ॥ राज्यकरीतोपेंकरून ॥ धर्मसंमतेंजा
णता ॥ ९ ॥ नंतरकितीएक दिवशीं ॥ पृथुआरंभीमहासत्रासी ॥ मानवआणिदेवऋषी ॥ पहावयातेथेंपातले ॥ १० ॥ त्यासमा
जांतभाषण ॥ करिताजाहलापृथुआपण ॥ अहोसभ्यहोपरिसावचन ॥ जेंनिवेदनकरितोंमी ॥ ११ ॥ प्रजांसीरक्षाव-
याभलें ॥ नृपासिविधीनेंनिर्मिलें ॥ तयानेंप्रजेसीयोग्यशासिलें ॥ तरीलाधेउत्तमगती ॥ १२ ॥ कर्त्ताशास्ताअनुमो
दन ॥ देताजोकाअसेलजन ॥ यात्रिवर्गासीफळसमान ॥ पापपुण्याचेंजाणिजे ॥ १३ ॥ यास्तवस्वकर्मेश्रीहरी ॥
आराधीतोनयेसंसारीं ॥ भगवद्भजनामूलनिर्धारीं ॥ ब्राह्मणवेदजाणते ॥ १४ ॥ ह्मणूनिविप्रांचेंपदरज ॥ कि-
रीटेंवंद्यसदामज ॥ ब्रह्मकुलआणिहरीसहज ॥ तुष्टअसोमजवरी ॥ १५ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ चतुर्थस्कंध
परमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ एकविंशाध्यायगोडहा ॥ १६ ॥ २१ ॥ द्वाविंशाध्यायप्रारंभः ॥
मैत्रेयह्मणेएकेदिवशीं ॥ ब्रह्मोपदेशकरावयासी ॥ पातलेसनकादिकऋषी ॥ पृथुरायासीजाणपा ॥ १ ॥ सभे-
तयेतांचमुनिवर ॥ पृथूनेंकेलानमस्कार ॥ षोडशोपचारींसत्कार ॥ करूनीआसनींबैसविलें ॥ २ ॥ नंतरहस्तजोडु-
नीनृपती ॥ सन्मुखउभाराहिलापुढतीं ॥ ह्मणेमाझाभाग्योदयअती ॥ ह्मणूनिदर्शनजाहलें ॥ ३ ॥ ऐकूनिपृथूचें
वचन ॥ प्रसन्नहोऊनिब्राह्मण ॥ देतेजाहलेआशीर्वचन ॥ रायाकारणेंसद्भावें ॥ ४ ॥ नृपह्मणेजेणेंहोयकल्याण ॥
तेंमजलासांगावेंतत्त्वज्ञान ॥ ऐसेंऐकूनियांवचन ॥ सनकादिकसांगती ॥ ५ ॥ हेराजापरिसेंवाणी ॥ साधूंचासमाग
मकरूनी ॥ हरिकथात्यांजकडुनी ॥ भक्तिभावेंऐकावीं ॥ ६ ॥ तेसांगतीलचरित्रेंपावन ॥ तींसद्भावेंकरावीं श्रवण ॥ श्र
वणानंतरमनन ॥ एकाग्रचित्तेंकरावें ॥ ७ ॥ संतसमागमासारिखा ॥ अन्यमोक्षोपायनाहींदेखा ॥ श्रद्धापूर्वकभावि

प्रसन्न॥मागूनिघेईंवरदान॥तेव्हांपृथुबोलेहेभगवन्॥विभवसर्वनश्वरहें॥१३॥हेंचिवरदानद्यावें॥साधुमुखा
पासूनिऐकावें॥नवगुणमाहात्म्यभावें॥दिवसयामिनीनिश्चयें॥१४॥तुझेंयशकरावयाश्रवण॥देईंमातेंदशसहस्र
श्रवण॥सर्वदाकमलेसमान॥सेवाकरीनचरणांची॥१५॥जैसेंबाळकाचेंहित॥योग्यकरूंजाणेतात॥तैसेंमजदेऊ-
निपुनीत॥करायेधवांरमापती॥१६॥आदिराजाचेंस्तवन॥ऐकूनिबोलेनारायण॥मद्भक्तितुजअसोपूर्ण॥भव-
बंधनतुटेजीणें॥१७॥मदाज्ञेंकरूनिसाचार॥प्रजेचाघेईंसमाचार॥तेणेंपावसीइहपर॥सदाचरणेंवर्ततां॥१८॥ऐ
सेबोलूनियांबोल॥अंतर्हिततमालश्यामल॥होताजाहलातात्काळ॥तैंविप्रसभाजननिघाले॥१९॥निरोपघेऊ-
निसत्वर॥स्वपुरानिघालेनारीनर॥पृथुराजबैसूनिरथावर॥नगरामाजीपातला॥२०॥श्रीमद्भागवतसारामृत
चतुर्थस्कंधींपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥विंशतितमाध्यायगोडहा॥२१॥ २०॥ एकविंशाध्याय०
मैत्रेयह्मणेतेअवसरीं॥वैष्णवाहरिकथाअवधारी॥पृथुराजसिंहासनावरी॥परमानंदेंबैसला॥१॥तेव्हांप्रजा
जनांनींफार॥महोत्सवघरोघर॥केलात्याचाप्रकार॥कोठवरीवर्णावा॥२॥चांदव्यासीमौक्तिकझालरी॥सु
वर्णकलशपूर्णद्वारीं॥कर्दळीस्तंभपरोपरी॥वसनगुढियासुंदर॥३॥पंचपल्लवांचींतोरणें॥मार्गसंमार्जिला
चंदनें॥अगरुहरिद्राकुंकुमानें॥सुशोभितदिसेचहूंकडे॥४॥पुष्पाक्षतादीपघेऊन॥नागरिकस्त्रियाशृंगार
करून॥उभ्याअसतीसुलक्षण॥शंखदुंदुभीवाजविती॥५॥पणवमृदंगगोमुख॥वाद्येंवाजतीअनेक॥
पथींचेतांगातीगायक॥रागरागिण्यांसहितपैं॥६॥वारवधूनृत्यकरिती॥ऐशासमारंभेंनिघती॥गंगाय-
मुनामध्यप्रांतीं॥ब्रह्मावर्तीनृपविराजे॥७॥मनुक्षेत्रींराहूनिभूपति॥सप्तद्वीपावसुमती॥पालनकरितांसुमती॥

का ॥ भागवतधर्मतारक होय ॥ ८ ॥ यास्तव भागवतधर्माचें ॥ आचरण करूनी साचें ॥ सुखीं नाम पुरुषोत्तमाचें ॥ दिव
सरजनीं स्मरावें ॥ ९ ॥ अध्यात्मविद्येस्तव जाण ॥ करावें योगेश्वराचें सेवन ॥ हिंसा करूं नये आपण ॥ परमहंसधर्म
आचरावे ॥ १० ॥ ज्ञानभक्तिवैराग्ययुक्त ॥ हें चि आत्मसाधन पुनीत ॥ याहूनि अन्यत्रें लोक्यांत ॥ कांहीं नाहीं निश्चयें
११ ॥ ज्या भगवंताचे ठायीं ॥ संपूर्ण विश्व राहतें पाहीं ॥ त्या वासुदेवाचें लवलाहीं ॥ भजन करावें सोज्वळ ॥ १२ ॥ ऐसें
ऐकूनि यांचें वचन ॥ भूपति होऊनि प्रसन्न ॥ करिता जाहला भावें पूजन ॥ प्रेमयुक्त तेधवां ॥ १३ ॥ ब्रह्मज्ञानश्रवणें म
न धालें ॥ सनकादिक स्वर्गा गेले ॥ रायासि पंच पुत्र जाहले ॥ नामें त्यांचीं परिसीजे ॥ १४ ॥ विजिताश्व धूम्रकेत ॥ ह
र्यक्ष द्रविण चतुर्थ ॥ वृकनामा हे पंचसुत ॥ रूपेंगुणें आगळे ॥ १५ ॥ लोकपाळांसमान ॥ विभव जयांचें भिन्न भिन्न ॥
ऐसे पृथुरायाचे पांच नंदन ॥ शोभते जाहले महीवरी ॥ १६ ॥ पृथुराज प्रजांचें धन ॥ घेऊनि समयीं करी विसर्जन ॥
सूर्यापरी जो तेजें हुताशन ॥ वासवापरी दुर्जय ॥ १७ ॥ क्षमाशील पृथ्वीपरी ॥ गंभीर तें सागराची सरी ॥ धैर्यासी जें सा-
मेरुगिरि ॥ शिक्षेसी यम जाणिजे ॥ १८ ॥ कुबेरासमान धनी ॥ मन्मथासम सौंदर्यखाणी ॥ इत्यादि विशिष्टगुणी ॥
त्रिजगामाजी विराजे ॥ १९ ॥ साधूंचें श्रवणपावन ॥ करावयासी जयाचे सद्गुण ॥ दाशरथी रामासमान ॥ अखंड ज
गीं विलसती ॥ २० ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ चतुर्थस्कंधीं परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ द्वाविंशाध्याय
गोड हा ॥ २१ ॥ २२ ॥ अथ त्रयोविंशाध्याय प्रारंभः ॥ ॥ मैत्रेय विदुरासी ह्मणती ॥ वृद्धावस्था पाहूनि नृपती ॥ रा
ज्य देऊनि पुत्रांप्रती ॥ तपोवनासी निघाला ॥ १ ॥ तेव्हां येऊनि प्रजाजन ॥ विरहें करिती रुदन ॥ रायें न यांचें सांत्वन ॥
यथासांग पैं केलें ॥ २ ॥ सगस्त्रियेसहित ॥ पृथुभूपती काननांत ॥ जाऊनि उग्रतप पार्थ ॥ साधन करिता जाहला ॥ ३

कांहीं दिवस शुष्क पर्णं ॥ भक्षूनि राहे आपण ॥ कांहीं दिवस उदकपान ॥ करिता जाहला अनुतापें ॥ ४ ॥ ग्रीष्मऋतु माजी जाण ॥ तीक्ष्ण पंचाग्निसाधन ॥ वर्षामाजी पर्जन्यसहन ॥ करिती कष्टें उभयतां ॥ ५ ॥ शिशिरऋतूचे ठायीं ॥ आ-कंठ उदकांत लवलाही ॥ उभा राहूनि विरक्त हृदयीं ॥ सनकोपदेश चिंतितो ॥ ६ ॥ ऐसें तप करितां दारुण ॥ शेवटीं प्राणायामसाधुन ॥ आत्मा ब्रह्मांडीं नेऊन ॥ प्राणोत्क्रमण करी पृथु ॥ ७ ॥ तेव्हां अर्चि नामें त्याची कांता ॥ पाहूनि पतीची अवस्था ॥ किंचित् शोकाकुलत्वतां ॥ होऊनि धैर्य ऐसें वरली ॥ ८ ॥ तिणें काष्ठें एकत्र करून ॥ चिता रचिली स्वयें आपण ॥ पृथुदेह उपरी ठेवून ॥ ध्यान केलें चरणाचें ॥ ९ ॥ स्नान करूनि गंगेंत ॥ साध्वी होऊनि पुनीत ॥ विमानस्थ देवांसि वंदी निश्चित ॥ अत्यादरें करूनियां ॥ १० ॥ अंतरीं करी पतीचें ध्यान ॥ तीन प्रदक्षिणा चितेसी करून ॥ माजी चेतवि हुताशन ॥ परमधैर्यें सती ते ॥ ११ ॥ नंतर करूनी तांतडी ॥ चितेमाजी घाली उडी ॥ देवांगना म्हणती प्रौढी ॥ का सविलक्षण साध्वीची ॥ १२ ॥ देव पुष्पवृष्टी करून ॥ वाद्यें वाजवूनि गायन ॥ करिती तोषें आपण ॥ महानंद प्रवर्तला ॥ १३ ॥ देव म्हणती धन्य धन्य ॥ अहो पतिव्रता सगुण ॥ पतिसह विमानीं बैसून ॥ वैकुंठीं जातें हे पहा ॥ १४ ॥ हें पृथुराचें आख्यान ॥ जो करील श्रवणपठन ॥ तयाचें अघटित महिमान ॥ वाढे पूर्ण हरिकृपें ॥ १५ ॥ होऊनियां पापसंहार ॥ आयुष्य मोक्ष धर्माचार ॥ पुत्र कास पांडित्य सुंदर ॥ पूर्ण लाधे भजकांतें ॥ १६ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ चतुर्थ स्कंधीं परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ त्रयोविंशाध्याय गोड हा ॥ १७ ॥ २३ ॥ चतुर्विंशाध्याय प्रा० मैत्रेय म्हणती विदुरासी ॥ पृथुपुत्र जो यशोराशी ॥ विजिताश्व तेणें भ्रात्यांसी ॥ चार दिशा दीधल्या ॥ १ ॥ पूर्वदिशा हर्यक्षासी ॥ दक्षिण दिधली धूम्रकेशासी ॥ पश्चिम दिशा वृकासी ॥ द्रविणासी उत्तर ॥ २ ॥ तयाचा पुत्र हविर्धान ॥ तो राजवृत्ती

स्यजीदारुण॥बर्हिषदगयश:कृष्णा॥सत्यजितव्रतसुतत्याचे॥३॥तयांषट्पुत्रांमाजीनिश्चित॥बर्हिषदनामेंजोविख्या
त॥तयानेंयज्ञकरितांसमस्त॥पृथ्वीदर्भीआच्छादिली॥४॥ह्मणूनित्याप्राचीनबर्हि॥सर्वलोकह्मणतीपाहीं॥शत-
द्रुतीकांतेचेठायीं॥दशपुत्रांतोनिपजवी॥५॥रूपेंगुणेंवयेंसमान॥ह्मणूनिप्रचेतसहें एकअभिधान॥ठेवूनिआ
ज्ञापीप्रजाउत्पन्न॥करामोदेंपुत्रहो॥६॥ऐसेंऐकूनिउत्तर॥कायबोलतीकुमर॥आह्मींतपकरूनीसुंदर॥प्रजोत
पादनकरूंपुढें॥७॥पित्राज्ञाकरूनीग्रहण॥पूर्वदिशेसीप्रचेतेगमन॥करितेजाहलेनलगतांक्षण॥तंवसरोवर दे-
खती॥८॥सिंधुसमानस्वच्छोदक॥कमळशोभादिसेचोख॥जेथेंहंससारसपक्षीदेख॥मयूरशब्दकरितीबहू॥९
उन्मत्तहोऊनिभ्रमर॥गुंजारवकरितीमधुर॥सुरम्यपाहूनिसरोवर॥माजीप्रवेशतेकरिती॥१०॥तोंअकस्मातउ
मारमण॥प्रगटजाहलेउदकांतून॥सदाशिवत्रिलोचन॥प्रसन्नवदनपरमात्मा॥११॥प्रचेतेकरितीनमस्कार॥म
गबोलेसर्वेश्वर॥हेबर्हिषत्पुत्रानोमनोहर॥वचनपरिसापैंमाझें॥१२॥तुमचीवासनाजाणून॥अनुग्रहकरावया
पूर्ण॥प्रगटजाहलोंजळांतून॥सदयहृदयेंनिश्चयें॥१३॥जेवासुदेवाचेभक्त॥तेमजप्रियअत्यंत॥तुह्मीभग-
वंतीरत॥ह्मणूनिसौख्यमजबहू॥१४॥रुद्रगीततुह्मांसी॥कथनकरितोंसौख्यराशी॥त्याचेंमननकरूनीमानसीं
महाविष्णुआराधा॥१५॥हेभगवन्परमानंदा॥नित्यस्थितआनंदकंदा॥पंकजनाभागोविंदा॥वासुदेवातुजन
मो॥१६॥प्रद्युम्नअनिरुद्धसंकर्षणा॥सोमसूर्याग्नित्रिलोचना॥सोमजळपृथ्वीगगना॥प्रभंजनातुजनमो॥१७
रुद्रब्रह्मरूपाश्रीहरी॥कृपासागरामुरारी॥दासाचातूंपूर्णकैवारी॥शीघ्रपावेंमुकुंदा॥१८॥ऐसेंसांगूनिरुद्रगी
त॥बोलताजाहलाविश्वनाथ॥एकांतीविष्णुजपपुनीत॥करितांहोयकार्यभाग॥१९॥यासाधनेंमनोरथ॥पू

र्णहोतील समस्त ॥ श्रवणपठनें प्राणी मुक्त ॥ शीघ्र होतील निश्चयें ॥ २० ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ चतुर्थस्कंध परमपु
नीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ चतुर्विंशाध्याय गोड हा ॥ २१ ॥ २४ ॥ पञ्चविंशाध्यायप्रारंभः ॥ मैत्रेय ह्मणे
विदुरासी ॥ कथा परिसें सौख्यराशी ॥ रुद्रगीत सांगूनि प्रचेत्यांसी ॥ शंकर गुप्त जाहले ॥ १ ॥ मग ते प्रचेते सहोदर ॥
रुद्रगीत जपती मनोहर ॥ जळांत दश सहस्र वत्सर ॥ तप करिती अनुतापें ॥ २ ॥ आतां तत्पित्याचा वृत्तांत ॥ विदुरा
सांगतों समस्त ॥ सावध ऐकें देऊनि चित्त ॥ पुराण कथा पावन ॥ ३ ॥ प्राचीनबर्हि कर्मासक्त ॥ जाहला पाहूनि बहुत ॥
सदयहृदय ब्रह्मसुत ॥ नारद बोधार्थ पातला ॥ ४ ॥ मुनि ह्मणे मेदिनीनाथा ॥ कर्में करूनि मोक्ष होता ॥ नलगे धवा
विचार पाहतां ॥ काय सांगूं तुजलागीं ॥ ५ ॥ ऐकूनि बोले नरनाथ ॥ कर्मठ मी न जाणें किंचित ॥ मज सांगा ज्ञान पुनीत
मोक्षकारक ये धवां ॥ ६ ॥ तें नारद बोले मात ॥ लक्षावधि पशु यज्ञांत ॥ आणूनि केला जयांचा घात ॥ ते तुज मारूं
पाहती ॥ ७ ॥ एतद्विषयीं चरित ॥ परिसें राया परमाद्भुत ॥ जीव बुद्धि दंपती चेष्टित ॥ सांगतों निश्चित तुजलागीं ८
तें पारोक्ष्यें करून ॥ मानवेंद्रा करावें श्रवण ॥ भूपती नामें पुरंजन ॥ असता जाहला महीवरी ॥ ९ ॥ अविज्ञात नामें
सखा ॥ ज्याचा असे पाठिराखा ॥ राजधानी पहावया देखा ॥ पृथ्वीवरी तो भ्रमतसे ॥ १० ॥ एकदां भूतळ भ्रमतां
हिमवान्पर्वतीं अवचितां ॥ दक्षिण भागींतलतां ॥ येतां नगर देखेपें ॥ ११ ॥ तें नगर नवद्वारयुक्त ॥ त्याचे बाहेर उ-
पवनांत ॥ उत्तम स्त्री सखीजनासहित ॥ अकस्मात अवलोकिली ॥ १२ ॥ पंचशीर्ष अहिपती ॥ रक्षक भ्रमे सभों
वतीं ॥ एकादश महाभट निश्चितीं ॥ संगतीं असती जयेच्या ॥ १३ ॥ उत्कृष्टरूपा मनोहर ॥ मृगाक्षी पाहूनि समोर
पुरंजन होऊनि कामातुर ॥ बोलता जाहला ते धवां ॥ १४ ॥ हे कमलाक्षी परिसें वचन ॥ तूं कवणाची आहेस कव-

ण॥रमाकीं उमाशारदापूर्ण॥मजनिवेदनकरावें॥ १५ ॥तुला पाठविलें मन्मथें॥मजकरितां सुंदरी येथें॥ कृपाक-
रूनीस्नेहातें ॥संपादन करीसुखें॥ १६ ॥मीभेदिलोंकंदर्पबाणीं॥हेशुभांगेलावण्यखाणी॥अनुकंपाकरीसु-
जभाषिणी॥कायआतांविनवावें॥ १७ ॥पुरंजनयाचितांयापरी॥ मोहितहोऊनिसुंदरी॥बोलतीजाहली
तेअवसरीं॥मनमोहकवाक्यहें ॥ १८ ॥ हेपुरुषपञ्चानन ॥मींमान्यकेलेंतुझें वचन ॥ वसावयानिर्मिलें
स्थान ॥पट्टणासन्निधमनोरम ॥ १९ ॥हेसखेसखियाअसती॥पंचफणांचाअहिपती॥पुररक्षणार्थदि-
वसराती॥सावधअसेसर्वदा॥ २० ॥हेनृपरायातुझेंआगमन ॥ येथेंउत्तमजाहलेंह्मणून॥इच्छितकामनाक-
रीपूर्ण॥अडथळानाहींकवणाचा ॥ २१ ॥माझ्यासहितनगरांत॥आतांचलावेंतुह्मीलरित॥भोगभोगा-
वेयथोचित॥मनोल्लासेंकरूनियां॥२२॥नारदह्मणेरायाभलें॥ नगरींदांपत्यप्रवेशलें॥तेंसंवत्सरशतरम-
लें॥पुढतीचरित्रअवधारीं॥ २३॥पुरंजनाचीनगररचना॥सांगपरिसेंलोकरमणा॥सप्तद्वारेंउपरीजाणा
त्यांतपांचपूर्वेस॥ २४ ॥दक्षिणोत्तरेंसीदोनअसती॥अधीद्वारद्वयअसेनिश्चिती॥उभयद्वारींसुगंधघे-
ती॥एकद्वारेंभक्षण॥२५॥दक्षिणोत्तरासीपंचाळ॥देशबोलतीसकळ॥एकेंअधोद्वारेंसौख्यसोज्वळ॥ग्रहणकरी
रतीचें॥२६॥एक्याद्वारेंकरून॥सदाहोतेंमलविसर्जन॥ऐसेंसुंदरतेंपत्तन॥पाहूनिपुरंजनरंजला॥२७॥चारनगर
सेवकजया॥अंधसंज्ञकअसतातया॥पुरीयापरीलिप्तराया॥पुरंजनजाहला॥२८॥कर्मासक्तहोऊनिबहुत॥शेव-
टींजाहलाउन्मत्त॥मदिरापानकरीत॥कांतेसवेंस्वच्छंदें॥२९॥स्नानकरितीजसवें॥वस्त्रग्रहणकरीनवें॥रडतां
रडेहसतांबरवें॥आपणहंसेखदखदां॥३०॥तीबोलेतरीआपणबोले॥तीचालेतरीचाले॥क्रीडामृगवनकरीत

वनरोमशकीं॥११॥आस्फ़रीदत्तात्रेयमुनी॥कींमहाविष्णुप्रगटलामेदिनी॥पतिततरतीतुमचेदर्शनीं॥आह्मांत सिद्धकवणहो॥१२॥पतंजलीकींवेदशिरा॥बोद्धकिंवापंचशिरा॥हिरण्यनाभकौशल्यकींदातारा॥कृपाकरूनीसांगावें॥१३॥ऋतदेवऋतध्वज॥आह्मांतकवणबोलासमज॥ग्राम्यपशुभवकूपींपडतीसहज॥त्यांचेउद्धारार्थभ्रमतसा॥१४॥ऐसेंऐकूनिभाषण॥अंगिराबोलेआपण॥तुझेंकरावयासमाधान॥नारदअंगिरापातलों॥१५॥रायापुत्रविरहेंकरूनिदेख॥यासमयींकरिसीमहाशोक॥तुजपुत्रसुखानुभवचोख॥आलायापरीसर्वही॥१६॥कांताकुमरकुमरी॥कोशभांडाररम्यमंदिरीं॥दासदासीपरोपरी॥दुःखकारकहेंसर्व॥१७॥अनेकपरीचीसंपत्ती॥रायाजीकांडोळांदिसती॥शेवटींतियेचीहोयमाती॥स्वप्नप्रायप्रपंचहा॥१८॥तस्मात्राजामनोहर॥आत्मानात्मविचार॥करितांहाभवसागर॥तरूनिजाशीलनिश्चयें॥१९॥नारदह्मणेचित्रकेतूसी॥मंत्रोपनिषद्विद्येसी॥बोधितांतेणेंसातवेदिवसीं॥शेषअनंतदेखसीतूं॥२०॥जपतांमंत्रसुंदर॥साक्षातभेटेलपरमेश्वर॥जयाचेपादमूळींविधिहर॥नम्रतत्परतूंहोसी॥२१॥श्रीमद्भागवतसारामृत॥षष्ठस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥पंचदशाध्यायगोडहा॥२२॥ १५ ॥षोडशाध्यायप्रारंभः॥ श्रीशुकह्मणेभागवता॥ परिसेंपुरातनगाथा॥राजपुत्राच्यापाहूनिप्रेता॥सन्निधनारदबोलती॥१॥हेजीवात्म्यापरिसेंवचन॥आतांहोईंसावधान॥तुझेमातापितरशोकदारुण॥करितीतयांशांतवी॥२॥सर्वांसीबोलनितोषवावें॥नृपासनींबैसूनिभावें॥पितृराज्यसुखेंकरावें॥ह्मणूनिहस्तफिरविला॥३॥मुनिस्पर्शहोतांसोज्वेळ॥उठूनिबैसलाराजबाळ॥बोलताजाहलावचनमंजुळ॥तेंचिपारसेंराजेंद्रा॥४॥अहोजननीहेताता॥व्यर्थकांसियाशोककरिता॥अनेकांचेउ-

दरींसमर्था ॥ जन्मेंसीं अनेक घेतलीं ॥ ५ ॥ शत्रुमित्र तस्मात् ॥ सर्वांचे सर्व होतात ॥ दैवयोगें करूनी प्राप्त ॥ जन्ममरणें हीं होती ॥ ६ ॥ माझा तुमचा संबंध ॥ नसे हा केवळ मायाबंध ॥ जाणूनि न करावा खेद ॥ ऐसें वदूनि देह त्यजी ॥ ७ ॥ ऐसी परिसतां चिमात ॥ राजशोक झाला त्वरांत ॥ प्रेतदशा जाहली प्राप्त ॥ तया राजबालका ॥ ८ ॥ तेव्हां भूपति आपण उत्तरक्रिया पुत्राची पूर्ण ॥ करिता जाहला दक्षिणा देऊन ॥ ब्राह्मणांसी विधानें ॥ ९ ॥ बालहत्यापरिहारार्थ ॥ राजकांता करिती व्रत ॥ कालिंदीतटाकीं पुनीत ॥ पुढती काय जाहलें ॥ १० ॥ राजा चित्रकेतु येऊन ॥ नारदासी करी साष्टांग वंदन ॥ ह्मणे मंत्रोपदेश पावन ॥ सदय हृदयें करावा ॥ ११ ॥ या परी परिसूनि वाणी ॥ बोधिते जाहले नारदमुनी ॥ रायासद्भाव धरूनी मनीं ॥ मंत्र ऐसा जपावा ॥ १२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नमस्तुभ्यं भगवते वासुदेवाय धीमहि ॥ प्रद्युम्नायानिरुद्धाय नमः संकर्षणाय च ॥ १८ ॥ नमो विज्ञानमात्राय परमानंदमूर्तये ॥ आत्मारामाय शांताय निवृत्तद्वैतदृष्टये ॥ १९ ॥ टीका ॥ इत्यादि वाक्यें करून ॥ भावें करावें स्तवन ॥ सप्तरात्र पुरश्चरण ॥ होतां अनंत प्रगटेल ॥ १३ ॥ ऐसें उपदेशूनि सत्वर मुनी ॥ अंगिरासवें घेऊनी ॥ ब्रह्मलोकास गेला तैं मनीं ॥ निश्चय धरी भूपती ॥ १४ ॥ तपाचरण भलें ॥ करितां शेषाचें दर्शन जाहलें ॥ तें रूप तेजें आगळें ॥ वर्णावया अशक्य ॥ १५ ॥ दृष्टीं पाहूनि भगवंत ॥ स्तवन करी चित्रकेत ॥ आपुले ठायीं बहुत ॥ समाधान पावला ॥ १६ ॥ रायासी श्रीहरि ह्मणती ॥ विद्याधरांचा अधिपती ॥ तूं होशील बा निश्चितीं ॥ मदनुग्रहें करूनियां ॥ १७ ॥ त्रिजगीं तुझें यश ॥ प्रगट होईल सुरस ॥ वरदान देऊन नृपास ॥ अदृश्य जाहले ॥ १८ ॥ श्रीमद्भागवतसारामृत षष्ठस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सरवाराम विरचित ॥ षोडशाध्याय गोड हा ॥ १९ ॥ १६ ॥ सप्तदशाध्याय प्रारंभः ॥ श्रीशु

कल्पणेरायासी ॥ चरित्र परिसें सौख्यराशी ॥ शेषवरें चित्रकेतुनृपासी ॥ गंधर्वाधिपत्य मिळालें ॥ १ ॥ एकेदिवशीं विमानांत ॥ गंधर्वश्रेष्ठ अप्सरेसहित ॥ बैसूनि करी यथोचित ॥ नानाविध क्रीडेतें ॥ २ ॥ ऐसें भ्रमण करितां करितां कैलासीं पावला अवचितां ॥ तेथें श्रीशंकर हिमनगसुता ॥ घेऊनि अंकीं बैसले ॥ ३ ॥ शंभु स्वयें दिगंबर ॥ भस्मांकित ज्याचें शरीर ॥ गळां गळां वेष्टिले फणिवर ॥ कंठीं नृमुंडमालिका ॥ ४ ॥ गजचर्म पांघरुण ॥ मृगहस्तकीं पिंगटलोचन ॥ जटाजूटीं गंगाजीवन ॥ भाळीं चंद्रमा विराजे ॥ ५ ॥ भूतें वेताळ नाचती ॥ हर्षयुक्त गिरिजापती ॥ वैराग्य भांडार संपत्ती ॥ चित्रकेतु हे पाहे ॥ ६ ॥ विपरीत देखूनियां परी ॥ राजा बोलेल्या अवसरीं ॥ सिद्धचारणसभेमाझारीं ॥ कायकर्म निंद्य हें ॥ ७ ॥ नग्न होऊनि आपण ॥ अंकीं कांता बैसला घेऊन ॥ लोकगुरु श्रेष्ठ असून ॥ निलाजरेपण केवढें ॥ ८ ॥ यापरी परिसूनि वाणी ॥ कुपित होऊनि भवानी ॥ शापोक्ति बोलेत येक्षणीं ॥ असुरयोनी तु जल्लाधो ॥ ९ ॥ ऐसा शाप करूनी श्रवण ॥ चित्रकेतु संतोषमानून ॥ शिवपार्वतींचे वंदूनि चरण ॥ गमन करिता जाहला ॥ १० ॥ पार्वतीसी बोलती शंकर ॥ हरिभक्त निस्पृह थोर ॥ शापकीं अनुग्रह प्रकार ॥ समसमान मानिती ११ तस्मात् महापुरुषांचें ॥ आचरण पाहूनि कांचें ॥ विस्मय मानूं नये साचे ॥ अंतरनिष्ठ ते असती ॥ १२ ॥ ते विचारें करूनि पाहीं ॥ देहवियोग संयोग ही ॥ समान मानिती वनीं गेहीं ॥ न्यूनाधिक नाहीं त्यां ॥ १३ ॥ ऐसें विष्णुभक्तांचें महिमान अपर्णे असे पावन ॥ तें चितुज लागीं केलें कथन ॥ यथावकाशें सुंदरी ॥ १४ ॥ येरीकडे त्वष्ट्यानें साचार ॥ मंत्रजपूनी अभिचार ॥ दक्षिणाग्नीचे ठायीं सादर ॥ हवन केलें यथाविधी ॥ १५ ॥ ऐसें करितां चि यजन ॥ चित्रकेतु वृत्रासुर होऊन ॥ अग्नीमाजी जाहला उत्पन्न ॥ मूळ कथन हें असे ॥ १६ ॥ विष्णुभक्तांचें चरित ॥ श्रवण पठन दिवस

रात ॥ करितांमानवांमोक्षलरित ॥ हरिप्रसादेंप्राप्तहोय ॥ १७ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ षष्ठस्कंधपरमपुनीत
प्राकृतसरवारामविरचित ॥ सप्तदशाध्यायगोडहा ॥ १८ ॥ १७ ॥ अष्टादशाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्रीशुकह्म
णेरायासी ॥ परिसेंआदित्यवंशासी ॥ पंचमादित्यसौख्यराशी ॥ जयाकारणेंबोलती ॥ १ ॥ त्यासवित्याचीपृश्नि
नामक ॥ भार्याजीतिचेउदरींदेख ॥ सावित्रीव्याहृतीत्रयीचोख ॥ अग्निहोत्रपशूजाणिजे ॥ २ ॥ सोमयागचा-
तुर्मास्यपुनीत ॥ पंचमहायज्ञविख्यात ॥ ऐशींअपत्येंजाहलींबहुत ॥ पुढतींवृत्तअवधारा ॥ ३ ॥ भगनामक-
आदित्याची ॥ संततिजाणासिद्धिभार्येची ॥ महिमानविभुप्रभु पुत्रत्यांची ॥ आशीभगिनीजाणिजे ॥ ४ ॥
धातृनामकआदित्याप्रति ॥ कुहूसिनीवालीराकाअनुमती ॥ याभार्यातयांचीपरिसासंतती ॥ कुहूतेंअस्तमा-
नजाहला ॥ ५ ॥ सिनीवालीप्रसवेदर्शा ॥ राकानिपजवीप्रत्यूषा ॥ तैसीअनुमतीपूर्णमासा ॥ प्रसवेंऐसाहावंश
६ ॥ विधातृनामकआदित्यासी ॥ क्रियानामकभार्येसी ॥ पंचचिताग्निपरियेसीं ॥ उत्पन्नपैंजाहले ॥ ७ ॥ वरुण
कांताचर्षणी ॥ भृगुवाल्मीकिपुत्रदोन्ही ॥ उत्पन्नजाहलेतिजपासूनी ॥ सत्यजाणराजेंद्रा ॥ ८ ॥ मित्रादित्याचीकां
ता ॥ रेवतीनामेंपतिव्रता ॥ तियेचेउदरींताता ॥ तीनपुत्रजन्मले ॥ ९ ॥ उत्सर्गअरिष्टपिप्पलजाण ॥ ऐसेंतयांचेंअ
भिधान ॥ मित्र वरुणांसीउर्वशीदर्शन ॥ होतांरेतस्खलनहोय ॥ १० ॥ तेंघेऊनितयांनीं ॥ तियेचेसन्निधतेक्ष-
णीं ॥ कुंभांतसिंचितांसद्गुणी ॥ अगस्त्यवसिष्ठनिपजले ॥ ११ ॥ यास्तवमित्रावरुणसुत ॥ हेअसतीविख्यात ॥
इंद्रापौलोमीसितीनसुत ॥ जयंतऋषभमीढुषहे ॥ १२ ॥ उरुक्रमासीकीर्तीपासून ॥ बृहच्छ्लोकपुत्रपावन ॥ जा
हलातयापासून ॥ सौभगादिकजन्मले ॥ १३ ॥ वामनचरित्रअद्भुत ॥ अष्टमस्कंधींपरिसेंपुनीत ॥ ऐसाआदि-

त्यवंशसमस्त॥ तुजलागींकथियेला॥ १४॥ दितीचावंशआतां॥ परिसेंअभिमन्युसुता॥ ज्यांतश्रीप्रल्हादबलीता
ता॥ निर्माणजाहलेभागवत॥ १५॥ प्रथमत्यादितीसीजाण॥ हिरण्याक्षहिरण्यकशिपुनंदन॥ महापराक्रमी
जाहलेपूर्ण॥ तृतीयस्कंधीं कथिलेते॥ १६॥ जंभासुरेंहिरण्यकशिपूसी॥ सुताकयाधूदिधलीपरियेसीं॥
चारपुत्रजन्मलेकुशीं॥ एकाधिकएकते॥ १७॥ संन्हादअनुन्हाद॥ न्हादचतुर्थप्रन्हाद॥ महाभागवतप्रसिद्ध
श्रीकृष्णाचरणींजडलाजो॥ १८॥ सिंहिकातयांचीभगिनी॥ दिधलीविप्रचित्तीलागुनी॥ राहुनामकपुत्रत्या
पासूनी॥ निर्माणजाहलावैष्णवा॥ १९॥ समुद्रमंथनीअमृतपान॥ करितअसतांसुरगण॥ त्यांतराहूबैस
लाजाऊन॥ सोमसूर्यतेंखुणाविती॥ २०॥ मोहिनीरूपीश्रीहरी॥ तोभावजाणूनीअंतरीं॥ सुदर्शनघेऊनिकरीं॥
मस्तकत्याचाछेदीपैं॥ २१॥ तोचिधरूनीमनींराग॥ चंद्रसूर्यांसीलावितोरोग॥ लागलाह्मणतीउपराग॥ बिबु
धजनत्याजला॥ २२॥ संन्हादाकृतिपासून॥ पंचजनजाहलानिर्माण॥ न्हादासिधमनीपासून॥ वातापिइल्व-
लजाहले॥ २३॥ वातापिमेषजाहला॥ इल्वलेंतयाचापाककेला॥ अतिथीअगस्तीबाहिला॥ तेणेंजिरविलाउ
दरांत॥ २४॥ इल्वलासीशापदेऊन॥ सवेंचिकेलेंतयाचेंदहन॥ पुढेंपरिसाकथानुसंधान॥ एकाग्रचित्तेंकरूनि
या॥ २५॥ दितिपौत्राअनुन्हादासी॥ सूर्मिनामकभार्येच्याकुशीं॥ बाष्कळमहिषसोरव्यराशी॥ दोनपुत्रजाह
ले॥ २६॥ प्रल्हादस्त्रीदेवीजाण॥ तिजलाहोयपुत्रविरोचन॥ तयापोटींलाधलेंनिधान॥ बलिसंज्ञकदैत्यपती
२७॥ तयाविंध्यावलीपासून॥ शतपुत्रजाहलेनिर्माण॥ तयांमाजीज्येष्ठबाण॥ वरदपुत्रशिवाचा॥ २८॥ त्याब
लिरायाचेंचरित॥ वर्णनकरूंअष्टमस्कंधांत॥ दितिसुतएकोनपंचाशत॥ मरुद्गणजाहले॥ २९॥ तेअपुत्रअ

सतांभले ॥ वासवसमानत्वपावले ॥ हें ऐकूनिपरीक्षिती बोले ॥ कायपुण्यतयांचें ॥ ३० ॥ दैत्यअसतांदेवापरी ॥
कैसेजाहलेतेअवसरीं ॥ श्रीशुकह्मणेनरकेसरी ॥ सावधानेंपरिसावें ॥ ३१ ॥ दितिह्मणेकश्यपमुने ॥ पुत्रवधिले-
महाविष्णूनें ॥ इंद्राच्याकैवारें तेणें ॥ मानसींदुःखितहोतेंसदा ॥ ३२ ॥ सापत्नकुमरराज्यकरिती ॥ नाहींमजला-
संतती ॥ हें दुःखमानसींकिती ॥ साहूंसत्यप्राणेशा ॥ ३३ ॥ कृपाकरूनीदेवांचा ॥ पराभवकरीलसाचा ॥ ऐसाकुमर
देऊनिमनाचा । हेतुपुरवालवल्लाही ॥ ३४ ॥ यापरीऐकूनिवाणी ॥ बोलतेजाहलेकश्यपमुनी ॥ एकवर्षपर्यंतव्रत-
करूनी ॥ तपतांफळपावसी ॥ ३५ ॥ इंद्रासीहीजिकणार ॥ ऐसादेईनतुजकुमर ॥ दितीह्मणेव्रतप्रकार ॥ कर्तव्याक
र्तव्यनिवेदा ॥ ३६ ॥ तदनंतरकश्यपह्मणती ॥ सावधपरिसेंशुभांगेदिती ॥ हिंसाअपशब्दरुदती ॥ हेचिमुख्यव
र्जावे ॥ ३७ ॥ करूंनयेअसत्यभाषण ॥ नखरोमांचेंछेदन ॥ करूंनयेआपण ॥ पदार्थअमंगळशिवूंनये ३८ उदकांनप्रवे
शकरून ॥ करूंनयेकधींस्नान ॥ रजस्वलाचांडालावलोकन ॥ स्पर्शहीत्यांचानकरावा ॥ ३९ ॥ परकीयांचेंघेऊनिवस
न ॥ आपणकरूंनयेपरिधान ॥ अंजळीचेंपात्रकरून ॥ उदकमानकरूंनये ॥ ४० ॥ अस्तमानींनग्नशयन ॥ करूंनये
कदाआपण ॥ प्रभातकाळींउठून ॥ स्नानकरावेंगंगेचें ॥ ४१ ॥ नंतरदेवब्राह्मणश्रीहरी ॥ धेनूसवत्सपाहूनीबरी ॥
सद्भावधरूनीअंतरीं ॥ पूजनकरावेंकमलाक्षि ॥ ४२ ॥ सुवासिनीस्त्रियाबाहून ॥ हरिद्राकुंकुमद्यावेंवायन ॥ ऐसेंकरि
तांव्रतपुंसवन ॥ मनकामनापूर्णहोय ॥ ४३ ॥ हेंव्रतसंवत्सरभर ॥ सांगकरितांसाचार ॥ इंद्रवधकरणार ॥ पुत्रहोईल-
तुजलागीं ॥ ४४ ॥ दितिह्मणेकश्यपासी ॥ हेंव्रतकरीनसौख्यराशी ॥ इंद्रजाणूनिमानसीं ॥ कपटकायआरंभी ॥ ४५
विनीतरूपेंयेऊन ॥ करिताजाहलादितीचेंसेवन ॥ एकेदिवसींव्रतछिद्रपाहून ॥ उदरींप्रवेशकरीतो ॥ ४६ ॥ दितीच्या

गर्भाचे निश्चित ॥ इंद्रानें तुकडे केले सात ॥ मागुती प्रत्येकाचे भाग सप्त ॥ करूनी बाहेर तो आला ॥ ४७ ॥ गर्भखंडें एकोनपन्नास ॥ तेचि मरुद्गण जन्मले स्फुरस ॥ इंद्र बांधवते सोत्कर्ष ॥ होते जाहले राजेंद्रा ॥ ४८ ॥ श्रीमद्भागवतसारामृत षष्ठस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ अष्टादशाध्याय गोड हा ॥ ४९ ॥ १८ ॥ ॥ एकोनविंशाध्यायप्रारंभः ॥ ॥ परीक्षिती ह्मणे शुकासी ॥ कथावें पुंसवन व्रतासी ॥ कवण विधि असे तयासी ॥ तोचि प्रकार सांगावा ॥ १ ॥ ज्या व्रतप्रभावें करून ॥ प्रसन्न होऊनि नारायण ॥ इच्छित कामना करी पूर्ण ॥ तें चीसकारण सांगा जी २ ॥ श्रीशुक ह्मणे सावधान ॥ राया परिसें पुंसवन ॥ व्रतामाजी व्रत पावन ॥ परम श्रेष्ठ हें जाणिजे ॥ ३ ॥ मार्गशीर्षशुक्ल प्रतिपदेसी ॥ पतीची आज्ञा सौख्यराशी ॥ ग्रहण करूनी व्रतासी ॥ आरंभ स्त्रीनें करावा ॥ ४ ॥ अखिलकामपूरित ॥ करणारें आहे हें व्रत ॥ मरुज्जन्म परिसूनि पुनीत ॥ सद्भावयुक्त असावें ॥ ५ ॥ ब्राह्मणाज्ञें करूनी स्नान ॥ करूनी शुक्लवस्त्रपरिधान ॥ अलंकार करूनी धारण ॥ लक्ष्मीरमण पुजावा ॥ ६ ॥ गद्य ॥ विष्णुपत्नि महामाये इत्यनेन च भगवंतं श्रियं च नमस्कृत्य नमो भगवते महापुरुषायेति मंत्रेण षोडशोपचारैः पूजयेत् ॥ ततः नमो भगवते महापुरुषायेति मंत्रेण अनलेह विशेषेण द्वादशाहुतीर्जुहुयात् ॥ श्रियं विष्णुं च भक्त्या नित्यं संपूजयेत् ॥ साष्टांग वंदन दंडवत ॥ मही वरी घालावें त्वरित ॥ मूर्ती पाहूनि भावयुक्त ॥ स्तवन करावें आदरें ॥ ७ ॥ मंत्राचा जप सुंदर ॥ भावें करावा दशवार ॥ मूर्ती लक्ष्मीनिश्यामसुंदर ॥ स्तोत्र करावें सप्रेम ॥ ८ ॥ देवा जगत्रयासी कारण ॥ तूंचि एक असून ॥ उत्पत्ति संहार पालन ॥ तुझें इच्छें होती बा ॥ ९ ॥ सूक्ष्म प्रकृतीचा ईश्वर तूंचि होशी रमावर ॥ तुझ्या चरणीं नमस्कार ॥ अखंडित असो हा ॥ १० ॥ इत्यादि करूनी स्तवन ॥ नैवेद्य पा

नैं पृथक्‌ ठेवून ॥ भावें द्यावें आचमन ॥ देवराया कारणें ॥ ११ ॥ दक्षिणा तांबूल पूर्वक ॥ मारुती पूजन करावें चोख ॥
यज्ञोच्छिष्ट अवघ्राणुनी देख ॥ उत्तर पूजा करावी ॥ १२ ॥ परम भावें करून ॥ पतीच जाणावा नारायण ॥ ऐसी भा
वना ठेवून ॥ करावें भजन तयाचें ॥ १३ ॥ दंपत्या माजील कोणी ॥ हें व्रत करील भावें करूनी ॥ तरी उभयतांसी फळ
याजनीं ॥ समसमान तें असे ॥ १४ ॥ हें विष्णुव्रत घेतल्यावरी ॥ विच्छिन्न होऊं न येमध्यंतरीं ॥ यथासांग पूजितां
श्रीहरी ॥ प्रसन्न होतो तात्काळ ॥ १५ ॥ हा पूजाविधि साचार ॥ सांग करावा संवत्सर ॥ कार्तिक मासीं सत्वर ॥ ये
तां अमा व्रत पूर्ण ॥ १६ ॥ ते दिवसीं निश्चित ॥ व्रत करावें समाप्त ॥ हुतशेष पायसान्न पुनीत ॥ पत्नीसि देतां सगर्भ
होय ॥ १७ ॥ नवमास होतांचि पूर्ण ॥ विजयी होईल नंदन ॥ श्रीहरिकृपें करूनी जाण ॥ सर्व कामना सिद्धी पें ॥ १८
संतुष्ट होऊनि श्रीकांत ॥ कल्याण करील अखंडित ॥ पुरुष व्रत करितां इष्टार्थ ॥ तया लागीं प्राप्त होय ॥ १९ ॥ सौभा
ग्यवतीसी चिरायु बाळ ॥ यश गृह कन्येसी वर सोज्वळ ॥ विधवेसी सद्गति तात्काळ ॥ विष्णुप्रसादें होईल कीं ॥ २०
मृतप्रजाती जीवसुता ॥ दुर्भगा तेंसुभगा वनिता ॥ कुरूपा होय रूपयुता ॥ श्रीहरिवरें साच पें ॥ २१ ॥ रोगियां हो-
ऊनि आरोग्य जाण ॥ अभ्युदय होय कल्याण ॥ पठनें देव पितर मुनिगण ॥ अखंड तृप्ती पावती ॥ २२ ॥ अग्निमुखीं
केलें हवन ॥ तेणें प्रसन्न नारायण ॥ भक्तांची कामना पूर्ण ॥ स्वयें तो करीतसे ॥ २३ ॥ षष्ठस्कंध तुळसीचा पाला ॥
भावें श्रीहरीसी अर्पिला ॥ सखारामें नामकीर्तन नाला ॥ उच्चस्वरें करूनियां ॥ २४ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ ष
ष्ठस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ एकोनविंशाध्याय गोड हा ॥ २५ ॥ १९ ॥ षष्ठस्कंध समाप्त

इतिश्रीमद्भागवतसारामृ० षष्ठस्कं० स०


अथश्रीमद्भागवतसारामृतेसप्तमस्कंधःप्रारंभः

श्रीगणेशायनमः॥ ॥श्रीसरस्वत्यैनमः॥ ॥श्रीगुरुभ्योनमः॥ ॥परीक्षितिह्मणेयोगिराया॥इंद्रकेवा
रेंकरूनियां॥महाविष्णूसीदैत्यवधावया॥कायकारणतेंसांगा॥१॥अहोसर्वात्मासमान॥सर्वांभूतींपरिपू
र्ण॥आहेतयासीद्वेषाचेंप्रयोजन॥कांहींएकअसेना॥२॥हासंशयमाझ्यामनांत॥सर्वदाजोकाअसेनि-
श्चित॥बोधशस्त्रेंकरूनीत्वरित॥छेदूनिटाकीस्वामियां॥३॥ऐसीपरिसूनिवाणी॥बोलतेजाहलेश्रीशुक-
मुनी॥कृष्णद्वैपायनातेंनमुनी॥कथितोंचरित्रहरीचें॥४॥नारदादिऋषीश्वर॥जेथेंभागवतमाहात्म्य
सार॥गायनकरितीमनोहर॥तेंचिसाग्रआइकें॥५॥भगवान्स्वयेंनिर्गुण॥परियुक्तजेमायागुणेंकरून
तयींबाध्यबाधकनालक्षण॥एऱ्हवींकदानातुडे॥६॥रजतमआणिसत्वजाण॥प्रकृतीचेहेतीनगुण॥त्यां
चीक्षयवृद्धिपरिपूर्ण॥एककाळींनघडेची॥७॥सत्वोत्कर्षकाळींदेवांची॥शक्तिवृद्धिंगतहोतेसाची॥रजउत्
कर्षेंदानवांची॥शक्तिबहुतवाढते॥८॥तमउत्कर्षेंकरूनिजाण॥यक्षराक्षसवर्धमान॥ऐसेंसृष्टीचेंमान॥च-
क्रापरीभ्रमतसे॥९॥ज्याकाळींजैसेगुणहोती॥त्याकाळींतैसीफळश्रुती॥जीवांचेभोगार्थनिश्चिती॥का
लानुगुणप्रभुहोय॥१०॥जेंसृष्टिकरूंइच्छीईश्वर॥तैंरजोगुणवाढवीसाचार॥खेळावयाइच्छीतेंसत्वगु-
णविस्तार॥करीसंहारतमोगुणें॥११॥प्रधानपुरुषसहकृत॥आत्मयोनीस्वाश्रयभूत॥स्वेच्छेंकरूनीक्रीडा
रत॥स्वयमेवकालसृजीहरी॥१२॥नृपश्रेष्ठापरिसेंमात॥हाकाळसत्वगुणोत्कर्षयुत॥ह्मणूनिदेववृद्धिंगत
शक्तिमानअसती॥१३॥कालशक्तिसंक्षुभित॥गुणगतवैषम्यबहुत॥तदधिष्ठात्यावरीस्फुरित॥दिसेवा
स्तवतेंनाहीं॥१४॥हिरण्याक्षहिरण्यकशिपुवीर॥जाहलेअखिलांअनिवार॥ह्मणूनिदेवांचाघेऊनिकै-

वार॥महाविष्णूवधितयां॥ १५ ॥ब्रह्मशापेंकरूनीतयां॥दैत्ययोनीलाधलीराया॥अनुग्रहार्थवधकराया
लक्ष्मीनाथप्रवर्तले॥ १६॥ हेराजर्षेएतद्विषयींजाण॥कथापरिसेंपावन॥राजसूययागींधर्मालागून॥
नारदेंरहस्यबोधिलें॥ १७॥तेंचिसांगतोंआतां॥सांगपरिसेंभारता॥यज्ञांतशिशुपालवधहोतां॥ मुक्ती
सगेलातात्काळ॥१८॥ ऐसापाहूनिचमत्कार॥नारदासीबोलेयुधिष्ठिर॥येणेंबाळपणापासूनिवैर॥ ब-
हुतकेलेंकृष्णाचें॥१९॥ ऐसेंअसतांसांप्रत॥चैद्यजाहलाकृष्णनाथ॥एकांतभक्तासहीमुक्तिप्राप्त॥ऐसी
नहोयकल्पांतीं॥२०॥आम्हीहेंविचित्रहरिचरित॥जाणावयासर्वउत्कंठित॥पूर्वींवेनन्नृपेंनिंदाबहुत॥
केलीश्रीहरीचीदुर्वाक्यें॥२१॥तेणेंतोनरकासिगेला॥तद्वतनरकपातव्हावायाला॥ऐसेंनघडतांमोक्षासि-
गेला॥याचेंकारणकायतें॥२२॥शिशुपाळवक्रदंत॥बाळपणापासूनिउन्मत्त॥श्रीकृष्णासीअपशब्दबोलि-
लेदुर्वृत्त॥तेकायमुखींवाणावे॥२३॥तयाविष्णुनिंदेंकरून॥कैसानउद्भवलाकुष्ठपूर्ण॥नरकपाततयांलागु-
न॥कांहोप्राप्तनजाहला॥२४॥याविषयींमनांत॥नारदासंशयअसेबहुत॥चरित्रसांगूनिपुनीत॥ निवार-
णतोकरीगा॥२५॥मगबोलेब्रह्मनंदन॥रायापरिसेंसावधान॥नाहींश्रीहरीसीवैरीपण॥सर्वांभूतींसमान-
जो॥२६॥वैरनिर्वैरभक्तिपाहीं॥भयस्नेहकामयांहीं॥योजितांमनश्रीकृष्णापायीं॥भिन्नत्वकांहींनसेकीं॥
२७॥वैरसंबंधेंकरूनीनिश्चिती॥करीसांपडतोजेसाश्रीपती॥तेसाकरितांइतरभक्ती॥कदाकाळींगवसे-
ना॥२८॥कारणयासीप्रमाणभूत॥प्रत्यक्षजाणादृष्टांत॥भ्रमरदंशकरूनीगृहांत॥कीटकआणूनीठेवी
जो॥२९॥तोकीटकभयद्वेषेंकरून॥अखंडकरीत्याचेंस्मरण॥तात्काळभ्रमरहोउनीआपण॥उडूनजाय

फिरावया॥ ३०॥ असेंचमायेनेंमनुजाकृती ॥ धारणकरीजोश्रीपती ॥ त्याचेंदृढस्मरणकरितांचित्तीं ॥ सरूपताप्राप्त
होय॥ ३१ ॥ कवणेपरीतरीदृढमती ॥ ईश्वरींलावितांदिवसराती ॥ ध्यानेंतेवैकुंठींजाती ॥ प्रत्यक्षप्रमाणसांगतों
३२ ॥ कामेंतरल्याबल्लवजाया ॥ भयेंतारिलेंकंसराया ॥ द्वेषबुद्धीकरूनियां ॥ शिशुपाळमुक्तजाहला ॥ ३३ ॥
बंधुत्वसंबंधेंयादवजन ॥ स्नेहेंतुह्मीपंडुनंदन ॥ हामीप्रत्यक्षभक्तीकरून ॥ जीवन्मुक्तसर्वदा ॥ ३४ ॥ हेशिशु-
पालवक्रदंत ॥ जयविजयसाक्षात ॥ महाविष्णूचेद्वारस्थित ॥ विप्रशापेंपातनयां ॥ ३५ ॥ तेंप्रार्थूनिबोलेधर्मरा
ज ॥ शापोक्तीचेंकारणमज ॥ कृपादृष्टीकरूनिसहज ॥ यथासांगनिरूपा ॥ ३६ ॥ परिसूनिबोलेनारदमुनी ॥ जा-
णाकोणेएकेदिनीं ॥ सनकादिकवैकुंठालागुनी ॥ श्रीहरिदर्शनाजातीहो ॥ ३७ ॥ कुमरजाणूनितयांस ॥ द्वारपालनि
षेधितीजावयास ॥ तेव्हांमुनिवरकुपितमानस ॥ बोलतेजाहलेतयासी ॥ ३८ ॥ हेप्रतीहारहोपरिसावचन ॥ तीन
जन्मअसुरपण ॥ प्राप्तहोईलतुह्मांलागुन ॥ आसुच्याशापेंकरूनिया ॥ ३९ ॥ सर्वेंचिहोऊनिकृपाळ ॥ अनुग्रहक-
रितीतात्काळ ॥ तीनजन्मसंपतांहरिस्थळ ॥ प्राप्तहोईलनिश्चयें ॥ ४० ॥ विप्रशापहोतांतयेकाळीं ॥ पतनपावले
महीस्थळीं ॥ हिरण्याक्षहिरण्यकशिपुदैत्यबळी ॥ प्रकटजाहलेतेधवां ॥ ४१ ॥ हरीनेंक्रोडरूपाधरिलें ॥ तेंपाता
ळींहिरण्याक्षावधिलें ॥ हिरण्यकशिपूनेंस्वपुत्रागांजिलें ॥ महाभागवतापऱ्हादा ॥ ४२ ॥ तेंतयाचाघेऊनिकैवा-
र ॥ स्तंभांतधरूनिअवतार ॥ नृसिंहरूपेंअंकावर ॥ असुरनखीं विदारिला ॥ ४३ ॥ पुनःतेचियाक्षितीं ॥ रावण
कुंभकर्णहोती ॥ समरकरूनीदाशरथि ॥ मारिताजाहलातयांतें ॥ ४४ ॥ तेचिआतांसांप्रत ॥ जाहलेशिशुपाळ
वक्रदंत ॥ श्रीकृष्णाकरींमरतांचित्वरित ॥ मुक्तजाहलेराजेंद्रा ॥ ४५ ॥ युधिष्ठिरह्मणेनारदासी ॥ हिरण्यकशिपू

नेंपुत्रासी ॥ गांजिलेंकिमर्थहरिभक्तासी ॥ तेंकारणसांगावें ॥ ४६ ॥ आणिप्रल्हाददैत्यकुमर ॥ असतांहरिभक्तिम
नोहर ॥ कैसीलाधलीतयाहाप्रकार ॥ मजलागींनिरूपा ॥ ४७ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ सप्तमस्कंधपरमपुनी
त ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ प्रथमाध्यायगोडहा ॥ ४८ ॥ १ ॥ द्वितीयाध्यायप्रारंभः ॥ ॥ धर्मासिह्मणे
नारदमुनी ॥ आदिसूकररूपघेऊनी ॥ दंष्ट्रेवरीधरूनिअवनी ॥ करुणाघनेंउद्धरिली ॥ १ ॥ तैंहिरण्याक्षासीश्रीह
री ॥ मारिताजाहलापाताळविवरीं ॥ हेंवर्तमानऐकिलियावरी ॥ हिरण्यकशिपुक्रोधावला ॥ २ ॥ सदसीशूलघे
ऊनिहातीं ॥ बोलताजाहलादानवांप्रती ॥ हेदानवदैत्यहोमहामती ॥ वाक्यमाझेंअवधारा ॥ ३ ॥ माझेसाप
त्नसहोदर ॥ इंद्रादिजाणाअमर ॥ विष्णूनेंत्यांचाघेऊनिकैवार ॥ हिरण्याक्षमारिला ॥ ४ ॥ आतांत्याहरीच्या
रुधिरेंकरून ॥ करीनबांधवाचेंतर्पण ॥ तोंतुह्मींकरावेंहेंआचरण ॥ तपयज्ञद्विजनाशावे ॥ ५ ॥ सर्वकर्माचाअ
धिपती ॥ मूळअसे लक्ष्मीपती ॥ गायीब्राह्मणवेदविभूती ॥ त्याच्याअसतीनिर्धारें ॥ ६ ॥ तेचीशोधूनिसम-
स्त ॥ आधींकरातयांचाघात ॥ नआणाशंकानिजमनांत ॥ कार्यनिश्चितकराहें ॥ ७ ॥ राजाज्ञापरिसूनिकानीं
दैत्यधांवलेतयेक्षणीं ॥ पुरग्रामनगरेंपाहूनी ॥ दहनकरितेजाहले ॥ ८ ॥ कोणीयज्ञविध्वंसिती ॥ कोणीब्राह्मणां
सीवधिती ॥ कोणीधेनूंसीताडिती ॥ कोणीदूषितीसाध्वींतें ॥ ९ ॥ सफळछेदितीतरुवर ॥ तैंस्वर्गत्यागूनिसुरवर ॥
गुप्तरूपेंकरितीसंचार ॥ महीमाजीराजेंद्रा ॥ १० ॥ हिरण्यकशिपूतदनंतर ॥ मृतबंधूचेंकर्मांतर ॥ पारलौकिककरू
नीसत्वर ॥ अंतःपुरींपातला ॥ ११ ॥ भ्रातृपत्नीरुषाभानुनामक ॥ शकुनिशंबरादिबालक ॥ दितिमाताबैसवूनि
सन्मुख ॥ बोधकरिताजाहला ॥ १२ ॥ हेअंबहेवधूहेबालका ॥ शोकव्यर्थकरूंनका ॥ योद्ध्यासीमृत्युविधीनें नि-

का॥समरींयोजिलानिश्चयें॥१३॥धारातीर्थीपावतांमरण॥वीरांसीप्राप्तमोक्षसदन॥हेंयुक्तजाहलेंवर्तमान॥
समाधानमानावें॥१४॥आत्मानित्यमुक्तअसेंपाहीं॥देहसंबंधतयानसेकांहीं॥तस्मात्मायाकृतसर्वही॥जाणू
निशोकत्यजावा॥१५॥याविषयींइतिहास॥श्रवणकरासावकाश॥उशीनरदेशांचानरेश॥सुयज्ञनामकवि-
क्रमी॥१६॥तोएकदांभिडतांसमरीं॥मरणपावलाझडकरी॥प्रेतपडिलेंमहीवरी॥स्वजनसभोंवतींमिळाले
१७॥कांतासन्निधयेऊन॥करित्याजाहल्यादीर्घरुदन॥प्राणनाथाआम्हांत्यागुन॥गेलातकेंसेयेधवा॥१८॥स्वा-
मियातुह्मांवांचुन॥कायकरावेंजगींवांचून॥कोठेंराहावेंयाचुन॥कवणापाशींतेंसांगा॥१९॥यारीतींशोकदारु-
ण॥करितांजाहलाअस्तमान॥परीतयाचेंकरायादहन॥नइच्छितीतेझालेंतीपें॥२०॥ऐसाविलापकरूनिश्चव-
ण॥तेथेंपातलाभास्करिआपण॥सानबालकवेषघेऊन॥समाधानकरीत्यांचें॥२१॥अहोअधिकवयेंमज-
हून॥पाहतीजनांचेंजन्ममरण॥मोहपावतीकेंसेजन॥चमत्कारहागमे॥२२॥अव्यक्तरूपापासूनिभला॥
प्राणीहाजन्मासीआला॥तोमागुतीपूर्वस्थानींगेला॥अवशिष्टराहेमृत्तिका॥२३॥आपणहीजाणातद्वत॥मृ
त्युमुखींजाणारअकस्मात॥शोककरावयाकिंचित॥कारणयेथेंअसेना॥२४॥आह्मीतुह्मांपेक्षांधन्य॥केंसे
तेंपरिसासकारण॥मायबापीत्यागितांआह्मीअरण्य॥बाळपणींसेविलें॥२५॥तयाचीचिंतामानसीं॥नसेकां
हींआह्मांसी॥वृकादिक्रूरपशूंचेंनिश्चयेंशीं॥आह्मांसिभयतेंनाहीं॥२६॥गर्भीज्यानेंरक्षिलेंपाहें॥तोसर्वत्रर-
क्षितआहे॥कारणनसतांरक्षितोलववाहे॥यास्तवक्रीडाहेश्रीहरीची॥२७॥उत्पत्तिलयपालन॥स्वेच्छेंकरीजो
भगवान॥हेंजगत्याचेंक्रीडासाधन॥सत्यमानामानसीं॥२८॥हरिकृपाआहेजयावरी॥तोअनाथवसेकांता-

रीं ॥ तरीतयाचें रक्षणपरोपरी ॥ ठायींगायींहोतसे ॥ २९ ॥ वक्रदृष्टीश्रीहरीचीअसतां ॥ गृहांतरक्षिलेंकांतास्फूता ॥
तरीअपघातअवचिता ॥ येणारयेतीबहुसाल ॥ ३० ॥ पथींवस्तपडतांभली ॥ रक्षणईश्वरेंस्वयेंकेली ॥ मार्गस्थ-
जनेंनाहींपाहिली ॥ कायकौतुकवाणावें ॥ ३१ ॥ तेसीवस्तुठेवितांगृहांत ॥ करूनीदक्षताबहुत ॥ ईश्वरइच्छेंनष्ट
होयनिश्चित ॥ प्रकारतद्वतजाणाहा ॥ ३२ ॥ आतांतुमचेंरुदन ॥ स्फुयज्ञकरीतनाहींश्रवण ॥ प्रत्युत्तराचेंभाष
ण ॥ तेंहीसमासजाहलें ॥ ३३ ॥ आत्माजाहलादेहभिन्न ॥ कायहोतेंशोककरून ॥ आत्मानित्यमुक्तआपण ॥ अ-
शाश्वतहीकाया ॥ ३४ ॥ व्याधकुलिंगाचादृष्टांत ॥ सांगूनिशांतविलेसमस्त ॥ यमजाहलाअंतर्हित ॥ दैत्येंद्रबो-
धीयापरी ॥ ३५ ॥ पुत्रशोकापासूनिदिती ॥ पौत्रस्नुषासहितनिश्चिती ॥ परावृत्तहोऊनिचित्तीं ॥ विवेकसारध
रीतसे ॥ ३६ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ सप्तमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ द्वितीयाध्यायगो
डहा ॥ ३७ ॥ २ ॥ ॥ तृतीयाध्यायप्रारंभः ॥ नारदह्मणेयुधिष्ठिरा ॥ पंडुकुलोद्भवान्नृपशेखरा ॥ सार्वभौमागुण-
णागारा ॥ चरित्रपावनअवधारीं ॥ १ ॥ हिरण्यकशिपुह्मणेमनीं ॥ मींअमरव्हावेंत्रिभुवनीं ॥ संग्रामींशत्रूपासू
नीं ॥ भयकिमपिनसावें ॥ २ ॥ मगमंदराचलावरी ॥ तपार्थगेलातोझडकरी ॥ दुष्करतपाआरंभकरी ॥ प्रकार
त्याचाजाणिजे ॥ ३ ॥ ऊर्ध्वबाहूसूर्यदृष्टी ॥ उभाराहिलापदांगुष्ठीं ॥ तपकरितांमहाकष्टी ॥ होताजाहलाआप
ण ॥ ४ ॥ त्याचेतालुस्थानांतूनिप्रखर ॥ सधूमनिघालावैश्वानर ॥ तोत्रैलोक्यासीभयंकर ॥ दहनकरूंलागला ॥
५ ॥ नदनद्याथिल्लरोदक ॥ वापीकूपादिकअनेक ॥ महासागरसरेंदेख ॥ क्षुभितजाहलींतेधवां ॥ ६ ॥ पृथ्वी
पर्वतकंपायमान ॥ होतीनक्षत्रेंपडतीजाण ॥ त्यात्रासेंसुरगणस्थान ॥ सोडुनीविधीकडेपातले ॥ ७ ॥ वर्त-

मानसर्वनिवेदिती ॥ रक्षणकेलेंपाहिजेह्मणती ॥ वचनऐकूनियांपुढती ॥ कायकरीविधाता ॥ ८ ॥ भृग्वादिऋषि
गणांसहित ॥ तदाश्रमींआलाधांवत ॥ तोंवल्मीकतृणाच्छादित ॥ दैत्यअदृष्टहोयतो ॥ ९ ॥ पिपीलिकाभक्षितीज-
या ॥ गलितमांसदेखिलेंतया ॥ प्राणराहिलाअस्थिमयराया ॥ कळवळेब्रह्मापाहूनी ॥ १० ॥ विस्मितहोउनीम-
नीं ॥ बोलेविधातातेक्षणीं ॥ हिरण्यकशिपूसलक्षूनी ॥ वरदवाक्यतेंपरिसा ॥ ११ ॥ हेकश्यपनंदनाउठावेंलवक-
री ॥ तुझीतपःसिद्धिजाहलीपुरी ॥ वरदानद्यावयायेअवसरीं ॥ प्राप्तजाहलोंपाहेंबा ॥ १२ ॥ देतोंतुजलाइच्छि-
तवर ॥ पिपीलिकाभक्षितीशरीर ॥ तुझेंपाहूनिगहिंवर ॥ बहुतआलामानसीं ॥ १३ ॥ अस्थिगतठेवूनिप्राण
घोरकरिसीतपाचरण ॥ ऐसेंधैर्यअवलोकन ॥ मागेंपुढेंनकेलें ॥ १४ ॥ देवांचेशतसंवत्सर ॥ उदकावांचूनिसाचा-
र ॥ सप्राणरक्षिलेंकलेवर ॥ कायसामर्थ्यवर्णावें ॥ १५ ॥ याव्यवहारेंकरूनिनिश्चिती ॥ लोजिंकिलेंसगामजप्र-
ती ॥ माझ्यादर्शनें चीफळप्राप्ती ॥ कदानिष्फळहोईना ॥ १६ ॥ यास्तवइच्छिततात ॥ वरमागेंमजसीआतां ॥ ऐ-
सेंबोलेविधाता ॥ कनककशिपूसितेकाळीं ॥ १७ ॥ नारदह्मणेकुंतीसुता ॥ ऐसेंबोलनिविधाता ॥ कमंडलूदकसिं-
चितां ॥ कांचनदेहीतोजाहला ॥ १८ ॥ सर्वअवयवसंपन्न ॥ हिरण्यकशिपुजाहलाआपण ॥ उठताजाहलावारु-
ळापासून ॥ तोंनमींविरिंचीदेखिला ॥ १९ ॥ सद्भावेंनमनदंडवत ॥ करूनिविधीसस्तवीदितिसुत ॥ हेअना-
थनाथादर्शनेंपुनीत ॥ सांगकेलेंदयाळा ॥ २० ॥ सांगतोंइच्छितआतां ॥ तेंचिपुरवावेंताता ॥ त्रिजगींऐसासा-
गता ॥ तुह्मांकधींनभेटला ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदिदास्यस्यभिमतान्वरान्मेवरदोत्तम ॥ भूतेभ्यस्त्व-
द्विसृष्टेभ्योमृत्युर्माभून्ममप्रभो ॥ ३५ ॥ नांतर्बहिर्दिवानक्तमन्यस्मादपिचायुधैः ॥ नभूमौनांबरेमृत्युर्न-

रैरपि मृगैरपि ॥ ३६ ॥ व्यसुभिर्वा ऽसुमद्भिर्वा सुरासुरमहोरगैः ॥ अप्रतिद्वंद्वतां युद्धे ऐकपत्यं च देहिनाम् ॥ ३७ ॥ सर्वेषां लोकपालानां महिमानं यथात्मनः ॥ तपोयोगप्रभावाणां यन्न रिष्यति कर्हिचित् ॥ ३८ ॥ टीका ॥ वरदोत्तमा मज लागून ॥ जरी जाहलांत प्रसन्न ॥ तरी हें चि देणें वरदान ॥ सांगतों श्रवण करावें ॥ २२ ॥ तुमचे सृष्टी पासूनि निश्चितीं ॥ मरण न यावें मज प्रती ॥ गृहांत बाहेर दिवसां रातीं ॥ मृत्यु प्राप्त न व्हावा ॥ २३ ॥ तव सृष्टींतील कीं अन्य प्राणी ॥ आयुधें न वा आकाश धरणीं ॥ पशु पक्षी मानवयां पासूनी ॥ पंचत्व मातें न सावें ॥ २४ ॥ तैसें प्राणयुक्त कीं प्राणरहित ॥ अखिल असती जे पदार्थ ॥ त यां पासूनि मृत्यु प्राप्त ॥ होऊं न ये विधात्या ॥ २५ ॥ जैसा असे तुमचा महिमा ॥ तैसा मज देणें सुरोत्तमा ॥ देवासुर नागांशीं संग्रामा ॥ करितां जय प्राप्त होवो ॥ २६ ॥ अप्रतिमल्ल देहीं करी ॥ जीवांचें एकाधिपत्य सत्वरी ॥ आपण द्यावें झडकरी ॥ कृपा करूनी नाभिजा ॥ २७ ॥ तपयोग प्रभावसंपन्न ॥ लोकपाळांचें ऐश्वर्य पूर्ण ॥ अचल द्यावें तत्समान ॥ मनोरथ हा पुरवावा ॥ २८ ॥ श्रीमद्भागवत सारामृत ॥ सप्तमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ तृतीयाध्याय गोड हा ॥ २९ ॥ ३ ॥ ॥ चतुर्थाध्यायप्रारंभः ॥ ॥ नारद म्हणे धर्मासी ॥ दुर्लभ वर देऊनि दैत्यासी ॥ ब्रह्मदेव गेले सत्यलोकासी ॥ पुढती चरित्र अवधारा ॥ १ ॥ हिरण्यकशिपु वरें करून ॥ कांचनापरी देह पावून ॥ हिरण्याक्षवध स्मरून ॥ श्रीहरिशीं द्वेष करी तसे ॥ २ ॥ देव दैत्य गंधर्वपती ॥ यक्ष राक्षसगणां प्रती ॥ जिंकिता जाहला युद्धांतीं ॥ लोकपाल सर्व पराभवी ॥ ३ ॥ इंद्रासनीं बैसूनि असुर ॥ त्रैलोक्य लक्ष्मी मनोहर ॥ भोगिता जाहला कश्यपकुमर ॥ विधिवरें करूनियां ॥ ४ ॥ अवघे सुरगण येऊन ॥ सद्भावें वंदिती त याचे चरण ॥ विधिहरिहरां वां

चून ॥ सकळसुरसेविती ॥ ५ ॥ दैत्ययक्षकिन्नर ॥ सिद्धचारणविद्याधर ॥ उपायनें घेऊनि सत्वर ॥ अग्रभागीं समर्पिती ॥ ६ ॥ यज्ञींहविर्भागग्रहण ॥ करिता जाहला दैत्य आपण ॥ पृथ्वी पूर्ण धान्यें करून ॥ यथाकालीं मेघ वर्षती ॥ ७ ॥ सागरापासूनि रत्नें निघती ॥ प्रचुर दुग्धासि धेनू देती ॥ पर्वत क्रीडास्थानें दाविती ॥ दैत्यरायाकारणें ॥ ८ ॥ फळें देती तरुवर ॥ सुगंधपुष्पें मनोहर ॥ ऐसा घडे प्रकार ॥ काळचक्र अघटित हें ॥ ९ ॥ त्रैलोक्यसंपदा सकळ ॥ भोगिता जाहला दैत्यपाळ ॥ तों अतिक्रांत जाहला काळ ॥ एकाहत्तर युगें भोजितां ॥ १० ॥ गोविप्रांचें हनन ॥ दैत्य करिती कोपें करून ॥ उन्मत्त जाहले मद्य पिऊन ॥ कवणा न गणिती चांडाळ ते ॥ ११ ॥ दैत्यांच्या उग्र दंडें पीडित ॥ जाहल्या प्रजा लोकपालांसहित ॥ स्वरक्षणार्थ व्हावया सुरत्वरित ॥ श्रीहरीसी शरण तैं गेले ॥ १२ ॥ स्तविता गंभीर मेघासमान ॥ आकाशवाणी जाहली पूर्ण ॥ देव हो परिसा सावधान ॥ चिंता न करा मानसीं ॥ १३ ॥ श्लोक ॥ मा भैष्ट विबुधश्रेष्ठाः सर्वेषां भद्रमस्तु वः ॥ मद्दर्शनं हि भूतानां सर्वश्रेयोपपत्तये ॥ २५ ॥ ज्ञातमेतस्य दौरात्म्यं दैतेयापसदस्य च ॥ तस्य शांतिं करिष्यामि कालं तावत्प्रतीक्षत ॥ २६ ॥ यदा देवेषु वेदेषु गोषु विप्रेषु साधुषु ॥ धर्मे मयि च विद्वेषः स वा आशु विनश्यति ॥ २७ ॥ निर्वैराय प्रशांताय स्वसुताय महात्मने ॥ प्रल्हादाय यदा द्रुह्येद्धनिष्येऽपि वरोर्जितम् ॥ २८ ॥ टीका ॥ देव हो माझें वचन आयका ॥ न काधरूं मानसीं शंका ॥ अखिलांचें कल्याण देखा ॥ अखंडित तें असो ॥ १४ ॥ कारण माझें दर्शन ॥ स्तवन श्रवण ही पावन ॥ कल्याणकारक आहे पूर्ण ॥ यास्तव धैर्य धरावें ॥ १५ ॥ तें सत्या दैत्याधमाचें ॥ दुष्टकर्म जाणिलें मीं साचें ॥ प्राण हरूनि तयाचें ॥ रक्षण तुमचें करीन मी ॥ १६ ॥ परंतु तुम्ही काळ कांहीं ॥ मार्गप्र

तीक्ष्णाकरापाहीं॥ कालावधिसरतांलवलाहीं॥ कार्यभागसिद्धहोय॥१७॥ कारणवेददेवब्राह्मण॥ धेनुसाधुधर्मपा
वन॥ आणिमीईश्वरनारायण॥ यांसीद्वेषितांनाशहोय॥१८॥ ऐसाद्वेषकेलाजरी॥ तरीनपावेतोयमपुरी॥ स्वपु
त्राछळितांपरोपरी॥ तयासमृत्युकरोकडा॥१९॥ माझ्याभक्तांचाद्रोहपूर्ण॥ हादैत्यकरीलसंपादन॥ तेंपावेलशीघ्र
मरण॥ वरविधीचानचाले॥२०॥ मुनिह्मणेभगवद्वचन॥ ऐसेंपरिसूनिसुरगण॥ परतलेकरूनियांनमन॥ दैत्यनि
धनचिंतिती॥२१॥ त्यादैत्येंद्रासीजाण॥ परमाद्भुतचारनंदन॥ तयांमाजीप्रल्हादसुलक्षण॥ महाभागवतजाणि
जे॥२२॥ तयाचास्वभावपुनीत॥ नृपोत्तमाश्रवणकरीसमस्त॥ ब्रह्मण्यसत्यसंधशांत॥ सर्वभूतींसमानजो॥२३॥
विषयींनिस्पृहविदेही॥ ईश्वरभावगुरूचेठायीं॥ नियतेंद्रियशोभेसदाही॥ वासुदेवपदींमतीज्याची॥२४॥ जोअ
सुरभावविरहित॥ जयासीगर्वनसेकिंचित॥ लोकबांधवभास्करवत॥ संकटींधैर्यजयाचें॥२५॥ देवासुरमानवांत
साधुत्वाच्याकथासभेंत॥ निघतांप्रसंगोपात्त॥ प्रल्हादासीवर्णिती॥२६॥ तेव्हांतुह्मासारिखेइतर॥ त्यांसीमुख्यत्वें-
मानितीलसाचार॥ यांतकायआश्चर्यथोर॥ धर्मरायासांगावें॥२७॥ असंख्यगुणेंकरूनिपूर्ण॥ प्रल्हादहोतापावन
यास्तवतयाचेंमहिमान॥ वाणावयाअशक्य॥२८॥ प्रल्हादाचेंअंतःकरण॥ श्रीकृष्णारूपग्रहानेंपूर्ण॥ आपणाक
डेआकर्षण॥ केलेंहोतेंउदंड॥२९॥ यास्तवबाल्यावस्थेंतपाहीं॥ क्रीडादिसाधनकांहीं॥ मुळींचतयाठाउकेंनाहीं॥
श्रीहरिस्मरणींनिमग्नतो॥३०॥ यावरूनीत्याचीस्थिति॥ जडोन्मत्तदिसेसर्वजगतीं॥ गोविंदाचीनिःसीमभक्ती॥
मनामाजीसर्वदा॥३१॥ श्लोक ॥ आसीनःपर्यटन्नश्नंश्छयानःप्रपिबन्ब्रुवन्॥ नानुसंधत्तएतानिगोविंदप
रिरंभितः॥३८॥ क्वचिद्रुदतिवैकुंठचिंताशबलचेतनः॥ क्वचिद्धसतितच्चिंताल्हादउद्गायतिक्वचित्॥३९॥ नदति

क्वचिदुत्कंठो विलज्जो नृत्यति क्वचित् ॥ क्वचित्तद्भावनायुक्तस्तन्मयोऽनुचकार ह ॥ ४० ॥ क्वचिदुत्पुलकस्तूष्णी-मास्ते संस्पर्शनिर्वृतः ॥ अस्पंदप्रणयानंदसलिलामीलितेक्षणः ॥ ४१ ॥ स उत्तमश्लोकपदारविंदयोर्निषेवयाकिंचनसंगलब्धया ॥ तन्वन्परां निर्वृतिमात्मनो मुहुर्दुःसंगदीनान्यमनःशमं व्यधात् ॥ ४२ ॥ टीका ॥ तो असतां आसनावरी ॥ किंवा कोठें गमन करी ॥ भक्षणसमयीं निद्राऽवसरीं ॥ श्रीहरिस्मरण करीतसे ॥ ३२ ॥ अथवा कांहीं प्राशन करितां ॥ कीं अन्यासवें बोलतां ॥ अशनीं पदार्थ भोगितां ॥ गुणदोष त्यांचा न जाणे ॥ ३३ ॥ क्षुभित जाहलें अंतःकरण ॥ तरी सद्भावें करूनी विष्णुस्मरण ॥ स्फुंदस्फुंदूनि करी रुदन ॥ नयनीं जीवन वाहातसे ॥ ३४ ॥ श्रीहरि-स्मरणें कदाचित ॥ हर्ष पावला जरी मनांत ॥ हास्य गायन करी क्वचित ॥ कौतुकें करूनी युधिष्ठिरा ॥ ३५ ॥ करितां श्रीकृष्णाचिंतन ॥ मुक्तकंठें करी गर्जन ॥ नृत्य करी निर्लज्ज होऊन ॥ तन्मनस्क सर्वदा ॥ ३६ ॥ तन्मय होऊनि प्रल्हाद-आपण ॥ करी श्रीकृष्णाचरितानुकरण ॥ करितां वासुदेवस्मरण ॥ प्रेमें कंठ सद्गद होय ॥ ३७ ॥ लोचनीं सुटती पा-झर ॥ पुलकांकित अवघें शरीर ॥ स्थिरत्वें होय निर्व्यापार ॥ उपाधि कांहीं असेना ॥ ३८ ॥ यापरी प्रल्हाद भक्त ॥ जाह-ला श्रीहरिचरणीं रत ॥ नारदसंगें निस्पृह बहुत ॥ होता जाहला तेथवां ॥ ३९ ॥ आत्मसौख्य वर्धमान ॥ करूनि रक्षी अ-न्यमन ॥ स्वपुत्र ऐसा असून ॥ पिता द्वेष करी त्याचा ॥ ४० ॥ नारदासी ह्मणे धर्म नृपती ॥ आश्चर्य वाटे माझे चित्तीं ॥ प्रल्हा-द असतां सुमती ॥ काय कारण द्वेषाचें ॥ ४१ ॥ प्रतिकूळ असतां कुमर ॥ पिता बोधीत यासी फार ॥ अथवा करूनी तिर-स्कार ॥ मृदुवाक्य न बोले ॥ ४२ ॥ परंतु पुत्रासि शत्रुवत् ॥ द्वेष कोणी नाहीं करित ॥ सुतद्वेष असुरनाथ ॥ कैसा करि-ता जाहला ॥ ४३ ॥ तें चि सांगावें चरित पावन ॥ योगेश्वरा कृपा करून ॥ ऐकूनि धर्माचें वचन ॥ विधिनंदन निरूपी ४४

श्रीमद्भागवतसारामृत ॥ सप्तमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसरव्वारामविरचित ॥ चतुर्थाध्यायगोडहा ॥ ४५ ॥ ४ ॥
पंचमाध्यायप्रारंभः ॥ ॥ नारदह्मणेधर्मासी ॥ शुक्राचार्यगुरुदैत्यांसी ॥ तत्सुतशंडामर्कराजगृहासी ॥ वसतेजा-
हलेनिश्चयें ॥ १ ॥ तेशुक्रसुतप्रल्हादासहित ॥ अन्यबाळांसीत्वरित ॥ असुरनीतीचापाठकुत्सित ॥ देतीहरिभ-
क्तनायकेतो ॥ २ ॥ एकदांतोदैत्येश्वर ॥ कुमरघेऊनिअंकावर ॥ बोलताजाहलावचनमधुर ॥ हेवत्सागुणनिधे ॥ ३ ॥
हेप्रल्हादागुरूपाशीं ॥ जेंकांहींअध्ययनकरिशी ॥ तयांतउत्तमकायमानिसी ॥ तेंमजसीसांगावें ॥ ४ ॥ ऐसीप
रिसूनिमात ॥ प्रल्हादबोलेअहोतात ॥ ऐकामाझेंमनोगत ॥ उत्तमअधीततेंवाटे ॥ ५ ॥ गृहांतवसतांआत्मघा
त ॥ वनींजाऊनिअकस्मात ॥ श्रीहरिचरणसदोदित ॥ भजावेअखंडित सद्भावें ॥ ६ ॥ यापरीऐकूनिवाणी ॥
दैत्यहासिन्नलातेक्षणीं ॥ ह्मणेशाळेंतबाळेंगुणागुणी ॥ संगतीफळहेंअसेत्यांचें ॥ ७ ॥ गुरूंसीबाहूनह्मणेत्व
रित ॥ विष्णुपक्षानींयाचेंचित्त ॥ भेदिलेंअसेजाणाकिंचित ॥ शिक्षायथोचितकरावी ॥ ८ ॥ सन्निधबाहूनिप्र-
ल्हादासी ॥ गुरुबोलतीरहस्यत्यासी ॥ बुद्धिविपर्ययहातुझेंमानसीं ॥ कवणेंकेलातेंवदावें ॥ ९ ॥ प्रल्हादह्मणे
भेदस्वपर ॥ अज्ञानीजाणतीनर ॥ विचारेंकरूनीसाचार ॥ माझ्याठायींनसेतें ॥ १० ॥ सर्वंठायींसमसमान ॥ स-
दानंदेनारायण ॥ ऐसीमाझीभावनापूर्ण ॥ सत्यजाणआचार्या ॥ ११ ॥ संपादावयाज्याचेंज्ञान ॥ मोहपावतीब्र-
ह्मादिआपण ॥ तेणेंमोहिलेंमाझेंमन ॥ लोहचुंबकवत्श्रीहरीनें ॥ १२ ॥ त्याश्रीकृष्णाचेइच्छेंनिश्चिती ॥ मातेंजा
हलीऐसीमती ॥ ऐसीऐकूनिवचनोक्ति ॥ कविकुमरखवळले ॥ १३ ॥ शंडामर्कबोलतीवचन ॥ कुलांगारजाह-
लाउत्पन्न ॥ येणेंआमुचाधर्मपावन ॥ सागरामाजीबुडविला ॥ १४ ॥ दैत्यकुळउत्पाटन ॥ करायाकुठारविष्णु

पूर्ण॥ प्रल्हादें दंडरूपी होऊन॥ अनर्थ येथें मांडिला॥ १५॥ तर्जन गर्जनादि पद्धति॥ सामें तया भेड साविती॥ परंतु तो दैत्यभाव चित्तीं॥ धारण किमपि करीना॥ १६॥ नंतर प्रल्हादासी घेऊनि त्वरित॥ सभेंत आले पुरोहित॥ सिंहासनीं पाहूनि तात॥ पुत्रें वंदन पैं केलें॥ १७॥ चिरंजीव हा आशीर्वाद भला॥ पित्यानें कुमरासी दिधला॥ आनंदयुक्त ते वेळां॥ प्रेमालिंगनीं मिसळे तो॥ १८॥ हे धर्म तया अंकावर॥ घेता जाहला असुरेश्वर॥ मुख कुरवाळूनि वारंवार॥ मधुरोत्तरें विचारी॥ १९॥ दैत्येंद्र ह्मणे प्रल्हादास॥ गुरुसन्निध केला अभ्यास॥ तो चि निवेदीं सावकाश॥ सन्निधर माझ्या बालका॥ २०॥ ऐसी परिसूनि यांची वाणी॥ हरिभक्त बोले ते क्षणीं॥ अभ्यास करितों दिवसयामिनी॥ तो चि सर्व अवधारा॥ २१॥ ॥श्लोक॥ प्रल्हाद उवाच॥ श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्॥ अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम्॥ २३॥ टीका॥ प्रल्हाद ह्मणे परिसा वचन॥ श्रीविष्णूचें श्रवण कीर्तन॥ स्मरण आणि पादसेवन॥ अर्चन वंदन दास्य तें॥ २२॥ सख्य आत्मनिवेदन॥ ऐशी भक्ती नवलक्षण॥ पुरुषें आचरूनि कृष्णार्पण॥ निरभिमान करावी॥ २३॥ पुत्रवाक्य ऐसें ऐकतां॥ हिरण्यकशिपु जाहला बोलता॥ त्रक्क पुत्रांसी तत्त्वतां॥ अरुणनेत्र करूनी॥ २४॥ गुरुपुत्र हो परिसा साचार॥ पढविलें पुत्रासी शास्त्र असार॥ कुलविरुद्ध हा प्रकार॥ काय ऐसा बोधिला॥ २५॥ तुह्मी माझे मित्र होतां॥ ते जाहलां तशत्रु आतां॥ या परी वाक्य ऐकतां॥ शंडामर्क बोलती॥ २६॥ हे इंद्रशत्रो परिसें मात॥ न आह्मीं पढविलें हें निश्चित॥ हा बाळ बोलतो विपरीत॥ काय आह्मीं करावें॥ २७॥ कोपाग्नि करूनी शमन॥ आसुच्यावरी आपण॥ न करावें दोषारोपण॥ दैत्यराया येधवां॥ २८॥ नारद ह्मणे धर्मासी॥ हिरण्यकशिपु बोले पुत्रासी॥ गुरुमुखींचें शास्त्र परियेसीं॥ जरी हें कांहीं असेना॥ २९॥ तरी ही बुद्धि तुला॥ कोणीं शिकविली मुला॥ तेंची

कथींगा मला ॥ शंका न मनीं धरावी ॥ ३० ॥ पितृवचन ऐकूनियां परी ॥ प्रल्हाद बोले ते अवसरीं ॥ बुडाला जो संसार कां-
तारीं ॥ तयाहीं बुद्धी नातुडे ॥ ३१ ॥ कवणें ही उपदेशितां ॥ न लाधे कीं स्वभावता ॥ शरण गेलिया विणसंतां ॥ श्रीकृ
ष्णावार्ता दुर्लभ ॥ ३२ ॥ ऐसें ऐकतां ची वचन ॥ दैत्य झाला कोपायमान ॥ मांडी वरूनी नंदन ॥ देई लोटुन पृथ्वीवरी ३३ मग
दैत्यांसी बोले वचन ॥ करा पुत्र प्राणहरण ॥ नाना उपायें करून ॥ वध याचा करावा ॥ ३४ ॥ बांधावा गजाचे पायांत
ळीं ॥ लोटूनि द्यावा पर्वतार खालीं ॥ कीं नेऊनि बुडवा अगाधजळीं ॥ किंवा भाजा अग्नींत ॥ ३५ ॥ मोठे तिरवट विखार-
आणूनि डंसवा सत्वर ॥ अथवा विष देऊनि भयंकर ॥ अप्राण पुत्र करावा ॥ ३६ ॥ कीं अभिचार मंत्रें करून ॥ करा या
चें अग्नींत हवन ॥ तैसें विषाचें भोजन ॥ दुष्ट पुत्रा करवावें ॥ ३७ ॥ ऐसें परिसूनि आज्ञोत्तर ॥ तद्वत करिती असुर ॥
परी हरिभक्तासी विकार ॥ तयापासूनी होईना ॥ ३८ ॥ मग शंडामर्क बोलती ॥ राया परिसें एक युक्ति ॥ शुक्राचा-
र्य जंव येती ॥ कारागारीं यारक्षावें ॥ ३९ ॥ तें वरुणपाशें बद्ध करून ॥ शाळेंत करूनीत याचें रक्षण ॥ दैत्य शास्त्र प-
ढविती पूर्ण ॥ प्रल्हाद कांहीं न मानी ॥ ४० ॥ गुरु गृहकृत्यासि जातां ॥ अवसर सांपडे हरिभक्ता ॥ तेंजा हला बालकां-
सी बोलला ॥ आत्मज्ञान संतोषें ॥ ४१ ॥ अन्य बालकें क्रीडा करिती ॥ बोधें तयांची वळवूनि वृत्ती ॥ जेणें लागे लतयां-
भक्ती ॥ ऐसाच करी उपदेश ॥ ४२ ॥ तीं सर्व बालकें मिळून ॥ प्रल्हादासी करिती वंदन ॥ सद्भावें करूनि सन्मान ॥ शां
तचित्तें बैसलीं ॥ ४३ ॥ मग प्रल्हाद तयांसी ॥ बोलता जाहला सौख्यराशी ॥ नारद ह्मणे युधिष्ठिरासी ॥ अग्रभागीं
परिसावें ॥ ४४ ॥ श्रीमद्भागवत सारामृत ॥ सप्तम स्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ पंचमाध्याय गोड
हा ॥ ४५ ॥ ५ ॥ षष्ठाध्याय प्रारंभः ॥ ॥ प्रल्हाद बोले बालकांसी ॥ परिसा वचन सौख्यराशी ॥ वेदांत शास्त्र निष्कर्षा-

सी॥ भावें करूनि अवधारा ॥ १॥ ॥ श्लोक ॥ प्रल्हाद उवाच ॥ कौमार आचरेत्प्राज्ञो धर्मान् भागवतानिह ॥ दुर्लभं मानुषं जन्म तदप्यध्रुवमर्थदम् ॥ १॥ टीका ॥ सज्ञानें मनुष्यजन्मांत ॥ आचरावे धर्म भागवत ॥ तरीच पुरुषार्थ निश्चित ॥ न-या लागीं जाणिजे ॥ २॥ तयांत अवस्था कौमार ॥ प्राप्त होतां मनोहर ॥ तेव्हांपासूनि सर्वेश्वर ॥ नारायण भजावा ॥ ३॥ नृजन्म दुर्लभ बहुत ॥ यास्तव या जन्मीं भागवत ॥ धर्माचें आचरण पुनीत ॥ यथासांग करावें ॥ ४॥ संचित क्रियमाणें-निश्चितीं ॥ सुखदुःखें पुढें धांवती ॥ यत्नावांचूनि तयांची प्राप्ती ॥ सहज होती दैत्य हो ॥ ५॥ ऐशा सुखाकरितां सकळ व्यर्थ करिती मनीं तळमळ ॥ आयुष्य घालविती सोज्वळ ॥ काय त्यांसी ह्मणावें ॥ ६॥ संसारीं पुरुषासी निश्चित ॥ जन्मभरी न मिळे क्षेम किंचित ॥ दुःखसागरीं बुडे सतत ॥ तरणोपाय गवसेना ॥ ७॥ शिश्नोदरपरायण ॥ हा प्राणी होऊनि आपण ॥ सौख्य भोगिती पूर्ण ॥ ह्मणे धन्य मी त्रैलोक्यीं ॥ ८॥ पुरुषायुवर्षशत ॥ तयाचें अर्ध होतें व्यर्थ ॥ निद्रा मैथुनीं निश्चित ॥ रजनींत काळ जो जातो ॥ ९॥ बाळपण कुमारपण ॥ वीस वर्षंपर्यंत जाण ॥ अवशिष्ट थोडें तरुणपण ॥ पुढती जरा जाणिजे ॥ १०॥ तारुण्यांत पुरुष उन्मत्त ॥ होतो तैसा विषयासक्त ॥ तो न स्मरे सुखें भगवंत ॥ तेणें घात आपुला कीं ॥ ११॥ ह्मणूनि जों काळपर्यंत ॥ मन जाहलें नाहीं विषयासक्त ॥ तोंवरी साधुसंग पुनीत ॥ शीघ्र करावा दानव हो ॥ १२॥ केवळ कुटुंबपोषणांत ॥ आयुष्य घालवून ये व्यर्थ ॥ द्रव्यार्जनाकरितां ताप बहुत ॥ उत्पन्न होती प्राणियां ॥ १३॥ तपा करितां कुटुंबाचा ॥ त्याग करावा साचा ॥ मार्ग धरावा परमार्थाचा ॥ परमसौख्याकारणें ॥ १४॥ आनंदरूपें ईश्वराचें केवळ ॥ चिंतन करावें मनीं मंगळ ॥ सर्वभूतीं होऊनि दयाळ ॥ असुरभाव सांडावा ॥ १५॥ धर्मार्थ आणि काम ॥ हे त्यागूनि परम ॥ भक्ती करावी निष्काम ॥ सात्विक भावें करूनियां ॥ १६॥ परपुरुषाचे ठायीं ॥

मनअर्पावेंलवलाहीं ॥ आपणहोऊनिविदेहीं ॥ जगामाजीवर्त्तावें ॥ १७ ॥ भागवतधर्माचरण ॥ दैत्यहोकरितांपाव-
न ॥ तुह्मांसीप्रसन्नभगवान ॥ होऊनिकामपुरवीलकीं ॥ १८ ॥ जरीश्रीकृष्णतुष्टजाहला ॥ मगकायउणेंभक्ताला ॥
चारीपुरुषार्थत्याचेघराला ॥ आपोआपपैंयेती ॥ १९ ॥ ऐसेंऐकतांदैत्यबाळें ॥ प्रल्हादासीह्मणतीतेवेळें ॥ हेंज्ञान
कोठेंअभ्यासिलें ॥ तेंचिआह्मांसांगावें ॥ २० ॥ कारणतुह्मीआह्मीपाहीं ॥ गुरूसन्निधपढतोंदिवसकांहीं ॥ ऐसें-
ज्ञानगुरूसीनाहीं ॥ ह्मणूनियांविचारितों ॥ २१ ॥ ऐसेंऐकूनियांवचन ॥ बोलताजाहलाकयाधूनंदन ॥ सत्समाग
महोतांपूर्ण ॥ ज्ञानउत्पन्नपैंहोतें ॥ २२ ॥ पुनः दैत्यबालकबोलती ॥ प्रल्हादासर्वदातुझीवसती ॥ अंतःपुरींअसतां-
निश्चिती ॥ कोठेंसत्संगलाधला ॥ २३ ॥ हासंशयआमुचा ॥ प्रल्हादाफेडीसांचा ॥ गौरवकरूनीसाचा ॥ बोलताजाह-
लाभागवत ॥ २४ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ सप्तमस्कंधपरमपुनीत ॥ शाह्लूलसरवारामविरचित ॥ षष्ठाध्याय
गोडहा ॥ २५ ॥ ६ ॥ ॥ सप्तमाध्यायप्रारंभः ॥ प्रल्हादह्मणेबाळकांसी ॥ माझाजनकसोरव्यराशी ॥ गेलियावरीत
पासी ॥ कायवृत्तजाहलें ॥ १ ॥ देवांनींप्रबळहोऊन ॥ समरींजिंकिलेदैत्यगण ॥ तयींकरूनीमन्माताहरण ॥ मघ-
वाघेऊनीचालिला ॥ २ ॥ संकटदेखूनियापरी ॥ माझीमाताशोककरी ॥ तोपरिसूनिझडकरी ॥ नारदतेथेंपातला ३
इंद्रासीह्मणेनारद ॥ बापरिसेंहितबोध ॥ तूंमहाविक्रमीप्रसिद्ध ॥ निंद्यकर्मकरूंनको ॥ ४ ॥ सगर्भआहेकयाधूसुं-
दर ॥ ह्मणूनिऐकेंसाचार ॥ करूंनोइयेचाअनादर ॥ शीघ्रजावेंयेथवां ॥ ५ ॥ ऐसीइंद्रापासूनीत्वरित ॥ सोडवूनि
आपुलेआश्रमांत ॥ मन्मातानेऊनिमुनिनाथ ॥ रक्षणकरिताजाहला ॥ ६ ॥ तेथेंनारदेंसद्भावें ॥ आत्मज्ञानकथा-
वें ॥ तेंसाग्रमींश्रवणकरावें ॥ मातेसीउमजपडेना ॥ ७ ॥ मित्रहोजोंकालपर्यंत ॥ काननींपिताहोतातपत ॥ ताव

कालपर्यंत॥गर्भवासम्यांकेला॥ ८॥ गर्भीदिवसलोटिलेकिती॥ह्मणालतरीऐकासांप्रतीं॥सहस्रवर्षेपरिमिती
काळअतिक्रांतजाहला॥ ९॥जेंज्ञानगर्भीऐकिलें॥तेंतुह्मांसीकथितोंपहिलें॥नारदाचींचिंतूनिपाउलें॥बोलताहों
यमागुती॥१०॥प्राणीजन्मासिआलियावरी॥षड्रिपुउपद्रवकरितीभारी॥आत्मारामहृदयमंदिरीं॥देहामाजीनि
रुपद्रव॥११॥अव्ययअखंडअभंग॥अविरअद्वितीयसांग॥गुणागुणकर्मप्रसंग॥तयासीकांहींबाधेना १२
एकक्षेत्रज्ञअविकारी॥जोव्यापकसर्वांतरीं॥तयासीशोधूनिविचारीं॥मनामाजीजाणावें॥१३॥प्रपंचमानावा
स्वप्नवत्॥हरिभक्तिकरावीसदोदित॥सद्गुरुसेवाकरूनीत्वरित॥ज्ञानाभ्याससंपादावा॥ १४॥सर्वांभूतींपाव
न॥करावेंब्रह्मावलोकन॥हेबाळकहोभगवान्॥हृदयामाजीनांदतो॥१५॥तयाचेंआराधन॥करावयानकों-
व्रतदान॥आत्मोपम्येंसर्वभूतींचिंतन॥करितांदयाघनसांपडे॥१६॥अमलभक्तियोगेंहरि॥संतुष्टहोयसर्वप-
री॥स्त्रीशूद्रादिपापजीवनिर्धारीं॥याचिपथेंतरलेकीं॥१७॥श्रीमद्भागवतसारामृत॥सप्तमस्कंधपरमपुनीत॥
प्राकृतसखारामविरचित॥सप्तमाध्यायगोडहा॥१८॥ ७ ॥अष्टमाध्यायप्रारंभः॥नारदह्मणेधर्मनृपाळा॥
प्रल्हादेंबोधिलेंदैत्यबाळां॥तेणेंतयांचादुष्टभावसगळा॥नष्टजाहलातात्काळ॥१॥सर्वजाहलेनिष्ठावंत॥धर्म
आचरावयाभागवत॥भूतमात्रींभगवंत॥पाहूनिशांतबैसले॥२॥तोंगुरूआलेअवचिती॥शाळेंतपाहतीबा-
ळकांचीरीती॥असुरभावपालटूनिचित्तीं॥नारायणभरियेला॥३॥ऐसेंपाहूनिसकळबाळ॥गुरुकरितीतळम
ळ॥जाऊनिदैत्येंद्राजवळ॥वर्तमानसांगती॥४॥ह्मणतीरायापरिसेंनिकें॥प्रल्हादेंभ्रंशविलींबाळकें॥आपण
भ्रष्टहोऊनिकौतुकें॥नारायणाजपतोकीं॥५॥ऐसातुझाकुलांगार॥पुत्रजन्मलापृथ्वीवर॥आह्मीनिषेधक-

रितांफार ॥ श्रवणकांहींकरीना ॥ ६ ॥ वचनऐकूनियांपरी ॥ दैत्येंद्रकोपलातेअवसरीं ॥ सभेंतपुत्रापाचारी ॥ दु-
ष्टोत्तरींबोलेतया ॥ ७ ॥ हेपुत्राधमाचांडाळा ॥ हेअपवित्राभ्रष्टखळा ॥ कलंकलाविसीमाझ्याकुळा ॥ आतांतु-
जलामारितों ॥ ८ ॥ सांप्रतयेथेंअवलोकीं ॥ तुजधाडितोंयमलोकीं ॥ मीमान्यअसूनित्रिलोकीं ॥ अवज्ञाकरिसी
तूंएक ॥ ९ ॥ आतांतुझेंअंतकाळीं ॥ रक्षणकरणारकवणबळी ॥ त्यातेंपाचारींयेवेळीं ॥ कवणकैसापाहूंदे ॥ १० ॥ ऐ-
सीपरिसूनियांमात ॥ बोलेप्रल्हादभागवत ॥ दैत्यरायाभगवंत ॥ असेव्यापसचराचरीं ॥ ११ ॥ तोचिब्रह्मसनातन ॥ क-
रीलमाझेंसंरक्षण ॥ कवणवधावयामजलागून ॥ समर्थब्रह्मांडमंडपीं ॥ १२ ॥ आतांइच्छितअसेंजेंमनीं ॥ तेंचिकरी
येक्षणीं ॥ यापरीपुत्रोक्तिपरिसूनी ॥ ब्रह्मराक्षसखवळला ॥ १३ ॥ हिरण्यकशिपुह्मणेदेख ॥ तूंह्मणतोसीतोसर्व-
व्यापक ॥ तरीयासभेंतप्रत्येक ॥ स्तंभींव्यापअसेकीं ॥ १४ ॥ सुतह्मणेस्तंभींकैसानाहीं ॥ सर्वव्यापकअसेतोपा-
हीं ॥ दैत्यह्मणेवधितोंएक्याघायीं ॥ खड्गेंकरूनीशत्रूतें ॥ १५ ॥ ऐसेंह्मणूनिसत्वर ॥ स्तंभींकेलामुष्टिप्रहार ॥ तों-
तात्काळतयांतगरगर ॥ शब्दभयंकरजाहला ॥ १६ ॥ दशदिशाजाहल्यानादित ॥ वसुंधराहोतसेकंपित ॥ मे-
घगर्जनाकरितीबहुत ॥ समुद्रक्षुभितजाहला ॥ १७ ॥ नक्षत्रमालिकातयेवेळीं ॥ पृथ्वीवरीपतनपावली ॥ नि-
शासुरवींवनमाळी ॥ नृसिंहरूपेंप्रगटला ॥ १८ ॥ मृगनाहींमानवनाहीं ॥ ऐशावेषेंशेषशायी ॥ स्तंभांतूनिलवला-
हीं ॥ बाहेरतेंनिघाला ॥ १९ ॥ तप्तसुवर्णासमान ॥ लखलखितजयाचेलोचन ॥ विक्राळदाढाभयानकपूर्ण ॥
गिरिकंदरवतपसरिल्या ॥ २० ॥ स्तब्धोर्ध्वकर्णजयाचे ॥ तीक्ष्णनखेंआयुधेंसाचें ॥ नरहरिरूपभगवंताचें ॥ दे-
खूनिबोलेदैत्यतो ॥ २१ ॥ अहोमाझ्यावधासाठीं ॥ ऐसाप्रगटलाजगजेठी ॥ पाठिराखाभक्तसंकटीं ॥ धांवघे-

तोहेंसाच ॥ २२ ॥ असोआतांकायकरावें ॥ आलियाप्रसंगाअनुसरावें ॥ मरावेंकींमारावें ॥ जयाजयदेवाधीन ॥
२३ ॥ ऐसेंबोलनिदैत्यकुंजर ॥ कोपेंधांवलाअंगावर ॥ नरहरितेजींप्रखर ॥ पतंगवत्शोभला ॥ २४ ॥ दैत्य घे-
ऊनियांगदा ॥ मारिताजाहलागोविंदा ॥ करूंपाहेमस्तकचेंदा ॥ तंवतोनृसिंहेंघेतला ॥ २५ ॥ मगचर्मखड्ग घे-
ऊनिकरीं ॥ मागुतीधांवलाझडकरी ॥ अट्टहासकरूनिभारी ॥ निकरेंकरीयुद्धातें ॥ २६ ॥ सर्पधरीजेसाउंदिर ॥
कींगरुडजेसाफणिवर ॥ तैसानृसिंहेंधरूनिअसुर ॥ अंकावरीघेतला ॥ २७ ॥ संध्याकाळींदारुण ॥ दैत्यहृद-
यविदारण ॥ करिताजाहलानखेंकरून ॥ ईशसनातनसक्रोधें ॥ २८ ॥ अंत्रमालिकाकाढनितेवेळां ॥ भूषणरू-
पघालीगळा ॥ आरक्तजिह्वालळलळा ॥ अधरप्रांतींविराजे ॥ २९ ॥ गतप्राणदेखूनिअसुरें ॥ लोटूनिदिधलापृ-
थ्वीवर ॥ दैत्यकरितीहाहाकार ॥ सुरवरआनंदपावले ॥ ३० ॥ देवांसीहर्षहोऊन ॥ पुष्पेंवर्षतीतेपावन ॥ गंध-
र्वअप्सराकरितीगायन ॥ सिद्धचारणस्तविताति ॥ ३१ ॥ देवगणऋषिगण ॥ यक्षकिन्नरचारण ॥ अखिलकरि-
तीस्तवन ॥ नृसिंहदेवरायाचें ॥ ३२ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ सप्तमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचि-
त ॥ अष्टमाध्यायगोडहा ॥ ३३ ॥ ८ ॥ नवमाध्यायप्रारंभः ॥ ॥ नारदह्मणेअगाधर्मा ॥ महाभागवतासार्वभौमा ॥
श्रीहरिभक्तीचाप्रेमा ॥ अखंडतूजपेंअसो ॥ १ ॥ हिरण्यकशिपुवधिलियावर ॥ कायजाहलाप्रकार ॥ नृसिंहपाहू-
नीभयंकर ॥ सन्निधकोणीनजाती ॥ २ ॥ उभेराहूनिसमोर ॥ स्तवनकरितीसुरवर ॥ परीनरहरीकोपप्रखर ॥ शां-
तनाहींजाहला ॥ ३ ॥ ऐसेंजाणूनितयेवेळा ॥ विधीनेंधाडिलीपुढेंकमळा ॥ अद्भुतरूपपाहूनिडोळां ॥ मनामाजी
शंकली ॥ ४ ॥ मगविचारकरूनीमानसीं ॥ विधीनेंपाठविलेंप्रल्हादासी ॥ तोताक्काळजाऊनिचरणासी ॥ घाली

मिठीसप्रेम ॥ ५ ॥ हरिभक्तजोडूनिकर ॥ स्तवनकरीमनोहर ॥ हेविश्वपालकाजगदाधार ॥ कृपासागरासर्वेशा ॥ ६
पुराणपुरुषाश्रीपती ॥ आगमनिगमतुजस्तविती ॥ ब्रह्माइंद्रउमापती ॥ ध्यानकरितीसकळिक ॥ ७ ॥ तुझेंउग्ररूप
पाहून ॥ ब्रह्मादिसर्वसुरगण ॥ करावयाशांतवन ॥ शक्तनजाहलेयेधवां ॥ ८ ॥ ऐसाश्रीहरिनारायण ॥ माझेस्त
वनेंकरूनीजाण ॥ होईलकैसाप्रसन्न ॥ शंकामनींवाटते ॥ ९ ॥ बहुधनसत्कुळींजनन ॥ सौंदर्यतपपंडितपण ॥
इंद्रियनैपुण्यकांतिपूर्ण ॥ प्रतापतनुबळजाणिजे ॥ १० ॥ उद्यमप्रज्ञाअष्टांगयोग ॥ द्वादशगुणांचाउद्योग ॥ केला
जरीयथासांग ॥ तरीश्रीरंगनातुडे ॥ ११ ॥ भक्तीकरूनीहरी ॥ करीसांपडतोसत्वरी ॥ करीपडतांसंकटीसरीं ॥ स्तवि
तांमुरारीधांवला ॥ १२ ॥ ॥ श्लोक ॥ विप्राद्द्विषड्गुणयुतादरविंदनाभपादारविंदविमुखाच्छ्वपचंवरिष्ठम् ॥ म-
न्येतदर्पितमनोवचनेहितार्थप्राणंपुनातिसकुलंनतुभूरिमानः ॥ १० ॥ टीका ॥ पूर्वोक्तहा द्वादशगुण ॥ यांहींसं
पन्नजरीब्राह्मण ॥ हरिपदींविमुखहोऊन ॥ जगींराहेसर्वदा ॥ १३ ॥ तरीतयाहूनिजाणास्पष्ट ॥ चांडाळअसेमहा-
वरिष्ठ ॥ कायावाचामनेंवैकुंठ ॥ सदाचित्तींधरीजो ॥ १४ ॥ त्यागुणेंतोभागवत ॥ स्वकुळसर्वतारीनिश्चित ॥ विप्रगर्वेंसदा
व्याप्त ॥ श्रीकृष्णआसत्यानाहीं ॥ १५ ॥ हेअजितानारायणा ॥ कृपाघनासौख्यसदना ॥ विनवणीआणावीमना ॥
चित्तदेऊनियेक्षणीं ॥ १६ ॥ प्रभोनेत्रतुझेअर्कसमान ॥ भृकुटीयात्याचंचळजाण ॥ तीक्ष्णदाढाकंठींपूर्ण ॥ अंत्रमाळा
पैंशोभे ॥ १७ ॥ केशउभेभाल्यापरी ॥ स्तब्धकर्णउभेवरी ॥ अत्यंतभयंकरकरी ॥ सिंहनादमुखानें ॥ १८ ॥ ऐसेंउग्ररू
पघेऊन ॥ केलेंभक्ताचेंअवन ॥ माझेपित्याचेंविदारण ॥ क्रोधेंकरूनीबाकेलें ॥ १९ ॥ घेऊनियुगायुगींअवतार ॥ उ
तरितापृथ्वीचाभार ॥ जेकामातलेअसुर ॥ त्यांचासंहारकरिताकीं ॥ २० ॥ भक्तसुरपादपागोविंदा ॥ सच्चिद्रूपा-

आनंदकंदा ॥ प्रार्थनाकरूनी मुकुंदा ॥ मागणें हें चीमागतों ॥ २१ ॥ त्रैलोक्याचीसंपत्ती ॥ नकोमजलाश्रीपती ॥ ज-
न्मोजन्मींतुझीभक्ती ॥ दास्यप्रीतीबादेई ॥ २२ ॥ श्लोक ॥ तत्तेऽर्हत्तमनमःस्तुतिकर्मपूजाः कर्म स्मृतिश्चरण-
योःश्रवणंकथायाम् ॥ संसेवयात्वयिविनेतिषडंगयाकिंभक्तिंजनःपरमहंसगतौलभेत ॥ ५० ॥ टीका ॥ या
स्तुतीचाउपसंहार ॥ एक्याश्लोकींकरूनिसाचार ॥ चरणींनिवेदनसुंदर ॥ देवाधिदेवाकरितोसी ॥ २३ ॥ पूजा
प्रणामस्तुति ॥ सर्वकर्मार्पणनिश्चिती ॥ परिचर्याचरणांचीस्मृती ॥ कीर्तनश्रवणअखंड ॥ २४ ॥ याषडंगलसे
वेवीण ॥ परमहंसांसीहीजाण ॥ नहोयंपरमगतिपूर्ण ॥ ह्मणूनभक्तीतेद्यावी ॥ २५ ॥ भक्तीवांचूनिमुक्ती ॥ आ
हेअप्राप्तत्रिजगतीं ॥ सेवेवांचूनिनाहींभक्ती ॥ यास्तवदास्यमजद्यावें ॥ २६ ॥ नारदह्मणेधर्मासी ॥ प्रल्हादेंऐसें
श्रीहरीसी ॥ स्तवितांतुष्टहोऊनिमानसीं ॥ बोलताजाहलापरमात्मा ॥ २७ ॥ श्रीभगवानुवाच ॥ श्लोक ॥
प्रल्हादभद्रभद्रंतेप्रीतोऽहंतेऽसुरोत्तम ॥ वरंवृणीष्वाभिमतंकामपूरोऽस्म्यहंनृणाम् ॥ ५२ ॥ मामप्रीणत-
आयुष्मन्दर्शनंदुर्लभंहिमे ॥ दृष्ट्वामांनपुनर्जंतुरात्मानंतप्तुमर्हति ॥ ५३ ॥ टीका ॥ श्रीनृसिंहबोलेप्र
ल्हादासी ॥ असुरोत्तमागुणराशी ॥ अखंडकल्याणतुजसी ॥ प्राप्तअसोभागवता ॥ २८ ॥ आहेंप्रसन्नमी
तुजला ॥ वरअभीष्टमागेंमला ॥ तोतुजदेतोंयेवेळा ॥ नधरींशंकामानसीं ॥ २९ ॥ भक्तकामकल्पद्रुम ॥ मज
बोलतीआगमनिगम ॥ हेंआयुष्मनपूर्णकाम ॥ अखिलकरितोंतुझामी ॥ ३० ॥ भक्तियोगेंकरूनिजाण ॥ न
करीजोआराधन ॥ तयांदुर्लभमाझेंदर्शन ॥ सत्यपूर्णप्रल्हादा ॥ ३१ ॥ मद्दर्शनहोतांमागुती ॥ अपूर्णकामआ
पुलेचित्तीं ॥ राहूनिशोकसागराप्रती ॥ नपाहेकल्यांतींनिश्चयें ॥ ३२ ॥ नारदह्मणेयुधिष्ठिरा ॥ श्रीहरीनेंदा-

विलालोभखरा ॥ परीप्रन्हादें तयाचाआसरा ॥ कांहींनकेलाविरागें ॥ ३३ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ सप्तमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ नवमाध्यायगोडहा ॥ ३४ ॥ ९ ॥ दशमाध्यायप्रारंभः ॥ ॥ नारद म्हणेपांडवासी ॥ मागेंप्रन्हादभक्तांसी ॥ तयेंवाचुनीतयासी ॥ अशाश्वतभासलें ॥ १ ॥ मग बोलेकरजोडून ॥ हे नरहरेसीमुमुक्षुजन ॥ म्हणूनिधरिलेतुझेचरण ॥ कायकारणलोभाचें ॥ २ ॥ मीअकामतुझाभक्त ॥ सेवोकरीन दिवसरात ॥ चरणकमळींवंदनेंशात ॥ माझींअसोतकेशवा ॥ ३ ॥ यापरीऐकूनिवाणी ॥ कायबोलेचक्रपाणी ॥ मन्वंतरपर्यंतदैत्येंद्रहोऊनी ॥ राज्यकरीपृथ्वीचें ॥ ४ ॥ सर्वभूतींअवलोकन ॥ करीप्रन्हादामजलागून ॥ तेणें होईलसमाधान ॥ अंतींमजपावसी ॥ ५ ॥ प्रन्हादापरिसेंमात ॥ तुवांस्तविलेंमातेंबहुत ॥ याचेंश्रवणपठनेंपुनीत ॥ प्राणीहोईलनिश्चयें ॥ ६ ॥ कर्मबंधनापासून ॥ मुक्तहोईलनलगतांक्षण ॥ मागुती प्रन्हादआपण ॥ बोलताजाहलानृहरीतें ॥ ७ ॥ माझ्याजनकेंफार ॥ तुम्हांसि केलेंवैर ॥ यास्तवतयाभयंकर ॥ नरकप्राप्तहोऊंनये ॥ ८ ॥ यापरीपरिसूनिमात ॥ कायबोलिलाभगवंत ॥ वत्सापरिसेंनिश्चित ॥ विकल्पचित्तींनधरीबा ॥ ९ ॥ तुझ्यासारिखाहरिभक्त ॥ होयजयाचेवंशांत ॥ एकविंशतिपुरुषांसहित ॥ पवित्रहोयतोनिश्चयें ॥ १० ॥ ऐसेंवरप्रदानकरून ॥ श्रीहरीपावलेअंतर्धान ॥ पित्याचें उत्तरकार्यसारून ॥ प्रन्हादराज्यींबैसला ॥ ११ ॥ सकळजाहलेहर्षनिर्भर ॥ स्वस्थानींगेलेसुरवर ॥ विष्णुपार्षदाख्यानसुंदर ॥ तुजलागींकथिलेंहें ॥ १२ ॥ तेचिरावणकुंभकर्णकुमती ॥ होतेजाहलेयाजगतीं ॥ रामचंद्रेंजाऊनिलंकेप्रती ॥ ससैन्यदोघांवधियेलें ॥ १३ ॥ तेचीशिशुपाळवक्रदंत ॥ ग्रस्तहोऊनिउन्मत्त ॥ वासुदेवासीद्वेषकरीत ॥ हेंतुजअसेठाउकें ॥ १४ ॥ वैरभावेंतात्काळ ॥ तुझे

सभेंतशिशुपाळ॥आपणचीयादवपाळ॥होऊनिबैसलाअखंड॥१५॥तुझ्याप्रश्नाचेंउत्तर॥दिधलेंरायामनो
हर॥याभूमंडळींभाग्यथोर॥मजतुझेंभासलें॥१६॥अगासर्वऋषिगण॥तुझ्यागृहींबैसतीयेऊन॥सा
क्षात्ब्रह्मसनातन॥श्रीकृष्णाभृत्यापरीराहे॥१७॥जयानेणतीब्रह्मादिसुर॥जगद्रक्षणार्थज्याचाअवतार॥
रुद्रयशनष्टहोतांसाचार॥येणेंचिपूर्वींरक्षिलें॥१८॥शुकह्मणेपरीक्षिता॥ऐकूनिनृसिंहचरितामृता॥पुनः
युधिष्ठिरहोयपुसता॥नारदमुनीकारणें॥१९॥श्रीहरिकरुणासागर॥अनुग्रहकरीशिवावर॥संक्षिप्ततयाचा
प्रकार॥मजलागींनिवेदीं॥२०॥तेंनारदसांगेपूर्ववृत्त॥रायापरिसेंचरितामृत॥शंकरयशरक्षीरमानाथ॥अ-
द्भुतवृत्ततेंअसे॥२१॥सुरपराभूतदानव॥मयासुराशरणगेलेसर्व॥तेंतेणेंपुरत्रयअभिनव॥निर्मूनिलयां
दीधलें॥२२॥तेंअसुरहोऊनिउन्मत्त॥त्रैलोक्यजिंकितीसमस्त॥त्रिपुरारूढभ्रमतीनिश्चित॥स्वेच्छेंकरूनी
निर्भय॥२३॥तेंसुरप्रार्थितमहादेव॥समरींमारीदानव॥तेंअमृतकूपींटाकूनिअभिनव॥मयासुरजीव-
वीत्यां॥२४॥सदाशिवतेव्हांहोयखिन्न॥ऐसेंपाहूनिनारायण॥विधिवत्साऽसहगोरूपेंआपण॥अमृत-
कूपप्राशीतसे॥२५॥मगअभिजित्सुहूर्तीं॥शिवासीसांगेरमापती॥आतांयुद्धकरितांदैत्यमरती॥वि-
लंबकांहींअसेना॥२६॥तेंधनुष्यासीलावूनिबाण॥युद्धींकेलेंत्रिपुरदाहन॥शंकरास्तवितीसुरगण॥हर्ष
सकळांजाहला॥२७॥श्रीमद्भागवतसारामृत॥सप्तमस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥दशा-
माध्यायगोडहा॥२८॥ १० ॥ एकादशाध्यायप्रारंभः ॥युधिष्ठिरह्मणेविधिसुता॥वर्णाश्रमाचारभागवता
मजनिरूपींआतां॥कृपाकरूनीतारक॥ १ ॥जेणेंकरूनीपाहीं॥भक्तिज्ञानमानवाकांहीं॥प्राप्तहोतेंलवला-

हीं ॥ तेचि धर्म सांगावे ॥ २ ॥ ऐसें ऐकूनियां वचन ॥ वंदूनि श्रीहरीचे चरण ॥ बोलते जाहले नारद आपण ॥ धर्मरा-
ज अवधारी ॥ ३ ॥ नारायणमुखापासूनि निश्चित ॥ श्रवण केले धर्म पुनीत ॥ तेचि कथितों समस्त ॥ तुजलागीं
नृपश्रेष्ठा ॥ ४ ॥ सत्य शौच दया जाण ॥ तप तितिक्षा पावन ॥ युक्तायुक्त विवेकपूर्ण ॥ शमदम आणि अहिंसा ॥ ५ ॥
ब्रह्मचर्य स्वाध्याय दान ॥ संतोष आर्जव महत्सेवन ॥ प्रवृत्तिनिवृत्ति कर्मे जाण ॥ निष्कामभावें आचरावीं ॥ ६ ॥
मौन आत्मविमर्शन ॥ अन्नसंविभाग करून ॥ सर्वांभूतीं जनार्दन ॥ अवलोकन करावा ॥ ७ ॥ श्रवणादि नववि-
धा भक्ति ॥ करावी धरूनी विरक्ति ॥ अखंड विषयीं आसक्ति ॥ करूं नये पांडवा ॥ ८ ॥ ऐसा त्रिंशल्लक्षण धर्म पाहीं
जो का आचरे दिवस कांहीं ॥ तो वैकुंठनगरीं लवलाहीं ॥ जातो संदेह असेना ॥ ९ ॥ आतां द्विजाचें लक्षण पुनीत ॥
वर्णन करितों समस्त ॥ गर्भाधानादि संस्कार पुनीत ॥ अविच्छिन्न जाहले ज्या ॥ १० ॥ तोचि जाण धरामर ॥
जयाचा पवित्र आचार ॥ षट्कर्मांचा अधिकार ॥ वेदसंमत असे तया ॥ ११ ॥ यजन आणि याजन ॥ अध्ययन
अध्यापन ॥ प्रतिग्रह आणि दान ॥ षट्कर्में या परी ॥ १२ ॥ जें धन मिळेल साचार ॥ तयाचे विभाग करावे चार
देव ब्राह्मण आणि पितर ॥ तस्मीत्यर्थ तीन वेंचावे ॥ १३ ॥ एक धनविभाग करून ॥ करावें देहाचें संरक्षण ॥ भगव
द्गुणांचें श्रवण ॥ कीर्तन करावें सद्भावें ॥ १४ ॥ हे मानवांचे धर्म ॥ आहेत कुरुपते उत्तम ॥ आचरण करितां पुरुषो
त्तम ॥ प्रसन्न होतो सर्वदा ॥ १५ ॥ नृपें प्रजा रक्षावी पुत्रापरी ॥ विप्र दंडूं नये परोपरी ॥ तयापासूनि कवणे प्रका
रीं ॥ करग्रहण करूं नये ॥ १६ ॥ वाढीदिढी करून ॥ व्यापार आणि गोरक्षण ॥ वैश्यें करूनी आपण ॥ उदरभरण
करावें ॥ १७ ॥ शूद्रें होऊनि त्रिवर्णांचे अंकित ॥ सेवा करावी दिवसरात ॥ पुराणोक्त मंत्रीं समस्त ॥ कर्मे करावीं

तयानें॥ १८॥ वेदमंत्रांचेंश्रवण॥ नकरावेंशूद्रानेंआपण॥ स्त्रियांचाधर्मपावन॥ मुख्यसेवापतीची॥ १९॥ प्रभा
तकाळींउठून॥ करावेंसडासंमार्जन॥ बंधूंसह पतीचीसेवाजाण॥ हरिमानुनकरावी॥ २०॥ श्रीमद्भागवतसा-
रामृत॥ सप्तमस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसखारामविरचित॥ एकादशाध्यायगोडहा॥ २१॥ ११॥ द्वादशा-
ध्यायप्रारंभः॥ ॥नारदह्मणेनृपनाथा॥ ब्रह्मचर्याचेधर्मआतां॥ श्रवणकरींभागवता॥ अत्यादरेंकरूनियां॥
१ गुरूनिकटराहून॥ तयाचेंकरावेंहितपूर्ण॥ दासासारिखीसेवाकरून॥ भिक्षान्नसेवनकरावें॥ २॥ सायंका
ळींप्रातःकाळीं॥ सूर्यसद्गुरूज्वाळामाळी॥ यांचेंपूजनकरूनीहृदयकमळीं॥ गायत्रीमंत्रजपावा॥ ३॥ करा
वेंवेदाचेंअध्ययन॥ करींदंडकमंडलूधारण॥ कटींमेखलाकृष्णाजिन॥ भिक्षान्नगुरूसीअर्पावें॥ ४॥ प्रमदाजनाची
कथा॥ श्रवणकरूंनयेनाता॥ केशप्रसाधनतत्वतां॥ सहसातेणेंकरूंनये॥ ५॥ गुरुस्त्रियेशींभाषणएकांतीं॥ नकरावें
दिवसरातीं॥ हेधर्मब्रह्मचारीयाचेतुजप्रती॥ कथनकेलेयुधिष्ठिरा॥ ६॥ गृहस्थाश्रमीयानेंजाण॥ विवाहितस्त्रिये
सीपूर्ण॥ ऋतुकाळींसंभोगकरून॥ प्रजोत्पादनकरावें॥ ७॥ त्रिकाळसंध्याकरून॥ पंचमहायज्ञआचरून॥ पंक्तीस
घेऊनिब्राह्मण॥ ससाक्षीभोजनकरावें॥ ८॥ वानप्रस्थधर्मनंतर॥ सांगआचरावेमनोहर॥ नित्यनूतनधान्यावर॥
उदरभरणकरावें॥ ९॥ धान्यसंग्रहपाहीं॥ आश्रमीकरूंनयेकांहीं॥ बारावर्षेंवानप्रस्थताही॥ धर्मेंकरूनीआचरावी
१० पुढेंअशक्तजाहलियाजाण॥ अनशनादिव्रतेंकरावींपूर्ण॥ आत्म्याच्याठायींअग्नीचाजाण॥ समारोपकरावा ११
पंचभूतांचेठायीं॥ देहाचालयकरावापाहीं॥ तैसाइंद्रियांचालयही॥ मनाचेठायींकरावा॥ १२॥ तेंमनभगवंतींअ-
र्पण॥ करूनिधर्मासावधान॥ नंतरदेहाचेंविसर्जन॥ यथासांगकरावें॥ १३॥ ऐसेधर्मआचरितां॥ प्राणीपावेसलो


लूनिअर्पिलें गंगोदका ॥ तो गंगेमाजी वाहतां देखा ॥ पाहूनि धरिला अधिरथें ॥ १६ ॥ ऐसा कानीन संपडला ॥ तेणें तो निज पुत्र केला ॥ कर्ण ही बोलती त्याला ॥ अखिलजन विख्यात जो ॥ १७ ॥ तयाकर्णापासून ॥ पुत्र जाहला वृषसेन-आतां द्रुह्यूचा वंश पावन ॥ श्रवण करी राजेंद्रा ॥ १८ ॥ त्या द्रुह्यूसी पुत्र जाहला ॥ बभ्रुनामक जाण पहिला ॥ सेतु नामें कुमर त्याला ॥ होऊनि सौख्य देबहु ॥ १९ ॥ आरब्ध तयाचा कुमर ॥ त्याचा पुत्र गांधार ॥ त्याचा धर्मनामें कंद-र ॥ त्याचा धृत जाणिजे ॥ २० ॥ त्याचा दुर्मना नवलतां ॥ त्यापासूनि जाहला प्रचेता ॥ शत पुत्र जाहले त्या नृपनाथा ॥ म्लेंछाधिपती ते होती ॥ २१ ॥ तुर्वसूचा वंश आतां ॥ सांग परिसें भागवता ॥ त्यातें वन्ही त्याचा भर्ग ताता ॥ उत्पन्न होता जाहला ॥ २२ ॥ तयाचा जाणा भानुमान ॥ त्याचा चित्रभानु नामें नंदन ॥ त्याचा करंधम पावन ॥ त्याचा मरुत भूपती ॥ २३ ॥ तो नृप अपुत्र जाहला ॥ तेणें पुरुवंशोत्पन्न भला ॥ दुष्यंत नामा पुत्र घेतला ॥ वंशरक्षणाकारणें ॥ २४ ॥ ययाती चा ज्येष्ठ पुत्र ॥ यदु नृप परमपवित्र ॥ महापुण्यकारक तयाचें गोत्र ॥ तुज कथितों राजेंद्रा ॥ २५ ॥ तो वंश करितां श्रवण ॥ होय पातकांचें दहन ॥ ज्या वंशीं नराकार भगवान ॥ जाहला अवतीर्ण श्रीहरी ॥ २६ ॥ त्या यदूसी सहस्रजित ॥ क्रोष्टा नल रिपु हे सुत ॥ सहस्रजिता सि शतजित ॥ त्यासी चार पुत्र जाहले ॥ २७ ॥ महाहय वेणुहय हैहय ॥ हैहयासी धर्म तनय ॥ नेत्र पुत्र तयासी होय ॥ त्यापासूनी कुंतिसाचा ॥ २८ ॥ सोहंजित पुत्र त्याचा महिष्मान ॥ तयाचा पुत्र भद्रसेन ॥ तयासी दुर्मद धनक हे दोन ॥ धनकाचे नंदन चार हे ॥ २९ ॥ कृतवीर्य कृताग्नि दुजा ॥ कृतवर्मा आणि कृतौजा ॥ कृतवीर्यासी सहस्रार्जुन राजा ॥ सप्तद्वीपींस्वामी जो ॥ ३० ॥ श्रीदत्तात्रेय प्रसादें करून ॥ योगसिद्धि पावला जो पूर्ण ॥ त्याची गती यज्ञादिकें अन्य ॥ पावणार नाहीं निश्चयें ॥ ३१ ॥ तेणें पंचायशीं हजार ॥ वर्षें पर्यंत राज्यभार ॥

धरिलातोषेंपृथ्वीवर॥ परमानंदेंकरूनियां॥ ३३॥ त्याचेपुत्रसहस्रांतीलपाहीं॥ पांचपुत्रराहिलेशेषमहीं॥ जयध्व
जशूरसेनवृषभमही॥ मधुऊर्जितजाणिजे॥ ३४॥ त्यांतीलजयध्वजासी॥ तालजंघजाहलानिश्चयेंसी॥ तयाचेंश
तपुत्रपरियसीं॥ और्वतेजेंनष्टजाहले॥ ३५॥ तयांतवीतिहोत्रज्येष्ठ॥ मधूसीवृष्णिज्येष्ठ॥ शतपुत्रजाहलेश्रेष्ठ॥
वीर्यवरिष्ठत्रिजगतीं॥ ३६॥ यदुमधुवृष्णिच्यानांवेंभलें॥ तेंकुलप्रसिद्धजाहलें॥ यदुपुत्रक्रोष्टात्यासपहिलें॥ वृ
जिनवान्अपत्य॥ ३७॥ त्याचाश्वाहिरुशेकुत्याचा॥ चित्ररथजाणातयाचा॥ शशबिंदुतत्कुमरसाचा॥ महायो
जतयापासूनी॥ ३८॥ त्यामहाभोजरायासी॥ दशसहस्रस्त्रियासौंदर्यराशी॥ मनोरमहोत्यापरियेसीं॥ शृं
गारसरोवरमराळिका॥ ३९॥ प्रत्येकीसीलक्षकुमर॥ होतेजाहलेमनोहर॥ संख्याकरितांदशसहस्र॥ लक्ष
होतीसकळते॥ ४०॥ पृथुश्रवापृथुयशाप्रभृती॥ सहात्यांतमुख्यअसती॥ ज्येष्ठासीधर्मसंतती॥ उशनातत्पुत्रजा
णपां॥ ४१॥ त्याचारुचकनृपनाथ॥ तयासीरुक्मपुरुजित॥ रुक्मेषुपृथुज्यामघपूत॥ ऐसेजाहलेराजेंद्रा॥ ४२॥
त्यांतज्यामघअप्रजअसला॥ शैब्याभयेंनवरीअन्यकांता॥ तोएकदांशत्रुगृहांतूनियेतां॥ चमत्कारजाहला॥ ४३
भोज्यानामकदुहिता॥ रथींबैसवूनियेअवचिता॥ तेंपाहूनिशैब्यास्त्रीनाथा॥ हेंकायबोलेतेधवां॥ ४४॥ हेंकपटि
यामाझ्यास्थानीं॥ हीकोणबैसविलीभामिनी॥ ऐसेंऐकूनिरावमनीं॥ भयभीतजाहला॥ ४५॥ तेंह्मणेतुझीहीस्नु
षा॥ तेव्हांशैब्याहोऊनगतरोषा॥ ह्मणेमीवंध्याअसूनिस्नुषा॥ कायबोलताहेंऐसें॥ ४६॥ मगह्मणेनरपाल॥ तूंज्या
पुत्रासीप्रसवशील॥ त्याचीहीस्त्रीहोईल॥ सत्यवचननिर्धारें॥ ४७॥ तेंविश्वेदेवपितरभले॥ त्याअनुमोदनदेते
जाहले॥ मगशैब्येसीगर्भराहूनितेवेळे॥ पुत्रविदर्भजाहला॥ ४८॥ तोतीस्नूनविवाहित॥ करूनियांजाहलातृप्त

असोस्त्रीजितांमाजीनृपनाथ॥ज्यामघहोताशिरोमणी॥४९॥श्रीमद्भागवतसारामृत॥नवमस्कंधपरमपुनीत॥
प्राकृतसखारामविरचित॥त्रयोविंशाध्यायगोडहा॥५०॥ २३ ॥ ॥चतुर्विंशाध्यायप्रारंभः॥ ॥श्रीशुकह्मणे
भागवता॥ विदर्भवंशपरिसेंआतां॥ भोजकन्येपासूनितत्वतां॥ तीनपुत्रत्याजाहले॥ १॥ कुशक्रथरोमपादप
रियेसी॥बभ्रुजाहलारोमपादासी॥त्याचापुत्रकृतिनामेंशीं॥तयाचापुत्रकुशिकतो॥ २॥ तयाचाचेदिकुमर॥
त्यापासूनिचैद्यवंशविस्तार॥क्रथाचाकुंतिसाचार॥त्याचाधृष्टित्यापुढती॥ ३॥ त्याचाजाणनिर्वृति॥दाशार्हभू
पतयाचानिश्चिती॥तयासीव्योमतत्संतति॥जीमूतविकृतितयाचा॥ ४॥ तत्सुतभीमरथानवरथ॥त्याचापुत्र
तोदशरथ॥त्याचाशकुनीनामेंसुत॥त्याचाकरंभीजाणिजे॥ ५॥ तयाचापुत्रदेवरात॥त्याचादेवक्षेत्रपूत॥
तयाचामधुनृपनाथ॥त्याचाकुरुवंशजाणिजे॥ ६॥ त्याचाअनुपूरुहोत्रत्याचा॥आयुपुढतीअसेतयाचा॥
त्याससात्वतनांवाचा॥पुत्रजाहलाजाणिजे॥ ७॥ त्यासात्वतासीजाण॥ भजिदिव्यवृष्णिभजमान॥देवावृधअं
धकमहाभोजसगुण॥ सातपुत्रहेजाहले॥ ८॥ त्यांमाजीभजमानासी॥पुत्रजाहलेएकास्त्रीसी॥निम्लोचि
किंकणवृष्णिपरियेसी॥अभिधानेंहींजाणावीं९अन्यस्त्रियेसीतीनसुत॥शताजितसहस्राजित॥ तिसरा-
जाणाअयुताजित॥देवावृधाचाबभ्रुतो॥ १०॥तोमानवांमाजीप्रवीर॥त्याच्याउपदेशेंसाचार॥पांसष्टहजारआठ
नर॥मोक्षमार्गींपैंगेले॥ ११॥महाभोजवंशींभोजजाहले॥सात्वतपुत्रवृष्णीसभले॥युधाजितसुमित्रनिपजले॥
युधाजितासीशिनीअनमित्र॥ १२॥ अनमित्राचानिम्नजाण॥त्यासीसत्राजितप्रसेन॥ऐसेपुत्रजाहलेदोन॥अनमि
त्रसुतशिनिदुजा॥१३॥तयाचापुत्रसत्यक॥त्याचायुयुधानदेख॥त्याचाजयतयाचाचोख॥कुणिनामेंनरपति॥१४॥

तयाचा जाण युगंधर ॥ अनमित्रासी अन्य कुमर ॥ वृष्णिनामक नरेश्वर ॥ त्या श्वफल्क चित्ररथ जाहले ॥ १५ ॥ अक्रूर
प्रमुख निश्चिती ॥ तेरा प्रतिबाहू पर्यंत ॥ श्वफल्कासी जाहले सुत ॥ कन्या सुचीरा जाणिजे ॥ १६ ॥ अक्रूराचे देववान ॥
उपदेव ऐसे दोन ॥ चित्ररथाचा पृथु नंदन ॥ विदूरथादि अन्य बहु असती ॥ १७ ॥ अंधकाचा कुकुर पाहीं ॥ भजमा
न शुचि कंबल बही ॥ कुकुरासी वन्हि होय निश्चयीं ॥ त्याचा विलोम जाणिजे ॥ १८ ॥ तयाचा कपोतरोमा निश्चित
अनु तयाचा होय सुत ॥ अंधक त्याचा दुंदुभि नृपनाथ ॥ त्याचा अरिद्योत जाणिजे ॥ १९ ॥ तयाचा पुनर्वसु नि-
श्चित ॥ आहुक नाम तयाचा सुत ॥ आहुकी नामें दुहिता गुणवंत ॥ तयाची जाण भारता ॥ २० ॥ आहुकासी देवक उ
ग्रसेन ॥ ऐसे कुमर जाहले दोन ॥ देवकासी चार नंदन ॥ देववान् सुदेवादि ॥ २१ ॥ तेयांची सात कन्या मनोहर ॥ धृत
देवा देवक्यादि साचार ॥ त्या वसुदेव पाहूनि वर ॥ तया कारणें अर्पिल्या ॥ २२ ॥ उग्रसेनासी समग्र ॥ कंसादि नऊ
जाहले पुत्र ॥ पांच कन्या ही सत्पात्र ॥ त्या दिधल्या वसुदेवानुजा ॥ २३ ॥ अंधक पुत्र भजमान ॥ त्याचा विदूरथ नंदन
त्याचा शूर तत्सुत भजमान ॥ त्याचा नंदन शिनि नामें ॥ २४ ॥ स्वयंभोज जाहला त्यापासून ॥ त्याचा हृदीक नंदन ॥
तत्पुत्र देवमीढादि जाण ॥ देवमीढाचा शूर पैं ॥ २५ ॥ मारिषा पत्नी त्वे कुशीं ॥ दश पुत्र जाहले तयासी ॥ वसुदेव देव
भागादि निश्चयेंशीं ॥ पुढें तीं चरित्र परिसावें ॥ २६ ॥ वसुदेवाचे जन्मकाळीं ॥ सुरगणीं मिळूनी सकळीं ॥ दुंदुभी वा
जविल्या निराळीं ॥ आनकवाद्यें ही बहू ॥ २७ ॥ म्हणूनि आनकदुंदुभि नाम ॥ तयासी प्राप्त जोहले परम ॥ शूरासी-
पांच कन्या उत्तम ॥ होत्या जाहल्या राजेंद्रा ॥ २८ ॥ त्यांतील कुंती नामें बाला ॥ आदरें अर्पी कुंतिराजाला ॥ सौंदर्या-
बुधि रत्नमाला ॥ तो अग्रज ह्मणवूनी ॥ २९ ॥ तियेच्या गृहा एके दिनीं ॥ अकस्मात आले दुर्वासमुनी ॥ त्यांची सेवा

भावेंकरूनी ॥ प्रसादस्वयेंसंपादी ॥ ३० ॥ देवाव्हानविद्यास्फुरस ॥ प्राप्तजाहली कुंतीस ॥ त्याचीपरीक्षापहावयास ॥ भास्करासीबाहिलेंनियेनें ॥ ३१ ॥ सूर्यआलाहें पाहून ॥ प्रार्थनाकरीवंदूनिचरण ॥ तमारीबोलेमाझेंदर्शन व्यर्थहोणारनाहींगे ॥ ३२ ॥ तुझें कुमारी त्वनभंगितां ॥ पुत्रदेतांमहादाता ॥ ऐसेंवदूनिसंभोगदेतां ॥ जाहलाकर्णत्यापासूनी ॥ ३३ ॥ तेव्हांतोतिणेनद्धदकांत ॥ पेटींतघालुनीसोडिलात्वरित ॥ पांडुरायेंतिशींपुनीत ॥ केलाविवाहउत्सवें ॥ ३४ ॥ वृद्धशर्माकारूषनृपति ॥ त्याचीस्त्रीश्रुतदेवानिश्चिती ॥ दंतवक्राप्रसवलीसती ॥ त्यासीपांचपुत्रजाहले ॥ ३५ ॥ धृष्टकेतुकैकयदेख ॥ श्रुतकीर्तीचेगर्भींसंतर्दनादिक ॥ पांचपुत्रउत्पादिचोख ॥ अन्यवंशपरिसेंआतां ॥ ३६ ॥ राजाधिदेवीपासून ॥ विंदानुविंदहेदोन ॥ जयसेनासीनंदन ॥ सुलक्षणलाभले ॥ ३७ ॥ चेदिदेशींचानरपाल दमघोषजाणापुण्यशील ॥ त्यालाश्रुतश्रवेपासूनिरवळ ॥ शिशुपालजाहला ॥ ३८ ॥ वसुदेवबंधुदेवभागासी ॥ चित्ररथबृहद्बलसौख्यराशी ॥ पुत्रजाहलेनिश्चयेंशीं ॥ देवश्रव्याचासुवीरतो ॥ ३९ ॥ आनकासदानसून ॥ सत्यजितपुरुजिन ॥ सृंजयाहृषदुर्मर्षणादिनिश्चिन ॥ शामकाहरिकेशहिरण्याक्ष ॥ ४० ॥ वत्सकतोमिश्रकेशी ॥ अप्सरेपासूनिवृकादिपुत्रांसी ॥ लाधताजाहलापरियेसीं ॥ पुढतींचरित्ररसाळतें ॥ ४१ ॥ त्याहृकाभिधासिपाहीं ॥ दुर्वाक्षीअप्सरेचेगर्भीं ॥ तक्षकपुष्करशालादिकही ॥ पुत्रलधलाहींनिपजले ॥ ४२ ॥ शामीकापासूनिसुमित्र ॥ अर्जुनपालादिपुत्र ॥ कंकासीऋतधामाजयपवित्र ॥ उत्पन्नहोतेजाहले ॥ ४३ ॥ वसुदेवरोहिणीचेगर्भीं ॥ बलगदादिपुत्रपाहीं ॥ लाधलापौरवीपासुनाही ॥ सुभद्रभद्रादिपुत्रते ॥ ४४ ॥ नंदोपनंदमदिरेपासून ॥ करिताजाहलाउत्पन्न ॥ भद्रेसीजाहलानंदन ॥ केशिनामाराजेंद्रा ॥ ४५ ॥ रोचनेपासूनिभले ॥ हेमांगदादिपु

ग्रजन्मले॥ इलेपासूनि उरुवल्कलादि झाले॥ यादवांमाजी मुख्यपें॥४६॥ धृतदेवीपासूनि निम्लिनी॥ विदुष्ठुना मेंजाहली संतती॥ शांतदेवी अन्यभार्याप्रती॥ प्रतिश्रुतादि होती बहुविध॥४७॥ आठ पुत्र देवकीपासून॥ जाहले रायापावन॥ कीर्तिमान सुषेण भद्रसेन॥ उदारधी ऋजु जाण पां॥४८॥ संमर्दन भद्र संकर्षण॥ आठवा स्वयें नारायण॥ आपण होऊनि अवतीर्ण॥ भूभारहरण पैं करी॥४९॥ वेदधर्माचा र्‍हास होतां॥ भगवान् श्रीहरि स्वतां॥ अवतार घेऊनि भागवतां॥ संरक्षण करितो गा॥५०॥ नवमस्कंध तुळशीचा पाला॥ भावें हरिचरणीं वाहिला॥ भवाब्धी पैलतट पाहिला॥ हरिनामसंकीर्तनें॥५१॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ नवमस्कंध परम पुनीत॥ प्राकृत सखाराम विरचित॥ चतुर्विंशाध्याय गोड हा॥५२॥ ॥२४॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥ इति नवमस्कंधः समाप्तः॥ ७॥

इतिश्रीमद्भागवतसारामृतेनवमस्कंधःसमा०





अथश्रीमद्भागवतसारामृते दशमस्कंध पूर्वार्धप्रारंभः





श्रीगणेशायनमः॥ ॥श्रीसरस्वत्यैनमः॥ ॥श्रीगुरुभ्योनमः॥ ॥जयश्रीहरिपतितपावना॥जगत्त्रयजीवननाराय
यणा॥सर्वांतर्यामीनंदनंदना॥सौख्यनिदानातुजनमूं॥१॥तूंचिजाहलासीगजवदन॥लंबोदरशूर्पश्रवण॥चतु-
र्दशविद्येचेंभवन॥निवारणकरीविघ्नें॥२॥प्रभोतूंचिनटसीसरस्वती॥ब्रह्मकन्यकाभगवती॥ग्रंथारंभींदेऊनि
मती॥चालवींपुढतींनिरूपण॥३॥बाळकृष्णासद्गुरुआपण॥तूंचिनटलासीनारायण॥व्यासवाल्मीकादिकविस
गुण॥स्मरूनिवंदनकेलेंतया॥४॥येग्रंथींचाश्रोतावक्ता॥तूंचिहोशीकृष्णनाथा॥आपुलीआपणावदवीकथा॥नि
मित्तमात्रमीअसें॥५॥परीक्षितीह्मणेशुकासी॥नवमस्कंधींसौख्यराशी॥सोमभास्करवंशांसी॥संक्षेपेंमजक
थियेलें॥६॥तयामाजीपावन॥यदूचावंशकथिलाआपण॥जेथेंसाक्षात्नारायण॥अंशरूपेंप्रगटला ७ त्यावि
ष्णूचेपराक्रम॥सांगास्वामीपरम॥यदुवंशींपुरुषोत्तम॥प्रगटूनिकेंकर्मकरीजीं॥८॥कारणमुक्तमुमुक्षुविषयी-
जनें॥सर्वहीगातीभगवद्गुण॥आत्मघातकीयाविणकोण॥गुणानुवादाकांटाळे॥९॥त्यांतआमुचेंकुलदैवत
गोपाळकृष्णावसुदेवसुत॥श्रवणकरावेंचरितामृत॥ह्मणूनिइच्छामानसीं॥१०॥भीष्मद्रोणादिमहावीर॥जेथेंअ
त्युग्रजलचर॥ऐसाकुरुसेनासागर॥अतिदुस्तरजो॥११॥तोश्रीहरिकृपाकटाक्षेंकरून॥मत्पूर्वजींलंघिलागोष्पद
समान॥तेणेंचिकेलेंमाझेंरक्षण॥जननीजठरींनिर्धारें॥१२॥द्रौणिब्रह्मास्त्रसोडीप्रखर॥कौरवपांडववंशांकुर॥
ऐसेंहेंमाझेंकलेवर॥भस्मकरावया॥१३॥मातेच्याउदरींमीअसतां॥तनूदग्धहोऊंलागेसमर्था॥ऐसीजाणूनि
संकटवार्ता॥सन्माताविनवीश्रीकृष्णा॥१४॥तेधवांसूक्ष्मरूपेंआपण॥उत्तराकुक्षींतप्रवेशून॥चक्रेंब्रह्मास्त्रातें-
शांतवून॥माझेंसंरक्षणपैंकरी॥१५॥मायामानुषअवतारी॥प्रगटजाहलाजगतीवरी॥त्याचेविक्रमपरोपरी॥

१

श्रवणकरवींदातारा॥१६॥नवमस्कंधींआपण॥केलेंसमर्थानिरूपण॥कींबलरामरोहिणीनंदन॥होयऐसेंमुनिवर्या
१७॥पुढेंतोचिसंकर्षण॥देवकीगर्भींपावेजनन॥ऐसेंकथिलेंपरीदेहांतरावांचून॥केंविंघडेहेंशुकराया॥१८॥मुकुं
दसोडूनतातसदन॥व्रजींकशास्तवकरीगमन॥तैसेंस्वज्ञातीसहितआपण॥कवणेस्थळींराहिला॥१९॥मथुरे
माजीमधुसूदन॥तैसेंचगोकुळींहीवासकरून॥जींकृत्येंकरिताजाहलापावन॥तींनिरूपणकरावीं॥२०॥आपु
ल्यामातुळाचाप्राण॥कैसाकेलारंगींग्रहण॥धर्मशास्त्रविरुद्धआचरण॥कवणकाजाकेलेंतें॥२१॥नृदेहाचा
आश्रयकरून॥यादवांसहितभगवान॥स्वयें निर्मूनिकुशस्थळीपावन॥कितीवत्सरराहिला॥२२॥त्याप्रभू
सीभामिनी॥कितीहोत्यात्याकामिनी॥हेंआणिकहीउदारपणीं॥कृष्णाचरितअसेतेंसांगा॥२३॥क्षुधातृषेचीबा
धापाहीं॥किमपिमातेहोतनाहीं॥हरिचरितामृतलवलाहीं॥पानकरितांयास्तव॥२४॥ह्मणूनकृष्णाकथामृ
त॥पानकरवींगापुनीत॥सूतबोलेशौनकानिश्चित॥प्रश्नऐसेनृपेंकेलें२५तें विष्णुरातालागुन॥बोलताजा-
हलाव्यासनंदन॥आधींकरूनसन्मान॥निरूपणकरीतसे॥२६॥श्रीशुकम्हणेपरीक्षिती॥निष्ठायुक्तआहे-
तुझीमती॥वासुदेवकथापावनकरिती॥श्रोत्यांवक्त्यांपृच्छकांही॥२७॥क्षत्रियकुलामाजीजाण॥राजयां
च्याभिषेंकरून॥कोटिशादैत्यजाहलेउत्पन्न॥सैन्यभारेंतयांच्या॥२८॥पीडितहोऊनिधरणी॥अश्रुमुखीगोरू
पेंजाउनी॥त्वरितधातियापाहुनी॥बुडालेंबुडालेंह्मणतसे॥२९॥शरणजाऊनिआपण॥वृत्तकेलेंनिवेदन॥
तेंविधिइंद्रादिसुरघेऊन॥भूमिशंकरासहितपैं॥३०॥क्षीराब्धितीरींजाऊन॥एकाग्रचित्तेंकरीस्तवन॥पुरु
षसूक्तेंकरूनिपावन॥नारायणाआळवी॥३१॥विधाताअसतांसमाधींत॥नभोवाणीजाहलीअकस्मात॥तीऐ

कूनिइंद्रादिदेवांप्रत॥निवेदनकरीतसे॥३२॥आपुल्याविनवणीचेआधीं॥वृत्तजाणतसेकृपानिधी॥दैत्यभारजें
आह्मांबाधी॥आणिककांहींजेंहोतें॥३३॥आतांदेवाधिदेवपरमेश्वर॥महींवरीघेऊनिअवतार॥दूरकरीलदुष्ट-
भार॥साधुरक्षणकरूनियां॥३४॥अंशरूपेंकरूनिजाण॥यादवव्हावेंतुह्मींजाऊन॥तुमच्यास्त्रियाहीएकवटून
राजकुळींनिपजोत॥३५॥वसुदेवगृहींनारायण॥होणारप्रत्यक्षअवतीर्ण॥तुह्मींतयाचेंसाह्यकरून॥कार्य
भागसाधिजे॥३६॥सहस्रवदनांचाफणी॥आदींप्रगटेलसद्रूपी॥विष्णुमायानंदसदनीं॥यशोदाजठरींनिप
जेल॥३७॥श्रीशुककह्मणेरायासी॥ऐसेंआज्ञापूनदेवांसी॥अभयदेऊनिप्रष्ठ्यासी॥निजस्थानाविधिगेला॥३८॥
पूर्वींयादवनृपशूरसेन॥राज्यकरीमथुरेंतपूर्ण॥माथुरआणिशूरसेन॥देशपाळीन्यायानें॥३९॥तयाचीराजधा
नीजाण॥मथुरानामकपट्टन॥यादवचक्रेंविराजमान॥स्वर्गसमाननिर्धारें॥४०॥ज्यामथुरेमाजीपूर्ण॥सन्निध
आहेभगवान॥तेथेंकोणेएकेसमयींपावन॥चरित्रजाहलेंतेंपरिसा॥४१॥शूरपुत्रवसुदेवनिश्चित॥स्त्रीघे-
ऊनिविवाहित॥निजगृहींजावयालरित॥रथारूढपैंजाहला॥४२॥तेव्हांउग्रसेनसुतजेठी॥भगिनीप्रियव्हा
वयासाठीं॥बैसूनिरथाचियेआगुठीं॥सारथ्यस्वांगेंकरीतसे॥४३॥हातींघेऊनिवाग्दोर॥रथचालवीस्थिर
स्थिर॥वाद्येंवाजतीअपार॥नादअंबरींकोंदाटला॥४४॥दयाळुदेवकेंआपण॥दिधलेंजामातासीआंदण॥चा
रशतेंउत्तमवारण॥पंचदशसहस्रतेवाजी॥४५॥अष्टादशशतेंस्यंदन॥सालंकारदासीसगुण॥दोनशतेंदे
ऊन॥बोळवणकेलीहो॥४६॥प्रयाणकाळींमंगलकारक॥वाद्येंवाजतीअनेक॥शंखतूर्यभेरीगोमुख॥वा-
जंतरेंसुस्वर॥४७॥वाग्दोरधारककंसाप्रती॥नभोवाणीहोयबोलती॥जीचेंरथींतूंमंदमती॥सारथ्यकरिशी

महामूर्खा ॥ ४८ ॥ त्या देवकीचा अष्टमगर्भ जाण ॥ घेईल तुझा निश्चयें प्राण ॥ ऐसें ऐकूनियां वचन ॥ कोपायमान जाहला ॥ ४९ ॥
खड्गपाणी होऊनि आपण ॥ भगिनीकेशां करी आकर्षण ॥ ऐसें पाहूनि तिचा रमण ॥ सांत्वन करीत याचें ॥ ५० ॥ वसुदेव ह्म
णे कंसराया ॥ कां गा छळिसी भगनी सवांयां ॥ कोठें गेली तुझी माया ॥ निंद्य कर्म करशी हें ॥ ५१ ॥ शूर वर्णिती तुज लागून
विवाहपर्वामाजी जाण ॥ कैसा घेशी भगिनीचा प्राण ॥ मरणभयें ह्मणसी जरी ॥ ५२ ॥ तरी देहधारी यांसी पूर्ण ॥ आज
अथवा शताब्दीं मरण ॥ येणार बापा निश्चयें ह्मणून ॥ पापाचरण योग्य नसे ॥ ५३ ॥ हा देह नष्ट झाल्यावर ॥ अन्य नाहीं
होणार ॥ असें असेल तरी प्रतीकार ॥ दुराचरणें ही करावा ॥ ५४ ॥ कर्मवशें करूनी प्राणी ॥ मृत्युसमयीं चिंतितो मनीं ॥
जो देह तो न याला गऊनी ॥ प्राप्त होतो निश्चयें ॥ ५५ ॥ जेसी तृणावरील जलूका ॥ अन्य आश्रय करूनि देखा ॥ मागील आ
श्रय सोडी निःशंका ॥ तैसा जीव ही जाणबा ॥ ५६ ॥ कर्मप्रचोदित अंतःकरण ॥ जिकडे जिकडे करितें भ्रमण ॥ देव मा
नव पशु कीटक जाण ॥ तीती योनी प्राप्त होय ॥ ५७ ॥ जन्ममरणें करूनी जाण ॥ जीव बद्धचा बद्ध होतो आपण ॥ आतां जन्म
मरणांचें लक्षण ॥ तुज कांहीं निवेदूं ॥ ५८ ॥ देहीं आत्मप्रतिबिंब जोंवरी ॥ स्थिर असे तोंवरी ॥ न यासी जन्म ऐशा असुर
रीं ॥ वर्णिती जन ॥ ५९ ॥ आत्मप्रतिबिंब देहींचें जातां ॥ मरण जाणसे दिनोनाथा ॥ अन्योन्य धर्माध्यासें तत्वतां ॥ जन्मादि
वार्ता आत्मयासी ॥ ६० ॥ देहधर्म आत्मधर्म ॥ यांचें परिसें बा वर्म ॥ राजत्व सूकरपण देहधर्म ॥ समत्व समान दोहीं वरी ॥
६१ ॥ याकरितां आपण ॥ करावया देहरक्षण ॥ न करावा द्रोह जाण ॥ भूतमात्रीं कवणाचा ॥ ६२ आणि हीतां तुझी भ
गिनी ॥ बाहुली समान जाण मनीं ॥ वधासी अयोग्य बाजनीं ॥ फार काय सांगावें ॥ ६३ ॥ श्रीशुक ह्मणे भारता ॥ या प
रिसा मोक्षिक करितां ॥ देवकी वधापासूनि तत्वतां ॥ दुष्ट मागुता फिरेना ॥ ६४ ॥ सगवसुदेव करी चिंतन ॥ कैसें चुकेल हि

चेंमरण॥ बुद्धिमंतें युक्तीकरून॥ आलाआघातचुकवावा॥ ६५॥ इतुक्यावरीसाचार॥ जरीनोव्हेपरिहार॥ तरीत्याकडेदो
षसाचार॥ कांहींएकनस्पर्शे॥ ६६॥ ईश्वरमायेचेंविंदान॥ नकळेकैसेंहोईलजाण॥ अगस्त्यब्रह्मादिकांलागुन॥ इच्छात्या
चीपृथक्असे॥ ६७॥ ऐसेंआयूनिमानसीं॥ बोलताजाहलाकंसासी॥ जेपुत्रहोतीलदेवकीसी॥ तेतुजअर्पीननिश्चयें॥ ६८
यापरीपरिसूनिवचन॥ कंसफिरलावधापासून॥ दिधलेंदेवकीसीसोडून॥ वसुदेवस्तवनसमगकरी॥ ६९॥ शौरीस्वगृहीं
पातला॥ पुढतीकांहींकाळजातांभला॥ प्रसूतिसमयपातला॥ देवकीचादेवयोगें॥ ७०॥ सर्वात्माभगवान॥ जिचो
देवतापावन॥ तीप्रतिवर्षीएकअपत्यजाण॥ प्रसवतीजाहली॥ ७१॥ येणेंपरीअष्टकुमर॥ एककन्यामनोहर॥ प्र
सवतीजाहलीसकुमार॥ प्रतिवत्सरक्रमानें॥ ७२॥ प्रथमपुत्रकीर्तिमंत॥ वसुदेवघेऊनित्वरित॥ जाऊनियांकंसस
भेंत॥ देताजाहलासद्भावें॥ ७३॥ बाळपाहतांकंसद्रवला॥ ह्मणेअष्टमदेइजेमला॥ ह्मासकुमारनिजसदनाला॥ घे
ऊनिजाईयादवा॥ ७४॥ परिसूनिऐसेंकंसवचन॥ चालिलाबालकासीघेऊन॥ परीनाहींहर्षितमन॥ कींहादुर्जनस्थि
रनसे॥ ७५॥ येरीकडेकंससभेंत॥ नारदमुनीपातलात्वरित॥ मनींआणूनिदेवकार्यार्थ॥ बोधकंसाकरीनसे॥ ७६॥
कंसाव्रजांतनंदादिगोपाळ॥ तयांच्यास्त्रियाहीसकळ॥ तैसामथुरेचायादवमेळ॥ स्त्रियात्याच्याजाणपां॥ ७७॥ तेदेव
आणिदेवीजाण॥ जाहलेमहीवरीनिर्माण॥ दैत्यवधेंभूभारहरण॥ करावयासकळही॥ ७८॥ वसुदेवदेवकीउदरीं
साक्षात्प्रगटेलश्रीहरी॥ ऐसेंसांगूनिझडकरी॥ नारदतेथूनीपैंगेला॥ ७९॥ कंसमानीमनांत॥ देवकीगर्भसंभूत॥
स्ववधकरणारनिश्चित॥ ह्मणूनिकोपेंदाटला॥ ८०॥ वसुदेवदेवकींलागून॥ शृंखळापायींघालून॥ करिताजाह
लासंरक्षण॥ बंदिशाळेमाझारी॥ ८१॥ जोजोपुत्रहोईलजाण॥ त्यातेंवधीकंसआपण॥ विष्णुअसेलह्मणून॥ हिं

साकर्मीं प्रवर्तला ॥ ८२ ॥ राज्या दुष्ट नृपती फार ॥ मायबापासिही देती मार ॥ तेथें बांधवादि परिवार ॥ कोण मानी बापुडा ॥ ८३ ॥ विष्णूनें जो रणांगणीं ॥ वधिला कालनेमि असुराग्रणी ॥ तोचि मी ऐसें कंस मानी ॥ वैर करी यादवांचें ॥ ८४ उग्रसेन पिता साचार ॥ भोज अंधक नरेश्वर ॥ तया प्रतिबंध करूनि सत्वर ॥ आपण राज्य करीतसे ॥ ८५ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ प्रथमाध्याय गोड हा ॥ ८६ ॥ १ ॥ ॥ द्वितीयाध्याय प्रारंभः ॥ ॥ शुक ह्मणे राया नंतर ॥ प्रलंबासुर बकासुर ॥ चाणूर तृणावर्त अघासुर ॥ मुष्टिक अरिष्ट द्विविद तो ॥ १ ॥ पूतना केशी धेनुक ॥ प्रमत्त जाहले खळ अनेक ॥ देती अखिलांसी महादुःख ॥ तें काय सुखें वाणावें ॥ २ ॥ अन्य बाण नरकासुर ॥ आदि करूनी नरेश्वर ॥ दैत्यरूपी अनिवार ॥ सहाय करिती कंसातें ॥ ३ ॥ जरासंधाच्या आश्रयें करून ॥ बलिष्ठ जाहला कंस पूर्ण ॥ यादवांसी करी उद्विग्न ॥ द्वेषबुद्धी करूनियां ॥ ४ ॥ तेव्हां यादव होऊनि पीडित ॥ कुरुपंचाल शाल्व निश्चित ॥ विदर्भ निषध देशांत ॥ कोसल गेले राहावया ॥ ५ ॥ मथुरे माजी यादवजन ॥ कोणी राहिले आश्रय धरून ॥ सहा गर्भ देवकीचे पूर्ण ॥ कंस वधिता जाहला ॥ ६ ॥ पुढती विष्णुतेज अनंत ॥ देवकीजठरीं राहिलें निश्चित ॥ तेव्हां हर्षशोकयुक्त ॥ सदा असे देवकी ॥ ७ ॥ यादवदुःख आणूनि अंतरीं ॥ योगमायेतें श्रीहरी ॥ पाचारूनी बोले झडकरी ॥ ऐसें करी जगदंबे ॥ ८ ॥ वसुदेवपत्नी रोहिणी ॥ कंसाचिया भयें करूनी ॥ गुप्त वसे नंदसदनीं ॥ तेथें सत्वर जावें त्वां ॥ ९ ॥ देवकीजठरीं अनंत ॥ शेषाख्य माझें धाम पुनीत ॥ तया गर्भाचें तुवां त्वरित ॥ आकर्षण कीजे ॥ १० ॥ तया रोहिणीचे उदरीं स्थापन ॥ वेगें करी जाऊन ॥ देवक्युदरीं पुत्र लेकरून ॥ प्राप्त होतो मी निर्धारें ॥ ११ ॥ नंदगृहीं यशोदाजठरीं ॥ प्रगट होशील तूं निर्धारीं ॥ अवतार होतां गोकुळांतरीं ॥ भक्त पूजन करतील ॥ १२ ॥ षोडशोपचारें करून

मानवकरितीलतुझेंपूजन॥ वंदनस्तवनआदरेंकरून॥ स्थानेंपावनकरितीलबहु॥ १३॥ दुर्गाभवानीभगवती॥ भद्रका
लीविजयासरस्वती॥ वैष्णवीआदिकरूनीनिश्चिती॥ नामेंप्रासहोतीलतुला॥ १४॥ त्यांगर्भकेलियाआकर्षण॥ तया-
सीह्मणतीलसंकर्षण॥ लोकरमणास्तवरामाभिधान॥ बलाधिक्येंजाण बळिभद्र॥ १५॥ भगवंताचेंवाक्यश्रवण॥
करितांमायाआपण॥ तथास्तुऐसेंह्मणून॥ व्रजामाजीतेंगेली॥ १६॥ श्रीहरिआज्ञामान्यकरून॥ तैसेंकरितीजाह
लीआपण॥ पुढेंकायजाहलेंचरित्रपावन॥ श्रवणतेंचीकरावें॥ १७॥ येरीकडेपौरजन॥ मथुरेमाजीकरितीभाष
ण॥ देवकीचागर्भपूर्ण॥ कंसभयेंगळाला॥ १८॥ यावरीश्रीनारायण॥ भक्ताभयदायकपावन॥ वसुदेवहृदयीं
आपण॥ आविर्भूतजाहला॥ १९॥ तेणेंशौरीप्रकाशवंत॥ भासूंलागेजगतांत॥ अशक्यजाहलानिश्चित॥ अन्य-
जनांनिरखावया॥ २०॥ तेंभगवत्तेजपूर्ण॥ वसुदेवसंतोषेंकरून॥ देवकीच्याठायींस्थापन॥ करिताजाहलासद्भावें॥
२१॥ तेधवांदेवकीआपण॥ त्याहरीसीमनेंधारण॥ करितीजाहलीपावन॥ प्राचीचंद्राधरीतैसें॥ २२॥ कारागारींदेव-
कबाळी॥ धारणकरीवनमाळी॥ परमतेजस्वीपरीतेकाळीं॥ शोभाविशेषनदिसे॥ २३॥ जैसामृन्मयघटींजाण॥
दीपलाविलाआपण॥ तयाचाप्रकाशसभाजन॥ बाहेरकांहींनदेखती॥ २४॥ तैसाचीजाणाहाप्रकार॥ प्रभापाहू-
निमनोहर॥ बोलताजाहलाउग्रसेनकुमर॥ कायवचनतेंपरिसा॥ २५॥ जोमाझाहरणारप्राण॥ तोइचेउदरींनारा
यण॥ आहेसाचपरिपूर्ण॥ कायकरावेंमीआतां॥ २६॥ तोपराक्रमकरीलनिश्चित॥ जरीकरूंदेवकीचाघात॥ स्त्री
भगिनीगर्भिणीनयांत॥ धर्मसंकटहेंकैसें॥ २७॥ स्त्रीवधेंकरूनीजाण॥ यशलक्ष्मीआयुष्यहरण॥ होतेंमानवाचें
पूर्ण॥ नलगतांक्षणसत्यलें॥ २८॥ क्रूरकर्मेंआचरलोंजरी॥ निंद्यहोईनजन्मभरी॥ अंधतमनिरयदेहांतरीं॥ प्रास

होईलनिर्धारें ॥ २९॥ कंसस्वयेंसमर्थअसून॥ याविवेकेंपरतलाआपण ॥ आसनींशयनींकरीस्मरण॥ नारायणा
चेंतेधवां ॥ ३०॥ सर्वविष्णुमयजगत॥ कंसपाहूंलागलानिश्चित॥ असताभयोपाधिरहित॥ तरीजीवन्मुक्तव्हा
णोंयेता ॥ ३१ ॥ तेंब्रह्मरुद्रादिसुरवर॥ देवकीसन्निधयेऊनिसत्वर॥ साष्टांगकरूनियांनमस्कार॥ गर्भस्तुतीक
रिताती॥ ३२ ॥ भूभारहरणार्थअवतार॥ घेईनऐसेंवदलासाचार॥ तेंहें प्रतिज्ञावचनपरमेश्वर॥ सत्यकरिता
जाहला॥ ३३॥ हासंतोषनमायमनीं॥ ह्मणूनीप्रकटकरितीस्तवनीं॥ सत्यसंकल्पामोक्षदानी॥ चक्रपाणीतुजन
मूं॥ ३४ ॥ हेप्रभोनारायणा॥ आह्मीशरणतुझेचरणा॥ नमोसर्वांत्म्यासर्वकारणा॥ अचळअभंगाअविटतूं॥ ३५
प्रभोज्यासंसारवृक्षालागुन॥ प्रकृतिआश्रयपरिपूर्ण॥ सुखदुःखफलेंमूलेंत्रिगुण॥ धर्मादिरसनिश्चयें ॥ ३६॥ स
प्तधातुत्वचाजयातें॥ मनबुद्धिअहंकारभूतें॥ विटपजोनवद्वारसहित॥ दशप्राणज्यापर्णें॥ ३७॥ जीवेश्वरहेपक्षी
जयासी॥ असतीतयाअनादिवृक्षासी॥ तूंचिसर्वात्मातेजोराशी॥ कारणतुजसीवंदनअसो॥ ३८॥ यावृक्षाचेउ-
द्भवलयजाण॥ तुझेठायींचआहेतपूर्ण॥ सात्विकरूपेंकरूनिधारण॥ भक्तजनसंरक्षिशी॥ ३९॥ कमलनेत्रातु
झेठायींचित्त॥ जोठेवितोसद्भक्त॥ भवसिंधुगोष्पदवत्॥ सहजलंघुनीजातसे॥ ४०॥ जेतवचरणपराङ्मुख॥ तें
यांनाहींमोक्षसुख॥ नरकालयादुःखअनेक॥ स्वयेंजाउनीभोगिती॥ ४१॥ तुझेसद्भक्तजाण॥ विघ्नमस्तकींपदठे-
वून॥ निर्भयविचरतीआपण॥ जेत्वच्चरणउपासिती॥ ४२॥ आणिकतुझेठायींएकाग्रमन॥ जेकांकरितीस्थापन
तेतुच्छमानितीइंद्रभुवन॥ भजनकरूनतुजपावती॥ ४३॥ मनमोहनाजगत्स्थिति॥ स्थितिलयआणिउत्पत्ति॥ तुज
नाहींनामरूपजाती॥ जन्मकर्मतेंहीनसे॥ ४४॥ तूंकवणाचापुत्रपिताही॥ नहोसीबांधवादिककांहीं॥ परंतुभूभा

रहरणार्थपाहीं॥मायाश्रयेंक्रीडसी॥४५॥मत्स्यहयग्रीवकमठ॥वाराहनरहरिरूपचोखट॥हंसक्षत्रियांतउत्कट॥
श्रीरामस्पष्टतूंहोशी॥४६॥विप्रांमाजीवामनादिक॥तैसेदेवांतयज्ञप्रमुख॥अवतारघेऊनिअनेक॥आमुचेंरक्षण
पैंकेलें॥४७॥तैसेंआतांभूभारहरण॥करूनिकरणेंसंरक्षण॥हेयदूत्तमाचरणींवंदन॥सदाअसोनिश्चयें॥४८॥
देवकीसीह्मणतीसुरसमस्त॥परमपुरुषजगन्नाथ॥प्रगटलाआमुचेंउदयार्थ॥तुझेकुशींनिर्धारें॥४९॥कंसभ
यपाहीं॥मातेआतांकांहींचनाहीं॥यादवरक्षकलवलाहीं॥पुत्रहोईलह्मातुझा॥५०॥श्रीशुकह्मणेपरीक्षिती॥
ऐसीकरूनीगर्भस्तुती॥ब्रह्मादिदेवनिजलोकाप्रती॥जातेजाहलेतेधवां॥५१॥श्रीमद्भागवतसारामृत॥दशम
स्कंधपरमपुनीत॥प्राकृतसरवारामविरचित॥द्वितीयाध्यायगोडहा॥५२॥ २॥तृतीयाध्यायप्रारंभः॥ ॥श्री
शुकह्मणेभारता॥कृष्णजन्मपरिसेंआतां॥जेंश्रवणकींपठनकरितां॥धर्मार्थकामसिद्धहोती॥१॥सर्वगुणेंकरूं
नियुक्त॥कालअसेजेंसुशोभित॥शांतनक्षत्रेंग्रहपुनीत॥रोहिणीस्थितचंद्रमा॥२॥प्रसन्नदिसतीदिशादाही॥
तैसेंआकाशनिरभ्रपाहीं॥नक्षत्रोदयेंलवलाहीं॥अतिरम्यदिसतसे॥३॥पृथ्वीवरीलजाण॥पुरग्रामगोकुळें
पावन॥तेशारत्नखाणीदेदीप्यमान॥मंगलकारकशोभती॥४॥तेधवांवर्षाकाळअसून॥सर्वसरितांचेंस्वच्छ-
जीवन॥प्रफुल्लितह्रदहीजलपूर्ण॥कमलेंकरूनीविराजती॥५॥अरण्यवृक्षांचेकुसुमावर॥गुंजारवकरितीभ्र
मर॥मंदसुगंधवाहेसमीर॥कायउत्सववर्णावा॥६॥अग्निहोत्रांतीलअग्निशांत॥असूनिदिसतीप्रज्वलित॥
असुरजयांचाद्वेषकरित॥त्यासाधूंचेंचित्तसुखीजाहलें॥७॥श्रीकृष्णजन्मकाळीं॥दुंदुभीवाजतीअंतराळीं॥
गंधर्वकिन्नरमंडळी॥स्वरसेंळींगातसे॥८॥स्तवितीसिद्धतैसेचारण॥अप्सराकरितीनर्तन॥मुनिआणिक-

सुरगण ॥ पुष्पवृष्टि करिताती ॥ ९ ॥ मंदमंद मेघांची गर्जना ॥ सागरा अनुसरूनी होय जाणा ॥ निबिड अंधकार गहना ॥ जाहलें पैं मध्यरात्री ॥ १० ॥ तैं कारागारीं देवकीजवळी ॥ अकस्मात प्रगटे वनमाळी ॥ पूर्वदिशेसी चंद्र ते काळीं ॥ भासे उगवला प्रत्यक्ष ॥ ११ ॥ कमलनयन चतुर्भुजधारी ॥ शंखचक्रगदा शोभती करीं ॥ श्रीवत्सलांछन दीसे उरीं ॥ जयासाजिरी दिसतसे ॥ १२ ॥ कंठीं कौस्तुभाचा झळाळ ॥ पीतांबरधारी घननीळ ॥ अमूल्य मणिखचित सोज्वळ ॥ किरीट कुंडलें झळकती ॥ १३ ॥ कुरळ केशीं सुशोभित ॥ कटिसूत्र कटकादिकीं विराजित ॥ पाहिला अतुलप्रभाभरित ॥ ऐसा निजसुत वसुदेवें ॥ १४ ॥ देखूनि अद्भुत बालकासी ॥ वसुदेव तोषला मानसीं ॥ दहासहस्र गोधनें द्विजांसी ॥ देता जाहला संकल्पें ॥ १५ ॥ परमपुरुषाचे तेजें करून ॥ सूतिकागृह होय विराजमान ॥ तैं आनकदुंदुभि करी स्तवन ॥ गोविंदाचें सद्भावें ॥ १६ ॥ हे परमेश्वरा तुजलागून ॥ मी मानसीं जाणिलें पूर्ण ॥ कीं तूं प्रकृतीहून भिन्न ॥ पुरुषचिह्न हो शोभा ॥ १७ ॥ तो चि तूं पूर्वी जगन्नाथा ॥ मायें करूनी विश्व निर्मिता ॥ तयांत तूं न प्रवेशतां ॥ प्रविष्ट परी भाससी ॥ १८ ॥ जैसीं महदादि तत्त्वें निश्चिती ॥ षोडश विकारांसहित होती ॥ तैं विराट पुरुषा उत्पादिती ॥ त्यांत भासती प्रविष्ट ऐसें ॥ १९ ॥ परंतु विराटाचे पूर्वी जाणा ॥ जों आहे तत्त्व नारायणा ॥ तों तत्त्वें त्यामाजी पावना ॥ प्रविष्ट न होती तद्‌परी ॥ २० ॥ तूं गुणासह वर्तमान ॥ असूनियां विद्यमान ॥ इंद्रियांनीं तुझें ज्ञान ॥ होत नाहीं सर्वथा ॥ २१ ॥ तूं सर्वांला अपरिच्छिन्न ॥ अंतर्बाह्य हा जयालागुन ॥ भेद नाहीं ऐशिया तुज कोठून ॥ गर्भप्रवेश संभवे ॥ २२ ॥ केवल अनुभवानंदस्वरूप ॥ ऐसें मी जाणिलें तुझें रूप ॥ कैसें माझें भाग्य अपरूप ॥ महोलाभ लाभला ॥ २३ ॥ सृष्टीचें आदि अंत कर्तृत्व ॥ तें तुज अकर्त्या दिसे विरुद्धत्व ॥ परी सर्वगुणाश्रय तुझें तत्त्व ॥ तेथें विरुद्ध कांहीं नसे ॥ २४ ॥ जैसे-

भृत्यकृत्यांचासाचार ॥ आरोपहोतोभूपतीवर ॥ तैसागुणक्रियांचाविस्तार ॥ तुजअक्रियावरआरोपे ॥ २५ ॥ तूंचित्रैलो
क्याचेंरक्षण ॥ तैसेंचिसृष्टिकींसंहरण ॥ करिशीक्रमेंशुक्लअरुण ॥ कृष्णवर्णहोऊनियां ॥ २६ ॥ आतांमाझेगृहींअव
तीर्ण ॥ झालासिकरावयालोकरक्षण ॥ करिशीलअसुरसैन्याचेंकंदन ॥ तथापिसावधानतूंराहें ॥ २७ ॥ कारणहा
कंसदुर्मति ॥ तुझेंजन्महोणारक्षितीं ॥ ह्मणूनितुझियाअग्रजांप्रती ॥ वधिताजाहला निर्दय ॥ २८ ॥ दूतद्वारेंसमा-
चार ॥ तयांसीकळतांसाचार ॥ सायुधधांवूनियेईलसत्वर ॥ कायआतांकरावें ॥ २९ ॥ श्रीशुकबोलेकथामृत ॥ ना
रायणलक्षणींयुक्त ॥ पुत्रासिपाहूनिलरित ॥ देवकीकरीहास्यमुख ॥ ३० ॥ कंसभयआणूनिमनीं ॥ स्तवितीजा-
हलीचक्रपाणी ॥ हेप्रभोसौख्यखाणी ॥ दर्शनआह्मांदीधलें ॥ ३१ ॥ निर्गुणआणिनिर्विकार ॥ ज्यावस्तूसीबोलती
साचार ॥ आपणआह्मांमनोहर ॥ तेचमहाविष्णु ॥ ३२ ॥ निमिषातेंआरंभकरून ॥ संवत्सरापर्यंतजाण ॥ तोकाल
चेष्टातुझीप्रमाण ॥ ऐसेंकविजनबोलती ॥ ३३ ॥ मानवमृत्युसर्पाभेणें ॥ धांवतांकोठेंहीनिर्भयस्थाननेणें ॥ मगला
धलेनितुझेचरणें ॥ सुखनिद्राकरीतसे ॥ ३४ ॥ मृत्युरूपभुजंगाचा ॥ नाशहोतअसेसाचा ॥ ऐसामहिमाचरणाचा
देवाधिदेवातुझ्याकीं ॥ ३५ ॥ यास्तवकंसापासून ॥ भयभीतहोऊनिआपण ॥ अनन्यभावेंपातल्येंशरण ॥ तुझि
याचरणकमलासी ॥ ३६ ॥ हेंतुझेंरूपयोगियांसी ॥ योग्यचिंतावयाजेंमानसीं ॥ तेंपहावयाचर्मचक्षूंसी ॥ उचि
तनोहेदयार्णवा ॥ ३७ ॥ हेप्रभोतूंप्रलयांतीजाण ॥ यथावकाशेंकरून ॥ आपुलेस्वरूपींसांठवण ॥ करिशीविश्वा-
ची ॥ ३८ ॥ ऐसातूंपरमेश्वर ॥ होशीमाझासगुणकुमर ॥ लोकांमाजीविडंबनसाचार ॥ होऊंनयेह्मणूनियां ३९
व्हावेंप्राकृतबाळहृषीकेशी ॥ श्रीहरीह्मणेदेवकीसी ॥ पूर्वजन्मींचेंस्मरणव्हावयासी ॥ सगुणदर्शनदिधलेंहें ४०

पूर्वी स्वायंभुवमन्वंतरांत ॥ तुह्मी जन्मला ऋषिकुळांत ॥ पृश्निसुत पाअसे दंपत्य ॥ विधिआज्ञें करूनियां ॥ ४१ ॥ द्वादशसहस्त्रवरुषें तापं ॥ सहन करूनियां असुप ॥ सूक्ष्मअर्थ तीव्रतप ॥ तुह्मीं तपलां निश्चयें ॥ ४२ ॥ तेव्हां मी होऊनि प्रसन्न ॥ यासगुणरूपें दिधलें दर्शन ॥ तुह्मीं मायेनें मोहित होऊन ॥ मजसम पुत्र मागीतला ॥ ४३ ॥ तें पृश्निगर्भ अभिधान ॥ पुत्र जाहलों मी सगुण ॥ द्वितीय जन्मांत मी वामन ॥ अदिति कश्यप होतां तुह्मी ॥ ४४ ॥ तेव्हां ही याचि रूपें करून ॥ दिधलें प्रेमें दर्शन ॥ आतां तृतीय जन्मीं अभिधान ॥ वसुदेव देवकी तुह्मां असे ॥ ४५ ॥ पूर्वजन्माचे स्मरणार्थ दर्शन दिधलें यथार्थ ॥ प्राकृतरूपें तुह्मां निश्चित ॥ पूर्वज्ञान न होतें ॥ ४६ ॥ आतां तुमचे इच्छानुसार ॥ होतों प्राकृत बालमनोहर ॥ परी नंदगृहीं गोकुळीं सत्वर ॥ प्रविष्ट करणें येथवां ॥ ४७ ॥ तुह्मीं पुत्र ऐशी कल्पना ॥ अथवा ब्रह्मत्वाची भावना ॥ करूनी ध्यायिलें तरी जाणा ॥ वैकुंठभुवन तुह्मांसी ॥ ४८ ॥ ऐसें बोलूनि श्रीधर ॥ प्राकृत बाळ मनोहर ॥ होता जाहला सर्वेश्वर ॥ मायामानुष अवतारी ॥ ४९ ॥ भगवदाज्ञा करूनि ग्रहण ॥ सूतिकागृहांतूनि आपण ॥ सत्वर करिता जाहला प्रस्थान ॥ परी उद्विग्नमानसीं ॥ ५० ॥ यशोदाजठरीं भगवती ॥ योगमाया जन्मली शीघ्रगती ॥ मोहूनियां इंद्रियवृत्ती ॥ कायचरित्र करीतसे ॥ ५१ ॥ सेवक सर्वही भुलती ॥ द्वारपाळ तदा घोरती ॥ कठिण कपाटें श्रृंखला तुटती ॥ मुक्त होय वसुदेव तो ॥ ५२ ॥ कुमर घेऊनि होय चालता ॥ तैं मंद मंद मेघ वर्षतां ॥ उदक निवारावया करितां ॥ शेषछत्र जाहला ॥ ५३ ॥ पुढती कालिंदी भयंकर ॥ दिसे आवर्त्त करूनि थोर ॥ जलभरित वाहे अपार ॥ वसुदेव नेथें पातला ॥ ५४ ॥ पूर्वी दाशरथी रामासी ॥ सागरें मार्ग दिधला जावयासी ॥ तेणें परी जावया गोकुळासी ॥ यमभगिनी मार्ग देतसे ॥ ५५ ॥ गोकुळांत येऊनि आपण ॥ नंदादि निद्रित असतां पूर्ण ॥ यशोदाशय्येवरी नंदन ॥ आनंद

घनतोठेवी ॥ ५६ ॥ मायाकरूनीग्रहण ॥ मथुरेंतआलानलगतांक्षण ॥ देवकीशय्येवरीकन्याठेवून ॥ आपणबंधनक रूनिघे ॥ ५७ ॥ वसुदेवेंश्रीहरित्यागिला ॥ आणिमायेचाआश्रयकेला ॥ तयायोगेंलोहशृंखळा ॥ पायांमाजीपडल्या हो ॥ ५८ ॥ यासाठींसर्वसोडून ॥ भावेंभजावाकमलारमण ॥ तेणेंचुकेजन्ममरण ॥ व्यासवचनसाक्षीया ॥ ५९ ॥ नंद पत्नीयशोदाही ॥ मनींसमजेआपणासीकांहीं ॥ मूलजाहलेंपरीलवलाहीं ॥ कन्यापुत्रहेंनेणे ॥ ६० ॥ श्रीमद्भागवत सारामृत ॥ दशमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ तृतीयाध्यायगोडहा ॥ ६१ ॥ ३ ॥ चतुर्थाध्यायप्रा रंभः ॥ ॥ श्रीशुकह्मणेपरीक्षिती ॥ मथुरानगरींचीनिश्चिती ॥ अंतरबहिर्द्वारेंअवचितीं ॥ पूर्ववतलागलीं ॥ १ ॥ नं तरकारागृहाआंत ॥ बालकाचास्वरनिश्चित ॥ ऐकतांद्वारपालजागृत ॥ अकस्मातजाहले ॥ २ ॥ द्वारपाळानेंत्वरेंजा ऊन ॥ कंसासीसांगितलेंवर्तमान ॥ देवकीचाअष्टमगर्भपूर्ण ॥ जन्मपावलानिर्धारें ॥ ३ ॥ वचनऐकतांचीतात्काळ ॥ कंसजाहलाउतावेळ ॥ शय्यात्यागूनियांरवळ ॥ कारागारींचालिला ॥ ४ ॥ ह्मणेमाझामृत्युहाचिनिश्चिती ॥ मार्गीं जातांपडेक्षितीं ॥ मस्तकींचेकेशसूटती ॥ शीघ्रऐसाप्रासहोय ॥ ५ ॥ ऐसाकंसदेखूनि नयनीं ॥ देवकीदचकलीमनीं ह्मणेबांधवाकृपाकरूनी ॥ हीतवस्नुषानवधींबा ॥ ६ ॥ बहुतबालकांचाजाण ॥ ग्रहणकेलासीबापाप्राण ॥ एवढीक न्याकरीदान ॥ मजलागींयेधवां ॥ ७ ॥ मजअभाग्येसीजाण ॥ हीशेवटीलकन्यादेऊन ॥ करीमनाचेंसमाधान ॥ फार कायमीप्रार्थूं ॥ ८ ॥ श्रीशुकह्मणेराजियासी ॥ कन्याधरूनीपोटाशीं ॥ देवकीविनवीतयासी ॥ आक्रंदूनीतेकाळीं ९ परीतियेचानिषेधकरून ॥ करीकन्येचेंहरण ॥ आपटावयापाहेधरूनिचरण ॥ शिळापृष्ठींकंसतो ॥ १० ॥ तंवतीनि सटोनीगेली ॥ पाहतांपाहतांअंतराळीं ॥ तात्काळजाहलीमहाकाली ॥ विष्णुभगिनीयोगमाया ॥ ११ ॥ साद्यु-

५

७

धाष्टभुजाविराजित ॥ स्रक्चंदनमाल्ययुक्त ॥ रत्नखचितभूषणसुशोभित ॥ आयुधेंकरांनतींपरिसा ॥ १२ ॥ धनुष्यशूलबाण ॥ चर्मखड्गशंखजाण ॥ चक्रगदाविराजमान ॥ वरदाबिकायापरी ॥ १३ ॥ सिद्धचारणगंधर्ववर अप्सराशेषादिफणिवर ॥ जयेसपूजितीऐसीमनोहर ॥ कंसदेखताजाहला ॥ १४ ॥ तंवतीबोलेतयासगर्जून मूर्खातुझाशत्रुझालासेउत्पन्न ॥ व्यर्थमाझाघेऊनिप्राण ॥ कायहोईलकार्यतुझें ॥ १५ ॥ मगतीमायामहीवरी बहुनांमेंपरोपरी ॥ धरूनिरायाअनेकपुरीं ॥ वासकरितीजाहली ॥ १६ ॥ मायावाक्यपरिसूनिकानीं ॥ कंसविस्मितजाहलामनीं ॥ वसुदेवदेवकींलागुनी ॥ मुक्तकरूनीबोलतसे ॥ १७ ॥ हेभगिनीहेवसुदेवाजाण ॥ दुष्टराक्षसवत् अपायकरून ॥ भगिनीसुताचेघेतलेप्राण ॥ कायचांडाळपातकीमी ॥ १८ ॥ प्राणीदेवाधीनअसती ॥ ह्मणूनएकस्थळींनचराहती ॥ अल्पकालपर्यंतजगती ॥ माजीवर्ततीनिश्चयें ॥ १९ ॥ मींपुत्रमारिलेह्मणून ॥ शोकनकरावाहेंजाणून ॥ प्राणीअसतीदेवाधीन ॥ सदाएकत्रनसतीबा ॥ २० ॥ जन्ममरणदेहासपाहीं ॥ जीवालागींनसेकांहीं ॥ यासीदृष्टांतलवलाहीं ॥ परिसेंआतां ॥ २१ ॥ जैसेपृथ्वीवरीजाण ॥ घटादिकहोतातनिर्माण ॥ तयाचानाशहोतांपूर्ण ॥ विकारमहीसीअसेना ॥ २२ ॥ तैसादेहासीविकार ॥ आत्माअसेनिर्विकार ॥ तस्माद्देहयोगवियोगव्यापार ॥ सत्यनसेजाणिजे ॥ २३ ॥ ह्मणूनिहेदेवकीसकुमारी ॥ पुत्रशोकाचात्यागकरी ॥ माझेंदौरात्म्यजेअवसरीं ॥ क्षमाकरीभगिनीतूं ॥ २४ ॥ ऐसेंकरूनियांभाषण ॥ कंसकरिताजाहलारुदन ॥ शांतरोषवसुदेवआपण ॥ बोलताजाहलातेधवां ॥ २५ ॥ कंसावदसीतेंचिसत्य ॥ परीदेहात्मबुद्धिदृढिंगत ॥ अहंकारजाहलानिश्चित ॥ ह्मणूनआपपरमानिती ॥ २६ ॥ तयायोगेंहर्षशोकहोती ॥ तेणेंतयाईश्वरानदेखती ॥ जोएकावधिदुजाहातीं ॥ हनहं

नामानितोस्वयें ॥ २७ ॥ श्रीशुक झणे रायासी ॥ ऐकूनि ऐशा वाक्यासी ॥ आज्ञा घेऊनि सदनासी ॥ कंस जाता जाहला ॥ २८ ॥ त्या रजनीमाजी जाण ॥ कंस सभा भरवून ॥ प्रधानासी सांगे वर्तमान ॥ झणे आतां काय करूं ॥ २९ ॥ ऐसें भोजें द्रचें वचन ॥ श्रवण करितां प्रधान ॥ देवशत्रु दुष्टांतःकरण ॥ काय भाषण करिती ते ॥ ३० ॥ देवांवरी क्रोध धरून बोलती कंसासी लक्षून ॥ जरी ऐसें आहे तरी जाण ॥ युक्ति हीच करणें बा ॥ ३१ ॥ नगरें गांवें गौळवाडे ॥ महीवरील शोधुनि रोकडे ॥ तयामाजी लबालकें निवाडें ॥ अनिर्दशसारीं मारावीं ॥ ३२ ॥ रणीं तव धनुष्य घोषें करून ॥ देव करिती पलायन ॥ जे सर्वदा मानसें उद्विग्न ॥ काय उद्योग करिती ते ॥ ३३ ॥ कोपी कच्छविरहित ॥ कोणी मुक्तकेशयुक्त ॥ पलायन करिती अरण्यांत ॥ तव दर्पे करूनियां ॥ ३४ ॥ त्रिविष्टपा लागून ॥ असणार क्षेम कोठून ॥ देव तुझा शरण येऊन ॥ झणती आह्मी बद्ध झालों ॥ ३५ ॥ सर्वांतर्यामी नारायण ॥ तो योगिहृदयीं राहिला भिऊन ॥ पुरुष संचार रहित जाण ॥ सदाशिव जाणिजे ॥ ३६ ॥ स्मशानीं राहिला निश्चित ॥ अथवा आवडे इलावृत ॥ तो काय करील आत्महित ॥ तुझ्या सन्निध येऊनियां ॥ ३७ ॥ तेसा अल्पविक्रम करणार ॥ काय करील अमरेश्वर ॥ ब्रह्मदेव तपस्वी साचार ॥ काय करील बा पुढा ॥ ३८ ॥ तथापि सापलभाव धरूनी अंतरीं ॥ भूपते वागणें परोपरी ॥ उपेक्षा करितां झडकरी ॥ पुढती आघात होतसे ॥ ३९ ॥ शत्रु मूळ खाणावयासी ॥ आज्ञा देणें आह्मांसी ॥ कारण उपेक्षिल्या शत्रु रोगासी ॥ चिकित्सा शक्य असेना ॥ ४० ॥ अखिल देवांचें मूळ जाण ॥ महाविष्णु कमलारमण ॥ जेथें वेदोक्त धर्म पावन ॥ असती तेथें जाणपां ॥ ४१ ॥ वेदगायी ब्राह्मण ॥ तप यज्ञ दक्षिणा पूर्ण ॥ हें सर्व त्याचें मूळस्थान ॥ जगतीमाजी असे बा ॥ ४२ ॥ हे राजा तपस्वी ब्राह्मण ॥ वेदपाठी तेसे जाण ॥ तयासह यज्ञ धेनूं लागून ॥ आपण

मारूं निश्चयें ॥ ४३ ॥ विप्रधेनुआणि निगम ॥ तपसत्यइंद्रियोपरम ॥ शांतिआस्तिक्यदयाधर्म ॥ यज्ञशरीर विष्णूचें ॥ ४४ ॥ ब्रह्मादिक देवांनिश्चित ॥ विष्णूविप्रसेमूळदैवत ॥ यास्तवऋषिवधहाचिलरित ॥ उपायआतांयोजावा ॥ ४५ ॥ श्रीशुककह्मणेपरीक्षिती ॥ दुष्टप्रधानांसाहितकुमति ॥ ह्याविचारकरूनीशीघ्रगती ॥ आज्ञादेताजाहला ॥ ४६ ॥ तेव्हांपासूनिदैत्यआपण ॥ करितीसाधूंचाद्वेषपूर्ण ॥ समीपप्रासजाहलेंमरण ॥ ह्मणूनिऐसेंआठवलें ॥ ४७ ॥ आयुष्यसंपत्तीआणिधन ॥ करितीमानवांचेंहरण ॥ यास्तवसाधुद्वेषजाण ॥ कवणेंकधींनकीजे ॥ ४८ ॥ पुढिले अध्यायींनिरूपण ॥ वदवीलजेसेंरुक्मिणीरमण ॥ तहूतश्रोतेपरिसापावन ॥ सखारामप्रार्थीतसे ॥ ४९ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ चतुर्थाध्यायगोडहा ॥ ५० ॥ ४ ॥

पंचमाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्रीशुककह्मणेनरनाथा ॥ नंदासिपुत्रजाहलाअसतां ॥ आनंदयुक्तहोत्सातां ॥ दानधर्मकरीबहू ॥ १ ॥ उदारचित्तेंकरून ॥ ज्योतिःशास्त्रज्ञांपाचारून ॥ त्यांच्यासंमतेंकरूनजाण ॥ मंगलस्नानकरीमोदें ॥ २ ॥ वस्त्रालंकारकरूनीधारण ॥ सुशोभितजाहलानंदआपण ॥ विप्रांकरवींस्वस्तिवाचन ॥ यथासांगसंपादी ॥ ३ ॥ यथाविधिदेवपितर ॥ यांचेंपूजनकरवूनसाचार ॥ कृष्णासीजातकर्मसंस्कार ॥ तेणेंसर्वकरविला ॥ ४ ॥ बहुतकाळेंकरून ॥ भूमिशुद्धिहोतेजाण ॥ द्रव्यशुद्धिदानेंकरून ॥ संस्कारेंशुद्धिगर्भाची ॥ ५ ॥ जातकर्मामाजीजाण ॥ नंदरायेंविप्रांदिधलेंदान ॥ नियुतद्वयगोधन ॥ सालंकृतिसंतोषें ॥ ६ ॥ तैसेतिळांचेसमपर्वत ॥ दिधलेविप्रांदक्षिणायुक्त ॥ गायकवादकसंगीत ॥ दाउनीकरितीउत्सवा ॥ ७ ॥ मंगलोत्सवामाजीपावन ॥ सूतमागधबंदिजन ॥ ॥ आशीर्वाददेतीयेउन ॥ कृष्णनाथाकारणें ॥ ८ ॥ भेरीदुंदुभीवाजंतरें ॥ सुस्वरवाजतीअतिगजरें ॥ त्र

जामाजीमंगलतुरें ॥ ध्वजपताकाविराजती ॥ ९ ॥ तैलहरिद्राकरूनीलिप्त ॥ वस्त्रालंकारघालूनिसमस्त ॥ गिरिधातूनेंसुरंजित ॥ धेनुवत्सेंशृंगारिलीं ॥ १० ॥ सर्वगोपाळमिळूनीआपण ॥ धारणकरूनीवस्त्राभरण ॥ सवेंघेऊनिउपायन ॥ नंददर्शनापातले ॥ ११ ॥ परिसूनियशोदासुतोद्भव ॥ मानूनियांआनंदपर्व ॥ गोपिकापातल्यासर्व ॥ नंदालयींतेधवां ॥ १२ ॥ हर्षयुक्तहोऊनिआपण ॥ उत्तमलेऊनिवस्त्राभरण ॥ हस्तकींघेऊनिउपायन ॥ हंसगमनाजातीही ॥ १३ ॥ कज्जलहरिद्राकुंकुमयुक्त ॥ जयांचेदेहमंडित ॥ केशरीचंदनेंकरूनीनिश्चित ॥ वदनेंसुशोभितजयांचीं ॥ १४ ॥ ऐशागोपिकासुंदरी ॥ यशोदेकडेझडकरी ॥ जातीभेटीघेऊनिकरीं ॥ मार्गींकौतुकहोतसे ॥ १५ ॥ कंठींपदकेंशोभती ॥ नीलकुंतलसर्पाकृती ॥ वेणीमाजींकुसुमजाती ॥ सुगंधवेष्टितीमनोरम ॥ १६ ॥ तोंपुष्पेंगमनकाळीं जाण ॥ महीवरीपावतीपतन ॥ हस्तामाजीवलयेंकांचन ॥ रत्नखचितशोभती ॥ १७ ॥ राजमार्गीकरितांगमन ॥ त्यांचींकर्णकुंडलेंरत्न ॥ कंठांमाजीलपुष्पहारजाण ॥ चंचलहोतांशोभाबहू ॥ १८ ॥ ऐशागोपीगृहींयेऊन ॥ यशोदेसीकरितीभाषण ॥ चिरकालसंरक्षण ॥ करीसुंदरीबालकाचें ॥ १९ ॥ हरिद्रातैलउदकेंकरून ॥ करित्याजाहल्या कृष्णासीसिंचन ॥ तेसेंउंचस्वरेंकरितीगायन ॥ महाआनंदप्रवर्तला ॥ २० ॥ त्यानंदनोत्सवींजाण ॥ वाद्येंवाजतीसघन ॥ सर्वगोपाळहर्षयुक्तहोऊन ॥ चमत्कारकरितीबहू ॥ २१ ॥ दहींदूधतूपउदक ॥ नवनीतगोळेघेऊनिअनेक ॥ परस्परांसीताडनकरितीदेख ॥ मानूनिचोरवपर्वणी ॥ २२ ॥ नंदोत्सवार्थधरामर ॥ सूतमागधबंदिजनयेर ॥ गुणीआलेतयांसीउदार ॥ नंदसाचारतोषवी ॥ २३ ॥ स्वपुत्रोदयार्थजाण ॥ नंदेंकेलेमनोरथपूर्ण ॥ महाविष्णूकमलारमण ॥ संतुष्टहोवोह्मणूनी ॥ २४ ॥ वसुदेवपत्नीभाग्यशालिनी ॥ सन्मानेंरक्षिलीरोहिणी ॥ नंदालयींसुखव्यपणीं ॥

सालंकारें मिरवतसे ॥ २५ ॥ त्या दिवसापासून ॥ नंदाचें गोकुळ शोभायमान ॥ कीं हरिप्रियकरावया पूर्ण ॥ लक्ष्मी येऊन राहिली ॥ २६ ॥ नंदराय एकदां जाण ॥ गोपांसि सांगूनि गोकुळरक्षण ॥ द्यावया कंसा वार्षिक धन ॥ मथुरेमाजी तैं गेला ॥ २७ ॥ परिसूनि नंदाचें वर्तमान ॥ भेटीसी आला वसुदेव आपण ॥ गोकुळनाथें अवलोकून ॥ आदरातिथ्य बहु केलें ॥ २८ ॥ वसुदेव ह्मणे तयालागून ॥ मित्रा सुखी आहेस कीं आपण ॥ आजपर्यंत अनपत्य असून ॥ जाहला पुत्र उत्तम हो ॥ २९ ॥ नंदा या संसारचक्रांत ॥ पुत्रमित्रदर्शन दुर्लभ निश्चित ॥ पुनर्जन्म जाहलें प्राप्त ॥ ऐसें गमतें बांधवा ॥ ३० ॥ सरिताओघें करूनि कांहीं ॥ तृणकाष्ठादिक स्थिति पाहीं ॥ सर्वदा एकत्र जेशी नाहीं ॥ तैसीच गति मानवां ॥ ३१ ॥ असो नंदा तुह्मी सकळ ॥ गोपी गोपसहित गोकुळ ॥ मानसीं निश्चिंत निर्मळ ॥ कुशळरूप आहां तरी ॥ ३२ ॥ पशूंस जें हितकारक ॥ आहे कीं काननीं तृणचारा ॥ आहे तरी वेली अनेक ॥ वृद्धिंगत गोकुळीं ॥ ३३ ॥ जो ह्मणे तुज लाताना ॥ ऐसा बलिराम मत्सुत ॥ हे नंदा मातेसहित ॥ सुखी तेथें असे कीं ॥ ३४ ॥ धर्मार्थकाम जाण ॥ पुत्रमित्रसहवासें पूर्ण ॥ पुरुषांसी शास्त्रोक्त पावन ॥ कथिले आहेत जाणपां ॥ ३५ ॥ ते बंधुक्लेशपाशांत ॥ वास करीत असतां नित्य ॥ धर्मार्थकाम मानवा प्राप्त ॥ सुखदायक न होती ॥ ३६ ॥ नंद ह्मणे यादवराया ॥ खेद न करावा वांया ॥ भगवंताची अगम्य माया ॥ तदनुसार सर्व होतसे ॥ ३७ ॥ देवकीचे पुत्र बहुत ॥ कंसें वधिले निश्चित ॥ अवशिष्ट कन्या तीही लरित ॥ स्वर्गी गेली जाणपां ॥ ३८ ॥ पुत्रयोगवियोगासी ॥ कारण अदृष्ट निश्चयेसी ॥ सुखदुःख पुरुषासी भोगणें लागे तद्वशें ॥ ३९ ॥ दुःख न मानीं तयाचें ॥ भजन करीं परमेश्वराचें ॥ जो इच्छेनुसार जगाचें ॥ रक्षण करी निश्चयें ॥ ४० ॥ परिसूनि नंदाची वाणी ॥ शौरी उमजला अंतःकरणीं ॥ बोलता जाहला तत्क्षणीं ॥ काय तें ची परिसावें ॥

॥४१॥ नंदातुवांवार्षिककर॥ कंसासीदिधलासाचार॥ आतांगोकुळींजावेंसत्वर॥ व्रजींउत्पातहोतीलबहु॥ ४२॥ श्रीशुकह्मणेपरीक्षिती॥ वसुदेवगेलासांगूनियुक्ती॥ शकटारूढनंदपुढती॥ सगोपगोकुळाचालिला॥४३॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ दशमस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसखारामविरचित॥ पंचमाध्यायगोडहा॥४४॥ ५॥ षष्ठाध्यायप्रारंभः॥ ॥श्रीशुकह्मणेभारता॥ श्रवणकरीश्रीहरिकथा॥ नंदह्मणेवसुदेववचनवृथा॥ कि मपिनहोयजाणिजे॥१॥ ऐसेंचिंतनकरीत॥ गोकुळाचामार्गक्रमित॥ उत्पातयेणारह्मणूनीत्वरित॥ शरणगेलाश्रीधरा॥ ॥२॥ येरीकडेवर्तमान॥ कायजाहलेंपावन॥ तेंचिपरिसाश्रोतेजन॥ अत्यादरेंकरूनियां॥ ३॥ कंसप्रेषितदुराचारी॥ बालघातिनीमहामारी॥ पूतनाभ्रमूनिपृथ्वीवरी॥ प्राणहरीबाळांचे॥४॥ तीएकदांभ्रमतभ्रमत॥ अकस्मातआलीगोकुळांत॥ कापट्यवेषधरीनिश्चित॥ रंभासमखेचरी॥५॥ केशपाशजातिकुसुमींवेष्टित॥ तेणेंपरिमळवाहेबहुत॥ कटिपृष्ठविस्तीर्णअत्यंत॥ कनककलशवतस्तनजीचे॥६॥ सुंदरवसनेंआच्छादित॥ कटिउदरजाणानिश्चित॥ अवयवकृशअसतीकिंचित॥ कर्णभूषणेंचंचळती॥७॥ देहकांतीनेंदेदीप्यमान॥ कुरळकुंतळेंकरून॥ मुखजीचेंशोभायमान॥ अतिरमणीयजाणपां॥८॥ सुखकरसदाहास्यमुख॥ नेत्रकटाक्षेंकरूनिदेख॥ गोकुलवासीजनाचीरव॥ मोहकारकतीजाहली॥९॥ ऐसीदेवतालावण्यसागर॥ महालक्ष्मीच मनोहर॥ पतिदर्शनाकारणेंसत्वर॥ कमलघेऊनिआलीगमे॥ १०॥ ऐसेंजाणूनिगोपजन॥ कोणीनकरितीनिवारण॥ पूतनानिःशंकपणेंआपण॥ नंदगृहींप्रवेशली॥ ११॥ यशोदारोहिणीजाण॥ गोपिकाकरितीअवलोकन॥ पडलेंसमस्तांसीमोहन॥ निवारणनचकरिती॥ १२॥ यशोदेच्याशयनावर॥ तिणेंदुष्टनाशकरणार॥ श्यामसुंदरमनोहर॥ कृष्ण

नाथदेखिला ॥ १३ ॥ भगवंतानें लीलें करून ॥ स्वतेज केलें आच्छादन ॥ भस्माच्छादित हुताशन ॥ तद्वत भासे विश्वात्मा ॥ १४ ॥ बालघातिनी पूतना जाणून ॥ झांकिले हरीनें आपुले लोचन ॥ नाशरहित स्वयें आपण ॥ दुष्टनाश जो करीतसे ॥ १५ ॥ बालक मानूनि प्राकृत ॥ अंकावरी घेऊनि त्वरित ॥ निजकरें स्तन दे विषयुक्त ॥ पान करावयाकारणें ॥ १६ ॥ जैसा निद्रित सर्प तें नर ॥ निर्भय धरी समजूनि दोर ॥ तैसाचि घडला प्रकार ॥ यासमयीं निश्चयें ॥ १७ ॥ मृदु चर्माचें आवरणवरी ॥ तिखट खड्ग जैसें अंतरीं ॥ तैशी माताकृती वरी परी ॥ दुष्ट अंतरीं खेचरी ती ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ तस्मिंस्तनं दुर्जरवीर्यमुल्बणं घोरांकमादाय शिशोर्ददावथ ॥ गाढं कराभ्यां भगवान्प्रपीड्य तत्प्राणैः समं रोषसमन्वितोपिबत् ॥ १० ॥ टीका ॥ ते पूतना तये काळीं ॥ अंकीं घेऊनि वनमाळी ॥ सविषस्तन मुखीं पिळी ॥ अच्युत घात करावया ॥ १९ ॥ रोषें तेधवां श्रीहरी ॥ पूतनाकुच पिळूनि निजकरीं ॥ तिच्या पंचप्राणांसह सत्वरीं ॥ पान करी गरळाचें ॥ २० ॥ पीडा होतां मर्मस्थानीं ॥ सोडीं सोडीं ह्मणूनी ॥ बोलती जाहली पापिणी ॥ बालघातिनी पूतना २१ सर्वांगीं होऊनि व्यथाभूत ॥ अत्याक्रोशें रुदन करीत ॥ धर्मयुक्त नेत्र फिरवीत ॥ करचरण झाडी तेधवां ॥ २२ ॥ पूतनेच्या शब्दें करून ॥ पृथ्वी जाहली कंपायमान ॥ रविशशी सप्तपाताळेंही जाण ॥ नादायमान दशदिशा ॥ २३ ॥ जाहला कीं वज्रपात ॥ ह्मणूनि लोक पडिले मूर्च्छागत ॥ ऐसा वर्तला आकांत ॥ राक्षसीशब्दें करूनियां ॥ २४ ॥ श्रीशुक ह्मणे परीक्षिती ॥ व्यथा होऊनियां स्तनाप्रती ॥ गतप्राण जाहली निश्चितीं ॥ पसरूनि क्षितीं हस्तपाय ॥ २५ ॥ मरणसमयीं भयंकर ॥ पूतनादेह सविस्तर ॥ पतन पावला महीवर ॥ गोकुळामाजी तेधवां ॥ २६ ॥ जैसा इंद्रवज्रें करून ॥ वृत्रासुर पावतां मरण ॥ पूतनादेह पावला पतन ॥ व्रजामाजी तो तैसा ॥ २७ ॥ सहा कोश पर्यंत जा-

ण ॥ मध्यवर्तीव्हिक्षजाहलेंचूर्ण ॥ तियेचादेह लंबायमान ॥ पसरतांक्षितीवरी ॥ २८ ॥ नांगराचेजैसे फाळ ॥ तैसेति येचे दंत विशाळ ॥ गिरिकंदरनासिककेवळ ॥ अंधकूपवत्‌नेत्र हो ॥ २९ ॥ दीर्घ पर्वतकड्यासमान ॥ शोभती जियेचे स्तन ॥ हस्तपादसेतूसमपूर्ण ॥ शुष्कन्हदवत उदरतें ॥ ३० ॥ पूर्वीदारुणशब्दें करून ॥ जयांचेभेदलेशिरन्हदयकर्ण ॥ रूपपाहतांगोपगोपीजन ॥ अत्यंतभयपावले ॥ ३१ ॥ पूतनावक्षस्थलावर ॥ निर्भयचित्तें मनोहर ॥ खेळतअसतांश्यामसुंदर ॥ गोपिकायेऊनिघेतीत्या ॥ ३२ ॥ यशोदारोहिणीनंतर ॥ गोपुच्छभ्रमणसत्वर ॥ गोमूत्रेंस्नानसाचार ॥ रक्षणप्रकार बहु करिती ॥ ३३ ॥ गोरजःकणांचें रक्षाबंधन ॥ केलेंतैसेंभाळींचर्चन ॥ द्वादशअंगींपावन ॥ केशवादिनामेंन्यासिलीं ॥ ३४ ॥ गोपीकरूनियांस्नान ॥ यथाविधीआचमन ॥ बीजन्याससहितजाण ॥ करितीरक्षणकृष्णाचें ॥ ३५ ॥ अजकरोपादरक्षण ॥ जानूरक्षोमणिमान ॥ यज्ञपतीऊरूंचेंपालन ॥ अच्युत करोकटितटाचें ॥ ३६ ॥ हयग्रीवाउदरसंरक्ष ॥ केशवान्हृदयकमलरक्ष ॥ ईशारक्षींबालकाचेंवक्ष ॥ इनरक्षोकंठनाला ३७ त्रिविक्रमारक्षींवदन ॥ ईश्वरारक्षींमस्तकालागुन ॥ येणेंपरीअंगन्यासकरून ॥ करितीदिग्बंधनतेंपरिसा ॥ ३८ अग्रभागींचक्रधर ॥ पश्चाद्भागींगदाधर ॥ रक्षणकरोधनुर्धर ॥ खड्गपाणिपार्श्वांचें ॥ ३९ ॥ शंखधारीचतुष्कोण रक्षोऊर्ध्वभागींउपेंद्रभगवान ॥ गरुडतुझेंअधोगतीरक्षण ॥ करोहलधरसभोंवतीं ॥ ४० ॥ हृषीकेशइंद्रियांचें रक्षण ॥ करोप्राणांचेंनारायण ॥ योगेश्वरसंरक्षोमन ॥ श्वेतद्वीपपतीचित्तातें ॥ ४१ ॥ पृश्निगर्भरक्षोबुद्धीतें ॥ अहंकाररक्षिजेभगवंतें ॥ क्रीडास्थानींगोविंदयातें ॥ माधवशयनींसंरक्षो ॥ ४२ ॥ वैकुंठपतीगमनकरितां ॥ श्रीपतीरक्षोबैसतां ॥ भोजनकरितांयज्ञभोक्ता ॥ रक्षणकरोयेऊनी ॥ ४३ ॥ शकक्षणडाकिनीशाकिनी ॥ भूतप्रेतपि

शाचजनीं ॥ कोटरा रेवती ज्येष्ठा आदिकरूनी ॥ दुःस्वप्नादि महोत्पात नते ॥ ४४ ॥ वृद्ध बालग्रहजाण ॥ यांचें तात्काळ होय निवारण ॥ करितां महाविष्णुस्मरण ॥ ह्मणूनि तें संख्या करिती ॥ ४५ ॥ स्तन देऊनि सत्वरी ॥ बाळा निजवूनि पालखा अंतरीं ॥ जोजो ह्मणूनि मधुरस्वरीं ॥ गीत गोपिका गाती हो ॥ ४६ ॥ हडगाई बागुल आला ॥ आतां निजरे निज बाळा ॥ ऐशा ह्मणती वेळोवेळां ॥ पूर्णब्रह्मने णुनी ॥ ४७ ॥ इतुक्यामाजी तात्काळ ॥ मथुरेहूनी सकळ ॥ आले नंदादि गोपाळ ॥ पाहूनि विस्मय बहु करिती ॥ ४८ ॥ ह्मणती तपप्रभावें करूनी ॥ वसुदेव जाहला महाज्ञानी ॥ जें कां कथिलें आह्मांलागुनी ॥ तेंचि आलें अनुभवा ॥ ४९ ॥ नंतर गोपाळ येऊन ॥ हस्तकीं परशू घेऊन ॥ पूतनादेह करूनी खंडन ॥ करिती दहन त्या काष्ठीं ॥ ५० ॥ तेव्हां पूतनादेहापासून ॥ सुगंधि धूम जाहला निर्माण ॥ ग्रहण करावयां आली प्राण ॥ परी तीसद्गति पावली ॥ ५१ ॥ ऐसा धूम येतो कोठून ॥ ऐसें बोलती सर्वजन ॥ मग व्रजजनीं पूतनागमन ॥ बालकक्षेम कथियेलें ॥ ५२ ॥ श्रीशुक ह्मणे परीक्षिती ॥ मृतपुत्रजन्म लाभ गमती ॥ ऐसें मानूनि आपुले-चित्तीं ॥ नंद संतोषी जाहला ॥ ५३ ॥ कृष्णा करूनी अवलोकन ॥ केलें मस्तकीं अवघ्राण ॥ पूतनामोक्ष परमपावन ॥ कलिकल्मषनाशक हा ॥ ५४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ य एतत्पूतनामोक्षं कृष्णस्यार्भकमद्भुतम् ॥ शृणुयाच्छ्रद्धया मर्त्यो गोविंदे लभते रतिम् ॥ ४४ ॥ ॥ टीका ॥ ॥ बालक्रीडे माजी पावन ॥ पूतनामोक्ष अद्भुत जाण ॥ जे श्रवण करिती प्रेमें करून ॥ गोविंदभक्ती लाधे तयां ॥ ५५ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखारामविरचित ॥ षष्ठाध्याय गोड हा ॥ ५६ ॥ ६ ॥ ॥ सप्तमाध्याय प्रारंभः ॥ ॥ शुक ह्मणे अभिमन्युनंदन ॥ ईश्वर षड्गुणैश्वर्यसंपन्न ॥ अवतारकृत्यें करी तीं पावन ॥ करितां श्रवणा सुख देती ॥ १ ॥ ऐकतां कृष्णाचरित ॥ मनोग्लानी पावे अस्त ॥ तृष्णा नाशें

शऋद्रविन्न॥ हरिदाससख्यप्राप्तहोय॥२॥ यास्तवकृष्णाकथामृत॥ निरूपींदयाळालरित॥ बालचरित्रश्रवणार्थ॥ मनमाझेंक्षुधितबा॥३॥ श्रीशुकह्मणेभारता॥ परिसेंभावेंआतां॥ गोकुळींबाळकृष्णाअवचिता॥ कुशीवरीवळलासे॥ त्यानिमित्तेंकरूनीजाण॥४॥ उत्सवकरितीमहान॥ जन्मनक्षत्रशऋद्दादन॥ पाहूनिअभिषेचितीबाळातें॥५॥ त्याउ-त्सवामाजीनिश्चिती॥ स्त्रियाज्यापतिस्फतवती॥ एकत्रजाहल्यासहर्षचित्तीं॥ नंदगृहींजाणपां॥६॥ त्यामार्जमंग-लकारक॥ वाद्येंवाजतीअनेक॥ गीतेंगातीसुस्वरेंदेख॥ पर्वणीचोखप्रगटली॥७॥ वेदमंत्रेंकरूनिजाण॥ अभि-षेककरितीब्राह्मण॥ यशोदानिजपुत्रालागून॥ मंगलस्नानकरवीतसे॥८॥ नंतरयशोदेनंजाण॥ विप्रांदीधलें पक्कान्नभोजन॥ दक्षिणेसहितकांचन॥ ऐसेंमंगलतेंकेलें॥९॥ निद्राचिन्हजाहलेंउत्पन्न॥ बालकालागींह्मणू-न॥ गाडियाचेतळीनेऊन॥ पाळण्यामाजीनिजविलें॥१०॥ औत्थानिकनामकउत्सवांत॥ नंदपत्नीनेंयथास्थि-त॥ गोकुलवासीपूजिलेसमस्त॥ तोंरुदनकरीतकृष्णाउठे॥११॥ बालकाचेंरुदन॥ यशोदानकरीतेधवांश्रवण जाणूनियांनारायण॥ कायकरिताजाहला॥१२॥ भजनाहींस्तनपान॥ ह्मणूनिकोपआलामहान॥ चरणझा-डिलातेणेंकरून॥ गाडाचूर्णजाहला॥१३॥ गोरसपात्रेंपडलींसमस्त॥ यशोदानंदअकस्मात॥ पाहतेजाहले तेंकृत्य॥ विपरीतघडलेंह्मणतीते॥१४॥ चूर्णकैसेंजाहलेंशकट॥ साहित्यंभरिलेंसेचोखट॥ कोणीनसतांही निकट॥ कायऐसेंजाहलें॥१५॥ तंवसानुलेंबाळबोलती॥ कृष्णेंपदझाडूनिनिश्चिती॥ गाडामोडिलाअवचितीं परीकोणीसत्यमानीना॥१६॥ तेधवांयशोदाकरूनिरुदन॥ जाऊनिकरीकृष्णग्रहण॥ ग्रहशंकामनींआणून स्वस्तिवाचनकरवीतसे॥१७॥ यशोदाग्रहभयेंकरून॥ करितीजाहलीरुदन॥ बाळकृष्णातेंकरुनिग्रहण॥

शांतीकरवीतयाची ॥ १८ ॥ विप्रांसिकरूनीपाचारण ॥ करवितीजाहलीस्वस्तिवाचन ॥ मायामोहें देऊनिस्तन ॥ बालका-
सीतोषविलें ॥ १९ ॥ अग्नीमाजीकरविलेंहवन ॥ यथाविधिभावेंकरून ॥ केलेंविप्रार्चनआशीर्वादग्रहण ॥ बालकउ-
दयाकारणें ॥ २० ॥ आणिकमंत्रोदकेंकरून ॥ बालकासीघातलेंस्नान ॥ पुण्यकारकपुण्याहवाचन ॥ अन्नदानकेलेंबहु
२१ ॥ कोणेएकेसमयींजाण ॥ यशोदासतीआपण ॥ अंकींघेऊनिपुत्रनिधान ॥ लालनकरीकौतुकें ॥ २२ ॥ तेंनसाहेवे
पुत्रभार ॥ ह्मणूनिठेविलाभूमीवर ॥ विस्मितहोऊनियांफार ॥ गृहकर्मींरतजाहली ॥ २३ ॥ इतुकियामाजीझड
करी ॥ कंसप्रेषितदुराचारी ॥ तृणावर्तयेगोकुळाभीतरी ॥ चक्रवातस्वरूपानें ॥ २४ ॥ धुळीनेंव्यापिल्यादिशादाही
परस्परांचेंदर्शननाहीं ॥ घोरशब्देंकरूनीपाहीं ॥ सकळव्रजदुमदुमिला ॥ २५ ॥ पवनचक्रींयशोदासती ॥ नदेख
तीजाहलीपुत्राप्रती ॥ कष्टमानूनिआपुलेचित्तीं ॥ रुदनकरीआक्रोशें ॥ २६ ॥ नंदराणीशोकाकुल ॥ पाहूनिगोपि
कासकळ ॥ शोककरित्याजाहल्यातात्काळ ॥ मृतवत्साधेनूपरी ॥ २७ ॥ तयाअवसरींजाण ॥ दैत्यकरीकृष्णाहर-
ण ॥ चुकवावयाआत्ममरण ॥ गगनमार्गेंनेतया ॥ २८ ॥ बालकेंकेलेंगलग्रहण ॥ जैसेंनागपाशाचेंबंधन ॥ शल्य
वतहोऊनिआपण ॥ असमर्थकेलेंदैत्यासी ॥ २९ ॥ कंठबंधनेंकरूनिजाण ॥ बाहेरआलेत्याचेनयन ॥ व्यथितहो
ऊनिगतप्राण ॥ गोकुळामाजीपडियेला ॥ ३० ॥ जैसाशंकरबाणेंकरून ॥ त्रिपुरपावलासागरींपतन ॥ तैसाभयंक
रदैत्यजाण ॥ व्रजींपडेशिळेवरी ॥ ३१ ॥ त्यादैत्याचेउरस्थळीं ॥ निर्भयरवेळेवनमाळी ॥ गोपिकायेऊनितयेवेळीं ॥
कृष्णनाथाघेतीत्या ॥ ३२ ॥ यशोदेसन्निधबाळ ॥ आणुनीदिधलातात्काळ ॥ ह्मणतीयासीआलाहोताकाळ ॥ परी
वेळनचआली ॥ ३३ ॥ आश्चर्यसकळकरिती ॥ नंदादिगोपाळआपुलेचित्तीं ॥ पुण्यअसेआमुचेंसंचितीं ॥ ह्मणूनि

ऐसेंजाहलें॥३४॥वसुदेवाचेंवचन॥नंदस्मरूनीमानसींजाण॥आश्चर्यकरीतसेपूर्ण॥ह्मणेधन्ययादवतो॥३५॥कोणे
एकेंसमयींजाण॥अंकींघेऊनिनारायण॥यशोदाकरीमुखाचेंलालन॥तोंनवलावदेखिला॥३६॥तृणावर्ताचेआगम
नीं॥भारभूतजाहलोंह्मणूनी॥शंकायेईलजननीसह्मणूनी॥बोधार्थतिच्याकरीऐसें॥३७॥जांभईचेंनिमित्तकरून॥
आपुल्यामुखींकमळारमण॥विश्वदाखविताजाहलापूर्ण॥जननीलागींतेकाळीं॥३८॥गगनस्वर्गधरणीसहित॥नक्ष-
त्रसमुदायमूर्तिमंत॥दशादिशासूर्यरोहिणीकांत॥अग्निवायुजाणिजे॥३९॥सप्तद्वीपेंसप्तसागर॥गंगादिसरितापर्व
तथोर॥नैमिषादिवनेंस्थावर॥जंगमप्राणीहरिवदनीं॥४०॥ ॥श्लोक॥ ॥सावीक्ष्यविश्वंसहसाराजन्संजातवेप
थुः॥संमील्यमृगशावाक्षीनेत्रेआसीत्सुविस्मिता॥३८ टीका ॥नरशार्दूलापरिसेंनिश्चित॥हरिणलोचनीयशोदाल
रित॥विश्वपाहेकृष्णावदनांत॥कायभाग्यसांगावें॥४१॥नेत्रझांकूनिअंतरीं॥विस्मयकरीनंदाचीअंतुरी॥ह्मणेकैशी
जाहलीपरी॥जागृतीकिंवास्वप्नहें॥४२॥श्रीमद्भागवतसारामृत॥दशमस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविर
चित॥सप्तमाध्यायगोडहा॥४३॥ ७॥ ॥अष्टमाध्यायप्रारंभः॥ ॥श्रीशुकबोलतीवचन॥राजापरीक्षितीसाव-
धान॥हरिकथाकरीश्रवण॥कायपुढतीजाहलीती॥१॥यादवांचापुरोहित॥गर्गाचार्यपरमपुनीत॥वसुदेवसंम
तेंकरूनित्वरित॥नंदगोकुळापातला॥२॥गोकुळनाथअवलोकुन॥करिताजाहलाभावेंवंदन॥आदरातिथ्यकरू
निजाण॥आसनींत्याबैसविलें॥३॥मगह्मणेविप्रोत्तमाआपण॥सर्वगुणींआहांतपूर्ण॥तेव्हांपूर्णाचेंआह्मीपूर्ण
कायकरावेंनिश्चयें॥४॥तुह्मीअतींद्रियज्ञान॥ज्योतिःशास्त्रसाधन॥पुरुषाचेंभूतभावीवर्तमान॥त्रिकालहीं
जाणतसा॥५॥माझेकुमाराचेंजातक॥आपणकरावेंसविधीचोख॥वचनपरिसूनियांअशोख॥गर्गबोलताजाह

ला ॥ ६ ॥ नंदरायापरिसें वचन ॥ मी यादवांचा पुरोहित जाण ॥ तुझे पुत्राचें करितां जातकरण ॥ देवकीनंदन ह्मणती-
लया ॥ ७ ॥ कन्यावचन श्रवणें करून ॥ कंस निश्चय करील पूर्ण ॥ देवकीचा अष्टम गर्भ जाण ॥ कन्या ह्मावया योग्य-
नसे ॥ ८ ॥ आणि तूं वसुदेवाचा ॥ सखा प्रसिद्ध आहेसि साचा ॥ ह्मणूनि बापा जातकाचा ॥ अनुमान याकाळीं ॥ ९ ॥
यापरी परिसूनि भाषण ॥ बोलता जाहला नंद आपण ॥ एकांत एक असे स्थान ॥ अलक्षित गोपाळां ॥ १० ॥ त्यास्थ-
ळीं जाऊनि आपण ॥ संस्कारयुक्त पुण्याहवाचन ॥ बालकाचें करा पूर्ण ॥ न करा अनुमान गुरुराया ॥ ११ ॥ श्रीशुक-
ह्मणे मेदिनीनाथा ॥ ऐसें नंदें प्रार्थिलें असतां ॥ गर्गें जाऊनि एकांता ॥ सविधि कर्म संपादिलें ॥ १२ ॥ गर्ग बोले वचन सा-
र ॥ जाणा हा रोहिणीकुमर ॥ आप्तजनां रमवील फार ॥ राम नाम ह्मणूनियां ॥ १३ ॥ जयाचें बळ अधिक ॥ ह्मणूनि बल
देव ह्मणतील देख ॥ यादवांचें एकमत चोख ॥ करील संकर्षण हाचि बा ॥ १४ ॥ प्रतियुगीं अवतारधारण ॥ करणारा हा
तुझा नंदन ॥ शुक्ल रक्त पीत वर्ण ॥ आतां कृष्ण जाहला ॥ १५ ॥ हा नव पुत्र निश्चयेंसी ॥ क्वचित जाहला वसुदेवासी ॥
ह्मणूनी वासुदेव नामें यासी ॥ बाहतील जन सारे ॥ १६ ॥ तव पुत्राचें नाम कर्म ॥ न कळे ब्रह्मादिकां त्याचें वर्म ॥ ब-
हुत असती निःसीम ॥ योगी तेही न जाणती ॥ १७ ॥ पूर्वीं नरपतीविण ॥ पावला जे धवां मरण ॥ ते धवां साधूचें संरक्षण ॥
येणें केलें गोकुळेश्वरा ॥ १८ ॥ जे मानव भाग्यवंत ॥ मनीं ध्याऊनि भगवंत ॥ तुझ्या पुत्रावरी प्रीती बहुत ॥ करिती ते ची
धन्य बा ॥ १९ ॥ ते जन शत्रूंचा निःपात ॥ निश्चयें करिती क्षणांत ॥ विष्णुपक्षी सुरपराभूत ॥ करिती जैसे दानवां २०
परिसें जातक फल पावन ॥ हा पुत्र करील तुमचें कल्याण ॥ अनायासें करूनि तरण ॥ संसारसागरीं होईल ॥ २१ ॥
श्लोक ॥ ॥ तस्मान्नंदात्मजोयंतेनारायणसमोगुणैः ॥ श्रियाकीर्त्यानुभावेनगोपायस्वसमाहितः ॥ १९ ॥ टीका ॥ नंद-

रायातुझानंदन॥स्वरूपशोभाकीर्तिसद्गुण॥यांहींनारायणासमान॥यास्तवरक्षणकरीयाचें॥ २२॥ कृष्णमाहात्म्य यापरी॥नंदासिसांगूनिझडकरी॥गर्गमुनीतेअवसरीं॥ निजाश्रमींपावले॥२३॥ नंदहोऊनिहर्षयुक्त॥आपणाला गींधन्यकृतार्थ॥सर्वसौख्यपात्रजगांत॥मानिताजाहला॥२४॥श्रीशुकह्मणेपरीक्षिती॥ कांहींकाळजातांपुढती बळरामासहश्रीपती॥ व्रजांतरांगतीकौतुकें॥ २५॥आपलेगुडघेआणिहस्त॥ भूमीटेकोनियांनेमस्त॥रामासहित रंगनाथ॥रांगताजाहलाअंगणीं २६॥त्याव्रजकर्दमींजाण॥रांगतां अच्युतसंकर्षण॥ जिहीं भूषितकटिचरण॥ भूष- णेंशब्दकरितीतीं॥२७॥तीनचारपाउलेंपुढेंजाऊन॥ मागुतीकरितीअवलोकन॥ दिसतांचिभयकारण॥जननींसंनि धतेंयेती॥२८॥मातायशोदारोहिणी॥उभयपुत्रांअवलोकुनी॥मायामोहेंस्रुतस्तनी॥असत्याजाहल्यातेकाळीं॥ २९॥सुगंधअंगरागेंजाण॥ तयांसीकेलेंअसेलेपन॥तयामाजीव्रजकर्दमपूर्ण॥ मिश्रितअंगींबाळांचे॥३०॥ बाळघेऊनिमांडीवरी॥स्तनपाजितीआपुलेकरीं॥तेधवांपाहतीवदनांतरीं॥ अल्पदशनउभयांचे॥३१॥ यशोदा रोहिणीआपण॥मनींपावतीसमाधान॥पुढेंकांहींकाळजातांपूर्ण॥व्रजींरामकृष्णखेळती॥३२॥गोवत्सांचेंपुच्छ धरून॥दोघेकरितीत्याचेंकर्षण॥तयायोगेंजेसंभ्रमण॥घडेतेंसेंसाहती॥३३॥हाचमत्कारपाहून॥गृहकृत्याचें विस्मरण॥गोपिकापावतीआपण॥हास्यसुखेंतोषपावती॥३४॥अतिचपलसुकुमार॥क्रीडेविषयींतत्पर॥न यांचाकरावयाप्रतिकार॥समर्थमातानचहोती॥३५॥ धेनुवृषभवैश्वानर॥उदकआणिखड्गघोर॥पक्षीकंट कयांपासूनअनिवार॥कुमाररोधूंनशकती॥३६॥तेव्हांप्रभूनेंतयांसीसाचें॥पूर्णत्वदाविलेंगृहसौख्याचें॥तेंका यबावर्णूवाचें॥श्रीशुकह्मणेभारता॥३७॥पुढतीकांहींकाळजातां॥महीसजानूकरनलावितां॥अनायासेंक

रूनीअवचितां ॥ रामकृष्णचालती ॥ ३८ ॥ समवयस्कबाळकें घेऊन ॥ रामासहितभगवान ॥ सर्वव्रजस्त्रियांसीहर्षदे-
ऊन ॥ बाळक्रीडाकरीतो ॥ ३९ ॥ कौमारचापल्यपाहून ॥ गोपिकानंदगृहीं येऊन ॥ गान्हाणींसांगतीआपण ॥ कवणे-
परीतींपरिसा ॥ ४० ॥ श्लोक ॥ वत्सान्मुंचन्क्वचिदसमयेक्रोशसंजातहासः स्तेयंस्वाद्वत्त्यथदधिपयः कल्पितैः
स्तेययोगैः ॥ मर्कान्भोक्ष्यन्विभजतिसचेन्नात्तिभांडंभिनत्तिद्रव्यालाभेसगृहकुपितोयात्युपक्रोश्यतोकान्
२९ ॥ टीका ॥ हेयशोदेसुंदरी ॥ कृष्णयेऊनिआमुचेघरीं ॥ दोहनाचेअनवसरीं ॥ वत्सेंसोडितोधेनूंकडे ॥ ४१ ॥ कुपित
होऊनिजाण ॥ कोणींकेलेंजरीभाषण ॥ तरीबळेंहास्यवदन ॥ करूनीमनमोहितो ॥ ४२ ॥ आह्मींतयागोरसकांहीं
भक्षणार्थजरीदिधलानाहीं ॥ तरीचोरीकरूनीलवलाहीं ॥ दहिंदूधभक्षितो ॥ ४३ ॥ बाळांसहितआपण ॥ गोरसकरू-
नीभक्षण ॥ शेखींदेतोवानरांलागुन ॥ काययासीह्मणावें ॥ ४४ ॥ शाखामृगहोतांतृप्त ॥ गोरसराहिलाजोकिंचित ॥
तोभूमीवरीसांडूनिदेत ॥ पात्रेंभग्नकरितोहा ॥ ४५ ॥ दहिंदूधनमिळेजेथें ॥ अग्निलावीनह्मणेतेथें ॥ आणखीजेंकरी
कृत्यतें ॥ परिसेंसर्वसाजणी ॥ ४६ ॥ बाळकेंजोंनिद्राभरीं ॥ असतीशेजेकींभूमीवरी ॥ तयांसीरडवूनिसत्वरी ॥ पळू-
निजातोयशोदे ॥ ४७ ॥ श्लोक ॥ हस्ताग्राह्येरचयतिविधिंपीठकोलूखलाद्यैश्छिद्रंह्यंतर्निहितवयुनः शिक्यभांडे-
षुतद्वित् ॥ ध्वांतागारेधृतमणिगणंस्वांगमर्थप्रदीपंकालेगोप्योयर्हिगृहकृत्येषुसुव्यग्रचित्ताः ३० ॥ टीका ॥ जेउंच
पदार्थशिंक्यावरी ॥ ठेविलेअसतीगृहांतरीं ॥ तेकरींयावयाझडकरी ॥ उपायकृष्णकरीतसे ॥ ४८ ॥ पाटठेवूनिउखळ-
ावरी ॥ गोरसपाहेशिंक्यावरी ॥ मणिप्रकाशेंअंधकारीं ॥ छिद्रकरीघटातें ॥ ४९ ॥ गोपीगृहकृत्यांव्यग्रांतरीं ॥ ऐसी
संधीपाहूनिझडकरी ॥ पुत्रतुझाचोरीकरी ॥ देवयोगेंजरीधरिला ॥ ५० ॥ तरीहाउलटआह्मांचोर ॥ ह्मणेकायतुमचे

बाचेंघर ॥ मीचअसेंगृहपतिथोर ॥ तुह्मीपामरकोणगे ॥ ५१ ॥ धीटपणाचेंकरूनिभाषण ॥ संमार्जितगृहींकृष्ण ॥
मलमूत्रादिकविसर्जन ॥ करितोबळें ॥ ५२ ॥ नानाउपायेंचोरीकरी ॥ उसंतनसेक्षणभरी ॥ याचेभेणेंगोकुळतरी ॥ सो
डुनीजावेंवाटतें ॥ ५३ ॥ हाकृष्णतुझ्याजवळ ॥ साधूसारिखाबैसलानिश्चळ ॥ परीबाईयशोदेअतिचपळ ॥ गुणकाय
याचेवानावे ॥ ५४ ॥ कैसाबैसलाभययुक्त ॥ नेत्रकमळेंसूशोभित ॥ ऐसेंगाऱ्हाण्याचेंकरूनिनिमित्त ॥ गोपीयेतीनंदा
लयीं ॥ ५५ ॥ यापरीऐकूनिवचन ॥ यशोदाआपुलेपुत्रांलागुन ॥ क्रोधयुक्तनकरीभाषण ॥ कायमाहात्म्यकृष्णाचें ॥
५६ ॥ एकेसमयींरामादिक ॥ खेळतअसतांगोपबाळक ॥ कृष्णेंमृत्तिकाभक्षिलीदेख ॥ ह्मणूनिकथितीयशोदेसी ५७
तेथवांयशोदासुंदरी ॥ कृष्णहस्ताधरूनिकरीं ॥ रागेंभरूनिबहुपरी ॥ कायबोलेतेंपरिसा ॥ ५८ ॥ हेचपल्लागाश्री-
पती ॥ मृत्तिकाभक्षिलीएकांतीं ॥ ऐसीपरिसूनिवचनोक्ति ॥ बाळकृष्णउत्तरदे ॥ ५९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नाहंभक्षि
तवानंबसर्वेमिथ्याभिशंसिनः ॥ यदिसत्यगिरस्तर्हिसमक्षंपश्यमेमुखम् ॥ ३५ ॥ टीका ॥ मातेमींमृत्तिकाजा
ण ॥ केलीनाहींभक्षण ॥ बलरामादिकयेऊन ॥ असत्यतुजसांगती ॥ ६० ॥ जरीत्यांचेंसत्यभाषण ॥ तरीसमक्ष
अवलोकींवदन ॥ यशोदाह्मणेकरीविस्तीर्ण ॥ विलंबनकरीयेथवां ॥ ६१ ॥ तेव्हांश्रीहरीआपण ॥ मुखविका-
सितकरीपूर्ण ॥ तयामाजीचराचरजाण ॥ दावितावाहल्लाजननीसी ॥ ६२ ॥ अद्रिद्वीपादिसहित ॥ ज्योतिश्चक्र
परमपुनीत ॥ गोकुळनंदआपणासहित ॥ विश्वऐसेंदाविलें ॥ ६३ ॥ तेंपाहूनियशोदेसी ॥ शंकाआलीमान-
सीं ॥ स्वप्नवादेवमायानिश्चयेंशीं ॥ अथवाऐश्वर्यबालकाचें ॥ ६४ ॥ मगह्मणेहानोहेबाळ ॥ परब्रह्मआहेहा
निष्कळ ॥ याचेचरणकमळींनिश्चळ ॥ वंदनअसोपैंमाझें ॥ ६५ ॥ ऐसेंजाणेजोंयशोदासुंदरी ॥ तोंकृष्णपुत्र-

स्नेहाचीमायावरी ॥ घालितांबुद्धिनष्टझडकरी ॥ होतीजाहलीतियेची ॥ ६६ ॥ मायामोहेंकरून ॥ बालकाकरवीत
सेस्तनपान ॥ राजाबोलेआश्चर्यमानून ॥ शुकयोगींद्राकारणें ॥ ६७ ॥ नंदेंपुण्यकेलेंकवण ॥ तेसेंयशोदेनेंपाव
न ॥ कींत्यांचेगृहींनारायण ॥ स्तनपानकरीतसे ॥ ६८ ॥ ऐकूनिश्रीशुकबोलती ॥ परिसेंराजापरीक्षिती ॥ द्रोणनाम-
कवसुनिश्चिती ॥ त्याचीभार्याधरानामें ॥ ६९ ॥ तयाआज्ञापीचतुरानन ॥ गोपकुळींव्हावेंनिर्माण ॥ तेंतेणेंब्रह्माप्रा-
र्थिलापूर्ण ॥ विष्णुभक्तिदेणेंआह्मां ॥ ७० ॥ तथास्तुह्मणतांचतुरानन ॥ गोकुळींहोयतोनंदाभिधान ॥ यशोदाना
मेंधराजाण ॥ उत्पन्नजाहलीराजेंद्रा ॥ ७१ ॥ श्रीहरिविधिवचनार्थ ॥ प्राप्तजाहलागोकुळांत ॥ नंदगृहींबलराम
सहित ॥ भक्तकामपूर्णकरी ॥ ७२ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसरवारामविरचित
अष्टमाध्यायगोडहा ॥ ७३ ॥ ८ ॥ नवमाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्रीशुकउवाच ॥ श्लो० ॥ एकदागृहदासीषु यशोदा
नंदगेहिनी ॥ कर्मांतरनियुक्तासु निर्ममंथस्वयंदधि ॥ १ ॥ टी० ॥ श्रीशुकबोलतीवचन ॥ कोणेएकेसमयींजाण ॥
कृष्णाचरित्रजाहलेंपावन ॥ राजाश्रवणतेंकरी ॥ १ ॥ आपल्याघरांतीलदासी ॥ लागल्याअन्यकार्यासी ॥ जाणूनिय-
शोदानिश्चयेसी ॥ दधिमंथनस्वयेंकरी ॥ २ ॥ कृष्णाचींजींबालचरितें ॥ त्यांचेंस्मरणकरूनिगीतें ॥ गातमंथितांय-
शोदेचीतें ॥ शोभाभासेअत्यद्भुत ॥ ३ ॥ श्लोक ॥ ॥ क्षौमंवासः पृथुकटितटेबिभ्रतीसूत्रनद्धंपुत्रस्नेहस्नुतकु-
चयुगंजातकंपंचसुभ्रूः ॥ रज्ज्वाकर्षश्रमभुजचलत्कंकणौकुंडलेचस्विन्नंवक्त्रंकबरविगलन्मालतीनिर्ममंथ ॥
३ ॥ टीका ॥ पुष्टकटीवरीजाण ॥ रेशमीवस्त्रपरिधान ॥ वरीकंबरपट्ट्याचेंबंधन ॥ विराजमानदिसतसे ॥ ४ ॥
पुत्रस्नेहेंकरूनिपाझर ॥ सुटेजयांऐसेपयोधर ॥ मंथनकाळींवारंवार ॥ कंपितहोतीजयेचे ॥ ५ ॥ घुसळण्या-

चीदोरी ॥ ओढितांश्रमेनंदाचीअंतुरी ॥ हेमकंकणेंहालतीकरीं ॥ कुर्णींकुंडलेंकंपितहो ॥ ६ ॥ आणिजियेच्यासुखा
वर ॥ स्फुटलाघर्माचापाझर ॥ श्रमयोगेंमनोहर ॥ भासोंलागेतेधवां ॥ ७ ॥ वेणीमाजीलमालती ॥ कुसुमेंगळतीखा
लती ॥ ऐशीमंथनकरीनंदसती ॥ दिसेशोभाविलक्षण ॥ ८ ॥ स्तनपानार्थचक्रपाणी ॥ धांवतआलातेक्षणीं ॥ दधिमं-
थनाचीरवीधरूनी ॥ ह्मणेक्षुधितामातेंदेस्तन ९ उचंबळूनीप्रेमसागर ॥ कृष्णासिघेतलेंअंकावर ॥ स्तनपानकरवि
तांवारंवार ॥ सुखकमळविलोकी ॥ १० ॥ श्रीहरिह्मणेमनांत ॥ माझ्यावरीजननीचित्त ॥ आहेअथवासंसारींसक्त ॥
पाहूंप्रचीतपैंयाची ॥ ११ ॥ ऐसेंचिंतूनिमनीं ॥ अग्नीसीआज्ञातेक्षणीं ॥ देताजाहलामोक्षदानी ॥ दुग्धतेणेंकरपिलें ॥ १२
ऐसाप्रकारजाहला ॥ यशोदेसीवासआला ॥ पृथ्वीवरीठेवूनिभगवंताला ॥ गृहामाजीतीगेली ॥ १३ ॥ कृष्णासीराग-
आलापूर्ण ॥ स्फुरेअधरोष्ठरक्तवर्ण ॥ वेगेंहाणूनिपाषाण ॥ मंथनडेराफोडिला ॥ १४ ॥ मिथ्याआणूनिअश्रुपात ॥
एकांतींजाऊनिलरित ॥ भक्षीतसेनवनीत ॥ जगन्नाथस्वच्छंदें ॥ १५ ॥ येरीकडेझडकरी ॥ दुग्धठेवूनिशिंक्यावरी
यशोदापाहेतेअवसरीं ॥ मंथनपात्रभग्नतें ॥ १६ ॥ पुत्रकृत्यऐसेंजाणून ॥ करितीजाहलीहास्यवदन ॥ परीनदिसेते-
थेंकृष्ण ॥ ह्मणूनितयाशोधितसे ॥ १७ ॥ तोंउखळघालूनिपालथें ॥ लोणीसंगृहीतशिंक्यावरुतें ॥ आपणभक्षूनि
वानरांतें ॥ देतांमाताअवलोकी ॥ १८ ॥ ऐसापाहूनिश्रीपती ॥ सकळतस्करांचानरपती ॥ तयाच्यामागेंयशोदास-
ती ॥ धरावयाजातसे ॥ १९ ॥ हातींघेऊनिवेताटी ॥ मायलागलीअसेपाठीं ॥ ऐसेंजाणूनिजगजेठी ॥ दूरभयेंपळतसे
२० ॥ एकाग्रचित्तेंकरून ॥ योगीकरितीजेध्यान ॥ तयांसीनातुडेजोनारायण ॥ यशोदातयाधरूंपाहे ॥ २१ ॥ मातेसीश्र
मजाहलेफार ॥ ऐसेंजाणूनिनंदकुमार ॥ भक्तपराधीनताप्रकार ॥ दावीताजाहलागोपींतें ॥ २२ ॥ गमनकरितांलसि-

न ॥ हस्तकीं धरिला रमानाथ ॥ जो कांपे रथरथरां कांपत ॥ कृतापराध रडतसे ॥ २३ ॥ ऐसी या कृष्णा परमात्म्यासी ॥ पा-
शें बांधावया उखळाशीं ॥ यशोदा इच्छी निजमानसीं ॥ कीं ऐसें पुन्हां न करावें ॥ २४ ॥ जयासी नाहीं आदिअंत ॥ च-
राचरव्यापक भगवंत ॥ मनुष्याकृती भासे प्राकृत ॥ परमेश्वर ऐसा हा ॥ २५ ॥ तयासी पुत्र मानून ॥ करूं पाहे उख-
ळीं बंधन ॥ काय गोपीचें अज्ञान ॥ करावें वर्णन भाविक हो ॥ २६ ॥ दांवें आणूनि झडकरी ॥ उखळासी बांधी मुरा-
री ॥ दोन अंगुळें ते अवसरीं ॥ रज्जू अपुरी जाहली ॥ २७ ॥ आणिलें दांवें दुसरें ॥ तेंही श्रीकृष्णा न पुरे ॥ दोन अंगुळें
असे अपुरें ॥ गोपी विस्मित जाहल्या ॥ २८ ॥ जीं दांवीं गोपिका आणिती ॥ अपूर्णचि तीं सारीं होतीं ॥ मातास खेद
जाहली चित्तीं ॥ पाहूनि रमापती कळवळे ॥ २९ ॥ सदयहृदय भगवान् ॥ मातेकरीं घे बांधुन ॥ कीं मी भक्तपराधी-
न ॥ आहें ऐसें दाखवी ॥ ३० ॥ सुलभ श्रीहरी भक्तांसी ॥ सदा प्रेमळा भाविकांसी ॥ ब्रह्मादिक योगीजनांसी ॥ महा-
दुर्लभ जाणिजे ॥ ३१ ॥ उखळीं कृष्णासी बांधुनी ॥ गृहकृत्यासि गेली जननी ॥ तों यमलार्जुन चक्रपाणी ॥ द्वारामा-
जी अवलोकी ॥ ३२ ॥ पूर्वीं देवयोनीमाजील देख ॥ गुह्यकजाती कुबेर बाळक ॥ संपत्ति योगें प्रमत्त चोख ॥ न गणि-
ती कवणातें ॥ ३३ ॥ ते चि नारद शापें करून ॥ गोकुळीं पावले वृक्षजनन ॥ नलकूबर मणिग्रीव जाण ॥ प्रसिद्ध त्यांचीं ना-
में हीं ॥ ३४ ॥ तयांसी पाहता जाहला हरी ॥ उखळासहित झडकरी ॥ रांगत आला ते अवसरीं ॥ भक्तोद्धरण करावया
३५ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ नवमाध्याय गोड हा ॥ ३६ ॥ ९
दशमाध्याय प्रारंभः ॥ ॥ भावें बोले उत्तरानंदन ॥ हे वैयासके करा कथन ॥ तयाचे शापा कारण ॥ अपराध काय य-
क्षांचा ॥ १ ॥ या परी परिसूनि वचन ॥ निरूपी श्रीशुक आपण ॥ श्रीकृष्णचरित्र पावन ॥ तें चि ऐका सज्जन हो ॥ २ ॥ जाण

कुबेरकुमर ॥ शंकराचे अनुचर ॥ कैलास उपवनीं गंगातीर ॥ पाहुनी क्रीडा करिती बहू ॥ ३ ॥ स्त्रीजनांसहित आपण ॥
करूनियां मदिरापान ॥ जलकेलीवारणां समान ॥ करिती सोदंते धवां ॥ ४ ॥ दैवयोगें करूनि जाण ॥ देवर्षि नारद पा
तला आपण ॥ तयासी करितां अवलोकन ॥ वस्त्रपरिधान करिती स्त्रिया ॥ ५ ॥ कुबेरपुत्र मदिरामत्त ॥ नग्न राहिले
जळांत ॥ शापभय मनांत ॥ किमपि नसे तयांच्या ॥ ६ ॥ मत्त पाहूनि वैश्रवणकुमार ॥ तयां अनुग्रहार्थ मुनीश्वर ॥
शाप देता जाहला सत्वर ॥ वृक्ष व्हा रे गोकुळीं ॥ ७ ॥ नारद बोलती वचन ॥ विषयसेवकाला गुन ॥ बुद्धिभ्रंश कारण
श्रीमद उत्पन्न होतसे ॥ ८ ॥ विभवमदा समान ॥ अन्य नाहीं अनर्थ कवण ॥ याच मदें स्त्रीव्यसन ॥ द्यूत वारुणी रत्न
बहु ॥ ९ ॥ जरी जाहला लोकेश्वर ॥ अंतीं कीटक कीं भस्म होणार ॥ तया देहा मानूनियां स्थिर ॥ करिती संहार पशूंचा ॥
१० ॥ भूतद्रोह करूनि आपण ॥ मिळवितो नरकाचें साधन ॥ त्यास त्या कर्मापासून ॥ सौख्य कांहीं न लाधेची ॥ ११ ॥ जो भू
तद्रोह करणार ॥ प्राणी तो काय समजे साचार ॥ तयासी स्वार्थ परमार्थ प्रकार ॥ कांहींच नाहीं जाणिजे ॥ १२ ॥ अभिमा
न वाहती ज्याचा ॥ तो देह काय अन्नदातियाचा ॥ कीं जननीचा अथवा पित्याचा ॥ बलिष्ठाचा कीं असे ॥ १३ ॥ अग्नीचा
अथवा श्वानाचा ॥ हा देह आहे कवणाचा ॥ अहो साधारण देह असे काचा ॥ व्यर्थ अभिमान वागविती ॥ १४ ॥ प्रकृ
तीपासूनि निर्माण ॥ देह होतो जाण ॥ शेवटीं प्रकृतीमाजी लीन ॥ होत असे जो ॥ १५ ॥ ऐशा नश्वर देहा लागून ॥ कव
ण मूर्ख वांचून ॥ आत्मा ह्मणूनि विद्वान ॥ भूतद्रोह करील पैं ॥ १६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ असतः श्रीमदांधस्य दारि
द्र्यं परमांजनम् ॥ आत्मौपम्येन भूतानि दरिद्रः परमीक्षते ॥ १३ ॥ टीका ॥ धनमदगर्वें करून ॥ अंध जाहले जया
चे नयन ॥ तयासी दैन्यरूपी अंजन ॥ घालितां सावध होतसे ॥ १७ ॥ जो दरिद्री असे जन ॥ तो कवणाचा द्रोह न करी आ

पण॥आपुलाअनुभवपाहून॥जगतीसाजीवर्ततसे॥१८॥ श्लोक॥ यथाकंटकविद्धांगोजंतोर्नेच्छ तितांव्यथाम्॥
जीवसाम्यंगतोलिंगैर्नतथाविद्धकंटकः॥१४॥ टीका ॥जैसाकंटकभेदेचरणासी॥तयाचीव्यथाआपणसोसी॥प
रीहीव्यथाहोवोदुसरीयासी॥ऐसेंनइच्छीसर्वथा॥१९॥जयासीकांटाटोंचलानाहीं॥तयासीदुःखानुभवकांहीं॥ नसे
यामुळेंपरदुःखपाहीं॥तेंअंगींहीस्पर्शेना॥२०॥दरिद्रीपुरुषआपण॥दुःखातेंकरितोसहन॥क्षुधातृषाकरि-
तांपीडन॥परहिंसानकरीतो॥२१॥यास्तवधनगर्विताचा॥दर्पहरीनमीसाचा॥ह्मणूनिलोकपालकुमरांचा॥
मदभंगकेलाशापयोगें॥२२॥ स्त्रियांसहितवस्त्ररहित॥जडकाष्ठापरीक्रीडतीजळांत॥ ह्मणूनिशापदिधलातरि
त॥वृक्षव्हालगोकुळीं॥२३॥माझ्याप्रसादेंकरून॥दर्शनदेईलनारायण॥पुनरपिपावालआपुलेंस्थान॥अनु-
ग्रहकेलायापरी॥२४॥शुकह्मणेऐसेंबोलूनी॥नारदगेलेबदरीवनीं॥नलकूबरमणिग्रीवदोनी॥वृक्षगोकुळीं
जाहले॥२५॥नारदाचेंवचन॥सत्यकरावयाभगवान॥उलूखलबद्धजाण॥दामोदरयेतेथें॥२६॥ दोंवृक्षांम
धूनिजातांहरी॥उखळआडलेंतयांभीतरी॥ बळेंओढितांतेअवसरीं॥वृक्षउन्मळोनीपडियेले॥२७॥वृक्षप-
तनेंकरूनिजाण॥गोकुळींशब्दजाहलादारुण॥तयांवृक्षांमधून॥कुबेरनंदनप्रगटले॥२८॥करूनिसाष्टांगन
मन॥भावेंकरितीतेव्हांस्तवन॥जयजयब्रह्मसनातन॥नारायणपाहिमां॥२९॥तुह्मीअसतांदेवआपण॥कृशा
सीकरितांभजवंदन॥मीतोनंदगोपाळनंदन॥ऐसेंमात्रह्मणूनये॥३०॥ ॥श्लोक॥ ॥कृष्णकृष्णमहायोगिंस्त्व
माद्यःपुरुषःपरः॥व्यक्ताव्यक्तमिदंविश्वंरूपंतेब्राह्मणाविदुः॥२९॥ टीका ॥ हेकृष्णाजगसती॥हेकृष्णायोगाधिप
ती॥तुमचेप्रभावासीनिश्चिती॥नाहींमितीपरमपुरुषा॥ ३१ ॥तस्मात्तुह्मीनव्हांबालक॥आहांविश्वाचेचालक॥

सर्वश्रेष्ठसुरपालक॥ योगिमननिवासीहो॥३२॥ जगदीशातुझेंध्यान॥ब्रह्मवेत्तेकरितीआपण॥तूंचिनारायणपति तपावन॥कृपाकरींगोविंदा॥३३॥ ॥श्लोक॥ नमःपरमकल्याणनमःपरममंगल॥वासुदेवायशांताययदूनां पतयेनमः॥३६॥ टीका ॥हेपरमकल्याणकारका॥नमस्कारतुह्मांसीसौख्यदायका॥आमुचेअसोतविश्वपाल का॥अनन्यभावेंकरूनी॥३४॥हेमंगलरूपाउत्तमा॥कृष्णानाथापुरुषोत्तमा॥सर्वभूतात्मकासुरसत्तमा॥यादव नाथातुजनमूं॥३५॥नारदआणियक्षनायक॥तुमचेहेचिसेवक॥त्याचेपदरजाधारक॥आह्मांआह्मीनिर्धारें॥३६ नारदअनुग्रहेंकरून॥जाहलेंचरणाचेंदर्शन॥स्वस्थानींजावयाआह्मांलागुन॥आज्ञादेईगोकुलेश्वरा॥३७॥ श्लो क॥ ॥वाणीगुणानुकथनेश्रवणौकथायांहस्तौचकर्मसुमनस्तवपादयोर्नः॥स्मृत्यांशिरस्तवनिवासजगत्प्रणा मेदृष्टिःसतांदर्शनेस्तुभवत्तनूनाम्॥३८॥ टीका ॥तवगुणानुवादकीर्तन॥करोआमुचीवाणीआपण॥तवकथा मृतकरावयाश्रवण॥श्रवणसावधअसोतहे॥३८॥आमुचेउभयहस्त॥तुझेपूजनींअसोतनेमस्त॥तुमचेचर णारविंदांसुचित्त॥राहोलीनसर्वदा॥३९॥तवनिवासस्थानभूत॥हेंअखिलविश्वह्मणूनिपुनीत॥तयासीस न्मानेंवंदनार्थ॥मस्तकसादरअसोहें॥४०॥केवळतुमचेंस्वरूपसंत॥त्यांच्यामूर्तींचेअवलोकनार्थ॥आमुचेने त्रपुनीत॥तत्परअसोतजगदीशा॥४१॥श्रीशुकह्मणेरायासी॥ऐशापरिस्तुनिस्तवनासी॥तेधवांतयांयक्षांसी॥ दामोदरऐसावदे॥४२॥ श्लोक॥ ॥श्रीभगवानुवाच॥ ॥ज्ञातंममपुरैवैतदृषिणाकरुणात्मना॥यच्छ्रीमदां धयोर्वाग्भिर्विभ्रंशोनुग्रहःकृतः॥४०॥ टीका ॥पूर्वींचमीजाणिलें॥कींनारदेंपरमदयाळें॥धनमदमत्तांतुह्मां- शापिलें॥अनुग्रहाकरितांची॥४३॥संतदर्शनेंकरून॥भवभयाचेंहोतेंनिरसन॥भक्तितुह्मांसीहोईलउत्पन्न॥

आतांस्वस्थानीं पैं जावें ॥ ४३ ॥ श्रीशुक ह्मणे विष्णुराता ॥ प्रदक्षिणा करूनी भगवंता ॥ भावें चरणीं ठेवूनि माथा ॥ स्वस्थानीं गे-
लेयक्षते ॥ ४४ ॥ श्रीमद्भागवत सारामृत ॥ दशमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ दशमाध्याय गोड हा ४५ ॥
१० ॥ एकादशाध्याय प्रारंभः ॥ ॥ श्रीशुक बोले वचन मधुर ॥ गोकुळामाजी तदनंतर ॥ काय जाहला प्रकार ॥ तो चि परि
सें राजेंद्रा ॥ १ ॥ वृक्ष पतनें भयंकर ॥ शब्द जाहला साचार ॥ नंदादि गोपाल सत्वर ॥ तया ठायीं पातले ॥ २ ॥ वृक्ष कैसे-
पावले पतन ॥ पडले भ्रांती माजी गोपजन ॥ सन्निध त्याचें असूनि कारण ॥ ह्मणती आश्चर्य काय हें ॥ ३ ॥ काय राक्ष-
सें येऊन ॥ येथें उपद्रव केला जाण ॥ किंवा उत्पात अति दारुण ॥ जाहला तें नाकळे ॥ ४ ॥ शंका आणूनि मनांत ॥ नंदादि
होती भयभीत ॥ कृष्ण सौंगडी बोलती तें त्वरित ॥ नंदराया कारणें ॥ ५ ॥ अले बाबा कुतन्यान ॥ उखल नेलें आपन ॥ दो
नी झालांचे मधून ॥ तेनें झाल मोलिलें ॥ ६ ॥ या झालांच्या मधून ॥ दोन मानसें निघून ॥ कुतन्यासी बलबल करून ॥ जा
तां आह्मी बघीतलें ॥ ७ ॥ चिमणे गोपाळ ऐसें वदती ॥ परी कोणी नच मानिती ॥ उलूखल युक्त स्वपुत्रा प्रती ॥ पाहूनि-
नंद हांसला ॥ ८ ॥ कृपाळू होऊनि आपण ॥ तात्काळ केला मुक्त बंधन ॥ हृदयीं धरूनी सुखें चुंबन ॥ करी लालन श्रीहरीचें ॥ ९
यावरी प्राकृत बाळका समान ॥ नाना क्रीडा करी जनार्दन ॥ कोणी ह्मणती तयालागुन ॥ उत्तम नाचसी गोविंदा ॥ १० ॥ गोपी ह-
स्त संकेतें जाण ॥ चिन्ह करितां न लगतां क्षण ॥ तांडव नृत्यीं स्वयें वामन ॥ हावभाव करी मोदें ॥ ११ ॥ काष्ठ पुतळी सम ॥ गोपीं-
चे अधीन पुरुषोत्तम ॥ जाहला तेव्हां क्रूर सत्तम ॥ काय आश्चर्य वाणावें ॥ १२ ॥ वेड्यासारिखें कधीं कधीं ॥ नृत्य करी दयानि-
धी ॥ गोपी पाहूनि अवधी ॥ पदार्थ सांगती आणावया ॥ १३ ॥ आपण पादुका पिढें त्वरित ॥ आणिं कृष्णा जाऊनि तेथ ॥ तेंनाहीं
उचलावयासामर्थ्य ॥ ऐसें दाखवी गोकुळीं तें ॥ १४ ॥ गोपी आणि गोपाळा ॥ सौख्य द्यावया त्या वेळां ॥ हस्त हालवी घ-

नसांवळा॥तोंड वांकडें करूनियां॥१५॥सर्वज्ञसर्वशक्तिमान॥भक्तवत्सलनारायण॥मायामनुष्यवेषघेऊन॥अवतारकृत्यसंपादी॥१६॥ ॥श्लोक॥ दर्शयंस्तद्विदां लोके आत्मनो भृत्यवश्यताम्॥ व्रजस्योवाह वै हर्षं भगवान्बालचेष्टितैः॥ ९॥ ॥टीका॥ याप्रमाणें लोकांत॥ ब्रह्मसनातनपुनीत॥ भक्तपराधीनतादाखवीत॥ ज्ञानियांसी संतोषें॥१७ बाललीला करूनि बहुत॥ गोकुलवासीजनाचें चित्त॥ हरण करिता जाहला त्वरित॥ कृष्णनाथ तेकाळीं॥१८॥ ऐसा जातां कांहीं काळ॥ अनर्थ पाहून बहुवेळ॥ उपनंदनामें वृद्ध गोपाळ॥ बोलता जाहला सकळांसी॥१९॥ आतां गोकुळ त्यागून॥ अन्यस्थळीं करावें गमन॥ वारंवार उत्पात दारुण॥ व्रजावरी येती बहु॥२०॥ आली बाळप्राणहरणार्थ॥ महामारी पूतना कुत्सित॥ तैसा अंतरिक्षीं तृणावर्त॥ नेता जाहला बालका॥२१॥ तयामाजी निश्चित॥ ह्या वांचला कृष्णनाथ॥ विष्णुप्रसादें चि हा सिद्धांत॥ सत्य जाणा गोपाल हो॥२२॥ आतां या वृक्षतळवटीं॥ सांपडला जगजेठी॥ आणखी उत्पात शेवटीं॥ काय होणार न कळे॥२३॥ श्लोक ॥ वनं वृंदावनं नाम पशव्यं नवकाननम्॥ गोपगोपीगवां सेव्यं पुण्याद्रितृणवीरुधम्॥ २७॥ टीका ॥ येथूनि समीप वृंदावन॥ जें आहे रम्यस्थान॥ तें गोवत्सां हितकारक जाण॥ पर्वत वेली तृणयुक्त॥२४॥ या गुणें मंडित स्थान॥ गो गोप गोपींलागून॥ वास करावया पावन॥ रुचेल तरी ऐसें करा॥२५॥ या परी परिसूनि वचन॥ सर्व म्हणती धन्यधन्य॥ तात्काळ केलें शकटारोहण॥ वृद्ध बाळ स्त्रियांसह॥२६॥ संगें घेऊनि गोधनें॥ शृंग तूर्यें वेणू मानें॥ वाद्यें वाजविती शोभा तेणें॥ बहु साळ जाहली॥२७॥ पुरोहितासहित जाण॥ शकटीं बैसले नंदादि आपण॥ गोपिका मार्गें करितां गमन॥ गाती कृष्णचरित्रातें॥२८॥ यशोदा आणि रोहिणी॥ शकटावरी बैसती जाउनी॥ सन्निध रामकृष्णांतें घेउनी॥ महा आनंदें ते धवां॥ २९॥ वृंदावनीं येऊनि

सकळ ॥ गोगोपिकागोपाळ ॥ बाळांसहितराहिले निश्चळ ॥ निवासस्थानकरूनियां ॥ ३० ॥ शकटव्यूहअर्धेंदुवत ॥
करूनिराहिलेसमस्त ॥ पुढेंकांहींकाळजातांपुनीत ॥ चरित्रजाहलेंतेंपरिसा ॥ ३१ ॥ श्लोक ॥ वृंदावनंगोवर्धनंयमु-
नापुलिनानिच ॥ वीक्ष्यासीदुत्तमाप्रीतीराममाधवयोर्नृप ॥ ३५ ॥ टीका ॥ कुरुकुलभूषणा करीश्रवण ॥ वृंदावन
गोवर्धन ॥ यमुनावाळुवंट पाहून ॥ बलमाधवसुखावले ॥ ३२ ॥ अतिक्रमणहोतांकांहींकाळ ॥ रामकृष्णजाहलेवत्स
पाळ ॥ सवेंघेऊनिगोपबाळ ॥ यमुनातीरींक्रीडती ॥ ३३ ॥ वत्सचारीनारायण ॥ वृंदावनामाजीआपण ॥ बाललीला
करीपावन ॥ त्याचिपरिसेंनृपश्रेष्ठा ॥ ३४ ॥ क्वचित्करितीवेणूवादन ॥ क्वचित् बिल्वफळेंघेऊन ॥ सभोंवतीदेतीझु
गारून ॥ शेखीकौतुकपाहती ॥ ३५ ॥ वांकीनूपुरांसहित ॥ पाउलेंपृथ्वीवरीताडित ॥ धरितीकृत्रिमगोवेषक्वचित ॥ वृ-
षभसिंहव्याघ्रांचा ॥ ३६ ॥ कृत्रिमवृषभहोउन ॥ रामकृष्णकरितीगर्जन ॥ परस्परयुद्धींमिसळून ॥ अनुकरणदाख
विती ॥ ३७ ॥ हंसमयूरासारिखे ॥ शब्दकरितीकौतुकें ॥ संगेंघेऊनिगोपबालकें ॥ यथासुखेंखेळती ॥ ३८ ॥ कवन-
णएकेसमयींजाण ॥ गोवत्सचारीजनार्दन ॥ तोंप्राणकरावयाहरण ॥ दैत्यआलातेधवां ॥ ३९ ॥ वत्सरूपेंकरूनीजा-
ण ॥ वत्सवृंदीमिसळेआपण ॥ दुष्टदैत्यतयाचेंलक्षण ॥ सर्वज्ञाणेश्रीहरी ॥ ४० ॥ तोरामासीदाखवून ॥ त्याचेपृ-
ष्ठभागींजाऊन ॥ चरणपुच्छहस्तकींधरून ॥ गरगरतयाभोंवंडी ॥ ४१ ॥ कोपेंझुगारीवत्सासुर ॥ कपित्थवृक्षाचे
अग्रावर ॥ जाहलादैत्याचासंहार ॥ पुष्पवृष्टिसुरकरिती ॥ ४२ ॥ कृत्यपाहूनिअघटित ॥ गोपाळजाहलेविस्मित
योग्यकेलादुष्टघात ॥ सकळगोपस्तविती ॥ ४३ ॥ श्लोक ॥ तौवत्सपालकौभूत्वासर्वलोकैकपालकौ ॥
सप्रातराशौगोवत्सांश्चारयंतौविचेरतुः ॥ ४४ ॥ टीका ॥ ऐसेरामकृष्णभगवान ॥ सर्वलोकांचेसुरव्यजा

ण॥पालनकरणारेअसून॥गोकुळींगोपाळजाहले॥४४॥याप्रमाणेंसाचार॥प्रातःकाळींमनोहर॥भोजनान्न-
घेऊनिबरोबर॥वासरेंचारितीवृंदावनीं॥४५॥वृंदावनाचेउपवनीं॥वत्सेंचारीमोक्षदानी॥एकेसमयींरामकृष्ण
सद्गुणी॥जलाशयींपैंगेले॥४६॥करविलेंवत्सांसउदकपान॥शेखींप्राशनकरितीआपण॥तोंयमुनातीरींपर्व
तासमान॥एकप्राणीदेखिला॥४७॥तयासीपाहूनिसकळ॥त्रासपावलेगोपाळ॥बगळ्याचेंरूपधरूनी
खळ॥दैत्यकपटीपातला॥४८॥तिखटचंचूनेंतयेवेळां॥बकेंगिळिलाघनसांवळा॥आक्रांतजाहलागो-
पाळां॥एकाबलरामावांचुनी॥४९॥तेव्हांतालुमूलाचेठायीं॥अग्निगोलकासमपाहीं॥नसहोतांचिकरील
वलाही॥वमनतेव्हांअसुरतो॥५०॥वमनासरिसाजाण॥बाहेरआलाभगवान॥करेंचंचूपुढद्दढधरून॥
विदारणपैंकेलें॥५१॥मृत्युपावलाबकासुर॥पुष्पेंवर्षतीसुरवर॥विजयीजाहलायशोदाकुमर॥गो-
पाळसर्वआनंदले॥५२॥कृष्णनाथासहित॥गोपाळआलेवृंदावनांत॥बकवधहेंकृष्णचरित॥गायनक-
रूंलागले॥५३॥गोपीगोपहेंपरिसूनी॥विस्मितजाहलेआपुल्यामनीं॥घनसांवळाअवलोकुनी॥बोलतेजा
हलेसकळिक॥५४॥कृष्णप्राणकरावयाहरण॥आजवरीआलेदैत्यदारुण॥शेखींतेचिनिजकर्मेंकरून॥
पावलेमरणआश्चर्यहें॥५५॥ब्रह्मनिष्ठमुनीचेंवचन॥कदापिनोव्हेअसत्यजाण॥बाळनारायणासमान॥
वदलेहोतेगर्गजे॥५६॥यापरीनंदादिगोपाळ॥परस्परबोलतीसकळ॥रामकृष्णवर्णितांनिश्चळ॥सं
सारींव्यथानचपावती॥५७॥बाळक्रीडाकरूनीफार॥नंदासितोषवितीसर्वेश्वर॥सवेंघेऊनिव्रजकुमर
अत्यानंददाखविती॥५८॥ श्लोक ॥ एवंविहारैःकौमारैःकौमारंजहतुर्व्रजे॥निलायनैःसेतुबंधैर्मर्कटो

त्लुवनादिभिः॥ ५८ ॥ टीका ॥यापरीखेळतीवृंदावनीं॥कुमारवयांतीलखेळणीं॥लपंडावचेंडूआदिकरू-
नी॥लगोऱ्याहुतूतूहमामा॥५९॥कपिसमउड्डाणेंनिश्चिती॥कुमारवयाचीपद्धती॥त्यागितेजाहलेश्रीपती॥
रोहिणीनंदनबळिभद्र॥६०॥श्रीमद्भागवतसारामृत॥दशमस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित
एकादशाध्यायगोडहा॥६१॥ ११ ॥ द्वादशाध्यायप्रारंभः॥ ॥श्रीशुकह्मणेनरपती॥एकेसमयींश्रीप-
ती॥आणिताजाहलाआपुलेचित्तीं॥कींप्रथमभोजनवनींकरूं॥१॥प्रातःकाळींउठूनिआपण॥शृंगवाज-
वीजनार्दन॥मनोहरशब्दकरूनीश्रवण॥धांवूनिगोपाळतेआले॥२॥सहस्त्रावधिगोपकुमर॥येतेजाहलेब-
रवेवर॥शृंगेंकाठ्याबरोबर॥नैशींशिंकींघेऊनियां॥३॥ वत्सघेऊनिअसंख्यात॥कृष्णवत्सांमाजीत्वरित
एकत्रकरूनीतयांचारित॥वनींस्वच्छंदेंचालिले॥४॥बाळक्रीडाकरितीसुंदर॥स्वयेंघालूनिअलंकार॥फ-
लेंप्रवालपिच्छमनोहर॥काचगुंजाहारतेसे॥५॥एकमेकांचींशिंकींचोरिती॥कांहींकाळेंजातांआणूनि
देती॥एकपुढेंजाऊनिकृष्णास्पर्शिती॥शोभापाहतीवनाची॥६॥मीपूर्वींमीपूर्वींह्मणून॥कृष्णास्पर्शक-
रितीगोपाळनंदन॥कितीएककरितीवेणुवादन॥कोणीशृंगेंवाजविती॥७॥कोणीभ्रमरांसमगायन॥को-
णीकोकिलाशब्दानुकरण॥करितीपक्षिच्छायादेखून॥परिभ्रमणतेसेंची॥८॥कोणीहंसासमचालती॥
कोणीबकापरीबैसती॥कोणीमोरासमनाचती॥उड्यामारितीकोणीएक॥९॥वृक्षारूढअसतांवानर॥त-
याचेंपुच्छधरूनिमहीवर॥ओढितीबाळकेंसत्वर॥मगहांसतीगद्गदां॥१०॥प्रवेशकरूनिजळांत॥उड्डा-
णकरितीमंडूकवत॥आपुलीपडछायादेखूनित्वरित॥तयेसवेंधांवती॥११॥प्रतिध्वनीकरूनिश्रवण॥स-

वेंचिदेतीगाळिप्रदान॥ ऐसीवनींक्रीडाकरून॥ रममाणहोतीते॥ १०॥ ॥श्लोक॥ इत्थंसतांब्रह्मसुखानुभूत्या दास्यंगतानांपरदैवतेन॥मायाश्रितानांनरदारकेणसाकंविजन्हुः कृतपुण्यपुंजाः॥ ११॥ टीका॥शुकह्मणेराया जाण॥ज्ञानियांजोब्रह्मसुखपूर्ण॥भक्तांसिदैवतपावन॥ नंदसूनुजोप्राकृतां॥ १३॥ऐशाश्रीकृष्णासंगती॥ गोपबाळकक्रीडाकरिती॥कृतपुण्यपुंजेंनिश्चिती॥ योगऐसाघडेतयां॥१४॥धन्यतेगोपबालक॥सन्मुखपाहतीविश्वपालक॥सर्वेक्रीडाकरूनियांदेख॥परमआनंदपावती॥१५॥ श्लोक ॥यत्पादपांसुर्बहुजन्मकृच्छ्रतोधृतात्मभिर्योगिभिरप्यगम्यः॥ सएवयद्दृग्विषयःस्वयंस्थितः किंवर्ण्यतेदिष्टमतोव्रजौकसाम् १२ टीका॥ ॥एकाग्रमनेंकरून॥अनेकजन्मींश्रमीहोउन॥ योगीकरिती सर्वदाध्यान॥ज्याचेंपदरजमिळावया॥१६॥ परीतयांसीतेंदुर्लभ॥तोचिश्रीपतीपद्मनाभ॥उभाराहूनिदर्शनलाभ॥गोपबाळकांदेतसे॥ १७॥तस्माद्व्रजवासीजनांचें॥कायभाग्यवर्णूवाचें॥ जेंनिजधनयोगियांचें॥ तेंचिनाचेजयांपुढें॥१८॥तैंरामकृष्णादिकांचेंखेलन अघासुरनकरीसहन॥ सर्परूपेंघ्यावयातयांचेप्राण॥वृंदावनींपातला॥१९॥ बकीबकसहोदर॥देखूनिक्रीडासौख्यसागर॥संतप्त होऊनिअघासुर॥ बोलताजाहलातेकाळीं॥२०॥ अहोतोहाकृष्णनाथ॥ जेणेंमाझेबंधूचाघात॥ केलाआतांयाचात्वरित॥ नाशकरीनयेथवां॥२१॥ कृष्णादिबाळांचेहरूनिप्राण॥ करीनआसांचेंतर्पण॥ ऐसेंहोतांव्रजवासीमरण॥सहजपावतीलत्यायोगें॥२२॥ऐसानिश्चयकरूनीमनांत॥ दीर्घपर्वतासमवनांत॥ वदनपसरूनिगुहावत॥अजगररूपेंपडियेला॥२३॥ पृथ्वीवरीतयाचाअधरोष्ठ॥ मेघमंडळींउत्तरोष्ठ॥ मुखप्रांतगव्हास्पष्ट॥ गिरिशृंगवत्दंष्ट्राही॥२४॥ मुखांतरींअंध कार॥ जिव्हाविस्तीर्णमार्गाकार॥ तयाचेश्वासकठोर॥ नेत्रदा

वाग्निसारिखे॥ २५ ॥ ऐसाअजगरपाहून ॥ गोपाळबोलतीभ्रांतीकरून ॥ वृंदावनाचीशोभापूर्ण ॥ कायआहेमित्रहो ॥ २६
वनशोभाचिन्हेंनिश्चित ॥ परीभासेअजगरवत् ॥ कींहाआमुच्याभक्षणार्थ ॥ आकरूनीबैसला ॥ २७ ॥ सूर्यकिरणीं
आरक्त ॥ हामेघदिसेउत्तरोष्ठवत् ॥ मेघछायेंकरूनीतदप्रांत ॥ अधरोष्ठनिश्चितगमेहा ॥ २८ ॥ गिरिगुहादक्षि-
णोत्तर ॥ दिसतीसृक्किणीसमसाचार ॥ पर्वतशृंगेंदाढाभयंकर ॥ वायुप्रखरश्वासजैसा ॥ २९ ॥ विस्तीर्णमार्गजिव्हा
भासे ॥ शिखरांतरभागींतमजेंअसे ॥ सर्पवदनांतरासरिसे ॥ भासतसेअपूर्व ॥ ३० ॥ अग्निसंगेंप्राणीजळतां
दुर्गंधसुटेजोअवचिता ॥ तोआंतीलमांसगंधापरीनलगतां ॥ भासेपहागोपाळहो ॥ ३१ ॥ जरीअसेलअजगर ॥ आ
म्हांसीगिळीलसत्वर ॥ तरीबकशत्रुनंदकुमर ॥ क्षणामाजीवधीलत्या ॥ ३२ ॥ यापरीकरूनीभाषण ॥ परस्परहां
सूनिआपण ॥ करितेजाहलेकरताडण ॥ श्रीहरीमुखपाहूनियां ॥ ३३ ॥ अहिमुखींगेलेगोपाळ ॥ धेनुवत्सांसहित
तात्काळ ॥ कृष्णाचीवाटपाहेखळ ॥ म्हणूनीनभक्षीतयांतें ॥ ३४ ॥ ऐसेंपाहूनियांहरी ॥ विचारकरीनिजांतरीं ॥ गो
पाळवांचूनमुखाभीतरी ॥ पावेनाशअरीकैसा ॥ ३५ ॥ विचारकरूनियांपूर्ण ॥ मुखींप्रवेशलानारायण ॥ विमानींपा-
हूनिसुरगण ॥ हाहाकारकरितीबहू ॥ ३६ ॥ आनंदसर्वदानवांचा ॥ पाहूनियांतेधवांसाचा ॥ आत्माअखिलभूतांचा ॥
कायकरिताजाहला ॥ ३७ ॥ कंठामाजीजनार्दन ॥ तदाजाहलावर्धमान ॥ तयायोगेंकरूनिजाण ॥ दैत्यप्राणतेगेले ३८
अमृतदृष्टिकरून ॥ गोगोपांकरीअवलोकन ॥ तेणेंहोऊनिसचेतन ॥ सुखावलेतेसारे ॥ ३९ ॥ अजगरमुखाबाहेर ॥
गोवत्सांसहनंदकुमार ॥ गोपाळघेऊनिबरोबर ॥ येताजाहलातेधवां ॥ ४० ॥ अघमुखांतूनितेजयुक्त ॥ ज्योतीनिघा
लीपुनीत ॥ कृष्णामुखामाजीत्वरित ॥ प्रवेशकरितीजाहली ॥ ४१ ॥ तेव्हांपुष्पेंवर्षतीसुरगण ॥ गंधर्वकरितीगाय

न॥ क्रूरस्त्रियाहीतेसेंनर्तन॥ सहावभावकरितीहो॥ ४२॥ तोवाद्यघोषकरूनीश्रवण॥ सत्यलोकींचतुराननं॥
विस्मयपावताजाहलाआपण॥ ह्मणेकायहेंऐसें॥४३॥ कृष्णामाहात्म्यपूर्ण॥ करावयाअवलोकन॥ वृंदावनीं-
पातलाचतुरानन॥ पाहूनिविस्मयपावला॥ ४४॥ तेंअजगरचर्मवाळलें॥ गृहेंसमानतयेवेळे॥ क्रीडासाधन
गोपांजाहलें॥ चिरकालनृपश्रेष्ठा॥ ४५॥ हेंकृत्यजाहलेंकौमारपणीं॥ गोपसांगतीपौगंडपणीं॥ आजजाहलें
ऐसेंवचनीं॥ अद्भुतकरणीश्रीहरीची॥ ४६॥ रायाश्रीहरीलागून॥ कायआश्चर्यआहेजाण॥ अघासुराआप
णासमान॥ देवरायेंपैंकेलें॥४७॥ जेंकांब्रह्मदेवाचेंध्यान॥ प्रल्हादासीतारकपूर्ण॥ तोचिअघासुरानारायण
मोक्षदाताहोयतें॥४८॥ सूतबोलेशौनकासी॥ कृष्णाचरित्रसौख्यराशी॥ ऐकूनिराजाशुकमुनीसी॥ बोलताजा-
हलातेंपरिसा॥ ४९॥ नरपतिह्मणेमुनिनाथा॥ कुमारपणींकृत्यसमर्था॥जाहलेंअसतांगोपाळसुतां॥ पौंगंडींकैं
सेंसमजलें॥५०॥ याचेंअसावेंकायकारण॥ तेंचिसांगासमजलागून॥ कौतुकवाटतेंपूर्ण॥ कृष्णकथाश्रवणाचें॥
५१॥ तुमचेमुखापासून॥ श्रीकृष्णचरित्रकरितांश्रवण॥ ह्मणूनिधन्यआह्मीपूर्ण॥ क्षत्रियाधमअसूनी॥ ५२॥ या
प्रश्नेंकरूनीजाण॥ शुकासीजाहलेंश्रीहरिस्मरण॥ ब्रह्मानंदींनिमग्नहोऊन॥ स्वरूपींऐक्यजाहलें॥ ५३॥ मगयेऊ
निदेहावरी॥ बोलतेजाहलेतेअवसरीं॥ कुरुनायकाअवधारीं॥ पावनकृष्णचरित्रहें॥५४॥ श्रीमद्भागवतसारामृ
त॥ दशमस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसखारामविरचित॥ द्वादशाध्यायगोडहा॥ ५५॥ १२ ॥ त्रयोदशाध्यायप्रा०
श्रीशुकह्मणेभागवता॥ भाग्यशालीविष्णुराता॥ उत्तमप्रश्नकरिसीताता॥ कृष्णकथेचासमजलागीं॥ १॥ प्रतिक्षणीं
नूतनासमान॥ श्रीहरिकथाकरितोसिश्रवण॥ साधूंचास्वभावहाचिपूर्ण॥ भगवत्कीर्तनींरतव्हावें॥ २॥ स्त्रैण

पुरुषजेसाकामिनी ॥ वार्ता हर्षें परिसतोकानीं ॥ आनंदतेसाहरिकीर्तनीं ॥ प्रतिक्षणींसानीहरिभक्त ॥ ३ ॥ हेंगु-
ह्यअसेआख्यान ॥ करितोंबापातुजलाकथन ॥ प्रेमळशिष्यांसीसद्गुरूआपण ॥ सांगतीपूर्णगुह्यजरी ॥ ४ ॥ अ
घमुखांतूनितात्काळ ॥ मुक्तकरूनीवत्सगोपाळ ॥ यमुनावाळवंटींतमाळनीळ ॥ आणुनीतयांबोलतसे ॥ ५ ॥
मित्रहोहेंयमुनातीर ॥ मृदुस्वच्छवालुकामनोहर ॥ जेथेंनानातरुवर ॥ नादायमानपक्षिशब्दें ॥ ६ ॥ येथेंकरावें-
भोजन ॥ ऐसेंइच्छीआमुचेंमन ॥ मध्यान्हकाळअतिक्रांतपूर्ण ॥ जाहलाअसेगोपाळहो ॥ ७ ॥ ऐशीऐकूनिकृष्णो
क्ती ॥ गोपसकळहीमानवती ॥ कींसमयातिक्रमेंक्षुधार्ती ॥ करीविकळबाळकां ॥ ८ ॥ करवूनवत्सांउदकपान ॥ को
मळतृणींतयांगुंतवून ॥ सिद्धान्नाचींशिंकींसोडून ॥ करितिभोजनतेसारे ॥ ९ ॥ तयांमाजीवत्सपाळ ॥ मुख्यअसेनं
दबाळ ॥ बलरामआणिगोपाळ ॥ सन्मुखयेऊनिबैसले ॥ १० ॥ कमलपत्रांसमान ॥ सभोंवतीबैसलेयेऊन ॥ मध्य-
कर्णिकाश्रीकृष्ण ॥ कायशोभावाखाणूं ॥ ११ ॥ कोणीघेऊनिपुष्पांकुर ॥ तैसींपल्लववल्कलेंथोर ॥ कोणीशिंकींठेवि
तीसमोर ॥ पाषाणपात्रकरितीकोणी ॥ १२ ॥ पात्रेंकरूनियांपरी ॥ भोजनकरितीतेअवसरीं ॥ आपणहास्यकरू
नीभारी ॥ बळेंहासवितीअन्यांतें ॥ १३ ॥ पदार्थरुचिमनोहर ॥ दावितेजाहलेपरस्पर ॥ जयाचेसन्मुखगोकुळेश्व-
र ॥ ध्यानसुंदरविराजे ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ बिभ्रद्वेणुंजठरपटयोःशृंगवेत्रेचकक्षेवामेपाणौमसृण-
कवलंतत्फलान्यंगुलीषु ॥ तिष्ठन्मध्येस्वपरिसुहृदोहासयन्नर्मभिःस्वैःस्वर्गेलोकेमिषतिबुभुजेयज्ञभुग्बा-
लकेलिः ॥ ११ ॥ टीका ॥ तेव्हांबालकांसमान ॥ क्रीडाकरणाराभगवान ॥ यज्ञभोक्तास्वयंआपण ॥ करी-
भोजनतयांसवें ॥ १५ ॥ उदरआणिपीतांबर ॥ यांचेमध्यभागींसाचार ॥ वेणुधारणकरीसुंदर ॥ शृंगवेत्रक-

क्षे माजी ॥१६॥ वामकरीं दध्योदन देख ॥ घेई तेव्हां रमानायक ॥ अंगुलीसंधी माजी चोख ॥ उत्तम लोणचीं शोभती ॥
१७॥ मध्यभागीं रमापती ॥ उभा आपणास शोभवती ॥ गोपाळ बैसले पंगती ॥ विमानीं पाहती सुरगण ॥ १८॥ हास्यवि
नोद करून ॥ तयाचें करी मनरंजन ॥ आपण असतां निरंजन ॥ अवतारकृत्य संपादी ॥१९॥ यापरी बाळांसहित ॥
भोजन करी रमाकांत ॥ तृणलोभ धरूनी मनांत ॥ वासरें वनांत दूर गेलीं ॥२०॥ तयायोगें निश्चयेंशीं ॥ भीती वाटे
बालकांसी ॥ ऐसें देखूनि हृषीकेशी ॥ वचन बोलता जाहला ॥ २१॥ भोजनीं न पावा विराम ॥ न धरा अंतःकरणीं भ्र
म ॥ वत्सें आणितों जाऊनि परम ॥ पुरुषोत्तम हें वदे ॥ २२॥ ऐसें सांगूनि साचार ॥ दहिंभात घांस हातावर ॥ घेऊ
नि शोधी घोर कांतार ॥ तयां वत्सांकारणें ॥ २३॥ त्या अवसरामाजी जाण ॥ ब्रह्मदेव येऊनि आपण ॥ गोपाळ व
त्स करूनि हरण ॥ अंतर्हित जाहला ॥ २४॥ कृष्णमहिमा पहावया सत्वरी ॥ कमळासन चोरी करी ॥ वासरें न दि
सती वनांतरीं ॥ ह्मणूनि हरी परतला ॥ २५ ॥ पुनः येऊनी यमुनातीरीं ॥ पाहता जाहला दानवारी ॥ तो गोपाळही
ते अवसरीं ॥ अदृष्ट जाहले जाणपां ॥ २६॥ सर्व जाणूनि विधीकरणी ॥ काय करी मोक्षदानी ॥ राजा परिसें चित्त
देउनी ॥ श्रीकृष्णचरित्र पावन हें ॥२७॥ ॥श्लोक॥ यावद्वत्सपवत्सकाल्पकवपुर्यावत्कराङ्घ्र्यादिकं यावद्यष्टि
विषाणवेणुदलशिग्यावद्विभूषांबरम् ॥ यावच्छीलगुणाभिधाकृतिवयो यावद्विहारादिकं सर्वं विष्णुमयं गिरों
गवदजः सर्वस्वरूपो बभौ ॥ १९॥ टीका ॥ जेवढे असती वत्सपाळ ॥ आणि वत्सेंही जी सकळ ॥ तीं वयें रूपें ए
कमेळ ॥ भुवनपाळ होयतें ॥ २८॥ जैसी जयाची असे प्रकृती ॥ जैसी कृती कीं नाम आकृती ॥ तैशीं तीं स्वरूपें श्रीपती ॥
स्वयें आपण नटलासे ॥ २९॥ वेत्रें शृंगें वेणू पानें ॥ शिंकीं वस्त्रें आणि भूषणें ॥ तो चि होय समान गुणें ॥ किंमपिउ-

येंअसेना ॥ ३० ॥ सर्वं विष्णुमयंजगत् ॥ हीवेदवाणीकरावयासत्य ॥ विधीहीव्हावयामदच्युत ॥ सत्यव्रतकरीअसें
३१ ॥ ऐसासर्वात्माश्रीहरी ॥ प्रविष्टजाहलाव्रजांतरीं ॥ वत्सेंबांधूनिगोष्ठ्याभीतरीं ॥ आपणघरोघरींजातसे ॥ ३२ ॥ प्रा-
तःकाळींवेणूस्वर ॥ मधुरवाजवीश्रीधर ॥ तोशब्दऐकूनिएकत्र ॥ होयआपणचीपरमात्मा ॥ ३३ ॥ आपणआप
णाचारी ॥ वनांमाजीदानवारी ॥ वत्सवत्सपरूपेंपानकरी ॥ धेनूजननीस्तनांतें ॥ ३४ ॥ यापरीनित्यव्रत ॥ आचरण-
करीरमानाथ ॥ गोपिकामानूनिनिजसुत ॥ वस्त्रभूषणेंलेववितो ॥ ३५ ॥ गोपिकाकरितीलालन ॥ आपुलाबालकजा-
णून ॥ पुत्रभावेंश्रीहरीचेंपूजन ॥ घडलेंतयांमनुजेंद्रा ॥ ३६ ॥ वत्सरूपीकृष्णासी ॥ बद्धहोऊनिमायापाशीं ॥ धेनुचाटि
तीसर्वांगासी ॥ कायभाग्यसांगावें ॥ ३७ ॥ वत्सवत्सपरूपेंहरी ॥ व्रजींवनींसंचारकरी ॥ एकवर्षपर्यंततेअवसरीं ॥ ली
लानाट्यकरीअसें ॥ ३८ ॥ पांचसहादिवसजाण ॥ वत्सरामाजीअसतांन्यून ॥ गोवर्धनशिखरींगोपाळआपण ॥ रक्षि
तीगायीएकदां ॥ ३९ ॥ व्रजासन्निधवृंदावनीं ॥ वासरेंचरतीतीपाहुनी ॥ त्याधांवतआल्यातेथूनी ॥ अतिदुर्गममार्गानें
४० ॥ धेनुरक्षकगोपाळ ॥ निवारणकरितांपर्वतमाळ ॥ उल्लंघनकरूनीउतावेळ ॥ वृंदावनींपातल्या ॥ ४१ ॥ ऊर्ध्वपुच्छें-
करून ॥ हुंकारशब्दींगर्जून ॥ वत्सासन्निधयेऊनिआपण ॥ अवघ्राणत्याकरिती ॥ ४२ ॥ मागुतीगोंवळदंडधारी ॥
धांवतआलेसत्वरी ॥ परीतयांचेक्रोधअंतरीं ॥ जिरतीबाळकपाहतां ॥ ४३ ॥ स्नेहपाशेंकरूनीनिश्चिती ॥ निजकुम-
रआलिंगिती ॥ हेंपाहूनिबळरामचित्तीं ॥ विचारकरिताजाहला ॥ ४४ ॥ अहोया व्रजाचेकृष्णावरी ॥ अखंडअसे-
प्रेमभारी ॥ तेंस्वपुत्रींचगमेयेअवसरीं ॥ कायकारणयाचें असे ॥ ४५ ॥ हाअद्भुतचमत्कार ॥ कींदैत्यमायाअनिवा-
र ॥ अथवादेवीचिसाचार ॥ हातोविचारनाकळे ॥ ४६ ॥ यामायेंकरूनिजाण ॥ मोहितकेलेंमाझेंहीमन ॥ तस्मात्

मत्प्रभूचेंविलक्षण॥कृत्यअसेनिर्धारें॥ ४७॥ विचारकरूनियापरी॥अंतरज्ञानेंअवलोकनकरी॥तोंवत्सासम
वेतअवघाहरी॥सर्वप्रकारींनटळासे॥ ४८॥ गोपाळचिमणीवासरें॥कृष्णमूर्तिएकसरे॥अवलोकनकरीपरमा-
रें॥जाणुनीवदेमाधवा॥ ४९॥ श्लोक ॥नैतेसुरेशाऋषयोनचैतेत्वमेवभासीशभिदाश्रयेऽपि॥सर्वंपृथक्त्वंनि
गमात्कथंवदेत्युक्तेनवृत्तंप्रभुणाबलोवैत्॥ ३९॥ टीका ॥हेवत्सगोपबालक॥देवांशाकींमुनीनव्हतीदेख॥भि-
न्नाकाररमानायक॥सर्वत्रतुह्मीचभासला॥ ५०॥ऐसेंपरिसूनियांवचन॥संक्षेपेंसांगेनारायण॥तेंपरिसूनिरोहि-
णीनंदन॥निजस्वरूपजाणताजाहला॥५१॥त्रुटिमात्रकाळजातांजाण॥वृंदावनींआलाकमलासन॥करितांजाहलाअ-
वलोकन॥तोंपूर्ववत्सर्वदिसे॥५२॥वत्सवत्सपाळांसहित॥क्रीडाकरीजगन्नाथ॥पाहूनिआश्चर्यकरीमनांत॥ह्मणे
हेंकायजाहलें॥५३॥मायापलंगावरीभले॥वत्सगोवळजेकांनिजले॥तेअद्यापिनाहींउठले॥येथेंहीसंचलेपूर्णत्वें ५४
यापरीविचारबहुत॥पितामहकरीत्वरित॥नचालेतयाचातर्ककिंचित्॥विष्णुमायेनेंमोहिला॥५५॥काजव्याचाप्रका-
शजोपाहीं॥ दिवसांतयाचेंतेजनाहीं॥महामायावीशेषशायी॥तेथेंविधीहोकुंठित॥५६॥ विधाताहोऊनिमोहित ॥
पाहताजाहलाअकस्मात्॥तोंवत्सेंगोपाळसमस्त॥कृष्णरूपदेखिले॥५७॥सजलमेघासमान॥श्यामसुंदरमन-
मोहन॥पीतांबरधारीपूर्ण॥कौस्तुभेंकंठींसाजिरे॥ ५८ ॥शंखचक्रेंशोभतीकरीं॥सकळहीगदापद्मधारी॥श्रवणीं
कुंडलेंमुकुटशिरीं॥रत्नखचितविलसती॥५९॥हारवनमालासालंकार॥श्रीवत्सलांछनमनोहर॥बाहुभूषणेंक-
रूनीफार॥सुशोभितदिसतीजे॥६०॥ब्रह्मादिस्तंबपर्यंत॥चराचरेंसमस्त॥गीतनृत्यादिप्रकारेंबहुत॥करिती
उपासनाजयांची॥६१॥अष्टसिद्धितत्वेंजाण॥कालस्वभावपरिपूर्ण॥करितीजयाचेंध्यान॥आदिनारायणयाप

री ॥ ६२ ॥ ऐसेंविष्णुमयजगत ॥ पाहूनिब्रह्माआश्चर्यकरित ॥ ह्मणेसच्चिदानंदमूर्तिमंत ॥ नंदकुमार हासाचा ॥ ६३ ॥
हंसारूढब्रह्माअसतां ॥ पतनपावलातत्वतां ॥ नेत्रउघडूनिहोयपाहता ॥ तोंपूर्ववतदेखिलें ॥ ६४ ॥ पुढेंआहेवृंदाव-
न ॥ जेथेंमृगमृगीपंचानन ॥ सख्यत्वेंकरितीवर्तन ॥ वैरभावतोनाहीं ॥ ६५ ॥ हातींघेऊनिदहिंभात ॥ परब्रह्ममूर्ति
कृष्णनाथ ॥ वनामाजीतेंधवांनिश्चित ॥ वत्सांस्तवभ्रमतसे ॥ ६६ ॥ ऐसापाहूनिहरी ॥ वहनावरूनिझडकरी ॥ उतरू
निविधातावंदनकरी ॥ दंडवततेधवां ॥ ६७ ॥ चतुर्मुकुटाग्रेंकरूनिपाहीं ॥ पादपद्मस्पर्शूनि लवलाहीं ॥ ह्मणेप्र-
भोत्राहि त्राहि ॥ अपराधीअसेकिंकरहा ॥ ६८ ॥ हरिचरणानेत्रोदकेंकरून ॥ करिताजाहलाअभिषेचन ॥ उठूनि
करीअवलोकन ॥ मुकुंदमूर्तिसंतोषें ॥ ६९ ॥ स्वापराधेंकंपायमान ॥ होऊनिविधाताआपण ॥ सद्गदितवचनींस्त-
वन ॥ करिताजाहलातेकाळीं ॥ ७० ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामवि-
रचित ॥ त्रयोदशाध्यायगोडहा ॥ ७१ ॥ १३ ॥ ॥ चतुर्दशाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्लोक ॥ ब्रम्होवाच ॥ ॥ नौमी-
ड्यते ऽभ्रवपुषेतडिदंबरायगुंजावतंसपरिपिच्छलसन्मुखाय ॥ वन्यस्रजेकवलवेत्रविषाणवेणुलक्ष्मश्रि-
येमृदुपदेपशुपांगजाय ॥ १ ॥ टीका ॥ हेस्तुतियोग्यानारायणा ॥ वंदनकरूनतुमच्याचरणा ॥ सजलमेघ-
श्यामवर्णा ॥ तवस्तवनाकरितोंमी ॥ १ ॥ तेजोमयविद्युल्लतेसमान ॥ वसनकेलेंपरिधान ॥ कर्णभूषणेंगुंजांचीं
पूर्ण ॥ श्रवणामाजीतळपती ॥ २ ॥ आणीकत्यामुकुटाचे ॥ सभोंवतींवेष्टनशिखिपिच्छांचें ॥ तेणेंमुखसुंदरदि
सेसाचें ॥ पद्मनाभागोविंदा ॥ ३ ॥ वनपुष्पांचेहारकंठीं ॥ दहींभाताचाकवळहस्तपुटीं ॥ कक्षेश्रृंगवेत्रवेणूपोटीं ॥
शोभागोमटीदिसतसे ॥ ४ ॥ तुमचेंचरणकमळ ॥ जनार्दनाअतिकोमळ ॥ पशुरक्षकनंदगोपाळ ॥ त्याचेंबाळ

ह्मणविता॥ ५॥हेदेवाअचिंत्यगुणधामा॥यासगुणरूपाचाहीमहिमा॥मीअथवाअन्यपुरुषोत्तमा॥कोणीनजा
णेत्रिजगतीं॥ ६॥यास्तवज्ञानाविषयींयत्न॥त्यागूनितवकथामृतींमग्न॥सद्भावेंराहतीआपण॥जिंकिलेंतयांनींतुज
लागीं॥७॥श्रेष्ठोतवभक्तीचात्याग॥करूनसंपादितीज्ञानयोग॥तयांअवशिष्टक्लेशभोग॥तुषकंडणेंपैंजेसा ८
हेभगवन्पूर्वींबहुत॥योगीयोगानींनिश्चित॥नहोतांतत्त्वज्ञानप्राप्त॥भक्तियोगेंतरलेबा॥ ९ ॥यादवेंद्रातु-
झागुणातीत॥महिमाजोअसेअगणित॥इंद्रियनिग्रहेंजाणावयासमर्थ॥होईलक्वचितत्याकोणी॥ १०॥प-
रीजोतूंविभोसगुण॥त्यातुझेअसतीअनंतगुण॥तयांचेंगणनकींवर्णन॥करायाशक्तनचकोणी॥ ११॥ या-
स्तवतुझीकृपाकधींतरी॥होईलऐसेंमानूनिअंतरीं॥संपादितकर्मफलसारी॥आसक्तकिमपिनहोतां॥ १२॥॥
तपादिकक्लेशनकरितां॥जोनिष्ठेनेंराहतोतत्त्वतां॥तोचिमुक्तीचाभोक्ता॥ब्रह्मांडमंडपींसुशोभित॥ १३॥ऐसी
स्तुतीकरूनीजाण॥आपलाअपराधपूर्ण॥करीतसेआतांनिवेदन॥तोचिसर्वपरिसावा॥ १४॥ माझेंदौर्जन्य
पहाहरी॥मायाटाकूनितुझ्यावरी॥ऐश्वर्याच्यामहासागरीं॥इच्छाकेलीपांहावया॥ १५॥ परंतुसर्वमोहका-
तुजसी॥मीकायसमर्थमोहावयासी॥हाविवेकनकरितांमानसीं॥ येऊनिछलहाकेला॥ १६॥जेंवीवैश्वानरा
पासून॥ज्वालाहोतीनिर्माण॥तयांचेंसामर्थ्यअग्निवरीजाण॥कायअसेगोपाळा॥ १७॥याकरितांपृथक् ॥
ईश्वरत्वाभिमानचोरव॥जयासीऐसामीअज्ञदेख॥ह्मणूनिअपराधक्षमाकरी॥ १८॥हेईश्वराप्रकृतीपासू-
न॥पृथ्वीपर्यंतसप्तजाण॥वेष्टनेंत्यांनींवेष्टितपूर्ण॥अंडकटाहजोअसे॥ १९॥माझ्यामानानेंसप्तवितीं॥तो
ज्याचादेहअसेनिश्चितीं॥ऐसामीकोणीकडेश्रीपती॥तुझीस्थितिपाहतां॥ २०॥ ऐसींअनेकब्रह्मांडें॥ परमा-

णूसमरोमरंध्रीरोकडे ॥ ज्याच्यातोमहिमाकोणीकडे ॥ कीटकपाडेंमीअसें ॥ २१ ॥ याकरितांमाझ्यावर ॥ कृपाकरा-
वीसत्वर ॥ मीतवचरणांचाकिंकर ॥ अभयदानदेइजे ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ उत्क्षेपणंगर्भगतस्यपादयोः किंकल्प
तेमातुरधोक्षजागसे ॥ किमस्तिनास्तिव्यपदेशभूषितंतवास्तिकुक्षेः कियदप्यनंतः ॥ १२ ॥ टीका ॥ हेअधोक्षजा
जगत्पती ॥ स्थूलसूक्ष्मशब्दपद्धती ॥ दर्शितवस्तुमात्रनिश्चिती ॥ तुझ्याकुक्षीमाजीअसे ॥ २३ ॥ तेव्हांमीहीतुझ्या
कुशींत ॥ आहेंह्मणूनियांनिश्चित ॥ मातेसमअपराधत्वरित ॥ क्षमाकरीदातारा ॥ २४ ॥ श्लोक ॥ जगत्त्रयांतो
दधिसंप्लुवोदेनारायणस्योदरनाभिनालात् ॥ विनिर्गतोजस्त्वितिवाङ्नवैमृषाकिंत्वीश्वरत्वन्नविनिर्गतोस्मि ॥ १३
टीका ॥ ॥ ऐसेंअसतांहीजाण ॥ माझेंजन्मआपणापासून ॥ लोकप्रसिद्धवर्तमान ॥ हेंकानेणाजगदीश्वरा ॥ २५
त्रिजगाचीहोतांसमाप्ती ॥ सप्तसमुद्रएकवटती ॥ तयाउदकींनारायणस्थिति ॥ ऐसीख्यातीसर्वत्र ॥ २६ ॥ तयाचेना
भिकमळापासून ॥ ब्रह्मदेवनिपजलापूर्ण ॥ असेऐशीवेदवाणीजाण ॥ नव्हेंपुत्रमीकैसा ॥ २७ ॥ तूंनारायणकुमर ॥
आहेह्मणसीवारंवार ॥ याचासंबंधमाझ्यावर ॥ कायऐसेंनम्हणावें ॥ २८ ॥ सकळजळासीआश्रयभूत ॥ सकळ
लोकसाक्षिभूत ॥ तूंचिनारायणजगन्नाथ ॥ जगद्गुरुराजाणिजे ॥ २९ ॥ अपरिच्छिन्नमूर्तीसरसी ॥ जळाश्रयन-
होयकैसी ॥ तेंजलाश्रयत्वहृषीकेशी ॥ मायाभासीभासतें ॥ ३० ॥ तुमचेंशरीरजळांत ॥ आहेजरीनिभ्रांत ॥ तें
मींनाहींपाहिलेंकिंचित् ॥ तपकेलियापूर्वींकां ॥ ३१ ॥ कमलनालमार्गेंजाण ॥ करिताजाहलोंमाजीगमन ॥ शोधक
रितांशनवत्सरपूर्ण ॥ तपांतीरूपपाहिलें ॥ ३२ ॥ ह्मणूनीजळानेंहीहरी ॥ परिच्छेदतुह्मांसीसाचारी ॥ सत्यत्वेंना
हींबकारी ॥ अवतारींकौतुकदाखविलें ॥ ३३ ॥ तुह्मींबाहेरप्रपंचांत ॥ स्पष्टमायादाखविलीपुनीत ॥ जननीसज

ठराचेअंत ॥ सर्वजगतदर्शविलें ॥ ३४ ॥ तेंसर्वतुमचेकुक्षींत ॥ मायामयभासेअसत्य ॥ मजलागींमायालरिल ॥
दाखविलीतीवदतों ॥ ३५ ॥ प्रथमएकमूर्तिहरी ॥ होतासीबापामनोहारी ॥ वत्सवत्सपन्नजांतरीं ॥ सर्वस्वरूपेंनटसी
तूं ॥ ३६ ॥ वृंदावनींवत्संगोंवळ ॥ पुढेंचतुर्भुजजाहलेसकळ ॥ तुझामहिमाअनंतअकळ ॥ नकळेकवणा विश्वेश्व
रा ॥ ३७ ॥ अंतींतुझीएकराहिला ॥ हीतुझीमायाचिगोपाळा ॥ अजाणत्यासीप्रकृतींतभला ॥ नानाकारेंभाससी
३८ ॥ जगदुत्पत्तिकरितांसम्यक ॥ प्रजसारिखाहोसीदेख ॥ पालनकरितांविष्णुचोख ॥ प्रलयींउमानायकभास
सी ॥ ३९ ॥ दुष्टनिग्रहकरावयासी ॥ जगतामाजीप्रगटहोसी ॥ अनुग्रहकरावयासज्जनांसी ॥ बळेंधांवसीगो-
विंदा ॥ ४० ॥ यापरीतूंरमापती ॥ कवणजाणेतुझीविभूती ॥ तवयोगमायाभगवती ॥ ऐश्वर्यअचिंत्यतियेचें ॥ ४१ ॥ या
स्तवहेंमिथ्याजगत ॥ सत्यएकतूंलक्ष्मीकांत ॥ तुझेनिसत्यत्वेंहेंनिश्चित ॥ सत्यभासेअखिलांसी ॥ ४२ ॥
सत्यवस्तुकोणतीआतां ॥ ह्मणालतरीसांगतोंताता ॥ एकतूंसत्यस्वप्रकाशआयता ॥ पुराणपुरुषअनंत ४३
ऐसीयातूंतेंतेजाणती ॥ सद्गुरूपासूनिज्यांज्ञानप्राप्ती ॥ उपनिषन्नेत्रेंतुजप्रती ॥ पाहूनितरतीभवसागरीं ॥
४४ ॥ मीकोणआहेंहेंजयासी ॥ कांहींनकळेचीमानसीं ॥ तयासअज्ञानेंनिश्चयेंशीं ॥ नित्यचिजाहलेंसकळजग
४५ ॥ तेंचिसत्यज्ञानेंकरून ॥ विलयापावतेंआपण ॥ दोरकावरीलजैसेंभुजंगपण ॥ भ्रांतिनाशेंनासतसे ॥ ४६ ॥ हें
चीबंधमोक्षकारण ॥ बोलतीसदाविचक्षण ॥ ऐसाविचारकरितांपूर्ण ॥ बंधमोक्षआंगींनस्पर्शे ॥ ४७ ॥ दिवसआणि
यामिनी ॥ नाहींजैसीसूर्यालागुनी ॥ तैसीजाणाआत्म्याचेठिकाणीं ॥ बंधमोक्षकल्पना ॥ ४८ ॥ अध्यासेंकरूनीजाण
देहाचेठायींआत्मानमानून ॥ बाहेरशोधकरितातिआपण ॥ आत्मवस्तुकोठेंअसे ॥ ४९ ॥ हेंचिआश्चर्यभासेमनांत

जैसीवस्तुनष्टहोतांगृहांत॥शोधकरितीजाऊनिवनांत॥कायऐसियांम्हणावें॥५०॥याकरितांविचारी॥पुरुषजा
णानिजांतरीं॥आत्माशोधितीदेहामाझारी॥अहंपणात्यागूनियां॥५१॥त्यायोगेंतोमुक्तिलाहे॥देवाहेंजरीस-
त्यआहे॥तरीतुझीअनुकंपाहे॥तेणेंचितत्वजाणतो॥५२॥तेंतत्वज्ञानभक्तांवांचून॥प्राप्तनोहेकिमपिजाण॥
यास्तवयास्दृष्टांतऐसेंजनन॥पशुपक्षियांमाजीमजहोवो॥५३॥कींभाग्ययोगेंकरून॥तवभक्तांमाजींनिपजू
न॥सेवाधारीहोईन॥चरणसेवाकरावया॥५४॥आणखीपहाशेषशायी॥याव्रजांतगोपाळगायी॥धन्यआ-
हेतसर्वदाही॥कायवर्णूंतयांसी॥५५॥ज्यांचियास्तनाकरितांआपण॥वत्सवत्सरूपेंजाण॥केलेंमाधवास्त
नपान॥आणिककारणपरिसावें॥५६॥ज्याचेतोषार्थपाहीं॥अद्यापियज्ञसमर्थनाहीं॥ऐसापरमात्मादेवतूं
ही॥भक्तिभावाभुललासी॥५७॥ श्लोक ॥अहोभाग्यमहोभाग्यंनंदगोपव्रजौकसां॥यन्मित्रंपरमानं
दपूर्णब्रह्मसनातनम्॥३२॥ टीका ॥परमानंदसर्वेश्वर॥सनातनमनोहर॥पूर्णब्रह्मयशोदाकुमर॥
जयांचामित्रशोभला॥५८॥ऐशानंदगोपजनांचा॥वर्णूंकायपर्वतभाग्याचा॥विधाताह्मणेकुंठितवाचा
जाहलीमाझीसर्वस्वें॥५९॥असोआह्मीइंद्रियांचे॥स्वामीधन्यआहोंसाचे॥सेवनकरितोंत्वद्रूपाचें॥गोप
देहींराहूनी॥६०॥अलौकिकहेंरूपजाण॥इंद्रियपात्रेंकरितोंपान॥यास्तवयालोकींव्रजीजनन॥सदाघ-
डोभगवंता॥६१॥व्रजवासीजनांचेयोगेंकरून॥चरणधूलीचेंघडेस्नान॥तेंचिमस्तकींदेवपावन॥जीवनश्रीकृ-
ष्णजयांचें॥६२॥अद्भुतव्रजजनांचीभक्ती॥तिणेंआकळिलासीश्रीपती॥नजाणोंकायदेऊनिलयांप्रती॥
ऋणमुक्तितुजहोय॥६३॥कदाचितह्मणालआपण॥स्वरूपदेऊनिऋणमुक्तहोईन॥तरीकुलासहपूतना-

पावलीजेंजाण ॥ तेणेंतेंऋणनफिटेची ॥ ६४ ॥ कींजयानींगृहधन ॥ प्रियमित्रशरीरनंदन ॥ प्राणहीअर्पिलेलदर्थपू-
र्ण ॥ ह्मणूनिऋणीतूंहोशी ॥ ६५ ॥ श्लोक ॥ तावद्रागादयस्तेनास्तावत्कारागृहंगृहम् ॥ तावन्मोहोंऽघ्रिनिगडो
यावत्कृष्णनतेजनाः ॥ ३६ ॥ टीका ॥ हेकृष्णाजोंवरीतवभक्त ॥ जाहलेनाहींतजननिश्चित ॥ तोंवरीरागादिक-
तस्करअप्रमत्त ॥ येऊनिगांजितीबळेंची ॥ ६६ ॥ राहतेंघरबंदिशाळा ॥ ऐसेंभासतेंडोळां ॥ मोहहाचीनिबि-
डश्रृंखळा ॥ पदामाजीखळखळे ॥ ६७ ॥ गोपाळकृष्णातुजप्रत ॥ जेजाणतअसतीलतेजाणोत ॥ फारबोलू-
नकायअर्थ ॥ माझेंवंदनतुजअसो ॥ ६८ ॥ तुझेंऐश्वर्यपूर्ण ॥ मजलानसमजेपावन ॥ हेकृष्णास्वस्थानींजों-
वयालागुन ॥ आज्ञादेणेंसमर्था ॥ ६९ ॥ तूंसर्वजाणसीप्रकार ॥ जगत्स्वामीश्यामसुंदर ॥ ह्मणूनिअर्पणके-
लेंशरीर ॥ तुजलागींसद्भावें ॥ ७० ॥ श्लोक ॥ श्रीकृष्णवृष्णिकुलपुष्करजोषदायिन्क्ष्मानिर्जरद्विजपश्वू-
दधिवृद्धिकारिन् ॥ उद्धर्मशार्वरहरक्षितिराक्षसध्रुगाकल्पमार्कमर्हन्भगवन्नमस्ते ॥ ४० ॥ टीका ॥ यादव-
कुलहेंचीकोणी ॥ कमलजेंत्याजलागुनी ॥ प्रीतिदायकतरणी ॥ आहांतआपणगोविंदा ॥ ७१ ॥ पृथ्वीदेवब्राम्ह-
ण ॥ क्षत्रियवैश्यगोपाळजन ॥ पशूहेचिकोणीसिंधुजाण ॥ वृद्धिदायकचंद्रतुह्मी ॥ ७२ ॥ पाखंडधर्मसाचार ॥ हा-
चिकोणीअंधकार ॥ त्याचाकरावयाप्रतीकार ॥ चंद्रसूर्यआपणहो ॥ ७३ ॥ ऐसानंदकुमार ॥ तुझेचरणींनम-
स्कार ॥ विधिह्मणेअसोवारंवार ॥ श्रीशुकसांगेनृपातें ॥ ७४ ॥ वंदनकरूनियांपरी ॥ प्रदक्षिणाकेल्यातीनउप-
री ॥ श्रीकृष्णमूर्तिठेवूनिअंतरीं ॥ ब्रह्मास्वस्थानींपैंगेला ॥ ७५ ॥ विधीसीआज्ञादेऊनिहरी ॥ बाळांसहवत्सेंझ-
डकरी ॥ आणिलाजाहलादानवारी ॥ यमुनातीरींतेधवां ॥ ७६ ॥ बाळकांसीश्रीकृष्णावांचून ॥ वर्षगेलेंक्षणासम

न ॥ हरिमाया अचिंत्य जाण ॥ सर्व विस्मरण तिचेनी ॥ ७७ ॥ तैं बोलती गोपाळबाळ ॥ कृष्णा तुझ्या वांचूनि कवळ ॥ भक्षण केला नाहीं जवळ ॥ येऊनि भोजन करावें ॥ ७८ ॥ ऐसी परिसूनि वाणी ॥ भोजन करी चक्रपाणी ॥ अजगर चर्म बाळकां-लागुनी ॥ दाखवी मग ते धवां ॥ ७९ ॥ मोरपिच्छें धातु लेउन ॥ करूनि विचित्र वेषधारण ॥ करीत वेणूचें वादन ॥ आला व्रजांत श्रीहरी ॥ ८० ॥ तेव्हां बाळकें बोलती वचन ॥ कृष्णें वधिला अजगर महान ॥ केलें आमुचें वनीं रक्षण ॥ महाविघ्न-वारुनी ॥ ८१ ॥ श्रीशुका सी ह्मणे नरपती ॥ परोद्भव असतां श्रीपती ॥ स्वपुत्राहूनि अधिक प्रीती ॥ गोप करिती कासया ८२ ॥ तें चि सांगा मज लागून ॥ ऐकूनि बोले व्यासनंदन ॥ सर्वभूतात्मा ह्मणऊन ॥ बहुत प्रिय अखिलांतें ॥ ८३ ॥ आत्यापरतें पाहीं ॥ प्रियकर वस्तु आणिक नाहीं ॥ स्त्रीपुत्र देहादि कांहीं ॥ अन्य पदार्थ ही सकळ ॥ ८४ ॥ जरी शरीर जाहलें जीर्ण ॥ तरी जीवित तृष्णा वाढे पूर्ण ॥ तस्मात् आत्मा नारायण ॥ सर्वत्रांसी प्रिय असे ॥ ८५ ॥ श्रीकृष्णा स्वरूपासमान ॥ आणिक नाहीं प्रिय पूर्ण ॥ ह्मणूनी हरिपदाश्रितां लागून ॥ भवसागर सूकर होय ॥ ८६ ॥ राज्या पूर्वीं जो प्रश्न केला ॥ तयाचा भाग सर्व कथिला ॥ भावें ऐकती जे कृष्णलीला ॥ सर्वार्थ ते पावती ॥ ८७ ॥ लपंडाव पूल बांधणें ॥ कपिसम उड्डाण करणें ॥ या क्रीडा करूनी बाळपणें ॥ त्यजिते जाहले कौमारा ॥ ८८ ॥ श्रीमद्भागवत सारामृत ॥ दशमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ चतुर्दशाध्याय गोड हा ॥ ८९ ॥ १४ ॥ पंचदशाध्याय प्रारंभः पौगंड वयामाजी जाण ॥ येते जाहले रामकृष्ण ॥ पशुपाल होउनी आपण ॥ वृंदावनीं विचरती ॥ १ ॥ गोपाळ घेऊनि संगती ॥ धेनु रक्षिती जगत्पती ॥ पादचारी गमन करिती ॥ मंद मंद स्वच्छंदें ॥ २ ॥ बलिराम आदि करून ॥ एकत्र होऊनि गोप आपण ॥ करिती मोदें वेणुवादन ॥ वत्सरक्षण समयासी ॥ ३ ॥ वृंदावनीं शोभा सुंदर ॥ मंजु घोषें गुंजती भ्र

मर ॥ मृगादिपशुपक्षीमनोहर ॥ क्रीडाकरितीसंतोषें ४ कमळावरूनीसुगंधसमीर ॥ शीतलवाहेवारंवार ॥ कोमलपल्लवींमनोहर ॥ तरुवरनम्रफलभारें ॥ ५ ॥ म्हणूनिशिरवाग्रेंपायांवरी ॥ पडलीदेखूनिश्रीहरी ॥ कौतुकेंउत्प्रेक्षाकरी ॥ वाग्विहारीश्रीकृष्ण ॥ ६ ॥ रामासिम्हणेतेअवसरीं ॥ वनशोभापहासत्वरी ॥ वृक्षफळभारघेऊनिशिरीं ॥ वंदनार्थआलेतूमच्या ॥ ७ हेभ्रमरतवयशपावन ॥ मनींआणूनीकरितीगायन ॥ जेतुझेंआदरितीभजन ॥ तरुमुनिगणगमतीहे ८ तूतेंआत्मदेवतमानून ॥ त्यागनकरितीकदाआपण ॥ हेस्तुतियोग्याशिखिनर्तन ॥ आनंदेंविपिनींकरितीपहा ॥ ९ ॥ सतोषेंहरिणीआपण ॥ गोपीसमकरितीनिरीक्षण ॥ कोकिलपक्षीमुनिपरीजाण ॥ आदरभारीकरितात ॥ १० ॥ हीपृथ्वीधन्यअसेबहुत ॥ जेथीलवेलिवृक्षझुडपेंगवत ॥ तवकरांघ्रिस्पर्शेंपुनीत ॥ होतीसत्यदेवराया ॥ ११ ॥ सदयअवलोकनेंकरून ॥ नदीपर्वतपशुपक्षिगण ॥ भुजांतरेंगोपीआपण ॥ तेशांचिधन्यहोतीपें ॥ १२ ॥ श्रीशुकम्हणेकुरुश्रेष्ठा ॥ ऐसीवृंदावनशोभावरिष्ठा ॥ श्रीकृष्णामोदेंवारवाणूनिज्येष्ठा ॥ सकळप्रेष्ठांआनंदवी ॥ १३ ॥ नदीतटाकींपर्वतावर ॥ गोवत्सचारितसर्वेश्वर ॥ रमताजाहलासुखसार ॥ गोपबालकांसंगती ॥ १४ ॥ बलरामासहितआपण ॥ कंठींमाळाकरूनिधारण ॥ भ्रमरगुंजतांकरीगायन ॥ पृष्ठभागींतोतयांचे ॥ १५ ॥ कैंकलहंसासमशब्दकरी कैंनाचेनाचतांमयूरी ॥ हसवीमित्रांनानापरी ॥ मेघवत्तबाहेधेनूंसी ॥ १६ ॥ चकोरक्रौंचचक्रवाक ॥ भारद्वाजमयूरदेख ॥ यांचेंअनुकरणकरीचोख ॥ कैंव्याघ्रसिंहाभीतसे ॥ १७ ॥ क्रीडाकाळींश्रमबहुत ॥ जाहलेअसतांअग्रजाप्रत गोपाळअंकींउसेंठेववित ॥ चरणचोळीतयाचे ॥ १८ ॥ केव्हांनाचतीकेव्हांगाती ॥ कधींभ्रमतीयुद्धींमिसळती ॥ कैंपरस्परेंहस्तधरिती ॥ प्रशंसितीगोपाळां ॥ १९ ॥ कैंकोमळपत्रशय्येवर ॥ वृक्षछायेंतनंदकुमार ॥ गोपांचेमांडीव-

रीशिर॥ ठेवूनिश्रमातुरनिद्राकरी॥ २०॥ निजतांश्रीकृष्णजगसती॥ गोपाळत्याचेचरणसेविती॥ निःपापकोणी
वाराघालिती॥ कोणी तेंगातीमनोवेधक॥ २१॥ असे निगूढजयाचेंज्ञान॥ तोआपुलेमायेंकरून॥ गोपाळपुत्रांचें-
अनुकरण॥ करूनिरमताजाहला॥ २२॥ ज्याचीपदसेवारमाकरी॥ ऐसामहाविष्णुअवतारी॥ तोग्राम्यजनांच्या-
सहवासधरी॥ ईश्वरचेष्टितअतर्क्यहें॥ २३॥ एकदांश्रीदामासुबळ॥ रामकृष्णांचेमित्रगोपाळ॥ स्तोककृष्णा-
दिवचनमंजुळ॥ प्रेमेंबोलतीतेंपरिसा॥ २४॥ रामारामासौख्यदायका॥ कृष्णाकृष्णादुष्टनाशका॥ येथूनिसं-
निधवनदेखा॥ एकअसेतालांचें॥ २५॥ तेथेंफळेंबहुतअसती॥ पतनपावलींतेंशीचपडती॥ परीधेनुकदैत्य-
रोधीनिश्चिती॥ कायकरावेंत्यालागीं॥ २६॥ खररूपघेऊनिजाण॥ ज्ञातीसहितराहेआपण॥ नरपशुपक्षी-
ह्मणवून॥ नस्पर्शितीफळांसी॥ २७॥ त्याफळांचासुगंधपाहें॥ येथवरीआह्मांयेतआहे॥ तींचदेईआह्मांलवलाहें॥
रुचेलतरीचलातेथें॥ २८॥ मित्रवचनकरूनीश्रवण॥ वनींगेलेरामकृष्ण॥ बळरामेंमाजीजाऊन॥ वृक्षाहालविले
तालाच्या॥ २९॥ फळपातशब्दपरिसून॥ महीपर्वतकांपवीतआपण॥ खररूपेंधेनुकधांवून॥ रामावरीयेतधवां॥
३०॥ रामाच्याहृदयावरी॥ दुष्टलत्ताप्रहारकरी॥ काशब्दकरूनीसत्वरी॥ पैलगेलापळूनियां॥ ३१॥ मगसकोपरो-
हिणीनंदन॥ मागेंजाऊनिधरीचरण॥ गरगरभ्रमवूनितोगतप्राण॥ तृणराजावरीझुगारिला॥ ३२॥ तेंएकाव-
रीएकपडून॥ समस्ततालजाहलेचूर्ण॥ धेनुकानुचरतेंपाहून॥ युद्धकंदनापातले॥ ३३॥ रामकृष्णातयांदैत्यां-
सी॥ त्यांचिक्रमेंफेंकितीआकाशीं॥ तद्देहपडतांतयांसरशीं॥ फळेंफारशींपडतीपैं॥ ३४॥ अघटितकृत्यपाहून
पुष्पेंवर्षतीसुरगण॥ अनेकवाद्येंवाजवून॥ करितीस्तवनसद्भावें॥ ३५॥ मगतालफळेंभक्षण॥ करितीमान-

वतेंपासून॥पशूंलागींयथेष्टतृण॥श्रमजाहलेंतेधवां॥३६॥ज्याचीकीर्तीहीपावन॥गोपाळकरितीगायन॥
तोश्रीकृष्णकमलनयन॥सरामव्रजींपावला॥३७॥ श्लोक ॥तंगोरजश्छुरितकुंतलबद्धबर्हवन्यप्रसू-
नरुचिरेक्षणचारुहासम्॥वेणुंक्वणंतमनुगैरनुगीतकीर्तिंगोप्योदिदृक्षितदृशोऽभ्यगमन्समेताः॥४२॥ टी०
गोरजेंकरूनीव्यास॥मयूरपिच्छेंशोभतीकेसांत॥वनपुष्पींशोभाबहुत॥कृष्णनाथयेऐसा॥३८॥सुंदरनेत्रमं-
दहास्यहरी॥मुरलीवाजवीतसेअधरीं॥गोपस्तवनकरितीबरोबरी॥पहावयागोपीपातल्या॥३९॥मुकुंदमु-
खातीलमकरंद॥पिऊनीगोपीनेत्रमिलिंद॥दिवसाचाविरहदुःखबंध॥त्यागितेजाहलेतेकाळीं॥४०॥मंद-
हासादिकेंकरून॥त्यांचासत्कारकरून॥समित्रव्रजामाजीभगवान॥प्रवेशकरिताजाहला॥४१॥यशोदाआ-
णिरोहिणी॥पुत्रदयाआपूनिमनीं॥आशीर्वाददेतीतेक्षणीं॥रामकृष्णांविजयप्रद॥४२॥श्रमपरिहारार्थमं-
गलस्नान॥नूतनवस्त्राचेंधारण॥करवूनिदिव्यमाळाकंठींअर्पण॥सुगंधलेपनहीकरिती॥४३॥याहीगुणेंउ-
भयतां॥शोभतेजाहलेनृपनाथा॥उत्तमान्नवाढिलीमाता॥भोजनकरितीत्यावरी॥४४॥मगसुखशय्येवरी॥प-
हुडलेबळरामहरी॥दुसरेदिवशींगोपांसहमुरारी॥रामावांचुनीवनींगेला॥४५॥ग्रीष्मऋतूंतदोनप्रहरीं॥जल-
पानार्थयमुनातीरीं॥गेगोपगेलेझडकरी॥विषोदकप्राशितांतेमेले॥४६॥गतप्राणपाहूनिसकळ॥शोककरी-
नंदबाळ॥अमृतदृष्टीनेंतात्काळ॥उठवीकृपाळुत्यांसी॥४७॥गोपांसिजाहलेंस्मरण॥कींउदकपानेंपावलों
मरण॥गोविंददृष्टीच्यायोगेंजीवन॥जाहलेंआश्चर्यपूर्णलें॥४८॥श्रीमद्भागवतसारामृत॥दशमस्कंधपरम
पुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥पंचदशाध्यायगोडहा॥४९॥ १५ ॥षोडशाध्यायप्रारंभः॥यमुनातीरीं

तमालनील ॥ विषयुक्त पाहूनि यमुनाजळ ॥ तीतें करावया विमळ ॥ अहि घालवूं इच्छितसे ॥ १ ॥ परीक्षिति ह्मणे शुक- काशी ॥ अगाधजळीं निश्चयेंशीं ॥ बहु युगपर्यंत रहिवासी ॥ सर्प कैसा जाहला ॥ २ ॥ तयाचें कथावें कारण ॥ करवाल कृ- ष्णाचरितामृतपान ॥ यापरी परिसूनियां वचन ॥ श्रीशुक बोलते ऐक ॥ ३ ॥ कालिंदीडोहामाजी जाण ॥ कालिया सर्प वसे महान ॥ तयाचे विषयोगें करून ॥ महाअनर्थ होतसे ॥ ४ ॥ नभींचे पक्षी गळूनि पडती ॥ नदीतीरस्थ वृक्ष जळती स्थिरजंगमां लागूनियेरिती ॥ बहु त्रास जाहला ॥ ५ ॥ यमुनानदींत दुष्ट अही ॥ देखूनि कोपला शेषशायी ॥ कदंबवृ- क्षावरील वलाही ॥ चढूनि थोपटी दंडातें ॥ ६ ॥ घालूनि पीतांबराची कास ॥ वनमाळा पृष्ठभागास ॥ टाकूनियां रमावि- लास ॥ घाली उडी त्या ह्रदीं ॥ ७ ॥ शतधनुष्यें उदक वर ॥ उसळलें तें अनिवार ॥ कृष्णभुजदंडांचा भयंकर ॥ शब्द जा- हला ते धवां ॥ ८ ॥ स्वगृहपराभव जाहला ॥ हें मानूनि काळिया कोपला ॥ पाहूनियां घनसांवळा ॥ त्वरें धांवला अंगा- वरी ॥ ९ ॥ निर्भयचित्तें करून ॥ जलविहार करी नारायण ॥ सर्प त्वरें येऊनि आपण ॥ मर्मस्थानीं दंश करी ॥ १० ॥ नं- तरीं कोपूनि अनिवार ॥ वेष्टन करी कृष्णशरीर ॥ तें पाहूनि गोपकुमार ॥ शोकें व्याकुळ तटाकीं ॥ ११ ॥ गोकुळीं त्रिवि- ध उत्पात ॥ होते जाहले अकस्मात ॥ तें पाहूनि भयें भीत ॥ गोपाळ चित्तीं तें होती ॥ १२ ॥ रामावांचूनि हरी ॥ वनांत- गेला झडकरी ॥ दुर्निमित्तें आणूनि अंतरीं ॥ ह्मणती पडला संकटीं तो ॥ १३ ॥ आबालवृद्धवनिता जाण ॥ करितें जा- हले ते धवां प्रयाण ॥ कृष्णपदसूचित मार्गें करून ॥ यमुनातटाकीं पातले ॥ १४ ॥ ऐसा प्रकार अवलोकून ॥ हांसता- जाहला संकर्षण ॥ कवणासवें न करी भाषण ॥ कृष्णमाहात्म्य ठावें तया ॥ १५ ॥ यमुनातीरीं येऊनि सकळ ॥ पाह- ते जाहले अगाधजळ ॥ तेंतें येथें श्यामसुंदर बाळ ॥ सर्पवेष्टित देखिला ॥ १६ ॥ शोक करिती गोवळ ॥ नंद यशोदा-

रोहिणीसकळ ॥ बाळावांचूनित्रैलोक्यनिष्फळ ॥ मानितेजाहलेतेधवां ॥ १७ ॥ याजगींकृष्णावांचून ॥ कायकरा-
वेंवांचून ॥ ह्मणूनिनंदयशोदाआपण ॥ जळप्रवेशकरूंपाहती ॥ १८ ॥ तेंरामेंकेलेंनिवारण ॥ पुढेंकायजाहलेंव-
र्तमान ॥ सर्पवेष्टितनारायण ॥ विचारकरीअंतरीं ॥ १९ ॥ सकळआपणाकरितां ॥ दुःखपावतीकींआतां ॥ म्हणू-
निनिजदेहाहोयफुगविता ॥ तेणेंकाळियाव्यथाहोय ॥ २० ॥ वेष्टनसोडूनिसत्वर ॥ वेगळाहोयफणिवर ॥ परी
क्रोधभरितअंतर ॥ पाहेश्रीहरीतेंतेकाळीं ॥ २१ ॥ मगतयासीभ्रमवूनिफार ॥ तेक्षणींकेलाजर्जर ॥ अकस्मात-
पाहूनिअवसर ॥ फणारूढहरीजाहला ॥ २२ ॥ काळियमस्तकींराहून ॥ नृत्यकरीजनार्दन ॥ ऐसासमारंभपाहू-
न ॥ गंधर्वजनआनंदती ॥ २३ ॥ सिद्धचारणादिसुरगण ॥ सुरसवाद्येंकरितीवादन ॥ त्यातालावरीमनमोहन
तांडवनृत्यकरीमुदें ॥ २४ ॥ जेंकरीकाळियावरमस्तक ॥ पदघातेंदंडपीविश्वचाळक ॥ रुधिरवमनकरूनिदे-
ख ॥ सर्पमूर्च्छितजाहला ॥ २५ ॥ सुगंधकुसुमवर ॥ वर्षतेजाहलेतेव्हांअमर ॥ काळियफणावरीनंदकुमार-
पाहूनित्रिजगआनंदले ॥ २६ ॥ हेंम्हूपतेजेंधवांफणी ॥ तांडवनृत्यभारेंकरूनी ॥ नम्रजाहलारुधिरवमुनी ॥ आठ-
वीमनींपुरुषाद्या ॥ २७ ॥ श्लोक ॥ तच्चित्रतांडवविरुग्णफणातपत्रोरक्तंमुखैरुरुवमन्नृपभग्नगात्रः ॥ स्मृत्वाचराचर
गुरुंपुरुषंपुराणंनारायणंतमरणंमनसाजगाम ॥ ३० ॥ टीका ॥ राजापरिसेंसमाचार ॥ फणाज्याच्याछत्राकार ॥
ऐसाकाळियासर्पतोथोर ॥ भग्नशरीरजाहला ॥ २८ ॥ विचित्रकृष्णनर्तनेंकरून ॥ करिताजाहलारुधिरवमन ॥
तेंपुराणपुरुषनारायण ॥ स्मरूनिशरणगेलामनें ॥ २९ ॥ पतीचीअवस्थायापरी ॥ पाहूनियातेंअवसरीं ॥ ना-
गपत्न्यादुःखितअंतरीं ॥ होत्याजाहल्यानृपराया ॥ ३० ॥ मगकरूनियांनमन ॥ बालकेंसन्निधठेवून ॥ ना-

गपत्न्यापतिव्रतास्तवन॥ करितीतेंचीपरिसावें॥ ३१ ॥ नागपत्न्याबोलतीवचन॥ कालियाचाअपराधपूर्ण॥ तयासीयोग्यदंडकेलापाहुन॥ योगाधीशाश्रीकृष्णा॥ ३२ ॥ खलनिग्रहार्थअवतार ॥ तुझादेवाअसेसाचार॥ दुष्टकालियाफणिवर॥ बरादंडिलापावना॥ ३३॥ दंडनोव्हेअनुग्रहबरा॥ आह्मांवरीकेलादातारा॥ चरणस्पर्शेंकरूनिकृतारा॥ पावनकेलेंआसुतें॥ ३४ ॥ पूर्वींतिपंतपलाफार॥ त्यागुणेंहाफणीश्वर ॥ तवअंघ्रिरेणुस्पर्शाधिकार ॥ आजिपावलानिर्धारें॥ ३५॥ याप्रभावाचेंकारण॥ आम्हीनजाणोंनिश्चयेंकरून॥ लक्ष्मीसजेदुर्लभचरण॥ तेचियातेंलाधले॥ ३६॥ ॥श्लोक॥ ॥ननाकपृष्ठंनचसार्वभौमंनपारमेष्ठ्यंनरसाधिपत्यं॥ नयोगसिद्धीरपुनर्भवंवावांछंतियत्पादरजःप्रपन्नाः॥ ३७॥ टीका ॥ हेप्रभोतवचरणकमलासी॥ जेकांशरणआलेनिश्चयेंसी॥ तेनइच्छितीसार्वभौमतासी ॥ सत्यलोकपातालतुच्छत्वां॥ ३७॥ तैसेंध्रुवपदादिजेंकांहीं॥ अणिमादिकयोगसिद्धीपाहीं॥ मोक्षहीनइच्छितीह्रदयीं॥ चरणींआसक्तअलिवत॥ ३८॥ ॥श्लोक॥ नमःप्रमाणमूलायकवयेशास्त्रयोनये॥ प्रवृत्तायनिवृत्तायनिगमायनमोनमः॥ ४४ ॥ टीका ॥ ज्ञानहोण्यासीकारणपुनीत॥ जींतत्त्वेंप्रमाणभूत॥ वेदादिशास्त्रेंजींसमस्त॥ तयांकारणतवरूप॥ ३९॥ आणितुझियाश्वासापासून॥ वेदपावलेजनन॥ ह्मणूनितुझेपायींनमन॥ अखिलेश्वराहेंअसो॥ ४०॥ ॥श्लोक ॥ नमःकृष्णायरामायवसुदेवसुतायच॥ प्रद्युम्नायानिरुद्धायसात्वतांपतयेनमः॥ ४५॥ टीका ॥ प्रभोआपणचतुर्मूर्तीकरून॥ सर्वांचेउपास्यआहांपावन॥ लावण्यागरबहुतह्मणऊन॥ संकर्षणतुजवदती॥ ४१ ॥ शुद्धसत्वप्रकाशकस्वयमेव॥ ह्मणूनिह्मणतीवासुदेव॥ प्रद्युम्नआणिअनिरुद्धदेव॥ हींस्वरूपेंतुझींचकीं॥ ४२ ॥ ऐशाकृष्णासवारंवार॥ आसु-

चाअसोनमस्कार॥ प्रागत्भ्यजूंपाहेभ्रतार॥ चुडेदानदेआतां॥ ४३॥ श्रीशुकह्मणेरायासी॥ ऐकूनिऐशास्तवनासी॥ सोडिताजाहलाकाळियासी॥ परमपुरुषतेधवां॥ ४४॥ स्वस्थचित्तहोउनिफणी॥ बोलताजाहलातेक्षणीं॥ चौऱ्यांशीलक्षयोनी॥ तूंचिनिर्मिशीपरमेश्वरा॥ ४५॥ तयांमाजीसर्पजाती॥ निर्माणकेलीसजगत्पती॥ फारक्रोधीछळकमती॥ स्वभावतोकेंसात्यजी॥ ४६॥ मायामोहनिवारण॥ ह्यावयासीतूंचिकारण॥ आलोंपदींशरण॥ करीरक्षणगोविंदा॥ ४७॥ ऐसेंपरिसूनिवचन॥ बोलताजाहलाभगवान॥ हेसर्पाकलत्रांसहितयेथून॥ समुद्रामाजीतांजावें॥ ४८॥ नृपशुपक्षियांसीशुद्धजीवन॥ करावयापाहिजेप्राशन॥ तुझेमस्तकींपदलांछन॥ पाहूनसुपर्णनभक्षीतुज॥ ४९॥ याचरित्राचेंश्रवणपठन॥ जोमानवकरीलआपण॥ तयासीभयतुझ्यापासून॥ नहोवोजाणकल्पांतीं॥ ५०॥ माझेक्रीडास्थानीस्नान॥ यान्हदींकरीलजोपावन॥ पितृतर्पणउपोषण॥ करूनिमातेंअर्चील॥ ५१॥ तोसर्वपापांपासून॥ मुक्तहोईलनलगताक्षण॥ तूंरमणकद्वीपींजाऊन॥ वासकरीमदाज्ञें॥ ५२॥ सूतबोलेशौनकासी॥ ऐशापरिसूनिवाक्यासी॥ काळियानेंतेसमयासी॥ श्रीकृष्णनाथपूजिला॥ ५३॥ दिव्यवस्त्रेंअलंकार॥ दिव्यगंधपीतांबर॥ कंठींपद्ममाळाअर्पूनिमनोहर॥ पद्मनाभनमियेला॥ ५४॥ प्रदक्षिणानयननमन॥ करूनिगेलाकाळियाआपण॥ शुद्धजाहलेंयमुनाजीवन॥ जगन्नाथअनुकंपें॥ ५५॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ दशमस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसखारामविरचित॥ षोडशाध्यायगोडहा॥ ५६॥ १६॥ छ

सप्तदशाध्यायप्रारंभः॥ ॥ विष्णुरातह्मणेयोगिनाथा॥ रमणकद्वीपसर्पांसमस्तां॥ निवासस्थानसुंदरअसतां॥ काळियात्यागीतेंकिमर्थ॥ १॥ गरुडभयेंह्मणावेंतरी॥ नसंभवेसाचोकारी॥ तोचिएकअप्रियकरी॥

कायऐसेंगरुडाचें ॥ २ ॥ याचेंसांगावेंकारण ॥ यापरीपरिसूनियांवचन ॥ बोलतेजाहलेश्रीशुकआपण ॥ तें-
चिआतांपरिसावें ॥ ३ ॥ रमणकद्वीपीं सर्पजन ॥ भयनव्हावेंगरुडापासून ॥ ह्मणूनिवृक्षमूळींकरितीबलि
दान ॥ अमापूर्णिमातिथींसी ॥ ४ ॥ गरुडासीतुच्छकरून ॥ कालियाकरीबलिभक्षण ॥ विष्णुवहनयापरीपा
हून ॥ क्रोधेंकरूनीधांवला ॥ ५ ॥ विषदर्पेंकरूनिजाण ॥ काळियाकरीयुद्धकंदन ॥ गरुडेंवामपक्षेंकरितांताडन
सर्पविव्हळजाहला ॥ ६ ॥ मरतोपरिवारासहित ॥ काळियानिघालात्वरित ॥ येऊनिराहिलायमुनाजळांत ॥
स्वस्थचित्तेंकरूनियां ॥ ७ ॥ तेस्थळीं एकदांजाण ॥ क्षुधातुरेंगरुडेंयेऊन ॥ सौभरिमुनिकरितांनिवारण ॥ मत्स्य
राज भक्षिला ॥ ८ ॥ मत्स्यराजपावतांमरण ॥ सकळमीनजाहलेदीन ॥ म्हणूनिसौभरीकृपानिधान ॥ अंतःकर
णींकळवळला ॥ ९ ॥ परोपकारार्थबोलेब्राह्मण ॥ येस्थळींमत्स्यार्थीगरुडआपण ॥ येतांचिपावेलमरण ॥ स-
त्यवाचाहीमाझी ॥ १० ॥ हेंश्रुतहोतेंकाळियासी ॥ अवगतनसेचीअन्यांसी ॥ ह्मणूनितोसहपरिवारेंशीं ॥ डो-
हामाजीतेंराहिला ॥ ११ ॥ नयानागासीसत्वर ॥ स्वस्थानींपाठवीनंदकिशोर ॥ नंतरत्याडोहाबाहेर ॥ श्रीकरधर
पातला ॥ १२ ॥ दिव्यवस्त्रसालंकार ॥ दिव्यपद्ममाळाधर ॥ भाळींगंधतिलकसुंदर ॥ घन श्यामऐसाप्रगटला
१३ ॥ श्रीकृष्णादेखूनिनयनीं ॥ गोपाळसंतोषलेमनीं ॥ नंदयशोदाआणिरोहिणी ॥ आनंदसागरींबुडालीं ॥ १४
बलिरामयेऊनिआपण ॥ करिताजाहलादृढालिंगन ॥ धेनुवत्सेंपुच्छेंउभारून ॥ उड्यामारितीकौतुकें ॥ १५ ॥
तेव्हांस्त्रियांसहितब्राह्मण ॥ येऊनिबोलतेजाहलेवचन ॥ हेनंदातवपुत्रसर्पापासुन ॥ मुक्तजाहलाहरिकृपें ॥
१६ ॥ दानधर्मकरावाआतां ॥ बाहूनिविप्रांसमस्तां ॥ गोपाळनाथेंपरिसूनिवार्ता ॥ पूर्णमनोरथतेकेले ॥ १७ ॥ ये

जीतीलागून॥नंदहोउनसोडीचवयी॥३५॥येणेंपरीउन्मत्ता॥गोपीभ्रमतीसमस्ता॥वृक्षांसिविचारितनत्वतां
लक्ष्मीकांताकारणें॥३६॥पुढतीकरितीगमन॥अकस्मातदेखिलेश्रीहरिचरण॥ध्वजवज्रांकुशचिन्हेंपूर्ण॥ पृ-
थ्वीवरीतेकाळीं॥३७॥कृष्णपदसूचितमार्गेंकरून॥जातीसमस्तगोपीआपण॥तोंहरिपदांमाजीमिश्रण॥स्त्री
पदांचेंअवलोकिती॥३८॥ह्मणतीकृष्णेंआपुलाकोंपर॥ठेवूनिजीच्याखांद्यावर॥आपुल्यासंगतीनेलीसाचार
ऐशीमनोहरकवणअसे॥३९॥कायतियेचेंतपाचरण॥श्रीहरीचेंअधरपान॥एकटीकरितसेआपण॥सखि
यानोमनक्षोभतें॥४०॥अग्रभागींकरितीगमन॥तोंपाहिलेअर्धचरण॥ह्मणतीयेथेंकेलेंवेणीबंधन॥सुमनेंसाक्षदे
तीही४१इकडेस्त्रैणपुरुषांचेंदैन्य॥आणिस्त्रियांचादुष्टस्वभावपूर्ण॥लोकींप्रसिद्धकरावयाजाण॥त्यागोपींसहह-

रीरमे ॥ ४२ ॥ येरीकडे गोपी समस्त ॥ वनीं भ्रमती अस्ताव्यस्त ॥ ज्या गोपी सवें श्रीकृष्ण रत ॥ तीतें गर्व जाहला ॥ ४३ ॥ सर्वत्यागूनि गोपनारी ॥ मातेंच भजे पूतनारी ॥ धन्य धन्य मी पृथ्वीवरी ॥ ह्मणूनि काय बोलतसे ॥ ४४ ॥ हे कृष्णा लक्ष्मीकांता ॥ मी श्रमलें विलास करितां ॥ यास्तव इच्छित स्थानीं आतां ॥ घेऊनि जाणें प्रियोत्तमा ॥ ४५ ॥ ऐसें ह्मणतां श्रीधर ॥ बोले वचन मधुर ॥ येऊनि बैसें स्कंधावर ॥ ह्मणूनि लवला परमात्मा ॥ ४६ ॥ उभी राहूनि गोपी आपण ॥ करूं जाय स्कंधा रोहण ॥ तों तेथेंन लागतां क्षण ॥ श्रीहरि गुप्त जाहला ॥ ४७ ॥ गोपिका पाहूनि या परी ॥ शोक पावली ते अवसरीं ॥ ह्मणे माधवा पूतनारी ॥ काय ऐसें हें केलें ॥ ४८ ॥ श्लोक ॥ हा नाथ रमण प्रेष्ठ क्कासि क्कासि महाभुज ॥ दास्यास्ते कृपणाया मे सखे दर्शय सन्निधिम् ॥ ३९ ॥ टीका ॥ गोपी बोले शोकातुर ॥ हे प्राणनाथ परमसुंदर ॥ हे अतिप्रिय मनोहर ॥ महाभुज कृष्णा कोठें तूं ॥ ४९ ॥ दीन दासीचा त्याग करून ॥ कोठें केलें सरवया गमन ॥ सन्निध ठेवीं आपुल्या नेऊन ॥ विनंति हीच प्राणाधिका ॥ ५० ॥ ऐसी विरहज्वरें संतप्त होऊन ॥ गोपी काननीं करी भ्रमण ॥ तों इतर गोपिका विरहदीन ॥ येती ऐशा देखिल्या ॥ ५१ ॥ त्वरें येऊनि समस्त नारी ॥ पुसत्या जाहल्या ते अवसरीं ॥ तिणें साकल्यें प्रत्युत्तरीं ॥ अन्य गोपीतें कथियेलें ॥ ५२ ॥ कृष्णापासूनि यां जाण ॥ प्राप्त जाहला मानापमान ॥ आपुल्या दुष्टस्वभावें करून ॥ कृष्ण अदृश्य जाहला हें ५३ ॥ या परी वृत्त करूनि श्रवण ॥ विस्मित जाहल्या गोपी आपण ॥ समस्त मिळून करिती गमन ॥ जेथवर असे चंद्रमा ॥ ५४ ॥ पुढें पडला अंधकार ॥ न करवे वनीं संचार ॥ ऐसें पाहूनि यां सत्वर ॥ समस्त गोपी परतल्या ॥ ५५ ॥ त्या निराश जरी पूर्ण ॥ तरी कृष्णावरी त यांचें मन ॥ पूर्वस्थानीं पुनरपि येऊन ॥ श्रीहरिगुण वर्णिती ॥ ५६ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंध-

परमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ त्रिंशाध्यायगोड हा ॥ ५७ ॥ ३० ॥ एकत्रिंशाध्यायप्रारंभः ॥ ॥ हे कृष्णा गोकुळांत ॥ तूं जाहलासी आविर्भूत ॥ तेव्हां पासूनि कमळा येथ ॥ वास करूं लागली ॥ १ ॥ आह्मी व्रजवासीजन ॥ तुझ्यावरी ठेवूनि प्राण ॥ शोध करितों ह्मणउन ॥ दर्शन देई दयाळा ॥ २ ॥ अन्य गोपी बोलती वचन ॥ हे स्मरतनाथ मनमोहन ॥ अमूल्य दासींचे नेत्रें करून ॥ प्राणहरण करिसी कसा ॥ ३ ॥ त्वां हरिले जे का प्राण ॥ ते चि परत द्यावया लागून ॥ प्रगट होई न लगतां क्षण ॥ अभयदान द्यावया ॥ ४ ॥ तुवां विषजळा पासून ॥ केलें गोगोपरक्षण ॥ अघवर्षवात अरिष्टांतून ॥ पालन केलें समस्तां ॥ ५ ॥ आतां चि कां आम्हांसी ॥ उपेक्षिशी हृषीकेशी ॥ दर्शनें हरि संतापासी ॥ व्रजवासीजनप्रिया ॥ ६ ॥ श्लोक ॥ नखलु गोपिकानंदनो भवानखिलदेहिनामंतरात्मदृक् ॥ विखनसार्थितो विश्वगुप्तये सख उदेयिवान्सात्वतां कुले ॥ ४ ॥ टीका ॥ हे कृष्णा निश्चयेंशीं ॥ तूं यशोदापुत्र नससी ॥ सकल जीवांच्या बुद्धि जाणसी ॥ सर्वांतरीं राहूनियां ॥ ७ ॥ विधीनें विश्वरक्षणा ॥ प्रार्थिलें तुज नारायणा ॥ म्हणूनि तूं संतापहरणा ॥ यादवकुळीं प्रगटलासी ॥ ८ ॥ तव विरहें करून ॥ प्राप्त जाहलें होतें मरण ॥ परी तव कथामृतें संजीवन ॥ केलें ह्मणूनि राहिलों ॥ ९ ॥ हे व्रजजनदुःखनाशना ॥ आम्ही दासी तुझ्या मनमोहना ॥ ह्मणूनि दाखवी पद्मानना ॥ कृपा करूनी ये काळीं ॥ १० ॥ जे चरण धेनूमागें भ्रमले ॥ तैसे फणिशिरीं नाचले ॥ ते आमुच्या स्तनीं ठेवूनि भले ॥ मन्मथातें शांत करी ॥ ११ ॥ हे पुष्करेक्षणा मधुर ॥ वाणी करूनी साचार ॥ मोहित जाहलों अपार ॥ अधरामृतें तृप्त करी १२ हे हरे तुझें जें कथामृत ॥ तप्तां जीववी हरि दुरित ॥ श्रवणमंगल बहु पुनीत ॥ सेविती ते धन्य महिमंडळीं ॥ १३ ॥ आणि जे का तुज पाहती ॥ ह्मणूनि प्रार्थितों चरणाप्रती ॥ दर्शन देणें शीघ्रगती ॥ कृपानिधी गोविंदा ॥ १४ ॥ देवा तुझें

हास्यावलोकन ॥ एकांतीं मधुर संभाषण ॥ तैसेंच जें काननीं विहरण ॥ तेणें मन क्षुभित होय ॥ १५ ॥ हे कपटनाटका मनमोहना ॥ पशुचारावयासी जाशी कानना ॥ तेव्हां तुझे कमलमृदुचरण ॥ तृणांकुर व्यथा देती ॥ १६ ॥ ऐसें पाहूनि आह्मांसी ॥ दुःख होतें बहु मानसीं ॥ सायंकाळीं जेव्हां येसी ॥ व्रजवासी सुखार्थ ॥ १७ ॥ सुनील कुंतलीं मंडित ॥ सुखकमल गोरजीं सुशोभित ॥ दाखवूनि आह्मां त्वरित ॥ कामदुर्दय प्रेरिशी ॥ १८ ॥ तयाचे शांत्यर्थ जाण ॥ स्वयें न करिशि सुरतदान ॥ कपटी नटह्मणऊन ॥ तुज बोलतों सकळिक ॥ १९ ॥ आतां आधि हरका प्रणतकामदा ॥ पद्मार्चित पद्मपादा ॥ कामशमनार्थ गोविंदा ॥ स्तनीं अर्पण करीं तूं ॥ २० ॥ ॥ श्लोक ॥ सुरतवर्धनं शोकनाशनं स्वरितवेणुना सुष्ठु चुंबितम् ॥ इतररागविस्मारणं नृणां वितर वीर नस्ते ऽधरामृतम् ॥ १४ ॥ टीका ॥ कृष्णा तुझें अधरामृत ॥ सुस्वरवेणूनें चुंबित ॥ आह्मांसी प्राशन करीं त्वरित ॥ सुरतवृद्धि करी जें ॥ २१ ॥ विषयवासनाक्षयार्थ ॥ तें चि द्यावें अधरामृत ॥ तव मूर्ति न पाहतां किंचित ॥ क्षण युगापरी जातसे ॥ २२ ॥ सायंकाळीं पावन ॥ कुटिल कुंतलें करूनि पूर्ण ॥ श्रीसुख पाहतां क्षुधाहरण ॥ सहज होतें मुकुंदा ॥ २३ ॥ हे अच्युता तस्मात् ॥ पतिसुत त्यागूनि त्वरित ॥ श्रवण करूनी वेणुगीत ॥ सन्निधानीं पातलों ॥ २४ ॥ त्याचा परिणाम शेवटीं ॥ ऐसा करिसी जगजेठी ॥ निराश्रित अबला पाहूनि दिठी ॥ त्याग सर्वथा न करावा ॥ २५ ॥ हे कृष्णा जगत्पती ॥ मंजुळ भाषण तुझें एकांतीं ॥ प्रसन्न सुखप्रेमावलोकन निश्चितीं ॥ लक्ष्मीस्थान उर तें सें ॥ २६ ऐसें पाहूनियां जाण ॥ तृष्णा अतिशय होते उत्पन्न ॥ मोहित होऊनि अंतःकरण ॥ सदा ध्यान लागतें ॥ २७ ॥ हे सखया हे कृष्णनाथ ॥ व्रजवासि दुःखहरणार्थ ॥ विश्वमंगल आविर्भूत ॥ झालासी ह्मणूनि दया करीं ॥ २८ ॥ आमुचे हृद्रोगासी ॥ देवा औषध तूंचि जाणसी ॥ हा गूढाभिप्राय मानसीं ॥ जाणूनि कार्य करावें ॥ २९ ॥ कृष्णा तुझ्या यास-

कुमार ॥ चरणासीव्यथाहोईलफार ॥ कींधेनुमागेंभ्रमतांसाचार ॥ कंटकादिरुततीबहु ॥ ३० ॥ यास्तवतुझेचरण कमळ ॥ आमुच्याकठिणस्तनींकेवळ ॥ ठेवूनिहरूचितापसकळ ॥ कृपानिधीशामवींतूं ॥ ३१ ॥ कृष्णाहोईलजरी दर्शन ॥ तरीचराहतीलआमुचेप्राण ॥ ऐसेंबोलूनिगोपिकाआपण ॥ करितीरुदनसुस्वरें ॥ ३२ ॥ श्रीमद्भागव तसारामृत ॥ दशमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ एकत्रिंशाध्यायगोडहा ॥ ३३ ॥ ३१ ॥ ॥ द्वात्रिं शाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्रीशुकउवाच ॥ इतिगोप्यःप्रगायंत्यःप्रलपंत्यश्चचित्रधा ॥ रुरुदुःसुस्वरंराजन्कृ- ष्णदर्शनलालसाः ॥ १ ॥ टीका ॥ श्रीशुकह्मणेपरीक्षिती ॥ कृष्णदर्शनाविषयींचित्तीं ॥ सोत्कंठहोऊनिभ्रमती ॥ काननींगोपीसकळिक ॥ १ ॥ विचित्रपणेंकरितीभाषण ॥ भगवद्गुणांचेंवर्णन ॥ उच्चस्वरेंकरूनीगायन ॥ करिती रुदनविरहानें ॥ २ ॥ तेथवांअकस्मात ॥ गोपिकासमाजांत ॥ प्रगटजाहलारमानाथ ॥ त्यांचीभक्तिदेखूनियां ३ तेंध्यानपरमसुंदर ॥ श्यामदेहपीतांबरधर ॥ किरीटकुंडलेंमनोहर ॥ वैजयंतीहारसुकंठीं ॥ ४ ॥ श्रीकृष्णापाहू- निजाण ॥ गोपींसिजाहलाआनंदपूर्ण ॥ जेसाकापरललाप्राण ॥ तेसावाटेअखिलांसी ॥ ५ ॥ कोणीयेऊनिगो पसुंदरी ॥ श्रीहरीचाहस्तधरी ॥ चंदनभूषितभुजकरीं ॥ ग्रहणकरितीकोणीहो ॥ ६ ॥ मुखमाजीलचर्वित ॥ तांबूलघेतीकोणीत्वरित ॥ तसस्तनावरीधरितीउत्कंठित ॥ हरिपदकोणीगोपिका ॥ ७ ॥ एकवांकडीदृष्टिकरू न ॥ हरीकडेकरितीअवलोकन ॥ अन्यसुखकमळींहोतीतल्लीन ॥ अन्तस्मनेंपाहती ॥ ८ ॥ नेत्रद्वारेंश्रीकृष्णासी ॥ नेऊनिस्थापितीमानसीं ॥ ब्रह्मानंदसौख्यराशी ॥ योगियांपरीपावती ॥ ९ ॥ असोऐशागोपकांता ॥ अकस्मातगोविं ददर्शनहोतां ॥ विरहसंतापांतूनिमुक्तता ॥ पावल्याजाहल्यात्याकाळीं ॥ १० ॥ जेसेमुमुक्षुईश्वर ॥ साधनांतींप्राप्त-

होतांसत्वर ॥ तद्वतगोपी पाहतांश्यामसुंदर ॥ गतशोकत्याहोती ॥ ११ ॥ गोपिकावेष्टितहरी ॥ असतांशोभेवनांत-
रीं ॥ जैसाआद्यपुरुषपरोपरी ॥ सत्वादिशक्तिसहितहो ॥ १२ ॥ सर्वगोपिकाकरूनिग्रहण ॥ कालिंदीतटींमनमोह-
न ॥ शरच्चांदण्यामाजीयेऊन ॥ वाळवंटींस्थिरावला ॥ १३ ॥ जेथेंयमुनातरंगींवाळूप्रसृत ॥ कुंदमंदारपुष्पेंप्रफुल्लि-
त ॥ सुगंधशीतळवाहेमारुत ॥ भ्रमरयुक्ततरुवरही ॥ १४ ॥ तेंपूर्णकामकृष्णाचाजाण ॥ गोपिकाकरितीसन्मान ॥
कुंकुमांकितउत्तरीयवसन ॥ आसनदेतीसद्भावें ॥ १५ ॥ नंतरगोपिकासमस्त ॥ सप्रेमहास्यासहित ॥ नानापरीलीला-
युक्त ॥ नेत्रकटाक्षेंअवलोकिती ॥ १६ ॥ वक्रदृष्टिपाहूनिसत्वर ॥ श्रीकृष्णपदमनोहर ॥ गोपिकाघेतीअंकावर ॥ सेवा-
करावयासद्भावें ॥ १७ ॥ कामपीडितअसतांआपण ॥ किंचित्कुपिताकरितीभाषण ॥ देवाधिदेवापरिसेंवचन ॥
दीनदासींचेंयेधवां ॥ १८ ॥ श्लोक ॥ गोप्यऊचुः ॥ भजतोऽनुभजंत्येकएकएतद्विपर्ययम् ॥ नोभयांश्चभजंत्येक
एतन्नोब्रूहिसाधुभोः ॥ १७ ॥ टीका ॥ आपणाभजतांदुजे ॥ आपणहीतयांभजे ॥ कोणीनभजतांहिरिझे ॥ आप-
णचीदुजावरी ॥ १९ ॥ भजकांआणिअभजकां ॥ नभजिजेचीकवणाएका ॥ मानीऐसेंत्यांचाअसका ॥ निर्णयक-
रीव्रजनाथा ॥ २० ॥ यापरीपरिसूनिवाणी ॥ कायबोलेशार्ङ्गपाणी ॥ परस्परेंकरितातकोणी ॥ उपकारादिकजे ॥ २१
तेस्वार्थपरतेथेंकांहीं ॥ शुद्धभावआणिधर्मनाहीं ॥ आतांप्रत्युपकाराचीवांछाहीं ॥ नधरितांउपकारकरितीजे ॥ २२
तेदयाशीलजाणासाचार ॥ संतमहाज्ञानसागर, पुत्रावरीमातापितर ॥ तैसेपुरुषवरयाजगीं ॥ २३ ॥ भजतांकीनभज-
तां ॥ सरिसेनभजतीचतत्वतां ॥ तयांचीअसेचतुर्विधता ॥ येणेंपरीसख्यानो ॥ २४ ॥ आत्मारामज्ञानसंपन्न ॥ कीं
पूर्णकामजेजन ॥ मूर्खआणिकृतघ्न ॥ उभयाहीनभजती ॥ २५ ॥ मीतंवययांचवघां ॥ माजीकोणीहिनसेउमगा

हामाझाउद्यमअवघा ॥ अदर्शनादिकजोकांहीं ॥ २६ ॥ तोतुमच्याप्रेमवर्धनानिमित्त ॥ कींदरिद्रीहारवतांवित्त ॥ निरंतरउद्विग्नचित्त ॥ चिंतीतेंचीसर्वदा ॥ २७ ॥ तैसेंतुमचेंप्रेममाझेठायीं ॥ वृद्धीसीपावलेंलवलाही ॥ ऐसेंबोलेशेषशायी ॥ गोपीलागींतेधवां ॥ २८ ॥ तुह्मीगृहरूपशृंखलाघोर ॥ तोडूनिभजतांसाचार ॥ मजवरीहाऋणभार ॥ तुमचाअसेंनिश्चयें ॥ २९ ॥ तोतुमचाउपकार ॥ तुमच्यासुशीलपणेंचिपरिहार ॥ पावोंकींमीप्रत्युपकार ॥ करूंनशकें ॥ ३० ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ द्वात्रिंशाध्यायगोडहा ३१ ॥ ३२ ॥ त्रयस्त्रिंशाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्रीशुकह्मणेपरीक्षिती ॥ गोपीपरिसोनीकृष्णोक्ति ॥ विरहबाधात्यागूनिसोख्याप्रती ॥ पावत्याजाहल्यातेधवां ॥ १ ॥ प्रसन्नहोऊनिमधुसूदन ॥ गोपिकांसहितआपण ॥ करिताजाहलारासक्रीडन ॥ वृंदावनींस्वानंदें ॥ २ ॥ दोनगोपींमध्येंएकहरी ॥ ऐसींअनेकरूपेंनटलातेअवसरीं ॥ करतलदेऊनिहस्तावरी ॥ सुस्वरगायनकरितीते ॥ ३ ॥ सुवर्णमण्यांमाजीजाण ॥ पाचूचेमणीशोभायमान ॥ तैसागोपींमाजीश्रीकृष्ण ॥ विराजिततैंजाहला ॥ ४ ॥ विमानींबैसूनिमनोहर ॥ वाद्येंवाजवितीसुर ॥ अप्सरानृत्यवारंवार ॥ करित्याजाहल्यातेकाळीं ॥ ५ ॥ स्त्रियांसहितसुरवर ॥ पुष्पवृष्टिकरितीकृष्णावर ॥ रासोत्सवपाहूनिसुंदर ॥ गातीयशसद्भावें ॥ ६ ॥ ॥ श्लोक ॥ वलयानांनूपुराणांकिंकिणीनांचयोषिताम् ॥ सप्रियाणामभूच्छब्दस्तुमुलोरासमंडले ॥ ६ ॥ टीका ॥ तेधवांत्यारासक्रीडेंत ॥ खेळतांकृष्णासहित ॥ गोपिकाकरींचींकंकणेंसमस्त ॥ पैंजणेंघागरियावाजती ॥ ७ ॥ श्लोक ॥ पादन्यासैर्भुजविधुतिभिःसस्मितैर्भ्रूविलासैर्भज्यन्मध्यैश्चलकुचपटैः कुंडलैर्गंडलोलैः ॥ स्विद्यन्मुख्यःकबररशनाग्रंथयःकृष्णवध्वोगायंत्यस्तंतडितइवतामेघचक्रेविरेजुः ॥ ८ ॥

टीका॥ ॥त्यारासमंडळींजाण॥कृष्णायोगेंगोपिकाआपण॥शोभत्याजाहल्यापूर्ण॥गोपिकायोगेंश्रीहरी॥
८॥चरणउचलुनिठेविती॥आणिहस्तहालविती॥हास्ययुक्तकटाक्षेंपाहती॥हरिमध्यांव्रजांगना॥९॥नृत्यस्र
मयींजाण॥गोपींचेचंचळहोतीस्तन॥कंचुकीआदिकरून॥देहावरीलवसनेंही॥१०॥गालावरीचंचळें॥होतात
सुवर्णकुंडलें॥सुशोभितनृत्यवेळें॥मुखश्रीगोपिकांची॥११॥नृत्यश्रमेंकरूनीफार॥घर्मबिंदुआलेमुखा-
वर॥कंबरपट्टाआणिकंबर॥याच्याग्रंथीशिथिलहोती॥१२॥ऐशा त्याकृष्णासहित॥रासमंडळींगोपिका
पुनीत॥मंगलचरित्रेंवर्णूनगीत॥गातीसुचित्तराजेंद्रा॥१३॥त्यारासक्रीडेंतजाण॥अनेकमूर्तीनींश्रीकृष्ण॥श्यामसुं
दरभगवान॥नानाभावकरितसे॥१४॥कृष्णमूर्तीमेघाकार॥रासमंडळींमनोहर॥गोपीसौदामिनीवर॥शोभत्याजा-
हल्यातेकाळीं॥१५॥रतिप्रियागोपसुंदरी॥नृत्यकरितीतालावरी॥गीतेंगातीउच्चस्वरें॥रागरागिणीसंयुक्त॥
१६॥रासमंडळींश्रमतांहरी॥गोपिकेच्चेअंकावरी॥मस्तकठेवूनिक्षणभरी॥विरामघेपरमात्मा॥१७॥तैशाचि-
गोपीनिश्चित॥श्रमहोतांअत्यंत॥मिठीघालुनीकृष्णाकंठांत॥चुंबनदेतीकौतुकें॥१८॥कृष्णाएकीच्यागालाव
र॥गालठेवूनिमनोहर॥मुखींतांबूलसुंदर॥अत्यादरेंअर्पितसे॥१९॥ऐसासमारंभपाहून॥गगनींदेवस्त्रि
याआपण॥मोहितहोऊनिनलगतांक्षण॥कामातुरजाहल्या॥२०॥चंद्रमाजाहलानभींस्थिर॥नक्षत्रांस
हितसाचार॥गोपींसवेंशार्ङ्गधर॥रमताजाहलायथासुखें॥२१॥गोपींसीश्रमहोतांफार॥घर्मबिंदुयेतीमु-
खावर॥तेपीतांबरेंश्रीकरधर॥मार्जनकरीकौतुकें॥२२॥ ॥श्लोक॥ ॥गोप्यःस्फुरत्पुरटकुंडलकुंतलत्विड्
गण्डश्रियासुधितहासनिरीक्षणेन॥मानंदधत्यऋषभस्यजगुःकृतानिपुण्यानितत्कररुहस्पर्शप्रमोदाः॥२२

टीका॥ ॥कृष्णहस्तस्पर्शेंकरूनिजाण॥आनंदितजाहल्यागोपीआपण॥कर्णींकुंडलेंदेदीप्यमान॥ज्यांच्यापू-र्णविराजती॥ २३॥नीलवर्णाकुंतलेंकरून॥कपोलींशोभादिसेजाण॥ज्यांच्यामुखींअमृतासमान॥अतिसुं-दरमंदहास्य॥२४॥त्यानेत्रकटाक्षेंअवलोकन॥करूनीहरीचाकरितीमान॥श्रीकृष्णाचरित्रेंपावन॥गातीसर्व-प्रेमोत्सवें॥२५॥स्थळक्रीडाकरूनीहरी॥जलक्रीडार्थगोपसुंदरी॥सवेंघेऊनियमुनोदरीं॥प्रवेशकरितजाहा-ला॥ २६॥जैसाकरेणुसहितवारण॥उदकींक्रीडाकरितोआपण॥तैसागोपींसहजनार्दन॥रमताजाहलाते-काळीं॥२७॥शुकासिबोलेविष्णुरात॥भगवान्धर्मस्थापनार्थ॥पृथ्वीवरीआविर्भूत॥खलनिग्रहाकारणें॥२८॥तोपूर्णकामअसतांआपण॥कसेंकरीपरदारागमन॥हासंशयकरानाशन॥कृपाकरूनीमुनिराया॥२९॥श्रीशु-कह्मणेरायासी॥श्रेष्ठकदाचित्धर्मातिक्रमासी॥करितीपरीतेतेजोराशी॥तेणेंत्यासीनबाधेतो॥३०॥तया-माजीभगवान॥सर्वगुणसंपन्न॥पुण्यपापतयालागुन॥लिळमात्रझगटेना॥३१॥सर्वभूतात्माहरी॥स्थाव-रजंगमींवासकरी॥अवतीर्णजाहलापृथ्वीवरी॥भक्तजनसौख्यार्थ॥३२॥असोब्राह्ममुहूर्तहोतांजाण॥ गो-पिकाकृष्णाज्ञाघेऊन॥पावल्याजाहल्यासदन॥ब्रह्मानंदेंकरूनिया ॥३३॥रासक्रीडाकरितांश्रवण॥हरिभ-क्तिप्राप्तहोयआपण॥हृद्रोगकामहोऊनिशमन॥पुरुषार्थचारीलाधती॥३४॥श्रीमद्भागवतसारामृत॥दश-मस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥त्रयस्त्रिंशाध्यायगोडहा॥ ॥३५॥ ३३॥ चतुस्त्रिंशाध्यायप्रा-रंभः॥ ॥श्लोक॥श्रीशुकउवाच॥ ॥एकदादेवयात्रायांगोपालाजातकौतुकाः॥अनोभिरनडुद्युक्तैःप्रययुस्तेंबिकावनम्॥१॥टीका॥एकदांगोपाळदेवयात्रेसी॥जातेजाहलेअंबिकावनासी॥परिवारेंकरूनीसौख्यरा

श्री ॥ कौतुकें करूनी राजेंद्रा ॥ १ ॥ तेथें समस्त करूनी स्नान ॥ धेनु अन्न आणि वसन ॥ करिते जाहले विप्रां दान ॥ संतर्पण सद्भावें ॥ २ ॥ रजनीमाजी व्रतधारण ॥ करूनी सरस्वती तटीं जाण ॥ निद्रा करिते जाहले आपण ॥ नंदादि गोपाळ ते ठायीं ॥ ३ ॥ होतां मध्यरात्रीचा अवसर ॥ निद्रित असतां समग्र ॥ एक मोठा अजगर ॥ येऊनि नंदा गिळितसे ॥ ४ ॥ चरणा कडून जाण ॥ करिता जाहला भक्षण ॥ तेव्हां नंद आक्रोशें करून ॥ हांका मारी समस्तां ॥ ५ ॥ गोपाळ होऊनि जागृत ॥ हातीं घेऊनि काष्ठें ज्वलित ॥ सर्पासी ताडिती त्वरित ॥ तरी तो मागें सरेना ॥ ६ ॥ तेव्हां नंद बोले वाणी ॥ धांव पाव गा चक्रपाणी ॥ सर्प गिळितो मज लागुनी ॥ सोडवीं येऊनी दातारा ॥ ७ ॥ यापरी परिसूनि त्याचें वचन ॥ श्रीहरी तेंसत्वर येऊन ॥ अजगरासी लाविला चरण ॥ तों नवल वर्तलें जाहलें ॥ ८ ॥ त्या सर्पदेहापासून ॥ एक पुरुष निघाला आपण ॥ लावण्यागार देवासमान ॥ वंदन करी श्रीहरीसी ॥ ९ ॥ श्रीकृष्ण विचारी तूं कवण ॥ येरू ह्मणे मी सुदर्शन ॥ नाम विद्याधर आपण ॥ सौंदर्यमदें मातलों ॥ १० ॥ विमानीं बैसूनि करितां भ्रमण ॥ अंगिराऋषी कुरूप पाहून ॥ गर्वें मीं केलें हास्यवदन ॥ तेणें शाप दिधला तेंव्हां ॥ ११ ॥ उःशाप मागतां वदला ॥ द्वापारीं श्रीकृष्ण पद तुजला ॥ स्पर्शतां ची पूर्वस्थाना ला ॥ शापमुक्त तूं जाशील ॥ १२ ॥ असो तो वरचा नोहे शाप ॥ त्वद्दर्शनें झालों निष्पाप ॥ आतां तूंचि माझा मायबाप ॥ आज्ञा पैं मज जावया ॥ १३ ॥ ऐसें बोलूनि विद्याधर ॥ स्वर्गासि जाता जाहला सत्वर ॥ नंद मुक्त ला पावूनि सुखकर ॥ कृष्णवैभव अवलोकी ॥ १४ ॥ अंबिकावनाहूनि सकळ ॥ गोपींसहित गोपाळ ॥ गोकुळीं येते जाहले तात्काळ ॥ अत्यानंदें करूनियां ॥ १५ ॥ एके दिवसीं सायंकाळीं ॥ बळिराम आणि वनमाळी ॥ चंद्रप्रभा पाहूनि नेत्रकमळीं ॥ वनामाजी पातले ॥ १६ ॥ श्रीकृष्ण करूनी मुरलीवादन ॥ गोपिकांसी करिता जाहला खूण ॥ मंजु-

ळध्वनीकरूनीश्रवण ॥ वनींपातल्यात्यासर्व ॥ १७ ॥ गृहकृत्यसोडूनिआपण ॥ गोपिकावनींआल्यातलगतांक्षण ॥ वन
वृक्षवल्लिसहितपूर्ण ॥ अवलोकनकरितीत्या ॥ १८ ॥ निबिडअत्यंतशोभायमान ॥ पाहूनिक्रीडतिवृंदावन ॥ राम-
कृष्णांसहसुंदरगायन ॥ करितीगोपीस्वानंदें ॥ १९ ॥ कामोद्दीपनेंकरूनिजाण ॥ नानाविधविलासकरून ॥ रात्रींनिद्रा
कुलपूर्ण ॥ विश्रांतीघेतीसकळिक ॥ २० ॥ इतुक्यामाजीसत्वर ॥ शंखचूडनामेंधनदानुचर ॥ त्यामार्गेंयेऊनिसाचा
र ॥ गोपीसुंदरअवलोकी ॥ २१ ॥ तोह्मणेआपुल्यामनांत ॥ यास्त्रियानेऊनिस्वर्गांत ॥ उपभोगूनिसमस्त ॥ मनकाम
नापुरवीनमी ॥ २२ ॥ ऐसानिश्चयकरूनीसाचार ॥ तोव्याघ्रासमानभयंकर ॥ गोपीपाहूनिसुकुमार ॥ घालूनिपुढें
धांववी ॥ २३ ॥ यापरीपाहूनिआकांत ॥ धांवाकरितीगोपीसमस्त ॥ रामकृष्णाहोहादुष्टछळीनिश्चित ॥ आह्मांरक्षावें
काळीं । २४ गोपीदीर्घस्वरेंबाहती ॥ ऐसेंऐकूनिश्रीपती ॥ रामासहजाऊनिदुर्जनाप्रती ॥ अकस्मातआडवी ॥ २५ ॥ गो
पींचेंकरावयारक्षण ॥ रामासीठेवीमनमोहन ॥ आपणशंखचूडासिगांठून ॥ देहापासूनशिरसोडवी ॥ २६ ॥ तया-
चेंमुकुटासीमणी ॥ अमूल्यहोतातोदेखुनी ॥ घेऊनियांचक्रपाणी ॥ रामाकारणेंअर्पीतसे ॥ २७ ॥ समस्तांसीजाहला
आनंद ॥ शेषरात्रीपाहूनिगोविंद ॥ तोकाननींसंपवूनिस्वच्छंद ॥ व्रजामाजीपातला ॥ २८ ॥ नित्याप्रमाणेंप्रातःकाळीं ॥
गोपाळघेऊनिवनमाळी ॥ धेनूचारावयारानोमाळीं ॥ रामासहितपैंगेला ॥ २९ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशम-
स्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ चतुस्त्रिंशाध्यायगोडहा ॥ ३० ॥ ३४ ॥ पंचत्रिंशाध्यायप्रारंभः
श्रीशुकह्मणेभारता ॥ श्रीकृष्णाविपिनींगेलाअसतां ॥ विरहक्रमणार्थवेणुगीता ॥ गोपीगातीमिळूनियां ॥ १ ॥ श्लो
क ॥ गोप्यऊचुः ॥ ॥ वामबाहुकृतवामकपोलोवल्गितभ्रुरधरार्पितवेणुम् ॥ कोमलांगुलिभिराश्रितमार्गंगोप्यईरय

तियन्नमुकुंदः॥२॥ टीका ॥सख्यानोकृष्णाआपुला॥वामस्कंधींडावियागाला॥ठेवूनिभोंवयानाचवीतभला॥वेणुधरीअधरोष्ठीं॥२॥त्यावेणूचेछिद्रावर॥कोमलकरांगुलीरुचिर॥ठेवूनिजेव्हांमनोहर॥वाजवीस्फस्वरवृंदावनीं॥३॥
तैंदेवस्त्रियापतीसहित॥विमानीबैसूनिगगनांत॥भ्रमणकरितांऐकतीगीत॥सुंदरवेणूचेंसद्भावें॥४॥त्याहीहोतीमोहितजाण॥ऐसाकृष्णाविरहगहन॥कैसाकरावासहन॥तेंचिसांगालवलाहें॥५॥हेस्त्रियानोपरिसासत्वरी॥वनींपावावाजवीहरी॥नंदनंदनतापसंहरी॥आर्तजनांचेजेधवां॥६॥वेणुगीतकरितांश्रवण॥व्रजवृषभधेनुहरिण॥करीतअसतांतृणचर्वण॥उभारूनिकर्णचित्रवत॥७॥हेसखिबळरामासहित॥कृष्णमयूरपिच्छेंविराजित॥कोमलपल्लवेंकरूनियुक्त॥मल्लवेषसाजिरा॥८॥मुरलीकरूनीवादन॥धेनूंसीपाचारीमनमोहन॥तेंगीतकरितांवनींश्रवण॥चमत्कारबहुहोती॥९॥यमुनेचीगतीकुंठित॥होऊनिस्थिरतनाराहेउदकांत॥प्रभंजनबैसलानिवांत॥निजव्यापारसोडूनियां॥१०॥वृक्षवल्लीप्रफुल्लितहोऊन॥मधुधारास्रवतीआपण॥श्रीकृष्णभ्रमरगीतऐकून॥तद्वतगायनकरीजेव्हां॥११॥तैंसारसहंसादिपक्षीसकळ॥मोहितहोऊनितात्काळ॥येतीश्रीहरीजवळ॥कायचमत्कारसख्यानो॥१२॥ऐसाविरहमहान॥बाईनकरवेकिमपिसहन॥आणिकएकसांगतेंखूण॥तेचिजीवींधरातुह्मी॥१३॥याव्रजाचेंदैवत॥गोपाळकृष्णनंदसुत॥रामासहितमालायुक्त॥विलसेजेंगिरितटीं॥१४॥
तेव्हांत्यावेणुनादेंकरून॥विस्मयहर्षितजाहलेंजाण॥तेव्हांमेघशंकितहोऊन॥मंदगर्जनकरीतसे॥१५॥पुष्पवृष्टीकरूनिपूर्ण॥श्रीहरीवरीछत्रआपण॥जाहलानलगतांक्षण॥तद्विरहसहनकरवेना॥१६॥ ॥श्लोक॥॥
विविधगोपचरणेषुविदग्धोवेणुवाद्यउरुधानिजशिक्षाः॥तवसुतःसतियदाधरबिंबेदत्तवेणुरनयत्स्वरजातीः॥

१४॥ टी०॥ हेसाध्वीयशोदेपरिसेंमात॥गोपांच्यानानाविधक्रीडांत॥अतिनिपुणतुझासुत॥शास्त्रसंगीतजाणत-
से॥१७॥जेव्हांअधरोष्ठांवर॥घेऊनिमुरलीमनोहर॥वादनकरीश्यामसुंदर॥तेव्हांचमत्कारहोयबहु॥१८॥ तें
वेणुगीतकरूनीश्रवण॥शिवब्रह्मामघवाआपण॥नम्रकरूनियांकंठमन॥ह्मणतीउत्तमयादवेंद्रा॥१९॥शेवटीं
होऊनिमोहित॥स्वस्थानींबैसतीनिश्चित॥यापरीकृष्णविरहदुरत्ययबहुत॥सहनकैसाकरणेंहा॥२०॥ हेसखी
कृष्णनाथ॥ध्वजवज्रादिचिन्हींमंडित॥व्रजमहीवरीयेतसेनिश्चित॥चरणकमळेंजेधन्नां॥२१॥तेव्हांवेणुक-
रितांवादन॥धांवूनिव्रजस्त्रियायेतीआपण॥कराव्याश्रीहरिदर्शन॥अंतरींमदनपीडिता॥ २२॥दर्शनहोतां
मार्गावरी॥तटस्थहोतीवृक्षापरी॥त्याचाविरहहाकैसातरी॥सहनकरावासखियानो॥२३॥ ॥श्लोक॥ मणिध-
रःक्वचिदागणयन्गामालयादयितगंधतुलस्याः॥ प्रणयिनो ऽनुचरस्यकदांसेप्रक्षिपन्भुजमगायतयत्र॥ १८॥
टीका॥ ॥कोणेदेशींजनार्दन॥मणियुक्तमालाकरूनिधारण॥करीतअसतांगोगणन॥सुगंधतुलसीसहशोभे
२४॥ एकहस्तगोपस्कंधावरी॥ठेवूनियांदानवारी॥मुरलीलावूनिअधरीं॥मधुरगायनकरीजेव्हां॥२५॥तेंवेणु
शब्दकरूनिश्रवण॥कृष्णसारकांताआल्याधांवून॥गोपीसमपतिगृहाशासोडून॥कृष्णाचरणींस्थिरावल्या॥२६
माधवविरहपरोपरी॥नसाहवेयासंसारीं॥गोपगोधनवेष्टितमुरारी॥यमुनाविहारकरीजें॥२७॥तेव्हांमल
यसंबंधीसमीर॥येऊनिसन्मानीजगदीश्वर॥पुष्पवृष्टिकरितीसुरवर॥वाद्यगीतेंउपासिती॥२८॥ऐसासु-
कुमारनारायण॥याचाविरहआम्हांलागुन॥होईलकैसातरीसहन॥सत्यसांगासाजणीहो॥२९॥याप्रकारें-
करून॥कृष्णलीलागानेंचिजाण॥दिनावसरअतिक्रमण॥करित्याजाहल्यागोपिका॥३०॥श्रीमद्भागवतसा-

रामृत ॥ दशमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ पंचत्रिंशाध्यायगोडहा ॥ ३१ ॥ ३५ ॥ षट्त्रिंशा-
ध्यायप्रारंभः ॥ ॥ रायासिबोलेयोगीश्वर ॥ वृषभरूपेंअरिष्टासुर ॥ वृंदावनींआलासत्वर ॥ चरणेंपृथ्वीविदा
रित ॥ १ ॥ महीहोयकंपायमान ॥ तीक्ष्णशृंगेंउभारूनिआपण ॥ शब्दकरिताजाहलामहान ॥ गर्भपतनहोयते-
णें ॥ २ ॥ असोतयापाहूनित्वरित ॥ गायीगोपाळभयाभीत ॥ होतेजाहलेसमस्त ॥ म्हणतीरक्षींगोविंदा ॥ ३ ॥
यापरीऐकूनिदीनवाणी ॥ दंडयोपटीचक्रपाणी ॥ वृषभासन्मुखउभाराहुनी ॥ युद्धकरीत्यासवें ॥ ४ ॥ बाहूठो-
कितांसर्वेश्वर ॥ शब्दजाहलाभयंकर ॥ तेणेंदैत्यकोपूनिघोर ॥ सन्मुखआलात्याकाळीं ॥ ५ ॥ देवेंत्याचींशृंगेंध
रून ॥ मागेंसारिलाकोपेंकरून ॥ तोगेलाअष्टादशचरण ॥ नंतरउलथूनिपडियेला ॥ ६ ॥ मगकृष्णेंपदेंरगडून-
वस्त्रापरीपिळिलातोजाण ॥ तेणेंदैत्यगतप्राण ॥ होऊनिमहीवरीपडियेला ॥ ७ ॥ पुष्पेंवर्षतीअमरगण ॥ गो
पाळकरितीश्रीहरिस्तवन ॥ गोकुळींप्रवेशेभगवान ॥ सरामगोगोपवेष्टित ॥ ८ ॥ यमपुरागेलियाअरिष्टासुर ॥
येरीकडेमथुरेंतसत्वर ॥ येताजाहलाविधिकुमर ॥ कंसभेटीकारणें ॥ ९ ॥ यथासांगकरूनीपूजन ॥ नारदाआस
नींबैसवून ॥ हस्तजोडुनिकंसआपण ॥ बोलेवर्तमानसांगावें ॥ १० ॥ ऐसीऐकूनियांवाणी ॥ नारदबोलेतयेक्षणीं ॥
नंदगोकुळींरामकृष्णदोनी ॥ वसुदेवपुत्रअसतीते ॥ ११ ॥ तयानींमारिलेतुझेअसुर ॥ कायपाहसीचमत्कार ॥ ऐं-
सेंऐकूनिवचनसार ॥ खळमानसींकोपला ॥ १२ ॥ खड्गघेऊनिपापराशी ॥ मारूंपाहेवसुदेवासी ॥ नारदनिवारू
नियांकंसासी ॥ हेंकायकरिसीभोजेंद्रा ॥ १३ ॥ नारदवाक्यासीदेऊनिमान ॥ वसुदेवदेवकींतेंआणून ॥ कारा
गारींशृंखळाघालून ॥ ठेविताजाहलाकंसतो ॥ १४ ॥ नारदपावलेअंतर्धान ॥ कंसकेशिदैत्यातेंबाहून ॥ म्हणेगो

कुळींत्यांजाऊन॥ रामकृष्णवधावे॥ १५ ॥ तदनंतर कंसासुर॥ सभा भरवूनि सत्वर॥ शलतोशलमुष्टिकचाणूर॥ पा चारूनि बोलेतयां॥ १६॥ ॥श्लोक॥ ॥नंदव्रजेकिलासातेसुतावानकदुंदुभेः॥ रामकृष्णौततोमह्यंमृत्युः किल निदर्शितः॥ २३॥ टीका ॥ वसुदेवपुत्र रामकृष्ण॥ नंदव्रजीं असती पूर्ण॥ आकाशवाणी करूनी मरण॥ माझें अ सेतयांकरीं॥ १७॥ तेयेथें आल्यावर॥ करावा तयांचा तुम्हीं संहार॥ मल्ललीलें करूनि सत्वर॥ पराजय करावा १८॥ मंचक करावे सुशोभित॥ सर्व पौरां बाहूनि त्वरित॥ तें कौतुक अवलोकनार्थ॥ सकळां होईल ऐसें करा॥ १९ गजकर्षका परिसें वचन॥ रंगद्वारीं प्रमत्त वारण॥ आणूनि कुवलयापीड जाण॥ संधि साधुनी अरि वधीं॥ २०॥ ध नुर्याग चतुर्दशीसी॥ आरंभावा उत्सवेंशीं॥ रामकृष्णा पशुप्रसूत राजासी॥ अर्पण करूं या मिषें॥ २१॥ या परी सचिवां सी निश्चित॥ आज्ञा करूनियां त्वरित॥ अक्रूरा पाचारी भोजनाथ॥ परम स्नेहें करूनियां॥ २२॥ करा माजी घालूनी कर॥ तया बोले उग्रसेनकुमर॥ तूं महाभाग्यशाली दानशूर॥ मित्रत्व माझें करीं बा॥ २३॥ अक्रूरा परिसें वाणी वृष्णिभोजकुळांत कोणी॥ कार्य करणारा अन्य प्राणी॥ तुजवांचुनी बा नसे॥ २४॥ स्वकार्या करितां जाण॥ करितों आश्रय तुझा महान॥ जैसा इंद्र स्वतः समर्थ असून॥ विष्णुआश्रयें कार्य करी॥ २५॥ आतां तूं व्रजांत जाऊन॥ मथुरे आणी रामजनार्दन॥ करवूनि रथारोहण॥ धनुर्याग पहावया॥ २६॥ त्याचे हस्तें माझें मरण॥ देवीं योजिलें असे पूर्ण॥ म्हणूनि तयां आणिं सोपायन॥ नंदादि गोपांसहित॥ २७॥ रामकृष्ण येथें आल्यावर॥ गजेंद्रहस्तें संहार॥ करवीन अथवा वांचले जर॥ मल्ललीलें त मारीन मी॥ २८॥ उभयांचा केलिया घात॥ वसु देवजी त्याचा तात॥ वृष्णिभोज वृद्ध समस्त॥ राज्यकामुक ममपिता॥ २९॥ यासकळांसी पाहीं॥ विलंब न ला

गतांकांहीं ॥ वधूनमीलवलाहीं ॥ निष्कंटकमहीभोगीन ॥ ३० ॥ जरासंधमाझागुरुवर ॥ महाबलाढ्यद्विविदवान-
र ॥ नरकशंबरबाणासुर ॥ हेत्रिमाझेप्रियसखे ॥ ३१ ॥ देवपक्षींचेराजेसमस्त ॥ वधूनिपृथ्वीयथास्थित ॥ भोगी-
नमीभोजनाथ ॥ अत्यानंदेंकरूनियां ॥ ३२ ॥ हेंजाणूनिअक्रूरासत्वर ॥ आणींरामकृष्णदोघेकुमार ॥ धनुर्मखअवलो
कनार्थसुंदर ॥ यदुपुरींशीघ्रघेऊनिये ॥ ३३ ॥ अक्रूरह्मणेकंसराया ॥ भावीसंकल्पकरिसीवांयां ॥ सूक्ष्मपरिहारका
रणसखया ॥ सुख्यएकदैवअसे ॥ ३४ ॥ साध्यासाध्यप्रकार ॥ दैवाधीनअसेसाचार ॥ व्यर्थमनोरथकरितीनर ॥ ह
र्षशोकांकारणें ॥ ३५ ॥ ऐसेंआहेकंसातरी ॥ तुझीआज्ञामान्यशिरीं ॥ ऐसेंबोलूनियांसत्वरी ॥ स्वगृहींगेलातेध-
वां ॥ ३६ ॥ स्वगृहींकंसहीपातला ॥ पुढेंकायवृत्तांतजाहला ॥ श्रीशुकह्मणेराजियाला ॥ सावधानेंपरिसावें ॥ ३७
श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ षट्त्रिंशाध्यायगोडहाः ॥ ३८ ॥
३६ ॥ ॥ सप्तत्रिंशाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्रीशुकह्मणेपरीक्षिती ॥ केशीदैत्यहयाकृती ॥ होऊनिवृंदावनाप्रती ॥
अकस्मातपातला ॥ १ ॥ तेथेंशब्दकरीदारुण ॥ भयभीतजाहलेलोकऐकून ॥ यापरीपाहूनिनारायण ॥ स-
न्मुखउभाराहिला ॥ २ ॥ सन्निधजाणूनियांहरी ॥ दैत्यतेधवांलाथामारी ॥ ऐसेंपाहूनितेअवसरीं ॥ कायकरीप-
रमात्मा ॥ ३ ॥ पृष्ठभागींचेउभयचरण ॥ धरूनीकरवीतयासीभ्रमण ॥ तोगेलाशतधनुष्येंआपण ॥ सावधहोउनी
धांवेपुन्हा ॥ ४ ॥ सरसावलाक्रोधेंकरून ॥ तेधवांपसरूनिआत्मवदन ॥ ऐसेंकरूनिअवलोकन ॥ मुखांतहस्तहरि
घाली ॥ ५ ॥ दैत्यमुखींकरघालितां ॥ अग्नीसमानजाहलातत्वतां ॥ तेणेंत्याचावायुरुद्धहोतां ॥ करचरणझाडीते
धवां ॥ ६ ॥ लीदकरूनियांजाण ॥ शेवटींसोडिलादैत्येंप्राण ॥ स्वर्गस्थदेवतोषमानून ॥ पुष्पवृष्टिबहुकरिती ॥ ७ ॥

नंतरयेऊनीनारदआपण ॥ करूनीश्रीहरीचेंस्तवन ॥ बोलतेजाहलेभविष्यपूर्ण ॥ तेंचिराजापरिसेंतूं ॥ ८ ॥ उद-
योकिंवापरवांआपण ॥ चरित्रकरालजेंपावन ॥ तेंआह्मीकरूंअवलोकन ॥ दृष्टीकरूनगोविंदा ॥ ९ ॥ कंसधनुष्य
भग्नकरून ॥ मारालकुवलयापीडवारण ॥ रंगींहरूनिमल्लप्राण ॥ कंसावधालशेवटीं ॥ १० ॥ नंतरसोळासहस्रए-
कशत ॥ अष्टराजकन्यापाहूनिपुनीत ॥ विवाहकरालनिश्चित ॥ कल्पवृक्षआणालस्वर्गींचा ॥ ११ ॥ स्यमंतकमणी-
जांबुवती ॥ सहितआणालगृहाप्रती ॥ नृगराजासीमोक्षगती ॥ सहजद्यालमुकुंदा ॥ १२ ॥ यमपुरींजाऊनिआपप-
ण ॥ मृतपुत्रविप्राकरालदान ॥ पौंड्रकवधकाशीपुरीदीपन ॥ दंतवक्त्रनिधनतयापरी ॥ १३ ॥ राजसूययज्ञामाजी
जाण ॥ करालशिशुपालशिरच्छेदन ॥ आणिकअनंतविक्रमपूर्ण ॥ द्वारकेंतकरालतुह्मी ॥ १४ ॥ हेकालस्वरूपाअ-
र्जुनसारथी ॥ होऊनिअक्षौहिणीवधनानायुक्ती ॥ करालतेंपाहूंपुढतीं ॥ आपुल्यादृष्टीकरूनियां ॥ १५ ॥ विज्ञा
पनाकरूनीत्वरित ॥ नमनकरूनीविधिसुत ॥ जाताझालाहरिगुणगात ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ १६ येरीकडेरामचक्रपाणी ॥ गो
पांसहितवृंदावनीं ॥ गोधनेंचारीतकौतुकेंकरूनी ॥ क्रीडाकरितीगिरितटीं ॥ १७ ॥ तेंकृत्रिमगोपवेषेंव्योमासुर ॥ ये
ऊनिखेळेमनोहर ॥ कपटेंगायीगोपकुमर ॥ गुहेंतनेऊनिसांठवी ॥ १८ ॥ तेंकपटजाणूनिहरी ॥ दैत्यावधीतेअ-
वसरीं ॥ गायीगोपाळपर्वतोदरीं ॥ शोधूनिबाहेरीकाढीतसे ॥ १९ ॥ फोडूनियांद्वारपिधान ॥ गोपांकरूनीबंध-
मोचन ॥ पुण्यकीर्तिपद्मलोचन ॥ व्रजीप्रवेशेत्यांसवें ॥ २० ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंधपरमपु-
नीत ॥ प्राकृतसरवारामविरचित ॥ सप्तत्रिंशाध्यायगोडहा ॥ २१ ॥ ३७ ॥ अष्टत्रिंशाध्यायप्रारंभः ॥ ॥ कं
साज्ञाघेऊनिसत्वर ॥ गोकुळासीजावयाअक्रूर ॥ निघालाबैसूनिरथावर ॥ लवलाहेंतेधवां ॥ १ ॥ मार्गांमा

ळीसाचार ॥ करिताजाहला विचार ॥ आजमाझें भाग्यथोर ॥ परमेश्वरपाहीनतो ॥ २ ॥ कायमाझें पूर्वपुण्य ॥ अथवाअसेतपसाधन ॥ किंवाकेलेंयोगधारण ॥ ह्मणूनिऐसेंघडतसे ॥ ३ ॥ आसक्तअसतांसंसारीं ॥ आतांपाहीनश्रीहरी ॥ संगृहीतपातकेंजन्मांतरीं ॥ सर्वनष्टहोतील ॥ ४ ॥ माझेंजन्मबहुतसफळ ॥ वंदीनकृष्णाचेंचरणकमळ ॥ कंसेंअनुग्रहकेलानिर्मळ ॥ ह्मणूनिऐसेंहोतसे ॥ ५ ॥ ब्रह्मादिकरितीज्याचेंचिंतन ॥ तोपाहीननारायण ॥ गोचारणार्थजोकानन ॥ गोपांसहपहातसे ॥ ६ ॥ सुकपोलनासिकसरळ ॥ मुकुंदमुखारविंदसोज्वळ ॥ पाहीनआतांनलगतांवेळ ॥ कींहेदक्षिणमृगजाती ॥ ७ ॥ स्वेच्छेंकरूनीमुरारी ॥ पृथ्वीवरीजोअवतारधरी ॥ मानवत्वस्वयेंअंगिकारी ॥ भारहरणास्तवराजेंद्रा ॥ ८ ॥ वासुदेवकमलनयन ॥ घेईनत्याचेंमीदर्शन ॥ जोपाहेकार्यआणिकारण ॥ आत्मासर्वभूतांचा ॥ ९ ॥ असूनिअहंकाररहित ॥ नानाकर्मेंगोपिकागृहांत ॥ करितोलीलार्थपुनीत ॥ आसक्तापरीसर्वदा ॥ १० ॥ याचेगुणकर्मजपतां ॥ भक्तियुक्तवाचितां ॥ वाणीसहोयसफलता ॥ अन्यतलतांशवतुल्य ॥ ११ ॥ ब्रह्मादिकांचेंदैवतजाण ॥ जेंसदाशिवाचेंध्यान ॥ तोचियादवकुळींअवतीर्ण ॥ प्रस्तुतअसेगोकुळीं ॥ १२ ॥ तोमीपाहीनमनमोहन ॥ प्रभातींजाहलेशुभशकुन ॥ रामकृष्णांचेचरणवंदीन ॥ तेंशिरीहस्तहरीठेवीलकीं ॥ १३ ॥ मीकंसदूतजाणूनिमनीं ॥ शत्रुबुद्धिनधरीलचक्रपाणी ॥ सर्वज्ञसर्वसत्तात्मक जनीं ॥ प्रगटमहाविष्णूतो ॥ १४ ॥ जेव्हांसीअंजळीपुटजोडून ॥ उभाराहीनसन्मुखहोऊन ॥ तेव्हांमजलापाहूनभगवान ॥ ह्मणेलताताअक्रूराया ॥ १५ ॥ तेव्हांचमीधन्यतर ॥ होईनह्मणेवारंवार ॥ समानअसूनिपरमेश्वर ॥ भक्तांसिहोयफलद्रूप ॥ १६ ॥ कल्पद्रुमाचेपरी ॥ भजकांसरूपहोऊनिहरी ॥ वांछितकामनापूर्णकरी ॥ भेदाभे

दनाहींजया॥ १७ रायासिह्मणेश्रीशुक आयण॥मार्गींयापरीकरूनिचिंतन॥गोकुळामाजीश्वफल्कनंदन॥अ
स्तमानींपातला॥ १८॥ तेंव्रजभूमींतीलधूळी॥पाहूनिचिन्हितहरिपदकमळीं॥लोळेअक्रूरप्रेममेळीं॥रथा-
खालींउतरूनी॥ १९॥ तयेसमयींजाण॥बळरामासहभगवान॥करूलागलागोदोहन॥ऐसेंअक्रूरेंअवलो
किलें॥२०॥मगकरितांसाष्टांगवंदन॥श्रीकृष्णेंदिधलेंआलिंगन॥परस्परप्रेमाश्रुजीवन॥येऊनिकंठगहिंवरले
२१॥मीअक्रूरऐसेंवचन॥गद्गदेंवदवेनातयालागुन॥तेव्हांचक्रांकितहस्तेंकरून॥अभयदानदेतया॥ २२॥ब
ळरामइतुक्यांतयेऊन॥देताजाहलाआलिंगन॥उभयतांहस्तकींधरून॥सदनींअक्रूरआणिती॥२३॥आद-
रातिथ्यकरून॥ दिधलेंबहुगुणभोजन॥तांबूलगंधमाल्यपावन॥परमादरेंदिधलें॥ २४॥नंदबोलेअक्रूरासी-
कंसाश्रयेंसुखवनसेतुह्मांसी॥हिंसकरक्षापशूंसी॥तोयदूंसीतयापरी॥ २५॥नंदकृतपाहूनिसत्कार॥अक्रूरश्रमा
चाहोयपरिहार॥अग्रभागींहोऊनिसादर॥चरित्रपरिसेंपरीक्षिती॥ २६॥श्रीमद्भागवतसारामृत॥दशम
स्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥अष्टत्रिंशाध्यायगोडहा॥ २७॥ ८॥ एकोनचत्वारिंशाध्यायप्रा
रंभः॥ ॥राजापरिसेंसावधचित्त॥अक्रूरासिपुसतां कुशलवृत्त॥तोहरीसीसांगेकंसमत॥नारदोक्तसकळही॥
१॥वसुदेववधाचाउद्योग॥यादवांसीवैरप्रयोग॥सांगूनिह्मणेधनुर्याग॥मिषेंतुह्मांखवळबाहे॥२॥तैंनंदासि
ह्मणेश्रीपती॥कंसाज्ञाअसेयारीती॥शीघ्रचलावेंमथुरेप्रती॥गोरसउपायनेंघेउनी॥ ३॥व्रजनाथपरिसून-
निवचन॥बोलताजाहलागोपांबाहून॥गोरसघेऊनिउपायन॥शकटारूढसिद्धव्हा॥ ४॥राजाज्ञाअसेयाप-
री॥सत्वरयावेंमथुरापुरीं॥धनुर्यागपर्वपहावयाबरी॥संधिअसेगोपालहो॥ ५॥व्रजांतकराहेंघोषित॥

परिसूनिगोपाळकरितीतहूत॥रामकृष्णान्यावयामथुरेंत॥अक्रूरआलागोकुळीं॥६॥ऐसीवार्ताप्रसिद्धहोतां दुःखितहोतीगोपयोषिता॥ह्मणतीनिर्दयविधाता॥श्रीकृष्णावियोगकरवीहा॥७॥कोणीकृष्णाविरहेंकरून ॥ हृदयींतमसुरेंम्लान॥करूनिसोडितीश्वासउष्ण॥कोणांचींवसनेंगलितहोती॥८॥कोणीकृष्णाध्यानेंकरू न॥तन्मयजाहल्यायोग्यांसमान॥कोणीचित्रविचित्रहरिभाषण॥स्मरूनितन्मयजाहल्या॥९॥यापरीदुः खितहोऊन॥करित्याजाहल्यागोपीरुदन॥समस्तएकस्थळींयेऊन॥बोलतीत्याकरुणास्वरें॥१०॥हेवि- धेतुजलादयाकांहीं॥निजमानसींतिळतुल्यनाहीं॥मैत्रीकरूनिवियोगलवलाहीं॥बालवतह्याकरिसीतूं॥ ११॥विधात्याहेंकुंतलावृत्त॥मुकुंदवदनसुशोभित॥प्रदर्शनकरूनीअदर्शनत्वरित॥कैसाकरिसीनिष्ठुरा॥१२ अक्रूरनामेंअतिक्रूर॥तूंचिनेशीनंदकिशोर॥ज्याचेंलावण्यपाहूनिचतुर॥ह्मणतहोतोंतुजलागीं॥१३॥घे- ऊनिजातोसिआमुचाप्राण॥आमुच्यागोकुळींयेऊनिआपण॥आम्हांसीरामकृष्णावांचून॥एकक्षणयु- गसम॥१४॥कृष्णाचारावयागायी॥वनींजातांलवलाहीं॥त्याचेंमुखपाहूनिबाई॥आनंदहोयसमस्तां॥१५ गायीचारूनिअस्तमानीं॥व्रजांतयेतांमोक्षदानी॥मुखकेशगोरजानीं॥लिसबहुतविराजे॥१६॥श्यामसुंदर मनोहर।आमुचाप्राणनंदकिशोर॥वेणुनादकरितांमनोहर॥चित्तआसक्तहोयबहु॥१७॥मथुरेमाजीनारा- यण॥जातांपाहतीलपौरजन॥देवकीनंदनह्मणऊन॥आनंदहोईलसमस्तां॥१८॥आजिआमुचेंभाग्यहीन॥चांडाळराहुआलाआपण॥यासावयाकृष्णारोहिणीरमण॥ह्मणूनिअक्रूरानिंदिती॥१९॥निर्लज्जहो ऊनियांनारी॥रुदनकरितीतेअवसरीं॥ह्मणतीसदयहृदयापूतनारी॥कृपाकरीगुणागारा॥२०॥श्लो

क॥ ॥श्रीशुकउवाच ॥एवंब्रुवाणाविरहातुराभृशंव्रजस्त्रियःकृष्णाविषक्तमानसाः॥ विसृज्यलज्जांरुरुदुःस्मसुस्वरंगोविंददामोदरमाधवेति॥ २१ ॥ टीका ॥श्रीशुकम्हणेभारता॥त्याव्रजांतीलगोपकांता॥भावीकृष्णाविरहार्ता॥दुःखितभाषणेंकरितीबहू॥ २१॥निर्लज्जहोऊनिआपण॥करितीदीर्घस्वरेंरुदन॥ हे गोविंददामोदरमाधवायेऊन॥कृपाकरीसखयातूं॥ २२॥ प्रभातकाळींरथावरी॥बैसवूनिरामहरी॥नसांत्वूनगोपनारी॥अक्रूरमथुरेचालिला॥ २३॥नंदादिकगोवळ॥गोरसभरूनीतात्काळ॥ शकटारूढहोऊनिउतावेळ॥प्रयाणकरितेजाहले ॥२४ ॥रथचालिलात्वरेकरून॥गोपीबोलतीकरुणावचन॥कोणीपदरपसरून॥दानमागतीहरीचें ॥ २५॥कोणीयेऊनियुवती॥ कृष्णास्यंदनापुढेंपडती॥रथध्वजदिसेनानेत्रपातीं॥ म्हणूनिकित्येकपरतल्या॥ २६॥गोपीपातल्यागृहांतरीं॥ येरीकडेअक्रूरयमुनातीरीं॥वृक्षछायेमाजीसत्वरी ॥ विश्रामार्थरथस्थापी ॥ २७॥ वाजीसकरवूनिउदकपान॥रामकृष्णरथीबैसवून॥ यमुनोदकींकरावयास्नान जाताजाहलातेकाळीं॥२८॥तेथेंकरीअघमर्षण॥तोंपाहिलेरामजनार्दन॥उदकाबाहेरयेऊनिजाण॥ पाहेतोंरामकृष्णास्यंदनीं॥ २९॥रथावरीपाहूनिहरी ॥ विस्मितहोऊनिअंतरीं॥मागुतींअक्रूरजळांतरीं॥ अघमर्षणकरिताजाहला॥ ३०॥ बुडीमारितांजळांत॥चमत्कारदेखिलाअत्यद्भुत॥शेषशायीलक्ष्मीकांत॥पार्षदगणांसहविराजे॥ ३१॥ शिरींकिरीटकंठींवनमाळा॥पीतांबरधारीघनसांवळा॥कमळनेत्रचरणींकमळा॥सेवाकरीसद्भावें॥ ३२॥ शंखपद्मसुदर्शन॥गदाहस्तकींविराजमान॥नारदतुंबरुसनकसनंदन॥ब्रह्मादिस्तवितीजयातें॥ ३३॥ पाहूनअक्रूरयापरी॥ विस्मितहोऊनिनिजांतरीं॥करपुटजोडूनिस्तवनकरी॥तेंचिपरिसेंनृपराया॥ ३४ ॥श्रीमद्भागवत-

सारामृत ॥ दशमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ एकोनचत्वारिंशाध्याय गो० ॥ ३९ ॥ चत्वारिंशाध्याय प्रारंभः ॥

॥ हे श्रीकृष्णा मनमोहना ॥ साष्टांग वंदन करितों चरणा ॥ तव नाभिकमळीं पावना ॥ ब्रह्मदेव निपजला ॥ १ ॥ आणखी हरे हें जगत ॥ सर्व पंचमहाभूतें निश्चित ॥ तुझ्या अंगापासूनि होत ॥ जाणावया तुज असमर्थ ॥ २ ॥ तुझें ब्रह्मरूप जाणावयासी ॥ सामर्थ्य नसे वेदांसी ॥ तेथें यत्किंचित जीवांसी ॥ काय बा पुढ्या थागतो ॥ ३ ॥ याप्रकारें करूनी जाण ॥ तूं महापुरुष नारायण ॥ यास्तव योगी साधुजन ॥ करिती यजन तुझें बा ॥ ४ ॥ कर्मयोगी भावें करून ॥ नाना कर्मरूपें करिती यजन ॥ कोणी ज्ञानयोगी कर्मत्यागून ॥ ज्ञानें यजिती सर्वेश्वरा ॥ ५ ॥ शिवविष्णु दीक्षाधारी ॥ सद्भावें भजती नानापरी ॥ त्वदुक्त पंचरात्र विधानें सत्वरी ॥ यजन करिती पुरुषाद्या ॥ ६ ॥ हे रुद्र देवताउपासक ॥ तुझ्या मूर्ती मानूनि अनेक ॥ सर्वदेवता म्हणूनि चोख ॥ नारायणा तुज भजती ॥ ७ ॥ शिवोक्त मार्गें करून ॥ शिवरूपें करिती तुझें यजन ॥ नाना मार्गांचें पर्यवसान ॥ तुझे ठायीं श्रीहरी ॥ ८ ॥ जैशा पर्वतापासून ॥ सरिता होऊनि उत्पन्न ॥ पर्जन्ययोगें सागरीं आपण ॥ जाऊनि मिळती तद्वत ॥ ९ ॥ इंद्रादि देव तुजपासून ॥ उत्पन्न होऊनि आपण ॥ भक्तियोगें करूनी पूर्ण ॥ तुझे स्वरूपीं पावती ॥ १० ॥ मायागुणत्रय निश्चित ॥ आब्रह्मस्थावरपर्यंत ॥ तयामाजी ओतप्रोत ॥ भरूनि उरसी दशांगुळें ॥ ११ ॥ तूं भिन्नत्वें कोठें नाहीं ॥ सर्वदा परिपूर्ण पाहीं ॥ निर्गुणत्व सगुणत्व कांहीं ॥ भिन्न नसे गोविंदा ॥ १२ ॥ हे प्रभो अग्नि तुझें वदन ॥ पृथ्वी जाणा चरण ॥ साक्षात् सूर्यनारायण ॥ लोचन तुझे महाविष्णो ॥ १३ ॥ आकाश तुझें नाभिस्थान ॥ दशदिशा तुझे श्रवण ॥ स्वर्गलोक शिरस्थान भुजा देव परमेश्वरा ॥ १४ ॥ तुझी कुक्षी सम सागर ॥ प्राणबळ जाणा समीर ॥ रोम तुमचे साचार ॥ वृक्ष औषधी

सर्वही ॥ १५ ॥ तुझे केश मेघ जाण ॥ अस्थि नखें पर्वत पूर्ण ॥ दिवस रजनी पावन ॥ निमिषोन्मेष निश्चयें ॥ १६ ॥ लिंग तुझें प्रजापती ॥ पर्जन्य वृष्टि वीर्य निश्चिती ॥ चतुर्दश भुवनात्मक मूर्ती ॥ येणें परी श्रीधरा ॥ १७ ॥ तुवां सृष्टीची करूनी रचना ॥ तयामाजी नारायणा ॥ व्यापक होऊनि खेळ नाना ॥ करिसी सहज कौतुकें ॥ १८ ॥ औदुंबर फळामाजी जाण ॥ अनेक कीटक वसती आपण ॥ तद्वत लव तनू क्रीडास्थान ॥ अखिल ब्रह्मांडां ॥ १९ ॥ लोकशोक हरणार्थ ॥ अवतार धरिसी जगतांत ॥ तें यश गायन करितो समस्त ॥ जन आनंदें करूनियां ॥ २० ॥ नमो मत्स्यस्वरूपा मधुसूदना ॥ कैटभभंजना वाजिवदना ॥ नमो कमठा मंदरधारणा ॥ भूम्युद्धारा श्रीक्रोडा ॥ २१ ॥ अद्भुतविग्रहा नरहरी ॥ नमो वामना परशुधारी ॥ भार्गवरामा रावणारी ॥ श्रीरामचंद्रा तुज नमो ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नमस्ते वासुदेवाय नमः संकर्षणाय च ॥ प्रद्युम्नायानिरुद्धाय सात्वतांपतये नमः ॥ २१ ॥ टीका ॥ आतां सद्भावें अक्रूर ॥ चतुर्व्यूहरूपानें नमस्कार ॥ करितो तयाचा प्रकार ॥ सांग परिसें हे राजा ॥ २३ ॥ कृष्णा तूं वसुदेवनंदन ॥ म्हणूनि वासुदेव म्हणती जन ॥ तशीच बळराम संकर्षण ॥ प्रद्युम्न अनिरुद्धस्वरूपें ॥ २४ ॥ हीं चार रूपें घेऊन ॥ करिसी भक्तांचें परिपालन ॥ तुझे चरणीं माझें नमन ॥ सदा सर्वदा असो हें ॥ २५ ॥ नमो दैत्यनाशना बुद्धमूर्ती ॥ म्लेच्छमर्दना जगत्पती ॥ कल्कीस्वरूपा श्रीपती ॥ वंदन असो तव चरणा ॥ २६ ॥ हे जन तव मायामोहित ॥ कर्ममार्गें होती भ्रांत ॥ स्वप्नतुल्य देह असतां निश्चित ॥ सत्य त्यातें मानिती ॥ २७ ॥ तूं सर्वात्मा प्रियकर ॥ मज तुझा पडला विसर ॥ ममत्व जडलें असे फार दारा सुत गृहांवरी ॥ २८ ॥ अनाथ अपराधी ऐसा जन ॥ चरणा सन्निध पातला जाण ॥ कूर्मदृष्टीनें अवलोकन ॥ शीघ्र करी श्रीहरी ॥ २९ ॥ श्लोक ॥ नमस्ते वासुदेवाय सर्वभूतक्षयाय च ॥ हृषीकेश नमस्तुभ्यं प्रपन्नं पाहि मां प्र

णो॥ ३०॥श्रीमद्भागवतसारामृत॥दशमस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥चत्वारिंशाध्यायगोडहा॥३०
४०॥ ॥एकचत्वारिंशाध्यायप्रारंभः॥ ॥योगींद्रह्मणेभारता॥अक्रूरऐशीस्तुतीकरितां॥श्रीहरिरूपतत्वतां॥गुप्तजाह-
लें॥ १॥अदृश्यपाहूनिश्रीधर॥अक्रूरआलाजळाबाहेर॥अवशिष्टकर्मकरूनिसत्वर॥रथनिकटपातला॥ २॥पा
हूनितयासिह्मणेहरी॥अद्भुतकायदेखिलेंजळांतरीं॥अक्रूरह्मणेअद्भुतसर्वोपरी॥तुझेंगाचीरमाधवा॥ ३॥मीं
कायसांगावेंअधिक॥सर्वज्ञतूंचिजगन्नायक॥ऐसेंबोलूनिरथावरीदेख॥बैसूनिपुढतीचालिले॥ ४॥पंथक्रमि-
तांक्रमण॥अस्तमानहोतांरामकृष्ण॥पावलेमथुरासन्निधान॥परमानंदेंकरूनी॥ ५॥रामकृष्णांसीमार्गस्थजन
पाहतीहर्षेंउभेराहून॥होतीतत्काळप्रसन्नमन॥प्रेमोत्सवेंकरूनियां॥ ६॥इतुक्यामाजीनंदादिगोवळ॥मागूनि
आलेनलगतांवेळ॥पुरोपवनाजवळ॥प्राप्तजाहलेतेधवां॥ ७॥अक्रूरासिह्मणेकृष्णनाथ॥स्वगृहाजावेंरथासहि-
त॥आम्हीविश्रांतिघेऊनिकिंचित॥नगरपाहूंकौतुकें॥ ८॥ अक्रूरबोलेजोडूनिपाणी॥पुरप्रवेशातुह्मांवांचु-
नी॥करणेंअयोग्यह्मणूनी॥माझात्यागनकरावा॥ ९॥ बळरामनंदादिगोपाळें॥आपणघेऊनिसकळ॥माझें
गृहींवैकुंठपाळ॥येऊनिपावनकरावें॥ १०॥नवपदरजेंकरूनीजाया॥माझेंहोईलउद्धरणा॥भावेंकरीनपदक्षा
लन॥पितृसद्गतीकारणें॥ ११॥पूर्वींपदकमलबळीप्रक्षालितां॥सद्गतीपावलातत्वतां॥त्रैलोक्यपावनाचीसत्ता
तयामाजीअसेकीं॥ १२॥देवातुझेंचरणोदकशिरीं॥जटाजूटींशंकरधरी॥सगरसुतगेलेमोक्षपुरीं॥ऐसेंमाहा
त्म्यतयाचें॥ १३॥ऐसातूंनारायण॥देवाधिदेवसनातन॥तुझेचरणींसाष्टांगवंदन॥गोपाळकृष्णाअसोहें॥ १४॥
श्रीहरिह्मणेअक्रूरासी॥आधींवधूनिकंसासी॥नंतरसाग्रजतवसदनासी॥येऊनिप्रियकरीनबा॥ १५॥अक्रू

रपरिस्रूनिवाणी॥पुरप्रवेशकरूनीतेक्षणीं॥कृतकर्मकंसानिवेदुनी॥स्वगृहातेंपातला॥ १६॥रामकृष्णगोपांसहित॥अपराण्हकाळींनिश्चित॥प्रवेशकरितीमथुरापुरींत॥कुतुकेंकरूनीकुरुश्रेष्ठा॥ १७॥ ॥श्लोक॥ ददर्श तांस्फाटिकतुंगगोपुरद्वारांबृहद्धेमकपाटतोरणाम्॥ ताम्रारकोष्ठांपरिखादुरासदासुद्यानरम्योपवनोपशोभितास्॥ २०॥ टीका ॥नगरद्वारेंगृहद्वारें॥उंचस्फटिकमयगोपुरें॥नेत्रींसबाह्यांतरपरभारें॥सुवर्णकपाटेंअवलोकिलीं॥ १८॥ताम्रपित्तलधातुकरून॥धान्यशाळाकेल्याबंधन॥सभोंवतीखंदकसज्जीवन॥निकटउद्यानेंविराजती॥ १९॥ श्लोक॥ ॥सौवर्णशृंगाटकहर्म्यनिष्कुटैःश्रेणीसभाभिर्भवनैरुपस्कृताम्॥वैडूर्यवज्रामलनीलविद्रुमैर्मुक्ताहरिद्भिर्वलभीषुवेदिषु॥ २१॥ टीका ॥उभयांगींहेमपत्रचवाटे॥वेष्टितशोभतीगोमटे॥धनाढ्यसदनेंचोखटें॥पुष्पवाटीमनोहर॥ २०॥वैडूर्यमणीहिरेजाण॥स्फटिकमणीनीलपूर्ण॥प्रवाळमौक्तिकेंपंचरत्न॥वळचणीमाजीशोभती॥ २१ सुवर्णकुंभजळेंकरून॥युक्तकेलेद्वारींपूर्ण॥राजमार्गींविराजमान॥मखरेंतोरणेंदीसती॥ २२॥ ऐशानगरीमाजीजाण॥रामकृष्णप्रवेशकरितीआपण॥पुरस्त्रियाकरावयादर्शन॥सप्रेमेंयेतीतेकाळीं॥ २३॥ कृष्णदर्शनेंकरून॥पुरस्त्रियांचेमनामोहन॥होऊनिगेलेंदेहभान॥तन्मयजाहल्यापाहुनी॥ २४॥पुष्पवृष्टिकृष्णावरी॥गोपुराहूनिकरितीनारी॥तोंरजकदेखिलासमोरी॥सवस्त्रकंसनृपतीचा॥ २५॥तयासीह्मणेश्रीहरी॥वस्त्रेंदेबाझडकरी॥ऐकूनितोउत्तरकरी॥कायबोलसीगोंवळा २६॥॥हेउद्धतागिरिवनांत॥संचारकरणारागोपसुत॥राजवस्त्रांचीआशामनांत॥करिशीलज्जानसेतुज॥ २७॥राजदंडहोईलतुह्मांसी॥ऐसेंऐकतांहृषीकेशी॥कोपेंनिवटूनिरजकासी॥वस्त्रेंगोंवळांदेतसे॥ २८॥ पुढती

गमनकरितां ॥ तंतुवायपूजीकृष्णनाथा ॥ तयाच्यापाहूनिभावार्था ॥ पूर्णकामकेलातो ॥ २९ ॥ अग्रभागींजातांश्री
धर ॥ सुदामानामेंमाल्यकार ॥ सुगंधपुष्पेंकरूनीसाचार ॥ रमावरपूजीसप्रेमें ॥ ३० ॥ तयासीदेऊनिआशीर्वचन
सगोपालरामकृष्ण ॥ उपवनामाजीयेऊन ॥ वासकरितेजाहले ॥ ३१ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंधपर
मपुनीत ॥ प्राकृतसरवारामविरचित ॥ एकचत्वारिंशाध्यायगोड हा ॥ ३२ ॥ ४१ ॥ द्विचत्वारिंशाध्यायप्रारंभः
श्लोक ॥ ॥ श्रीशुकउवाच ॥ ॥ अथव्रजन्राजपथेनमाधवः स्त्रियंगृहीतांगविलेपभाजनाम् ॥ विलोक्यकुब्-
जांयुवतींवराननांपप्रच्छयांतींप्रहसन्रसप्रदः ॥ १ ॥ टीका ॥ रायासिबोलेयोगेश्वर ॥ कृष्णलीलामनोह
र ॥ श्रवणकरीबासत्वर ॥ प्रेमोद्गारमजयेती ॥ १ ॥ राजमार्गेंश्रीपती ॥ सरामगमनकरितांपुढती ॥ कोणीए-
कस्त्रीअवचिती ॥ अवलोकिलीत्रिवक्रा ॥ २ ॥ जीस्त्रीवयानेंतरुण ॥ रमणीयजयेचेंवदन ॥ तीकुब्जाघेऊनिचं
दन ॥ राजमंदिरींजातसे ॥ ३ ॥ ऐसेंपाहूनिनारायण ॥ मंदहास्यविनोदेंकरून ॥ करिताजाहलाभाषण ॥ काय-
तेंचीपरिसावें ॥ ४ ॥ हेस्त्रियेतूंकवणाचीकवण ॥ कोठेंजाशीघेऊनिचंदन ॥ हेंसुवासिकअनुलेपन ॥ आम्हांका
रणेंसमर्पी ॥ ५ ॥ ऐकूनिऐसेंबाक्यासी ॥ तोह्मणेमीकंसदासी ॥ त्रिवक्राचंदनरायासी ॥ विलेपनार्थहेंनेसें ॥ ६
यापरीकरूनीभाषण ॥ रामकृष्णांसीदिधलेंचंदन ॥ प्रसन्नहोऊनिभगवान ॥ अनुग्रहकरिताजाहला ॥ ७ ॥
श्लोक ॥ ॥ पद्भ्यामाक्रम्यप्रपदेद्व्यंगुल्युत्तानपाणिना ॥ प्रगृह्यचुबुकेऽध्यात्मसुदनीनमदच्युतः ॥ ७ ॥ टीका ॥
हरीनेंनिजपदांजाण ॥ कुब्जापदाग्रहृढधरून ॥ दोनअंगुलीउत्थकरून ॥ हनुवटीधरूनीउचलिली ॥ ८ ॥ ऐसें
करितांनमालनील ॥ जाहलीकुब्जासुंदरसरळ ॥ मदनमूर्तीपाहूनिव्याकुळ ॥ कामेंकरूनीजाहली ॥ ९ ॥ कुब्जा

बोलेजगन्नाथा ॥ त्यागूनिमजलाकेविंजातां ॥ माझ्यागृहाचलावेंआतां ॥ नवविरहार्तामीसत्य ॥ १० ॥ रामास-
मक्षवदेनारी ॥ गोपाळसुखपाहूनिसत्वरी ॥ मंदहास्येंमधुरोत्तरीं ॥ वदताजाहलातयेनें ॥ ११ ॥ मंजूभाषिणीपरि
सेंवचन ॥ कंसवधूनजेस्फलज्जन ॥ त्यांचेंकरूनिसमाधान ॥ तवमंदिरींयेईनसी ॥ १२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एष्या
मितेगृहंसुभ्रूःपुंसामाधिविकर्शनम् ॥ साधितार्थोऽगृहाणांनःपांथानांत्वंपरायणम् ॥ १२ ॥ ॥ टीका ॥
हेसुभ्रूपरिसेंवचन ॥ कंसवधआमदर्शन ॥ होतांचिपुढतीतुझेंसदन ॥ पाहीनजाणनिश्चयें ॥ १३ ॥ कारणअ-
गृहींआणिप्रवासी ॥ आह्मीयास्तवसौख्यराशी ॥ येथेंआश्रयनिश्चयेंसी ॥ आह्मांलागींतूंचिएक ॥ १४ ॥ मधु
रवाणीकरूनिजाण ॥ कुब्जेसीनिरोपदेऊन ॥ पुढेंघेतचालिलेपूजन ॥ पौरजनांचेंकुतूहलें ॥ १५ ॥ स्त्रियापाहू
निश्यामसुंदर ॥ मानसींहोतीकामातुर ॥ धनुस्थानपौरांसीसत्वर ॥ विचारीश्रीधरउत्कंठें ॥ १६ ॥ बहुपुरुषधनुर-
क्षण ॥ करितीऐसेंअवलोकून ॥ निवारितांहीश्रीरमण ॥ चापाजवळीपातला ॥ १७ ॥ वामहस्तेंसज्जकरून ॥ म
ध्यप्रदेशींकेलेंखंडन ॥ जैसाइक्षुदंडमोडीवारण ॥ सहजतहूतजाणिजे ॥ १८ ॥ तोधनुःशब्दगगनांत ॥ व्यास-
जाहलादशदिशांत ॥ श्रवणकरितांकंसमनांत ॥ भयभीतजाहला ॥ १९ ॥ धनुरक्षकअसुरजाण ॥ धांवलेहो
ऊनिकोपायमान ॥ रामकृष्णांधनुःशकलेंकरून ॥ कृतांतनगरापाठविती ॥ २० ॥ अद्भुतपाहूनिचमत्कार ॥ नाग
रिकह्मणतीश्यामगौर ॥ दोघेसकुमारपरमेश्वर ॥ भूभारहरणार्थप्रगटले ॥ २१ ॥ तोंजाहलाअस्तमान ॥ रामा
सहितभगवान् ॥ पावलाजाहलाशकटस्थान ॥ उपवनामाजीनेथवां ॥ २२ ॥ हस्तपादप्रक्षालन ॥ करूनिकृष्णा-
संकर्षण ॥ दुग्धान्नकरूनिभक्षण ॥ शयनकरितीकौतुकें ॥ २३ ॥ धनुर्भंगकरूनीजाण ॥ रक्षकांचेघेतलेप्राण ॥

ऐसें ऐकूनि वर्तमान ॥ कंस भयभीत मानसीं ॥ २४ ॥ तैं होती अनेक दुःशकुन ॥ आरसा पाहतां कंस आपण ॥ शरीर पाहे मस्तकावांचून ॥ तैसे द्विरूप रविशशी ॥ २५ ॥ छायेंत छिद्रें दिसती दारुण ॥ स्वप्नीं प्रेतालिंगन खरवाहन ॥ विषभक्षण तैलस्नान नग्न ॥ करूनि जाय दक्षिणेकडे ॥ २६ ॥ या दुष्टचिन्हें करूनि निश्चिती ॥ निद्रा न लागे कंसाप्रती ॥ श्रीशुक म्हणे परीक्षिती ॥ उत्सव प्रभातीं करवीतो ॥ २७ ॥ कोणी कंसदूत येऊन ॥ मल्लक्रीडेचें स्थान शोभित स्थान ॥ करिती तैसे किती एक जन ॥ नाना वाद्यें वाजविती ॥ २८ ॥ सेवकीं माळा पताका युक्त ॥ मखरें तोरणें पुष्पमंडित ॥ स्थळोस्थळीं लाविलीं बहुत ॥ मंच अलंकृत ते केले ॥ २९ ॥ माथुरदेशांतील चारी वर्ण ॥ मंचावरी बैसले येऊन ॥ तैसा कंस दुःखित असून ॥ प्रधानां सहित बैसला ॥ ३० ॥ त्याकाळीं मल्लवीरांसी ॥ रंगणीं उत्तेजन यावयासी ॥ उंचताल वरी वाद्यें सरिसीं ॥ वाजविती नरकोणी ॥ ३१ ॥ मोठे मोठे मल्ल जाण ॥ अलंकार भूषणें करूनि धारण ॥ समागमें आचार्य घेऊन ॥ रंगामाजी पातले ॥ ३२ ॥ सर्वांमाजी बलिष्ठ फार ॥ मुष्टिक कूट चाणूर ॥ शाल तोशाल महावीर ॥ येऊनि बैसले भीतरी ॥ ३३ ॥ नंदादि गोपाळ येऊन ॥ उपायनें कंसा अर्पून ॥ मंचावरी बैसले जाऊन ॥ कौतुकार्थ ते काळीं ॥ ३४ ॥ श्रीमद्भागवत सारामृत ॥ दशमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ द्विचत्वारिंशाध्याय गोड हा ॥ ३५ ॥ ४२ ॥ त्रिचत्वारिंशाध्याय प्रारंभः ॥ ॥ बळिराम आणि नारायण ॥ सारूनि स्नान भोजन ॥ मल्लवाद्यांचा शब्द श्रवण ॥ करूनि कौतुकार्थ निघाले ॥ १ ॥ समागमें घेऊनि गोपाळ ॥ रंगद्वारीं पातला वैकुंठपाळ ॥ तों कुवलयापीड अयुतनागबळ ॥ महावारण उभा पुढें ॥ २ ॥ गज कर्षकासी म्हणे हरी ॥ द्विरदवेगें मार्गें सारीं ॥ ऐसें न करितां ये अवसरीं ॥ कृतांतनगरी दाखवूं ॥ ३ ॥ या परी परिसूनि वा-

णी॥ महातकोपलानेक्षणीं॥ रामकृष्णांतेंलक्षूनी॥ गजअंगावरी लोटिला॥ ४ ॥ तोशुंडेनें धरीश्रीकृष्णा॥ तेंसुटू
निहरीत्याद्विरदना॥ करीहृदमुष्टिताडना॥ मगचरणातळींलपे॥ ५॥ हरीनदिसतांरागें॥ शुंडाफिरवूनिनागें॥
उदरीस्पर्शिलातोंमागें॥ निघूनिवेगेंपुच्छधरी॥ ६॥ ओढीमागेंशतहस्त॥ तेंफिरेतोउचलूनिहस्त॥ सर्वेंमुकुंदभ्र
मूनिव्यस्त॥ सन्मुखयेऊनिउभाराहे॥ ७॥ मगहाणोनियांपाणी॥ पळेसहसाचक्रपाणी॥ दाटूनिपडेधरणीं॥
सवेंउठूनिहोयपुढें॥ ८॥ गजावाटेपडलाहरी॥ ह्मणूनिभूमीसदंतमारी॥ नाहींऐसेंसमजोनकरी॥ कृष्णाव
रीपुन्हांधांवे॥ ९॥ श्रीकृष्णेंधरूनिरदन॥ सवेंचिपाडिलाउलथून॥ शुंडेवरीदेऊनिचरण॥ दंतउपटोनिघेतले
॥ १०॥ त्यादंतायुधेंकरूनिजाण॥ हत्तीमारिलानलागतांक्षण॥ दैत्याचेंकरूनिकंदन॥ सभेमाजीपातले॥ ११॥
हस्तकीघेऊनिगजदंत॥ येतीरामआणिभगवंत॥ तेंध्यानपरमसुशोभित॥ पाहतीजनसानंदें॥ १२॥ त्याकंसा
चेरंगणीं॥ शोभलाकैसाचक्रपाणी॥ जयाजैसाभावमनीं॥ तयातद्रूतगमलाहो॥ १३॥ श्लोक ॥ मल्लानाम
शनिर्नृणांनरवरःस्त्रीणांस्मरोमूर्तिमान्गोपानांस्वजनोसतांक्षितिभुजांशास्तास्वपित्रोःशिशुः॥ मृत्युर्भोजप
तेर्विराडविदुषांतत्त्वंपरंयोगिनांवृष्णीनांपरदेवतेतिविदितोरंगंगतःसाग्रजः॥ १७ ॥ टीका ॥ मल्लांसिवा
देवज्रापरी॥ सामान्यलोकांश्रेष्ठापरी॥ योषितांसीमन्मथापरी॥ भासताजाहलापरमात्मा॥ १४॥ नंदादि-
कांसीआप्तासमान॥ दुष्टराजांसीशास्तापूर्ण॥ वसुदेवदेवकीसीनंदन॥ कंसासिमृत्युगमेतो॥ १५॥ योगियां
सीपरमतत्त्वजाण॥ यादवांसीदेवतजनार्दन॥ अज्ञानीजनांसीगमेसान॥ परब्रह्मश्रीकृष्ण॥ १६ ॥ अग्रजा
सहितभगवान॥ रंगसमाजीपातलाआपण॥ ऐसेंपाहूनिसुंदरध्यान॥ सकळजनबोलती॥ १७ ॥ वसुदेव

गृहीं देवकीचे उदरीं ॥ महाविष्णु अवतार धरी ॥ नानाविध क्रीडा करी ॥ भूभारहरणार्थ निश्चयें ॥ १८ ॥ येणें पूतनाचक्रवात ॥ अर्जुनवृक्ष मोडिले त्वरित ॥ शंखचूड केशी खर कुश्चित ॥ आणिक बहुत वधियेले ॥ १९ ॥ दावानल करूनि पान ॥ वनीं केलें गोपाळरक्षण ॥ यमुनाजळांत कालियमर्दन ॥ गोवर्धन करीं धरियेला ॥ २० ॥ यापरी कृष्णाची लीलामृत ॥ त्रिजगामाजी असे विश्रुत ॥ श्रवणपठन करितां पुनीत ॥ प्राणिमात्र जाणिजे ॥ २१ ॥ याचें पाहूनि सुख सुंदर ॥ त्रिविधतापांचा होय परिहार ॥ याचा अग्रज राम गौर ॥ प्रलंब याणें वधियेला ॥ २२ ॥ वत्स बक केले गतप्राण ॥ ऐसें बोलती तेथ वांजन ॥ रामकृष्णांसी पाहून ॥ चाणूरमल्ल वदतसे ॥ २३ ॥ हे रामकृष्णा हो परिसा वचन ॥ वीरमान्य आहांत दोघेजण ॥ युद्धनिपुण कंसें जाणून ॥ तुह्मां कारणें पाचारिलें ॥ २४ ॥ राजांचें प्रिय करितां ॥ कल्याणप्राप्त होय तत्वतां ॥ तुह्मी नित्य अरण्यांत भिडतां ॥ मल्लयुद्धें गोपांशीं ॥ २५ ॥ आणि धेनु चारूनि आपण ॥ करितां भावें कालक्रमण ॥ तस्मात् आपण उभयतां जाण ॥ प्रिय करूं कंसाचें ॥ २६ ॥ भूतानुग्रह करणार ॥ सर्वभूतमय नृपवर ॥ ऐसें ऐकूनि वचन मधुर ॥ कृष्णनाथ वदे तदा ॥ २७ ॥ या राजियाच्या प्रजा आपण ॥ तुह्मी आह्मी दोघेजण ॥ काय करावें प्रियत्व पूर्ण ॥ तशांत आम्ही बाळकें ॥ २८ ॥ तुल्यबळिष्ठ वीर ॥ पाहूनि करणें संगर ॥ मल्लसभेमाजी साचार ॥ अधर्म ऐसा न करावा ॥ २९ ॥ यापरी ऐकूनि उत्तर ॥ काय बोले तो चाणूर ॥ रामकृष्णा हो तुह्मी बळसागर ॥ बालक नव्हा निर्धारें ॥ ३० ॥ कुवलयापीड वारण ॥ तुम्हीं मारिला न लागतां क्षण ॥ आणिक असुरांचे घेतले प्राण ॥ तें काय सुखें वर्णावें ॥ ३१ ॥ तस्मात् मजशीं बाहुयुद्धातें ॥ तूं योग्य आहेस निश्चित ॥ मुष्टिकासवें रोहिणीसुत ॥ युद्ध करील निर्धारें ॥ ३२ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सरवाराम विं

रचित॥त्रिचत्वारिंशाध्यायगोडहा॥३३॥ ॥४३॥ ॥चतुश्चत्वारिंशाध्यायप्रारंभः॥ ॥श्लोक॥ ॥श्रीशुकउवाच॥ ॥एवंचर्चितसंकल्पोभगवान्मधुसूदनः॥आससादाथचाणूरंमुष्टिकंरोहिणीसुतः॥१॥ टीका ॥श्रीशुकह्मणेपरीक्षिती॥संकल्पप्रेरयिताश्रीपती॥चाणूराकरवींवदवूनिपुढती॥संकेतेंयुद्धार्थऊठिला॥१॥तैसाचीरोहिणीसुत॥बळरामप्रतापवंत॥युद्धकरिताजाहलाअद्भुत॥मुष्टिकासवें॥२॥हस्तेंहस्तकरितीबंधन॥तैसेंचिचरणेंचरण॥जानूनेंजानुतूर्ण॥शिरींशिरउरउरीं॥३॥परस्परांचेंउत्थापन॥करितेजाहलेउन्नयन॥चालनकरूनिआकर्षण॥करितीपूर्णएकमेका॥४॥वज्रमुष्टीमस्तकधडका॥सक्रोधेंदेतीएकमेका॥करूपाहतोप्रणांतधोका॥येरयेरांरंगणीं॥५॥भ्रमणाकरितीचक्राकार॥करूनीबैठकावारंवार॥करमुद्गरतीक्ष्णप्रहार॥अपकारकारकबहुकरिती॥६॥रंगणीं तैं पाहूनिसमर॥नागरस्त्रियाबोलतीमधुर॥यासभेमाजीअधर्मफार॥होतोकायवदावें॥७॥अहोहामल्लचाणूर॥बलिष्ठजैसागिरिवर॥तयासवेंश्यामसुंदर॥सुकुमारहाकोणीकडे॥८॥बलाबलनेणूनिकांहीं॥केलीकैसीयोजनाही॥येथेंबैसणेंयोग्यनाहीं॥चलाबाईसदनाकडे॥९॥हेसखिशत्रुकृष्णावर॥धांवतोकोपेंकरूनिफार॥श्रमेंकरूनिघर्मसुखावर॥आलाकैसातोपहा॥१०॥कोणीबोलतीमधुर॥तोकायपहाचमत्कार॥युद्धकरितांरोहिणीकुमर॥आरक्तनेत्रजाहला॥११॥एकबोलतीवचनपरिसासाजणीवर्तमान॥याव्रजवासीजनांचेंपुण्य॥कितीह्मणूनिवर्णावें॥१२॥ ॥श्लोक॥ पुण्याबतव्रजभुवोयदयंनृलिंगगूढःपुराणपुरुषोवनचित्रमाल्यः॥गाःपालयन्सहबलःक्वणयंश्चवेणुंविक्रीडयांचतिगिरित्ररमार्चितांघ्रिः॥१३॥ टीका ॥त्याव्रजभूमीअत्यंत॥धन्यआहेतपुनीत॥कींजेथेंश्रीकृष्णावैकुंठनाथ॥पुरा

णपुरुषअसतांही ॥ १३ ॥ मनुजाकृतीनेंहोऊनिच्छन्न ॥ रामासहकरीगोरक्षण ॥ पादचारीज्याचेचरण ॥ शिवलक्ष्मीपूजिती ॥ १४ ॥ वनपुष्पेंविचित्रधारण ॥ करूनीश्रीहरीवेणुवादन ॥ करितांपाहतीजेजन ॥ अगाधपुण्यतयांचें १५ ॥ गोपिकामंथनाचेवेळीं ॥ गातीकृष्णकथाप्रातःकाळीं ॥ ज्यांचेध्यानींमनींवनमाळी ॥ म्हणूनिधन्यत्यासाऱ्या १६ स्त्रियांचीवाणीयापरी ॥ श्रवणकरूनीश्रीहरी ॥ रंगणींचाणूरासिमहीवरी ॥ आपटूनिमारीक्षणार्धें ॥ १७ ॥ बलभद्रेंमारिलामुष्टिक ॥ पाहूनिधांवलेकूटशलादिक ॥ तयांसीमारूनियांदेख ॥ रामकृष्णविजयीजाहले ॥ १८ ॥ तेंशेषमल्लकरितीपलायन ॥ मगगोपाळांसवेंक्रीडन ॥ करूनिदाखवीमनमोहन ॥ कंसालागींचमत्कार ॥ १९ ॥ तेव्हांसर्वआनंदती ॥ रामकृष्णप्रशंसिती ॥ कंसनिवारूनिवाद्यांप्रती ॥ स्वसेवकांसीआज्ञापी ॥ २० ॥ अरेयादुर्वृत्तवसुदेवकुमारां ॥ आतांपुराबाहेरसारा ॥ नंदाबांधूनिधनहरा ॥ वसुदेवमाराजिवेंशीं ॥ २१ ॥ ऐशींकंसोक्तिऐकतां ॥ कृष्णेंकेलीचपळता ॥ एकाएकींसिंहासनावरुता ॥ जाऊनिकंसझडपिला ॥ २२ ॥ मृत्युरूपकृष्णपाहूनिनयनीं ॥ कंसभयभीतमनीं ॥ खड्गचर्महस्तकीं घेऊनी ॥ मारावयात्यापाहे ॥ २३ ॥ तंवकोपूनिशार्ङ्गधर ॥ स्वहस्तेंशिखाआकर्षूनिसत्वर ॥ ओढीरंगणींतेंभयातुर ॥ कंसआपणचीनिमाला ॥ २४ ॥ सभेहाहाकारजाहला ॥ कंसतोहरिसारूप्यलाधला ॥ कींभयेंनिदिध्यासलागला ॥ सर्वदाचित्तींतयाचा २५ कंसबांधवयुद्धासिआले ॥ श्रीरामेंतेहीवधूनिटाकिले ॥ कंसस्त्रियाआक्रोशत्यावेळे ॥ करितीभर्ताकारणें ॥ २६ श्लो० हानाथप्रियधर्मज्ञकरुणानाथवत्सल ॥ त्वयाहतेननिहतावयंतेसगृहप्रजाः ॥ ४५ ॥ टीका ॥ ॥ हेनाथहेप्रियकरा ॥ हेधर्मज्ञाकरुणागारा ॥ तवमरणेंगृहप्रजादारा ॥ आह्मीमृतवतजाहलों ॥ २७ ॥ हेपुरुषश्रेष्ठाकंसराया ॥ तुजवांचूनिआम्हींवांया ॥ जाहलोंप्रजांसहनगराया ॥

शोभाकांहींदिसेना॥ २८ ॥श्रीशुकम्हणेरायासी॥ यापरीऐकूनिशोकासी॥श्रीकृष्णेंमातुळस्त्रियांसी॥अभयदानदीधलें॥२९॥ कंसाचेंपारलौकिककर्म॥करविताजाहलापुरुषोत्तम॥मातापितापूर्णकाम॥मुक्तकरीलवलाहें॥३०॥रामकृष्णजाऊनिआपण॥करितेजाहलेसाष्टांगवंदन॥वसुदेवदेवकीपाहून॥समाधानपावले॥३१॥वसुदेवदेवकीजाण॥रामकृष्णींपुत्रबुद्धित्यागून॥ साशंकहोऊनिआपण॥शेषनारायणत्यामानिती॥ ३२॥श्रीमद्भागवतसारामृत॥दशमस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसरवारामविरचित॥चतुश्चत्वारिंशाध्यायगोडहा॥ ३३॥ ४४ ॥ पंचचत्वारिंशाध्यायप्रारंभः॥ ॥यापरीनिजस्वरूपासी॥नातमाताजाणतीमानसी॥ऐसेंजाणूनमायापाशीं॥त्यात्घषीकेशीआच्छादी॥ १॥ मगमातापितरांसीवंदन॥करूनिबोलेश्रीकृष्ण॥तुमचेउदरींजन्मघेऊन॥नघडलीसेवाकांहींआम्हां॥ २॥ बाललीलावलोकनसुख॥आह्मांपासूनिक्षणएक॥लाधलेंनाहींहाशोक॥सर्वकाळपीडितो॥ ३॥ तुमच्यासन्निधवास॥घडलानाहींआह्मांस॥नकळेकेलेकायदोष॥पूर्वजन्मींपितरहो॥ ४ ॥ देहकरितीजेनिर्माण॥तयांमातापितरांचेंऋण॥शतवर्षेंफेडितांहीपूर्ण॥नव्हेअनृणकदापि॥ ५॥ कंसभयेंआजवरी॥तुमचीसेवाक्षणभरी॥नघडलीहासर्वपरी॥अपराधउदरींघालावा॥ ६॥ ऐशाश्रीहरिभाषितें॥मोहझालाउभयातें॥ अंकींआरोपूनिसुततातें॥वरीप्रेमाश्रुढाळिती॥७॥ यापरीसांत्वूनिपितरां॥हरीजायउग्रसेनमंदिरा॥म्हणेघेऊनिनृपाधिकारा॥प्रजाउदाराप्रतिपाळीं॥८॥ ययातीशापासुळेंसकळां॥यादवांनसेराज्यसोहळा॥माझ्याआज्ञेंअडथळा॥अणुमात्रतुह्मांनसे॥ ९ ॥मगउग्रसेनास्थापिलेंआसनीं॥ सर्वयादवआणिलेबाहूनी॥अखिलांआश्वासनदेऊनी॥मथुरेमाजीठेविले॥१०॥नंदासिम्हणेश्रीहरी॥कृपाअसोंद्यावीमजवरी॥सांभाळिलेंबाळकापरी॥

अनेककष्टसाहूनियां ॥ ११ ॥ आतांगोकुळासीजाऊन ॥ करावेंगोपींचेंसमाधान ॥ स्वस्थराहावेंऐसेंऐकून ॥ नंदादि-
गोकुळातेगेले ॥ १२ ॥ येरीकडेवसुदेवेंजाण ॥ केलेंगर्गाचार्यापाचारण ॥ प्राप्तहोतांमुहूर्तपाहून ॥ उपनयनेंके-
लीं ॥ १३ ॥ ब्राह्मणांसीदेऊनिवसन ॥ अलंकारदक्षिणासुवर्ण ॥ तैसेंकरूनितर्पण ॥ समस्तांससुखविलें ॥ १४
रामकृष्णासुदामाब्राह्मण ॥ ऐसेत्रिवर्गरथींबैसून ॥ अवंतिकापुरीमाजीजाऊन ॥ सांदीपिनीसनमितीते ॥ १५ ॥
शिष्यवृत्तीकरूनिधारण ॥ लोकसंग्रहास्तवआपण ॥ विद्याभ्याससंपूर्ण ॥ करितेजाहलेत्रिवर्गते ॥ १६ ॥ चवदा
विद्याचतुःषष्टिकला ॥ अवगतजाहल्यातेवेळां ॥ जैसाकरतळींचाआंवळा ॥ तद्वतअवगतव्याहोती ॥ १७ ॥ गुरू
सीह्मणेभगवान ॥ दक्षिणामागाआपण ॥ गुरुपत्नीबोलेवचन ॥ मृतपुत्रआणूनिपैंद्यावा ॥ १८ ॥ यापरीपं
रिसूनिवाणी ॥ यमलोकींगेलाचक्रपाणी ॥ कृतांतेंमस्तकठेवूनिचरणीं ॥ पूजनकेलेंसद्भावें ॥ १९ ॥ गुरुपुत्र-
दिधलाआणून ॥ तोघेऊनिनारायण ॥ अवंतिकापुरींयेऊन ॥ आचार्यासीअर्पीतसे ॥ २० ॥ सद्गुरुआज्ञाघेऊ
निश्रीपती ॥ रामासहितपुढती ॥ येताजाहलामथुरेप्रती ॥ आनंदसकळांजाहला ॥ २१ ॥ श्रीशुकह्मणेभारता
सावधपरिसेंश्रीहरिगाथा ॥ श्रवणपठणेंभवाचीचिंता ॥ जगतामाजीआतुडेना ॥ २२ ॥ श्रीमद्भागवतसारामृ
त ॥ दशमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ पंचचत्वारिंशाध्यायगोडहा ॥ २३ ॥ ४५ ॥ ॥ षट्चत्व-
त्वारिंशाध्यायप्रारंभः ॥ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशुकउवाच ॥ ॥ वृष्णीनांप्रवरोमंत्रीकृष्णस्यदयितःसखा ॥
शिष्योबृहस्पतेःसाक्षादुद्धवोबुद्धिसत्तमः ॥ १ ॥ टीका ॥ बृहस्पतीचाशिष्यसाक्षात ॥ उद्धवसुबुद्धिनिष्णात
कृष्णाचाप्रियमित्रपुनीत ॥ श्रेष्ठयादवसचिवजो ॥ १ ॥ ऐशाप्रियकरभक्तासी ॥ एकांतींबाहूनिहृषीकेशी ॥

बोलेजाऊनिगोकुळासी॥सुखवीसर्वांसीउपदेशीं॥२॥नंदयशोदागोपाळ॥गोपीविरहेंजाहल्याविव्हळ॥धेनुवत्सेंरानोमाळ॥भ्रमतीजळनेत्रांतरीं॥३॥मद्विरहेंगोपकांता॥दुःखितहोतीसमस्ता॥तयांचीव्हावयाशांतता
निरोपआतांकळवींबा॥४॥बापात्यागोपीमाझ्यास्तव॥तनूमाजीधरूनिजीव॥असतीत्यांसवासुदेव॥येईल
हाभावदर्शवीं॥५॥मीराहिलोंयेऊनिदूर॥म्हणूनिवाटेतयांहुरहुर॥मोहपावतीवारंवार॥साचप्रकारउद्धवा
६॥याकरितांजाऊनिआधीं॥गोपिकांचीनुरवीआधी॥ब्रह्मज्ञानकथूनिसाधी॥कार्यसमाधीलावींत्यां॥७॥श्री
शुकम्हणेनरपती॥यापरीपरिसूनिकृष्णोक्ती॥रथारूढहोउनिपुढती॥गोकुळाप्रतीनिघाला॥८॥अस्तमान-
होतांचिजाण॥गोकुळींप्रवेशलाउद्धवआपण॥गोरजेंव्रजसंपूर्ण॥गेलेंव्यापुनतेकाळीं॥९॥हृदयींआणूनि
कृष्णनाथ॥गोपगातीकृष्णलीलामृत॥वृषभांचींयुद्धेंबहुत॥आसमंतातंतेंहोतीं॥१०॥स्वेच्छेंकरूनिवासरें॥सैरावैरा
चक्राकारें॥भ्रमणकरितीनदुसरें॥कार्यबरेंतयांसी॥११॥कांहींवत्सेंइकडेतिकडे॥धांवतीवेडेंवांकुडें॥कोणीचाल
तानांपुढें॥कानवडेबहुहोती॥१२॥रामकृष्णांचेंचरित्र॥गोदोहनींगातीपवित्र॥गोपाळगोपीहीगृहींस्वतंत्र॥
असतांअन्यनेणती॥१३॥असोसूर्यधरामर॥हेपूजितीमनोहर॥गोपाळगृहींदैवतवर॥जेंसुखकरपूजकां॥१४
तैसींवनेंसुपुष्पित॥भ्रमरपक्षीयांहींयुक्त॥ऐसेंव्रजपाहूनिनिवांत॥उद्धवमनांतसुखावला॥१५॥उद्धवासी
पाहूनिनयनीं॥नंदआनंदलानिजमनीं॥आलिंगनसप्रेमेंदेउनी॥आणूनिआसनींबैसवी॥१६॥भोजनदेऊनि
रुचिर॥त्रयोदशगुणीतांबूलवर॥पादसंवाहनप्रकार॥करवीसत्वरपाहुण्या॥१७॥नंतरीनंदपुसेतयासी॥स
खावसुदेवस्वापत्यांशीं॥सुखीआहेकींमथुरेसी॥हेंचिआह्मांसीसांगावें॥१८॥कारणकंसेंबहुतछळिलें॥का

ळरूपें बाळां गिळिलें ॥ तेणें त्याचें चित्त पोळिलें ॥ नाहीं वळलें सौख्यार्थी ॥ १९ ॥ उद्धवा श्रीकृष्णासकुमार ॥ करितो काय वारंवार ॥ स्मरण आमुचें गोपकुमर ॥ धेनूवर लक्ष जयाचें ॥ २० ॥ वृंदावन गोवर्धनगिरी ॥ स्मरतो काय पूतनारी ॥ स्वजनास्तव येईल जरी ॥ पाहीन तरी मुखकमळा ॥ २१ ॥ दुरत्यय मृत्यूपासून ॥ कृष्णें केलें आमुचें रक्षण ॥ त्याचे पराक्रम हास्यवदन ॥ देती स्मरण उद्धवा ॥ २२ ॥ सर्व चरित्रें स्मरण होतां ॥ मनासी झगटे व्यग्रता ॥ हरिपदाध्वजवज्रांकुशयुता ॥ वनीं पाहतां तन्मय होय ॥ २३ ॥ कारण देवोत्तम विष्णु फणी ॥ प्रगटले दोघे या धरणी ॥ ऐसें मी मानिलें मनीं ज्यांची करणी अमानुष ॥ २४ ॥ नागायुतबळ कंस पाहीं ॥ असतां जैसा गरुडें अही ॥ धरावा तैसा लवलाही ॥ वधिला नाहीं विलंब ॥ २५ ॥ मारिला कुवलयापीडकरी ॥ चाणूरमुष्टिकमल्लअरी ॥ वधिले जो सप्तदिवस धरी ॥ गोवर्धनगिरी उद्धवा ॥ २६ ॥ तैसें ताल त्रय प्रमाणयुक्त ॥ कंसधनुष्य भंगिलें त्वरित ॥ प्रलंबादि दैत्यांचा निःपात ॥ केला क्षणांत जयानें ॥ २७ ॥ उद्धवा या कारणास्तव ॥ ब्रह्म सनातन वासुदेव ॥ जयाचे चरणीं ब्रह्मादि देव ॥ लागती सदैव अनुरागें ॥ २८ ॥ श्रीशुक म्हणे भारता ॥ या परी गोकुळनाथ बोलतां ॥ हृदयीं जाहली तन्मयता ॥ ती काय आतां वदावी ॥ २९ ॥ स्तब्ध बैसला गोपपती ॥ पुत्रसद्गुण यशोदा सती ॥ जाहली तेथ वांश्रवण करिती ॥ पान्हा स्तनीं दाटला ॥ ३० ॥ प्रीती पाहूनि यांपरी ॥ उद्धव बोले ते अवसरीं ॥ हे नंदा श्रवण करी ॥ धन्य म्हणूं वरी उभयतां ॥ ३१ ॥ तन मन आणि धन ॥ सर्वस्व केलें कृष्णार्पण ॥ काय आणिक तें साधन ॥ परमार्थी याहून वेगळें ॥ ३२ ॥ हे रामकृष्ण जगन्नाथ ॥ प्रगट जाहले भूभारहरणार्थ ॥ ज्यांचें स्मरण करितां त्वरित ॥ मोक्षप्राप्त प्राणियां ॥ ३३ ॥ तस्मात् त्या नारायणीं भाव ॥ ठेवूनि बैसला तंत स्वयमेव संसार कृत्यांत वासुदेव ॥ तुम्हांस देव दिसतो कीं ॥ ३४ ॥ नंदा कृष्ण व्रजांत सत्वर ॥ तोषवावया मातापितर ॥ शी-

घ्रमागुतीयेणार॥सत्यकरणारसंकल्प॥३५॥महाभागकृष्णनाथ॥नांदेसर्वभूतांच्याहृदयांत॥जैसाकांअग्निकाष्ठांत॥तेंवींव्यापकअसेसदा॥३६॥तोपरमात्मानिरहंकारी॥प्रियाप्रियपदार्थसंसारीं॥जयानसतीनिर्धारीं॥ऐसाश्रीहरीअद्वैत॥ ३७॥ ॥श्लोक॥ ॥नमातानपितातस्यनभार्यानिसुतादयः॥नात्मीयोनपरश्चापिनदेहोजन्मएवच॥३८॥ टीका ॥मातापिताभार्यासुत॥कृष्णासीनाहींतनिश्चित॥तथापिसद्रक्षणाकमळाकांत॥देवादियोनींतअवतरे॥३८॥स्वयेंनिर्गुणअसतांहरी॥भक्तांस्तवसगुणत्वधरी॥हेनंदाहेयशोदेसुंदरी॥खिन्नअंतरींहोऊंनका॥३९॥पुत्रबुद्धीचाकरूनित्याग॥अंतरींधरूनिविराग॥अवलोकनकरासर्वजग॥महाभागश्रीकृष्णाची॥४०॥ऐसेंकरितांमननिश्चळ॥कृष्णाराहेतुह्मांजवळ॥विरहसागरींचाकल्लोळ॥हाअळुमाळस्पर्शेना॥४१॥तुह्मीचहोऊनिकृष्णनाथ॥बसालब्रह्मानंदींसदोदित॥ऐसेंबोलतांजाहलेंप्रभात॥तोंजागृतहोतीगोपिका॥४२॥गोपिकाउठूनिआपण॥गृहींकरितीसडासंमार्जन॥स्नानकरूनीदधिमंथन॥करितांहरिगुणगातीसुखें॥४३॥कृष्णचरित्रगानपुनीत॥दधिमंथनशब्देंहोयमिश्रित॥इतुक्यांतसविताविभ्रांत॥आपुलेंतेजदावीपें॥४४॥नंदद्वारींपाहूनिरथ॥बोलत्याजाहल्यागोपीसमस्त॥हागोकुळावरीअनर्थ॥दुसराकरितआलागे॥४५॥इतुक्यामाजीजाण॥यमुनाजीवनींकरावयास्नान॥उद्धवनिघालाआपण॥लक्षिलादुरूनगोपींनीं॥४६॥श्रीमद्भागवतसारामृत॥दशमस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥षट्चत्वारिंशाध्यायगोडहा॥४७॥४६॥

सप्तचत्वारिंशाध्यायप्रारंभः॥ ॥श्रीशुकह्मणेगुरुराया॥पाहत्याजाहल्यागोपजाया॥तोहरिदासदिसेजयासुंदरकायासुशोभित॥१॥रुचिरपीतांबरधर॥कमळमाळापरिकर॥प्रलंबबाहूमनोहर॥उद्धवभक्तवरदेखि-

ला ॥ २ ॥ उद्धव पाहूनि शक्र विस्मित ॥ सत्य अच्युत वेषें विराजित ॥ कवण हें पाहावया लवरित ॥ भोंवती पुनीत मिळाल्या ३ ॥ उत्तरीयवस्त्राचें आसन ॥ उद्धवा सिदेती गोपिका आपण ॥ सद्भावें करिती सन्मान ॥ बोलती वचन नंतरी ॥ ४ ॥ हे उद्धवा तूं सेवक कृष्णाचा ॥ आहेस बापा साचा ॥ बहुत प्रियकर विश्वासाचा ॥ नससी काचा जाणियलें ॥ ५ ॥ मातापितरांचें प्रियपूर्ण ॥ करावया तुज लागून ॥ धाडिलें कीं आणिक कारण ॥ नाहीं च जाण यादवा ॥ ६ ॥ कृष्णाचे तयां वांचुनी ॥ आसना हीं गोकुळीं कोणी ॥ निज बंधूचे स्मरणीं ॥ मन गुंते मुनीचें ही ॥ ७ ॥ अन्य स्नेह हतो कार्यनिमित्त ॥ यासि परिसें उद्धवा दृष्टांत ॥ गंध नसतां सुमनांत ॥ भ्रमर त्यजी तयांतें ॥ ८ ॥ पुरुष होतां निष्कांचन ॥ गणिका सोडीत याला गुन ॥ असमर्थ भूपती पाहून ॥ जाती त्यागून प्रजा त्या ॥ ९ ॥ प्राप्त होतां विद्या कांहीं ॥ विद्यार्थी त्यजिती गुरूसी पाहीं ॥ कीं अफल वृक्ष लवला हीं ॥ पाहूनि खग ही जाती स्वयें ॥ १० ॥ अश्ववा दग्धारण्य नयनीं ॥ देखूनि मृगजाती अन्य वनीं ॥ तेसी आह्मां विषयीं अंतःकरणीं ॥ प्रीती जाण श्रीहरीची ॥ ११ ॥ या परी काया वाचा चित्तें ॥ गोपिका करिती कृष्णार्पित ॥ हरिचरित्र स्मरूनि पुनीत ॥ शोकें अत्यंत व्याप्त होती ॥ १२ ॥ निर्लज्ज होऊनि प्रश्न करिती ॥ भ्रमरा पाहूनि गोपयुवती ॥ कृष्णदूत कल्पूनि त्याप्रती ॥ काय बोलती तें परिसा ॥ १३ ॥ ॥ श्लोक ॥ गोप्य ऊचुः ॥ ॥ मधुप कितवबंधो मा स्पृशांघ्रिं सपत्न्याः कुचविलुलितमालाकुंकुमश्मश्रुभिर्नः ॥ वहतु मधुपतिस्तन्मानिनीनां प्रसादं यदुसदसि विडंब्यं यस्य दूतस्त्वमीदृक् ॥ १२ ॥ टीका ॥ ॥ हे भ्रमरा कपटी श्रीधर ॥ त्याचा मित्र तूं साचार ॥ परस्त्रियांचे पयोधर ॥ जये सिथोर घासती ॥ १४ ॥ ऐसी हरीची वनमाळ ॥ तियेच्या केसरें आरक्तसोज्वळ ॥ जाहलें तुझें मुख कुंतळ ॥ यास्तव पदकमळ स्पर्शूं नको ॥ १५ ॥ श्रीकृष्ण मथुरावासिनी ॥ ज्या स्त्रिया म

हामानिनी॥ नयांचीप्रीतीसुखवेंकरूनी॥ दिवसयामिनीसंपादी॥१६॥ जेणेंआपुलीअधरसुधा॥ आम्हांपाजूनिए
कदां॥ दावूनियांस्नेहसुधा॥ गेलाअबुधाफसवूनी॥ १७॥ ऐशाप्रभूचेचरण॥ नित्यसेवीलक्ष्मीआपण॥ या
चाकपटपणानेणून॥ कायह्मणूनभुललीययां॥ १८॥ कांभ्रमराआह्मांपुढें॥ कृष्णकथागायनकरिसी-
गाढें॥ कृष्णप्रियकरकांतेकडे॥ जाऊनिवेडेचारकरी॥ १९॥ त्याचिकृष्णाकांतातुजसी॥ संतुष्टहोऊनिमानसीं
इच्छितपदार्थसौख्यराशी॥ निश्चयेंसीदेतीलबा॥२०॥ आह्मीकेवळभिकारी॥ राहतअसोंगोकुळाभीतरी॥
हेषट्पदाजाझडकरी॥ तुष्टअंतरींव्हावया॥ २१॥ त्रिजगांतीलसर्वकांता॥ बहुतसुलभकृष्णानाथा॥ महाल-
क्ष्मीपदसेवितां॥ कृष्टनत्वतापावली॥२२॥ तेथेंकायआम्हीपामरी॥ हेभ्रमरापरिसेंनिर्धारी॥ आमुचेंपदशिरा
वरी॥ नधेसत्वरीतूंजाईं॥२३॥ आह्मीजाणतोंतुझेंअंतर॥ कृष्णासमअविश्वासीफार॥ आहेसह्मणूनिवारंवार
करिसीप्रकारहेऐसे॥२४॥ पतिपुत्रांचाकरूनित्याग॥ वासुदेवींसाधिलालाग॥ तयानेंकंठनाळछेदूनिसवेग॥ जी
वाउद्वेगबहुकेला॥२५॥ जेणेंव्याधरूपेंआपण॥ घेतलावाळीचाप्राण॥ केलेंशूर्पनखाविडंबन॥ होऊनिवामनब-
ळिबांधिला॥२६॥ ऐसाअविश्वासीहरी॥ याशींसख्यनकरावेंसंसारीं॥ परीत्याचेंचरित्रामृतअंतरीं॥ नशकूंआ
ह्मीटाकावया॥२७॥ भवसागरींतरावया॥ गातीजेचरितायया॥ प्रपंचभोगनरुचेतयां॥ ऐसीमायाहरीची॥२८
त्याचेवचनींठेविलाविश्वास॥ ह्मणूनफशींपाडिलेंआह्मांस॥ त्याचात्यागूनिकथारस॥ चरित्रसुरसअन्यवदें॥२९
भ्रमरातुजलागुनी॥ कृष्णेंप्रेषिलेंत्वरेंकरूनी॥ आम्हांकडेबापायेक्षणीं॥ घेमागूनिइच्छितरे॥३०॥ जरीकामूळ
आलासिआह्मां॥ तरीबहुतस्त्रियापुरुषोत्तमा॥ तेथेंजावयाचारिकामा॥ घोळकामानयेची॥३१॥ हेह्रिरेफापरि

सेंवाणी ॥ गुरुगृहाहूनि चक्रपाणी ॥ आला काय मधुरा पट्टणीं ॥ आठवितो मनीं काय आह्मां ॥ ३२ ॥ ऐसी वार्ता सुखकर आतां मधुपा सांगें सत्वर ॥ आह्मां विरहतप्तांच्या मस्तकावर ॥ ठेवील कर केंव्हां हरी ॥ ३३ ॥ गोपिकांची वचनें या परी ॥ परिसूनि उद्धव निजांतरीं ॥ सद्गद होऊनि ते अवसरीं ॥ हरिसंदेश सत्वरी वदतसे ॥ ३४ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ भवतीनां वियोगो मे न हि सर्वात्मना क्वचित् ॥ यथा भूतानि भूतेषु खं वाय्वग्निर्जलं मही ॥ २९ ॥ तथाहं च मनःप्राणभूतेंद्रियगुणात्मना ॥ आत्मन्येवात्मनात्मानं सृजे हन्म्यनुपालये ॥ ३० ॥ टीका ॥ श्रीहरि सांगे तुह्मांलागुन ॥ तें आतां परिसा सावधान ॥ तुमचा माझ्याशीं वियोग जाण ॥ एक क्षण नाहीं कधीं ॥ ३५ ॥ कारण सर्व इंद्रियांत ॥ मी व्याप्त असें लक्ष्मीकांत ॥ या विषयीं परिसा दृष्टांत ॥ आतां यथार्थ बल्लवीहो ॥ ३६ ॥ स्थावरजंगम प्राणियांत ॥ पंचमहाभूतें राहती निश्चित ॥ तेसा मी विश्वव्यापक पुनीत ॥ आहें सत्य जाणिजे ॥ ३७ ॥ मीची मन प्राण ॥ भूतेंद्रिय आणि गुण ॥ रूपें सृष्टि संहरण ॥ पालनही करितसें ॥ ३८ ॥ हें मायागुणें घडतें सकळ ॥ आत्मा ज्ञानमय सोज्वळ ॥ गुणीं प्रवेशों उतावेळ ॥ नाहीं निश्चळ व्रजवासिनीहो ॥ ३९ ॥ मी उपादान सकळां ॥ आहें कार्यासी वेगळा ॥ अवस्थात्रयाचा चाळा ॥ मज गोपाळा ठाउका ॥ ४० ॥ विश्व तैजस प्राज्ञ संज्ञक ॥ मायायोगें मीचि एक ॥ अनुभवासी येतों चोख ॥ होतां विवेक ब्रह्माचा ॥ ४१ ॥ जागा होऊनियां प्राणी ॥ स्वप्नाचें चिंतन करितो मनीं ॥ तेसें इंद्रियें मिथ्या विषयध्यानीं ॥ सार्वकाळ मन प्रवर्तवी ॥ ४२ ॥ त्या मनाचा सोडूनि आळस ॥ निरोध करावा सावकाश ॥ तेणें चित्त कृतार्थ होऊनि स्फुरस ॥ वैकुंठवास पावेतो ॥ ४३ ॥ सर्व साधनांची समाप्ति ॥ मुख्य मनोजयींच होय निश्चिती ॥ नद्या नाना पंथें गमन करिती ॥ परंतु समाप्ती सागरीं ॥ ४४ ॥ तैं बोलती व्रजकामिनी ॥ ब्रह्मोपदेश आम्हां करूनी ॥ वंचितोसी काय ये क्षणीं ॥ अबला पाहूनि गोकुळींच्या ॥ ४५ ॥

सर्वगुणसंपन्नहरी ॥ याचाविरहसंसारीं ॥ सहननहोयपरोपरी ॥ जाणअंतरींयाद्वा ॥ ४६ ॥ उद्धवह्मणेगौळिणीसी ॥
ऐसेंह्मणालजरीमानसीं ॥ तरीश्रीकृष्णेंकथिलेंतुह्मांसी ॥ तेंनिश्चयेंसींपरिसावें ॥ ४७ ॥ आहेंमीदृष्टीसीप्रियकर ॥
परीध्यानयोगव्हावयाइदतर ॥ आणिकतुमचामनोजयसाचार ॥ व्हावयादूरराहतोंमी ॥ ४८ ॥ जेसापतिअसतां
प्रवासी ॥ कांताचिंती निजमानसीं ॥ सन्निधअसतांदिवसनिशीं ॥ नकरीसारसीप्रीतीतें ॥ ४९ ॥ सर्ववासनानिर्मु-
क्त ॥ ऐसेंकरूनियांनिजचित्त ॥ माझेठायींअर्पितांनिश्चित ॥ स्वार्थपरमार्थसिद्धहोय ॥ ५० ॥ कृष्णसंदेशयापरी ॥
श्रवणकरूनीगोपसुंदरी ॥ संतुष्टहोऊनिअंतरीं ॥ वदतीसत्वरीउद्धवा ॥ ५१ ॥ यादवशत्रुदुःखदायक ॥ मरणपा-
वलादुष्टकंटक ॥ बंधूसहितदेख ॥ जाहलेंचोखसकळिकां ॥ ५२ ॥ श्रीकृष्णेंआम्हांसिउपेक्षिलें ॥ आतांपुरस्त्रियां-
सीवरिलें ॥ त्यावरीप्रेमठेवितोंकींभलें ॥ सुहास्यवदनगोविंद ॥ ५३ ॥ अन्यगोपीबोलेवचन ॥ पुरस्त्रियांनींहरि-
तांमन ॥ त्यांचेमनोरथपूर्ण ॥ स्वयेंनारायणकांनकरी ॥ ५४ ॥ उद्धवापुरस्त्रियाशीवदतां ॥ श्रीहरिस्मरतोकाय
आतां ॥ रासमंडळींआम्हांसवेंरमतां ॥ क्रीडातत्वतांकेल्याज्या ॥ ५५ ॥ आह्मीसंतप्तजाहलोंफार ॥ येऊनिधरू-
निआसुधाकर ॥ आह्मांसीसौख्यसागर ॥ देईलकायमागुतां ॥ ५६ ॥ तेंअन्यबोलतीवचन ॥ तयालाधलेंराज्य-
सिंहासन ॥ राजकन्येशीं विवाहकरून ॥ गृहस्थपूर्णहरिजाहला ॥ ५७ ॥ आम्हीगोळिणीवनवासी ॥ कोणीकडे
हृषीकेशी ॥ आतांपिंगलावतउदासी ॥ होतांमनासीतुष्टता ॥ ५८ ॥ कृष्णाशाधरूनिकांहीं ॥ आतांउपयोगसर्वथा
नाहीं ॥ एकांतवार्तातयाच्याही ॥ असाध्यपाहींअखिलांतें ॥ ५९ ॥ तोइच्छारहितअसतांही ॥ लक्ष्मीजडलीजयाच्या
देहीं ॥ क्षणमात्रविरहतयाचापाहीं ॥ सहननाहींहोततो ॥ ६० ॥ सरिताकाननपर्वत ॥ रामकृष्णानींजेसेवित ॥ तेपाह

तांक्षभित ॥ स्मरे चित्त तयासी ॥ ६१ ॥ मधुरभाषण अवलोकन ॥ इत्यादि लीलें करून ॥ ज्यानें केलें चित्तहरण ॥ तो कृष्ण केंसा विसरावा ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ हे नाथ हे रमानाथ व्रजनाथार्तिनाशन ॥ मग्नमुद्धर गोविंद गोकुलं वृजिनार्णवे ॥ ५३ ॥ टीका ॥ ॥ हे नाथ हे रमापती ॥ हे गोकुलपालका श्रीपती ॥ हे दुःखनाशना व्रजाप्रती ॥ शीघ्र गती देई देवा ॥ ६३ ॥ श्रीकृष्णें रायालागुनी ॥ त्या समस्त गोपकामिनी ॥ ध्यानें श्रीकृष्णाचिये चरणीं ॥ स्थिर ते क्षणीं जाहल्या ॥ ६४ ॥ सत्कारयुक्त उद्धव भक्त ॥ कांहीं मास राहिला व्रजांत ॥ परी नंदादिकांचे मनांत ॥ वास क्षणवत जाहला ॥ ६५ ॥ स्वयें उद्धव करूनि कीर्तन ॥ करवी अखिलां तें श्रवण ॥ तेणें त यांचें चित्तहरण ॥ करूनि पूर्ण रमवीतो ॥ ६६ ॥ यापरि तो हरिभक्त ॥ सरिता वनादि समस्त ॥ पाहूनि गोकुळीं निश्चित ॥ स्मरण करवी श्रीहरीचें ॥ ६७ ॥ कृष्णाविषयीं प्रेमोद्गार ॥ पाहूनियां अनिवार ॥ उद्धव गोपिकांसी नमस्कार ॥ करूनि सादर बोलतसे ॥ ६८ ॥ धन्य गोपिका महीवरती ॥ आहेत जाणा महासती ॥ या व्यभिचारदुष्ट नसती ॥ कृष्णभक्ति महापुण्यें ॥ ६९ ॥ हरिप्रसाद दुर्लभ फार ॥ महालक्ष्मीसी हीसाचार ॥ तो रासमंडळीं मनोहर ॥ प्राप्त जाहला गोपींतें ॥ ७० ॥ म्हणूनि मी या वनांत ॥ गोपीपादांबुजरेणूनि मित्त ॥ लतागुल्म होईन निश्चित ॥ पूर्ण हेतू करी देवा ॥ ७१ ॥ जयाचें पदकमळ पावन ॥ ब्रह्मादि देव करिती पूजन ॥ तें पद गोपिका घेऊन ॥ स्तनीं ठेवून शांत होती ॥ ७२ ॥ म्हणूनि गोपींचें पदरज ॥ वंदन करितों मी सहज ॥ भूपतीसी म्हणे मुनिराज ॥ ऐकें चोज पावनगा ॥ ७३ ॥ नंदादिकां विचारूनि पुढती ॥ उद्धव बैसला रथावरती ॥ जाता जाहला मथुरेप्रती ॥ भेटीसंगती घेउनी ॥ ७४ ॥ सजळनेत्रें करून ॥ उद्धवासि बोले नंद आपण ॥ हृत्तिअसो हरिपदार्पण ॥ नामसंकीर्तन घडो सदा ॥ ७५ ॥ यापरि त्यांचा सत्कार ॥ करूनियां साचार ॥ उद्धव मथुरेसी सत्वर ॥ जाता जाहला तेधवां ॥ ७६ ॥ वंदन करू

निश्रीहरीसी॥वर्तमानकथीसौख्यराशी॥व्रजजनांचीभक्तिपाहूनिसरसी॥संतुष्टमानसींजाहलों॥ ७७॥गोरसउपा
यनतुह्मांसी॥तयांनींदिधलेंसौख्यराशी॥तेंग्रहणकरावेंयासमयासी॥श्रीहरीसीउद्धववदे॥७८॥श्रीमद्भागवत
सारामृत॥दशमस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥सप्तचत्वारिंशाध्यायगोड्हा॥७९॥ ४७॥अष्टच
त्वारिंशाध्यायप्रारंभः॥ ॥ ॥श्लोक॥ ॥श्रीशुकउवाच॥ ॥अथविज्ञायभगवान्सर्वात्मासर्वदर्शनः॥सैरंध्र्याः
कामतप्तायाः प्रियमिच्छन्गृहंययौ॥ १॥ टीका ॥श्रीशुकह्मणेभारता॥श्रवणकरीश्रीहरिकथा॥षड्गुणैश्वर्यपरिपूर्ण
ता॥सर्वज्ञताजेथअसे॥१॥तोसर्वात्माश्रीहरी॥जाणूनिकामार्तकुब्जासुंदरी॥जायतियेचेरम्यमंदिरीं॥तिचेंप्रियक
रावया॥२॥अनर्घ्यउपकरणेंकरून॥स्फुरतबंधादिचित्रींविराजमान॥धूपदीपादियुक्तपूर्ण॥कुब्जासदनविभ्रपावे
॥३॥कृष्णासिदेखूनिझडकरी॥कुब्जाजाऊनिसामोरी॥दिव्यासनेंदेऊनिसत्वरी॥तयांवरीबैसवी॥४॥षोडशोप-
चारेंकरून॥केलेंभगवंताचेंपूजन॥उद्धवसोडूनिआसन॥पृथ्वीवरीबैसला॥५॥तोंशयनगृहींजाण॥जाऊनिबै-
सलानारायण॥कुब्जाअंतरगृहींजाऊन॥श्रृंगारकरूनपातली॥६॥गजगामिनीयेऊनिजवळी॥शंकितहोऊनि-
रूपन्याहाळी॥तोंकृष्णेंधरूनीहस्तकमळीं॥मंचकावरीबैसविली॥७॥कुब्जेसहितभगवान॥होताजाहलारममा-
ण॥हृदयींधरूनिआलिंगन॥करीकुब्जाकृष्णातें॥८॥तेणेंविरहसंतापहरला॥मगमंदभाग्यानेंअबला॥मोक्षदाय-
कश्रीकृष्णाला॥आराधूनहेंमागे॥९॥कृष्णासिह्मणेचंद्रवदनी॥कांहींदिवसराहावेंसदनीं॥माझात्यागसर्वथाकरू
नी॥जाऊंनयेदयार्णवा॥१०॥यापरीपरिसूनियांवाणी॥कामवरदानचक्रपाणी॥देताजाहलातियेलागुनी॥ सौ
ख्यअंतरींव्हावया॥११॥मोक्षदायककंसारी॥दुराराध्यअसेभारी॥तोप्रसन्नजाहलातरी॥मूर्खमागतीविषयांतें

१२॥एकदांरामउद्धवश्रीपती॥त्रिवर्गनिघालेशीघ्रगती॥येतेजाहलेअक्रूरगृहाप्रती॥पूर्णकामकरावया॥ १३॥अ
क्रूरेंपाहूनिसत्वर॥उत्थापनदेऊनिसाचार॥आलिंगुनीनमस्कार॥ रामकृष्णांकेलातें॥ १४ ॥पूजनतेसेंपादक्षालन
भावेंमस्तकींतीर्थधारण॥अक्रूरकरूनीआपण॥वस्त्रभूषणेंत्यांसत्कारी॥ १५ ॥रामकृष्णांचेचरणकमळ॥अक्रू
रअंकींघेऊनिसोज्वळ॥पादसंवाहनउतावेळ॥करिताजाहलाभक्तीनें॥ १६॥हेरामामनमोहना॥ह्यापरिवारांस
हितजाणा॥कंसदुष्टलाविलायमसदना॥आपणउत्तमकेलेंहें॥१७॥तेसेंयादवकुळहरी॥बुडालेंहोतेंदुःखसाग
रीं॥आपणहोऊनिसौख्यतरी॥मुक्तकेलेंदयार्णवा॥ १८ ॥सर्वकुळामाजीपुनीत॥यादवकुळजाणानिश्चित॥आ
पुल्यायोगेंजालेंजगांत॥प्रधानपुरुषतुह्मीदोघे॥ १९॥कार्याकारणप्रकार॥तुह्मांवांचुनिनाहींतिळभार॥सर्वांचेंअ-
धिष्ठानसाचार॥शेषशायीपरमात्मा॥ २० ॥हेंजगउत्पन्नकरूनीपाहीं॥माजीप्रवेशकरितालवलाहीं॥कारणत्यामुळें
प्रविष्टनसतांही॥ प्रविष्टऐसेंभासत॥ २१ ॥हेंजगनिर्मूनिजगत्पती॥करितांसंहारआणिकस्थिती॥गुणकर्मबंधनि-
श्चिती॥होतनाहींनिर्गुणा॥ २२ ॥यास्तवबद्धमुक्तता॥तुह्मांसीनाहींभगवंता॥हेकृष्णावसुदेवसुता॥ बळरामापरि-
सावें॥ २३ ॥जैंअनादिमार्गवेदाचा॥पाखंडपीडितहोतोसाचा॥त्याकाळींसत्वगुणांचा॥आश्रयकरिसीपुरुषाद्या॥
२४॥सांप्रतभूभारहरणार्थ॥जाहलासीवसुदेवसुत॥आमुचेंगृहेंपुनीत॥जगन्नाथजेथेंअवतरे॥ २५ ॥हेजनार्दना
वैकुंठनायका॥दर्शनासीदुर्लभदेवादिकां॥ऐसातूंआम्हांसन्मुखा॥दृष्टिगोचरजाहलासी॥ २६॥हेंआमुचेंभाग्यमह
त्॥यास्तवदेवापरिसेंमात॥आमुचादारासुतावरीलकुश्चित॥ममतापाशछेदनकरी॥२७॥यापरीअक्रूरभक्तिपूर्वक
स्तवनकरितांरमानायक॥बोलताजाहलावचनचोख॥श्वफल्कतनयाकारणें॥२८॥अक्रूरातूंआमुचागुरुनाथ॥पि

तृव्यआह्मीतुझेसुत॥यास्तवकृपाकरूनीसतत॥पालनकरावेंयेधवां।२९तुह्मांसारिखेसाधुजन॥दर्शनमात्रेंकरून॥क
रितीअखंडकल्याण॥उद्धारगतीप्राणियां॥३०॥ ॥श्लोक॥ ॥नह्यम्मयानितीर्थानिनदेवामृच्छिलामयाः॥तेपु-
नंत्युरुकालेनदर्शनादेवसाधवः॥३१॥ ॥टीका॥पवित्रकरितीतीर्थें॥तैशींमृत्पाषाणदेवतें॥परिबहुकाळेंजनांतें
दर्शनमात्रेंसज्जन॥३१॥तस्मात्हेअक्रूरानिश्चिती॥तूंआमुचासुहृत्सुमती॥ह्मणूनिहस्तनापुराप्रती॥गमनकरीये
धवां॥३२॥पंडुराजापावलामरण॥पांडवबाळकेंत्याचींजाण॥वनींहूनीपातलींअज्ञान॥कुंतीसहितऐकिलेंहें॥३३॥प्र
ज्ञाचक्षुनधरिसमता॥अवघीपुत्रांवरीममता॥दुष्टस्वभावेंपुत्रवर्तता॥कांहींनबोलेतोअंध॥३४॥यास्तवअक्रूराजा-
ऊनिसत्वर॥घेईंपांडवांचासमाचार॥बरावाईटपाहूनिप्रकार॥कथनकरीमजलागीं॥३५॥जेणेंहोईलपांडवहित
तेंचिकरूंबानिश्चित॥ऐसेंबोलूनिरमानाथ॥बलउद्धवांसहगृहींआला॥३६॥श्रीमद्भागवतसारामृत॥दशमस्कं-
धपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥अष्टचत्वारिंशाध्यायगोडहा॥३७॥ ४८॥ एकोनपंचाशत्तमाध्याय-
प्रारंभः॥ ॥वारणपुरासीअक्रूर॥रथारूढहोऊनिसत्वर॥जाताजाहलासाचार॥समाचारघ्यावया॥१॥तेथेंदेखिला
गंगानंदन॥भीष्मवृद्धविराजमान॥सोमदत्तद्रोणकृपकर्ण॥द्रौणिसुयोधनपांडवतें॥२॥बाल्हीकादिकसोयरे॥पा-
हूनिभेटलेपरस्परें॥कुशलप्रश्नकरूनिसारे॥सुखमनींपावती॥३॥दुष्टपुत्रांचेअधीन॥धृतराष्ट्रजाहलाअसेजा-
ण॥त्याचेंपहावयावर्तन॥तोकांहींदिनराहिला॥४॥पांडवप्रतापपाहूनिनयनीं॥झुरतीदुर्योधनादिकमनीं॥विष
दानादिअपकारकरणी॥कुंतीविदुरकथितीहे॥५॥पांडवांचीजन्मकथा॥अक्रूरासीकथितीजाहलीपृथा॥ह्मणे
बंधुरायादुःखवार्ता॥कायह्मणूनबोलावी॥६॥अक्रूरामाझेमातापितर॥बंधुभगिनीभाचेसकुमार॥आप्तसंबं-

धीजनयेर ॥ स्मरतातकायआह्मांतें ॥ ७ ॥ माझेभाचेबळराम ॥ आणिकसुंदरपुरुषोत्तम ॥ तेठेवितीकींबहुप्रेम ॥ पांडवां वरीवदआतां ॥ ८ ॥ जैसीलांडग्यामाजीहरिणी ॥ शोकेंआक्रंदेदिवसयामिनी ॥ तेसीशत्रुसमाजींशोकाकुलमनीं ॥ हो तेंबहुतवदूंकाय ॥ ९ ॥ पितृहीनमाझींमुलें ॥ असतीधर्मादिसातुले ॥ तच्छोकसांत्वनभलें ॥ करीलकायश्रीपती १० श्लोक ॥ ॥ कृष्णकृष्णमहायोगिन्विश्वात्मन्विश्वभावन ॥ प्रपन्नांपाहिगोविंदशिशुंश्चाभिसीदतीम् ॥ ११ ॥ टीका ॥ ॥ हेकृष्णाहेकृष्णापावना ॥ हेविश्वात्मानारायणा ॥ हेजगदुत्पादकापावना ॥ गोविंदाकेशवामाधवा ॥ १२ ॥ मीआपल्याबाळांसहित ॥ याशत्रुसमाजींक्लेशयुक्त ॥ वासकरितेंदिवसरात ॥ चरणींशरणहोउनी ॥ १२ ॥ हेप्रभोमृत्युसंसारापासून ॥ भयपावणारेजेकाजन ॥ तयांसीशरणयावयायोग्यस्थान ॥ तुजविणअन्यअसेना ॥ १३ ॥ तस्मात्तनुमनतुजप्रती ॥ सदाअर्पणअसोश्रीपती ॥ तूंशुद्धब्रह्मपरमात्मायोगिपती ॥ शरणागतमीपदातें ॥ १४ ॥ श्रीशुकह्मणेपरीक्षिती ॥ श्रीकृष्णस्मरणकरूनीचित्तीं ॥ शोककरितीजाहलीकुंती ॥ ऐकूनिदुःखितयादवहोय ॥ १५ मगबोलेअहोभगिनी ॥ तवपुत्रदेवांशजाणमनीं ॥ ऐसेंसमाधानकरूनी ॥ नंतरप्रयाणइच्छितो ॥ १६ ॥ जातेसमयीं स्वपुत्रांवर ॥ रात्रंदिवसप्रीतितत्पर ॥ जोप्रज्ञाचक्षुराजेश्वर ॥ तयासीपाहूनिबोलतसे ॥ १७ ॥ समीपजाऊनिआपण सर्वआप्तांमाजीजाण ॥ कृष्णादिकांचेंवचन ॥ कथिताजाहलाअक्रूरतो ॥ १८ ॥ हेविचित्रवीर्यकुमरा ॥ धृतराष्ट्राकुरुशेखरा ॥ तुझाबांधवपांडुसाजिरा ॥ मरणपावलास्वकर्में ॥ १९ ॥ सांप्रततयाचेअज्ञकुमर ॥ असतांतूंराज्यावर ॥ असशी तरीएकप्रकार ॥ सावधानेंपरिसावा ॥ २० ॥ धर्मेंप्रजांचेंपालन ॥ स्वकीयांविषयींसमबुद्धीठेवून ॥ करितांलाधेकी र्तिकल्याण ॥ अन्यथापतननिरयांतरीं २१ ह्मणसीलस्वपुत्रींममता ॥ भ्रातृसुतींनसमता ॥ होईलकेंसीतरीआतां ॥

बोधवार्तापरिसावी ॥ २२ ॥ आपुला देह आपुले संगती ॥ येणार नाहीं गा नरपती ॥ तेथें दारासुतांची कवण गती ॥ जा
णचित्तीं नृपश्रेष्ठा ॥ २३ ॥ जन्मासि येतो एक प्राणी ॥ लेसाचि जातो मृत्युवदनीं ॥ सुकृतदुष्कृत भोगस्थानीं ॥ असे आप
ण एकला ॥ २४ ॥ आपण अधर्मे द्रव्य संपादिलें ॥ पुत्रादिकीं सर्व हरिलें ॥ पुत्रमिषें शत्रू समजलें ॥ पाहिजे तया धृत-
राष्ट्रा ॥ २५ ॥ वडिलोपार्जित जीवनाचा ॥ मत्स्य ग्रास करिती साचा ॥ शेवटीं घात निजप्राणांचा ॥ करिती तद्वत पुत्रादि-
क ॥ २६ ॥ जेणें परमार्थ साधिला नाहीं ॥ अशा पुरुषाचा पाहीं ॥ पुत्रादिकानीं त्यागलवलाहीं ॥ करितां अनर्थ होय पें
२७ ॥ तो प्राणी आपुले संगतीं ॥ संगृहीत पातकें घेऊनि निश्चिती ॥ जातो अंधतम निरयाप्रती ॥ स्वधर्मभ्रष्ट हे राजा ॥ २८
तस्मात् विश्वस्वप्नवत् ॥ मिथ्या पाहूनि प्रसक्त ॥ आपुल्या मनाचें नियमन त्वरित ॥ करूनि शांत हो राया ॥ २९ ॥ अक्रूर
वचन ऐकूनि ते वेळा ॥ काय बोले राजा आंधळा ॥ जैसा अमृतलाधतां सोहळा ॥ पावे नर सर्वदा ॥ ३० ॥ जैसी तुझी मधुर
वाणी ॥ ऐकतां अतृप्त मी येक्षणीं ॥ परी क्षणएक सौदामिनी ॥ पर्वतीं स्थिर न च राहे ॥ ३१ ॥ तैसे स्वपुत्रप्रीतीनें निश्चि
त ॥ विषम आणि चंचळ बहुत ॥ जाहलेल्या माझ्या मनांत ॥ तव बोध पुनील शिरकेना ॥ ३२ ॥ जाणूनि कां न व्हे स्थिर ॥
ह्मणसी तरी विचार ॥ विपरीत संकल्प परमेश्वर ॥ करी तेणें होय असें ॥ ३३ ॥ तो परेश सांप्रतकाळीं ॥ अवतीर्ण जाह-
ला यादवकुळीं ॥ जो मायें करूनी वेळोवेळीं ॥ घडी मोडी सृष्टीतें ॥ ३४ ॥ विश्व करूनी निर्माण ॥ माजी प्रवेश करी आ-
पण ॥ कर्मानुरूप जाण ॥ फल देतो निर्धारें ॥ ३५ ॥ न जाणवती त्याचे पवाडे ॥ हें चि मुख्य कारण आहे गाढें ॥ संसारा-
पासूनि रोकडें ॥ मुक्त करी जो श्रीकृष्ण ॥ ३६ ॥ त्या श्रीहरीसी असो नमन ॥ ऐसें बोले अंबिकानंदन ॥ श्रीशुक ह्मणे नृपा
लागुन ॥ साग्र अक्रूर श्रवण करी ॥ ३७ ॥ मित्रजनाची आज्ञा सत्वर ॥ घेऊनि आला मथुरे अक्रूर ॥ धृतराष्ट्राचा सर्व

प्रकार ॥ रामकृष्णां निवेदिला ॥ ३८ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंधे परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥
एकोनपंचाशत्तमाध्याय गोड हा ॥ ३९ ॥ ४९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ इतिदशमस्कंध पूर्वार्धः समाप्तः ॥ १० ॥ श्रीशं-

इतिश्रीमद्भागवतसारामृते दशमस्कंधे पूर्वार्धं समाप्तम्.


अथश्रीमद्भागवतसारामृतेदशमस्कंधोत्तरार्धप्रारंभोयम्

श्रीगणेशायनमः॥ ॥श्रीसरस्वत्यैनमः॥ ॥श्रीगुरुभ्योनमः॥ ॥श्रीशुकह्मणेभारता॥अस्तिप्राप्तिकंसकांता॥
पतिमरणाचीवार्ता॥सदनींताताकळवीती॥१॥वैधव्यपणाचेंकारण॥मागधासिकेलेंनिवेदन॥अप्रियवाक्य-
करूनीश्रवण॥भूपमानसींकोपावला॥२॥शोकक्रोधपावूनिबहुत॥बोलिलातेंमागधनाथ॥अयादवीपृथ्वी
समस्त॥स्वपराक्रमेंकरीनमी॥३॥तेवीसअक्षौहिणीदळ॥घेऊननिघालाउतावेळ॥येऊनियांमथुरेजवळ॥
नगरसर्ववेढिलें॥४॥मागधबलअसेअमित॥तेणेंनगररोधिलेंसमस्त॥लोकभयेंजाहलेव्यास॥देखतांचिंत-
नहरीकरी॥५॥मीभूभारहरणार्थ॥प्रगटजाहलोंजगतांत॥ह्मणूनीसैन्याचाघात॥करीनआतांनिर्धारें॥६॥
मागधासीनवधावें॥कोंतोबलोद्यमकरीलस्वभावें॥ऐसेंध्यातांवासुदेवें॥चमत्कारजाहला॥७॥गगनापासू
निअकस्मात॥सूतकवचध्वजांसहित॥दोनरथसायुधप्राप्त॥महीवरीजाहले॥८॥तेपाहूनिश्रीहरी॥रामासि
बोलेतेअवसरीं॥हेआर्यव्यसनकेवढेंतरी॥यादवांवरीओढवलें॥९॥तैसेपहादोनरथ॥सायुधआलेबाळासि
त॥रथींबैसूनीकरावाघात॥विलंबआतांकरूंनये॥१०॥व्यसनापासूनिउद्धार॥करावास्वजनांचासाचार॥या
करितांआपुलाअवतार॥जगामाजीअसेहा॥११॥तेवीसअक्षौहिणी॥चतुरंगमहावाहिनी॥भूमिभारह्यायेक्ष-
णीं॥दूरकरीससमर्था॥१२॥विचारकरूनियापरी॥रामकृष्णबैसलेरथांवरी॥सायुधसेनेसहितबाहेरी॥येतेजाह
लेतेधवां॥१३॥वासुदेववाजवीपांचजन्य॥तेणेंशत्रुकंपायमान॥तोशब्दकरूनीश्रवण॥जरासंधबोलतसे॥१४॥हे
कृष्णातूंबालक॥आहेसगोरसाचाचालक॥ह्मणूनीयुद्धाचाविवेक॥तुझ्यासंगतीघडेना॥१५॥तूंआहेसबंधुहंताप
तित॥ह्मणूनिजावेंबापरत॥हेरामासंग्रामार्थ॥इच्छाअसेतरीयावें॥१६॥धैर्यधरूनीकरीसमर॥मच्छरेंकरूनीतुझें

शरीर॥ भग्न होईल हा निर्धार॥ स्वर्गीं प्रयाण तुज घडे॥ १७॥ अथवा मज लागा स्वबाणीं॥ शीघ्र सारंगा येरणीं॥ मागधें ऐसें बोलूनी॥ सैन्यें बलहरी वेष्टिले॥ १८॥ रथध्वज अश्व सारथी॥ यांहीं वेष्टित जाहलात यांप्रती॥ तंव गोपुरावरूनी पौर युवती॥ कौतुक पाहती युद्धाचें॥ १९॥ शत्रुसैन्यें करूनी भले॥ रामकृष्ण रथ आच्छादिले॥ पुरस्त्रिया तये वेळे॥ शोकयुक्त जाहल्या॥ २०॥ श्रीकृष्णें पाहूनिया परी॥ शार्ङ्गधनुष्य घेतलें करीं॥ तेणेंच तुरंगसैन्य समरीं॥ गतप्राण पैं केलें॥ २१॥ गजमस्तकें छिन्न केलीं॥ अश्ववदनें विदारिलीं॥ रथध्वज सूतनायकावली॥ याविण रथ केले बहु॥ २२॥ पदातींच्या भुजा ऊरू॥ छेदूनि टाकिले निर्धारू॥ देहांपासूनि निघाले थोरू॥ रुधिरसरिता होय तेणें॥ २३॥ भुजा वाहती सर्पपरी॥ वीरमस्तकें कासवें वरी॥ गजशरीरें बेटें निर्धारीं॥ घोडे सुसरी जाणिजे॥ २४॥ करमांडिया हेचि मासे॥ नरांचे केश शेवाळ सरसे॥ धनुष्यें तरंग आयुधें विलसे॥ गुल्मचर्में भोंवरा॥ २५॥ रत्नमणी हीच सिकता॥ जये माजी तळवता॥ रामकृष्ण युद्ध करितां॥ रक्तसरिता होय ऐसी॥ २६॥ हें वसुदेवपुत्रांचें खेळणें॥ सहज जाणा केलें क्षणें॥ पराक्रमाचें पूर्ण केणें॥ पृथक् आहे नृपश्रेष्ठा॥ २७॥ अहो जो त्रिभुवनाची॥ सृष्टि स्थिती करितो साची॥ तया या शत्रुसैन्याची॥ काय गणती जाणिजे॥ २८॥ तेव्हां बळिराम जाऊन॥ विरथ मागध केला बंधन॥ वरुणपाशीं तें पाहून श्रीकृष्ण॥ सोडूनि देत यातें॥ २९॥ जरासंध होऊनि लज्जित॥ तप संकल्प करीत मिळरित॥ मार्गीं जातां तयाचें चित्त॥ राजे फिरविती उपदेशें॥ ३०॥ मागध गेला आपुल्या घरीं॥ पुष्पवृष्टी कृष्णावरी॥ सुर करिती गगनोदरीं॥ महा आनंद प्रवर्तला॥ ३१॥ मथुरावासी जन सकळ॥ नगर शृंगारिती सोज्वळ॥ पुरामाजी यादवपाळ॥ रामकृष्ण प्रवेशले॥ ३२॥ मागध सत्रावेळा येऊन॥ ससैन्य पराभव पावे आपण॥ अठराव्या संग्रामीं कालयवन॥ नारदें प्रेषियला॥ ३३॥ तीन कोटी यवनां-

सहित ॥ मथुरेमाजी आला भोंवत ॥ क्रोध आणूनियां बहुत ॥ यादव घात करूं पाहे ॥ ३४ ॥ नगर वेष्टिलें साचार ॥ ऐसें पाहूं
नि श्रीधर ॥ बलरामासहित विचार ॥ करिता जाहला तेधवां ॥ ३५ ॥ उभय सुखदुःख निश्चितीं ॥ प्राप्त जाहलें यादवां प्रती ॥
सांप्रत यवन जरासंध पुढती ॥ येऊनि अनर्थ करील कीं ॥ ३६ ॥ स्वजनाचा करील घात ॥ अथवा नेईल स्वपुरांत ॥ यास्तव
त्यांचे रक्षणार्थ ॥ सागरीं दुर्ग निर्मावें ॥ ३७ ॥ तेथें ठेवूनि सकळ ज्ञाती ॥ मग वधावें यवनाप्रती ॥ ऐसें विचारूनी चित्तीं ॥ का
य करी परमात्मा ॥ ३८ ॥ द्वादश योजनें सागरांत ॥ दुर्ग निर्मिलें निश्चित ॥ सर्वाश्चर्यमय पुनीत ॥ योग्य वास करावया ॥
३९ ॥ चातुर्वर्ण्य प्रजेसी ॥ गृहें उत्तम राहावयासी ॥ राजगृहें पथ उद्यानासी ॥ करी उत्पन्न तो लक्ष्मी ॥ ४० ॥ विश्वक-
र्म्यानें कळाकुसरी ॥ संपूर्ण जाण द्वारकेभीतरीं ॥ लाविली तेधवां वासवें सत्वरी ॥ सुधर्मा सभा पाठविली ॥ ४१ ॥ तें-
सा दिधला पारिजात ॥ वरुण श्यामकर्ण अर्पि हर्षित ॥ कुबेर अष्टनिधी त्वरित ॥ देता जाहला कौतुकें ॥ ४२ ॥ अन्य लो
कपाळांनीं जाण ॥ निज विभूती केल्या अर्पण ॥ द्वारकेंत सिद्धि आदि करून ॥ सकळ प्राप्त जाहलें ॥ ४३ ॥ तेव्हां योग
प्रभावें निश्चिती ॥ सर्व जन नेले द्वारकेप्रती ॥ रामासवें विचार पद्धती ॥ पूर्णब्रह्म करीत असे ॥ ४४ ॥ प्रजारक्षण करा
वें आपण ॥ आह्मी करितों पलायन ॥ ऐसा संकेत करून ॥ चमत्कार हरी करी ॥ ४५ ॥ निरायुध होऊनि त्वरित ॥ उ-
भा राहिला भगवंत ॥ तेधवां नगर महाद्वारांत ॥ वाट पाहे यवनाची ॥ ४६ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंध प-
रम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ पंचाशत्तमाध्याय गोड हा ॥ ४७ ॥ ५० ॥ एकपंचाशत्तमाध्याय प्रारंभः ॥
पुरद्वारांतूनी श्रीहरी ॥ त्वरित निघाला बाहेरी ॥ श्रीवत्सवक्षा पीतांबरधारी ॥ चतुर्भुज श्यामकांती ॥ १ ॥ नारदोक्त लक्ष
णें करून ॥ हा वासुदेव परिपूर्ण ॥ जाणूनि निरायुध पाहून ॥ आपणा अशस्त्र जाहला ॥ २ ॥ आतां धरीन वेगेंशीं ॥

ऐसें चिंतूनि मानसीं ॥ कालयवन लागला पाठीशीं ॥ श्रीकृष्ण तयाना टोपे ॥ ३ ॥ जो दुष्प्राप योगीजना ॥ तो काय आतुडेल दुष्टयवना ॥ भ्रमण करितां वनें नाना ॥ काय बोले भगवंता ॥ ४ ॥ यदुकुळांत जन्म घेऊन ॥ मज पुढें करिशी पलायन ॥ हें उचित नोहे तुज लागून ॥ काय ह्मणावें यादवा ॥ ५ ॥ यापरी भाषण करून ॥ धरूं पाहे कालयवन ॥ तों गुहेंत गेला श्रीकृष्ण ॥ नर निद्रित तेथें असे ॥ ६ ॥ यवन जाऊनि सत्वर ॥ ह्मणे बरा सांपडला चोर ॥ क्रोधें करितां लत्ताप्रहार ॥ पुरुष जागृत जाहला ॥ ७ ॥ तयानें नेत्र उघडितां ॥ यवन जळाला अवचितां ॥ भूपति ह्मणे मुनिनाथा ॥ कवण पुरुष तो असे ॥ ८ ॥ कवण काज धरूनि मनीं ॥ निवांत गुहेंत रमला शयनीं ॥ साद्यंत वृत्त मज लागुनी ॥ श्रवण करवीं दातारा ॥ ९ ॥ श्रीशुक ह्मणे विष्णुराता ॥ इक्ष्वाकुकुळज मांधाता ॥ त्याचा पुत्र मुचुकुंद ताता ॥ महापराक्रमी तो असे ॥ १० ॥ अमरनाथें त्या महावीरासी ॥ प्रार्थूनि नेलें स्वर्गासी ॥ स्वरक्षणार्थ तेंं तयासी ॥ रक्षणीं बहु श्रम झाले ॥ ११ ॥ नंतर देवां सेनापती ॥ स्वामी कार्तिक मिळतां पुढती ॥ सकळ देव मुचुकुंदा ह्मणती ॥ बहुत श्रम तुज जाहले ॥ १२ ॥ आतां स्वस्थ रहा आपण ॥ तव कामना होवो पूर्ण ॥ दारा सुत बंधु स्वजन ॥ कोणी सांप्रत नसती बा ॥ १३ ॥ तुझें कल्याण असो राया ॥ वरदान सांगें या समया ॥ ऐसें ऐकूनि मुचुकुंदराया ॥ काय बोलता जाहला ॥ १४ ॥ वंदन करूनी नरनाथ ॥ ह्मणे मी जाहलों श्रमपीडित ॥ यास्तव निद्रा देणें बहुत ॥ विश्रामाकारणें ॥ १५ ॥ देव हो परिसा एक वाणी ॥ मध्यंतरीं जागृत करील कोणी ॥ तो भस्म व्हावा तत्क्षणीं ॥ ऐकूनि तथास्तु ते वदती ॥ १६ ॥ वंदन करूनी पुढती ॥ गुहेंत पावला भूपती ॥ देवदत्त निद्रेप्रती ॥ ग्रहण करिता जाहला ॥ १७ ॥ यवन भस्म जाहल्यावरी ॥ मुचुकुंदासी दर्शन श्रीहरी ॥ देता जाहला ते अवसरीं ॥ ध्वांतागारीं जाणिजे ॥ १८ ॥ चतुर्भुज श्यामसुंदर ॥ श्रीवत्सलांछन कौस्तुभधर ॥ देदीप्यमान वसुदेवकुमर ॥ आत्मतेजें प्रका

शित ॥ १९ ॥ राजा बोले हळुच उत्तर ॥ तूं काय होशी भास्कर ॥ किंवा असशी वैश्वानर ॥ इंद्र चंद्र लोकपती ॥ २० ॥ कीं ब्रह्मादि देवांमाजी लजाण ॥ तूं महाविष्णु नारायण ॥ आत्मतेजें प्रकाशमान ॥ सकळ गुहा हीं केली ॥ २१ ॥ कृपा करूनीं आम्हांसी जन्मकर्म अभिधानांसी ॥ सांगा आतां सौख्यराशी ॥ माझें वृत्त अवधारा ॥ २२ ॥ मी इक्ष्वाकुकुलोद्भव जाण ॥ मुचुकुंद मांधातृनंदन ॥ करीत असतां निद्राग्रहण ॥ कोणीं मज लाउठविलें ॥ २३ ॥ माझ्या दृष्टिपातें निश्चित ॥ पुरुष जाहला भस्मीभूत ॥ अनंतर प्रभो लक्ष्मीकांत ॥ पूर्वपुण्यें देखिलें तुम्हां ॥ २४ ॥ तुझें तेज सहन आतां ॥ न करवे बा भगवंता ॥ ऐसें वचन परिसतां ॥ बोले तेधवां श्रीहरी ॥ २५ ॥ माझीं जन्मकर्में असंख्यात ॥ तीं जाणावया कोणी नाहीं समर्थ ॥ तथापि हे राजा प्रस्तुत ॥ सांगतों तें ऐक बा ॥ २६ ॥ विधिप्रार्थनें करून ॥ भूभार करावया हरण ॥ वसुदेवगृहीं अवतीर्ण ॥ वासुदेव मी जाहलों ॥ २७ ॥ मी कालनेमि कंस मारिला ॥ साधुद्वेषी प्रलंब वधिला ॥ तव दृष्टिपातें यवनाला ॥ भस्मीभूत करवीलें ॥ २८ ॥ ऐसा मी जगजेठी ॥ तुझ्या अनुग्रहासाठीं ॥ गुहेंत प्राप्त जाहलों शेवटीं ॥ इच्छित वर माग आतां ॥ २९ जे भक्त मज पावले ॥ ते मागुती संसारीं नाहीं आले ॥ ऐसें श्रीकृष्णें बोलिलें ॥ मुचुकुंदा कारणें तेधवां ॥ ३० ॥ श्रीशुक म्हणे परीक्षिती ॥ नारायण याजाणूनि चित्तीं ॥ स्तवन करीत से भूपती ॥ भावभक्तीयुक्त हो ॥ ३१ ॥ हे देवा सकल जन ॥ तव मायामोहित जाण ॥ कदा न करिती तुझें भजन ॥ याचें कारण परिसावें ॥ ३२ ॥ नरजन्मांत आलिया प्राणी ॥ जे न भजती चक्रपाणी ॥ ते चि द्विपद पशु हे वाणी ॥ सत्य जाणा निर्धारें ॥ ३३ ॥ श्रीसदेहें होऊनि मत्त ॥ दारासुतगृहासक्त ॥ असतां दिवस गेले बहुत ॥ व्यर्थ माझे श्रीकृष्णा ॥ ३४ ॥ सत्संग आणी तुझी भक्ती ॥ येणें चि लाधे प्राणियां मुक्ती ॥ तव अनुग्रहें संसारीं विरक्ती ॥ मानिली देवा साचपैं ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ चिरमिह वृजिनार्तस्तप्यमानोनुतापैरवितृषषडमित्रोलब्ध

शांतिः कथंचित् ॥ शरणद समुपेतस्त्वत्पदाब्जं परात्मन्नभयमृतमशोकं पाहि मापन्नमीश ॥ ५९ ॥ टीका ॥ चिरकालया संसारांत ॥ कर्मपाशांनीं पीडित ॥ फलवासनानीं तापयुक्त ॥ सर्वदा चित्त जयाचें ॥ ३६ ॥ इंद्रियशत्रु अतृप्त ज्याचे ॥ सौख्य लाधलें नाहीं शांतीचें ॥ यास्तव निःसार हें जाणून साचें ॥ तव पदीं शरण आहें मी ॥ ३७ ॥ तें तुझें चरणकमळ ॥ शोक निवारूनी सकळ ॥ मोक्षसुख देतें विमळ ॥ यास्तव रक्षण करावें ॥ ३८ ॥ श्रीकृष्ण ह्मणे मुचुकुंदासी ॥ निर्मळ भक्ती तुझे मानसीं ॥ सदा सर्वदा वसो निश्चयेंशीं ॥ माझ्या वरें करूनियां ॥ ३९ ॥ हे राया माझे ठायीं मन ॥ अखंड करी गा स्थापन ॥ अव्यभिचारिणी भक्ति तुज लागून ॥ प्राप्त होवो मुचुकुंदा ॥ ४० ॥ क्षात्रधर्मामाजी बहुत ॥ जंतुवधाचें पाप अमित ॥ घडलें ह्मणूनि तप वनांत ॥ करावया जावें लां ॥ ४१ ॥ राजा जन्मांतरीं ब्राह्मण ॥ होऊनियां पावन ॥ मज पावसील खरें करून सत्य वचन जाणिजे ॥ ४२ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ एकपंचाशत्तमाध्याय गोड हा ॥ ४३ ॥ ५१ ॥ द्विपंचाशत्तमाध्याय प्रारंभः ॥ श्रीशुक ह्मणे परीक्षिती ॥ कृष्णें अनुग्रह करितां निश्चितीं ॥ तप करावयाशी प्रगती ॥ जाता जाहला मुचुकुंद ॥ १ ॥ गुहेंतूनि बाहेर निघतां ॥ क्षुद्र नरनारी अवचितां ॥ पाहूनि ह्मणे कलियुगसत्ता ॥ प्राप्त जाहली प्रस्तुत ॥ २ ॥ नंतर उत्तरदिशेसी जाऊन ॥ श्रीकृष्णचरणीं मन स्थापून ॥ बदरिकाश्रमीं तपाचरण ॥ करिता जाहला तेधवां ॥ ३ ॥ गुहा त्यागूनी श्रीधर ॥ मागुती पावला मथुरानगर ॥ सर्व सैन्यांचा करूनी संहार ॥ वित्त नेववी कुशस्थळीं ॥ ४ ॥ इतुक्यामाजी मागधनृपती ॥ तेवीस अक्षौहिणी सैन्यसंगती ॥ घेऊनि आला मागुती ॥ युद्धकंदन करावया ॥ ५ ॥ जरासंधासी देखूनि हरी ॥ रामासहित पळे सत्वरी ॥ द्रव्य सांडूनि पृथ्वीवरी ॥ वनांतरीं शिरती ते ॥ ६ ॥ मागें जरासंध लागला ॥ सैन्यासहित रागें जळा ॥ तों दूर जाऊनि विचार के-

ला॥ वसुदेवपुत्रींतेकाळीं॥ ७ ॥ प्रवर्षणनामेंगिरीवरी॥ रामकृष्णचढलेसत्वरी॥ मागधेंदेखूनितेअवसरीं॥ अपायमनींयोजिला॥ ८॥ काष्ठेंघालूनिपर्वतासी॥ सभोंवतीलाविलेंअग्नीसी॥ ज्वाळाजातीआकाशीं॥ महाअनर्थमांडिला॥ ९॥ एकादशयोजनेंउंचपर्वत॥ तेथेंगुप्तस्थानींवसुदेवसुत॥ असतांज्वाळास्पर्शेनिश्चित॥ नंतरकायकरितीते॥ १०॥ शत्रुदृष्टीचुकवूनित्वरित॥ गिरिशिखराहूनिनिश्चित॥ भूतळवरीअकस्मात॥ उडीमारितीबलरामकृष्ण॥ ११॥ तेथूनिरामकृष्णनाथ॥ पलायनकरूनिनिश्चित॥ येतेजाहलेद्वारावतींत॥ सकळसुहृदांभेटले॥ १२॥ रामकृष्णपावलेदहन॥ पर्वताग्नीमाजीजाण॥ ऐसेंमानसींजाणून॥ ससैन्यमागधगृहींगेला॥ १३॥ विधिवचनेंरेवतनृपती॥ स्वसुताघेऊनिरेवती॥ देताजाहलाबलरामाप्रती॥ नवमस्कंधींकथिलेंहें॥ १४॥ हेभारताश्रीकृष्णायावरी॥ भीष्मकसुतायोग्यनोवरी॥ राक्षसविधीकरूनिवरी॥ चैद्यादिसमरींजिंकूनी॥ १५ नृपह्मणेभीष्मकनंदिनी॥ भाग्यशालिनीरुक्मिणी॥ ईतेंराक्षसविधीनेंचक्रपाणी॥ वरीऐसेंऐकिलेंम्यां॥ १६॥ जरासंधशाल्वादिप्रबळ॥ रणींजिंकूनिभूपाळ॥ कैसाहरणकरीश्रीगोपाळ॥ भीष्मकराजकन्येतें॥ १७॥ श्रीकृष्णतेजस्वीअमित॥ वासुदेवत्रैलोक्यनाथ॥ तयाचापराक्रमपुनीत॥ ऐकावयाइच्छीतसें॥ १८॥ कृष्णकथाकरितांश्रवण॥ तेसेंभावेंकरितांपठण॥ अनेकजन्मार्जितपातकेंदारुण॥ जातीविलयाकारणें॥ १९॥ शुकह्मणेराजाविदर्भाधिपती॥ भीष्मकनामामहीपती॥ तयापंचपुत्रकन्यासुदती॥ एकअसेसभाग्या॥ २०॥ ॥ रुक्मीआणिरुक्मरथ॥ रुक्मबाहूनिजाविख्यात॥ रुक्मकेशरुक्ममालीनिश्चित॥ कन्यासह्मावीरुक्मिणी॥ २१॥ श्रीकृष्णागुणश्रवणकरितां॥ भीमकीलुब्धलीतत्वतां॥ कांतह्मावयाकृष्णनाथा॥ चिंतनकरितीजाहली॥ २२॥ मायबापांचीसंमती॥ कृष्णाविषयींअसेचित्तीं ॥

कृष्णाद्वेषी रुक्मिया निश्चिती ॥ ह्मणे देईन चैद्यातें ॥ २३ ॥ ती वार्ता करूनी श्रवण ॥ सकुमारी जाहली खिन्न ॥ म्हणे-
आलें महाविघ्न ॥ काय आतां करावें ॥ २४ ॥ मग विचार करूनी कांहीं ॥ आपुला हितकर्त्ता विप्र पाहीं ॥ पाचारूनि द्वारके-
सी लवलाहीं ॥ देऊनि पत्रिका धाडीत्या ॥ २५ ॥ मनोवेगें करूनी सत्वरी ॥ विप्र पातला द्वारकापुरीं ॥ प्रवेश केला महाद्वा-
रीं ॥ महानंद करूनियां ॥ २६ ॥ श्रीकृष्णा पाहूनि नयनीं ॥ विप्रासी संतोष बला मनीं ॥ हेमसिंहासन त्यागूनी ॥ सन्मुख
धांवला आदरें ॥ २७ ॥ ब्राह्मणासी करून वंदन ॥ घातलें तया मंगलस्नान ॥ वसन चंदन सुमन ॥ उत्तम भोजन दिध-
लें ॥ २८ ॥ शय्या घालूनि एकांतीं ॥ चरण चुरितसे श्रीपती ॥ त्या परी पाहूनि सद्भक्ति ॥ विप्र बोले यादवेंद्रा ॥ २९ ॥ प
रिसें श्रीधरा माझें वचन ॥ मीं तों करावें तुझें पूजन ॥ तूं पूर्णब्रह्म सनातन ॥ कां गा करिसी हें ऐसें ॥ ३० ॥ कृष्ण ह्मणे इं-
द्रसंपत्ती ॥ असतां तृप्ती न से ज्याचे चित्तीं ॥ संसारांत याची फजिती ॥ सर्वदा निश्चित जाणिजे ॥ ३१ ॥ दारिद्र्य ही गृहीं
असतां ॥ प्रसन्नता ज्याचे चित्ता ॥ तो मज प्रिय अनंता ॥ दैवत पूर्ण ते माझें ॥ ३२ ॥ असो पाहतां श्रीकृष्णध्यान ॥ मौन
पडलें ब्राह्मणा लागून ॥ जाहलें कार्याचें विस्मरण ॥ प्रभु जाणूनी प्रश्न करी ॥ ३३ ॥ कवण स्थान कोठून येणें ॥ जाहलें
स्वामियां आह्मां बोलणें ॥ प्रजापालन धर्म जाणे ॥ ऐसा भूपती असे कीं ॥ ३४ ॥ आमुचे भेटी करितां ॥ दुरूनि आला
द्विजनाथा ॥ काय इच्छा असे चित्ता ॥ ती समर्था पुरवीन मी ॥ ३५ ॥ आपण आलां तज्या कार्यासी ॥ ते गुह्य न से-
तरी सांगावें आह्मांसी ॥ ऐशा परिसूनि वाक्यासी ॥ द्विज पत्रिका वाचीतसे ॥ ३६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ रुक्मिण्युवा
च ॥ ॥ श्रुत्वा गुणान् भुवनसुंदर शृण्वतां ते निर्विश्य कर्णविवरैर्हरतोंऽगतापम् ॥ रूपं दृशां दृशिमतामखिला-
र्थलाभं त्वय्यच्युताविशति चित्तमपत्रपं मे ॥ १ ॥ टीका ॥ हे भुवनसुंदरा अच्युता ॥ श्रोत्यांच्या श्रवणीं तव गुण

जातां॥ त्रितापहरनीकृष्णानाथा॥ सौख्य लाधे भक्तांचें॥ ३७॥ नेत्रवंतप्राणियांतुझेंदर्शन॥ सर्वार्थदायकअसेपूर्ण ऐसेंतुझेंरूपअवलोकून॥ निर्लज्जमनसक्तहोतें॥ ३८॥ ॥श्लोक॥ ॥कात्वामुकुंदमहतीकुलशीलरूपविद्या-वयोद्रविणधामभिरात्मतुल्यम्॥ धीरापतिंकुलवतीनवृणीतकन्याकालेनृसिंहनरलोकमनोभिरामम्॥ २॥ टीका आपणआणालकांहींमनांत॥ कुलीनकन्यांनीस्वातंत्र्येंनिश्चित॥ परपुरुषासीधाडणेंलिखित॥ हेंसाहसअद्भुतपैं॥ ३९॥ ऐसेंनाणावेंगाचित्तीं॥ हेनरश्रेष्ठामुकुंदश्रीपती॥ कवणकुलीनकन्यागुणवती॥ धीरवतीतुजवरीना॥ ४०॥ ऐसें-असतांमनमोहना॥ व्यर्थकांशंकाघ्यावीमना॥ रूपशीलादिकींपावना॥ आनंददायकतुह्मीआहां॥ ४१ ॥श्लोक तन्मेभवान्खलुवृतःपतिरंगजायामात्मार्पितश्चभवतोऽत्रविभोविधेहि॥ मावीरभागमभिमर्शतुचैद्यआराद्गोमा-युवन्मृगपतेर्बलिमंबुजाक्ष॥ ३॥ टीका ॥प्रभोमीमनेंआपणांसी॥ पतिलेंवरिलेंसौख्यराशी॥ देहअर्पिला-चरणासी॥ येऊनिग्रहणकरावा॥ ४२॥ हेकमलपत्राक्षाहरी॥ वीरमुगुटमणीतुह्मीतरी॥ त्यातुमच्याभागास्पर्श करी॥ चैद्यजंबुकयेधवां॥ ४३॥ सिंहाचाभागजंबुकेंघेणें॥ हेंतोंनघडोलाजीरवाणें॥ मीतुह्मांवरिलेंआपुलेमनें॥ अनुग्रहकरीसर्वेश्वरा॥ ४४॥ ॥श्लोक॥ ॥पूर्तेष्टदत्तनियमव्रतदेवविप्रगुर्वर्चनादिभिरलंभगवान्परेशः॥ आराधितोयदिगदाग्रजएत्यपाणिंगृण्हातुमेनदमघोषसुतादयोऽन्ये॥ ४॥ टीका ॥वापीकूपआरामज्ञाण व्रतनियमयज्ञदान॥ देवविप्रगुरुपूजन॥ जरीकेलेंअसतील॥ ४५॥ ऐसेंआराधनजन्मांतरीं॥ जरीघडलेंअसे लमाझ्याकरीं॥ तरीश्रीकृष्णयेऊनिझडकरी॥ पाणिग्रहणकरोमाझें॥ ४६॥ ॥श्लोक॥ ॥श्वोभाविनित्वमजि-तोद्वहनेविदर्भान्गुप्तःसमेत्यपृतनापतिभिःपरीतः॥ निर्मथ्यचैद्यमगधेंद्रबलंप्रसह्यमांराक्षसेनविधिनोद्वहवी

यशुल्कास्॥ ५॥ टीका ॥कदाचित्आपणह्मणालमनीं॥ शिशुपालासीदिधलेंबांधवांनीं॥कायकरावेंमीयेक्ष-
णीं॥तरीउपायसांगतें॥ ४७॥ विवाहाचेपूर्वदिवसीं॥श्रीहरियावेंविदर्भदेशीं॥गुप्तपणेंसहसेनेशीं॥ शीघ्रप्रग
टपैंह्वावें॥४८॥चैद्यमागधसेनेचा॥वधकरूनियांसाचा॥माझादेहपराक्रममोलाचा॥ घेऊनिवेगेंजावेंहो॥ ४९॥राक्ष
सविधीनेंआपण॥ देवाकरावेंपाणिग्रहण॥तेणेंमाझेहेतुपूर्ण॥सहजहोतीलगोविंदा॥५०॥ ॥श्लोक॥ ॥अंतःपु
रांतरश्चरीमनिहत्यबंधूंस्त्वामुद्वहेकथमितिप्रवदाम्युपायम्॥ पूर्वेद्युरस्तिमहतीकुलदेवियात्रायस्यांबहिर्नववधूर्गिरि
जामुपेयात्॥ ६॥ टीका ॥अंतःपुरींतुजराहणें॥तेथेंकैंचेंआमुचेंयेणें॥समयप्राप्तहोतांबांधववधणें॥प्राप्तहो-
ईलआह्मांसी॥ ५१ ॥ऐसेंनह्मणावेंयदुनायका॥याचाउपायसांगतेंऐका॥लग्नाचेपूर्वदिवशींदेखा॥देवीयात्राकु
लधर्म॥ ५२॥नववधूनेंतीदर्शनासी॥आपणयावेंतेसमयासी॥हरणकरूनीस्वस्थानासी॥घेऊनिजावेंदयार्णवा
५३॥ ॥श्लोक॥ ॥यस्यांघ्रिपंकजरजःस्नपनंमहांतोवाञ्छंत्युमापतिरिवात्मतमोपहत्यै॥ यर्ह्यंबुजाक्षनलभे-
यभवत्प्रसादंजह्यामसून्व्रतकृशान्शतजन्मभिःस्यात्॥७॥ टीका ॥हेंकरण्यासीसंकटबहुत॥ह्मणा-
लवरावादमघोषसुत॥तरीप्रतिज्ञावचनमाझेंनिश्चित॥श्रवणकरीयादवेंद्रा॥ ५४॥ज्याचेंचरणरजस्नान॥
इच्छितीशिवादिगुरुजन॥कींजाऊनिनिजाज्ञान॥मोक्षनिधानलाधतें॥५५॥तेतुह्मीयेथेंयेऊनिसत्वर॥जरी-
नकरालमाझास्वीकार॥तरीतुमच्याप्राप्तीस्तवसाचार॥उपायशतकरीनमी॥ ५६॥व्रतेंउपोषणेंकरूनीभारी॥दे
हशुष्ककरीननिर्धारीं॥नवप्राप्तीकरितांमुरारी॥शतजन्मांतरींकष्टेनमी॥ ५७॥विप्रह्मणेहृषीकेशी॥ भीमकी
चानिरोपआपणांसी॥कथनकेलासौख्यराशी॥उचितदिसेलतेंकरा॥५८॥श्रीमद्भागवतसारामृत॥ दशम

स्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ द्विपंचाशत्तमाध्यायगोड हा ॥ ५१ ॥ ५२ ॥ त्रिपंचाशत्तमाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्रीशुकम्हणेकुरुनाथा ॥ श्रीहरिरुक्मिणीनिरोपऐकतां ॥ जाहलाविप्राबोलता ॥ कायतेंचीअवधारीं ॥ ॥ १ ॥ हेविप्रारुक्मिणीचेंमन ॥ माझेठायींआहेपूर्ण ॥ तद्वतमाझेंहीसुमन ॥ तिचेस्वरूपींगुंतलें ॥ २ ॥ निद्रानलागे रजनींत ॥ जाहलोंबहुचिंताक्रांत ॥ रुक्मीविवाहनिवारीनिश्चित ॥ हेंकृत्यसर्वमीजाणें ॥ ३ ॥ समस्तराजेजिंकूनिरणीं ॥ वेगेंआणीनरुक्मिणी ॥ विवाहअसेपरवांचेदिनीं ॥ जाणूनिसूतावाहिलें ॥ ४ ॥ दारुकासिम्हणेश्रीहरी ॥ माझारथसिद्धकरी ॥ अश्वजुंपूनियांझडकरी ॥ घेऊनियेयेंयेधवां ॥ ५ ॥ दारुकेंवंदूनिचरण ॥ रथआणिलाजोडून वरीआरूढलानारायण ॥ सवेंब्राह्मणबैसविला ॥ ६ ॥ एकरात्रीमाजीनिश्चिती ॥ विदर्भदेशागेलाश्रीपती ॥ पुत्रस्नेहबहुविदर्भनृपती ॥ चैद्यजामाताकरूंपाहे ॥ ७ ॥ स्वस्तिवाचनादिप्रकार ॥ करिताजाहलानृपवर ॥ पुत्रस्नेहेंज यांचेंअंतर ॥ बहूजाहलेंसर्वदा ॥ ८ ॥ नगरशृंगारिलेंचहूंकडे ॥ मंगळतुरेंजिकडेतिकडे ॥ मखरेंतोरणेंपताकापुढें लावूनिसाजिरेंकेलेंतें ॥ ९ ॥ चंदनपुष्पेंआभरणें ॥ नरनारीउत्तमप्रावरणें ॥ अलंकृतहोतीतैसन्मानें ॥ देवपितृ-पूजनकरीभूप ॥ १० ॥ भोजनदिधलेंब्राह्मणांसी ॥ दक्षिणातांबूलसन्मानेंशीं ॥ मंगळस्नानरुक्मिणीसी ॥ घालूनि भूषितकेलीअसे ॥ ११ ॥ ऋग्वेदादिमंत्रेंकरून ॥ तियेचेंकरितीरक्षाबंधन ॥ पुरोहितयेऊनिआपण ॥ ग्रहशांती-करीतसे ॥ १२ ॥ तेधवांभीमकनृपवर ॥ द्विजांसीअर्पीदक्षिणासादर ॥ रजतसुवर्णतिळमिश्र ॥ धेनूसवत्सद्विजांदे ॥ १३ ॥ तैसाचैद्यदमघोषनृपती ॥ पुत्रउदयाचाअर्थी ॥ सविधानदानेंविप्रांप्रती ॥ अर्पणकरिताजाहला ॥ १४ ॥ चतुरंगसेनेसहित ॥ चैद्यआलाकुंडिनपुरांत ॥ रायेंपूजूनियांत्वरित ॥ जानवसासीआणिलें ॥ १५ ॥ तेंजरासंधमा

गधेश्वर ॥ दंतवक्रादिराजे थोर ॥ चैद्यपक्षपाती अनिवार ॥ दळभारेंशीं पातले ॥ १६ ॥ जेणें करूनी नोवरी ॥ शिशुपालाचे येईल करीं ॥ ऐसीच करणी करूं तरी ॥ पक्षपाती साच हो ॥ १७ ॥ ऐसें बोलती नृपवर ॥ असो इकडे काय जाहला प्रकार ॥ रामासि कळला समाचार ॥ रुक्मिणीहरणार्थ हरि गेला ॥ १८ ॥ मग सिद्ध करूनी वाहिनी ॥ संगें घेऊनि यादवश्रेणी ॥ बळिभद्र निघाला तेक्षणीं ॥ कुंडिनपुरा जावया ॥ १९ ॥ तदा रुक्मिणी सदनांत ॥ मार्गप्रतीक्षा करी सचिंत ॥ द्विजपाठविला पत्रिकेसहित ॥ कां तो न ये अद्यापि ॥ २० ॥ न जाणें कारण त्याचें कांहीं ॥ आतां काय करावें बाई ॥ मीं साहस केलें ह्मणूनि पाहीं ॥ शेषशायी न च पावे ॥ २१ ॥ अथवा मी भाग्यहीन ॥ दैव प्रतिकूळ झालें पूर्ण ॥ किंवा गोरी मज लागून ॥ अनुकूल नाहीं ये धवां ॥ २२ ॥ चिंतन करितां या परी ॥ शुभशकुन जाहले ते अवसरीं ॥ वामोरु भुज नेत्र सलरी ॥ स्फुरण पावती ते धवां ॥ २३ ॥ इतुक्यामाजी ब्राह्मण ॥ धांवत आला न लागतां क्षण ॥ पाहूनि सुखश्री शोभायमान ॥ भीमकी वंदन करी तेव्हां ॥ २४ ॥ विप्रें कथिलें वर्तमान ॥ शुभांगी तुज वराया भगवान ॥ रामासह यादवसेना घेऊन ॥ पुरानिकट पातला ॥ २५ ॥ रामकृष्ण यादवपती ॥ आले ऐकूनि भीष्मकनृपती ॥ सामोरा जाऊनि तयां प्रती ॥ पुजूनि चित्तीं तोष विपें ॥ २६ ॥ सर्व राजांचें आतिथ्य थोर ॥ करिता जाहला भीमकनृपवर ॥ पौरजन पाहूनि श्यामसुंदर ॥ ह्मणती योग्य भीमकीसी ॥ २७ ॥ रुक्मिणीसी कृष्णनाथ ॥ विवाहकाळीं हो वो कांत ॥ ऐसें बोलती जन समस्त ॥ पुरामाजी ते धवां ॥ २८ ॥ भीमक ह्मणे रुक्मियासी ॥ आतां करणें कुळधर्मासी ॥ लग्नाचिये पहिले दिवसीं ॥ नोवरी न्यावी अंबिकालयीं ॥ २९ ॥ तें मान्य करूनियां वचन ॥ चतुरंग दळ सिद्ध करून ॥ मध्यभागीं रुक्मिणी ठेवून ॥ जाती घेऊन अंबालया ॥ ३० ॥ सखीजनासहित ॥ रुक्मिणी पंथ क्रमी त्वरित ॥ शस्त्रें झळकती लखलखि

त॥ सभोंवतीजयेच्या॥ ३१॥भवानीचरणींराजबाळा॥वंदनकरीतयेवेळा॥पूजनाचाकरूनीसोंहळा॥स्तवनक
रीसद्भावें॥३२॥ ॥श्लोक॥ ॥नमस्येत्वांबिके॰भीक्ष्यांस्वसंतानयुतांशिवाम्॥भूयात्सतिर्मेभगवान् कृष्यास्त
दनुमोदताम्॥४६॥ टीका ॥प्रार्थनाकरितेरुक्मिणी॥हेअंबिकेप्रणवरूपिणी॥गणेशासहितकुलस्वामिणी॥
विज्ञप्तिकरितेंअवधारीं॥ ३३॥माझाहोवोकृष्णपती॥तूंह्मणशीलआपुलेचित्तीं॥स्वस्वरूपींरममाणश्रीपती॥अ
सतांकेसेंहेंघडे॥३४॥तरीतूंचीतच्छक्तिप्रत्यक्ष॥जगदंबेसर्वसाक्ष॥माझाधरूनियांपक्ष॥अनुमोदनत्वांद्यावें
३५॥ऐसेंस्तवनकरितां॥पुष्पमालाआलीहाता॥ह्मणेहीचघालूनीश्रीयदुनाथा॥मनकामनापुरवीन॥३६॥वा-
यनेंदेऊनिसुवासिनींसी॥विडेतांबूलकंठसूत्रांसी॥अर्पूनियांसद्भावेंशीं॥तयांलागींतोषविते॥३७॥विप्रस्त्रि
यादेतीआशीर्वचन॥तयांसीनमूनिअंबिकाचरण॥वंदनकरूनीरुक्मिणीआपण॥सैन्यअवलोकनकरीतसे॥
३८॥वीरसोहिनीराजसुता॥चतुरंगसैन्यअवलोकितां॥गजाश्वांवरूनीवीरतळतां॥पृथ्वीवरीपडियेले॥३९॥इ-
तुक्यामाजीश्रीहरी॥रथारूढहोऊनिझडकरी॥हस्तदेऊनिभीमककुमरी॥हरणकरिताजाहला॥४०॥राज
चक्राचाकरूनीभेद॥अकस्मातयेऊनिगोविंद॥रुक्मिणीचापुरवीछंद॥भक्तकामकल्पद्रुम॥४१॥हिरमुष्टी-
होऊनिनृपवर॥बोलतेजाहलेपरस्पर॥गोवळेंयशनेलेंसमग्र॥आह्मांधिक्कारहाअसो॥४२॥श्रीमद्भागवत
सारामृत॥दशमस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥त्रिपंचाशत्तमाध्यायगोडहा॥४३॥ ५३॥चतुःपं
चाशत्तमाध्यायप्रारंभः॥ ॥श्रीशुकह्मणेपरीक्षिती॥भीमकीहरणकरीश्रीपती॥ऐसेंपाहूनिअन्यनृपती॥सक्रोध
चित्तींजाहले॥१॥स्वसैन्यघेऊनिअमित॥संग्रामींभिडलेबहुत॥परस्परेंयुद्धकरित॥अतिवेगानेंतेधवां॥ २॥

जरासंधादिनृपवर ॥ यादवांवरी वर्षती शर ॥ पतिसैन्य व्याकुळ समग्र ॥ पाहूनि त्रस्त भीमकी ॥ ३ ॥ चित्तीं होऊनि भयाक्रांत श्रीकृष्णावदनन्याहाळी दुःखित ॥ तें जाणूनि मनांत ॥ अभय देनाथ तियेतें ॥ ४ ॥ हास्यवदन करूनी श्रीपती ॥ बोलता जाहला रुक्मिणीप्रती ॥ भय न मानूनीं निज चित्तीं ॥ स्वस्थ आतां असावें ॥ ५ ॥ यादव वीर अति गाढे ॥ परसैन्य काय त्यांपुढें ॥ मशकसमान बापुडें ॥ आतां च नाश करिती लगे ॥ ६ ॥ म गगद संकर्षणादि वीर ॥ परोत्कर्ष पाहूनि फार ॥ सोडूनि निर्वाणशर ॥ जर्जर तयां बहु करिती ॥ ७ ॥ रथ गज अश्वांवर ॥ आरोहण करणारे जे वीर ॥ त्यांचीं सकुंडल मस्तकें अपार ॥ छेदूनि यां टाकिलीं ॥ ८ ॥ करचरणरहित ॥ कित्येक रणांत ळमळित ॥ कोणी पाणी द्या म्हणत ॥ घायाळ ते थपडियेले ॥ ९ ॥ कोट्यावधी शत्रुशिरें ॥ यादव उडविती परभारें ॥ पराभव पावूनि सारे ॥ पलायन करिती ते ॥ १० ॥ शुष्कवदन दमघोषनंदन ॥ चिंताक्रांत बैसला आपण ॥ तें जरासंध देखून ॥ बोलता जाहला तयासी ॥ ११ ॥ हें चैद्या नको वेंदुश्चित ॥ सप्तदश वार पराभूत ॥ मी जाहलों समरांत ॥ एक वेळ जय आला ॥ १२ ॥ यश आलिया पूर्ण ॥ अथवा लाधलीया अपयश जाण ॥ उभयां मानूनि सम समान ॥ धीमंतें स्वस्थ असावें ॥ १३ ॥ काळ अनुकूळ यादवांसी ॥ प्रतिकूळ जाहला आपणांसी ॥ बळपराक्रम काय करिसी ॥ व्यर्थ शोक करूं नको ॥ १४ ॥ आपणांसी काळ साह्य होतां ॥ यादवांसी जिंकूं बालखतां ॥ हा बोध मानूनि होपरता ॥ फार आतां वदूं काय ॥ १५ ॥ ऐसें ऐकूनि शिशुपाळ ॥ निज नगरा निघाला तात्काळ ॥ आणिक मागधशाल्व नृपाळ ॥ स्वपुरीं पावले तेधवां ॥ १६ ॥ एक अक्षौहिणी दळ ॥ रुक्मियामेळवी तात्काळ ॥ सक्रोध चित्तें उतावेळ ॥ भीमकाजवळ पातला ॥ १७ ॥ रायासि म्हणे तेक्षणीं ॥ श्रीकृष्णा जिंकूनियां रणीं ॥ सदनीं न आणितां रुक्मिणी ॥ पुरीं प्रवेशन करीं मी ॥ १८ ॥ ऐसें बोलूनि तेअ

वसरीं॥ आपणबैसलारथावरी॥ सारथ्यासीह्मणेझडकरी॥ रथहांकीयेधवां॥ १९॥ सूताजेथेंवसुदेवसुत॥
असेतेथेंन्यावारथ॥ बाणेंहरूनिमदसमस्त॥ पराभवकरीनमी॥ २०॥ सन्मुखश्रीहरिपाहून॥ रुक्मियाबोले
वचन॥ उभाराहेतस्कराक्षणा॥ भगिनीहरणकरिसीकसा॥ २१॥ मतिमंदागोवळा॥ कोठेंनेसीभीमकबाळा॥
माझेशरींतुजयेवेळां॥ मरणारोकडेंपातलें॥ २२॥ जोंवरीसोडिलानाहींबाण॥ तोंवरीवांचवींआपुलाप्राण॥ रुक्मि
णीसोडूनिपलायन॥ शीघ्रकरीकपटिया॥ २३॥ श्रीकृष्णेंपरिसूनिवाणी॥ धनुष्यसंजोगिलेंबाणीं॥ रुक्मियाचें
चापतेक्षणीं॥ सहाबाणींछेदिलें॥ २४॥ आठबाणेंकरूनीनिश्चिती॥ चारीअश्वपाडिलेक्षिती॥ दोनबाणेंकरू-
नीसारथी॥ यमनगरापाठविला॥ २५॥ तीनबाणींध्वजछेदिला॥ पाहूनिरुक्मियाकोपला॥ अन्यधनुष्यघेऊ-
नितेवेळां॥ युद्धकरीनिकरानें॥ २६॥ पांचबाणतेणेंसोडिले॥ श्रीकृष्णासीआच्छादिलें॥ त्यांचेंनिवारणकरू-
निमलें॥ कोदंडछेदितोकरींचें॥ २७॥ अन्यधनुष्यघेतांकरीं॥ तेंहींतोडिलेंझडकरी॥ मगशूलपट्टिशतोमरधारी
होऊनिमारीयादवेंद्रा॥ २८॥ तेंहीतोडिलेसकळ॥ मगरुक्मियाघेऊनिपाशजाळ॥ रथावरूनीतात्काळ॥ मही-
माजीउतरला॥ २९॥ खड्ग घेऊनियांकरीं॥ धांवेकृष्णाचेअंगावरी॥ पतंगदीपन्यायापरी॥ प्रकारघडेतोराजा॥
३०॥ तेंखड्गछेदूनि नारायण॥ रुक्मियाचाघेऊंपाहेप्राण॥ तोंसभयचित्तेंरुक्मिणीयेऊन॥ निवारणकरीतसे॥
३१॥ ॥श्लोक॥ ॥योगेश्वराप्रमेयात्मन्देवदेवजगत्पते॥ हंतुंनार्हसिकल्याणभ्रातरंमेमहाभुज॥ ३३॥ टीका॥
मधुरोत्तरेंरुक्मिणी॥ प्रार्थितीजाहलीचक्रपाणी॥ हेयोगेश्वरापरिसावाणी॥ कृपाकरूनीदासीची॥ ३२॥ हेदेवा-
धिदेवा॥ हेजगत्पतेवासुदेवा॥ हेमहाभुजाकेशवा॥ दयार्णवाबंधुनमारी॥ ३३॥ तेंरुक्मिवधापासूनिनिवृत्त॥

स्वयें होउनि कृष्णानाथ ॥ वस्त्रेंदृढ बांधूनि त्वरित ॥ पांच पाट शिरीं काढिल्याचे ॥ ३४ ॥ विरूप करूनी तयासी ॥ मग हरि म्हणे रुक्मिणीसी ॥ दिपवाळी कल्पूनि मानसीं ॥ ओंवाळी शीघ्र बंधुराया ॥ ३५ ॥ ऐसी पाहूनि विरूपता ॥ संकर्षण बोले कृष्णानाथा ॥ सुहृदा विटंबन सर्वथा ॥ कधीं आपण करूं नये ॥ ३६ ॥ रुक्मिणीसी वदे बलराम ॥ क्षत्रियांचा कठिण नियम ॥ दारुण मांडिलिया संग्राम ॥ आप पर न म्हणावें ॥ ३७ ॥ नाना देहीं आत्मा एक ॥ सुख दुःखें होती अनेक ॥ तीं सर्व देहासी देख ॥ आत्मा चोख जाणिजे ॥ ३८ ॥ अविद्यायोगें प्राणी ॥ संसारचक्रांत भ्रमण करूनी ॥ मूळ वस्तू तेने णती कोणी ॥ म्हणूनि ऐसें होतसे ॥ ३९ ॥ अज्ञान करूनी दूर ॥ आत्मज्ञानें राहें स्थिर ॥ सर्वां घटीं योगेश्वर ॥ कृष्ण पाहें शुभांगे ॥ ४० ॥ श्रीशुक म्हणे परीक्षिती ॥ रामें बोधितां रुक्मिणी सती ॥ स्वस्थ जाहली आपुले चित्तीं ॥ पुढती काय-जाहलें ॥ ४१ ॥ रुक्मियाचें शेष दळ ॥ यादवीं वधिलें सकळ ॥ सरोवरीं जैसे करेणु पाळ ॥ कमळीं रंवदळ करिती ते ॥ ४२ ॥ विमूनें रुक्मियासी सोडिला ॥ उरल्या सेनेंसी पळ सुटला ॥ विजयलक्ष्मी यादवांला ॥ वरिती जाहली ते काळीं ॥ ४३ ॥ भोजकूट नामें नगरी ॥ प्रतिज्ञापालनार्थ रुक्मिया करी ॥ तेथें जाऊनि ते अवसरीं ॥ वास करिता जाहला ॥ ४४ ॥ रुक्मिणीसहित श्रीधर ॥ स यादव बळराम वीर ॥ संगें घेऊनि द्वारकापुर ॥ पावता जाहला कौतुकें ॥ ४५ ॥ श्रीकृष्णें रुक्मिणी पुरीं आणून यथाविधी केलें पाणिग्रहण ॥ समारंभ जाहला पूर्ण ॥ तो काय मुखीं वर्णवे ॥ ४६ ॥ आनंद वाटे सकळां मनीं ॥ कृष्णें परिणिली रुक्मिणी ॥ राजे राजकन्या श्रवणीं ॥ ऐकतां विस्मित बहु होती ॥ ४७ ॥ श्रीमद्भागवत सारामृत ॥ दशमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ चतुःपंचाशत्तमाध्याय गोड हा ॥ ४८ ॥ ५४ ॥ पंचपंचाशत्तमाध्याय प्रारंभः ॥ पूर्वी रुद्र ललाट ज्वालें करून ॥ मन्मथ जाहला होतां दहन ॥ तो राहिला अनंग होऊन ॥ रुक्मिणी उद-

रीं जन्मला ॥ १ ॥ पूर्वशत्रु मानूनि कुमर ॥ तयाहरूनी शंबरासुर ॥ सागरीं टाकी सत्वर ॥ मत्स्यें तयासी गिळियेलें ॥ २ ॥ तो मीन धरिला धीवरीं ॥ नेऊनि दिधला राजागारीं ॥ शंबरें तयां धन देऊनि भारी ॥ महानसीं पाठविला ॥ ३ ॥ तो मत्स्य सूद घेऊन ॥ शस्त्रें करिती विदारण ॥ त्यामाजी सुकुमार नंदन ॥ निघता जाहला तेक्षणीं ॥ ४ ॥ तो दिधला मायावतीसी ॥ इतुक्यामाजी नारद ऋषि ॥ येऊनि वदती वाक्यासी ॥ रती तव पती हा पाहे ॥ ५ ॥ बालकाची उत्पत्ती मत्स्योदरीं प्रवेशा निश्चिती ॥ कैसा जाहला तयाची स्थिती ॥ सविस्तर तो सांगे ॥ ६ ॥ रति नामक कामकांता ॥ स्वपतिदेहोत्पत्ति ऐकतां ॥ समाधान पावून चित्ता ॥ स्नेहें पालन करीतसे ॥ ७ ॥ कुशल जाणूनि रती सी ॥ शंबरासुरें महानसीं ॥ ठेविलें बहु दिवसीं ॥ परमप्रीती करूनियां ॥ ८ ॥ कामबुद्धी करूनि सती ॥ स्नेहभरित होय बाळाप्रती ॥ अल्पकाळें करूनी निश्चिती ॥ कुमर प्रौढ जाहला ॥ ९ ॥ तो नारींसी मोहकारक ॥ साक्षात् मन्मथदेख ॥ भासूं लागला चोख ॥ सौंदर्य काय वाणावें ॥ १० ॥ ते धवां मायावती ॥ प्रार्थिती जाहली एकांतीं ॥ भोगदान देणें दासीप्रती ॥ कामदेवा ये समयीं ॥ ११ ॥ यापरी परिसूनि वाणी ॥ प्रद्युम्न बोले तयेक्षणीं ॥ मातृभाव त्यागूनि कामिनी ॥ भाव प्रगट कां करिसी ॥ १२ ॥ रति बोले मधुरोत्तर ॥ तूं कामश्रीकृष्णाकुमर ॥ शंबरें आणिला सीसाचार ॥ रतिनामें मी तव पत्नी ॥ १३ ॥ दहा दिवसांत सूतिकासदनीं ॥ प्रवेशूनी स्वकरें घेऊनी ॥ या शंबरें तुज लागूनी ॥ जलधीमाजी त्यागिलें ॥ १४ ॥ तें तुज मत्स्यें गिळिलें ॥ कैवर्तकें मीनासी धरिलें ॥ उपायन मिषें येथ आणिलें ॥ विदारितां जाहलें मज दर्शन ॥ १५ ॥ सगनारदें येऊन ॥ कथन केलें वर्तमान ॥ कीं रते पति हा मदन ॥ पालन करीं तूं याचें ॥ १६ ॥ यास्तव शत्रु तुझा शंबरासुर ॥ याचा करूनी संहार ॥ माता शोकें व्याप्त फार ॥ समाधान करी तिचें ॥ १७ ॥ श्रीशुक ह्मणे परी–

क्षिती ॥ ऐसें सांगूनियां रती ॥ सर्वमायाभंगविघाती ॥ कथितीजाहलीकामातें ॥ १८ ॥ मदनें शंबरासुरा जवळ ॥ जाऊनि सोडिलें वाग्जाळ ॥ कलह केला तात्काळ ॥ युद्धालागीं बाहिलें ॥ १९ ॥ गृहांतूनी गदापाणी ॥ असुर निघाला समरंगणीं ॥ अनंगें करींचीगदा तेक्षणीं ॥ छेदूनियां टाकिली ॥ २० ॥ नानाप्रकारें युद्ध करित ॥ मायानिर्मी दैत्य अद्भुत ॥ पराक्रमें करूनी रुक्मिणीसुत ॥ निवारण करीतसे ॥ २१ ॥ खड्गपाणी होऊनि मदन ॥ शंबरासुराचें शिरच्छेदन ॥ करिता जाहला न लागतां क्षण ॥ जयजयकार प्रवर्तला ॥ २२ ॥ पुष्पवृष्टि अमर करिती ॥ आकाशमार्गें मायावती ॥ प्रद्युम्नासहित द्वारावती ॥ माजी प्रविष्ट जाहली ॥ २३ ॥ मेघ सौदामिनी सहित ॥ जैसा प्रवेशे गगनांत ॥ तैसा कुशस्थळी माजी रतियुक्त ॥ कंदर्प प्रवेश करीतसे ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ तं दृष्ट्वा जलदश्यामं पीतकौशेयवाससम् ॥ प्रलंबबाहुं ताम्राक्षं सुस्मितं रुचिराननं ॥ २७ ॥ टीका ॥ मेघाप्रमाणें श्यामवर्ण पीतांबर परिधान ॥ दीर्घबाहु अरुणनयन ॥ ॥ सुप्रभ वदन मंदस्मित ॥ २५ ॥ नीलवक्रकुंतळीं युक्त ॥ कृष्णासम मदन प्राप्त ॥ होतां होती स्त्रिया लज्जित ॥ कृष्णनाथ म्हणूनियां ॥ २६ ॥ नष्टपुत्राची स्मृती ॥ करिती जाहली रुक्मिणी सती ॥ पान्हा दाटला स्तनांप्रती ॥ सद्गद चित्तीं वदतसे ॥ २७ ॥ नरश्रेष्ठ हा असे कवण ॥ कमळापरी ज्याचे नयन ॥ कवण स्त्री करी धारण ॥ उदरामाजी ययातें ॥ २८ ॥ आणि याची ही कांता ॥ कवण असे लावण्यलता ॥ मत्पुत्र आजवरी असता ॥ तरी दिसता यासमकीं ॥ २९ ॥ जरी कोठें असे तो जीवंत ॥ तरी वयें गुणें आकृतियुक्त ॥ यासम मनीं भासे निश्चित ॥ कृष्णासम हा कैसा ॥ ३० ॥ हा पाहतां मनोहर ॥ प्रीती उत्पन्न जाहली फार ॥ माझा वामबाहु वारंवार ॥ स्फुरण पावतो येथवां ॥ ३१ ॥ तस्मात् जो का उदरीं ॥ नवमास वाहिला बरोबरी ॥ तोचि हा असेल नि-

धरीं ॥ शंका न कांहीं मनांत ॥ ३२ ॥ वैदर्भी चिंतन ऐसें करी ॥ तों वसुदेव देवकी श्रीहरि ॥ अकस्मात आले ते अवसरीं ॥ चमत्कार पाहती तो ॥ ३३ ॥ सर्वज्ञ असतां कृष्णनाथ ॥ पाहूनि बैसला सुग्धवत् ॥ तों नारद पावला त्वरित ॥ तेणें इतिहास कथियेला ॥ ३४ ॥ नष्टपुत्र प्राप्त जाहला ॥ विस्मय भासे जनाला ॥ दंपत्य देखतां हर्षपयोनिधि ला ॥ पूर्ण भरतें पातलें ॥ ३५ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ पंचपंचाशत्तमाध्याय गोड हा ॥ ३६ ॥ ५५ ॥ षट्पंचाशत्तमाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्रीशुक म्हणे नरनाथा ॥ भावें परिसें श्रीहरि गाथा ॥ सत्राजित अपराधक्षमे करितां ॥ समणी कन्यका कृष्णा दे ॥ १ ॥ ऐकूनि बोले परीक्षिती ॥ कवण अपराध केला निश्चिती ॥ स्यमंतकमणी तयाप्रती ॥ प्राप्त कैसा जाहला ॥ २ ॥ कन्या केली कृष्णार्पण ॥ याचें असे काय कारण ॥ हें चि सांगा कृपा करून ॥ परिसूनि मुनि म्हणे ऐक बा ॥ ३ ॥ सत्राजिताचा सखा तरणी ॥ तयानें दिधला स्यमंतकमणी ॥ तो एकदां कंठीं घालुनी ॥ द्वारकेमाजी पातला ॥ ४ ॥ तया देखतां साचार ॥ जना भासे प्रत्यक्ष भास्कर ॥ प्रकाशमान पृथ्वीवर ॥ आला ऐसें अखिलां गमे ॥ ५ ॥ सुधर्मसभेंत श्रीपती ॥ द्यूत खेळत असतां निश्चिती ॥ सत्राजित आला अवचितीं ॥ जन म्हणती सूर्य पातला ॥ ६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नारायण नमस्तेस्तु शंखचक्रगदाधर ॥ दामोदरारविंदाक्ष गोविंद यदुनंदन ॥ ६ ॥ टीका ॥ हे नारायणा सर्वेश्वरा ॥ हे शंखचक्रगदाधरा ॥ हे कमलपत्राक्षा दामोदरा ॥ यदुनंदना तुज नमो ॥ ७ ॥ आपुल्या दर्शनासी सविता ॥ भावें येत से पृथ्वीवरुता ॥ ऐसें परिसूनि यांची वार्ता ॥ हास्यवदनें हरि वदे ॥ ८ ॥ हा सूर्य नव्हे सत्राजित ॥ रविप्रसादें प्रकाशवंत ॥ ऐसा ऐकतां वृत्तांत ॥ जन समस्त स्थिरावले ॥ ९ ॥ तेव्हां सत्राजितें तो मणी ॥ स्थापन केला आपुले सदनीं ॥ तो नित्य प्रसवे सद्गुणी ॥ अष्टभार सुव-

णतिं ॥ १० ॥ भारसंख्याप्रमाण ॥ राजापरिसें सावधान ॥ एकभाराचे सहा मण ॥ शेर सदतीस जाणिजे ॥ ११ ॥ तैसे तोळे बारा निश्चिती ॥ अष्टभारांची करितां गणती ॥ शतार्ध पंचमण निगुती ॥ शेर विंशति निर्धारें ॥ १२ ॥ यापरी प्रसवे नित्य हेम ॥ जेथें राहील मणी उत्तम ॥ तेथें आधिव्याधि दुर्भिक्ष अधम ॥ मारी सर्पभय नसे ॥ १३ ॥ श्रीकृष्ण-ह्मणे सत्राजिता ॥ हा मणी दे यादवनाथा ॥ तिरस्कार करूनि मागुता ॥ सवेंच सदनीं पातला ॥ १४ ॥ एके दिवशीं साचा र ॥ प्रसेन त्याचा सहोदर ॥ कंठीं घालूनि मणिवर ॥ सावज गेला मृगयेतें ॥ १५ ॥ सिंहें मणि हरूनि लवरित ॥ वधिलें तया अश्वासहित ॥ सिंहा जांबुवंतें अवचित ॥ मारूनि मणी हरियेला ॥ १६ ॥ तेणें नेऊनि विवरीं ॥ बद्ध केला पालखावरी ॥ येरीकडे सत्राजित-अंतरीं ॥ बंधूवांचूनी व्याकुळ होय ॥ १७ ॥ ह्मणे त्या मण्याकरितां ॥ कृष्णें वधिला माझा भ्राता ॥ कर्णोपकर्णी ऐसी वार्ता ॥ यादवनाथा कळों ये ॥ १८ ॥ दुर्यश टाळावयासी ॥ सेनेसहित हृषीकेशी ॥ शोधार्थ निघाला काननासी ॥ तों नवलाव देखिला ॥ १९ ॥ अश्वासहित प्रसेन ॥ होऊनि पडिला गतप्राण ॥ पुढें देखिले सिंहाचे चरण ॥ तोही निधन पावला ॥ २० ॥ ऋक्षचरण पुढें असती ॥ विवरापर्यंत जाणा निश्चिती ॥ ऐसें पाहूनि यदुपती ॥ काय करिता जाहला ॥ २१ ॥ प्रजा ठेवूनि बाहेर ॥ बिळीं प्रवेशला श्रीकरधर ॥ पालखासन्निध येतां सत्वर ॥ स्यमंतकमणी देखिला ॥ २२ ॥ हरण करी स्यमंतक ॥ तों पालखीं असे बालक ॥ अद्भुत पाहूनि रसानायक ॥ धात्री आक्रोश करी तेव्हां ॥ २३ ॥ तो शब्द करितां चिश्रवण ॥ धांवूनि आला जांबवान ॥ प्राकृत पुरुष मानून ॥ युद्ध करिता जाहला ॥ २४ ॥ मल्लयुद्धाचे प्रकार ॥ दाविता जाहला वनचर ॥ तयांचा उपसंहार रुक्मिणीवर ॥ सहज करी कौतुकें ॥ २५ ॥ बाहुयुद्ध वृक्षयुद्ध ॥ आयुधयुद्ध पाषाणयुद्ध ॥ नानापरी मुष्टियुद्ध ॥ परस्पर करिती बहू ॥ २६ ॥ जैसे आमिषासक्त वश्येन ॥ परस्पर

भांडतीक्रोधेंकरून॥तैसेश्रीहरिजांबवान॥ अठ्ठाविसदिनश्रमतीहो॥२७॥हरीनेंमुष्टिप्रहारकरितां॥ व्यथाभूत ऋक्षजाहलातत्वतां॥विस्मितहोऊनिआपुलेचित्ता॥म्हणेमहापुरुषहा॥२८॥सद्भावेंकरूनिजाण॥बोलताजाहलाजांबवान॥हेप्रभोनारायण॥वंदनअसोतवचरणा॥२९॥ ॥श्लोक॥जानेत्वांसर्वभूतानांप्राणओजःसहोबलम्॥विष्णुंपुराणपुरुषंप्रभविष्णुमधीश्वरम्॥२६॥ टीका ॥प्रभोलोकांमाजीजाण॥जोकांअसेमुख्यप्राण॥त्याचेठायींतेजबलपूर्ण॥तेंआपणआह्मांनिश्चयें॥ ३०॥परमेश्वरासाक्षात्विष्णु॥पुराणपुरुषमहाविष्णु॥सर्वेश्वरप्रभविष्णु॥आह्मांऐसेंजाणिलें॥३१॥स्तवनपरिसूनियापरी॥जांबुवंतासिबोलेहरी॥मिथ्यापवादआलामाझ्यावरी॥ह्मणूनीविवरींपातलों॥३२॥ऐसेंऐकतांनिश्चिती॥स्यमंतकासहजांबुवती॥ अर्पणकरिताजाहलाप्रीती॥श्रीकृष्णासीसद्भावें॥३३॥बिलद्वारासन्निधजाण॥यादवठेविलेहोतेरक्षण॥तेद्वादशदिनवाटपाहून॥द्वारकेसीजाऊनिकथितीतें॥३४॥ऐकूनिरुक्मिणीदेवकीसती॥शोकाकुलझाल्याअती॥उग्रसेनवसुदेवसर्वज्ञाती॥रामासहितदुःखितहो॥३५॥कृष्णप्राप्तिव्हावया॥आराधितेजाहलेमहामाया॥दुर्गादेवीप्रसादेंराया॥सस्त्रीश्रीकृष्णपातला॥३६॥आनंदजाहलासकळांसी॥श्रीहरीनेंपाचारिलेंसभेसी॥सत्राजितामणिदानासी॥करूनिवृत्तांतकथियेला॥३७॥मणिहोतांहस्तगत॥सदनींयेऊनिसत्राजित॥मानसींजाहलालज्जित॥ह्मणेआतांकरूंकाय॥३८॥अच्युताचाप्रसादसुंदर॥होईलकैसामजवर॥कायकरावेंम्यांसत्वर हेंचिकांहींआकळेना॥ ३९॥कैसेंहोईलमाझेंसुभद्र॥मूढलुब्धककामीक्षुद्र॥जनह्मणतीमजलाअभद्र॥ आणिकशापदेतीबहू॥४०॥ऐसेंचिंतूनितेक्षणीं॥स्वकन्यालावण्यखाणी॥सत्यभामादेऊनिसन्मणी॥वरीआं-

दणदिधला ॥ ४१ ॥ नंतरविधानोक्तपाणिग्रहण ॥ करिताजाहलानारायण ॥ सत्राजितासीबोलेवचन ॥ नलगेमणी हा आम्हां ॥ ४२ ॥ देवभक्तायोग्यअसेहामणी ॥ तुम्हींजावें गृहींघेउनी ॥ मणिअसोतुमचेसदनीं ॥ फलभागीआम्हीचहे ताता ॥ ४३ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसरवारामविरचित ॥ षट्पंचाशत्तमाध्याय गो डहा ॥ ४४ ॥ ५६ ॥ ॥ सप्तपंचाशत्तमाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्रीशुकम्हणेपरीक्षिती ॥ श्रवणाकरिताजाहलाश्रीप ती ॥ कींदुर्योधनेंसपांडवकुंती ॥ लाक्षागृहींहोमिली ॥ १ ॥ त्यांचाध्यावयासमाचार ॥ बळिरामआणिश्रीधर ॥ त्वरि तपावलेहस्तनापूर ॥ रथारूढहोऊनियां ॥ २ ॥ भीष्मादिकांचासंगमहोतां ॥ लोकरीतीकरितीशोकवार्ता ॥ सर्व ज्ञपुरुषअसतीनलता ॥ सर्ववृत्तगउकें ॥ ३ ॥ द्वारकापुरीमाजीजाण ॥ कायजाहलेंवर्तमान ॥ अक्रूरकृतवर्मामि- ळून ॥ शतधन्व्यासीबोलती ॥ ४ ॥ सत्राजितापासूनिमणी ॥ कांघेतनाहींसआझुनी ॥ आह्मांसीकन्यादेतोंम्हणूनी ॥ भा- माकृष्णादीधली ॥ ५ ॥ दुष्टसत्राजितनिर्धारीं ॥ निजबांधवप्रसेनापरी ॥ कांनजावोयमपुरीं ॥ पृथ्वीटाकूनीयादवा ॥ ६ ऐसाबुद्धिभेदकेला ॥ शतधन्वाजाऊनितयेवेळा ॥ हिंसकापरीप्रवेशला ॥ घातकरावयाजवगृहीं ॥ ७ ॥ निद्रितअसेतो सत्राजित ॥ कंठछेदूनिकरीघात ॥ सकळस्त्रियाहोतीशोकार्त ॥ घेऊनिमणीपळाला ॥ ८ ॥ पित्याचेंपाहूनिप्रेत ॥ सत्य भामाशोककरित ॥ तद्देहतेलद्रोणींत ॥ ठेवूनिगजपुरींपातली ॥ ९ ॥ पितृवधाचेंवर्तमान ॥ रामकृष्णांकेलेंकथन ॥ लौकिकमार्गास्तवरुदन ॥ करितेजाहलेउभयतां ॥ १० ॥ मगयेऊनिद्वारकापुरीं ॥ विचारकरिताजाहलाहरी ॥ स त्वानिमित्तकृतांतपुरीं ॥ शतधन्वाधाडावा ॥ ११ ॥ ऐसीऐकूनियांमात ॥ शतधन्वाजाहलाभयभीत ॥ कृतवर्म्यासी आश्रयमागेत्वरित ॥ तोह्मणेमीनअनुकूळयाकामीं ॥ १२ ॥ ईश्वराचाअपराधकरितां ॥ कवणावांचेलमहीवरता ॥ कं

सजरासंधांचीवार्ता॥कायजाहलीजाणिजे॥१३॥यापरीपरिसूनियांवाणी॥शतधन्वाखिन्नजाहलामनीं॥अक्रूरा
सन्निधजाउनी॥साह्यमागतांतोबोले॥१४॥ईश्वराचेंजाणूनिबळ॥कवणाद्वेषकरीलखळ॥जोपरमात्माविश्वपा
ळ॥अगम्यमहिमातयाची॥१५॥सप्तमवर्षांचाअसतांहरी॥पर्वतधरिलानखाग्रावरी॥अद्भुतकृत्यकर्तामहीव-
री॥वंदनतयाअसोहें॥१६॥अक्रूरेंतयाचात्यागकेला॥मगमणीदेऊनितोपळाला॥ह्मणेबळेंबाहिलेंकाळाला॥
आतांकायकरावें॥१७॥शतयोजनेंगमनकरणार॥ऐसाअश्वआणूनिसत्वर॥बैसूनियांतयावर॥पलायनक-
रीतसे॥१८॥गरुडचिन्हितरथांत॥रामकृष्णबैसलेत्वरित॥धांवतेजाहलेअकस्मात्॥शत्रुपृष्ठीतेधवां॥१९॥॥
मिथिलानगरीचेउपवनीं॥अश्वपातजाहलातेक्षणीं॥नंतरतयालागींत्यागुनी॥पादचारीपळतसे॥२०॥ऐसेंदे-
खूनिनारायण॥तयावरीसोडिलेंसुदर्शन॥तात्काळजाहलागतप्राण॥मस्तकखंडितजाहलें॥२१॥अप्राप्तम
णीदेखूनिपुढें॥श्रीकृष्णजाऊनिरामाकडे॥सांगताजाहलापवाडें॥व्यर्थशतधन्वामारिला॥२२॥ऐकूनिबोलेह
लधर॥अन्यपुरुषींअसेलमणिवर॥तरीतुह्मींपुरींजाऊनिसत्वर॥शोधतयाचाकरावा॥२३॥मींमिथिलापुरीं
जनार्दना॥जातोंजनकाच्यादर्शना॥ऐसेंबोलूनियांजाणा॥नगरप्रवेशपैंकेला॥२४॥दृष्टींपाहूनिवसुदेवकुमर॥
जनकेंसन्मानकेलाथोर॥वासकेलासंवत्सर॥अत्यानंदेंकरूनियां॥२५॥तेव्हांरामापासून॥गदायुद्धींदुर्योधन-
अभ्यासकरिताजाहलापूर्ण॥श्रीहरिस्वपुरींपावले॥२६॥शतधन्वनिधनेंमणी॥नलाधलाहेंसांगेमोक्षदानी॥स
र्वेंचिसत्यभामाभुवनीं॥येऊनिशांतवीतियेतें॥२७॥सत्राजिताचेंपारलौकिक॥कर्मकरवीजगन्नायक॥हेंवृत्त-
ऐकूनियांदेख॥कृतवर्माअक्रूरपळाले॥२८॥अक्रूरगेलियापासूनिजाण॥ आधिव्याधीउद्भवल्यानाना॥ताप-

जाहलाजनांच्यामना॥विफळकामनाहोतीसर्व॥२९॥काशीदेशांतअवर्षण॥पडतांकाशिराजनृपपूर्ण॥गांदिनीना मककन्यादान॥श्वफल्कासीकरीतदा॥३०॥तेव्हांइंद्रकृपादृष्टी॥करूनीकरीपर्जन्यवृष्टि॥सौख्यमयजाहलीसृष्टी कष्ट दृष्टींआतुडेना॥३१॥त्याश्वफल्काचाकुमर॥महाभागवतअक्रूर॥ नाहींह्मणूनि हाप्रकार॥होयवृद्ध- बोलती॥३२॥अक्रूरमाहात्म्यपरिसूनिकानीं॥विचारकरीशार्ङ्गपाणी॥अक्रूरगमनाकारणमणी॥जाणूनित्य यासीआणविलें॥ ३३॥पूजनकरूनिसादर॥प्रियकथासांगूनिफार॥संतुष्टकरूनियांअंतर॥नंतरश्रीधरपु सतसे॥३४॥हास्यवदनेंमधुरवाणी॥करूनिबोलेतयालागुनी॥तुह्मांजवळठेविलामणी॥आहेआम्हांठाउकें ३५॥ अक्रूराअपुत्रसत्राजित॥यास्तवअधिकारीनिश्चित॥दौहित्रअसतीपुनीत॥कर्मांतरकरावया॥ ३६॥ शेषधनराहीलकांहीं॥त्याचाअधिकारदौहित्रापाहीं॥यास्तवमणीआणूनिलवलाहीं॥प्रदर्शितकरावा॥३७॥ धर्मेंऐसेंआहेतरी॥मणीसंग्रहींआपुलेमंदिरीं॥परीआतांआणूनिझडकरी॥सभेमाजीदाखवी॥३८॥कोंम- ण्याविषयींअविश्वास॥रामाचाआहेबहुवस॥ऐसापरिसूनिवाक्यास॥मणी अक्रूरें दीधला॥३९॥तोमणी श्रीकृष्णेंआपण॥अक्रूरासिकेलाअर्पण॥हेंआख्यानश्रवणपठन॥होतांशांतीप्राप्तहोय॥ ४०॥श्रीमद्भाग- वतसारामृत॥दशमस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥सप्तपंचाशत्तमाध्यायगोडहा॥ ४१॥ छ्‌ ५७॥ ॥अष्टपंचाशत्तमाध्यायप्रारंभः॥ ॥श्रीशुकबोलेपरीक्षिती॥एकेसमयींरुक्मिणीपती॥सात्यकी- सहइंद्रप्रस्थाप्रती॥जाऊनिभेटलेपांडवांसी॥ १॥पार्थसन्मुखहोऊनिआपण॥दिधलेंदेवासीआलिंगन॥भी मधर्मासी भगवान॥वंदनकरिताजाहला॥२॥नकुलसहदेवनमिती॥आशीर्वाददेऊनितयांप्रती॥जाऊनिबैस

लेंआसनावरती ॥ तोंद्रौपदीवंदीश्रीकृष्णा ॥ ३ ॥ सात्यकीचेंकरूनिपूजन ॥ आसनीं बैसविलेंतयालागुन ॥ नंतर वासुदेवें
जाऊन ॥ पितृभगिनीवंदिली ॥ ४ ॥ कुंतीस्मरूनीक्लेशकांहीं ॥ बोलेदेवाशेषशायी ॥ पूर्वीअक्रूराधाडूनिलवलाही ॥ स-
माचारघेतला ॥ ५ ॥ ह्मणूनीदेवाचेभारी ॥ आह्मींजाहलोंसंसारीं ॥ कृपाकरूनीकंसारी ॥ चरण केमळीं ठावदे ॥ ६
युधिष्ठिरह्मणेजगज्जीवना ॥ नारायणामनमोहना ॥ विषयासक्तांसीदर्शना ॥ कृपाकरूनीतूंदेसी ॥ ७ ॥ ह्मणूनिआ-
ह्मीसुकृत ॥ कायकेलेंनकळेनिश्चित ॥ चातुर्मास्यराहावेंयेथ ॥ कृपाकरूनीगोविंदा ॥ ८ ॥ धर्मवचनामानदेउनी ॥ इंद्र-
प्रस्थींशार्ङ्गपाणी ॥ राहतेजाहलेदर्शनदेउनी ॥ प्रजाजनांतेंकौतुकें ॥ ९ ॥ एकेसमयींकृष्णार्जुन ॥ रथीबैसूनीआपण
मृगयाकरावयालागुन ॥ वनामाजीपातले ॥ १० ॥ तेठायींपशुमांसल ॥ सूकरमहिषमृगादिसकळ ॥ संहारकरूनी-
तात्काळ ॥ धर्माकडेपाठविले ॥ ११ ॥ अर्जुनहोऊनितृषाक्रांत ॥ यमुनाजीवनींआलात्वरित ॥ तोंसुंदरस्त्रीतपोव्रत ॥
करितेऐसेंदेखिलें ॥ १२ ॥ हस्तपादप्रक्षालन ॥ सारूनिकेलेंउदकपान ॥ कृष्णाकडेयेऊनआपण ॥ वर्तमानकथियेलें
१३ ॥ श्रीकृष्णाह्मणेअर्जुना ॥ सत्वरजाऊनितयास्थाना ॥ शोधकरीकवणअंगना ॥ कष्टभोगीनानापरी ॥ १४ ॥ जाऊ-
निअर्जुनेंसत्वर ॥ प्रश्नकेलामनोहर ॥ हेकन्येघोरकांतार ॥ सेवनकरिसीकासया ॥ १५ ॥ कायसंकल्पधरूनीमनीं
तपकरिसीतूंयावनीं ॥ यापरीवचनपरिसूनी ॥ सकुमारीबोलतसे ॥ १६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कालिंद्युवाच ॥ अहंदेवस्य
सवितुर्दुहितापतिमिच्छती ॥ विष्णुंवरेण्यंवरदंतपःपरमसास्थिता ॥ २० ॥ टीका ॥ तेजोनिधीभास्करपिता ॥
कालिंदीनामेंसीतयाचीदुहिता ॥ ब्रह्मादिकांसीवरदाता ॥ महाविष्णुजोअसे ॥ १७ ॥ तोश्रीहरीव्हावयापती ॥ इच्छि-
तेंअर्जुनायाक्षिती ॥ ह्मणूनितपअहोराती ॥ करितेंजाणनिश्चयें ॥ १८ ॥ श्लोक ॥ नान्यंपतिंवृणेवीरतमृतेश्रीनिके

ततनस्॥ तुष्यतांमेसभगवान्मुकुंदोऽनाथसंश्रयः॥ २१॥ टीका ॥ हेपार्थवीरापरिसेंवाणी॥ मींनिश्चयकेलामनीं॥
कींश्रीमहाविष्णुवांचूनी॥ अन्यपतीनवरीनबा॥ १९॥ भक्तकामकल्पद्रुम॥ आत्मारामपुरुषोत्तम॥ तोचीसंतुष्टहो
ऊनिपरम॥ अनुग्रहकरोमाझ्यावरी॥ २०॥ ऐकूनिकालिंदीचीवाणी॥ त्वरेंनिघालागांडीवपाणी॥ कृष्णातेंकळवू-
नितेथेंआणी॥ तोरमणीपहावया॥ २१॥ नंतरस्वरथींबैसवूनिहरी॥ इंद्रप्रस्थीनेसुकुमारी॥ विश्वकर्म्याहातींनग
री॥ निर्मूनिदेपांडवां॥ २२॥ मगखांडवदाहकाळीं॥ अर्जुनसारथीहोयवनमाळी॥ तेंविजयाश्वरथादिकज्वाला
माली॥ संतोषेंदेविजयातें॥ २३॥ मयाकरवींसभाकरी॥ मगधर्माज्ञेंयेद्वारकापुरीं॥ विधानोक्तपाणिग्रहणक
री॥ कालिंदीचेंतेधवां॥ २४॥ अवंतीमाजीराहणार॥ विंदानुविंदनरेश्वर॥ तयांचीभगिनीसकुमार॥ मित्रविंदा
नामकअसे॥ २५॥ तीतेंस्वयंवरींश्रीपती॥ हरिताजाहलाशीघ्रगती॥ पुढेंनग्नजित्कन्यानाग्नजिती॥ सुकुमारी
जीअसे॥ २६॥ तेथेंसातवृषभांटोंचूनिवेसण॥ जिंकूनितेथीलसर्वपण॥ केलेंनाग्नजितीचेंहरण॥ रायेंविवाह-
केलातें॥ २७॥ तेणेंआंदणदिधलेंबहुत॥ तेंघेऊनिद्वारकेश्रीकांत॥ आलापुढतींश्रुतकीर्तिसुता निश्चित॥ वरि-
लीभद्राप्रीतीनें॥ २८॥ मगमद्राधिपाचीदुहिता॥ लक्ष्मणाहरिलीनत्वतां॥ द्वारकेमाजीसुमुहूर्ता॥ पाहूनिविवाहके
लातो॥ २९॥ भौमासुराचाघेऊनिप्राण॥ सहस्रावधीस्त्रियानारायण॥ राजकन्यावरीनलगतांक्षण॥ श्रीशुक-
म्हणेविष्णुराता॥ ३०॥ श्रीमद्भागवतसारामृत॥ दशमस्कंधपरमपुनीत॥ प्राकृतसखारामविरचित॥ अष्टपंचा
शत्तमाध्यायगोडहा॥ ३१॥ ५८॥ एकोनषष्टितमाध्यायप्रारंभः॥ ॥ श्रीशुकासीबोलेपरीक्षिती॥ भौमासिव-
धिलेंकवण्याअर्थी॥ तेंचिसविस्तरमजप्रती॥ कृपाकरूनीसांगावें॥ १॥ वेंया सकीम्हणेरायासी॥ इंद्रेंप्रार्थिलेंश्री

कृष्णासी ॥ कीं भौमासुरें आह्मांसी ॥ फारत्रास दीधला ॥ २ ॥ कुंडल छत्र स्थान हरण ॥ केलें माधवा घेऊन ॥ तेणें माझा अपमान ॥ विश्वामाजी जाहला ॥ ३ ॥ यापरी परिसूनि वाणी ॥ सत्यभामा सवें घेउनी ॥ गरुडावरी आरुढोनी ॥ प्राक्ज्योतिषपुरीं पातला ॥ ४ ॥ पर्वत शस्त्रें यांचे कोट ॥ उदक अग्नी वायूचे सुघट ॥ मुरपाशें करूनियां तनगर ॥ नगर सर्व वेष्टित असे ॥ ५ ॥ कौमोदकी गदें करून ॥ प्राकार भेद केला पूर्ण ॥ शस्त्र दुर्ग बाणीं चूर्ण ॥ क्षणामाजी पैं केलें ॥ ६ ॥ सुदर्शन चक्रानें सारा ॥ उदक अग्नीचा प्रावार भूवरा ॥ नंदक खड्गें मुरपाश धारा ॥ विध्वंसूनी टाकिला ॥ ७ ॥ पांचजन्य शंखनाद ॥ करिता जाहला गोविंद ॥ नगर वेष्टित यंत्रें विविध ॥ होतीं तीं हीं भेदिलीं ॥ ८ ॥ शंखशब्द भयंकर ॥ श्रवण करूनी धांवला सत्वर ॥ दैत्य विक्रमी नामें मुर ॥ त्रिशूल घेउनी ते धवां ॥ ९ ॥ विहंगम राजावरी ॥ असुर धांवला सर्पापरी ॥ गरुडें धडक मारूनी सत्वरी ॥ नयामागें सारिलें १० पंचमुखीं सिंहनाद अद्भुत ॥ करी तेणें ब्रह्मांड होय व्याप्त ॥ येणान्या त्रिशूलाचा घात ॥ दोन बाणीं हरि करी ॥ ११ ॥ मग तेणें मारिली गदा ॥ व्हावया शत्रूचा चेंदा ॥ स्वगदें करूनि गदा भेदा ॥ गदाग्रज करी तेक्षणीं ॥ १२ ॥ श्रीकृष्णें चक्र प्रेरिलें ॥ तेणें मुर मस्तक उडविलें ॥ ऐसें पाहूनि धांवले ॥ सप्तपुत्र तयाचे ॥ १३ ॥ ताम्र अंतरिक्ष सुबळ ॥ विभावसु वसु प्रबल ॥ नभस्वान अरुण दैत्यपाळ ॥ कृष्णावरी धांवले ॥ १४ पीठनामा भौमसेनापती ॥ पुढें करूनी युद्ध करिती ॥ तच्छस्त्र संहार श्रीपती ॥ करूनि वधी तयांतें ॥ १५ ॥ ऐसें पाहूनि नरकासुर ॥ गजसैन्यासह निघे सत्वर ॥ भार्येसहित यदुवीर ॥ गरुड वहनीं अवलोकी ॥ १६ ॥ असुर कुपित होऊनि मनीं ॥ शतघ्नी प्रेरी तेक्षणीं ॥ स्वशरें करूनि मोक्षदानी ॥ तोडिता जाहला ते धवां ॥ १७ ॥ प्रभु बाणीं अपरिमितीं भौमसैन्य खिळिलें निश्चितीं ॥ शस्त्रां शरछेदन करिती ॥ गरुड गजांताडीतसे ॥ १८ ॥ तेणें गज पुरीं मुरडती ॥ नर-

कामनींपडेभीति ॥ कृष्णवधार्थयोजी त्रिशूळाप्रती ॥ तोंहरीतोडीक्षणमात्रें ॥ १९ ॥ चक्रेंकरूनित्याचेंशिर ॥ छेदनकरीशा-
र्ङ्गधर ॥ जाहलाएकचीहाहाकार ॥ साधुसाधुह्मणतीहो ॥ २० ॥ पुष्पवृष्टिअमरकरिती ॥ कृष्णदर्शनासीवसुमती ॥ छ-
त्रकुंडलेंवनमालानिश्चिती ॥ महामणीघेऊनिये ॥ २१ ॥ तेंसर्वकरूनिकृष्णार्पण ॥ भावेंआदरीस्तवन ॥ तूंपुराण
पुरुषनारायण ॥ कृपाकरीगोविंदा ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भूमिरुवाच ॥ नमस्तेदेवदेवेशशंखचक्रगदाधर ॥
भक्तेच्छोपात्तरूपायपरमात्मन्नमोस्तुते ॥ २५ ॥ टीका ॥ नमोदेवदेवाश्रीहरी ॥ शंखचक्रगदाधारी ॥ भक्त-
कामकल्पद्रुमबरी ॥ पदवीतुजलाशोभते ॥ २३ ॥ श्लोक ॥ नमःपंकजनाभायनमःपंकजमालिने ॥ नमःपंक-
जनेत्रायनमस्ते पंकजांघ्रये ॥ २६ ॥ टीका ॥ पद्मनाभानमोकृष्णा ॥ कमलमालाधारणा ॥ सुकुमारासरोरुह
लोचना ॥ चरणारविंदाप्रतीनमो ॥ २४ ॥ अदितीचींकुंडलेंआणून ॥ देताजाहलीपृथ्वीआपण ॥ नंतरभामेस-
हितनारायण ॥ नगरप्रवेशकरीतसे ॥ २५ ॥ श्रीहरीजातांअंतःपुरांत ॥ देखिल्याषोडशसहस्रएकशत ॥ राजकन्या
भौमेंसंगृहीत ॥ पाहूनिभुलल्यात्याकृष्णा ॥ २६ ॥ तयांसिबसवूनिवाहनांवर ॥ द्वारकेसीपाठवीसत्वर ॥ आपण
इंद्रलोकींजाऊनिप्रकार ॥ कायकरीतोपरिसा ॥ २७ ॥ कुंडलेंदेवमातेसी ॥ देताजाहलाहृषीकेशी ॥ सर्वेंचियेऊनिनं-
दनवनासी ॥ पारिजातउपटीतेथींचा ॥ २८ ॥ तोघेऊनिगरुडावरी ॥ श्रीकृष्णचालिलाद्वारकापुरीं ॥ तोंइंद्रयेऊनि-
युद्धकरी ॥ शेवटींपराभवपावला ॥ २९ ॥ कल्पवृक्षआणूनिजाण ॥ सत्यभामेच्याउद्यानींरोपण ॥ करिताजाहला
श्रीरमण ॥ द्वारकापुरींउत्सववर्ते ॥ ३० ॥ एक्यामुहूर्तेंकरून ॥ सोळाहजारएकशतेंपाणिग्रहण ॥ करिताजाहलाज-
नार्दन ॥ पृथक्‌मंदिरांमाजीहो ॥ ३१ ॥ दासदासीधनसंपत्ति ॥ समसमानसर्वांप्रती ॥ प्रत्येकगृहींआपणश्रीप-

ती ॥ योगाधीशाराहें सदा ॥ ३२ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ एकोनषष्टितमाध्यायगोडहा ॥ ३३ ॥ ५९ ॥ षष्टितमाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्रीशुकउवाच ॥ कर्हिचित्सुखमासीनंस्वतल्पस्थंजगद्गुरुम् ॥ पतिंपर्यचरद्भैष्मीव्यजनेनसखीजनैः ॥ १ ॥ टीका ॥ श्रीशुकह्मणेसावधान ॥ राया परिसेंचरित्रपावन ॥ एकेदिवसींकृष्णभगवान ॥ सुखशय्येवरी बैसले ॥ १ ॥ तेसमयींभीमकनंदिनी ॥ सन्निधउभी रुक्मिणी ॥ आदिमाताप्रणवरूपिणी ॥ चित्कळासाक्षात ॥ २ ॥ अनेकसखीजनासहित ॥ विंझणाघेऊनिस्वकरांत ॥ जगद्गुरूसीवाराघालित ॥ हास्यमुखीउभीती ॥ ३ ॥ सन्मुखपाहूनिसुंदरी ॥ जगदात्माश्रीहरी ॥ हास्यवदनेंविनोदकरी ॥ नानापरीरुक्मिणीशीं ॥ ४ ॥ राजकन्येपरिसेंमात ॥ महापराक्रमीश्रीमंत ॥ रूपऔदार्यबलवंत इंद्रासमऐश्वर्यें ॥ ५ ॥ पूर्वीतुजलावरावया ॥ जेआलेस्वयंवरीतया ॥ त्वत्कामपीडितहृदयां ॥ कायम्हणूनिउपेक्षिलें ॥ ६ ॥ जनकेंबांधवेंतुजप्रती ॥ देऊंकेलेंइतरानिश्चिती ॥ तयाचीत्यागूनिसंपत्ती ॥ हेंचिकेसेंआवडलें ॥ ७ तुजलायोग्यशिशुपाळ ॥ होतासुंदरनरपाळ ॥ त्याचात्यागकरूनिउनावेळ ॥ कायसाहसहेंकेलें ॥ ८ ॥ त्यागूनिमनोहरभूपाळा ॥ कांमजवरिलेंगोपाळा ॥ येथेंतवविचारयेवेळा ॥ फोलजाहलासर्वस्वें ॥ ९ ॥ जरासंधाचेभयें करून ॥ समरींकेलेंआह्मीपलायन ॥ शेखींसागराजाऊनिशरण ॥ एकीकडेराहिलों ॥ १० ॥ नृपासनछत्रचामर आह्मांसिनाहींसाचार ॥ स्वयेंदरिद्रीआवडेभिकार ॥ प्राणाहुनीमजलागी ॥ ११ ॥ मानापमानकांहीं ॥ राजबाळे आह्मांनाहीं ॥ आतांविवेककरूनिलवलाहीं ॥ आत्महितसाधणें ॥ १२ ॥ वयवित्तआकृतीसमान ॥ पाहूनिवरीनृपनंदन ॥ विवाहअथवामैत्रीपूर्ण ॥ घडतेतुल्यजनाशीं ॥ १३ ॥ आह्मीगुणहीनअसतांभले ॥ नेणूनिकैसेंतुवांवरि-

लें॥ अविचाराचें फळ आपुलें॥ भोगिल्याविण सुटेना॥ १४॥ सुंदर क्षत्रिय पाहूनी॥ वरीं जारा हूनि सदनीं॥ मनोरथ पुरवीं रुक्मिणी॥ विलंबन करी शशांकानने॥ १५॥ चैद्य मागध मंदमती॥ भंगावया त्यांची गर्वसंपत्ती॥ हरण केलें तुज प्रती आणिक कारण असेना॥ १६॥ मी स्त्रीकामुक पाहीं॥ जगामाजी सर्वथा नाहीं॥ मनीं रुचेल तें लवलाहीं॥ करीं वैदर्भी यथोचित॥ १७॥ श्रीशुक ह्मणे यापरी॥ कृष्णावचन परिसूनि सुंदरी॥ भयभीत होऊनि अंतरीं॥ चिंताक्रांत जाहली॥ १८॥ आपुल्या चरणें वसुमती॥ खनन करी रुक्मिणी सती॥ अधोमुखी मौनवती॥ पंखा हाती चा तें निसटे॥ १९॥ धरणीवरी मूर्च्छागत॥ पतन पावली सती त्वरित॥ ऐसें पाहूनि कृष्णनाथ॥ प्रेमबंधनें गहिंवरला॥ २०॥ पलंगा खालीं उतरूनी हरी॥ सांवरूनी रुक्मिणीसी धरी॥ ह्मणे वल्लभे घाबरी॥ नको होऊं येधवां॥ २१॥ स्वकरें केशपाश॥ सांवरूनी जगन्निवास॥ मुख वावरूनी रमाविलास॥ हस्त फिरवी कौतुकें॥ २२॥ बाहू करूनि जाण॥ देऊनियां हृदालिंगन॥ मधुर भाषणें बोलून॥ समाधान पैं करी॥ २३॥ श्रीकृष्ण ह्मणे रुक्मिणी॥ मज वरी दोषारोप येक्षणीं॥ करूं नको राजनंदिनी॥ याचें कारण परिसावें॥ २४॥ तुझें मंजुळ भाषण॥ ऐकाया भ्रम केलें माझें मन॥ या स्तव विनोदें करून॥ सहज बोलिलों जाणतूं॥ २५॥ हे भीरु दंपत्यें परस्पर॥ भाषण करिती विनोदपर॥ गृहस्थाश्रमासी हा लाभ थोर॥ आहे ऐसें मानिती॥ २६॥ श्रीशुक ह्मणे भारता॥ ऐसें समाधान करितां॥ विनोदपर भीमकसुता॥ भाषण तें मानीतसे॥ २७॥ मग ह्मणे देवाधिदेवा॥ कृपासागरा वासुदेवा॥ कोणीकडे तुह्मी केशवा॥ त्रैलोक्यनाथ समर्थ॥ २८॥ आणि मी गुणत्रयरूप निश्चित॥ कोणीकडे पहाय किंचित॥ हे हरे शब्दादि विषयभीत॥ जाणें हृदयीं प्रकाशासी॥ २९॥ नरकतुल्य राज्यासन कुत्सित॥ तव सेवकीं ही परित्यक्त॥ तु वांतें सोडिलें यांत॥ आश्चर्य नसे कांहीं पैं॥ ३०॥ ब्रह्मादिक

रितीतुझें पूजन ॥ यास्तव तुह्मांसी दरिद्र कवण ॥ ह्मणे लक्ष्मीधरप्रियकर पूर्ण ॥ सर्वदा तयांस अससी तूं ॥ ३१ ॥ आद्य तामानूनि मनीं ॥ जे का अंधळे जाहले जनीं ॥ ते तूं काळस्वरूप असूनी ॥ न जाणती निर्धारें ॥ ३२ ॥ तूं सर्व जगाचा आत्माराम ॥ वासुदेव पूर्णकाम ॥ आत्मस्वरूपदायक परम ॥ पुरुषोत्तम तूं देवा ॥ ३३ ॥ ऐसें जाणूनियां हरी ॥ ब्रह्मादिक त्यागूनि सत्वरी ॥ मी तुज वरिलें कंसारी ॥ पूर्णब्रह्मस्वरूपा हो ॥ ३४ ॥ त्वां धनुष्यटणत्कारें करून ॥ जरासंधादि राजा पळवून ॥ विवाहसमयीं केलें हरण ॥ मज लागीं यादवेंद्रा ॥ ३५ ॥ राजियां भेणें सागरासी ॥ शरण गेलों ऐसें म्हणसी ॥ सयुक्तिक नाहीं हृषीकेशी ॥ कारण याचें परिसावें ॥ ३६ ॥ भजनेच्छा धरूनि मनीं ॥ गयादि नृपराज्य त्यागुनी ॥ जाते जाहले काननीं ॥ तव पदप्राप्तीकारणें ॥ ३७ ॥ तेथें ते तव पदाश्रित ॥ होऊनि राहिले दिवसरात ॥ न तयांसी दुःख यत्किंचित् ॥ प्राप्त नाहीं सर्वेश्वरा ॥ ३८ ॥ ते मीन जाहले सुखसागरीं ॥ आपण ह्मणता श्रीहरी ॥ माझे भक्तांसी दुःख भारी ॥ तरी व्यर्थ तें सारें ॥ ३९ ॥ तूं सर्वगुणांची खाणी ॥ पाहूनि मनमोहना तुज सोडूनी ॥ अन्य आश्रय कवण कामिनी ॥ करील जाण निर्धारें ॥ ४० ॥ तस्मात् सर्व जगाचें ईश्वर ॥ असा तुह्मी शार्ङ्गधर ॥ मन याच चरणीं करूनी स्थिर ॥ भजन करित्यें केशवा ॥ ४१ ॥ जे राजे सांगितले चोरव ॥ ते तव पदासी विमुख ॥ ज्या राजकन्या देख ॥ त्यांचे पती होवोत ॥ ४२ ॥ हे श्रीधरा तुमचें भाषण ॥ मिथ्या न सानीं किमपि जाण ॥ याचें परिसावें कारण ॥ लोकीं प्रीती व्यभिचार ॥ ४३ ॥ क्वचित स्थळीं ढळे प्रीती ॥ जैसी काशिराजकन्या सुदती ॥ अंबानामें शाल्वावरती ॥ धरि ते झाली रतीतें ॥ ४४ ॥ तो माझी मती निरंतर ॥ राहो श्रीधरापायीं स्थिर ॥ विवाह जाहल्या जीचें अंतर ॥ नूतनपुरुषीं पें जातें ॥ ४५ ॥ पोषण ऐसे स्त्रियेचें ॥ ज्ञानियानीं न करावें साचें ॥ भाषण ऐसें रुक्मिणीचें ॥ ऐकूनि बोले श्रीहरी ॥ ४६ ॥ परिसें साध्वी रुक्मि

णी ॥ तुझें हें चीवाक्य ऐकावया श्रवणीं ॥ इच्छा होती आमुच्या मनीं ॥ ह्मणूनि विनोद हा केला ॥ ४७ ॥ मीं जो विनोद केला ॥ त्याचा भावार्थ तूं अन्य दाविला ॥ तो सर्व यथार्थपणें लागला ॥ वेदांतमतें माझ्याकडे ॥ ४८ ॥ सर्व साध्वींमाजी सुगुणमणी ॥ हे विदर्भराजनंदिनी रुक्मिणी ॥ मी मोक्षदाता चक्रपाणी ॥ तुझिया वचनीं रत सदा ॥ ४९ ॥ ऐहिक सुखाकरितां ॥ जे का भजती मज अनंता ॥ ते मंदभाग्य जाणत ल्लता ॥ आत्मा हि ताने णती ५० हे स्त्रिये सकळ विषयीं ॥ निष्कामचित्तें करूनि पाहीं ॥ वृत्ती अर्पिली समाझे ठायीं ॥ तरी तूं धन्य शुभानने ॥ ५१ ॥ तसें तुझे स्वयंवरांत ॥ असंख्य आले नरनाथ ॥ त्यांसी न गणून मातें निश्चित ॥ विप्रसंदेश पाठविलासी ॥ ५२ ॥ बंधु वेरूप्य समरीं केलें ॥ अनिरुद्ध-विवाहीं त्या मारिलें ॥ परी आमुच्या वियोगभयें सोशिलें ॥ स्मरणही नुरविलें तूं त्याचें ॥ ५३ ॥ आह्मांकरितां रुक्मिणी ॥ तें दुःख साहिलें आपुले मनीं ॥ आहों अधीन ह्मणउनी ॥ संशय कांहीं ना णिजे ॥ ५४ श्रीशुक ह्मणे परीक्षिती ॥ रुक्मिणीचें समाधान श्रीपती ॥ यापरी करूनी निश्चिती ॥ रममाण होत से ॥ ५५ ॥ तेसेंच जागा घरोघरीं ॥ श्रीहरी रमला गृहस्थापरी ॥ जो सर्वात्मा स्थिर चरीं ॥ व्यासमान चहूंकडे ॥ ५६ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ षष्टितमाध्याय गोड हा ॥ ५७ ॥ ६० ॥ एकषष्टितमाध्याय प्रारंभः ॥ ॥ श्रीशुक ह्मणे रायासी ॥ प्रत्येक श्रीकृष्णस्त्रियेसी ॥ कृष्णासमान निश्चयेशीं ॥ दशदश पुत्र होती पैं ॥ १ ॥ पृथक्पृथक् सदनीं ॥ राहता जाहला चक्रपाणी ॥ हावभाव पाहूनि नयनीं ॥ सौख्यानंदें विराजे ॥ २ ॥ दासदासी घरोघरीं ॥ शतावधी ठेवी हरी ॥ दहा कुमर एक कुमारी ॥ सर्वांलागीं समान ॥ ३ ॥ सोळासहस्रांमाजी देखा ॥ मुख्य जाणा अष्टनायका ॥ तयांच्या पुत्रांचीं नामें ऐका ॥ एकचित्तें भाविक हो ॥ ४ ॥ प्रद्युम्न सुदेष्ण चारु

चारुदेष्णचारुदेहसूचारु॥ चारुचंद्रचारुगुप्तभद्रचारु॥ विचारुसूतहेरुक्मिणीचे॥ ५॥ भानुसूभानुस्वर्भानु॥ प्रभानु
भानुमानचंद्रभानु॥ बृहद्भानुअतिभानुश्रीभानु॥ प्रतिभानुहेसत्यभामेचे॥ ६॥ सांबसुमित्रपुरुजित्॥ शतजित्वि
जयसहस्रजित्॥ वसूमान्आणिचित्रकेत॥ द्रविडक्रतुहेजांबवतीचे॥ ७॥ वीरचंद्रअश्वसेन॥ चित्रगुवृषवेगवा
न॥ आमशंकुवसूश्रीमान॥ सत्यानंदनहेदहा॥ ८॥ श्रुतकविवृषवीर॥ सूबाहुशांतिभद्र॥ दर्शपूर्णमासहेकुमर॥
सोमकासहदहाकालिंदीचे॥ ९॥ प्रघोषगात्रवानसिंहबल॥ ऊर्ध्वगमहाशक्तिप्रबळ॥ सहओजअपराजितसोज्व
ळ॥ लक्ष्मणासतीचेपुत्रहे॥ १०॥ वृकहर्षअनिलवीर॥ गृध्रवर्धनअन्नादघोर॥ महायशपावनवन्हिसाचार॥ क्षु-
धिसहपुत्रमित्रविंदेचे॥ ११॥ बृहत्सेनसंग्रामजित॥ शूरप्रहरणअपराजित॥ जयसूभद्रवामआयुसत्य॥ भद्रा
नंदनहेदहा॥ १२॥ तैसेरोहिणीसरूप्यापासून॥ दीप्तिमान्ताम्रतप्तादिजाण॥ जाहलेदशपुत्रउत्पन्न॥ इतरस्त्रि-
यांसीतैसेची॥ १३॥ रुक्मवतीपासूनिनिश्चित॥ मदनाजाहलाअनिरुद्धसूत॥ त्यांचेपुत्रपौत्रनिश्चित॥ कोट्याव-
धीपुढेंहोती॥ १४॥ स्वयंवरींरुक्मवती॥ वरितीजाहलीमदनाप्रती॥ कृतवर्मात्मजासीचारुमती॥ रुक्मिणीकन्या
अर्पिली॥ १५॥ हरिद्वेष्टारुक्मिया॥ परीभगिनीप्रियत्वावया॥ भोजकूटनगरींबाहूनियां॥ रामकृष्णांआणवी॥
१६॥ निजपुत्राचीकन्यारोचना॥ अनिरुद्धासिअर्पूनिजाणा॥ विवाहकालींउत्सवनाना॥ करितीजाहलाआदरें
१७॥ चारदिवसजाहल्यावर॥ कलिंगादिनृपवर॥ रुक्मियासीबोलतीमधुर॥ द्यूतक्रीडाकरावी॥ १८॥ पणला
वूनियांबहुत॥ बळिरामासिजिंकूंलरित॥ तोयाविद्येंतअशिक्षित॥ परंतुव्यसनीबहुअसे॥ १९॥ रामासिकरू-
निपाचारण॥ नृपांसहरुक्मियाआपण॥ बैसूनिआरंभीलावीपण॥ तोतेणेंचिजिंकिला॥ २०॥ अर्बुदधनलाविल्या

वरी ॥ रामेंजिंकिलापणसत्वरी ॥ रुक्मियाह्मणेआपुलेकरीं ॥ डावम्यांचीजिंकिला ॥ २१ ॥ तेंऐकूनियांवचन ॥ सकळ नृपकरूनीहास्यवदन ॥ ह्मणतीरुक्मियानेंहापण ॥ निःसंशयजिंकिला ॥ २२ ॥ ऐसेंकपटपाहतांनिश्चिती ॥ नभोवाणीजाहलीअवचिती ॥ बळरामेंजिंकिलेंहेनृपती ॥ मिथ्याबोलतीजाणिजे ॥ २३ ॥ आकाशवाणीचाअनादर ॥ करूनियांरुक्मियावीर ॥ बोलताजाहलावचनकठोर ॥ कींयोग्यनृपवरद्यूतासी ॥ २४ ॥ तेथेंगोवळाचेंकामनाहीं ॥ ऐसाबोलिलाकपटेंपाहीं ॥ ऐकूनिरामासिलवलाही ॥ क्रोधप्राप्तजाहला ॥ २५ ॥ परिघघेऊनियांहातीं ॥ बळभद्रें वधिलेंरुक्मियाप्रती ॥ कलिंगादिकनृपजेहांसती ॥ दशनत्यांचेपाडिलें ॥ २६ ॥ राजेराहिलेजेदुसरे ॥ हेंकृत्यपाहूनियांसारे ॥ पळूनिगेलेपरभारें ॥ करपदतोडिलेकवणांचे ॥ २७ ॥ यापरीअनर्थपाहूनी ॥ स्तब्धबैसलीरुक्मिणी ॥ स्नेहभंगभयेंकरूनी ॥ व्यामह्मणूनीनचबोले ॥ २८ ॥ रथींबैसवूनिवधुवर ॥ बलरामयादवश्रीधर ॥ भोजकूटनगरांतूनिसत्वर ॥ द्वारकापुरींपावले ॥ २९ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंधपरमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ एकषष्टितमो० गो० ॥ ३१ ॥ ६१ ॥ ॥ द्विषष्टितमाध्या० प्रा० ॥ श्रीशुकह्मणेभारता ॥ कुरुकुळभूषणासमर्था ॥ सावध्परिसें हरिकथा। भावबळेंकरूनियां ॥ १ ॥ बळीचाज्येष्ठकुमर ॥ नामेंजाणाबाणासुर ॥ तोशोणितपुरींराज्यसुंदर ॥ करिताजाहलाशिवकृपें ॥ २ ॥ नित्यकरीशिवार्चन ॥ तेणेंतोषलाउमारमण ॥ तयानेंदिधलेंवरदान ॥ तेणेंदेवजिंकिले ॥ ३ तोसहस्रबाहुधर ॥ पराक्रमीबाणासुर ॥ तांडवनृत्यमनोहर ॥ करूनितोषवीभवातें ॥ ४ ॥ प्रसन्नहोतांशिवभोळा ॥ असुरमागेतेवेळा ॥ माझ्येनगराच्याप्रतिपाळा ॥ सदाआपणअसावें ॥ ५ ॥ पुढेंकोणेएकेदिवसीं ॥ असुरजाऊनिकैलासीं ॥ स्तवनकरूनीशंकरासी ॥ इष्टवरमागताजाहला ॥ ६ ॥ वीर्यदुर्मदेंकरूनिबाण ॥ तेंवंदन करूनि बोले वचन ॥

सहस्रबाहु युद्धावीण ॥ भार भूल पशुपते ॥ ॥७॥ ॥ प्रतियोद्धा तुजहून इतर ॥ नदिसे मज शौंधुरंधर ॥ तें भाषण ऐकूनि शंकर ॥ सक्रोध बोलते जाहले ॥८॥ जेव्हां रथकेतु पावेल पतन ॥ तेव्हां तव गर्वहरण ॥ योद्धा मिळेल साच वचन ॥ मनामाजी जाणिजे ॥९॥ ऐसी परिसूनियां वाणी ॥ बाण संतुष्ट जाहला मनीं ॥ सद्भावें वंदूनि भवभवानी ॥ नगरामाजी पातला ॥१०॥ उषा नामें कन्या उपवर ॥ त्याची असे मनोहर ॥ स्वप्नामाजी श्यामसुंदर ॥ अनिरुद्ध तिचें हरमतसे ॥११॥ नदेखतां तयासी ॥ उषा बोले सौख्यराशी ॥ मीतव चरणाची दासी ॥ त्यागूनि जातां कां मातें ॥१२॥ उभा राहें प्राणेश्वरा ॥ भाषण करी गुणागारा ॥ तुझ्यावांचूनियां मंदिरा ॥ नसे शोभा तीकांहीं ॥१३॥ ऐसें भाषण करी उखा ॥ स्वप्नीं बरळे देखा ॥ तों सन्निध सचिव कन्यका ॥ चित्रलेखा ती होती ॥१४॥ तिणें वचन सर्व ऐकिलें ॥ ह्मणे सुंदरी हें काय जाहलें ॥ पति मुख न देखतां भलें ॥ काय भ्रम हा तुज लागीं ॥१५॥ ॥श्लोक॥ उषोवाच ॥ दृष्टः कश्चिन्नरः स्वप्ने श्यामः कमललोचनः ॥ पीतवासा बृहद्बाहुर्योषितां हृदयंगमः ॥ १६ ॥ तमहं मृगये कांतं पायचित्वाधरं मधु ॥ क्वापि यातः स्पृहयतीं क्षिप्त्वा मां वृजिनार्णवे ॥१७॥ टीका ॥ उषा बोले साजणी ॥ स्वप्नीं पुरुष देखिला नयनीं ॥ तयाचें रूप माझे मनीं ॥ येऊनियां राहिलें ॥१६॥ श्यामसुंदर कमललोचन ॥ पीतांबर नेसला आपण ॥ सरळ भुजी शोभायमान ॥ स्त्रीमनमोहन तो बाई ॥१७॥ त्यानें आपुलें अधरामृत ॥ प्राशन करविलें मजला पुनीत ॥ मी इच्छित असतां दुःखसमुद्रांत ॥ टाकूनि कोठें तो गेला ॥ १८ ॥ ऐसें परिसूनियां वचन ॥ चित्रलेखा बोले उषेलागुन ॥ जेणें केलें चित्तहरण ॥ तो कोण पुरुष सांगतूं ॥ १९ ॥ त्रैलोक्य शोधूनि निश्चिती ॥ आणूनि देईन तुजप्रती ॥ उखा म्हणे वय आकृती ॥ दृष्टीपुढें परी नवदवे ॥२०॥ तेव्हां त्रिजगभिंतीवरी ॥ चित्रलेखा लेखन करी ॥

तैं द्वारकापुरामाझारी ॥ अनिरुद्ध रेखिला ॥ २१ प्रद्युम्नासी पाहूनि देखा ॥ लज्जित जाहली ते ह्यां उखा ॥ ऐसें पाहूनि चित्ररे खा ॥ ह्मणे आणितें त्यासमी ॥ २२ ॥ नारदस्मरण करूनी मनीं ॥ कुंभांडकसुता ते क्षणीं ॥ जाऊनि द्वारकापट्टणीं ॥ अनिरुद्ध आणी मोहुनी ॥ २३ ॥ सत्वर आणूनि मंदिरीं ॥ उखेसि दावी ते अवसरीं ॥ एकांत पाहूनि निजांतरीं ॥ संतुष्ट जाहली नृपकन्या ॥ २४ ॥ कृष्णापौत्रासंगती ॥ उषा रमे दिवसराती ॥ नाना उपचार अर्पूनि त्याप्रती ॥ पुरवी आपुली वासना ॥ २५ ॥ बाणाचा रथध्वज उन्मळिला ॥ शिववराचा समय आला ॥ ह्मणे योद्धा युद्धा ला ॥ कवण येतो कळेना ॥ २६ कांहीं काळ जातां साचार ॥ उखा जाहली गरोदर ॥ द्वारपाळ जाऊनि सत्वर ॥ बाणासुरा कथिती तें ॥ २७ ॥ कुळदूषणास्पद वाणी ॥ ऐकूनि कोपला बाण मनीं ॥ ससैन्य उखेच्या भुवनीं ॥ येऊनि वेष्टन करीतसे ॥ २८ ॥ अंतःपुरीं बाणासुर ॥ पाहता जाहला चमत्कार ॥ उषा आणी प्रद्युम्नकुमर ॥ द्यूत खेळती एकांतीं ॥ २९ ॥ अनिरुद्ध तें परिघ घेऊन बाणसैन्या करी मथन ॥ शेवटीं नागपाशें बंधन ॥ दैत्यें केलें अनिरुद्धा ॥ ३० ॥ ऐसी पाहूनि यांची करणी ॥ उखा दुःखित जाहली मनीं ॥ शोकाकुल होऊनि ते क्षणीं ॥ रुदन करी आक्रोशें ॥ ३१ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखारामविरचित ॥ द्विषष्टितमाध्याय गोड हा ॥ ३२ ॥ ६३ ॥ त्रिषष्टितमाध्याय प्रारंभः ॥ ॥ श्रीशुक ह्मणे सावधान ॥ राया परिसें कथा पावन ॥ अदृष्ट अनिरुद्ध ह्मणून ॥ यादव समस्त दुःखित ॥ १ ॥ चातुर्मास्य यापरी ॥ गेलें तयांचे विचारावरी ॥ तों ब्रह्मवीणा घेऊनि स्कंधावरी ॥ नारदमुनी पातला ॥ २ ॥ तेणें कथिला वृत्तांत ॥ ऐकूनि राम कृष्ण नाथ ॥ प्रद्युम्न सांब सात्यत ॥ ससैन्य यादव निघाले ॥ ३ ॥ द्वादश अक्षौहिणी दळ ॥ संगें घेऊनियां प्रबळ ॥ शोणितपुरीं तात्काळ ॥ अकस्मात पातले ॥ ४ ॥ बाणासुराचें नगर ॥ वेष्टन केलें समग्र ॥ पुरोद्यान द्वारें साचार

यादवांनीं भंगिलीं ॥ ५ ॥ वृषभारूढ पार्वतीपती ॥ प्रमथस्वामी गणपती ॥ भूतप्रेतपिशाचसंगती ॥ घेऊनि आला तेथवां ॥ ६ ॥ परस्परें समरांत ॥ भिडते जाहले समस्त ॥ युद्ध पहावया अद्भुत ॥ विमानीं सुरगण पातले ॥ ७ ॥ श्रीकृष्णासवें शंकर ॥ मदनासवें स्वामी वीर ॥ कुंभांड कूपकर्ण अनिवार ॥ रामासवें झगडती ॥ ८ ॥ बाणपुत्र भिडे सांबासी ॥ सात्यकी झगडे बाणासी ॥ युद्ध करिते जाहले परियेसीं ॥ तुंबळ क्रोधें करूनियां ॥ ९ ॥ बाण सोडूनियां हरी ॥ भूतप्रेतांसी त्रास करी ॥ गुह्यक डाकिनी कूष्मांड समरीं ॥ जर्जर बहुत झाले ते ॥ १० ॥ शंकरें सोडूनियां बाणें ॥ युद्ध केलें निर्वाण ॥ परस्परां वरी शरसंधान ॥ करिते जाहले हरिहर ॥ ११ ॥ ब्रह्मास्त्रासी ब्रह्मास्त्रें घातें ॥ वायव्यासी पार्वत ॥ आग्नेयावरी पार्जन्य निश्चित ॥ पाशुपतीं नारायण ॥ १२ ॥ ऐसा चाले युद्धप्रकार ॥ श्रीकृष्णें जृंभणास्त्र थोर ॥ योजिलें शिवावरी प्रखर ॥ तेणें जांभया देतो बहु ॥ १३ ॥ कंदर्पें स्कंद पीडिला ॥ युद्ध करितां भागला ॥ शेखीं रण त्यागूनि पळाला ॥ पराभूत होउनी ॥ १४ ॥ बाणासुराची वाहिनी ॥ मारिता जाहला चक्रपाणी ॥ स्वसैन्य व्याकुळ पाहूनी ॥ बाण मनीं चिंतावला ॥ १५ ॥ सात्यकीचा परित्याग ॥ बाण करूनी सवेग ॥ सन्मुख पाहूनि श्रीरंग ॥ अंगावरी धांवला ॥ १६ ॥ पांचशत धनुष्यें सत्वर ॥ करीं घेऊनि बाणासुर ॥ श्रीकृष्णासवें दुष्कर ॥ युद्ध करिता जाहला ॥ १७ ॥ ऐसें पाहूनियां जाणा ॥ काय करी यादवराणा ॥ चापीं जोडूनि उभय बाणा ॥ सारथी रथ छेदिले ॥ १८ ॥ अश्व पाडिले महीवरी ॥ नंतर शंख वाजवी हरी ॥ तो नाद भरिला गगनोदरीं ॥ दशदिशा व्यास होती ॥ १९ ॥ बाणप्राणरक्षणार्थ ॥ तन्माता कोटरा निश्चित ॥ कृष्णाकडे नग्न धांवत ॥ अकस्मात पावली ॥ २० ॥ नग्न ऐसी पाहूनि तेक्षणीं ॥ मुख मुरडी चक्रपाणी ॥ तो अवसर असुर पाहूनी ॥ पुरामाजी पातला ॥ २१ ॥ भूतगणांचा पराभव ॥ करिता जाहला वासुदेव ॥ माहेश्वरज्वर क्रोधभाव ॥

धरूनि वेगें धांवला ॥ २२ ॥ प्रभूनें वैष्णवज्वर सोडिला ॥ तेणें माहेश्वर गांजिला ॥ सभयचित्तें हरिचरणाला ॥ शरण येउनी स्तुति करी ॥ २३ ॥ त्रिशिरज्वर ह्मणे हरी ॥ कृतापराध मी निर्धारीं ॥ क्षमा करूनि ये अवसरीं ॥ रक्षण माझें करावें ॥ २४ ॥ ज्वरासि देऊनि अभयदान ॥ सर्वेंचि पाहे भगवान ॥ तंव रथारूढ आला बाण ॥ पुन्हा समर करावया ॥ २५ ॥ मग त्याशीं श्रीकृष्ण ॥ युद्ध करूनी दारुण ॥ छेदी भुज सहस्र जाण ॥ चार ठेवून अवशिष्ट ॥ २६ ॥ शेंदुरें माखिला गिरिवर ॥ तैसा दिसे बाणासुर ॥ रुधिरें डवरिलें शरीर ॥ पाहूनि शंकर कळवळला ॥ २७ ॥ मग येऊनि कृष्णाजवळी ॥ ह्मणे काय केलें हें वनमाळी ॥ मायामोहित हा दैत्यकुळीं ॥ जन्मूनि तुज न जाणे ॥ २८ ॥ हा बाण माझा प्रियकर ॥ याचा न करावा संहार ॥ सर्वेंचि ह्मणे शार्ङ्गधर ॥ वचन परिसें सदाशिवा ॥ २९ ॥ वधासि अयोग्य बाणासुर ॥ कारण प्रल्हादा दिधला वर ॥ गर्वनाशनार्थ छेदिले कर ॥ बल हें भूभार नाशिलें ॥ ३० ॥ याच्या अवशिष्ट भुजा चार ॥ त्या होतील अजरामर ॥ तव पार्षदगणांमाजी हा थोर ॥ होईल जाण सर्वेश्वरा ॥ ३१ ॥ अभय पावूनि यापरी ॥ बाणें वंदिला श्रीहरी ॥ उषेसहित अनिरुद्ध सत्वरी ॥ रथीं बैसवूनि आणिला ॥ ३२ ॥ यथाविधी पाणिग्रहण ॥ बाणें करविलें उत्सवें पूर्ण ॥ ससैन्य यादवां घेऊन ॥ द्वारकेमाजी हरि आला ॥ ३३ ॥ आनंद जाहला सकळांसी ॥ प्रभातकाळीं या हरिविजयासी ॥ स्मरण करील जो मानसीं ॥ पराजय नाहीं त्याचा ॥ ३४ ॥ श्रीमद्भागवत सारामृत ॥ दशमस्कंध परमपुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ त्रिषष्टितमाध्याय गोड हा ॥ ३५ ॥ चतुःषष्टितमाध्यायप्रारंभः ॥

श्रीशुक ह्मणे रायासी ॥ यदुकुमार एके दिवसीं ॥ उपवनीं क्रीडा करावयासी ॥ सहज गेले सांबादिक ॥ १ ॥ ते उदक पहावया कूपांत ॥ जातें जाहलें अकस्मात ॥ तों सरडा देखिला अद्भुत ॥ ॥ विस्तीर्ण शरीर ज्याचें ॥ २ ॥ पा

शयालूनिकूपांतरीं ॥ काढूं पाहती बाहेरी ॥ नंवतो ह्मालेना जाग्यावरी ॥ स्वस्थपणें बैसला ॥ ३ ॥ आश्चर्य करूनि मनीं ॥ गेले धांवत कुमारभवनीं ॥ वृत्त सांगूनि चक्रपाणी ॥ आले घेऊनि त्या ठाया ॥ ४ ॥ तेथें जाऊनियां हरी ॥ वामकरें काढी बाहेरी ॥ तात्काळ होऊनि दिव्यशरीरी ॥ श्रीकृष्णाचरणीं लागला ॥ ५ ॥ माधव ह्मणे तूं कवण ॥ येरू ह्मणे नृगराजा ण ॥ दानीजनामाजी निपुण ॥ श्रवणीं ऐकिला असेल ॥ ६ ॥ जितुक्या पर्जन्याच्या धारा ॥ तितुक्या धेनु धरामरां ॥ अर्पण करितां यादवेश्वरा ॥ संकट एक पातलें ॥ ७ ॥ सालंकृत धेनु द्विजा दिधली ॥ ती येऊनि माझ्या गोठणीं मिळाली ॥ दुसरे दिवसीं विप्रा अर्पिली ॥ पाहूनि भांडती उभयतां ॥ ८ ॥ सहस्र धेनू द्यावया ॥ सिद्ध जाहलों मी तयां ॥ परी मानसीं नाणूनि दया ॥ मातें शापिलें या परी ॥ ९ ॥ तूं सरडा होऊन ॥ कूपीं पावशील पतन ॥ मग मी वंदून चरण ॥ उच्छापतया मागीतला ॥ १० ॥ ब्राह्मण बोलती नंतरीं ॥ मुक्त होशील कृष्णावतारीं ॥ तें पडलों कूपांतरीं ॥ पावन केलें तुवां समर्था ॥ ११ ॥ या परी बोलूनि साचार ॥ श्रीकृष्णासि केला नमस्कार ॥ विमानीं बैसूनि सत्वर ॥ स्वर्गभुवना नृप गेला ॥ १२ ॥ तैं श्रीकृष्ण यादवांसी ॥ बोलते जाहले त्या समयासी ॥ विषकीं अग्निसरसीं ॥ ब्रह्मस्वे सीं न होती ॥ १३ ॥ विष जो करील भक्षण ॥ तोचि पावेल मरण ॥ कठिण ब्रह्मस्व हुताशन ॥ समूळ कुळ भस्म करी ॥ १४ ॥ अग्निस्पर्श गृहासी ॥ होतां उदकें शमन त्यासी ॥ होतें परि विप्रधनाग्नीसी ॥ उपाय न से शमवाया ॥ १५ या परी बोधूनि यदुकुमारां ॥ श्रीकृष्ण गेले निजमंदिरा ॥ श्रीशुक ह्मणे नरेश्वरा ॥ हरिकथा अवधारीं ॥ १६ ॥ श्रीमद्भागवत सारामृत ॥ दशमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत स्वखाराम विरचित ॥ चतुःषष्टितमाध्याय गोड हा ॥ १७ ॥ ६४ ॥

॥ पंचषष्टितमाध्याय प्रारंभः ॥

॥ श्रीशुक ह्मणे रायासी ॥ आलें बळिरामाचे मानसीं ॥ गोकुळीं जाऊनि स-

वंसी ॥ भेटूनियावेंसत्वर ॥ १ ॥ यापरी करूनियांविचार ॥ संकर्षणबसूनिरथावर ॥ नंदव्रजांत बलवत्तर ॥ स्नेह-
पाशें पातला ॥ २ ॥ गोपगोपींसीपाहून ॥ रामेंनंदाकेलेंवंदन ॥ तेणेंअंकावरीघेऊन ॥ आशीर्वाददीधला ॥ ३ ॥
आलिंगनतयासीकेलें ॥ नेत्रोदकेंअभिषेकिलें ॥ प्रेमेंचित्तगहिवरलें ॥ मधुरवाक्येंकरूनी ॥ ४ ॥ वृद्धगोपांनमीरा
म ॥ कनिष्ठत्याकरितीप्रणाम ॥ सर्वविचारितीक्षेम ॥ कुशलसप्रेमतयासी ॥ ५ ॥ हेसंकर्षणाबांधवासहित ॥ सु-
रवीआहांतकींसमस्त ॥ आमुचेंस्मरणयत्किंचित ॥ साचआहेकींनाहीं ॥ ६ ॥ तुह्मीमारूनिकंसासी ॥ मुक्तकेलेंआ
प्तजनासी ॥ रचूनिअभेद्यदुर्गासी ॥ सागरामाजीराहिला ॥ ७ ॥ गोपिकाबोलतीनंतर ॥ सुरवीआहेकींश्रीधर ॥ स्मरू
नियांमातापितर ॥ येईलकायगोकुळा ॥ ८ ॥ आमुचीसेवामनींकांहीं ॥ स्मरतोकायकेशवपाहीं ॥ हेरामापति
पुत्रादिकांही ॥ त्यागूनिरतलोंज्यातयाशीं ॥ ९ ॥ तेणेंकेलाआमुचाघात ॥ ऐसाकृतघ्नकृष्णनाथ ॥ पुरस्त्रियांवरी
प्रीतीअत्यंत ॥ करूनीसुरवीआहेकीं ॥ ॥ १० ॥ आह्मांवांचूनित्याजला ॥ काळक्रमणहोतोभला ॥ तेसाचिकाळआ
मुचागेला ॥ जाईलपुढेंहीनिश्चयें ॥ ११ ॥ परंतुत्याचास्मरवेंकरून ॥ सहजकाळजातोपूर्ण ॥ दुःखहोतेंआह्मांगह
न ॥ ह्मणूनिरुदनकरितीबहु ॥ १२ ॥ तेधवांबळिरामेंकृष्णाचा ॥ निरोपसांगूनिसाचा ॥ शांतवनकरूनिसर्वांचा ॥
शोककेलानिवारण ॥ १३ ॥ वसंतऋतूमाजीनिश्चित ॥ बळिभद्रराहिलागोकुळांत ॥ संगेंघेऊनिगोपिकाबहुत ॥
यमुनातटींपैंगेला ॥ १४ ॥ पूर्णचंद्राचेंशीतळ ॥ चांदणेंपडलेंसोज्वळ ॥ तयामाजीयादवपाळ ॥ रमताजाहला-
स्वच्छंदें ॥ १५ ॥ वरुणेंमदिराधाडिली ॥ तीवृक्षापासावनिघूंलागली ॥ गोपींसहरामापुली ॥ प्राशनकरितांप्रामहो
य ॥ १६ ॥ तेणेंजाहलेआरक्तनयन ॥ स्वेच्छेंकरितीकाननींभ्रमण ॥ उन्मत्तपणेंतेंगोपीगायन ॥ करूनितद्यश

वाणिती ॥ १७ ॥ तोभगवानजलक्रीडार्थ ॥ यमुनेसीबाहेत्वरित ॥ स्वयेंअसतांउन्मत्त ॥ करूनिकल्पनाबोलेतो ॥
१८ ॥ मीबाहतअसतांसत्वर ॥ केलावाक्याचाअनादर ॥ मगक्रोधेंघालूनिनांगर ॥ ओढूनिआणीसन्निध ॥ १९ ॥
रामबोलेयमुनेसी ॥ हेदुष्टेपापराशी ॥ मीबोलाविलेंअसतांतुजसी ॥ विलंबकेलासीकिमर्थ ॥ २० ॥ तस्मात्तूंस्व
च्छंदेंजाण ॥ करणारीआहेसगमन ॥ तुझेहलाग्रेंकरून ॥ शतओघकरीनमी ॥ २१ ॥ ऐसाकरितांधिःकार ॥ मू-
र्तिमंतयमुनानमस्कार ॥ करितीजाहलीसत्वर ॥ ह्मणेअपराधसाहिजे ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ रामराममम
हाबाहोनजानेतवविक्रमम् ॥ यस्यैकांशेनविधृताजगतीजगतःपते ॥ २६ ॥ टीका ॥ हेमहाभुजाब-
लभद्रापाहीं ॥ तुझापराक्रममीजाणिलानाहीं ॥ एकांशेंप्रभोशिरींधराही ॥ सहजधारणकेलीतुवां ॥ २३ ॥ भक्त
वत्सला ॥ मनमोहना ॥ अभयदेउनिवांचविंप्राणा ॥ मुक्तताकरीयदुनंदना ॥ वंदनचरणाहेंअसो ॥ २४ ॥ विनं-
तिकरितांयापरी ॥ यमुनासोडिलीसत्वरी ॥ गोपींसहितप्रलंबारी ॥ जळक्रीडाकरीतसे ॥ २५ ॥ यथेच्छक्रीडाज
ळांत ॥ करूनिरामगोपींसहित ॥ बाहेरनिघालाअकस्मात ॥ जेवींसूर्यप्रगटला ॥ २६ ॥ महालक्ष्मीयेऊनिआप-
ण ॥ करीबळिरामाचेंपूजन ॥ कमळमाळानीलवसन ॥ सुगंधचंदनभूषणीं ॥ २७ ॥ ॥ श्लोक ॥ अद्यापिदृ-
श्यतेराजन्यमुनाकृष्टवर्त्मना ॥ बलस्यानंतवीर्यस्यवीर्यंसूचयतीवहि ॥ ३१ ॥ टीका ॥ हेराजापरीक्षिती ॥ ओ
घयमुनेचानिश्चिती ॥ आकर्षणकरीयदुपती ॥ कोपवशेंकरूनियां ॥ २८ ॥ तोरामपराक्रमथोर ॥ अद्यापिदृश्य
आहेधुरंधर ॥ जलप्रवाहवक्राकार ॥ चालिलादेखतीजनसर्व ॥ २९ ॥ दोनमासांच्यारजनी ॥ एकयामिनीवत रा-
मालागुनी ॥ जाहल्याऐसाआनंदतेक्षणीं ॥ उद्धवेनंदगोकुळीं ॥ ३० ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंधप-

रमपुनीत ॥ प्राकृतसखारामविरचित ॥ पंचषष्टितमाध्यायगोड हा ॥ ३१ ॥ ६५ ॥ ॥ षट्षष्टितमाध्यायप्रारंभः ॥ ॥
रामगोकुळींगेलियावरी ॥ करूषाधिपतीसत्वरी ॥ पौंड्रुकदुर्मतीद्वारकापुरीं ॥ दूतपाठवीकृष्णाकडे ॥ १ ॥ सुध-
र्मासभेंतजगन्नाथ ॥ बैसलाअसतांयादवांसहित ॥ तौंपौंड्रुकदूतअकस्मात ॥ येऊनिकथीसंदेशा ॥ २ ॥ मीए-
कवासुदेववीर ॥ मजवीणनाहींपर ॥ गरुडध्वजशंखचक्रसुंदर ॥ गदाचिन्हेंहींमाझीं ॥ ३ ॥ चतुर्भुजपीतांबरधा-
री ॥ मीचअवतरलोंपृथ्वीवरी ॥ निजभक्तांचासर्वपरी ॥ सांभाळकरितोंजाणिजे ॥ ४ ॥ तूंमिथ्याअभिधान ॥ वासुदे-
वहेंकरिसीधारण ॥ हेंकायतुझेंअज्ञान ॥ जगामाजीह्मणावें ॥ ५ ॥ वासुदेवनामसोडून ॥ शरणयेऊनिवांचवीप्रा-
ण ॥ तुजदेतोंअभयदान ॥ सत्यवचनहेंमाझें ॥ ६ ॥ हेंजरीतुजनघडे ॥ तरीसंग्रामकरीरोकडें ॥ यादवांसहीबापु-
डें ॥ आह्मांपुढेंबळकितो ॥ ७ ॥ आश्रयभूतभूतांसी ॥ मीचप्रगटलोंयादववंशीं ॥ आतांत्यागीअसत्यनामासी ॥ ना-
तरीप्राणांतनिश्चयें ॥ ८ ॥ श्रीशुककह्मणेभारता ॥ यापरीदूतेंकथितां ॥ उग्रसेनादियादवांसमस्तां ॥ विस्मयहोऊनि
हांसतीबहू ॥ ९ ॥ तेसमयींभगवान ॥ दूतवाक्यकरूनीश्रवण ॥ विनोदपरतयांसीभाषण ॥ बोलतेजाहलेहेरा-
जा ॥ १० ॥ दूताजाऊनिकथींराया ॥ कांअभिमानधरिसीवांयां ॥ मित्रांसहितमृत्युकगयां ॥ अकस्मातजाशीलतूं
११ ॥ मीसोडूनिसुदर्शन ॥ कृत्रिमआयुधेंकरीनछेदन ॥ शंखचक्रकाष्ठमयजाण ॥ बाहूतेंसेजाणपां ॥ १२ ॥ मूर्खा
तुझेंकाळेंतोंड ॥ बाणेंकरीनदुखंड ॥ आतांफुटोंपाहेभंड ॥ रणींकावळेटोंचतील ॥ १३ ॥ श्रीकृष्णआक्षेपयापरी ॥
दूतपौंड्रुकाकथनकरी ॥ काशिराजमित्रघरीं ॥ होतातेव्हांदुष्टतो ॥ १४ ॥ यास्तवश्रीकृष्णनाथ ॥ संगेंयादवघेऊ-
निअमित ॥ दोनअक्षौहिणीउद्धत ॥ सैन्यासहनिघाला ॥ १५ ॥ काशीपुरासन्निधजाऊन ॥ श्रीहरीकरीपांचजन्य

स्फुरण ॥ तेणें मनीं कंपायमान ॥ सकलशत्रु जाहले ॥ १६ ॥ तीन अक्षौहिणीं सहित ॥ काशिराजा निघाला युद्धार्थ ॥ सर्वे कृत्रिम वासुदेव ह्मणवीत ॥ पौंड्रक राजा देखिला ॥ १७ ॥ श्रीकृष्णें देखिला समोर ॥ आपणासमान श्याम सुंदर ॥ रंगलावूनि पीतांबर ॥ धारण केला सद्भावें ॥ १८ ॥ शंखचक्रगदायुक्त ॥ चापखड्ग आयुधें समस्त ॥ कौस्तुभ मणी कंठांत ॥ किरीट कुंडलें त्यापरी ॥ १९ ॥ काष्ठांचीं आयुधें करून ॥ आणि ताजा हलाशोभापूर्ण ॥ नटापरी सोंग घेऊन ॥ युद्धालागीं पातला ॥ २० ॥ गरुडध्वज रथावरी ॥ काष्ठमय करूनी उभारी ॥ कृतीचा वेष पाहूनि हरी ॥ हास्य करिते जाहले ॥ २१ ॥ पौंड्रकें केला भडिमार ॥ शूल गदा परिघ तोमर ॥ तीक्ष्ण बाण कृष्णावर ॥ अत्यद्भुत वर्षतसे ॥ २२ ॥ काशिराजसेनेसहित ॥ पौंड्रकसैन्य जर्जर बहुत ॥ सुदर्शनें करूनी भगवंत ॥ पौंड्रकासी बोलती ॥ २३ ॥ हे दुर्मदा दूतद्वारें ॥ काय बोललासी नीचारे ॥ तीं च अस्त्रें त्यजितों त्वरें ॥ सहन करी ये धवा ॥ २४ ॥ वासुदेव नाम त्यापरी ॥ मिथ्या तुझें नामधारी ॥ बळेंचि होसी पृथ्वीवरी ॥ तें न वकरी त्यजवीन ॥ २५ ॥ आणिक ऐकें एक वचन ॥ मी तव संगें न इच्छीं रण ॥ तरी आज च तुज ला शरण ॥ येईन साच पौंड्रका ॥ २६ ॥ श्रीकृष्णें निंदायुक्त ॥ भाषण करूनियां त्वरित ॥ तीक्ष्ण बाणीं केला विरथ ॥ पौंड्रक वासुदेव तो ॥ २७ ॥ सवेंचि सोडूनि सुदर्शन ॥ त्याचें केलें शिरच्छेदन ॥ काशिनृपाचे देहापासून ॥ मस्तक शीघ्र सोडविलें ॥ २८ ॥ तें शिर उडालें सत्वरी ॥ पडिलें जाऊनि नगरद्वारीं ॥ इकडे यादवांसहित श्रीहरी ॥ द्वारकापुरीं पातले ॥ २९ ॥ काशिरायाचें मस्तक ॥ नगरद्वारीं पाहूनि देख ॥ स्त्रीपुत्र बांधव करिती शोक ॥ सन्निध येऊनि आक्रोशें ॥ ३० ॥ तेव्हां त्याचा नंदन ॥ नामें जाणा सुदक्षिण ॥ उत्तरक्रिया पित्याची करून ॥ ह्मणे उगवीन सूड तो ॥ ३१ ॥ जेणें माझा पिता वधिला ॥ त्यासी शोधूनि ये वेळां ॥ त्याचा कापीन मी गळा-

ळा ॥ तरीच आगळा नृपंत ॥ ३२ ॥ मग उपाध्यायासहित ॥ उपाय करूनियां बहुत ॥ आराधीला रे उमाकांत ॥ भक्तिभावें क
रूनियां ॥ ३३ ॥ प्रसन्न होऊनि शूलपाणी ॥ तयासि बोले ते क्षणीं ॥ हे सुदक्षिणा विप्रां घेउनी ॥ दक्षिणाग्नियजन करावें
३४ ॥ मग तो होऊनि प्रसन्न ॥ जो ब्राह्मणांसी दयाविहीन ॥ ऐशा नराचें करील दहन ॥ कार्यसाध्य होय तेणें ॥ ३५ ॥ शं
करवचनें करूनि निश्चिती ॥ हवन करिता जाहला नृपती ॥ तों प्रमथगणांसहित उग्रमूर्ती ॥ दक्षिणाग्नि प्रगट होय ॥
३६ ॥ तो क्रोधें करूनी साचार ॥ द्वारकापुराकडे सत्वर ॥ धांवता जाहला समोर ॥ सर्व नगर जाळावया ॥ ३७ ॥ श्लोक
अक्षैः सभायां क्रीडंतं भगवंतं भयातुराः ॥ त्राहि त्राहि त्रिलोकेश वह्नेः प्रदहतः पुरम् ॥ ३८ ॥ टीका ॥ सुधर्मसभेंत
मन्मथतात ॥ यादवांसहित क्रीडासक्त ॥ असतां तेथें भयपीडित ॥ जन बहुत पातले ॥ ३८ ॥ आम्हांसि रक्षीं शार्ङ्ग
धरा ॥ जाळितो अग्नि द्वारकापुरा ॥ ऐसें ऐकूनि तया अवसरा ॥ अभय देउनी हरि बोले ॥ ३९ ॥ मी तुमचें करीन रक्षण
आतां करा स्वस्थ मन ॥ शैवी कृत्या ती जाणून ॥ काय करी हरी मग ॥ ४० ॥ तयाचा करावया नाश ॥ सुदर्शन योजी र
माविलास ॥ तें चक्र कोटिभास्करसदृश ॥ त्यावरी तेव्हां धांवलें ॥ ४१ ॥ चक्रें कृत्याग्नि गांजिला ॥ तो तेंसाचि मागें-
सुरडला ॥ काशीनगरीं जाऊनि भला ॥ कायकृत्य करितसे ॥ ४२ ॥ प्रयोगकर्त्या सुदक्षिण ॥ ऋत्विजांसहित केला दह
न ॥ त्याचे पृष्ठभागीं सुदर्शन ॥ काशीमाजी प्रवेशलें ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ दग्ध्वा वाराणसीं सर्वां विष्णोश्चक्रं सुदर्श-
नम् ॥ भूयः पार्श्वमुपातिष्ठत्कृष्णस्याक्लिष्टकर्मणः ॥ ४२ ॥ टीका ॥ विष्णुचक्र काशिकापुरी ॥ दहन करूनियां-
सारी ॥ तात्काळ येऊनि द्वारकापुरीं ॥ कृष्णाहस्तीं राहिलें ॥ ४४ ॥ श्लोक ॥ य एनं श्रावयेन्मर्त्य उत्तमश्लोकविक्रमम् ॥ स-
माहितो वा शृणुयात्सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ४३ ॥ टीका ॥ जो स्वस्थचित्तें करून ॥ पुण्यश्लोकाचे हे गुण ॥ स्वयें करूनियां पठ

ण॥ करवीश्रवणइतरांतें ॥४५॥ तो सर्वपापनिर्मुक्त॥ होतोजाणानिश्चित॥ साक्षिव्यासवचनपुनीत॥ शंकानधराभा-
विकहो॥४६॥श्रीमद्भागवतसारामृत॥दशमस्कंधपरमपुनीत॥प्राकृतसखारामविरचित॥षट्‌षष्टितमाध्यायगो-
डहा॥ ४७॥ ६६ ॥सप्तषष्टितमाध्यायप्रारंभः॥ ॥शुककासिबोलेअभिमन्युनंदन॥ बळिरामचरित्रपावन॥
कथनकराकृपाकरून॥सोख्यागरामुनिराया॥ १॥ श्रीशुकह्मणेसादर॥रायापरिसेंमनोहर॥नरकमित्रद्वि-
विदवानर॥नवनागसहस्रबळी॥२॥श्रीहरीनेंवधिलेंनरकासी॥ऐकूनिकोपलामानसीं॥तयाचासूडघ्यावया
सी॥अनर्थमहीवरीकरीतसे॥३॥पुरग्रामराजधानी॥खेटकव्रजगोष्ठपाहुनी॥बळेंचिलावीजाउनीअग्नि॥
नगणीकवणादुष्टतो॥४॥पर्वतकरींउपटावे॥अन्यदेशावरीटाकावे॥अनेकजंतूमारावे॥उपायकांहींतोनसे॥
॥५॥समुद्रमध्यभागींजाऊन॥जळांतउभाराहूनिआपण॥स्वहस्तेंजळबाहेरउडवून॥देशबुडवूंलागला॥६॥
तैसातोदुष्टवानर॥ऋषिआश्रमींजाऊनिसत्वर॥फलपुष्पदायकतरुवर॥भंगोनिटाकीकौतुकें॥७॥अग्निहोत्र
संबंधीकुंडांत॥मूत्रविसर्जनकपीकरित॥ब्राह्मणांचाकरीघात॥मुष्टिप्रहारेंकरूनियां॥८॥स्त्रीपुरुषघेऊनिस-
त्वरी॥नेऊनिठेवीपर्वतोदरीं॥पर्वतघालूनियांवरी॥आच्छादनकरितसे॥९॥जैसाभ्रमरकीटकांसी॥घेऊनिने
अन्यस्थळासी॥तैसाकपीदोषराशी॥अनर्थबहुतकरितसे॥१०॥कुलस्त्रियाभ्रष्टकरित॥वनचरचालिलापंथक्र
मित॥द्वेषआणूनिमनांत॥आनर्तदेशीपातला॥११॥सुंदरगायनकरूनीश्रवण॥रेवतकपर्वतींआलाधांवून॥तों
तेथेंबळिरामसमनमोहन॥स्त्रियांसहितक्रीडतसे॥१२॥ बळिरामसर्वांगींसुंदर॥कंठींकमळांचेहार॥देहासह
स्रमनोहर॥स्त्रियांसहितविराजे॥१३॥वारुणीमद्यप्राशून॥आरक्तजाहलेजयाचेनयन॥स्वकांतीनेंशोभाय

मान ॥ करीतगायनकौतुकें ॥ १४ ॥ मदोन्मत्तवारणापरी ॥ राममग्नसौख्यसागरीं ॥ होताजाहलातेअवसरीं ॥ पा
हूनिकपीक्षोभला ॥ १५ ॥ आपणबैसूनिवृक्षावरी ॥ वांकुल्यादावूनिनानापरी ॥ मर्कटचेष्टातेधवां करी ॥ रामासन्मु
खदुर्मती ॥ १६ ॥ वृक्षशाखाहालवीबहुत ॥ किलकिलशब्दकरीअमित ॥ हास्यप्रियतरुणीमनांत ॥ कौतुकमा-
नित्याजाहल्या ॥ १७ ॥ रामासमक्षवानर ॥ स्त्रियांसीगुददावीसत्वर ॥ भौंवयाकरूनिवक्राकार ॥ चमत्कारकरी
बहू ॥ १८ ॥ तेव्हांवीरशिरोमणी ॥ बलरामरुष्टजाहलामनीं ॥ पाषाणप्रहारकरीतेक्षणीं ॥ तोचुकविलामर्कटें
॥ १९ ॥ मद्यकलशरामाचा ॥ कपीनेंफोडिलासाचा ॥ ऐसेंपाहूनिकोपाचा ॥ तवकारामाबहुआला ॥ २० ॥ रागआ
णावयासीदाटुन ॥ वानरकृत्यकरीदारुण ॥ स्त्रियांचींवस्त्रेंआकर्षून ॥ फाडिताजाहलातेधवां ॥ २१ ॥ यापरीमदो
न्मत्तवानर ॥ तृणतुल्यमानूनिबलभद्र ॥ कृत्येंकरिताजाहलाफार ॥ अपकारकपेंजाणा ॥ २२ ॥ देशनाशआणिउ-
न्मत्तपण ॥ बळभद्रमानसींआणून ॥ क्रोधेंकरीअरुणनयन ॥ कपिवधकरूंपाहे ॥ २३ ॥ हातींघेमुसळनांगर ॥ तें
पाहूनिद्विविदवानर ॥ हस्तकींघेऊनिशालतरुवर ॥ राममस्तकींआपटी ॥ २४ ॥ तोवृक्षरामेंकरेंझेलिला ॥ मुसळें-
माकडाप्रहारकेला ॥ तेणेंमस्तकभेदझाला ॥ रुधिरवाहेभडभडां ॥ २५ ॥ शेंदुरेंमाखिलागिरिवर ॥ तैसेंदिसेतया
चेंशरीर ॥ रामासिवृक्षेंताडीथोर ॥ तेणेंचूर्णतोकेला ॥ २६ ॥ नंतरतोकपिपती ॥ शिलावृष्टिकरीअती ॥ हेंपाहूनिरे-
वतीपती ॥ मुसळेंतयानिवारी ॥ २७ ॥ महाबलाढ्यवानरभारी ॥ मुष्टीवळवूनिवज्राकारी ॥ कोपेंरामहृदयावक-
री ॥ मारिताजाहलातेधवां ॥ २८ ॥ तेव्हांरामहलत्यागून ॥ बाहूमाजीधरीपूर्ण ॥ संधिस्थानींपिळूनचूर्ण ॥ करिता
जाहलातयातें ॥ २९ ॥ तैंकरीतरुधिरवमन ॥ पावलामहीवरीपतन ॥ रामेंवधितांतयालागुन ॥ पुष्पवृष्टिसुर

करिती ॥ ३० ॥ स्त्रीजनांसहित ॥ द्वारकापुरामाजी त्वरित ॥ येता जाहला वसुदेवसुत ॥ महानंदें करूनियां ॥ ३१
श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचित ॥ सप्तषष्टितमाध्याय गोड हा ॥ ३२
६७ ॥ ॥ अष्टषष्टितमाध्यायप्रारंभः ॥ ॥ श्रीशुक ह्मणे परीक्षिती ॥ परिसें दुजा चरित्राप्रती ॥ कृष्णपुत्र सांब महा
रथी ॥ हस्तनापुरीं पातला ॥ १ ॥ तेथें स्वयंवरीं दुर्योधनसुता ॥ लक्ष्मणा नामें लावण्यलता ॥ तीतें हरण करूनी अव
चिता ॥ कुशस्थळीस मुरडे तो ॥ २ ॥ ते धवां कौरव रुष्ट होऊन ॥ बोलते जाहले काय आपण ॥ विनयरहित यादवनं-
दन ॥ अकृत्य केलें हें तेणें ॥ ३ ॥ तृणवत मानूनि आह्मांसी ॥ हरणा केलें कन्येसी ॥ धरूनियां दांडग्यासी ॥ शीघ्र बंध-
न करावें ॥ ४ ॥ काय भय त्या यादवांचें ॥ आह्मांलागीं असे साचें ॥ पूर्ण योद्धे पराक्रमाचे ॥ आहों बलाढ्य पृथ्वीवरी
५ ॥ जरी तव का धरूनी यादवजन ॥ संग्रामा पातले तरी जाण ॥ तयांचा गर्वहृक्ष छेदन ॥ क्षणमात्रें करूं कीं ॥ ६ ॥ ॥
आह्मीं दिधलेली मही ॥ यादव भोगिती सर्व ही ॥ समता नसे तयां कांहीं ॥ ह्मणूनि पुत्र धरावा ॥ ७ ॥ कुरुवृद्धांचे म-
तें सत्वरी ॥ कौरव निघाले बाहेरी ॥ दुर्योधन कर्ण दळभारी ॥ दुःशासनादि सर्व योद्धे ॥ ८ ॥ सांबबंधन विचार ॥
करिते जाहले अनिवार ॥ अखिल शस्त्रास्त्रें प्रखर ॥ घेऊनि धांवले सक्रोध ॥ ९ ॥ ऐसें करूनी अवलोकन ॥ कृष्णपु
त्र करी शरसंधान ॥ सोडी बाणापाठीं बाण ॥ जर्जर करी बहूत यां ॥ १० ॥ या परी पाहूनि साचार ॥ कौरव करिती
शस्त्रमार ॥ तेणें खिळिला कृष्णाकुमार ॥ सारथी रथाश्व छेदिले ॥ ११ ॥ विरथ करूनियां त्वरित ॥ सांबासि ध-
रिलें अकस्मात् ॥ कन्येसहित गजपुरांत ॥ घेऊनि गेले हे राजा ॥ १२ ॥ नारदमुखें करूनी जाण ॥ द्वारकेंत समज
लें वर्तमान ॥ स्वयंवरीं सांबासी बंधन ॥ दुर्योधनें पैं केलें ॥ १३ ॥ ऐसी परिसूनियां वाणी ॥ यादव कुपित जाह-

लेमनीं ॥ उग्रसेनआज्ञाग्रहणकरूनी ॥ कौरवनाशार्थप्रवर्त्तले ॥ १४ ॥ हेंपाहूनिरेवतीरमण ॥ बोलताजाहला-
कायवचन ॥ कौरवदृष्टोंमाजीजाण ॥ कलहसहसानसावा ॥ १५ ॥ समाधानकरूनीयापरी ॥ बळरामबेसूनिर
थावरी ॥ वृद्धयादवांसहितहस्तनापुरीं ॥ येताजाहलासवेगतो ॥ १६ ॥ उपवनींराहूनिनिश्चिती ॥ उद्धवासी-
धाडिलेंपुढतीं ॥ तेणेंजाऊनिकुरुश्रेष्ठाप्रती ॥ रामागमनकथियेलें ॥ १७ ॥ कौरवऐकूनिसत्वरी ॥ उपायनेंघेऊनि
करीं ॥ सन्मुखजाऊनिसामोपचारीं ॥ पूजनकरितीरामाचें ॥ १८ ॥ कुशलप्रश्नपरस्पर ॥ करितेजाहलेसुखकर ॥
बळरामबोलिलेनंतर ॥ परिसावचनकौरवहो ॥ १९ ॥ उग्रसेनरायेंतुह्मांसी ॥ आज्ञाकेलीनिश्चयेंसी ॥ तीसर्व-
आणूनिमानसीं ॥ आचरणकरातद्वतहो ॥ २० ॥ अधर्मेंकरूनीरणांत ॥ तुह्मींबहुतींएकलासुत ॥ बंधनकेलाहें
अयुक्त ॥ तुह्मांसौजन्यसंबंधें ॥ २१ ॥ कलहनसावाआपणांत ॥ ह्मणूनिआलोंधांवत ॥ आतांजाऊनिस्वपुरांत ॥
आमुचासुतआह्मांद्या ॥ २२ ॥ ऐसीपरिसूनिवाणी ॥ कुपितजाहलेकौरवमनीं ॥ बोलतेजाहलेतेक्षणीं ॥ कायतेंचीपरि
सावें ॥ २३ ॥ अहोचरणसंस्पृष्टशिरीं ॥ बैसोंपाहेयेअवसरीं ॥ कायचमत्कारभूवरी ॥ जाहलाकैसातोपहा ॥ २४ ॥ आमु-
च्याअनुग्रहेंकरून ॥ यादवपावूनिराज्यासन ॥ छत्रचामरराजचिन्ह ॥ सकळभोगभोगिती ॥ २५ ॥ तेआतांबहुतमा-
तले ॥ आह्मीसार्वभौमअसतांभले ॥ ह्मणतीयादवेंआज्ञापिलें ॥ कायआश्चर्यसांगावें ॥ २६ ॥ सर्पासि दिधलेंअमृ-
त ॥ दात्यासिजेसेविरुद्धनियत ॥ तेविंराजचिन्हेंयादवांपुरेत ॥ तींआजपासूनीनिधरिं ॥ २७ ॥ श्रीशुकह्मणे-
राया ॥ ऐसींदुर्भाषणेंकरितीवायां ॥ लक्षूनिरामत्यासमया ॥ दुष्टदुर्जनकौरव ॥ २८ ॥ अवाच्यभाषणेंबोलती
कोणकवणहेंनेणती ॥ हस्तनापुरींत्वरितगती ॥ जातेजाहलेतेसर्व ॥ २९ ॥ कौरवांचादुष्टस्वभाव ॥ अमर्याद

भाषणेंसर्व॥ ऐकतांचिबळदेव॥ सक्रोधचित्तींजाहला॥ ३०॥ उग्रमूर्तिकुपितफार॥ होऊनियांवारंवार॥ हास्यवदनेंभाषणसार॥ कायकरीतेंपरिसें॥ ३१॥ ॥श्लोक॥ नूनंनानामदोन्नद्धाः शांतिंनेच्छंत्यसाधवः॥ तेषांहिप्रशमोदंडः पशूनांलगुडोयथा॥ ३१॥ टीका ॥धनगर्वेंकरूनिमत्त॥ कलहाचीइच्छाकरितीलरित॥ हेकुरुकुलोद्भवकुश्चित॥ अमर्यादभाषणकरितीबहू॥ ३२॥ श्रीकृष्णादियादवजाण॥ कुपितजाहलेपूर्ण॥ तयांचेंकरूनिसमाधान॥ सामाकारणेंपातलों॥ ३३॥ ऐसेंअसतांमंदमती॥ गर्विष्ठहेकलहप्रीती॥ धरूनिबोलतीकुत्सितनिश्चिती॥ अनादरकरितीपैंमाझा॥ ३४॥ भोजवृष्णीअंधक॥ सात्वतयादवइत्यादिक॥ आज्ञाकरावयाप्रभुदेख॥ नाहींतम्हणतीहेंकेसें॥ ३५॥ इंद्रादिलोकपाल॥ ज्यांचीआज्ञापाळितीसकळ॥ श्रीकृष्णयोगेंयादवप्रबळ॥ पृथ्वीमाजीजाहले॥ ३६॥ देवसभासुधर्मानामक॥ तयांतबैसतीयादवसन्मुख॥ स्वर्गींचापारिजातकचोख॥ सत्यभामाउद्यानीं॥ ३७॥ तोप्रभुनृपासनासी॥ योग्यनसेकांबैसावयासी॥ महालक्ष्मीचरणदासी॥ सेवनकरीजासद्भावें॥ ३८॥ ॥श्लोक॥ यस्यांघ्रिपंकजरजोऽखिललोकपालैर्मौल्युत्तमैर्धृतमुपासिततीर्थतीर्थं॥ ब्रह्माभवोहमपियस्यकलाःकलायाःश्रीश्चोद्वहेमचिरमस्यनृपासनंक्व॥ ३७॥ टीका ॥हरिचरणाचेरजें भागीरथीपावनसहज॥ जेंसमस्ततीर्थेंतीर्थराज॥ पवित्रकरीकौतुकें॥ ३९॥ तेंपादोदकशिरावरी॥ धारणकरितीविधिपुरारी॥ सीप्रत्यक्षशेषावतारी॥ महालक्ष्मीतदूत॥ ४०॥ ज्याचेअंशेंअंशभूत॥ आम्हीआहोंतनिश्चित॥ त्याश्रीकृष्णासराज्यासनकुत्सित॥ कायपाडअसेतयाचा॥ ४१॥ कौरवींदिलेलीमही॥ भोगूनिराहतोंसर्वही॥ आम्हीपादरक्षेपरीपाहीं॥ मस्तकापरीश्रेष्ठहे॥ ४२॥ याचेंबोलणेंसहन॥ कोणकरीसामर्थ्यअसून॥ आतांनिष्कौरवीपृथ्वीपू

र्ण॥सहजकरितोंयेधवां॥४३॥ऐसेंबोलूनिअतिरुष्ट॥हलाग्रेंआकर्षीपुरबलिष्ठ॥तैंदक्षिणभागाकडूनिस्पष्ट॥गंगेंत
बुडवूंपाहतसे॥४४॥ऐसापाहूनिअनर्थ॥कौरवघाबरलेसमस्त॥लक्ष्मणासांबासहित॥आणूनिदेतीरामातें॥४५
दुर्योधनादिकरितीनमन॥ह्मणतीआलोंभावेंशरण॥आतांआमुचेंकरारक्षण॥कृपाकरूनीयादवेंद्रा॥४६॥मूढाप-
राधकराक्षमा॥जगद्वंद्यापुरुषोत्तमा॥जगज्जीवनाविश्वकर्मा॥नमोअनंताकरुणाब्धे॥४७॥ ॥श्लोक॥ ॥राम
रामाखिलाधारप्रभावंनविदामते॥मूढानांनःकुबुद्धीनांक्षंतुमर्हस्यतिक्रमम्॥४४॥ टीका॥कौरवह्मणतीरामा
सी॥सर्वाधारदक्षीकेशी॥आपुलाप्रभावजाणावयासी॥समर्थआहेकवणतो॥४९॥आह्मींअज्ञानेंतवप्रभाव॥
जाणिलानाहींसर्वथैव॥कुत्सितबुद्धिधरूनिवाव॥कायअनर्थहाकेला॥४९॥हेप्रभोतवकोपपाहें॥सर्वांच्याशि-
क्षणार्थआहे॥द्वेषबुद्धीवामत्सरनसाहे॥तिळमात्रसर्वेश्वरा॥५०॥सर्वअरिष्टांपासून॥आपणकरितांजगाचेंरक्ष
ण॥कल्पांतीशेषरूपहोऊन॥शय्याहोताविष्णूची५१आपणआत्मासर्वांसी॥आहांतरामासौख्यराशी॥प्राणादिक्रियाशक्तीसी॥-
मुख्यचालकपैंतुह्मी॥५२॥ श्लोक ॥नमस्तेसर्वभूतात्मन्सर्वशक्तिधराव्यय॥विश्वकर्मन्नमस्तेस्तुत्वांवयंशरणंगताः
४८॥ ॥टीका॥हेअनंताबलरामा॥सर्वात्मातूंपूर्णकामा॥यास्तववंदनपुरुषोत्तमा॥सदासर्वदाअसोहें॥५३॥ऐ
सेंकरितांस्तवन॥रामेंदिधलेंआश्वासन॥तयांचेंपरिसूनिवचन॥महाआनंदवाटला॥५४॥कुमरस्नुषांसहितरा
म॥नगरींआणिलाधरूनिप्रेम॥दुर्योधनअंदणसहेम॥देताजाहलाजामात्या॥५५॥द्वादशशतवारण॥दहास
हस्रतुरंगजाण॥तैसेसहासहस्रस्यंदन॥सहस्रदासीतयापरी॥५६॥सुतसांबस्नुषालक्ष्मणा॥संगेंघेऊनियाद
वराणा॥पारिबर्हप्रकारनाना॥ग्रहणकरूनीचालिला॥५७॥बलरामयेऊनिद्वारकापुरीं॥श्रीकृष्णातेंकथनकरी॥

तेव्हां सुधर्मसभेमाझारी ॥ यादवां आनंद जाहला ॥ ५८ ॥ तें गजपुर दक्षिणेस ॥ अद्यापि आहे उंच विशेष ॥ दाखवितें प
राक्रमास ॥ बलिरामाच्या निश्चयें ॥ ५९ ॥ श्रीमद्भागवतसारामृत ॥ दशमस्कंध परम पुनीत ॥ प्राकृत सखाराम विरचि
त ॥ अष्टषष्टितमाध्याय गोड हा ॥ ६० ॥ ६८ ॥ एकोनसप्ततितमाध्याय प्रारंभः ॥ ॥ श्रीशुक म्हणे परीक्षिती ॥ नरकासु
राचा वध श्रीपती ॥ करूनि हरी ज्या सुदती ॥ कन्या सोळा सहस्र ॥ १ ॥ त्यांशीं एके समयीं पाणिग्रहण ॥ पृथक् केलें मु
हूर्त पाहून ॥ पृथक् रूपें करूनि आपण ॥ हें चि आश्चर्य जगत्त्रयीं ॥ २ ॥ तें कौतुक पहावयासी ॥ नारद आले द्वारकेसी
रुक्मिणीसहित श्रीकृष्णासी ॥ मंदिरामाजी देखिलें ॥ ३ ॥ नारदा पाहतां नारायण ॥ पलंगाचा त्याग करून ॥ उत्थापना
सहित वंदन ॥ करूनि बोले स्वागत ॥ ४ ॥ बैसवूनि आसनावरी ॥ पूजन करूनी उपचारीं ॥ हस्त जोडूनि बोले हरी ॥ आ
ज्ञा काय करूं मी ॥ ५ ॥ या परी ऐकूनि वाणी ॥ काय बोले नारदमुनी ॥ तुझा अवतार या मेदिनी ॥ पुण्यकारक जाणिजे ॥
६ ॥ मर्दावया दुष्टांसी ॥ तैसें संरक्षाया संतांसी ॥ प्रगट होऊनि यादववंशीं ॥ लीला करिसी जगदीशा ॥ ७ ॥ तुझें देखतां चरणक
मल ॥ माझें जन्म जाहलें सफळ ॥ ऐसें बोलूनि उतावेळ ॥ नारद गेला अन्य गृहीं ॥ ८ ॥ तेथें उद्धवासहित ॥ अक्षक्रीडा करी कृष्ण
नाथ ॥ नारदा देखूनि सत्कार बहुत ॥ करूनि बोले काय त्या ॥ ९ ॥ बरें आलांत आपण ॥ गृह केलें पावन ॥ पूर्णाचें आम्हीं पू
र्ण ॥ काय करावें मुनीश्वरा ॥ १० ॥ तेथें न बोलतां कांहीं ॥ जाता जाहला अन्य गेहीं ॥ तों मुलें खेळवी शेषशायी ॥ दुसरे गृहीं
मग गेला ॥ ११ ॥ देखिला कोठें स्नान करितां ॥ कोठें अग्नीसी होम देतां ॥ कोठें पंचमहायज्ञ सारितां ॥ कोठें जेववितां ब्राह्म
णां ॥ १२ ॥ कोठें अवशिष्ट विप्रप्रसाद ॥ ग्रहण करितसे गोविंद ॥ कोठें संध्या परमानंद ॥ करी ऐसा पाहिला ॥ १३ ॥ कोठें
खड्गपाणी असतां ॥ कोठें घोडे भ्रमवितां ॥ कोठें शयन करितां ॥ पलंगावरी संतोषें ॥ १४ ॥ कोठें बंदिजन स्तविती ॥ को

ठेंउद्धवासहएकांतीं॥करीतबेसलागुह्योक्ति॥नारदेंऐसादेखिला॥१५॥कोठेंजलक्रीडारत॥कोठेंधेनुविप्रांदेत॥कोठेंइ
तिहासपुराणनिश्चिंत॥श्रवणकरीपरमात्मा॥१६॥कोठेंकरीधर्मसेवन॥कोठेंकरीअर्थसाधन॥कोठेंदिसेहास्यवदन
